दोस्तांची

श्रीरंगपट्टणवर मोहीम.

अथवा

सवाशें वर्षांपूर्वींचा दक्षिण हिंदुस्थान

लेखक

दत्तात्रय विष्णु आपटे

शके १८४३

किंमत दीड रुपया.

मुद्रक व प्रकाशक

शंकर नरहर जोशी

चित्रशाळा प्रेस १०२६ सदाशिव पेठ, पुणें.

प्रस्तावना.

इतिहास म्हणंजे जुन्या व्यवहाराची माहिती. आणि ती ग्रंथावरून व कागदपत्रावरून मिळविण्याचा आपण - प्रयत्न करतों. परंतु व्यवहारापैकीं फारच थोडा भाग कागदावर लिहिला जातो यामुळें केवळ वाचनानें मागील व्यवहाराचें हृद्गत समजणें फार कठीण पडतें. तथापि या अडचणसिहि एक मार्ग मोकळा आहे. जुना असो किंवा नवा असो, हिंदी असो. किंवा इंग्रजी असो जातिस्वभाव फारसा बदलत नाहीं. यामुळें वरवर कितीहि फरक असला तरी आजचा व्यवहार व जुना व्यवहार यांच्या मुळाशीं सारखेपणा बराच असतो. तेव्हां चालू [illegible]हाराची व राजकारणांची गुंतागुंत सोडवून खरा प्रकार ओळखण्याचा प्रसंग [illegible]च्यावर हरघडी येतो अशा व्यवहारचतुर लोकांशीं ऐतिहासिक प्रश्नांची चर्चा करणें [illegible]ळ वेळां फायदेशीर असते. त्यांतून अशा लोकांना ऐतिहासिक प्रश्नांचा विचार कर[illegible]चीं संवय असली म्हणजे फारच मदत होते. हा अनुभव मला वऱ्हाडांतील माझे रा. शामराव प्रल्हाद देशपांडे यांच्याशीं बोलतांना आला. या मार्मिक [illegible]तिहासभक्त गृहस्थांशीं " मराठ्यांचें स्वराज्य नाहींसें होऊन, इंग्रजी राज्याची स्थापना कशी झाली " या प्रश्नासंबंधी चर्चा करीत असतां त्यांनीं असें सांगितलें कीं "कागदपत्र व ग्रंथ काय बोलत असतील तें तुम्ही पहा. पण शौर्याच्या अभावीं मराठ्यांचें राज्य बुडालें नाहीं एवढें खास. महाराष्ट्रांतील लोक रजपुताप्रमाणें केवळ रणांगणावर देह ठेवण्यांत आयुष्याची इतिकर्तव्यता मानीत नसतील. [illegible]ज्यांत धाडस व शौर्य यांचा संबंध नसेल असा व्यवहार महाराष्ट्रांतील लोकांना [illegible]हि गोड वाटत नाहीं."

रा. शामराव देशपांडे यांचें हें मत मला विचार करण्याजोगें वाटलें आणि [illegible]तर जुने कागदपत्र मी पुनः चाळून पाहिले. तेव्हां आमचें स्वराज्य केव्हां व कोठें [illegible]झालें याचा शोध सुरू करण्यास ' श्रीरंगपट्टणावरील मोहीम ' हा प्रसंग योग्य असें माझ्या लक्षांत आलें. या स्वारीच्या वेळीं मराठ्यांचें मराठेपण कायम

मुद्रक व प्रकाशक

शंकर नरहर जोशी

चित्रशाळा प्रेस १०२६ सदाशिव पेठ, पुणें.

प्रस्तावना.

इतिहास म्हणंजे जुन्या व्यवहाराची माहिती. आणि ती ग्रंथावरून व कागदपत्रावरून मिळविण्याचा आपण-प्रयत्न करतों. परंतु व्यवहारापैकीं फारच थोडा भाग कागदावर लिहिला जातो यामुळें केवळ वाचनानें मागील व्यवहाराचें हूबहूब समजणें फार कठीण पडतें. तथापि या अडचणसिहि एक मार्ग मोकळा आहे. जुना असो किंवा नवा असो, हिंदी असो किंवा इंग्रजी असो जातिस्वभाव फारसा बदलत नाहीं. यामुळें वरवर कितीहि फरक असला तरी आजचा व्यवहार व जुना व्यवहार यांच्या मुळाशीं सारखेपणा बराच असतो. तेव्हां चालू …हाराची व राजकारणांची गुंतागुंत सोडवून खरा प्रकार ओळखण्याचा प्रसंग …च्यावर हरघडी येतो अशा व्यवहारचतुर लोकांशीं ऐतिहासिक प्रश्नांची चर्चा करणें …ळ वेळां फायदेशीर असते. त्यांतून अशा लोकांना ऐतिहासिक प्रश्नांचा विचार कर…चीं संवय असली म्हणजे फारच मदत होते. हा अनुभव मला वऱ्हाडांतील माझे रा. **शामराव प्रल्हाद देशपांडे** यांच्याशीं बोलतांना आला. या मार्मिक …तिहासभक्त गृहस्थांशीं " मराठ्यांचें स्वराज्य नाहींसें होऊन, इंग्रजी राज्याची स्थापना कशी झाली " या प्रश्नासंबंधी चर्चा करीत असतां त्यांनीं असें सांगितलें कीं "कागदपत्र व ग्रंथ काय बोलत असतील तें तुम्ही पहा. पण शौर्याच्या अभावीं मराठ्यांचें राज्य बुडालें नाहीं एवढें खास. महाराष्ट्रांतील लोक रजपुताप्रमाणें केवळ रणांगणावर देह ठेवण्यांत आयुष्याची इतिकर्तव्यता मानीत नसतील. …यांत धाडस व शौर्य यांचा संबंध नसेल असा व्यवहार महाराष्ट्रांतील लोकांना …हि गोड वाटत नाहीं."

रा. **शामराव देशपांडे** यांचें हें मत मला विचार करण्याजोगें वाटलें आणि …तर जुने कागदपत्र मी पुनः चाळून पाहिले. तेव्हां आमचें स्वराज्य केव्हां व कोठें …झालें याचा शोध सुरू करण्यास ' श्रीरंगपट्टणावरील मोहीम ' हा प्रसंग योग्य …असें माझ्या लक्षांत आलें. या स्वारीच्या वेळीं मराठ्यांचें मराठेपण कायम

असून ते इंग्रजांना धडाडीनें शह देतांना आढळतात, पण या अंकाचा पडदा पडतांच एकदम सर्व देखावा बदलतो. आणि मराठे हतप्रभ व गोंधळून गेलेले दिसतात!

हें गौडबंगाल समजून घेण्यास इंग्रजी व मराठी कागदपत्रांची बरीच सामुग्री उपलब्ध आहे. ती एकमेकाशीं ताडून पाहून आपणास खरा प्रकार बाहेर आणला पाहिजे. आणि याच दृष्टीनें या राज्यक्रांतीचा प्रास्ताविक भाग या पुस्तकांत आज लिहिला आहे. श्रीरंगपट्टणच्या स्वारीची माहिती देणारे विस्तृत ग्रंथ इंग्रजींत आहेत. परंतु त्यांतला जेवढा भाग मला मराठी कागदपत्रांतून पडताळून पाहतां आला तेवढाच या पुस्तकांत दिलेला आहे.

या पुस्तकांतील विवेचनांत अनेक प्रकारचे दोष राहिले आहेत. यांतील पहिले भाग चित्रमयजगत् मासिकांत वेळोवेळीं प्रसिद्ध केले आणि नंतर एक वर्षानें शेवटचीं प्रकरणें लिहिलीं.यामुळें या लिहिण्यांत ठिकठिकाणीं तुटकपणा व द्विरुक्ति झाली आहे. 'स्वारी' व मोहीम' या सारखे कित्येक महत्वाचे शब्द उलटसुलट पडले आहेत. व या शब्दांतील सूक्ष्म भेद पाळला गेला नाहीं.

तथापि हे सर्व दोष असून देखील हें लिहिणें मी लोकांसमोर मांडण्याचें धा[illegible] करतों. कारण यांतील दोषांची चर्चा करण्यासाठीं कां होईना, पण महाराष्ट्रां[illegible] विचारी लोकांचें या विषयासंबंधीचें मत पुढें यावें ही माझी इच्छा आहे.

या पुस्तकास आधारभूत अशा ग्रंथांची स्वतंत्र यादी देण्याचें कारण न[illegible] त्यांचा निर्देश पुस्तकांतच योग्य ठिकाणीं केलेला आहे. तथापि कांहीं संस्था व व्य[illegible] यांनीं मला या लेखनाच्या कामीं जें मनःपूर्वक सहाय्य केलें त्यांचा येथें कृतज्ञताप[illegible] उल्लेख करणें जरूर आहे. भारत-इतिहाससंशोधक मंडळ, ओरियंटल बुक स[illegible] एजन्सी व चित्रशाळा या संस्थांचा मला फारच उपयोग झाला; याशि[illegible] अष्टेकर कंपनीनें आपल्या संग्रहीं असलेलीं कित्येक दुर्मिळ पुस्तकें वाचण्याची[illegible] देऊन मला उपकृत केलें आहे. रा. दत्तोपंत पोतदार व डॉ. श्रीपतराव बेलव[illegible] यांनींहि मला वेळोवेळीं सूचना करून ग्रंथलेखनाच्या कामीं बरेंच सहाय्य केलें.

पुणें, भाद्रपद शु.
१४ शके १८४३.

दत्तात्रय विष्णु आपटे.

अनुक्रमणिका.

दोस्तांची श्रीरंगपट्टणावर मोहीम
अथवा
सवाशें वर्षांपूर्वीचा दक्षिण हिंदुस्थान.

भाग १ विषय परिचय.

महायुद्धाची इतिश्री झाल्यामुळें त्याची हकीकत म्हणजे आधुनिक इतिहासाचा एक भाग होऊन बसला आहे. तेव्हां तें सुरू होण्यास कारणें काय झालीं, डावपेचाच्या दृष्टीनें त्यांत कोणते गुणदोष आढळून आले, जर्मनांचा व मध्यवर्ती राष्ट्रांचा पराभव कां झाला आणि शेवटीं आतां होणाऱ्या तहानें युरोपांत शांतता प्रस्थापित होईल किंवा हा तह देखील 'कागदाचें चिठोरें' ठरून पुनः युद्धाचा वणवा पेटेल वगैरे अनेक मनोरंजक व महत्त्वाच्या मुद्यांचें विवेचन होणें अगत्याचें आहे. हें विवेचन साधार व सशास्त्र होण्यास आजची माहिती तर भरपूर पाहिजेच. पण त्याबरोबरच यासारखे प्रसंग युरोपच्या इतिहासांत म्हणा किंवा अन्य देशाच्या इतिहासांत म्हणा पूर्वी कोणते होऊन गेले व त्यांचे परिणाम इतिहासकारांनीं काय लिहून ठेवले आहेत हें ताडून पाहिलें असतां महायुद्धासारख्या जबरदस्त उलाढालींत ऐतिहासिक दृष्ट्या टिकाऊ भाग किंवा तत्त्वें कोणतीं व तात्कालिक महत्त्वाचीं कोणतीं हें ठरविण्यास मदत होणार आहे. आणि सव्वाशें वर्षांपूर्वी दोस्त राष्ट्रांनीं श्रीरंगपट्टणावर केलेल्या मोहीमेची जी हकीकत आम्ही देणार आहों तिचा तरी हाच हेतु आहे.

या वेळीं दक्षिण हिंदुस्थानच्या पटावर मराठे, मोगल, इंग्रज व टिपू अशीं चार जवळ जवळ एका तोलाचीं मोहरीं वावरत होतीं. याशिवाय त्रावणकोरचा राजा, सावनूरचा नवाब, फुलचरीचे फरासीस, गोव्याचे पोर्तुगीज व कोचीचे वलंदेज हीं किरकोळ मोहरीं ठिकठिकाणीं मांडलेलीं होतीं. पण हीं डावास प्रारंभ होतांच कोणत्याना कोणत्या पक्षाकडून पुढें सारलीं जाऊन बळी पडणार व त्या अवधींत मोठीं मोहरीं तयारीनिशीं बाहेर निघून

रणधुमाळी माजणार हें उघड दिसत होतें. आणि अखेरीस तसेंच घडून आलें. तथापि निमित्त कारण म्हणून चिमुकल्या राष्ट्रांचीं नांवें वारंवार झळकत असलीं तरी प्रमुख व बलाढ्य व्यक्तींची ' प्रधान मल्ल ' म्हणवून घेण्याची अहमहमिकाच मोठ्या युद्धाचें कारण असतें हा अनुभव सव्वाशें वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत; व आज युरोपांत एकसारखाच आला आहे. याकरितां आम्हीं ज्या मोहिमेची हकीकत देण्याचें योजलें आहे त्यांतील प्रमुख व्यक्तींचा परिचय आधीं करून देतों.

या व्यक्तींत टिपूसुलतानाची गणना अग्रस्थानीं करणें प्राप्त आहे. ' हिंदुस्थानांतील सर्व राष्ट्रें एकीकडे व मी एकटा एकीकडे असा प्रसंग आला तरी मी डगणार नाहीं ' असें तो उघड रीतीनें बोलून दाखवीत असे. कवाइती सैन्याच्या जोरावर मराठ्यांशीं उत्तम रीतीनें तोंड देतां येईल असें त्यास वाटे. निजाम तर त्याच्या खिसगणतींतच नव्हता आणि इंग्रजांना हिंदुस्थानांतून घालवून देण्याची त्यानें प्रतिज्ञा केली होती. शिवाय हे सर्व लोक धर्मलंड आहेत, त्यांचा पाडाव करून महंमदीधर्माचा जगभर प्रसार करण्यासाठीं परमेश्वरानें मला आज्ञा केली आहे असे जाहीरनामे लावून त्यानें आपल्या राजमुद्रेंत देखील अशा अर्थाचीं वाक्यें घातलीं होतीं. आणि त्याच्या आयुष्यक्रमाचा बारकाईनें विचार केला व तो अठराव्या शतकांतला हिंदुस्थानांतला मुसलमीना राजा होता ही गोष्ट जमेस धरली तर त्याच्या आवेशाचें बीज केवळ साम्राज्यतृष्णेंत नसून त्यास थोडा तरी धार्मिक कल्पनेचा ओलावा पोंचत असावा असें वाटतें.

पण धर्मश्रद्धेमुळें असो किंवा जगज्जेतृत्वाच्या कल्पनेमुळें असो, टिपू या वेळीं ऐश्वर्यनगाच्या शिखरावर होता ही गोष्ट खरी आहे. अडीच कोटींचें राज्य, तुडुंब भरलेला खजीना, शस्त्रास्त्रानिशीं सज्ज असें दीड लाख सैन्य, उत्तम तोफखाना आणि राज्याच्या सरहद्दीवर कडेकोट किल्ल्याची तयारी इतकी सामुग्री आपल्या कर्तृत्वानें उभारून त्यानें आपला दरारा सर्वांवर बसविला होता.

टिपूचें अवाढव्य सैन्य व तोफखाना यांची उत्तम स्थिति पाहून तत्कालीन इंग्रजांचा असा समज झाला होता कीं त्याचा खजीना अलोट संपत्तीनें भरलेला असेल आणि त्यानें याकरितां प्रजेची नागवणूक करून त्यांना ' त्राहि त्राहि ' करून सोडलें असेल; अर्थात आपण ससैन्य त्याच्या राज्यांत पोंचतांच लोकांना मोठा आनंद होऊन ते भराभर आपणास मिळतील आणि मग टिपूस अनायासें जिंकता येईल पण हें मत सर्वस्वीं चुकीचें होतें. कारण तत्कालीन इंग्रजी मुत्सद्यांमध्यें व लेखकांमध्यें एक खोड पदोपदीं आढळून येत असे; ती ही कीं शत्रु

म्हटला कीं त्याची बेसुमार निंदा करावयाची. कांहीं ठिकाणीं अर्थात् ही निंदा योग्यच होती. पण केव्हां केव्हां या दृष्टिदोषाची मजल येथवर जाई कीं, जॉर्ज वॉशिंगटनसारख्या शूर आणि देशाभिमानी पुरुषाचे देखील सद्गुण तत्कालीन सामान्य इंग्रजांनाच नव्हे तर त्यांच्या नामांकित इतिहासकारांना सुद्धां दिसत नसत! तोच प्रकार टिपूच्या बाबतीत झाला होता.+ टिपू अत्यंत क्रूर आहे, दुष्ट आहे, तो प्रत्यक्ष राक्षसाचा अवतार आहे असें वाटल्यामुळें आपण एका दुष्टाचा संहार करण्यासाठीं चाललों आहों अशा समजुतीनें इंग्रजी सैन्यास त्वेष चढे व आम्हास मरावें लागलें तरी आमचा देह सत्कारणीं लागला असें त्यांची मनोदेवता सांगे वगैरे गोष्टींमुळें हा अशास्त्रीय स्वभाव त्या वेळीं फायदेशीर ठरला. पण त्यापासून थोडासा तोटाहि झाला. कारण टिपूच्या राज्यांत शिरतांच तेथील लोक आनंदानें आपलें स्वागत करतील व मग टिपू सहजच चिरडला जाईल ही समजूत भ्रामक ठरली. 'टिपू शत्रूच्या मुलखांत कोणतेहि अनन्वित प्रकार करीत असला तरी तो आमच्या सुखासाठीं झटत असतो' असा त्याच्या प्रजेस प्रत्यक्ष अनुभव असल्यामुळें इंग्रज, मराठे किंवा मोगल यांचीं सैन्यें जेव्हां त्याच्या राज्यांत शिरूं लागलीं तेव्हां तेथील लोक त्यांच्या विरुद्ध अत्यंत आवेशानें लढले; व त्यामुळें इंग्रजी सैन्यास दोन वेळा माघार घ्यावी लागली. आणि टिपूच्या प्रजेकडून दोस्तांचें स्वागत होण्याऐवजीं त्यांच्या सैन्यास टिपूच्या राज्यांतील प्रत्येक किल्ल्यावरील लोकांशीं लढावें लागलें. अर्थात् या बाबतीत आपला अंदाज कसा चुकला याविषयीं तत्कालीन इंग्रजांनीं मोठें आश्चर्य व्यक्त केलें आहे. त्याचप्रमाणें टिपूजवळ अलोट संपत्ति असेल व प्रजा फाजील करानें त्रस्त झाली असेल ही गोष्ट देखील अनुभवाच्या कसोटीस उतरली नाहीं. कारण वस्तुस्थिति अशी होती कीं टिपूनें मोठें सैन्य बाळगलें तरी तो त्याचें ओझें लोकांवर पडूं न देतां परस्पर शत्रूच्या राज्यांत लूट मिळवून त्यांतून तो लष्करी खर्च भागवीत असे. यामुळें प्रजेवर कराचें ओझें बेताचें असून लोक समृद्ध व सुखी होते. सारांश, टिपूविषयीं आज ज्या सामान्य कल्पना आहेत त्या पौराणिक थाटाच्या आहेत. राम म्हटला कीं सद्गुणाचा पुतळा व रावण म्हटला म्हणजे दुर्गुणाचें भांडार असें चित्र काढण्याची आमच्या पुराणांची पद्धति आहे. तीच इंग्रजांनीं येथें अनुसरल्याचें दिसतें. पण आपणास ही चुकीची पद्धति न स्वीकारतां खरोखर टिपू कसा होता हें पहावयाचें आहे.

टिपूला या वेळीं खरा मित्र असा हिंदुस्थानांत कोणी दिसला नाहीं. एक फ्रेंच मात्र मैत्री जोडण्यास योग्य आहेत असें त्यास वाटे; व अडचणीच्या वेळीं तो त्यांची मदत मिळविण्याचा

+ मिल्नें आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासांत असाच अभिप्राय व्यक्त केला आहे.

प्रयत्न करी व तेहि ती आनंदानें देत असत. यामुळें उभयतांचें चांगलें रहस्य जमून त्यापासून टिपूचा एकंदरींत फायदा झाला. तरी एक मोठें नुकसान झालें, तें असें कीं, तो इंग्रजांचा पक्का द्वेष्टा बनला. इंग्रज व टिपू यांचें वैमनस्य येण्यास अनेक कारणें हिंदुस्थानांतल्या तत्कालीन परिस्थितींतच होतीं. दोघेहि येथें साम्राज्य मिळवूं पाहत असल्यामुळें त्यांच्यांत वितुष्ट वाढणें अपरिहार्यच होतें. पण या वितुष्टास जी तीव्रता आली होती त्यास कारण टिपूचा फ्रेंचाशीं असलेला संबंध हें होय. युरोपांत इंग्रज व फ्रेंच यांचें वैमनस्य कित्येक शतकांपासून चालत आलें होतें. तेव्हां आपला इंग्रजांविषयींचा द्वेष त्यांनीं सहजच टिपूच्या अंतःकरणांत बिंबविला. आणि अखेरीस हा द्वेष टिपूच्या नाशास कारण झाला. एरव्हीं त्याच्या मनांत इंग्रजांविषयीं पराकाष्ठेची अढी नसती तर आपणहून त्याच्याशीं कुरापत काढण्याची तत्कालीन इंग्रजांना इच्छा झाली नसती.

फ्रेंचांच्या संसर्गानें इंग्रजांविषयीं टिपूच्या मनांत दीर्घद्वेष तर रुजला होताच; पण याशिवाय त्यांच्याविषयीं तिरस्काराची भावना बळावत चालली होती. ‘ इंग्रजांची मात्रा माझ्यापुढें चालणार नाहीं, मनांत आणीन मी तेव्हां त्यांचा नक्षा जिरवीन ’ असें तो वारंवार म्हणत असे. आणि १७८३।८४ सालीं इंग्रजांशीं झालेल्या सामन्यांत त्यास जें अभूतपूर्व यश आलें त्यामुळें त्याचें डोकें फिरून जाणें स्वाभाविक होतें. त्या सालीं मद्रासचे इंग्रजी अधिकारी टिपूच्या सैन्यानें इतके जर्जर होऊन गेले कीं टिपूविरुद्ध लढणारा इंग्रजी सेनापति फुलर्टन यास त्यांनीं श्रीरंगपट्टणाकडे चाल न करतां परत फिरण्यास भाग पाडलें व फुलर्टननें काबीज केलेला प्रांत टिपूस परत दिला. आणि मद्रासचा गव्हर्नर लॉर्ड माकार्टने यानें एकदम टिपूशीं तहाचें बोलणें सुरू करून टिपूकडून उत्तर येईपर्यंत आपणहून युद्ध तहकूब ठेवलें. हा मूर्खपणाचा प्रकार तावडतोब बंद करण्याबद्दल हेस्टिंग्जनें हुकमावर हुकूम पाठविले; पण ‘ कलकत्त्यास बसून पाठविलेले हुकूम आम्ही मानणार नाहीं आम्हास जें योग्य दिसेल तें केलें पाहिजे ’ असा मद्रासकरांनीं हट्ट चालविला.

टिपूनें यामुळें अर्थात् शेफारून इंग्रजांची टवाळी करण्यास प्रारंभ केला. तीन महिनेपर्यंत इंग्रजांच्या सूचनेकडे आपलें लक्ष नाहीं असें दाखवून हलकेच त्यानें आपला एक हस्तक मद्रासेस पाठवून तहाचें बोलणें करण्यासाठीं इंग्रजांनीं वकीलाची रवानगी करावी असें सुचविलें. मद्रासकरांनीं त्याप्रमाणें दोन कमिशनर टिपूशीं तहाची वाटाघाट करण्यासाठीं मंगलोरकडे धाडले. यानंतर टिपूनें त्यांच्याशीं जें वर्तन केलें त्यावरून त्याच्या उथळ स्वभावाची, बेगुमानपणाची आणि मुत्सद्देगिरीच्या अभावाची चांगली साक्ष पटते. ते दोन

वकील येतांच त्यानें चोहोंकडे मुद्दाम पत्रें पाठवून असा पुकारा केला कीं इंग्रजांनीं 'तह करा म्हणून माझी विनवणी करण्यासाठीं मजकडे दोन वकील पाठविले आहेत.' आणि एव-ढ्यावर न थांबतां त्या दोन वकीलांची पदोपदीं मानहानि करण्याचा व टर उडविण्याचा त्यानें उपक्रम केला. ते प्रवास करीत असतांना त्यांना ठिकठिकाणीं सामान्य माणसाप्रमाणें अड-विण्यांत येई व ते ज्या तंबूंत उतरले असतील त्याच्यासमोर अनेक बीभत्स प्रकार होत! अडचणींत सापडल्यामुळें त्या कमिशनरांनीं हें सर्व सोसून घेतलें, पण त्याबरोबरच त्याचा सव्याज सूड उगवण्याचा निश्चय त्यांच्या अंतःकरणांत याच वेळीं कायम झाला असेल हें उघड आहे. 'टिपूशीं चाललेली ही तहाची वाटाघाट इंग्रजांच्या इभ्रतीस हानिकारक आहे व ती बंद करा' असें हेस्तिंग्जनें मद्रासरकारांस पुनः लिहिलें.पण मागें सांगितल्याप्रमाणें त्यांनीं तो हुकूम अमान्य केला आणि हें प्रकरण डायरेक्टरांपर्यंत गेलें.दुर्दैवानें या वेळीं होम-गव्हर्नमेंटमध्यें हेस्तिंग्जची पत नाहींशी झाली होती. यामुळें त्यांनीं मद्रासरकारचें करणें मंजूर केलें. अर्थात् कमिशनरांनीं कसेंहि करून टिपूची गांठ घ्यावी असा विचार कायम ठरला. टिपूहि त्यांची गाठ घेण्यास कबूल झाला, कारण या वेळीं त्यानें इंग्रजांकडला मंगळूरचा किल्ला हस्तगत केला होता. 'माझ्यावर चालून येणाऱ्या इंग्रजी सेनापतीला मागें फिरावें लागलें पण मी इंग्रजांचा पराभव करून मंगळूर घेतलें' असें आढ्यतेनें सांगत त्यानें इंग्रजी कमिशनरांना आपल्या भेटीस येण्याची परवानगी दिली. आणि इतकेंहि करून तह करणार किंवा नाहीं याचा तो पत्ताच लागू देईना! परंतु 'इंग्रजांशीं मिटतें घ्या नाहींतर आम्ही त्यास मिळून तुमच्यावर चालून येऊं' अशी मराठ्यांनीं धमकी दिल्यामुळें टिपूला तहावर सही करावी लागली. पण ही गोष्ट लोकांत सांगतांना तो असें म्हणत असे कीं "इंग्रजांचे कमिशनर माझ्यापुढें दोन तास टोपी काढून, तहाचा खलीता हातांत घेऊन, त्यावर सही करण्यासाठीं माझें मन वळावें म्हणून अनेक गौरवपर व नम्रपणाच्या शब्दांनीं विनवीत होते. आणि त्या विनवण्यांतच पुण्याच्या व हैदराबादच्या वकीलांनीं सूर जोडून दिला होता. यामुळें (परमेश्वराच्या छायारूपी) आमच्या स्वारीनें सदय अंतःकरणानें त्यास संमति दिली!" *

टिपूच्या उद्दाम स्वभावाची कल्पना येण्यासाठीं हा मासला आम्हीं येथें दिला आहे. तो पराक्रमी होता, कर्तृत्ववान होता, राज्यव्यवस्था कशी ठेवावी हेंही तो जाणत होता, पण बडबड्या व बेफाम स्वभावामुळें त्यानें सर्वांना आपले शत्रु करून ठेवले होते. वस्तुतः मंगलोर

---

* मार्शमनकृत हिंदुस्थानचा इतिहास पहा.

घेतल्यांबद्दल टिपूनें एवढें शेफारण्याचें कारण नव्हतें. त्या किल्ल्यांत इंग्रजांचे फक्त २७ शें लोक असून टिपूच्या एक लाख सैन्यास त्यांनीं नऊ महिनेपर्यंत झुलविलें. आणि शेवटीं उपासमार होऊन केवळ अस्थिपंजर असे ७१८ शें लोक शिल्लक राहिले तेव्हां किल्ला टिपूच्या हस्तगत झाला. म्हणजे बहादुरीच वर्णन करावयाची तर ती किल्ला लढविणाऱ्या कर्नल कँबेलची केली पाहिजे. पण टिपूचा स्वभाव अहंमन्य असल्यामुळें जें जें घडलें तें तें माझ्या पराक्रमानें घडले असें जगास भासविण्याचा तो प्रयत्न करी. पण कांहीं दिवसांनीं यामुळें त्याचें त्यासच असें वाटू लागलें कीं ' मी इंग्रजांसच काय पण साऱ्या जगास भारी आहें. ' अर्थात मराठे, मोंगल व इंग्रज या सर्वांविषयींच तिरस्काराचे उद्गार टिपूच्या तोंडून निघूं लागले. यामुळें आस्ते आस्ते सर्वांच्या मनांत प्रतिक्रिया सुरू होऊन ते तिघेहि एक होऊन टिपूवर चालून आले.

आतां दुसऱ्या बाजूचा मुख्य मोहरा कार्नवालीस कसा होता तें पाहूं. वयानें तो टिपूपेक्षां अकराच वर्षांनीं वडील; पण अनुभवानें व शहाणपणानें शतपटीनें मोठा होता. टिपूनें दक्षिण हिंदुस्थानापलीकडचें जग पाहिलें नव्हतें; पण कार्नवालिसनें त्रिखंड शोधलें होतें. इंग्लंडांत जन्म पावल्यामुळें युरोपियन राजकारणाची तर त्याला खडानखडा माहिती होतीच; शिवाय अमेरिकन युद्धांत सेनापति या नात्यानें चांगला अनुभव मिळाल्यापासून त्याच्या धाडशी स्वभावास सावधपणाची जोड मिळाली होती. पण कार्नवालिसचा सर्वांत महत्त्वाचा गुण म्हटला म्हणजे, तो अठराव्या शतकांतील अस्सल **विलायती मुत्सद्दी** होता, हा होय. हे विलायती मुत्सद्दी अत्यंत देशाभिमानी व अविश्रांत परिश्रम करणारे होते. देशाचें वैभव, संपत्ति व इभ्रत कशी वाढेल या विषयाखेरीज त्यांना दुसरा ध्यास नव्हता. कोणत्याहि कृत्याची योग्यायोग्यता ठरवितांना ' त्यामुळें देशहित साधलें किंवा नाहीं ' ही एकच कसोटी त्यांनीं ठेवली होती. न्याय, अन्याय, पापपुण्य वगैरे सर्व विचार दुय्यम महत्त्वाचे समजून ते राष्ट्रासाठीं झटत होते. वॉरनहेस्टिंग्जनें अन्याय केले, क्रूरपणा केला, लोकांना नागविलें वगैरे अनेक आरोप बर्कनें मोठी खटपट करून व उत्तम भाषेंत त्यांची मांडणी करून इंग्रजी लोकसभेंतील प्रतिनिधींपुढें त्यांची सिद्धता करून दाखविली. आणि त्यांची त्याबद्दल खात्रीही झाली. पण या सभासदांनीं शेवटीं एकच प्रश्न केला कीं, " हेस्टिंग्जनें इंग्लंडच्या संपत्तींत भर टाकून इंग्लंडचें राज्य वाढविलें किंवा नाहीं ? " आणि या एका प्रश्नास हेस्टिंग्जला अनुकूल असें उत्तर मिळताच त्याचे सर्व अपराध माफ होऊन त्यास सोडून देण्यांत आलें आणि कंप-

नाच्यां चालकांनीं तर त्याचे आभार मानून वर भरपूर पेनशन दिलें. हें उदाहरण या विलायती मुत्सद्यांच्या विचारसरणीचें निदर्शक आहे. आणि कार्नवालिस हा यांचा पट्ट शिष्य असल्यामुळें त्याची परीक्षा करतांना नुसतीं भाषणें व खलीते वाचून कोणतेंहि अनुमान काढणें योग्य होणार नाहीं. त्यांत पदोपदीं परस्परविरोधी विधानें आढळतील. अमेरिकन वसाहतींनीं बंडाचें निशाण उभारलें तेव्हां त्यांच्या स्वातंत्र्यप्रियतेची तारीफ करणाऱ्यांपैकीं तो एक होता. पण इंग्लंडची अब्रू जाते असें दिसतांच तो अमेरिकन लोकांवर पाठविलेल्या इंग्रजी सैन्यांत सामील झाला व त्यानें त्यांचा पराभव करण्यासाठीं कसून मेहनत केली. पुढें थोडा वेळ इंग्रजांचें आरमारी वर्चस्व नाहींसें झाल्यामुळें तो ससैन्य वेढला गेला आणि अखेर त्याला शत्रूस शरण जावें लागलें हा भाग निराळा; पण त्याच्या कृत्यांत उत्कट देशाभिमान दिसून येतो हें निर्विवाद आहे. आणि त्याच्याबद्दल अशी खात्री असल्यामुळेंच एवढ्या पराभवानंतर देखील पिटनें त्याला हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल नेमून स्वतंत्रपणें वागण्याची पूर्ण मुखत्यारी दिली. 'अमेरिकन युद्धांत पराभव झाला हें एक इंग्रजांचें सुदैवच समजलें पाहिजे' अशी जी इतिहासांत एक म्हण आढळते तिचा तरी अर्थ असाच आहे कीं त्यामुळें तत्कालीन विलायती मुत्सद्यांचें लक्ष अमेरिकेकडून वळून हिंदुस्थानाकडे लागलें आणि त्यामुळें इंग्लंडचा मोठा फायदा झाला. तोंपर्यंत 'हिंदुस्थानांत आपली एक व्यापारी कंपनी आहे व ती इंग्लंडांत बराच पैसा आणते' यापलीकडे हिंदुस्थानची माहिती मोठमोठ्या मुत्सद्यांना देखील नव्हती. यामुळें कंपनीच्या नोकरांनीं माजविलेल्या गोंधळाकडे त्यांचें फारसें लक्ष जात नसे. वरिष्ठ मुत्सद्यांचा दाब नसल्यामुळें या वेळीं हिंदुस्थानांत कित्येक इंग्रजी अधिकारी इतके नादान झाले होते कीं त्याचें वर्णन वाचलें म्हणजे मोठें आश्चर्य वाटतें. ही स्थिति पाहून कार्नवालिसनें एके प्रसंगीं असे उद्गार काढले आहेत कीं, "हिंदुस्थानांतून जे इंग्रज परत विलायतेस जातात त्यांपैकीं गबर लोक बदमाष (rogue) असले पाहिजेत आणि हात हालवीत, रिकामा खिसा ठेऊन परत आले असतील ते मूर्ख असले पाहिजेत, असा इंग्लंडांतील लोकांचा सर्वसाधारण समज आहे." लाचखाऊपणाचे कांहीं मासले तर अगदीं पाहण्याजोगे होते. हिंदुस्थानांतील इंग्रजी सेनाधिपतीनें आपल्या दोन बगलबच्चांकडे पलटणें उभारण्याचें काम सोपविलें; आणि त्या बहाद्दरांनीं एकहि नवीन शिपायाची भरती न करतां सबंद दोन पलटणींतील शिपायांचा पगार मात्र आपल्या खिशांत टाकण्याचा क्रम ठेवला! बनारसच्या राजाच्या दरबारीं जो पोलिटिकल एजंट होता त्याचा पगार दरमहा एक हजार रुपये होता पण त्याची दरसा-

ल्ची प्राप्ती चार लाखांची! सारांश, या वेळीं हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याची स्थिति अत्यंत असमाधानकारक होती. क्लाइव्ह व वॉरन हेस्टिंग यांनीं इंग्रजी राज्याची मुहूर्तमेढ रोवली असें म्हणण्याचा प्रघात आहे आणि अक्षरशः पहावयाचें असेल तर ही गोष्ट खरी आहे. पण ती मेढ बंगाल्यांत व मद्रासेंत म्हणूनच रोवली गेली हें लक्षांत ठेवलें पाहिजे. या दोन प्रांतांत एके वेळीं अत्यंत बजबजपुरी माजली असून राज्यकर्ते अगदीं ऐदोबा बनले होते. यामुळें तेथें कोणाही धाडसी मनुष्यास आपलें बस्तान बसविण्यास उत्तम संधी मिळण्याजोगी होती. आणि म्हणूनच क्लाइव्हचा लाग साधला. पण राज्य स्थापल्यानंतर तें कायम राखण्यास केवळ धाडसानें काम भागत नाहीं; त्यास पोक्तपणा, दूरदृष्टि, नीतीची चाड आणि थोर पुरुषांच्या सहवासानेंच लाभणाऱ्या कित्येक गुणांची आवश्यकता असते. आणि हे गुण क्लाइव्ह किंवा हेस्टिंग्ज यांच्या अंगीं असण्याचें कारणच नव्हतें. हे दोन गृहस्थ इंग्लंडांतील मुत्सद्यांनीं मुद्दाम निवडून राज्य करण्यासाठीं पाठविलेले नव्हेत. आईबापांनाही जड झालेला क्लाइव्ह देशांत पोट भरेना म्हणून कंपनीच्या दुकानांत कारकुनी करावी या हेतूनें हिंदुस्थानांत आला. आणि धाडसी स्वभाव असल्यामुळें व हलक्या प्रतीच्या शत्रूशीं गाठ पडल्यामुळें त्याला युद्धांत विजयश्रीनें माळ घातली व तो एकदम वरिष्ठ हुद्यावर पोंचला. पण त्या आसनावर बसून काम चालविण्याची त्याची पात्रता नसल्यामुळें हाताखालचे अधिकारी वाटेल तसें वर्तन करूं लागले. हेस्टिंग्ज यापेक्षां कांहींसा वरच्या दर्ज्याचा खरा; पण त्याची देखील आवरशक्ति बेताचीच होती. यामुळें मराठे व हैदर यांसारख्या प्रबल शत्रूंशीं सामना देण्याची वेळ आली तेव्हां हेस्टिंग्जची तारांबळ उडाली. याच वेळीं हैदर मेला व इंग्रजांशीं तह करून दिल्लीचें तक्त काबीज करण्याची महादजी शिंद्याची वंशपरंपरागत इच्छा अनावर झाली यामुळें प्रसंग निभावला. यानंतर वारन हेस्टिंग्ज किंवा बेथल्याच अधिकाऱ्यांपैकीं एखादा इंग्रज गव्हर्नरजनरल राहिला असता तर इंग्रजी राज्याची बढती होण्याऐवजीं पिछेहाटच झाली असती असें मानण्यास भरपूर आधार आहे.

पण मागें सांगितल्याप्रमाणें अमेरिका हातची गेल्यामुळें विलायती मुत्सद्यांना आपल्या विश्वासांतला एक पुरुष निवडून या वेळीं हिंदुस्थानांत पाठविण्याची बुद्धि झाली. इंग्लंडांत असो किंवा कोणत्याहि देशांत असो, खरी कर्तृत्ववान व प्रभावशाली माणसें साऱ्या राष्ट्रांत मिळून हाताच्या बोटांवर मोजण्याइतकींच असावयाचीं. आणि तीं राष्ट्रास लाभतील तेव्हां राष्ट्राचा उत्कर्ष होतो आणि त्यांच्या अभावीं अपकर्ष होत असतो. या वेळीं इंग्लंडांत पिटच्या हातांत सर्व राज्यसूत्रें आलीं होतीं. तो व्यवहारचतुर व धोरणी असल्यामुळें त्यानें ओळखलें

कीं, हिंदुस्थानाकडे आतां हुषार मनुष्य पाठवून त्याला कोणतेंहि बंधन न ठेवतां जें योग्य दिसेल तें करण्याची पूर्ण मुभा ठेवावी. मात्र त्यानें इंग्रजांचा नांवलौकिक हिंदुस्थानांत वाढविण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन पार पाडली पाहिजे. आपल्या भावी कारकीर्दीस विलायतेंत लावल्या जाणाऱ्या या कसोटीची बरोबर कल्पना कार्नवालिसला पूर्णपणें होती. कारण तो त्यांच्या तालमींत वागलेला होता. अर्थात् तो हिंदुस्थानांत कारभार करतांना निश्चयानें पाऊल टाकीत असे. कौन्सिलरांचें बहुमत, इंग्लंडांतील डायरेक्टर अगर प्रधान यांचे हुकूम किंवा हेस्तिंग्जनें ठरविलेलें धोरण वाटेल तेव्हां खिशांत ठेवून तो प्रसंगोचित वर्तन करी. ज्या कौन्सिलरांच्या बहुमतामुळें हेस्तिंग्जनें कंटाळून राजिनामा दिला तें बहुमत कार्नवालिसनें वाटेल तेव्हां बाजूस ठेवावें असा पिटनेंच त्याला अधिकार दिला होता, तेव्हां त्यानें तसें केल्यास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. पण आश्चर्य हें कीं, खुद्द डायरेक्टरांच्या व प्रधानमंडळाच्या खलीत्यांतील सांगण्याच्या अगदीं उलट तो हिंदुस्थानांत वागला असून तो परत विलायतेस जातांच त्याची पाठ थोपटून त्यास मार्क्विस ही पदवी देण्यांत आली हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. 'राज्यविस्तार करूं नका व एतद्देशीय संस्थानिकांच्या भानगडींत पडूं नका' अशीं कलमें त्यांच्या खलीत्यांत असलीं तरी राष्ट्रहितास बाधक होतील तर तीं पाळण्याचें कारण नाहीं हें कार्नवालिसनें ओळखलें. व पिटचा कार्नवालिसच्या शहाणपणावर पूर्ण विश्वास व बोर्डाचा अध्यक्ष डंडास हा तर त्याचा जिवलग मित्र; यामुळें कायदेशीर रीतीनें आलेले विलायतेंतील हुकूम देखील त्यानें जुमानले नाहींत. आपण यश मिळवून दाखविलें तर या सर्व गोष्टी पचतील व आपणास शाबासकी मिळेल अशी कार्नवालिसची खात्री होती.

टिपूशीं युद्ध सुरू करण्यांत कोणीं पुढाकार घेतला व युद्धाचें कारण कोणत्या पक्षाकडून उपस्थित झालें याचा विचार करतांना कार्नवालिसची ही परिस्थिति व देशभक्ति विसरतां कामा नये. मागें सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थानांत येतांच, मंगलोरचा तह व त्यामुळें झालेली इंग्रजी इभ्रतीची हानि, त्यानें ओळखली; व ती भरून काढण्याचा त्यानें एकदम निश्चय केला. टिपू आपली कुरापत काढतो किंवा नाहीं याची तो वाट पहात राहिला नाहीं. टिपूवर चाल करून जाण्याच्या वाटेवर व सरहद्दीवर लष्करी सामानाचा भरपूर पुरवठा करून तीस हजार सैन्यास वर्षभर पुरेल अशी अन्नसामुग्री त्यानें व्यवस्थेनें साठवून ठेवली. कार्नवालिस हिंदुस्थानांत १७८६ त आल्यावर इंग्लंड व फ्रान्स यांचें युद्ध सुरू होण्याचा रंग दिसूं लागला. तेव्हां 'फ्रेंच सैन्य टिपूच्या मदतीस जाऊन हिंदुस्थानांत आपल्या राज्यावर शत्रूची स्वारी होईल'

अशा अंदाजानें इंग्रजी प्रधानमंडळानें चार पल्टणी हिंदुस्थानाकडे रवाना केल्या. त्या पलटणी धरून इंग्रजांचें या वेळीं आठ हजार गोरें सैन्य होतें. त्याची व काळ्या सैन्याची कार्नवालिसनें शिस्त सुधारली. वशिल्याची तट्टें काढून टाकून लायक माणसांची भरती केली, सर्व किल्ल्यांची डागडुजी करून वीस हजार सैन्यास तळ देऊन राहतां येईल इतक्या सामुग्रीची त्यानें जमवाजमव केली. कंपनीचें उत्पन्न या वेळीं अवघें दीड कोटीचें असून त्या मानानें एवढें लष्करी खर्चाचें ओझें त्यांना डोईजडच होतें. पण कार्नवालिसला अष्टाधिकार मिळून वर सेनापतिहि तोच नेमला गेल्यामुळें एका हातानें त्यानें अमुक लष्करी खर्चाची आवश्यकता आहे असा अर्ज लिहिला व दुसऱ्या हातानें त्यास मंजुरी दिली. आणि या सर्व गोष्टींची जमवाजमव करीत असतांना टिपूविरुद्ध एक चकार शब्द तोंडांतून काढला नाहीं !

या ठिकाणीं दुसऱ्या एका प्रकरणाचा थोडासा उल्लेख करणें अवश्य आहे. बसालतजंग मेल्यावर निझामानें त्याच्याकडे असलेला 'गुंतूर सरकार' हा प्रांत कंपनीस देण्याचें कबूल केलें होतें. नंतर बसालतजंग १७८२ सालीं मरण पावला. पण निजामानें तो प्रांत ठरल्याप्रमाणें इंग्रजांच्या हवालीं केला नाहीं. तेव्हां त्या प्रांताची मागणी करण्यास हैदराबाद येथील रेसिडेंटास हुकूम देऊन कंपनीची पल्टणें निजामाच्या सरहद्दीकडे कार्नवालिसनें रवाना केलीं. हें पाहून निजामानें गुंतूर सरकार देण्याचें कबूल केलें; पण त्याबरोबर अशी आठवण दिली कीं " ज्या तहानें आम्हीं गुंतूर देण्यास बांधले गेलों आहों त्याच तहानें कंपनी, (हैदरानें आमचा घेतलेला बालाघाट प्रांत परत घेण्यासाठीं) दोन पलटणीं व सहा तोफा पुरविण्याविषयीं वचनबद्ध झाली आहे." रेसिडेंटाच्या हुकुमाची अशी वासलात लावल्यावर निजामानें आपल्या मतानें इंग्रजांविरुद्ध एक निराळेंच कारस्थान केलें. तें असें कीं, ' आम्ही व तुम्हीं मिळून इंग्रजांस हाकून देऊ ' अशा अर्थाचें एक पत्र गुप्तपणें त्यानें टिपूस पाठविलें. पण टिपूस निजामाचें दुटप्पी वर्तन माहीत असल्यामुळें त्यानें उलट उत्तर धाडलें कीं, ' तुमचा बेत आम्हांस कबूल आहे पण तुमचा आमचा स्नेहसंबंध दृढ होण्यासाठीं आधीं तुम्हीं आपली मुलगी मला दिली पाहिजे.'' निजामास आपण अस्सल मुसलमान घराण्यांतील आहों असा अभिमान असल्यामुळें एका नाइकाच्या मुलानें आपल्या मुलीविषयीं मागणी घातल्याचें पाहून त्याला पराकाष्ठेचा राग आला व तो टिपूविरुद्ध मोहीम करण्यास तयार झाला !

अशा रीतीनें आपल्या कल्पनेपलीकडे यश आलेलें पाहून कार्नवालिसनें या संधीचा

टिपूस चिडविण्याचें कामीं उपयोग करून घेण्याचा एक नाजूक प्रकार काढला तो असा. मागल्या तहांत ठरल्याप्रमाणें, केवळ वचन पाळण्यासाठीं म्हणून, फलटणें व तोफा निजामाच्या तैनातीस देण्याचें त्यानें कबूल केलें. आणि ' या सैन्याचा तुम्ही वाटेल तिकडे उपयोग करण्यास हरकत नाहीं, मात्र आमच्या दोस्ताविरुद्ध त्यांना लढण्यास लावूं नये. ' असें त्यानें कळविलें व इंग्रजांच्या दोस्तांची जी यादी दिली होती त्यांत टिपूचें नांव घातलें नव्हतें ! अर्थात टिपूविरुद्ध लढण्यासाठीं इंग्रज आपलें सैन्य निजामाकडे पाठविण्यास तयार आहेत हें जाहीर झालें. तेव्हां मंगळूरचा दोस्तीचा तह इंग्रज मोडणार असें समजून टिपूनें युद्ध पुकारलें ! या एकंदर प्रकरणांत आधीं पूर्ण विचार करून धोरण ठरविणें, त्याचा उच्चार न करतां शांतपणें सर्व युद्धाची तयारी करून ठेवणें व तयारी झाल्यावर शत्रूकडून युद्धाचा पुकारा होईपर्यंत वाट पाहणें वगैरे बाबतींत कार्नवालिसनें दाखविलेलें चातुर्य लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

आतां या वेळीं मराठी राज्यनौकेचा कर्णधार नाना फडणीस यांची माहिती सांगावयाची. परंतु मराठी वाचकांपुढें ती अनेक वेळां येऊन गेलेली असल्यामुळें तिचा विशेष विस्तार न करतां कित्येक अवांतर मुद्यांची नुसती आठवण करून दिल्यास काम भागणार आहे. मराठी राज्यास राहूप्रमाणें ग्रहण लावू पाहणारा राघोबा मरण पावल्यामुळें या वेळीं मराठी मुत्सद्यांचें मन बरेंच निश्चिंत झालें होतें. उत्तर हिंदुस्थानांत महादजी शिंद्यावर रजपुतांनीं आणलेली बावटळ शांत होऊन त्यानें पुन: दिल्लींत आपला अंमल कायम केला होता. व इंग्रजांशीं सालबाई मुकामीं दोस्तीचा तह होऊन तो त्यांनीं चांगल्या प्रकारें पाळला असल्यामुळें त्या बाजूनें सध्या तरी संकट ओढवण्याचा संभव नव्हता. हैदराबादकर चौथ देण्याची टाळाटाळ करी; पण वरून तो देखील सलोख्याच्या गोष्टी बोलत असे. आणि त्यानें केव्हांहि बिघाड केला तरी त्यास आपण ताळ्यावर आणू असा मराठ्यांना भरंवसा होता. फक्त दक्षिणेकडे टिपू मात्र मराठ्यांशीं धडकी घेई. यामुळें नानास 'बदामी'ची स्वारी करावी लागली. या स्वारींत निजाम व मराठे यांनीं टिपूचा पराभव केला; तरी पण त्याची त्यांना रग जिरवितां आली नाहीं. यामुळें इंग्रजांशीं दोस्तीचा तह करून टिपूचें चांगलें शासन केलें म्हणजे मराठी राज्याचा दरारा व लौकिक हिंदुस्थानभर कायम होईल असा तत्कालीन पुणेंकर मुत्सद्यांचा अंदाज होता. आणि पुढें सुद्धां श्रीरंगपट्टणच्या स्वारींत टिपूचा पूर्ण पराजय करून मराठी सैन्यें परत आलीं व पाटिलबोवाची आणि नानाची दिलसफाई झाली तेव्हां मराठी मुत्सद्यांना आपण कृतकार्य झालों

असें वाटून आतां फक्त उपभोग घेण्याचें मात्र काम राहिलें असे उद्गार निघूं लागले. या वेळच्या विचाराचें उत्तम निदर्शक असें एक पत्र गोविंदराव काळे यांनीं नाना फडणीसास पाठविलेलें आहे*. त्यांत तर 'एवढें मोठें राज्य कमावलें असून मराठे लोक आत्मस्तुति करून घेत नाहींत' म्हणून दोष दिला आहे! आणि त्या वेळीं दिसणाऱ्या परिस्थितीचा विचार केला असतां मराठी साम्राज्यावर कोणताहि ढग साक्षात नव्हता, ही गोष्ट खरी आहे. नुसत्या कुशंका काढून भावी संकटाशीं तोंड देण्याची झटून तयारी केली पाहिजे असें मराठ्यांच्या मनांत आलें नाहीं. याचें कारण मराठ्यांच्या कित्येक मानापमानाच्या व मर्दपणाच्या कल्पनेंत सापडण्याजोगें आहे. संकट आलें म्हणजे मराठे लोक हुल्लड करून त्यांतून पार पडण्यास पडेल ती मेहनत व संघटित कार्य करीत आणि लागतील त्या हालअपेष्टा सोशीत. त्यांत त्यांना आनंद व मोठेपणा वाटे. शिवाजी महाराज दिल्लीस गेल्या वेळचा प्रसंग, संभाजीच्या वधानंतर शाहू येईपर्यंतचा काळ व नारायणरावाच्या खुनानंतरची अराजक स्थिति अशीं तीन फार मोठीं संकटें मराठी राज्यावर ओढवलीं. पण मर्दपणा, संघटना व मुत्सद्देगिरी वगैरे गुणांच्या जोरावर ते त्या संकटांतून उत्तम रीतीनें निभावून गेले. यामुळें पुढें कोणतेंहि संकट आलें तरी असेंच आपण पुनः करून दाखवूं असा त्यांना आत्मविश्वास वाटे. अठराव्या शतकांतले

---

*"अमूक ब्राह्मणांनीं राज्य केलें असें शास्त्रीं पुराणीं वर्णन नाहीं. परशुराम अवतारीं काय असेल तें असो. त्या गोष्टी यांस [सवाई माधवरावास] शिंदे होळकर दोन बाजूस होऊन प्राप्त झाल्या. हल्लीं श्रीमंतांचें पुण्यप्रतापेंकडून व राजश्री पाटिलबावांचें बुद्धि व तरवारेच्या पराक्रमेकडून सर्व घरास आलें. परंतु जालें कसें? प्राप्त जालें तेणेकडून सुलभता वाटली. अगर मुसलमान कोणी असे, तरी मोठे मोठे तवारीखनामे जालें असतें. यवनाच्या जातींत तिळाइतकी चांगली गोष्ट जाल्यास गगनाबराबर करून शोभवावी; आमचे हिंदूंत गगनाइतकी झाली असतां उच्चार न करावा हे चाल आहे. असो. अलभ्य गोष्टी घडल्या. उग्याच दौलती पुसत घरास आल्या याचें संरक्षण करणें परम कठीण, दोस्त दुष्मन फार. यवनांचे मनांत कीं, काफरशाई जाली हें बोलतात. लेकिन ज्यानीं ज्यानीं शिरें हिंदुस्थानांत उचललीं, त्यांचीं शिरें पाटिलबावांनीं फोडिलीं, कोणाच्याही मनांत हे वाहडले, ते शेवटास जाऊं नये. यास्तव, नाना स्वरूपें व युक्तीकडून नाश करावे ऐसे आहेत. न लाभाव्या त्या गोष्टी लाभल्या. त्यांचा बंदोबस्त शककर्त्याप्रमाणें होऊन उपभोग घ्यावे हें पुढेंच आहे. कोठें पुण्याईत उणें पडेल आणि काय दृष्ट लागेल न कळे!

ऐतिहासिक टिपणें भाग १, पृ. १७.

मराठे पुढारी निधड्या छातीचे होते. रणभेरीचा नाद ऐकतांच जातिवंत घोडा जसा रोमांचित होऊन नाचूं लागतो त्याप्रमाणें संकट आलें म्हणजे त्याच्याशीं टक्कर देण्यासाठीं त्यांचे बाहु सदैव स्फुरण पावत ! त्यांचे सर्व सद्गुण संकटकाळीं फार चांगल्या प्रकारें निदर्शनास येत. आणि म्हणून आपल्या समोर चांगलासा पैलवान आलेला पाहिला म्हणजे त्यांच्या अंतःकरणास समाधान होई; व त्याच्याविषयीं गौरवपर उद्गार काढण्यासही ते कमी करीत नसत. एक वेळ ज्यानें आपल्याशीं तंटा केला त्याच्याविषयीं दीर्घद्वेष बाळगणारे मराठे नव्हते. त्याच्याशीं दोस्तीचा तह झाला म्हणजे तो आपला मित्र बनला, त्या तहांत अंतर आपणाकडून पडता उपयोगी नाहीं, दुसऱ्या पक्षानें वाटेल तर बेमानी करून दोस्ती मोडावी; अशी त्यांची शिपाईबाण्याची विचारसरणी होती. आसपासचे शत्रु तहांतील कलमें सोईस पडेल तेव्हां मोडतात असा त्यांना अनेक वेळां अनुभव आला होता; आणि पुढेंहि असेंच चालणार हें त्यांना कळत नव्हतें असें नाहीं, पण मराठी पुढाऱ्यांची आपल्या राष्ट्राच्या इभ्रतीविषयींची कल्पनाच ही कीं कोणताही प्रसंग आला तरी आपण वचनाचे घड आहों असें जगास दाखवावयाचें. मग त्या कामांत आपला सर्वस्वीं घात होत असला तरी हरकत नाहीं.

तत्कालीन पुढाऱ्यांची ही सत्यनिष्ठा व मानापमानाची कल्पना लक्षांत ठेवली म्हणजे अनेक गोष्टींचा बरोबर उलगडा होतो. पाणिपतच्या समरांगणांत ज्यानें लक्षावधी मराठ्यांची कत्तल केली त्या अबदालीविषयीं तिरस्काराचे उद्गार मराठ्यांनीं कधीही काढले नाहींत. इतकेंच नव्हे तर त्यानंतर चारच वर्षांत मराठ्यांचा वकील अबदालीकडे व अबदालीचा मराठ्यांच्या दरबारीं येऊं जाऊं लागले. आखाड्यांत उतरल्या वेळीं पहिलवानांनीं परस्परावर डाव करावे पण बाहेर येतांच हातांत हात घालून दोस्त बनावे हा मराठ्यांचा बाणा होता. विश्वासघातकी व दगलबाज लोकांची त्यांना फार चीड, यामुळें नजीबखानासारख्यावर मात्र त्यांचा फार राग असे. राघोबास राज्यभ्रष्ट होण्याचा प्रसंग तरी याचमुळें आला. माधवरावानें नारायणरावाचा हात दादासाहेबांच्या हातांत घातल्यावेळीं दादानें जें वचन दिलें होतें तें मोडून राज्यलोभानें जेव्हां त्यानें नीचपणानें नारायणरावाचा खून करविला तेव्हां तत्कालीन मराठ्यांना फार चीड आली; आणि यामुळें त्याचा सूड घेण्याची प्रतिज्ञा करणाऱ्या बारभाईस चोहींकडून पाठिंबा मिळाला, व राघोबानें हरप्रयत्न केला तरी त्याचा पाय मराठ्यांच्या गादीवर टिकूं शकला नाहीं. पण हाच न्याय लाऊन नाना जेव्हां बाजीरावास सवाई माधवरावाच्या मागून पेशवाईपदावर आरूढ होऊं

देईना तेव्हां तेंच लोकमत उलटलें, व त्याला हार खावी लागली. सारांश मराठ्यांना दीर्घद्वेष करणें केव्हांही आवडत नव्हतें.

त्या वेळचे महाराष्ट्रांतील लोक प्रयत्नवादी तर खरेच. पण त्याबरोबरच त्यांचा देवावर, दैवावर, धर्मावर आणि नीतीवर फाजील विश्वास होता. आपलें आयुष्य व राज्य हीं ऐहिक उपभोगार्थ आहेत असें त्यांना वाटत नसून परलोकसाधन हें त्यांचें ध्येय असे. रणांगणावर मृत्यु आल्यास स्वर्गप्राप्ति होते म्हणून त्याचा ते आनंदानें स्वीकार करीत. आपण प्रयत्न करावा पण त्यांत यश येणें अगर न येणें हे परमेश्वराधीन आहे असे ते मानीत.* गोब्राम्हण-प्रतिपालन, अन्नदान, भूमिदान आणि द्रव्यदान हीं ज्या राज्यांत घडतील, आणि जेथील राजे नीतीची चाड बाळगून वागतील तें राज्य परमेश्वर चालवील असें ते भक्तिभावानें समजत. मुसलमान, इंग्रज किंवा पारसी वगैरे लोकांचा केवळ परकी म्हणून त्यांनीं कधीं द्वेष केला नाहीं. राज्ययंत्र चालविण्याचीं सूत्रें हातीं येतात तीं परमेश्वराच्या विशेष कृपेशिवाय येत नाहींत या समजुतीमुळें सवाई माधवराव हा कोणी महात्म्याचा अंश आहे आणि यामुळेंच त्याच्या कारकीर्दींत शत्रु पराभूत होतात व नानाच्या हातास यश लाभतें अशी त्यांची भावना होती. आणि म्हणूनच त्यांच्या विश्वासास व आदरास पात्र झालेल्या नाना, महादजी परशुरामभाऊ वगैरे पुढाऱ्यांनीं हाक मारतांच हजारो मराठे एकत्र जमून कोणतीही कठिण मसलत एकजुटीनें पार पाडीत. मात्र या पुढाऱ्यांच्या अभावी ते पंगु होते. याचा परिणाम असा झाला कीं पुण्यांश ज्यांच्या गाठीं आहे असे पुढारी मरून गेले असें पाहतांच त्यांचे हात लुले पडले, व लक्षण बरें दिसत नाहीं असें त्याच्या मनानें घेतलें.

---

*आपल्या आयुष्यांतील अनेक संकटप्रसंग परमेश्वरी कृपेनें कसे टळले याचें एक टाचण नाना फडणसांनीं केलेलें इतिहाससंग्रहांत [ऐ. टि. भा. १ पृ. ५५] छापलें आहे. त्यांत आपल्या हातून घडलेल्या राजकीय कामगिरीबद्दल त्यांचे असे उद्गार आहेत. " गंगाबाई गरोदर असतां बुद्ध त्यांस काढून न्यावयाची देऊन कीर्ती करून दाखविली. दादासाहेबांजवळ पन्नास हजार फौज असतां अशी बुद्धि दिल्ही. पुढें पुत्र कीं कन्या याचा निश्चय नाहीं. मारलेंच जावें. परंतु कृपा करून रावसाहेबांचा जन्म होऊन सर्वांनीं अतर्क्य कर्म केले असें म्हणविलें. मोरोबा, होळकर यांस सखारामपंतांनीं एक करून अवघे मातबर त्यांत मिळाले. मी एकटा. परंतु सर्वांचीं पारपत्यें यथायोग्य करवून माझें थोरपण वाढविलें. राज्यांतील शाहाणे एकीकडे. त्यापुढे मी एकट्यानें काय करणें? परंतु ईश्वरानें केलें. "

अशावेळीं सवाईमाधवराव, नाना, महादजी, अहिल्याबाई, हरिपंत, परशुरामभाऊ, रामशास्त्री वगैरे लोकांच्या कसोटीस उतरलेले व यशवंत माणसें आठ दहा वर्षांच्या अवधींत एकामागून एक अकस्मिकरीतीनें मरण पावलेली पाहून त्यांचा धीर सुटला. आणि अशा वेळीं बाजीराव, दौलतराव शिंदे, यशवंतराव होळकर, भोसले वगैरे मराठी साम्राज्यचालकांनीं देखील इंग्रजांशीं केलेल्या प्रत्येक लढाईत पराभव झालेला पाहून व अपरिहार्य असें समजून इंग्रजाकडे शरणचिठी पाठविली; तेव्हां लोकांना दशदिशा भयाण दिसू लागल्या व "आपलें नशीब फिरलें; परमेश्वरी इच्छेपुढें इलाज नाहीं. त्याच्याच कृपेनें हेहि दिवस जातील" असे मनाचे समाधान करीत जनतेनें शस्त्रें फेकून दिली व खिन्न अंतःकरणानें लोक घरोघर चालते झाले! असो.

दोस्तांच्या श्रीरंगपट्टणावरच्या स्वारींत मराठे मुत्सद्दी कसे सामील झाले याचा खुलासा करण्यासाठीं थोडेसें मागल्यापुढल्या इतिहासाचें पर्यालोचन करणें अवश्यक दिसल्यामुळें तें येथें केलें आहे; तें लक्षांत ठेवल्यावांचून मराठी मुत्सद्यांच्या वर्तनाचा समाधानकारक रीतीनें छडा लावतां येत नाहीं. १७८० च्या आगस्टांत नानानें इंग्रजाविषयीं महादजीस लिहिलेल्या पत्रांत "इंग्रजांचें मानस असें आहे कीं हैदरखान, श्रीमंत व नबाब या तिघांच्याही दौलता घ्याव्या. त्यास कोणेही प्रकारें एकाशीं शकटभेद करून एकास खालीं पाडावें. असें करता एक राहील त्यास आपण शेवटीं गुंडाळावें." असा अभिप्राय व्यक्त केला असून दाहा वर्षांनंतर तोच नाना टिपूवर स्वारी करण्यासाठीं इंग्रजांच्या मदतीस गेला. याचें कारण असें कीं १७८२ मध्यें सालबाईचा तह झाल्यापासून इंग्रजांनीं दोस्तींत अंतर पडूं दिलें नव्हतें. मग तें आपण तरी कां म्हणून पडूं द्यावें? असा प्रश्न नानाच्या मनापुढें उभा राही. अतिशय अडचणींत सापडल्यामुळें मान्य कराव्या लागलेल्या अटी देखील प्रामाणिकपणें पाळण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांच्या शिरावर कशी येते याबद्दलची नानाची कल्पना 'तालिमनामा' म्हणून इतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालेल्या एक पत्रांत फार स्पष्टपणें मांडलेली आढळते ती या प्रकरणीं वाचण्याजोगी आहे.

मराठे लुटीच्या आशेनें स्वारीशिकारीवर निघत असत असा कित्येक ग्रंथकारांनीं अभिप्राय लिहून ठेवला आहे. पण तो सर्वस्वीं निराधार आहे. मराठे लूट करीत पण ती शत्रूच्या मुखांत युद्धप्रसंगीं करीत. शत्रु पराभूत होऊन शरण आला म्हणजे त्याला ते उदारपणें सोडून देत व त्याच्या दौलतीस धक्का लावीत नसत. यामुळें मराठ्यांना भरपूर शत्रु होते तोंपर्यंत त्यांची सांपत्तिक स्थिति बरी होती. पण साम्राज्याचा विस्तार

चोहीकडे होऊन, राहिलेल्या राजाशीं तह झाले तसतसे मराठे कर्जबाजारी बनले. नानासाहेबांच्या कारकीर्दींत तर मराठ्यांची सत्ता भराभर वाढली. पण त्यापासून द्रव्यप्राप्ति न होता कर्ज कोट्यावधि रुपायांचें झालें. सारांश,मराठ्यांनीं उत्तरेस केलेल्या स्वाऱ्या दिल्लीच्या बादशहाशीं झालेला करारनामा पाळण्यासाठीं झाल्या व इतर सर्व शत्रूंनें आगळीक केल्यामुळें झाल्या. केवळ लूट मिळविण्यासाठीं त्यांनीं कधींही स्वारी केली नाहीं.

शांततेच्या वेळीं युद्धाची तयारी व युद्धाच्या वेळीं युद्धोत्तरकालीन व्यापाराची तयारी करून सतत राष्ट्रांतील लोकांना जागे ठेवण्याची सध्याची जर्मन कल्पना त्यांच्या मनांत उद्भवणें, किंवा ती कोणी सांगितली असती तरी त्यांना पटणें शक्य नव्हतें. त्यांना अजून वैयक्तिक नीति व अनीति ही राष्ट्रीय नीतीहून भिन्न असते हें ध्यानांत आलें नव्हतें. यामुळें युरोपांत जसे लिस्ट व बर्नहार्डी निर्माण झाले, तसे येथें न होता पोवाडे, भक्तिपर काव्यें व मोरोपंतांच्या आर्या निर्माण झाल्या. फडणीस, शिंदे व होळकर संकटाच्या वेळीं एकमतानें वागले, पण तें दूर होतांच जो तो आपल्या आवडीच्या कामांत गढून गेला. नाना पुण्यास राहून तेथील व्यवस्था पाहूं लागला. कारण राजकारण हें त्याचें व्यसन बनलें होतें. पण अधून मधून तो काशी यात्रेस जाण्याच्या गोष्टी मनापासून बोलत असे*. शिंदे दिल्लीचें तख्त काबीज करण्याची परंपरागत हौस पुरवून घेण्यास गेला. तुकोजी वाफगांवास स्वस्थ पडून राहिला आणि अहिल्याबाई दानधर्म करून जन्माचें सार्थक करू लागली. सारांश हुल्लडींची वेळ संपल्यानंतर महाराष्ट्रांतील डोकीं एके ठिकाणीं जमत नसत. यामुळें शांततेच्या काळीं त्यांच्या व्यवहारांत एकसूत्रीपणा राहात नव्हता. आणि यामुळें ' राघोबा इतक्यांत मराठ्यांच्या स्वाधीन झाला नसता तर बरें झालें असतें, ' असें आपणास वाटूं लागतें. कारण त्या योगानें इंग्रजी कवाइती पलटणीची व शिस्तीची जी

---

* बहुत दिवस मनांतून हेत होता कीं काशीयात्रा घडावी. परंतु तसा समय दृष्टीस पडेना. ईश्वरीकृपेकडून दक्षिण हिंदुस्थानचा बंदोबस्त व सर्वांसीं तह सरकारचे (होऊन) व राजश्री पाटिलबावांचें येणें याच समयीं होतें.......यांच्या संमतानें श्रीमंतांचा संतोषें-करून निरोप होणें. यास प्रथम अनुकूलता व हें मला घडणें व मागें संभाळावयास राजश्री हरीपंत तात्या यांची अंतःकरणपूर्वक (खात्री) करून घेऊन जावयाचा विचार केला आहे.

ऐ. टि. भा. १, पृ. ७२.



नाना फडणवीस.


महती महादजीच्या लक्षांत आली ती व झाशीच्या सुभेदारानें* त्या वेळचा इंग्रजी ज्ञानकोश (एनसायक्लोपेडिया) वाचून जी माहिती मिळविली होती व अन्य उपायानें युरोपियनाच्या विद्युत्शास्त्राचे जे तुटपुंजे प्रयोग तो करीत होता ते नाना, हरिपंत, परशुरामभाऊ वगैरे सर्वच मंडळीपुढें मांडले जाऊन त्यांची शहानिशा होऊन ग्राह्याग्राह्यता ठरली असती. पण त्याना संकटावांचून एकत्र होण्याचे व एकंदर परिस्थितीचा खल करण्याचे प्रसंग येत नसत. नाहीं तर " आपल्या सैन्यांत रांगड्यांची भरती करीत आहा ही चूक आहे. " असें सांगण्याकरितां ज्या नानानें पुण्याहून मुद्दाम मनुष्य पाठवून वाद केला त्या नानानें शिंद्याच्या कवाइती सैन्यांत युरोपियन अधिकाऱ्यांचें प्रस्थ खास राहूं दिलें नसतें. मनुष्य कितीही बुद्धिमान असला तरी त्याला सर्वच गोष्टी एकदम ध्यानांत येत नाहींत. पण चार डोकीं एकत्र जमून वाटाघाट सुरु झाली म्हणजे कोणत्याहि प्रश्नाचे अंतर्बाह्यस्वरूप पुढें येतें व डोक्यांत प्रकाश पडतो. श्रीरंगपट्टणच्या स्वारींत सामील होणाऱ्या प्रमुख व्यक्तींचा व मराठ्यांच्या स्वभावाचा सामान्यतः येथवर परिचय करून दिला. आतां प्रत्यक्ष युद्धाची

* याचें नांव रघुनाथ हरी (१७७०-१७९४ सुभेदारी) जुन्या ऐतिहासिक गोष्टी भाग २ पृ. ४३ पहा. विलियम हंटर त्याच्या भेटीस गेला होता. त्याची हकीकत देताना तो म्हणतो.— Next morning when we returned his visit he received us in an upper room of the castle which was furnished with chairs and tables in the European manner. He showed us several English books, among which was the second edition of the Encyclopedia Britanica. Of this he had got all the plates neatly copied by artists of his own. He exhibited an electrical machine, constructed by a man of his own service. The cylinder was a common shade; with this he charged a viol and gave pretty smart shocks to the no small astonishment of those who were the subjects of his experiments and of the spectators. As the weather was very dry the operations succeeded remarkbly well. He even proposed sensible queries on the nature of the caustic fluid and the parts of the phial on which the accumulation took place; as whether in the glass, or the coating &c which showed that he did not look upon the experiment with an eye of mere childish curiosity which is amused with novelty but had a desire to investigate the cause of the phenomena.

हकीकत देण्यास हरकत नाहीं. §

---

§ या ठिकाणीं एका किरकोळ मुद्यांचा उल्लेख करणें अगत्याचें आहे. महादजी शिंदा श्रीरंगपट्टणची स्वारी संपल्यावर पुण्यास आला तोच दोन वर्षें आधी आला असता तर मराठे या मोहिमेंत सामील झाले असते किंवा नाहीं याची शंका वाटते. कारण महादजी उत्तर हिंदुस्थानांत जेव्हां मराठ्यांचें बस्तान बसवूं लागला तेव्हां दिल्लीतील इंग्रजांच्या पोटांत दुखूं लागलें व पुढें तो अडचणींत सापडल्या वेळीं त्यानें मागितलेली मदत दिली नाहीं इतकेंच नव्हे तर उलट विरुद्ध पक्षास ते चिथवीत असावे असा त्याला संशय आला होता. यामुळें व फ्रेंचांच्या सहवासामुळें दाहा वर्षांपूर्वीं इंग्रजांशीं तह करण्याविषयीं महादजी जितका उत्सुक होता तितकाच तो आतां त्यांना शह देण्यासाठीं आतुर झाला होता. अर्थात त्याच्या आग्रहामुळें नानाला इंग्रजांस मिळता आलें नसतें.



टिपूचा शिक्का.

भाग २ रा,

युद्धाचीं कारणें.



द्धाची अथवा भांडणाची मीमांसा दोन प्रकारांनीं करता येते. पक्षभेद ज्या वेळीं उत्पन्न झाला तेथपासून दोघांतील वैमनस्याची वाढ कसकशी होत गेली व त्याचें पर्यवसान कोणत्या तरी पक्षाकडून दुसऱ्याची आगळीक करण्यांत कधीं झालें वगैरे इत्थंभूत हकीकत देणें हा पहिला प्रकार आणि प्रत्यक्ष युद्धाचा पुकारा होण्यापूर्वी प्रथम कोणी कोणावर हात टाकला एवढेंच सांगून मोकळें होणें हा दुसरा प्रकार. पैकीं पहिल्यांत तात्त्विक विवेचनास प्राधान्य द्यावें लागतें व दुसऱ्यांत कार्यकारणभाव नीटपणें उकलून न सांगतां वर्णनावरच भर दिलेला असतो. आपणास येथें पहिल्या पद्धतीचा अंगीकार करावयाचा आहे.

खरें पाहू गेलें असतां कार्यकारणमीमांसा व वर्णन यांची योग्य पद्धतीनें मांडणी करून दाखविणें हाच इतिहासाचा प्रधान हेतु असला पाहिजे. यांपैकीं कोणत्याही बाबतीकडे दुर्लक्ष झालें तरी त्या मानानें एकंदर विवेचनास वैगुण्य यावयाचेंच. उदाहरणार्थ, दोन राष्ट्रांत मत्सरामुळें असो किंवा महत्त्वाकांक्षेमुळें असो परस्परांविषयीं द्वेषाग्नीची ठिणगी एक वेळ उत्पन्न झाली म्हणजे ती दोघांच्याही अंतःकरणांत सहजगत्याच वाढत असते. पण सहजगतीशिवाय कधीं या पक्षाकडून तर कधीं दुसऱ्या पक्षाकडून फुंकर घालण्यांत येऊन ही धुमसत असलेली ठिणगी क्रमाक्रमानें उज्ज्वल रूप धारण करते आणि अखेरीस एका पक्षाच्या लहान फुंकरानें ती पेट घेते.

सामान्य दृष्टीनें शेवटचा फुंकर घालणाऱ्यावर जाळ पेटविल्याची जबाबदारी लादण्यांत येते. पण तात्विकदृष्ट्या दोघांवरही एकसारखाच दोष असतो. पण वस्तुतः हा 'दोष' असें म्हणणें सुद्धां योग्य नाहीं. कारण बुद्धिबळें खेळण्यास बसल्यावर प्रतिपक्ष्यास मारामारीस प्रारंभ करणें भाग पाडून जर आपला डाव साधत असेल तर तसें करणाऱ्यास कोणी

दोष देण्याचें कारण नाहीं. हाच न्याय पुढें दिलेलें विवेचन वाचतांना लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. टिपूला घोळवीत घोळवीत अडचणीच्या जागीं गांठून तेथें त्याला सामना करण्यास भाग पाडलें हा कार्नवालिसच्या राजकारणांतील एक डाव समजला पाहिजे. पण कार्नवालिसचें असें सरळ वर्णन देणें इंग्रजी इतिहासकारांना गैरसोईचें भासत असल्यामुळें ते टिपूस चार निंदात्मक विशेषणें देऊन व 'इंग्रजांचा स्नेही त्रावणकोरचा रामराजा यांजवर टिपूनें हल्ला केल्यामुळें इंग्रजांना त्याच्या मदतीस जाणें भाग पडलें' असें एकदोन वाक्यांत या युद्धाचें कारण सांगून इंग्रजी-सेनानींची बहादुरी वर्णन करण्यास प्रारंभ करतात. यामुळें इतिहास-वाचनापासून मानवी स्वभावाचें जें ज्ञान वाचकांना व्हावयाचें तें होत नाहीं. असो.

मंगळूरच्या तहानें इंग्रज व टिपू परस्पराचे, (कायदेशीर भाषेंत) मित्र बनले, तरी त्याच वेळीं त्यांच्यांत वैमनस्य कसें उत्पन्न झालें हें मागें सांगितलेंच आहे. या तहानंतर इंग्रज आपणाशीं मुद्दाम कुरापत काढणार नाहींत असा प्रथम टिपूचा अंदाज होता. परंतु कार्नवालिस हिंदुस्थानांत आल्यामुळें नव्या धोरणास प्रारंभ होऊन त्यानें युद्धाची कसून तयारी चालविली तेव्हां त्याच्या मनांत किंतु उत्पन्न होण्यास कारण झालें. परंतु ही तयारी आपल्याबरोबर युद्ध करण्यासाठींच असली पाहिजे असें टिपूस न वाटण्याची कारणें अशीं होतीं. (१) मंगळूरच्या तहाप्रमाणें इंग्रज टिपूचे दोस्त बनले होते; (२) विलायतेंतील प्रधानांनीं कार्नवालिसला एतद्देशीय संस्थानांतील भानगडींत न पडण्याबद्दल निक्षून बजावलें होतें आणि (३) युरोपांत इंग्रज व फ्रेंच यांचें युद्ध जुंपल्यास हिंदुस्थानांत तो झगडा चालू ठेवता यावा म्हणून फ्रेंचाविरुद्ध इंग्रजांची तयारी चालली असेल असा त्याचा समज होता; पण हळुहळू हा त्याचा भ्रम नाहींसा झाला.

इ. स. १७८६ च्या अखेरीस मराठे व टिपू यांमध्यें युद्धप्रसंग चालू असतां टिपूनें इंग्रजांस पत्र पाठवून कळविलें कीं, "मऱ्हाठे यांसी व आम्हांसी लढाई मातबर जाहली. त्यांत आम्ही बहुत लोक दस्तगीर (कैद) करून आणले. कित्येक स्वार व तोफा आणिल्या. मोठी फत्ते जाहली. ही खुषीची खबर तुम्हास कळावी म्हणून लिहिली असे. दुसरें, तुम्हांसी आम्हांसी स्नेह जाला ते समयीं करार निश्चयें जाहला कीं, आम्हावरी वख्त पडल्यास तुम्ही सामील व्हावें; तुम्हावरी वख्त पडल्यास आम्ही सामील व्हावें. सांप्रत आम्हांवरी प्रसंग पडला आहे. तरी तुम्ही या समयीं कुमकेस यावें."* यानंतर आणखी

* या भागांत घतलेलीं अवतरणें बहुतेक "चिनापट्टणाकडील राजकारणें" व "परराष्ट्रीय दरबारांतील मराठ्यांचे वकील" या दोन (इतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालेल्या) तत्कालीन अस्सल पत्रव्यवहार देणाऱ्या प्रकरणांमधलीं आहेत.

चार दिवसानीं पाठविलेल्या पत्रांत टिपू लिहितो, " अद्याप तुम्हांकडील कुमकेचें उत्तर आलें नाहीं ! ऐशा समयीं खबर ऐकण्यांत येती जे, तुम्ही फौज घेऊन मऱ्हाठे यांच्या कुमकेस जाणार म्हणून ऐकिलें. त्यास तुमची आमची दोस्ती मजबूत असतां, तुम्ही आमची कुमक करावी; नाहीं तरी कोणाकडे न जातां उभयतांचा तमाशा पाहणें उत्तम. या दोन्ही बाबती फरामोष करून (बाजूस ठेवून) आमची मुखालिफ्त (शत्रुत्व) कबूल कराल तरी बाद (गैरशिस्त). या मोहिमेचें (समयीं) आम्हांस कर्नाटक पायाघांट जवळ असे, हें चित्तांत ठेवून काय इरादा तुमचा आहे तो सफाईनें लिहून पाठविल्यानें व कुमक केलियानें ऐन येहसान (फार योग्य होईल) व घांटावरील मुलूख कोलार वगैरे तुम्हास जहागीर देऊं. " या दोन्ही पत्रांस मद्रासचा गव्हर्नर कँबेल यानें जें उत्तर लिहिलें त्यांत टिपूच्या मदतीस जाण्याचा जो मुख्य मुद्दा तो अजीबात गाळून असें म्हटलें होतें कीं " दो दफे (दोन वेळां) फत्तेचे (जय मिळविल्याचे) कागद आले ते पाहून बहुत खुषी जाहली. आम्हीं मऱ्हाठे यांजकडे जातों म्हणून, ऐकून, तुम्ही लिहिलें. त्यास, तुम्ही आमचे दोस्त आहां. तुम्हांस इत्ला केल्याशिवाय आम्ही कैसे जातो ? तैसेच हर एखादे तर्फेस जाणें जाल्यास दोस्तास इतल्ला करून जाऊं. "

कँबेलच्या या पत्रानें इंग्रज मंगळूरच्या तहास कितपत मान देतात याबद्दल टिपूस संशय वाटूं लागला. शिवाय कार्नवालिसला मिळालेले अधिकार व त्यानें चलविलेली युद्धाची तयारी आपल्यास बाधक होण्याचा संभव आहे हेंही त्याच्या सहज ध्यानांत येण्याजोगें होतें. मद्रासेंत गव्हर्नर व जनरल अशा दोन स्वतंत्र व्यक्ति असल्यामुळें आणीबाणीच्या प्रसंगीं त्यांच्यांत मतभेद आला म्हणजे सर्व मसलत बिघडून जात असे; याकरितां " बादशहांनीं व पार्लमेंट यांनीं ठरविलें जे, मद्रास व बंगाला खुषकीचीं मकानें. तेथें जंग (युद्ध) सुरू झाल्यास आम्हांस (विलायतेस) येथें सहा महिन्यानें वर्तमान कळावें. तेथून बंदेबस्ती हो पावेतों तेथें दुही पडोन काम खराब होतें, हें कामाचें नाहीं. याकरितां मद्रास व बंगाल्यांत जे गौरनर तेच जनरल मोकरर करून (ठरवून) येथील गौरनराचें नांवें हुकूम येऊन पावला व कार्नवालिस बंगाल्यास जाऊन पावले ". अशा प्रकारें या नवीन व्यवस्थेची महती पुणेंकरापर्यंत जर पत्रद्वारें चिन्नापट्टणाहून (मद्रासेहून) पोचत होती तर तेथेंच शेजारीं राहणाऱ्या व फ्रान्सपर्यंत प्रत्यक्ष राजकारण खेळविणाऱ्या टिपूस या स्थित्यंतराचें परिणाम काय होतील हें समजलें असल्यास नवल नाहीं.

इंग्रजी राज्यकारभारांतील हा बदल तात्विक स्वरूपाचा असला तरी युद्ध प्रसंगीं त्याचे

दुष्परिणाम एकदम दिसून पडण्याजोगे होते. व्यक्तिस्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य इतर प्रसंगीं कितीही हितावह असले तरी शत्रूशीं समरांगणांत तोंड देतांना बहुनायाकी झाल्यास मोठ-मोठ्या सैन्यांना पराभव पत्करावा लागतो असा अनुभव अनेक वेळां आलेला आहे. १७८४ सालीं तरी इंग्रजांचा पराभव व टिपूचा विजय होण्यास महत्वाचें कारण हेंच होतें कीं टिपूचा सर्व व्यवहार एकतंत्री होता व इंग्रजांत फूट होती. पण १७८७ साला-पासून ही परिस्थिति पार बदलून इंग्रजी कारभार देखील आपल्यासारखाच एकमुखी होणार हें ऐकून टिपूनें मराठ्यांशीं चालविलें युद्ध बंद केलें. व इंग्रज आपणाशीं प्रत्यक्ष दोस्तीनें न वागले तरी चढावाचें धोरण न स्वीकारतां निदान तटस्थ राहण्यास काय केलें पाहिजे हें तो पाहूं लागला.

या वेळीं इंग्रज चढावाचें धोरण स्वीकारतील असा संशय टिपूस येण्यास आणखी एक कारण घडलें होतें. इंग्रजांचा टिपूशीं दोस्तीचा तह झाला त्याच सुमारास इंग्रज व मराठे यांचा देखील तह झाला होता. त्या तहाच्या आधारावर १७८६ मध्यें मराठ्यांनीं इंग्रजांकडे मदत मागितली. परंतु तसें करण्याचें त्याचें लक्षण दिसेना. इंग्रज आपल्या मदतीस येण्याची टाळा-टाळी करतात असें पाहून मराठे लोक फ्रेंचांची मदत घेण्याची वाटाघाट करूं लागले. या-संबंधीं पुण्यास असलेला इंग्रजी वकील मद्रासकरास लिहितो, " हरघडी येथील सरदार इंग्रज लोकांची नालीष (निंदा) करितात जे, इंग्रज लोक बद मामली (अविश्वसनीय) यांचा कौलकरार (तह) कायम नाहीं; आणि लिहिल्याप्रमाणें निभावीत नाहींत; यापेक्षां फरासीस (फ्रेंच) कायम जुबान (एकवचनी) व बहादर आहेत. वक्त पडल्यास दोस्ताचे कामावरी तेव पडतील ऐसे म्हणतात, व संदर्भही त्याकडे (फ्रेंचाकडे) लाविला आहे. त्याअर्थी तुम्हीं त्वरा करून यांसी (मराठ्यांसी) सामील राहणें; व हर दोघांचे मुखालिफास (टिपूचे) तंबी करणें (शासन करणें) ऐन सलाह (योग्य) आहे." सारांश वेळ निभाऊन नेण्यासाठीं हेस्टिंगजच्या कारकीर्दीत मराठे व टिपू या दोघांशीही इंग्रजांनीं दोस्तीचे तह केल्यामुळें १७८७ मध्यें कोणत्याही पक्षास मिळावें तरी दुसऱ्या पक्षाशीं केलेला करार मोडल्याचें पाप पदरीं येऊं लागलें. तेव्हां कार्नवालिसनें दोघांकडेही प्रत्यक्ष मदत न देतां कसा तरी प्रसंग मारून नेला. तथापि टिपूपेक्षां मराठ्यांशीं या वेळीं इंग्र-जांनीं बरेंच सलगीचें बोलणें लावलें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण पुणें-दरबारीं असलेल्या इंग्रजी वकीलाच्या (वर सांगितलेल्या) पत्रास उत्तर देतांना मद्रासचा गव्हर्नर लिहितो, " तेथील (पुण्यांतील) सरदार हमेशा आम्हां लोकांची नालीष

(निंदा) करितात म्हणून लिहिले तें युक्तच. नालीष कां न करतील? आजपावेतों जे गौरनर या खुशकीस (मद्रासेस) येत गेले ते कार्यबाहु होते. याकरितां श्रीमंताची मर्जी राखूं शकले नाहींत. या उपरांतिक ईश्वरकृपेकडून त्यांची मर्जी ज्यांत खूष होय तैसीच वर्तणूक अमलांत येईल. दुसरें कुमकेची बाबत लिहिली, ते सलाह उत्तम असे. परंतु सर्वा गोष्टींस, राजकारणाच्या प्रसंगास, मुखत्यार जनरल गौरनर बंगाल्याचे आहेत. त्यास आम्ही पत्रें पाठविलीं आहेत. ईश्वरदयेकडून (करून) खातरखाच उत्तरें येतील. ''

फ्रेंचांचें नांव काढतांच इंग्रज सरळ रीतीनें बोलूं लागतात असा मराठी मुत्सद्यांना अनुभव असल्यामुळें त्यांनीं या वेळीं ही कळ दाबली व आपलें काम करून घेतलें. यानंतर इंग्रज मराठ्यांना मिळणार हें अगदीं ठरून गेलें. टिपूला देखील याबद्दल स्पष्ट इषारा मिळाला होता. फ्रेंच लोकाजवळ आपण मदत मागितली असून ती देण्याबद्दल ते नेहमीं-प्रमाणें उत्सुक नाहींत व '' तुमच्या कामाविषयीं विलायतीस (फ्रान्सकडे) लिहून पाठविलें आहे '' असें नुसतें ' मधाचें बोट ' लावतात असा त्याला संशय आला होता. पुढें फुलचरीचा (पांडेचरीचा) फ्रेंच सेनापति मुसा कुसनी यानें टिपूस असें स्पष्टच कळविलें कीं, '' आमचा इंग्रजांचा तह आहे कीं, तुम्हांसीं (टिपूशीं) व श्रीमंतांशीं (मराठ्यांशीं) लढाई जाली, तरी परस्परें कोणी कोणास कुमक करूं नये. जर इंग्रज तुम्हाकडे आले, तरी आम्ही श्रीमंतांकडे जाऊं. इंग्रज श्रीमंतांकडे गेले तरी आम्ही तुम्हा-कडे येऊं. '' *

अर्थात् इंग्रज व फ्रेंच यांपैकीं कोणीही एकटा मराठ्यांना मिळतांच दुसरा टिपूची बाजू उचलण्यास तयार होता. पण टिपू व मराठे एके बाजूस होऊन इंग्रजांविरुद्ध उभे राहतील तर फ्रेंचांनाही इंग्रजांविरुद्ध उभे राहण्यास या तहानें कांहीं अडकाठी नव्हती. आणि असें घडून आलें तर हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यावर मोठीच आपत्ति ओढवणार होती. म्हणून ती टाळण्यासाठीं टिपू व मराठे यांमधलें युद्ध आटोपण्यापूर्वीच इंग्रजांना मराठ्यांची दोस्ती जोडणें भाग होतें. यामुळेंच कार्नवालिसकडून श्रीमंतांच्या दोस्तीबद्दल ' खातरखाच ' उत्तरें येतील असें मद्रासचा गव्हर्नर लिहीत होता.

पण एकीकडून हें संकट टाळण्यासाठीं मराठ्यांची दोस्ती जोडावी तर दुसरीकडून फ्रेंच टिपूस साहाय्य करणार हेंही तितकेंच स्पष्ट होतें. शिवाय फ्रेंचांनीं या वेळीं केलेल्या कित्येक

---

* चिनापट्टणाकडील राजकारणें, पृ. २२ पहा.

भानगडीमुळें या संशयास बळकटी येत चालली. कारण त्रिंकबार बंदर वलंदेजाकडून (डचाकडून) फ्रेंचांनीं घेतल्याची बातमी या सुमारास आली; या ठिकाणावरून इंग्रजांच्या ठाण्यावर हल्ला करण्यास फ्रेंचांना फार सोईचें पडत होतें. अर्थात् हें बंदर घेण्यांत फ्रेंचांचा हेतु टिपूस मिळून इंग्रजांवर चाल करण्याचा असला पाहिजे असा अंदाज दिसूं लागला. या वेळच्या इंग्रजी मसलतीसंबंधानें मराठ्यांचा मुंबईचा बातमीदार लिहितो, " फ्रान्सेज यांचा भाव पुरता घ्यानीं आणणार कीं, हैदरखानास (येथें टिपूस असें पाहिजे) मदत, त्याजकडून (फ्रेंचाकडून), जाहाली म्हणजे वरचेवर श्रीमंतास मिळोन टिपूवर चढाव करावा व त्रिंकबार यांजबरही जावे. "

इंग्रजांचा हा ' मसलतीचा भाव ' टिपूस समजल्यामुळें त्यांलाही किनाऱ्याकडे लक्ष देणें भाग पाडलें. व तो कलिकोटास * आला.

याशिवाय कलिकोट्यास येण्यांत टिपूचा आणखी एक हेतु असावा. त्याचा मांडलिक चेरिकलचा राजा तलचेरी येथील इंग्रजी कंपनीनें बहुतेक संपुष्टांत आणला होता. वस्तुतः तालचेरी बंदर या राजाच्या ताब्यांतलें. पण त्याला वेळोंवेळीं कर्जाऊ रकम देऊन व तालचेरीबंदराच्या जकातीचा मक्ता आपण पत्करून कंपनीनें राजास अगदीं मिंधे केलें होतें. शिवाय कर्जाच्या फेडीकरितां ' रांधतेरा ' प्रांत लाऊन घेतला होता तो निराळाच. अशा स्थितींत २०।२२ वर्षें गेलीं तरी प्रांत सोडण्याचें अगर जकातीचा हिशेब सालोसाल देण्याचें कंपनीच्या हातून घडेना. तेव्हां त्या राजानें एके दिवशीं त्रासून इंग्रजी शिपाई हाकून दिले व आपला प्रांत ताब्यांत घेतला आणि जकातीच्या मक्त्याबद्दल वीसबावीस वर्षांच्या बाकीपैकीं निदान एक लाख रुपये पाठविण्याबद्दल कंपनीस तगाद्याचें पत्र पाठविलें. तेव्हां कंपनीनें ' राजाचा हिशेब चुकता केला असून कंपनीचें राजानें उलट देणेंच निघत आहे ' अशी (त्या राजाचा वरिष्ठ जो) टिपू याजकडे तक्रार केली. अर्थात् टिपूला या प्रकरणाची चौकशी करण्यासाठीं समुद्रकाठच्या प्रदेशांत जाणें भाग होतें.

पण " ही टिपूची हालचाल तालचेरी येथील इंग्रजांवर हल्ला करण्यासाठीं असली पाहिजे व चेरीकाच्या राजास टिपूची फूस असल्यावांचून तो आमच्याशीं इतक्या जोराबारीचें वर्तन

---

* " टिपूमिया यासी, कांहीं इंग्रेजाकडून, मसलतीचा भाव समजण्यांत आल्यामुळें टिपु खुद्द फौजसुद्धा बंदरचीं ठिकाणें आहेत तेथील बंदोबस्ती करावी व कलिकोटास किल्ला बांधावयाचा बेत केला आहे. सबब कलिकोटाकडेस टिपू आला आहे. "

पर. दर. मरा. चे वकील.

करणार नाहीं " अशी सबब पुढें करून कंपनीनें तालचेरीस युद्धाची तयारी चालविली, व मुंबईकडे जाणारें एक जहाज तेथें ठेवून घेतलें.‡

याशिवाय या वेळीं इतर निमित्य पुढें करून इंग्रज तालचेरीस अन्नसामुग्री व पैसा यांची जमवाजमव करू लागले. " येथून (मुंबईहून) दीड लक्ष रुपये बाणकोटास जातात म्हणून रवाना जाहालेत; परंतु सदरहू रुपये तालचेरीचे खर्चास गेले आहेत. गवगवा न व्हावा याबद्दल बाणकोटचें नांव घातलें. तालचेरीचे लोकास भातें, डाळ, तांदूळ वगैरे येथून बतेले भरून मुबलक रवाना होत असे (आहे). मनवर (man of war) व गुराब तालचेरीस जातील येतील. इतक्यांत संयोग पाहून मालवणाकडेस अकस्मात भिडतील असा बेत दिसतो " असें त्या वेळच्या इंग्रजांच्या हालचालीचें वर्णन मराठ्यांच्या बातमीदारानें दिलें आहे. अशा परिस्थितींत टिपूलाही सैन्य जमविण्याची आवश्यकता भासू लागली. व "अजम टिपूमिया याचे फौजेचा चांद कालिकोटचे दरम्यान व मंगळोर येथें फारच उतरल्या आहेत. तालचेरीवरून कानानोरास फौजा जावयासी मार्ग मागतो, इंग्रेज देत नाहींत. " $ अशी स्थिति प्राप्त झाली.

एकंदरीत हे तालचेरीचें प्रकरण विकोपास जाऊन टिपू व इंग्रज यांचें युद्ध जुंपण्याचा अधूनमधून संभव दिसे. परंतु या वेळीं कित्येक गोष्टीबद्दल अद्याप संशय घेण्याजोगी परिस्थिति होती. मराठे कोणत्या बाजूस मिळतील, फ्रेंचांचा हल्ला आल्यास तो परतवितां येईल किंवा नाहीं. खालच्या बाजूनें टिपूस पायबंद देण्यास काय उपाय योजावा वगैरे प्रश्नांचीं उत्तरें अद्याप निश्चयात्मक रीतीनें देणें कठिण होतें. यामुळें कर्नाटकच्या मसलतीकडेच पूर्ण लक्ष लागलें होतें तरी कार्नवालिसनें आणखी थोडे दिवस वाट पहात व तयारी करीत घालविण्याचें ठरविलें.

या विचारांची फोड रघुनाथ रणसोड नांवाच्या मुंबई येथील मराठ्यांच्या बातमीदारानें फार मार्मिकपणें केली आहे. १७८८ च्या आक्टोबर १२ तारखेस लिहिलेल्या बातमी-

---

‡ "एडमिरल म्हणून थोरलें जहाज मद्रासहून मुंबईस यावयासी तालचेरीचे मार्गेहून येता तालचेरीस इंग्रेजानें ठेवून घेतलें आहे. निमित्य कीं टिपू मिया याच्या फौजा कालिकोटाकडेस उतरल्या आहेत. न कळे, हंगामा (हल्ला) तालचेरीकडेस जाहाला तर इंग्रेज लोकांचे कबिले त्या जहाजावर चढवून मुंबईस पाठवावे हा विचार करून जहाज खोटी केलें आहे (थांबविलें आहे)." पर. दर. मराठ्यांचे वकील.

$ पर. दर. मरा. चे वकील. पृ. २२।२३.

पत्रांत तो म्हणतो—" मसलतीचा भाव बारकाईनें घेतां लक्ष तों कर्नाटकावरी खरें आहे; परंतु त्यांत ही कल्पना प्राप्त जाहली जे भिलामलाय (?) हें ठिकाण फ्रान्सेजांचें (फ्रेंचांचें) होय. हाली फ्रान्सेज यांनीं...लोकांची जमाबंदी फारच ते ठिकाणीं केली आहे. इंग्रेजास व त्यांस सलूख तों चालतो. ऐसें असतां इंग्रज त्याचा विश्वास काडीमात्र धरीत नाहीं. टिपूचा व इंग्रेजांचा बेबनाव जाहाल्यावर (फ्रेंच) टिपूस साहित्य करील अथवा परभारें हरएक ठिकाणावर (घाला) घालील ऐसी पुढील विचाराची छालणूक होत आहे. त्यांत द्रव्याची जमाबंदी अद्यापि जाहाली नाहीं. याजकरितां त्वरित मसलतीचा उठाव दिसत नाहीं. पातशाहाचा हुकूम आहे कीं आपलीं ठिकाणें आहेत तेथील बंदोबस्ती यथास्थित जाहाल्यानंतर कर्नाटक येथील मसलत जाहालियावर (जाहालियास ?) ठीक पडेल."

तथापि इंग्रजांना या वेळीं कर्नाटकच्या मसलतीचा उठाव करणें गैरसोईचें वाटत असलें तरी सैन्याची जमवाजमव करणें मात्र अगत्याचें दिसलें. तालचेरीखेरीज चेतपट, त्रिणामल, आरणी, कामकनूर, तीर्थम्, कडपनाथ वगैरे टिपूच्या सरहद्दीनजीकच्या ठाण्यांमधून इंग्रजी शिपायांची जमवाजमव व हालचाल जोरांत चालली होती व त्यांच्या टिपूच्या शिपायांशीं अधूनमधून चकमकीही झडत असत. * पण त्या किरकोळ स्वरूपाच्या असल्यामुळें येथें त्यांचें वर्णन न दिलें तरी चालण्याजोगें आहे.

आतां म्हैसूरच्या तिसऱ्या युद्धाचें कारण म्हणून सर्व इतिहासकारांनीं नमूद करून ठेवलेलें जें त्रावणकोर प्रकरण, त्याचें स्वरूप काय होतें तें पाहूं.

पुढें दिलेल्या नकाशाकडे† पाहिलें असतां हें ध्यानांत येईल कीं, त्रावणकोरच्या पश्चिम

---

* चिनापट्टणाकडील राजकारणे, पृ. ३१।३२ पहा.

† या लेखांत व नकाशांत दिलेलीं कित्येक गांवांचीं व व्यक्तींचीं नांवें अपरिचित अशीं भासण्याचा संभव आहे. याचें कारण आमच्या देशांतील गांवांचीं नांवें इंग्रजी नकाशांत दिल्याप्रमाणें वेडीवांकडीं व अत्यंत अपभ्रष्ट अशीं उच्चारण्याची आपणास सवय लागली आहे. पण हा लेख जुन्या पत्रावरून व त्यांतील आधार देऊन लिहावयाचा असल्यामुळे देशीं नांवेंच देणें इष्ट वाटलें. हीं ओळखण्यास अडचण पडूं नये म्हणून कांहींचा खुलासा येथें देतों.

चिनापट्टण-मद्रास.	फुलचरी पांडेचरी.	वलंदेज-डच.
तालचेरी-तेलचेरी.	कोची-कोचीन.	फरासीस-फ्रेंच.
कालिकोटा-कालिकत.	हालन-हॉलंड.	केमल-कँबेल.

सरहद्दीजवळ एके ठिकाणीं खाडी आंत आल्यामुळें (लेखणीचा टाक तोडल्यामुळें जशी ती दुभंगते तद्वत) जमिनीचे दोन भाग झाले आहेत. पैकीं पश्चिमेकडील म्हणजे समुद्राच्या लगत्याचा भाग कोचीकराचा व खाडीच्या पूर्वेपासून डोंगरापर्यंतचा भाग त्रावणकोरच्या राजाचा होता. त्रावणकोरच्या राजाचें नांव **किरीटी रामराजा** असें असून तो कंपनी सरकारचा दोस्त किंवा त्याच्या दरबारीं असलेल्या इंग्रजी रेसिडेंटाच्या पूर्णपणें छायेखालीं गेलेला एक संस्थानिक होता. कोचीकर तर सांगूनसवरून टिपूचा मांडलिकच होता. यामुळें इंग्रज व टिपू यांमध्यें युद्धप्रसंग सुरू झाला तर इंग्रजांना त्रावणकोर प्रांतांत व टिपूला कोची संस्थानांत सोईस पडेल तेव्हां सैन्य घुसवितां आलें असतें; आणि दोघांनीं असा प्रयत्नही केला. पण इंग्रजांचा प्रयत्न साधला व टिपूचा फसला.

या ठिकाणीं इंग्रजांचा हेतु कां सफल झाला हें समजण्याकरितां थोडी मागली हकीकत सांगितली पाहिजे. एके काळीं कलिकोट्याच्या झामरीनानें (राजानें) कोचीकरावर हल्ला केल्यामुळें तो परतविण्यासाठीं कोचीकरास त्रावणकोरच्या राजाचें साहाय्य घेणें अगत्याचें दिसलें. त्याप्रमाणें साहाय्य घेऊन त्यानें प्रसंग निभाऊन नेला. पण या सहायाबद्दल त्रावण-कोरच्या राजास कांहीं मोबदला देण्याचा प्रश्न निघाला तेव्हां त्यानें डोंगराच्या पायथ्याचे व समुद्राच्या खाडीचें पाणी येऊन नापीक बनलेले दोन तालुके देऊ केले. अर्थात् त्रावणकोरच्या राजानें प्रथम ते घेण्याचें नाकारलें. यानंतर हें प्रकरण असेंच अर्धवट स्थितींत असतांना कोचीचा राजा मरण पावला व त्या भागांत हैदराच्या हालचाली सुरू झाल्या. तेव्हां हैदराची धाड आपल्या प्रांतावर आली तर आपला बचाव कसा करावा याची विवंचना करीत असतां त्रावणकोर व कोची या दोनही संस्थानांच्या अधिपतींना तीस मैलांचा एक भक्कम कोट बांधण्याची कल्पना सुचली. हा कोट कोठें बांधावा याचा विचार केल्यावर विपिन नांवाच्या बंदरापासून आनेमलै (म्ह. हत्तीचा डोंगर) पर्वताची सोंडेसारखी एक शाखा पूर्वेस पुढें आलेली आहे तेथपावेतो तीस मैलांची भिंत बांधणें कमी खर्चाचें आहे असें दिसलें. तेव्हां कोचीच्या राजानें पूर्वी देऊं केलेले दोन तालुके या वाटेवर असल्यामुळें त्रावणकोरच्या राजानें ते या वेळीं आपल्या ताब्यांत घेतले; आणि कोट बांधण्याचें काम मोठ्या खर्चाचें होतें तरी पार पडलें. हा कोट चांगला भक्कम असून त्याला बाहेरून सोळा फूट रुंदीचा व चारपाच पुरुष खोल अशा खंदकाचा दुजोरा दिला होता; व त्या पलीकडे समुद्र-किनाऱ्यापासून तों तहत आनेमलैच्या शुंडाकृति शाखेपर्यंत वेळवाची व निवडुंगाची दाट लागवड करून त्यांचें मोठें कुंपण बनविलें होतें. याशिवाय ठिकठिकाणीं टेकड्यावरून बुरुज व

पडकोट बांधून व बातेऱ्यांची तयारी करून शक्य तितकी स्वसंरक्षणाची व्यवस्था केली होती.

पण हा निर्जीव भिंतीचा कोट कितीही भक्कम केला तरी त्यामागें दडून बसूं पाहणाऱ्या राजांच्या छातीचा कोट निर्बल असल्यामुळें या व्यवस्थेंत एक मोठेंच व्यंग राहिलें. ही भिंत त्रावणकोरच्या सरहद्दीच्याही पलीकडून गेलेली असल्यामुळें त्या संस्थानाचें संरक्षण करण्यास ती चांगली उपयोगी पडण्याजोगी होती हें खरें. पण ही भिंत कोची संस्थानच्या मधून गेली असल्यामुळें शत्रूचा हल्ला आल्या वेळीं कोटाबाहेरचा कोचीकराचा मुलूख राखण्यास ती असमर्थ होती. यामुळें अशा प्रसंगीं आपलें कसें होईल या धास्तींत कोचीकर असे. अशा वेळीं हैदराची स्वारी या प्रांतावर झाली व त्यानें कोचीकरांस आपल्या भेटीस येण्याबद्दल निरोप पाठविला; तेव्हां कोचीकरास एकीकडून आड व एकीकडून विहीर अशी पंचाइतीची स्थिति प्राप्त झाली. भेटीस जावें तर हैदर सांगेल तें मान्य करून येणें प्राप्त. न जावें तर अर्धें राज्य हैदरानें घेतलेलें उघड्या डोळयांनीं पहात स्वस्थ बसलें पाहिजे; अखेर हैदराची भेट घेणेंच श्रेयस्कर आहे असा मनाशीं निश्चय करून तो भेटीस गेला; आणि हैदराचें मांडलिकत्व मान्य करून सुखरूपपणें परत आला.

पण या एका भेटीमुळें बऱ्याच गोष्टींचें स्वरूप पार बदलून गेलें. कोचीकरास कोटाचा तादृश उपयोग दिसेना. ' त्रावणकोरचा राजा इंग्रजांचा स्नेही व आपण हैदराचे मांडलिक तेव्हां आपल्या हितसंबंधांत केव्हां विरोध येईल कोण जाणें ' या फिकीरींत तो होता. तथापि त्याचें राहणें त्रावणकोरच्या हद्दींत असल्यामुळें वरवर पाहणारास सर्व व्यवहार सलोख्यानें चाललेला दिसत होता.

यानंतर हैदर मरण पावला आणि टिपू व इंग्रज यांमध्यें युद्ध जुंपलें. व त्या वेळीं त्रावणकोरच्या सुपीक प्रदेशांतून इंग्रजांना सामुग्रीची चांगली मदत पोहोंचली असल्यामुळें मंगळूरच्या तहाच्या वेळीं इंग्रजांनीं त्रावणकोरच्या राजाचें म्हणजे किरीटी रामराजाचें नांव आपल्या दोस्तांच्या यादींत नमूद करून ठेवलें.

यानंतर मागें सांगितल्याप्रमाणें तालचेरी प्रकरणाची चौकशी केल्यावर टिपू पालघाटचेरीस आला. तेथून त्यानें कोचीकरास भेटीस बोलावून " तूं त्रावणकोरच्या हद्दींतून निघून माझ्या आश्रयास येशील तर रामराजानें व डचांनीं घेतलेले तुझे तालुके मिळवून देण्यास मी आपलें सैन्य तुला देतों " असा त्याला उपदेश केला. निदान अशा अर्थाचा रिपोर्ट रामराजाच्या नांवानें मद्रासच्या गव्हर्नराकडे गेला एवढें निःसंशय आहे. टिपूचा हा उपदेश कोचीकरास पटल्यामुळें तो रामराजाकडून निघून टिपूच्या आश्रयास गेला. यानंतर कोची-

कराच्या राज्याचें संरक्षण करण्यासाठीं टिपूनें व रामराजातर्फे इंग्रजांनीं सैन्य पुढें ढकलण्यास सुरुवात झाली. मात्र कोचीकर टिपूचा मांडलिक असल्यामुळें त्याच्या प्रदेशांत जाण्याचा आपला हक्क आहे असें म्हणून टिपू धडाक्यानें जाई. पण इंग्रज रामराजाचे 'दोस्त' असल्यामुळें त्याच्या संमतीनें व तो मागेल तेवढेंच सैन्य त्याच्या राज्यांत नेऊं शकत होते. तेव्हां इंग्रजांकडे रामराजानें सैन्याची आधीं मागणी करण्याचा विधि झाल्यावांचून त्यांना आपलें सैन्य त्याच्या हद्दींत नेतां येईना. पण टिपूच्या या प्रांतांतील लष्करी हालचाल व त्याची रामराजास वाटत असलेली भीति अशीं दोन कारणें रामराजाकडून इंग्रजी सैन्याची मागणी होण्यास या सुमारास उद्भवलेली असल्यामुळें सर्व गोष्टी बिनबोभाट घडून आल्या.

या ठिकाणीं आणखी दोन व्यक्तींचा परिचय करून घेतला पाहिजे. त्यांचीं नांवें सर आर्चि-बाल्ड कँबेल व मेजर बॅनरमन अशीं होती. कँबेल हा मद्रासचा गव्हर्नर व जनरल असून कार्न-वालिसप्रमाणेंच धोरणी व दीर्घोद्योगी होता. मद्रासेकडील इंग्रजी प्रदेशांत युद्धोपयोगी सामुग्री, धान्याचा पुरवठा व लष्करी व्यवस्था दूरदर्शीपणानें करून ठेवण्याचें काम कार्नवा-लिसनें याच कँबेलकडे सोपविलें होतें व तें काम त्यानें जिवापाड मेहनत घेऊन पार पाडलें. दुसरा गृहस्थ मेजर बॅनरमन हा त्रावणकोरचा राजा किरीटी रामराजा याच्या दरबारीं असलेला रेसिडेंट. त्यानें रामराजाला चांगलेंच आपल्या कह्यांत घेतलें होतें. पुढें दिलेल्या पत्रव्यव-हारांत बहुतेक ठिकाणीं रामराजानें बॅनरमनवर हवाला दिलेला पाहून या संस्थानचा कार-भार या रेसिडेंटाच्याच तंत्रानें चालत असावा असें वाटतें. तें कसेंही असो. १७८८ च्या जूनपासून रामराजा व मद्रासचा गव्हर्नर कँबेल यांत टिपूच्या हालचालीचा अर्थ काय याबद्दल जो पत्रव्यवहार सुरू झाला, त्याचें सामान्य स्वरूप असें आहे.

प्रथम १७८८ च्या जून ९ तारखेस रामराजानें मद्रासकरास पत्र पाठविलें त्यांत अशा अर्थाचा मजकूर होता. "कालिकोटा व पालघाटवरीच्या आसपास टिपूच्या हालचाली होत आहेत. त्यांत टिपूचा हेतु कदाचित आमच्यावर चाल करून येण्याचा असेल. तेव्हां आमच्या सैन्याची शिस्त सुधारण्याकरितां तुम्हीं कांहीं लष्करी अधिकारी आम्हांस पुरवावे."

रामराजाच्या पत्रास कँबेलनें उत्तर पाठविलें कीं, "कंपनीच्या नियमाप्रमाणें अधिकारी देतां येत नाहीत. पण तीन पलटणींचा खर्च सोशीत असाल तर आम्ही त्या तुमच्या तैना-तीस देऊं." यानंतर आणखी बराच पत्रव्यवहार होऊन "एका पल्टणीस १७५०

होन (Star pagodas) खर्च देण्याचें कबूल करून राजानें दोन इंग्रजी पलटणें ठेवावीं व अधिक पलटणींची जरूर लागल्यास कंपनीनें ती आपल्या खर्चानें रामराजाला पुरवावी '' असा ठराव झाला. याबद्दल आभार व्यक्त करण्याकरितां ५ नोव्हेंबर रोजीं लिहिलेल्या पत्रांत रामराजा म्हणतो, " माझी विनंति मान्य केली हे माझ्यावर मोठे उपकार झाले; पण माझें स्वतःचें सैन्य तुम्हीं आपल्या तिनेवल्ली प्रांतांत नेलें आहे तें माझें मजकडे लौकर परत धाडण्याबद्दल हुकूम द्यावा. '' म्हणजे या वेळीं त्रावणकोरच्या राजाचें सैन्य इंग्रजांच्या मदतीस तिनेवल्लीकडे जाऊं शकलें पण स्वसंरक्षणासाठीं मात्र त्याला इंग्रजी पलटणें भाड्यानें आणावीं लागलीं ! एकंदरींत या प्रकरणांत रामराजा आपल्या मताप्रमाणें वागण्यास स्वतंत्र होता किंवा तो बॅनरमनच्या तंत्रानें वागणारा बाहुलें बनला होता हा एक विचार करण्याजोगा प्रश्न आहे.*

अशा प्रकारें त्रावणकोरच्या हद्दींत इंग्रजी सैन्याची मांडणी झाली; व या संस्थानच्या हद्दीबाहेर असलेलीं डचांच्या ताब्यांतील (पण कोचीकरांच्या मालकीचीं) ठाणीं घेण्याचा जो टिपूचा बेत होता तो हाणून पाडण्याचा विचार सुरू झाला; ' क्रांगनूर व अयकोटा हीं बंदरें टिपू घेईल तर त्रावणकोरच्या तटाचें संरक्षण करणें जड जाईल' असें ठरून कॅंबेलच्या संमतीनें हीं ठाणीं त्रावणकोरच्या रामराजानें विकत घ्यावीं अशी कल्पना निघाली व ती सहज शेवटास गेली असती. पण मध्यंतरी १७८९ च्या फेब्रुवारींत कॅंबेलची प्रकृति बिघडून तो विलायतेस गेल्यामुळें येथवर बिनबोभाट चाललेल्या व्यवहारांत एकदम घोटाळा उडाला. कारण कॅंबेलच्या जागीं आलेला मद्रासचा गव्हर्नर हालंड हा अगदीं निराळ्या स्वभावाचा मनुष्य होता. टिपूस चीड येईल असें कृत्य इंग्रजांनीं किंवा त्यांच्या दोस्तानें करून त्यामुळें टिपू व इंग्रज यांत युद्धप्रसंग ओढून यावा ही गोष्ट त्याला मुळींच संमत नव्हती. टिपू त्रावणकोरच्या हद्दींत येईल तर रामराजाच्या मदतीस जाणें हें इंग्रजांचें कर्तव्य आहे; पण आपल्या हद्दीबाहेरलीं बंदरें ताब्यांत घेऊन टिपूची धाड रामराजा बळेंच ओढून घेईल तर आम्हीं त्याचा पक्ष उचलणार नाहीं असें त्यानें राजारामास कळविलें. तरी त्यास न जुमानता रामराजानें हीं बंदरें डच लोकांपासून विकत घेतलीं. या बंदरांत डचांच्या वखारी होत्या, पण त्या बंदरांची मालकी कोची-

* हा सर्व पत्रव्यवहार एचिसनकृत ' तहनामे व पत्रव्यवहार वगैरे ' या ग्रंथाच्या पांचव्या खंडांत दिलेला असून त्यावरून सारांशरूपानें तो येथें घेतला आहे.

कराची किंवा डचांची हा एक मोठा वादग्रस्त प्रश्न होता. रामराजा व रेसिडेंट बॅनरमन यांच्या-मतें हीं बंदरें डचांची व हालंडच्या मतें तीं कोचीकराचीं. पुढें हा वाद कार्नवालि-सकडे गेला. तेव्हां प्रथम त्याचेंही मत हालंडप्रमाणेंच होतें. पण शेवटीं त्यानें रामराजास अनुकूल असा ठराव केला.

टिपूला अर्थातच ही गोष्ट पटली नाहीं. " हीं बंदरें कोचीकरांच्या राज्यांतलीं असून तेथें वखार घातल्याबद्दल डच लोक भाडें भरतात. म्हणून या राजाची रयत या नात्यानें ते बंदरांत राहिलेले व्यापारी आहेत असें सिद्ध होतें. अशा स्थितींत हीं बंदरें विकत देण्याचा अधिकार डचांना नाहीं व रामराजाला तीं माझ्या संमतीवांचून विकत घेण्याचा अधिकार तर नाहींच नाहीं. इतक्याही उपर रामराजा हीं बंदरें जबरदस्तीनें ताब्यांत ठेवीत असेल तर माझ्या मांडलिकाच्या संरक्षणासाठीं मला धाऊन जाणें भाग आहे, " असें टिपूचें म्हणणें होतें.

मद्रासचा गव्हर्नर हॉलंड याचा देखील अभिप्राय असाच पडला. त्यानें रामराजाचें विक्रीपत्र नाशाबीत ठरवून 'तीं बंदरें घेण्याचा उपद्व्याप करून टिपूची घोरपड आपणावर ओढून घेऊं नका' असा सल्ला दिला. रामराजा व रेसिडेंट यांचें म्हणणें असें कीं " हॉलंडच्या पूर्वीचा गव्हर्नर कँबेल यांच्या अमदानींत हा प्रश्न निघाला होता व त्याच्या संमतीनेंच हीं बंदरें विकत घेण्याचें ठरलें. आज ही गोष्ट आम्ही नव्यानें करीत नाहीं. याची वाटाघाट आज दोन वर्षें चालू होती. " हॉलंडनें यास सरळ असा जबाब दिला कीं, " कँबेलचा कदाचित तसा अभिप्राय असेल. पण तो जाऊन मी गव्हर्नर झालों तों-पर्यंत विक्रीपत्र कांहीं झालें नव्हतें. तेव्हां अशा महत्त्वाच्या प्रकरणांत माझा सल्ला घेणें जरूर होतें. तसा तो न घेतां हा व्यवहार झाला आहे म्हणून त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या भानगडीबद्दल मी जबाबदार नाहीं. "

खरा प्रकार असा होता कीं, 'हॉलंड हा टिपूशीं भांडण उकरून काढण्याच्या विरुद्ध आहे व तो फक्त बचावाच्या धोरणापुरतींच रामराजास मदत देण्यास तयार आहे' ही गोष्ट प्रथमपासून सर्वांना माहीत होती. पण 'क्रांगनूर व अय्याकोटा हीं बंदरें रामराजाच्या ताब्यांत असल्यावांचून कोटाचें नीटसें संरक्षण करतां येणार नाहीं' असा रेसिडेंटाचा अभिप्राय असल्यामुळें त्यानें व रामराजानें मिळून डचाकडून हीं बंदरें विकत घेण्याची शक्कल योजली होती. कारण टिपूनें या बंदरावर हल्ला केला तर " हीं बंदरें रामराजाच्या मुलखांतलीं ठरलीं म्हणजे इंग्रजांनीं रामराजाच्या मदतीस जाणें भाग आहे. "

असा कोटिक्रम लढवून हें प्रकरण ' बचावाच्या ' धोरणांत आणून टाकण्यासाठीं हा खटाटोप चालला होता. पण हॉलंड या गोष्टीनें फसून गेला नाहीं.

अशा स्थितींत या दांडगाईबद्दल रामराजाचें शासन केलें पाहिजे असें ठरवून १७८९ च्या आक्टोबरमध्यें टिपु पालघाटचेरी येथें कांहीं सैन्य घेऊन आला. त्यानें प्रथम रामराजाकडे वकील पाठवून असें कळविलें कीं, " क्रांगनूर बंदर डचांच्या मालकीचें नव्हे. अर्थात त्यांजकडून ते तुम्हांस विकत घेतां येत नाहीं. म्हणून तुम्हीं तेथें ठेवलेलें सैन्य काढून घ्या. दुसरें असें कीं कोचीच्या हद्दींत तुम्हीं बांधलेल्या कोटाचा कांहीं भाग आहे. तो तेथें राहूं देणें आम्हास इष्ट वाटत नाहीं. तेव्हां आमच्या साम्राज्यांतील एक भाग या नात्यानें तो पाडून टाकण्याचा आम्हांस अधिकार आहे "

रामराजाकडून आलेल्या उत्तरांत यांपैकीं कोणतीच गोष्ट मान्य केलेली नव्हती. "क्रांगनूर बंदर पोर्तुगीजापासून डचांनीं जिंकून घेतलें आहे. तेव्हां त्यांजपासून ते आम्हांस विकत घेण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. दुसरें, कोटाच्या भिंतीचा प्रश्न आजच कां उपस्थित व्हावा ? कोचीच्या राजानें आम्हांस हा भाग फार पूर्वी दिला होता व त्याबद्दल मंगळूरच्या तहांत कोणत्याही प्रकारें कलम घातलेलें नाहीं. अर्थात पूर्वस्थिति तहाच्या वेळीं तुम्हांस मान्य होती असा अर्थ निघतो. " या कोटिक्रमास टिपूला उत्तर देतां आलें असतें. पण या शाब्दिक वादापासून कांहीं निष्पन्न होणार नाहीं असें पाहून टिपूनें तोफा आणून (वकीलामार्फत कळविल्याप्रमाणें) कोटाचा कांहीं भाग पाडण्याचा तयारी केली. यानंतर झालेल्या झटापटीचें वर्णन तत्कालीन एका पत्रांत चांगल्या प्रकारें दिलेलें असल्यामुळें त्यांतील प्रस्तुत प्रकरणास उपयोगी पडणारा भाग अवतरणरूपानें येथें देतों. " खान मशारनिल्हे कोयेमतुरावरून खुद्द खाडीच्या काठीं छत्र आहे तेथें जाऊन उतरले. ती खाडी अडीच कोस रुंद आहे. किस्तींत (होडींत) बसून जावें. खाडीच्या अलीकडील या काठीं छत्राजवळ राजाची सरहद्दीची भिंती आहे. तेथें एका बतेरात राजाचे कांहीं लोक होते. त्यांवरील खानाचे लोक पडून राजाचे लोक सफ केले. कलहास तोच आरंभ. हें वर्तमान राजे मशारनिल्हेस कळल्यानंतर भारी फौज चाळीस हजार बार व चाळीस हजार नायमारनाये प्यादे व स्वार व तोफखाना वगैरे सरंजाम रवाना करून, आपणही कूच करून दरमजल निघाले. इकडे खान मशारनिल्हे यांनीं किस्तींत फौज दाखल करून फार जलदीनें खारीपार जाले. पार होते वेळेस राजाचे सरहद्दचे भितीजवळ राजाचे लोक

होते. त्यासी व यासी लढाई भारी झाली. खानाचे लोक फार मारले गेले. परंतु " खान मशारनिल्हेनीं खारी (खाडी) घेऊन, राजाचे सरहद्देचा किल्ला बेटीकोटा नामे, तेथे हमेशा भारी सरंजाम असतो, त्या गडावरी १६ जमादिलावली खानानीं खुद्द हल्ला केला. त्या-समयीं राजाचे लोकांनीं शर्तमर्दी करून हल्ला चढूं न देतां पुढे होऊन मुकाबिला घेतला. प्रहर दहा घटका पावेतों लढाई जहाली. खान शिकस्त खाऊन आपण खुद्द कोयेमतुरास दाखल झाले, फौज समग्र, खान-मशारनिल्हेची, खारी पलीकडेच आहे. त्या फौजेची बंदोबस्ती खान वरचेवरी कोयेमतुराहून करीत आहेत. हरदो लढाईमध्यें त्या रस्तेंत इंग्रजांची फौज नव्हती. तिनेवल्लीच्या रस्त्यावरी सहा हजार बार व कसरेकम (अजमासे) हजार फिरंगी व राजाचे लोक आहेत. तेथें असावयास कारण जे तिनेवल्लीच्या रस्त्यानें आम्हांस राजाच्या मुलखांत जावयास वाट देणें म्हणून खान इंग्रेजास लिहीत होता. तिनेवल्लीच्या रस्त्यांतून राजाच्या मुलखांत जातांना वाटेत खारी नाहीं, डोंगरकांठ व झाडी आहे. कदाचित् जबरदस्तीनें खान त्या मार्गें जातील म्हणून इंग्रजांनीं आपली फौज व राजाची फौज भारी जमीयेत तिनेवल्लीच्या रस्त्यांत ठेविली. हें जाणून खानांनीं इंग्रेज वाट देत नाहींतसें समजून पलकाटचेरीच्या मार्गें खारी उतरून, बेटीकोट्यावरी लढाई घातली."

या उताऱ्यांतील उत्तरार्धावरून बेटीकोट्यावर झालेल्या या चकमकीशीं इंग्रजांचा बिलकुल संबंध नसून टिपू व रामराजा यांमधील हें खासगी स्वरूपाचें भांडण होतें हें उघड आहे. पण रामराजा इंग्रजांच्या आधारावर आपणाशीं भांडण्यास सिद्ध झाला आहे हें टिपूस माहीत असल्यामुळें इंग्रजांनीं मध्यें पडून हें प्रकरण मिटवावें असें टिपूनें सुचविलें. यासंबंधीं वर दिलेल्या पत्रांत असा उल्लेख आहे. "खान (शिकस्त) झाल्यानंतर, येथील गत गौनेर मेस्तर हालन (गव्हर्नर मिस्तर हॉलंड) यांचे नांवें दोन पत्रें आलीं जे रामराजा आम्हासी बेअदबी तुमच्या कुमकेवरून करीत आहे. आम्हांसी व त्यासी सरहद्देचा कजिया आहे. तुम्हीं मनास आणून वारावारी करावी."

हें प्रकरण विकोपास जाऊं न देतां टिपूनें म्हटल्याप्रमाणें 'वारावारी' करून टाकावी असेंच हालंडचेंही मत होतें. आणि तें त्यानें कार्नवालिसला लिहून पाठविलें. परंतु कार्नवालिसची विचारसरणी अगदीं निराळी होती. "आमच्या इलाख्याच्या (ताब्यांतल्या) संस्थानावरी खानांनीं कमरबंदी करून गोळी वाजविल्यावरी त्याची दोस्ती काय राहिली ? यावरी तुम्ही भारी जमियत करून खानाच्या मुलखांत जाऊन, लढाई करून खानाचें

पारिपत्य नीटच करणें, ” असें कार्नवालिसनें हालंडच्या पत्रास उत्तर लिहिलें व निजामाकडे पेशव्याकडे एकदम वकील पाठवून टिपूवर मोहीम करण्याच्या बाबतींत ‘ तुम्ही सहाय करणार कीं नाहीं ’ वगैरे वाटाघाट सुरू केली.

पण कार्नवालिसची ही घाई हॉलंडला मान्य नव्हती. एवढ्या यःकश्चित कारणावरून इंग्रज व टिपू यांत युद्धाचा प्रसंग यावा हें त्यास बरें दिसेना, ‘ वादविषयक बंदरांवर डचांची सत्ता असली तरी तीं या वेळीं रामराजानें विकत घेणें म्हणजे टिपूशीं खाजवून खरूज काढण्याप्रमाणें आहे. हें विक्रीपत्र अंतरराष्ट्रीय कायद्याप्रमाणें ग्राह्य ठरणार नाहीं. मद्रासच्या शेजारीं असलेले साद्रस व पुलिकेट हे किल्ले डचांच्याच मालकीचे आहेत. पण ते त्यांनीं फ्रेंचांना या वेळीं विकत दिले तर ते आम्हीं मान्य करूं काय ? ’ अशा अर्थाचें पत्र त्यानें कार्नवालिसकडे पुनः रवाना केलें.

या पत्रांतील मजकूर पाहून कार्नवालिसच्या अंगाचा तिळपापड झाला. हालंडनें आपणास आंतरराष्ट्रीय कायदा समजाऊन सांगण्याचें धाष्टर्य केलें याबद्दल त्याला आश्चर्य वाटलें. त्यानें उत्तरादाखल इतकेंच लिहिलें कीं, “ रामराजा व डच यांच्या प्रकरणांत तुम्हीं आंतरराष्ट्रीय कायद्याचीं जीं तत्त्वें २ जानेवारीच्या पत्रांत मला लिहून पाठविलीं तीं मी पूर्वीं तुम्हास पाठविलेल्या हुकमांतील धोरणास विघातक आहेत. माझ्या हुकमाप्रमाणें वागणें हें तुमचें काम होतें. त्याच्या योग्यायोग्यतेची चर्चा करण्याचा अधिकार तुमचा नव्हे; कारण त्याच्या परिणामाची जबाबदारी तुमच्या शिरावर नसून माझ्या शिरावर आहे. ”

याशिवाय आपण पाठविलेलें खलीते रामराजास पोचविले नाहींत, युद्धाची तयारी करण्याच्या कामीं टाळाटाळी केली, पैशाची अफरातफर झाली वगैरे अनेक गोष्टींबद्दल कार्नवालिसनें हॉलंडची चांगलीच खरड काढून त्याच्या जागीं मेडोजची नेमणूक केली. अर्थात यापुढे राजीनामा देण्यावांचून हालंडला गत्यंतरच राहिलें नाहीं. पण जातां जातां पुनः एक वेळ त्यानें “ कंपनीची कुरापत काढण्याची टिपूची इच्छा नाहीं आणि वादविषयक मुद्यांची वाटाघाट करून तडजोड करण्यास तो तयार आहे अशी मला खात्री वाटते. ” असा शेरा मारला आणि तो पहिल्या बोटीनें विलायतेस निघून गेला; नंतर मेडोज मद्रासेस येऊन त्यानें युद्ध जाहीर केलें.

हालंडचा अभिप्राय वर दिलाच आहे. त्यास उत्तरादाखल टिपूनें ७ फेब्रुवारी रोजीं असें कळविलें कीं, “ मी या प्रकरणासंबंधीचे कागद स्वतः तपासून पाहिले आहेत;तेव्हां कमिशन

नेमून चौकशी करण्याचें वस्तुतः कांहीं कारण राहिलें नाहीं. पण इंग्रज सरकारची इच्छा असेल तर त्यांनीं एक दोन विश्वासू लोकांचें कमिशन मजकडे पाठवावें म्हणजे तें या प्रकरणाचा निकाल करतील. माझा व इंग्रजांचा स्नेहसंबंध आहे म्हणून मी हें पत्र लिहीत आहे. एरव्ही रामराजाचा कोट घेण्यास मला मोठेंसें जड जाईल अगर फार दिवस लागतील अशातला कांहीं अर्थ नाहीं.'' पण या वेळीं हालंडच्या जागीं नवा गव्हर्नर आला होता. आणि टिपूकडे इंग्रजांनीं कमिशनर पाठवणें म्हणजे इंग्रजांच्या इभ्रतीस कमीपणा आणण्यासारखें आहे असा त्याचा अभिप्राय पडला. तथापि आतां मद्राससरकारच्या अभिप्रायाची मातब्बरीच राहिली नव्हती. कारण टिपूशीं युद्धच केलें पाहिजे असें कार्नवालिसनें यापूर्वीं ठरविलें होतें.

त्रावणकोर प्रकरण विकोपास जाऊं नये, त्याचा निकाल तडजोडीनें व्हावा अशी टिपूची व हॉलंडची अंतःकरणपूर्वक इच्छा असून कार्नवालिसलाच या वेळीं युद्ध करण्याची आवश्यकता कां भासली हा एक महत्वाचा प्रश्न या ठिकाणीं उपस्थित होतो. त्याचें उत्तर कार्नवालिसनें यापूर्वीच म्हणजे १७९० च्या मार्च ८ तारखेस मद्रासकडे रवाना केलेल्या खलित्यांत दिलें आहे. त्याचा सारांश असाः—


'' मुत्सद्देगिरीच्या व इभ्रतीच्या दृष्टीनें पाहिलें असतां या वेळीं टिपूकडून जबर भरपाई घेणें आवश्यक आहे; इतकेंच नव्हे तर इंग्रजी राष्ट्राविषयींचें शत्रुत्व वेळीं अवेळीं उघडपणें बोलून दाखविणाऱ्या टिपूची सत्ताच कमी करण्याकडे आम्हीं या प्रसंगाचा उपयोग केला पाहिजे. सध्या एतद्देशीय संस्थानाकडून आम्हांस मदत मिळेल असा एकंदरींत रंग दिसतो आणि टिपूला या वेळीं फ्रान्सकडून मदत मिळणें मात्र अशक्य आहे. अशा परिस्थितींत आजचें त्याचें महत्त्व कायम राहूं देणें अगर शेजारच्या राष्ट्रांना भेवडावण्याचा त्याचा आजचा क्रम असाच अव्याहत चालू देणें म्हणजे-त्याला मदत करण्याजोगी फ्रेंचांची पुनः स्थिरस्थावर झाल्यावर--भविष्यकालीं एक मोठें भयंकर युद्ध उपस्थित करण्याचें बीज राखून ठेवण्यासारखेंच होणार आहे.*

---

* या मोहिमेसंबंधींचे कांहीं कागदपत्र ब्रिटिश पार्लमेंटपुढें मागाहून सादर करण्यांत आले. त्यामधील कांहीं उतारे मिळून आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासाच्या सहाव्या खंडांत दिले आहेत. त्यापैकीं कांहींचा समावेश हें प्रकरण लिहितांना सारांशरूपानें अधूनमधून केला आहे.

कार्नवालिसच्या अभिप्रायांतील हा उतारा महत्त्वाचा आहे. त्यावरुन श्रीरंगपट्टणच्या मोहिमेचें एक महत्त्वाचें कारण फ्रेंच राज्यक्रांतींत आहे असें ठरतें. त्रावणकोर प्रकरणाकडे टिपू सामान्य नीतीच्या किंवा व्यवहाराच्या दृष्टीनें पाहात होता; व हॉलंड अंतरराष्ट्रीय कायदा पाहून या प्रश्नाची योग्यायोग्यता ठरवूं पाही; पण कार्नवालिसची दृष्टि राष्ट्रीय स्वरूपाची होती. " इंग्रजांचा शत्रु टिपू या वेळीं असहाय आहे; फ्रेंच लोक स्वदेशांतील राज्यक्रांतीच्या बंडाळीमुळें त्याच्या मदतीस आज येऊं शकत नाहींत; आणि इंग्रजांना मराठे व निजाम यांची मदत मिळण्याची खात्री आहे; तेव्हां टिपूस चांगला नरम करण्याची ही संधी वाया जाऊं देणें इंग्रजी राष्ट्राच्या फायद्याच्या व लौकिकाच्या दृष्टीनें चुकीचें ठरेल " असा कार्नवालिसच्या म्हणण्याचा इत्यर्थ होता. तेव्हां त्याला व्यावहारिक नीति अगर अंतरराष्ट्रीय कायद्याची तत्त्वें समजाऊन देऊन युद्धापासून परावृत्त करूं पाहणें म्हणजे " वाळवेच्या घाण्यांतून तेल केव्हां निघतें " म्हणून वाट पहात रहाण्यासारखें मूर्खपणाचें होतें. सारांश मद्रासच्या अधिकारपदावरून झालेली हॉलंडची हकालपटी म्हणजेच कार्नवालिसनें टिपूस पाठविलेलें युद्धाचें स्पष्ट आव्हान होय. अर्थात यानंतर 'वारावारी'ची भाषा आटोपून दोन्ही बाजूस युद्धाच्या तयारीची 'वाटाघाट' ऐकूं येऊं लागल्यास कांहीं नवल नाहीं.

सवाशें वर्षांपूर्वीचा दक्षिण हिंदुस्थान.



भाग ३ रा.

परराष्ट्रीय राजकारण व धर्मच्छलाचे दुष्परिणाम.

मागील भागांत टिपूचें त्रावणकोरच्या राजाशीं–व पर्यायानें इंग्रजांशीं–युद्ध सुरु होण्याचीं कारणें कोणतीं याची हकीकत दिली व पुढें प्रत्यक्ष युद्धाची हकीकत द्यावयाची. पण ती देण्यापूर्वी युद्धांत यशापयश येण्यास ज्या गोष्टी कारणीभूत होतात त्यांची माहिती सांगणें आवश्यक आहे. कारण ती माहीत असल्यावांचून एका पक्षास जय व दुसऱ्यास परजय कां आला याचा नीट खुलासा होत नाहीं.

प्रत्यक्ष रणांगणावर यश मिळविण्यास ज्या गुणांची व सामग्रीची आवश्यकता असते ते गुण व ती सामग्री टिपूजवळ चांगली होती. टिपूचा स्वभाव धाडसी, शूर व बाणेदार असून सैन्यांत आवेश उत्पन्न करण्याची हातोटी देखील त्याला चांगली साधली होती. फ्रेंच व जर्मन अधिकाऱ्यांच्या मदतीनें त्यानें कवाइती सैन्य तयार केलें असून त्याच्याजवळ जबरदस्त तोफखाना होता. राज्यांत फंदफितूर होऊं नये म्हणून त्यानें कडक बंदोबस्त ठेवून प्रजेस समृद्ध ठेवण्यासाठीं तो झटत असे. तो स्वतः मुसलमानी धर्माचा पूर्ण अभिमानी व ख्रिस्ती धर्मांचा द्वेष्टा होता तरी त्याच्या राज्यांत हिंदु प्रजेस आपल्या धर्मानुसार वागण्याची मोकळीक होती, व हिंदु लोकांची देवळें व त्यांचे धर्मगुरु यांचा प्रसंगोपात तरी मानमरातब राखण्यांत येत होता. उदाहरणार्थ; युद्ध सुरू होतांच शृंगेरीचे शंकराचार्य व कडकडीत धर्माचरण करणारे ब्राह्मण यांनीं टिपूला यश मिळण्याप्रीत्यर्थ देवावर कसा भार टाकला व त्याबद्दल त्यानें त्या सर्वांचा कसा गौरव केला हें इतिहाससंग्रहांतील एका उताऱ्यावरुन स्पष्टपणें कळण्याजोगें आहे.*

---

*-रंगस्वामीपाशीं व शिवालयीं ब्राह्मण अनुष्ठानास घालून प्रयोग चालिले आहेत. एक ब्राह्मण जलांत मस्तक ठेवून, दोन अडीच प्रहर वरते पाय करून, अनुष्ठान करीत आहे. याशिवाय चाळीस ब्राह्मणांनीं दुसरा पर्याग चालविला. याखेरीज बहुत ब्राह्मणांकरवीं अनुष्ठानें चालविलीं. त्यांत कोण्ही भोजन करून, कोण्ही निर्शनाचा फराळ करून, आहेत. याप्रमाणें शृंगेरीकर स्वामी यांस तेथें नेलें आहे. ते उपवास करितात. याकरितां भोजनाविशीं बहुत आग्रह केला. त्यांणीं उत्तर केलें जे, भोजनाचा प्रकार ज्या काळीं घडेल तेव्हां करीन. तेव्हां बहुत प्रकारें सांगितलें जे तुम्ही स्वस्थ असावें. द्रव्य पाहिजे तितकें देईन. याप्रमाणें बोलोन सुवर्णप्रतिमा फार कांहीं एक करून दिल्या आणि चाळीस सहस्रांचा शिधा ब्राह्मणभोजनाकरितां देवविला. पट्टणांत दोन हजार ब्राह्मण दररोज भोजन करीत आहे. (ऐ. टि. भा. ५, पृ. २८) हें वर्तमान हरिपंत फडक्यांनीं पुण्याकडे पाठविलेल्या पत्रांत १७९० च्या नोव्हेंबरांत लिहिलें आहे.

पण युद्धांत शेवटीं यश येण्यास एवढे गुण अंगीं असून भागत नाहीं. सेनापतीचा स्वभाव व त्याचें पूर्वचरित्र या गोष्टी देखील कोणत्या पक्षास यश येईल हें ठरवितांना जमेस धराव्या लागतात; कारण ज्या सेनापतीचा अगर राजाचा स्वभाव क्रूर व खुनशी असेल व ज्याच्या हातून कोणत्याही कारणानें धर्मच्छल झाला असेल त्याच्या उलट पक्षास शेजारीपाजारी सहजगत्याच जाऊन मिळतात; आणि अशा रीतीनें समान शत्रु-त्वामुळें एकत्र झालेल्या संघापुढें शूर पण एकाकी राजास शेवटीं हात टेकणें भाग पडतें. टिपूच्या बाबतींत हा अनुभव फार स्पष्टपणें आला; आणि याचमुळें प्रत्यक्ष युद्धाची हकीकत देण्यापूर्वीं त्यानें आपल्या शेजारच्या प्रांतांत धर्मच्छल करून लोकमत कसें आपल्याविरुद्ध करून ठेवलें होतें याची कल्पना देणें आम्हांस अगत्याचें दिसतें.

टिपूचा स्वभाव एकंदरींत उत्पाती म्हणून प्रसिद्ध होता. तो शेजारच्या राजांपैकीं कधीं कोणावर चाल करील याचा नेम नसे; आणि यत्किंचित कारण सापडतांच लष्करी सामर्थ्याच्या जोरावर तो लहानसहान राजांना चिरडून टाकीत असे. यामुळें ते नेहमीं टिपूच्या लष्करी हालचालीकडे संशयित दृष्टीनें पहात. याशिवाय शत्रूशीं व बंडखोर लोकांशीं क्रौर्यानें वागण्याचा व त्यांना बाटवून मुसलमान करण्याचा क्रम त्यानें सुरू केल्यामुळें या संशयास तीव्र द्वेषाचें स्वरूप येत गेलें. एकंदरींत दक्षिण हिंदुस्थानांतील तत्कालीन लहानमोठ्या सत्ताधाऱ्यांचें त्यानें वैर संपादन केलें व त्याची भरपाई करण्यासाठीं पर-राष्ट्रीय राजकारणांत उलाढाल करून तेथून सहाय मिळविण्याचा त्यानें प्रयत्न केला. पण त्यामुळें ‘ हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागणाऱ्या ’ मनुष्यास जो अनुभव येतो तोच टिपूस आला.

पैकीं परराष्ट्रीय राजकारणाची माहिती प्रथम देऊं. इराण, तुर्कस्तान व फ्रान्स या तीन देशांकडे वकील पाठवून त्यांच्याशीं तह करण्याचा व त्यांची मदत मिळविण्याचा टिपूनें प्रयत्न केला. परंतु त्यांत त्याला बिलकुल यश आलें नाहीं. त्यांतल्या त्यांत तुर्कस्थानकडे पाठविलेल्या मिशनची इतकीं फजिती झाली कीं पुढें कित्येक वर्षेपर्यंत हें मिशन म्हणजे लोकांच्याच नव्हे तर खुद्द टिपूच्या देखील थट्टेचा विषय होऊन बसला होता.

तुर्कस्थानच्या बादशहाकडे पाठविलेल्या मिशनची हकीकत त्या मिशनमधील लतीफ अलीबेग नांवाच्या वकीलानें व सय्यद जाफर नांवाच्या त्याच्या चिटणिसानें लिहिलेल्या रोजनिशीच्या आधारें आपण दिली आहे असें विल्कस म्हणतो. ही रोजनिशी १७९२

मध्यें इंग्रजी सैन्य श्रीरंगपट्टणास गेलें त्या वेळीं तेथें त्यास मिळाली व ती कलकत्त्यास ठेवण्यांत आली आहे असें म्हणतात.

हें मिशन १७८५ मध्यें निघालें. हजार अकराशें लोक, नजराण्याचें सामान आणि चार हत्ती एवढें लटांबर नेण्याकरितां या मिशनच्या कामाकडे चार जहाजांची नेमणूक झाली होती; पैकीं एक जहाज युफ्रेटिस व तैग्रीस नदीच्या संगमाजवळ अग्निनारायणास बळी पडलें व चारही हत्ती वाटेंतच मरण पावले! बसरा येथें या वकीलांचे योग्य तऱ्हेनें स्वागत करण्यांत. आलें. परंतु पुढें कॉन्स्टान्टिनोपलकडे जाण्यास परवानगी मिळेपर्यंत तीन महिने लोटले. तोंपर्यंत वकीलांनीं नजफ, करबेला वगैरे क्षेत्रांचें दर्शन घेऊन आपला काल कंठला. नंतर एकदाची परवानगी आली व हें अवजड मिशन जलमार्गानें बगदाद, मोसूल, दियारबेकर या वाटेनें कॉन्स्टान्टिनोपल येथें पोचलें. नंतर दरबारांत येण्याची परवानगी मिळण्यास आणखी कांहीं महिने लागले. शेवटीं एकदा सुलतानाची भेट झाली, ती देखील उभ्याउभ्या झाली. त्या वेळीं सुलतान साहेबांची स्वारी दुमजल्यावर सज्जांत सुखासीन असून टिपूच्या वकीलांनीं खालच्या मजल्यांतून त्याला सलाम केला. बादशहानें नंतर आपल्या जवळच्या एका अधिकाऱ्याला " बरे आहा ना?" असा प्रश्न करण्यास सांगितलें. तेव्हां " आपल्या उत्कर्षाची प्रार्थना करणारे हे दास सुखरूप आहेत " असें उत्तर टिपूच्या वकीलांनीं दिलें. नंतर " तुम्हांस फार त्रास झाला असेल?" या दुसऱ्या प्रश्नास " आपल्या दर्शनानें श्रमपरिहार होऊन आम्हांस अत्यानंद झाला आहे " असें उत्तर दिलें. झालें. भेटीचा विधि येथें आटोपला व वकीलांना निरोप देण्यांत आला!

अशा रीतीनें सामोपचारांत नऊ महिने गेले; या अवधींत फक्त एक वेळ मुख्य कामासंबंधीं वजीराशीं बोलणें झालें. तो प्रकार असा—

वजीर—तुमचें काम काय आहे तें बोला.

गुलामअली—आमच्या मालकाच्या मनांतून सुलतान साहेबांशीं साक्षात दळणवळण ठेवावयाचें आहे व तत्प्रीत्यर्थ मंगलूरचा किल्ला नजरेदाखल देण्यास तो तयार आहे.

वजीर—याचा विचार करण्यांत येईल. पुढें दुसरें काम काय आहे?

गुलामअली—या नजरेचा मोबदला म्हणून बसरा बंदर आपणास तुम्ही यावे अशी आमच्या मालकाची इच्छा आहे.

चिटणीस—[वजीरास या संभाषणाचें भाषांतर सांगण्यापूर्वी] तुम्ही कोठें आहां, कोणाशीं बोलत आहां हें ध्यानांत घेऊन शहाणपणानें बोला.

शानूरअली—[टिपूचा दुसरा वकील]–एक बंदर म्हणजे त्याचें काय येवढें महत्त्व ! मी इराणच्या बादशहाकडे 'वकीलीस गेलों होतों तेव्हां त्यानें दोन बंदरें मला स्वत:ला देऊं केलीं होतीं.

वजीर—महाराज, असे आपण कोण मोठे बादशहाचे लेक आहात ? तुम्ही आपली अक्कल कोठें ठेवून आला ? तुम्ही कोणासमोर या चेष्टा मांडल्या आहेत ? करीमखान बदमाष असला पाहिजे.

आपल्या कामास यश येण्याऐवजीं भलत्या थरावर गोष्ट जाते असें पाहून " माझ्या बोलण्याचा अर्थ असा होता कीं आमच्या जहाजांना बसरा बंदरांत राहण्यास परवानगी मिळावी " असें सांगण्याचा गुलामअल्लीनें प्रयत्न केला. पण एक वेळ भट्टी बिघडली ती पुन: साधली नाहीं.

नंतर ' बसऱ्यांत व्यापाराचा मक्ता आपणास मिळावा ' हें कलम गाळून नजफ नांवाच्या क्षेत्रापर्यंत युफ्रेटिस नदीचें पाणी कालवा खणून आणण्यास परवानगी मिळावी अशी त्यानें मागणी केली. ही सूचना ऐकून वजीर उपरोधिकपणें हसून म्हणाला, " हा कालवा करणें इष्ट आहे असें ठरलें तरी ही गोष्ट आम्हांस तुमच्या बलाढ्य टिपू सुलतानाच्या मदतीवांचून पार पाडतां येईल ! शिवाय खुद्द बादशहास विचारल्यावांचून या प्रश्नाचें उत्तर देतां येत नाहीं. " नंतर कांहीं दिवसांनीं बादशहाचेंही उत्तर आलें. त्याचा मथितार्थ असा होता कीं, " ही सूचना यापूर्वी एक वेळ करण्यांत आली होती; पण असा कालवा करण्यांत येऊं नये असा एका फकीरास त्या वेळीं दृष्टांत झाला, तेव्हां उलट दृष्टांत झाल्यावांचून या कामास हात घालतां येत नाहीं ! "

अशा रीतीनें मुख्य उद्देश मुळींच सफल होण्याचें लक्षण दिसेना. तेव्हां तेथून हें मिशन परतलें; कारण तेथें असतांना यांच्या छावणींत एका रोगाची साथ सुरू होऊन ५६५ लोक मरण पावले. तेथून या मंडळींनीं फ्रान्सकडे वकीली करण्यासाठीं जावें असा टिपूचा मूळ हुकूम होता. पण अलेक्झांड्रिया येथें गेल्यानंतर फ्रान्सकडे दुसरें मिशन गेलें असल्याबद्दलची बातमी त्यांना समजली, तेव्हां त्यांनीं हिंदुस्थानाकडे परत येण्याचें ठरविलें. नंतर नाइल नदीमधून कैरो, सुएज, यद्दे या वाटेनें मक्का, मदीना या क्षेत्रांत ही मंडळी पोंचली.

यानंतर बऱ्याच हालअपेष्टा सोसून हें मिशन हिंदुस्थानांतून निघाल्यापासून पांच वर्षांनीं स्वदेशीं येऊन पोचलें. निघतांना अकराशें लोक या मिशनमध्यें होते. त्यांपैकीं परत फक्त ६८ लोक जिवानिशीं आले; शिवाय २०।२५ लक्ष रुपये खर्च झाला तो निराळाच. त्यांतल्या त्यांत मागील भागांत सांगितल्याप्रमाणें टिपूचा त्रावणकोरच्या कोटा-जवळ ज्या दिवशीं पराभव झाला त्याच दिवशीं हें मिशन परत आलें. अर्थात हें मिशन अपेशी ठरून व त्या मिशनचा पुढारी गुलामअली यावर टिपूची गैरमर्जी होऊन त्यानें आपल्यां घराबाहेर पाऊल ठेवूं नये असा हुकूम सुटला. नंतर कांहीं दिवसांनीं या प्रकरणाची चौकशी करण्याचें मनांत आल्यावरून टिपूनें "त्या मनुष्यखाऊ प्राण्यास हाक मार" असें आपल्या शिपायास सांगितलें. तेव्हां 'मनुष्यखाऊ प्राणी' कोण हें शिपायाच्या प्रथम लक्षांत आलें नाहीं. पण टिपूनें समजावून सांगितल्यावर 'गुलामअली' स हें नवीन टोपण नांव मिळाल्याचें शिपायाच्या ध्यानांत आलें. लोकांना ही बातमी समजतांच त्यांनीं हें टोपणनांव रूढ करण्यास उशीर लावला नाहीं; व पुढें टिपूचें राज्य गेलें तरी या मिशनमधील लोकांना मिळालेली ही पदवी कित्येक वर्षेंपर्यंत चालू होती!

टिपूला मनुष्यस्वभावाची पारख किती कमी होती, भलती कामगिरी उचलण्यास आपल्या नोकरांना सांगून त्यांत त्यांना यश आलें नाहीं म्हणजे तो त्यांची कशी फजिती करी वगैरे त्याच्या आंगचे कित्येक दोष ध्यानांत येण्याकरितां हा मासला येथें दिला आहे.

त्याच्या हातून शेजाऱ्यांच्या राज्यांत जो धर्मच्छल घडला त्याचें कारण तरी त्याला मनुष्यस्वभावाची बरोबर पारख नव्हती हेंच होय. आपल्या राज्यास बळकटी आण-ण्यासाठीं म्हणून शेजारच्या राजाशीं दांडगाईचें वर्तन करून दहशत बस-विण्याचा त्यानें प्रयत्न केला. पण या छळानें दहशत बसण्याऐवजीं सभोंवारचे सर्व लोक चिडून एकवटले व त्यामुळें टिपू युद्धाच्या प्रसंगीं अगदीं एकटा, असहाय असा शत्रूंच्या वेढ्यांत सांपडला.

आपलें राज्य निष्कंटक करण्याच्या हेतूनें त्यानें वाजवीपेक्षां फाजील कडक उपाय योजले हें अनेक उदाहरणांवरून सिद्ध करतां येण्याजोगें आहे. उदाहरणार्थ; हैदरनें राज्यपद बळकावलें तरी मूळचा हिंदु राजा त्यानें जिवंत ठेवला होता व प्रसंगोपात तो त्याचा मान सन्मान ठेवीत असे. दिल्ली, सातारा वगैरे ठिकाणीं देखील परंपरागत गादीचा मालक शून्यवत होऊन कर्त्या लोकांनीं सत्ताधारी बनावें हा प्रकार अस्तित्वांत

आला होता; व तो फारसा अनुकरणीय मानला जात नसला तरी सवईमुळें लोकांना त्याचें फारसें वैषम्यही वाटत नव्हतें. पण टिपूचें एवढ्यानें समाधान झालें नाहीं. गादीचा मालक चामराज देवीच्या आजारानें मरण पावतांच त्याच्या जागीं कोणाचीही स्थापना केली नाहीं, इतकेंच नव्हें तर म्हैसूर शहरांतील इमारती व कोटाच्या भिंती पाहून लोकांना प्राचीन हिंदु राज्याचें स्मरण होण्याचा संभव आहे एवढ्याच कारणावरून त्यानें त्या राजवंशांतील सर्व लोकांची तेथून उचलबांगडी करून म्हैसूरचा कोट पाडून टाकला व तेथील इमारतींचे दगड, माती वगैरें सामग्री घेऊन त्यानें ' नजरबार ' नांवाचा एक नवीन किल्ला बांधविला. पण इतक्या कसोशीनें म्हैसूर शहराचा त्यानें नायनाट केला असून त्या शहराचें नशीब असें बलवत्तर होतें कीं दहा वर्षांच्या आंत टिपूचें राज्य धुळीस मिळून म्हैसूरचें राज्य परत प्रस्थापित झालें व ' नजरबाग ' किल्यावरील दगड म्हैसुरास येऊन पूर्वस्थलीं पुनः विराजमान झाले! असो.

म्हैसूरचा बंदोबस्त केल्यावर टिपूनें मलबारकडे मोर्चा फिरविला. या प्रांताची रुंदी तेवीस कोस असून लांबी दोनशें कोस आहे. तेथें मुख्यत्वेंकरून नायमार नांवाचे हिंदु व मापिला नांवाचे मुसलमान लोकांची वस्ती असे. हैदरानें हा प्रांत आपल्या राज्यांत सामील केला. पण लोक स्वातंत्र्यप्रिय असून लष्करी हालचालींस हा प्रदेश बराच गैरसोईचा असल्यामुळें तेथें व्यवस्था ठेवण्याकरितां हैदर व टिपू यांना फार कष्ट पडले व वीस हजार सैन्य बंदोबस्तासाठीं ठेवून दरसाल लाखो रुपयांचा खर्च चालविण्याचा क्रम अव्याहतपणें पंचवीस वर्षेपर्यंत चालला होता तरी तेथील परिस्थिति सुधारण्याचें लक्षण दिसेना. तेव्हां दर चाळीस घरास एक अमलदार याप्रमाणें मलबार प्रांतांत अधिकाऱ्यांची नेमणूक करून व एक जाहिरनामा काढून टिपूनें असें कळविलें कीं " प्रत्येक पावसाळ्यांत बंडाळी मांडून माझ्या सैन्यांतील शिपायांचा प्राण घेण्याचा क्रम आज चोवीस वर्षे तुम्ही चालविला. पण आतां यापुढें हा क्रम बंद न ठेवाल तर तुम्हास फार जड जाईल. झाल्या गोष्टी होऊन गेल्या. पण आतां कोणी यत्किंचित दंगाधोपा केल्यास त्यास कडक शासन करण्यांत येईल. शिवाय एकाच स्त्रीनें दहा दहा पुरुषांशीं संबंध ठेवण्याची जी रूढी तुमच्यांत चालू आहे ती पशूस देखील लाजविणारी आहे ती बंद झाली पाहिजे; आणि आपणहून बंद न कराल तर सर्व लोकांना इस्लामी धर्माची दीक्षा देऊन मी तुम्हांस माझ्या राजधानीकडे जाऊन राहण्यास भाग पाडीन."

हा जाहिरनामा पाहून लोकांच्या धार्मिक समजुतीस केवढा धक्का पोंचला असेल व त्यांना किती चीड आली असेल याची कल्पना कोणासही करता येण्याजोगी आहे. टिपू आपणास धर्मभ्रष्ट करण्यासाठीं कांहीं तरी कुरापत काढीत आहे; तेव्हां त्याची पाठ फिरतांच बंड उभारण्यावांचून गत्यंतर नाहीं असें मलबारांतील लोकांच्या मनानें घेतलें. यानंतर कलिकोट येथील कोट पाडून शेजारीं दुसरा कोट उभारण्याचा त्यानें प्रारंभ केला. इतक्यांत पावसाळ्यास सुरुवात झाली; तेव्हां कित्येक दूरदर्शी सल्लागारांनीं त्याला असा इषारा दिला कीं 'यापुढें सैन्यासह येथें राहणें शहाणपणाचें नव्हे.' तेव्हां टिपू कोइमतूरकडे वळला. पण वाटेंत पावसानें गाठल्यामुळें चिखलांत सापडून सैन्याचे बरेच हाल झाले.

कोइमतुराहून टिपू दिंडगल येथें गेला. तेथील जहागीरदार टिपूचा नातेवाईक असल्यामुळें त्यानें त्याचें फार थाटाचें स्वागत केलें. तेथें आसपासच्या पाळेगारांना टिपूनें भेटीस बोलावलें; परंतु ते वेळेवर आले नाहींत; तेव्हां त्यांच्या जहागिरीचे गांव जाळून व लुटून फस्त करण्याचा त्यानें हुकूम सोडला. अशा रीतीनें आपल्या मतानें बंडखोरांना शासन करून चोहींकडे दहशत बसवून टिपू परत राजधानीस आला; पण वस्तुतः या फेरफटक्यानें त्याच्या राज्यांत व्यवस्था उत्पन्न होण्याऐवजीं शत्रु मात्र जिकडे तिकडे उत्पन्न होऊन ते डोकें वर काढण्यास केव्हां संधी सापडते हें पहात राहिले.

श्रीरंगपट्टणांत त्यानें सैन्याची नवीन व्यवस्था करून व सय्यद, शेख, पठाण, मोगल वगैरे लोकांचीं स्वतंत्र पथकें तयार करून त्यांना शिस्तीचे नियम घालून दिले. शिवाय मलबार प्रांतांत हैदराच्या कारकीर्दीपासून अर्शदबेखान या नांवाचा जो अनुभविक अधिकारी होता त्याच्या मदतीस मीर इब्राहीम नांवाचा दुसरा अधिकारी पाठविला. हा नवा अधिकारी वरपांगी मदतनीस म्हणून पाठविण्यांत आला होता तरी टिपूनें केलेल्या नवीन नियमांची अंमलबजावणी करण्याचें काम त्याच्याकडे दिलें होतें. अर्थात अर्षदबेगखानाचा हा एका प्रकारें अपमानच होता; तेव्हा त्यानें 'माझ्या हातून आतां काम झेपत नाहीं, सबब मक्केच्या यात्रेस जाण्याची मला परवानगी मिळावी' असा टिपूजडे अर्ज पाठविला. पण टिपूनें त्याला तसें करण्याची परवानगी दिली नाहीं. इकडे मदतनिसानें जुने करारनामे मोडून, अनेक कर बसविल्यामुळें लोकांत बंडाळी सुरू होण्याची वेळ आली. शेवटीं टिपूच्या ध्यानांत ही गोष्ट आल्यावर त्यानें नव्या मदतनिसास तर बडतर्फ केलेंच, पण त्याबरोबर अर्षदबेगखानास देखील कैदेंत ठेवलें.

सारांश, मलबारांतील लोकांनीं आपल्या जाहिरनाम्यास न जुमानतां दंगा करण्याचा पूर्वक्रम चालू ठेवला, असें टिपूच्या मनानें घेतलें आणि त्यांचे याबद्दल शासन करण्याचा त्यानें निश्चय केला. प्रथम कुर्ग प्रांताची व्यवस्था लावून तो मलबारांत मोठ्या सैन्यानिशी शिरला. तेव्हां नायर लोकांनीं शहर सोडून जंगलाचा आश्रय केल्यामुळें त्यांना पकडण्याकरितां टिपूला आपल्या सैन्याच्या टोळ्या करून निरनिराळ्या ठिकाणीं पाठवाव्या लागल्या. पैकीं एका मोठ्या टोळीनें गुत्तीपूर येथील नायर लोकांच्या एका बळकट किल्ल्यास वेढा दिला. तेथें बायकापोरासुद्धां दोन हजार नायर लोक होते. त्यांनीं कांहीं दिवस किल्ला लढविला; पण शेवटीं निरुपाय झाल्यामुळें उपासमार होऊं लागली तेव्हां ते शरण आले. तेव्हां ' एक तर त्यांनीं आपणहून मुसलमानी धर्म स्वीकारावा, नाहीं तर त्यांना सक्तीनें मुसलमानी धर्माची दीक्षा देण्यांत येऊन शिवाय सर्वांना हद्दपारीची शिक्षा मिळेल व श्रीरंगपट्टणाकडे नेण्यांत येईल ' असें त्या नायर लोकांना कळविण्यांत आलें. हें पाहून त्या लोकांनीं मुसलमानी धर्म स्वीकारण्याचें कबूल केलें; व दुसरे दिवशीं सर्व पुरुषांची सुंता करण्याचा विधि झाला; आणि नंतर स्त्रीपुरुषांनीं मिळून मांसभक्षण केल्यावर हा धर्मांतराचा समारंभ संपला. हें उदाहरण पाहून अरण्यवासाच्या यातनेस कंटाळलेले कित्येक लोक टिपूच्या सैन्यांत दाखल होऊन मुसलमान बनले.

याच सुमारास चेरिकुलच्या नायर राजास अभयपत्र पाठवून टिपूनें भेटीस बोलावलें व त्याचा चांगला आदरसत्कार करून त्यास निरोप दिला. पण थोड्याच दिवसांत तो राजा ' आपल्या विरुद्ध कटांत सामील झाला असून आपण नायर लोकांचा छळ केला त्याचा सूड उगविण्याचा विचार करीत आहे ' अशी बातमी टिपूस लागल्यावरून त्यानें त्या राजाकडे कांहीं सैन्य पाठवून ताबडतोब पुनः भेटीस येण्याबद्दल कळविलें. राजाच्या सैनिकांना या बोलावण्याच्या हेतूविषयीं गुणगुण कळली असल्यामुळें त्यांनीं टिपूच्या सैन्यास अडविलें; व त्यांच्यांत चकमकीस प्रारंभ झाला. त्यांत राजा व त्याचे कांहीं साथीदार रणांगणावर मृत्युमुखीं पडले व राजाचें प्रेत टिपूकडे नेण्यांत आलें. तेव्हां त्यानें तें बंडखोराचें प्रेत असें ठरवून त्याची फार अप्रतिष्ठा केली, व तो प्रांत लुटून अगदीं फस्त केला. अशा रीतीनें या प्रांताचा बंदोबस्त करण्याच्या चुकीच्या कल्पनेनें प्रेरित होऊन त्यानें लोकांचीं अंतःकरणें संतापानें भडकून जातील अशीं धर्मच्छलाचीं अनेक कृत्यें करून मलबार प्रांतांतून आपला तळ हालविला. पण तेथें कायमचें बरेंच लष्कर ठेऊन जमिनींची पाहाणी करणें, उपयोगी झाडांची मोजदाद करणें व नायर

जातींच्या बंडखोर लोकांचा तपास करून त्यांचा नायनाट करणें अशीं तीन कामें त्यांजकडे सोपविलीं.

टिपूचें सैन्य नायर लोकांचा नायनाट करण्याकरितां अगदीं हात धुवून पाठीशीं लागलें तेव्हां त्यांना जंगलाचा आश्रय करणें अगर देशत्याग करणें यावांचून तिसरा मार्ग राहिला नाहीं. बरेच लोक तलचेरी येथें असलेल्या इंग्रजी कंपनीच्या आश्रयास जाऊन तेथून जहाजांचा आश्रय करून त्रावणकोरच्या राज्यांत जाऊन बसले. यामुळें टिपूच्या मनांत त्रावणकोरच्या राजाविषयीं व इंग्रजी कंपनीच्या लोकांविषयीं पराकाष्ठेची अढी उत्पन्न झाली. " माझ्या राज्यांतील बंडखोर लोकांना हे आश्रय देतात, तेव्हां या गोष्टीकडे दुर्लक्ष केल्यास आणखी बंडें उपस्थित होतील. याकरितां याचा मला चांगला बंदोबस्त केला पाहिजे " असें तो वारंवार म्हणत असे; व तलचेरी येथील इंग्रजी कंपनीशीं चाललेला व्यापार बंद करण्याकरितां व त्रावणकोरच्या राजास दहशत बसण्याकरितां त्यानें अनेक उपाय योजले. या आपल्या वर्तनाचा परिणाम बरोबर उलट होऊन आपली इच्छा नसली तरी त्याचें पर्यवसान मोठ्या युद्धांत होईल ही गोष्ट शेवटपर्यंत त्याच्या ध्यानांत आली नाहीं. फार तर ' बंडखोर लोकांना आसरा देणार नाहीं ' अशी त्रावणकोरच्या राजाकडून कबुली घेण्याकरितां थोडीबहुत मारामारी करावी लागेल असा त्याचा अंदाज होता व तेवढी त्याची तयारी होती. मात्र या प्रकरणांत इंग्रजांशीं प्रत्यक्ष भांडण उपस्थित करण्याचा त्याचा हेतु नव्हता.

इंग्रजांशीं भांडण उपस्थित होऊं देण्याची टिपूची इच्छा नव्हती असें जें वर सांगितलें आहे त्याचा खरेपणा तलचेरी येथील इंग्रजांशीं वागतांना त्यानें जें आत्मसंयमन केलें त्यावरून दिसून येण्याजोगा आहे; करितां ती हकीकत येथें देतों.

इ. स. १७८८ च्या जुलै १४ तारखेस तलचेरी येथील इंग्रजी कोठीवाल्यांच्या मनांतून टिपूच्या हालचालीसंबंधी व इतर कांहीं बातमी मद्रास व कलकत्ता येथें पोंचवावयाची होती. याकरितां प्रथम पत्रें अंजनगावास पाठवून तेथून बोटीच्या मार्गें तीं पुढें रवाना करण्याचा नेहमीचा प्रघात होता. हें पत्रें पोंचविण्याचें काम कोठीवाले इंग्रज ब्राह्मणाकडून करवीत. कारण ब्राह्मणाच्या अंगावर हात टाकण्याचें धाडस सहसा कोणी करीत नसल्यामुळें त्यांना एका ठिकाणाहून पत्रें दुसऱ्या ठिकाणीं पोंचविण्यास अडचण पडत नसे व हें काम बिनबोभाट होई. पण मंगळूरच्या वेढ्याचे वेळीं कारवारांतील नेटिव ख्रिश्चन लोक इंग्रजांना गुप्तपणें सहाय करतात अशी खात्रीलायक बातमी कळल्यापासून टिपूनें परराज्यां-

तील मुसलमानेतर प्रजेविषयीं अतिशय सावधपणा ठेवण्याचें ठरविलें. या सावधपणाचाच अतिरेक होऊन त्यानें कारवारांतील हजारो नेटिव ख्रिश्चनांना मुसलमान बनवून त्यानें त्यांची कारवारांतून हकालपट्टी केली; व याच सावधपणामुळें आतां त्यानें परराज्यांतील ब्राह्मणांवर हत्यार धरलें. "आजपर्यंत या ब्राह्मणांनीं शत्रूच्या हेराचें काम करण्यासाठीं बिनहरकत माझ्या राज्यांतून जा ये केली असेल पण इतउत्तर या गोष्टीकडे मला डोळेझाक करतां येत नाहीं" असें ठरवून त्यानें असें हेराचें काम करणाऱ्या ब्राह्मणांना पकडण्याचा सपाटा चालविला. तेव्हां तेथील ब्राह्मणांस दहशत बसून इंग्रजी कोठीवाल्याचीं पत्रें पोचविण्याचें त्यांनीं साफ नाकारलें. प्रथम कंपनीच्या लोकांना या गोष्टी खऱ्या वाटेनात. पण कालिकोट येथील दोनशें ब्राह्मणांना टिपूनें बाटवून मुसलमान केलें अशी खात्रीलायक बातमी कंपनीकडे २० जुलै रोजीं आल्यामुळें त्यांनीं पत्रें नेण्याबद्दल ब्राह्मणांना आग्रह करण्याचें सोडून दिलें.

पण ब्राह्मणांच्या अंगावर सरसहा हात टाकल्यामुळें आसपासच्या राजांनीं टिपूचा पक्ष सोडून दुसरीकडे आश्रयास जाण्याचें नक्की केलें. कोट्टायम व कोडत्तनाद येथील राजांनीं इंग्रजी कोठीवाल्याकडे स्पष्टपणें पत्रें पाठवून असें कळविलें कीं, "आतां यापुढें टिपूवर आम्हांस यत्किंचित विसंबून राहतां येत नाहीं; तेव्हां आम्हांस व ब्राह्मणजातीस तुम्ही आश्रय देऊन रक्षण करावें अशी विनंति आहे." हीं विनंति करण्यांत ब्राह्मणांनींच पुढाकार घेतला असें नव्हें तर नेलंबूर, परप्पनाद वगैरे ठिकाणच्या नायर क्षत्रियांनीं देखील कोठीवाल्याकडे आश्रयार्थ परोपरीनें विनवण्या चालविल्या. अशा रीतीनें ज्यांना तलचेरीच्या मार्गें पळ काढतां आला त्यांनीं पळ काढला व इतर नायरलोकांनीं बंडाचें निशाण उभारलें. तेव्हां त्यांचा परभाव करण्याचें काम टिपूनें लाली नांवाच्या फ्रेंच सेनापतीकडे सोपविलें, व कोटायमपासून पालघाटपर्यंतच्या सर्व प्रदेशांत जितके नायर लोक आढळतील त्यांना पकडून त्यांची सरसहा कत्तल करावी असा त्यानें हुकूम सोडला; आणि आपण स्वतः सैन्य घेऊन तांबरचेरीचा घाट उतरून आला. नायर लोक अर्थात सैरावैरा चोहीकडे धांवत सुटले व त्यांपैकीं कित्येकांनीं तलचेरी येथील इंग्रजाकडे आश्रय मागितला. टिपूनें इंग्रजी कोठीवाल्याकडे 'आमच्या राज्यांतील बंडखोरांना आश्रय देण्यांत येऊं नये,' असें पत्रद्वारें कळविलें होतें, यामुळें ते आश्रय देण्यास कांहींसे कांकूं करूं लागले. शिवाय त्या प्रांतांत मापला म्हणून जे मुसलमान लोक होते त्यांना विशेष सवलती देऊन आपल्या बाजूस वळवून घेण्याचा त्यानें प्रयत्न केला.

अशा रीतीनें दक्षिण मलबारांत कांहींशी स्थिरस्थावर झाल्यावर उत्तरेकडे रानावनांत लपून राहिलेल्या नायर लोकांना हुसकून काढण्याचा त्यानें उद्योग आरंभला; त्याबरोबर पुष्कळ लोक एकदम तलचेरीस आले. तेव्हां कोटायम् येथील टिपूच्या फौजदारानें इंग्रजी कोठीवाल्यास रागारागानें ८ मार्च १७८९ रोजीं एक पत्र लिहून कळविलें कीं ' आमच्या राज्यांतील कित्येक बंडखोर राजे व इतर लोक यांना तुम्ही तलचेरीस आश्रय, दिला आहे. याचा परिणाम चांगला होणार नाहीं. " कोठीवाल्यांच्या अध्यक्षानें उत्तरादाखल असें लिहिलें कीं, " टिपूच्या राज्यांतील सर्व लोकांना तलचेरींतून घालवून देण्याबद्दल मी वटहुकूम सोडला आहे; आणि फौजदारांस याबद्दल शंका वाटत असेल तर त्यांनीं खुशाल या गांवांत येऊन समक्ष सर्व स्थिति पाहून तपासणी करून जावें. " खरा प्रकार असा होता कीं टिपुच्या राज्यांतील लहानसहान जहागीरदार व राजेरजवाडे तलचेरीस आले होते व तेथून ते बोटींनें त्रावणकोरच्या हद्दींत निघून गेले; आणि जातांना त्यांनीं आपलें जडजवाहीर व रोकड मिळून दहावीस लाखांचा ऐवज बरोबर नेला. यानंतर टिपूचें पत्र आल्यामुळें मागें सांगितल्याप्रमाणें " तुम्हीच वाटेल तर समक्ष येऊन पहा " असें उत्तर पाठविण्यास इंग्रजी कोठीवाल्यांना सबब मिळाली. त्याप्रमाणें मार्च १० तारखेस टिपूच्या अधिकाऱ्यांनीं येऊन तपासणी केली. परंतु ' वरातीमागून घोडें ' असा प्रकार होऊन त्यांना रिकाम्या हातानें परत जावें लागलें.

यानंतर मार्च २२ तारखेस चिरक्कलच्या राजानें कोठीवाल्यांकडे ' आश्रय मिळेल काय ? ' हें विचारण्याकरितां पत्र पाठविलें. त्यास त्यांनीं साफ नाहीं असें उत्तर दिलें. दुसरे दिवशीं राजाची बहीण व इतर कांहीं राजघराण्यांतील मंडळींनीं तलचेरीलगत असलेल्या धर्मपट्टणम् नांवाच्या बेटांत नको नको म्हणत असतां तळ दिला. तेथून निघून त्यांना जाण्याबद्दल कायदेशीर रीतीनें हुकूम देण्यांत आला. पण तो त्यांनीं जुमानला नाहीं. दुसरे दिवशीं रात्रीं १०।१५ हजार नायरलोक या राजघराण्यांतील मंडळीस निरोप देण्यासाठीं त्या बेटावर आकस्मिक रीतीनें जमले व तें ठिकाण नायर लोकांनीं अगदी गजबजून गेलें. हा प्रकार टिपूस समजतांच टिपूनें अतिशय रागानें एक पत्र इंग्रजाकडे पाठविलें. पण तें पत्र येण्यापूर्वीं रात्रीं चेरिकलच्या राजाची बहीण व इतर मंडळी आपली दहा बारा लाखाची पुंजी घेऊन बोटींतून निघून गेली व इतर सर्व नायर लोक सकाळ होण्यापूर्वीं पुनः रानांत कोठें निघून गेले याचा पत्ता देखील राहिला नाहीं ! यामुळें दुसरे दिवशी सकाळीं टिपूचें पत्र येतांच येथें " एक देखील नायर नाहीं " असें उत्तर लिहिण्यास

इंग्रजी कंपनीस कोणतीही हरकत राहिली नाहीं ! सारांश, टिपूच्या या वेळच्या मूर्खपणाच्या वर्तनामुळें इंग्रजी कंपनी व त्रावणकोरचा राजा यांना नायर लोकांचे आश्रयदाते बनण्यास व त्यांची कायमची सहानुभूति आपणाकडे ओढून घेण्यास उत्तम संधी मिळाली.+

राजघराण्यांतील मंडळी त्रावणकोर येथें सुखरूपपणें पोंचली तरी खुद्द राजा मात्र टिपूशीं लढतां लढतां मरण पावला. तेव्हां ' टिपूनें त्याचें प्रेत हत्तीच्या पायास बांधून त्याची धिंड काढली व आणखी १५।२० प्रेतांसुद्धा तें एका झाडास टांगून ठेवलें !

या प्रकरणांत तलचेरी येथील इंग्रजी कंपनीनें टिपूच्या राज्यांतील लोकांना आश्रय देऊन त्यांना त्रावणकोर येथें किंवा दुसरीकडे निघून जाण्यास उघड उघड मदत केली. पण टिपूनें या कारणाकरितां त्यांच्याशीं युद्ध सुरू केलें नाहीं हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. मात्र बंडखोरांना आश्रय दिल्याबद्दल त्रावणकोरच्या राजास जाब विचारण्याचा त्यानें निश्चय केला. या जाबाचें उत्तर समाधानकारक न आल्यास कडक उपाय योजून अगर दहशत दाखवून त्याला आपली चूक कबूल करण्यास भाग पाडावयाचें असा एकंदरींत त्याचा विचार झाला असून अप्रत्यक्षपणें मदत करण्यापलीकडे इंग्रज या प्रकरणांत हात घालणार नाहींत असा त्याचा अंदाज होता.

या अंदाजाप्रमाणें त्रावणकोरच्या किरीटी राजास गोडीगुलाबीनें वळविण्याचा प्रयत्न करण्यासठीं व तो न साधल्यास क्रांगनूर व आयकोटा हीं बंदरें ताब्यांत घेऊन त्रावणकोर संस्थानांत चालून जाण्याची दहशत घालण्यासाठीं त्यानें कोचीच्या राजामार्फत रामराजाकडे निरोप पाठविला वगैरे हकीकत मागील भागांत दिलीच आहे. परंतु या निरोपामुळें रामराजा वश न होतां त्यानें रेसिडेंट बॅनरमन याच्या सल्यानें हीं दोन बंदरें डचांपासून विकत घेण्याचा मात्र निश्चय केला, व तो पार पाडला. टिपूनें हीं बंदरें आपल्या मांडलिकाचीं म्हणजे कोचीकराचीं असा आग्रह धरल्यामुळें तो टिपूवर खुष होऊन त्रावणकोरमधून आपलें ठाणें उठवून टिपूच्या आश्रयास गेला. परंतु आपल्या पक्षास आलेल्या हिंदु राजाचें प्रेम संपादण्याचें कौशल्य टिपूच्या अंगीं नव्हतें असें म्हणावें लागतें. मंगळूरच्या

+ टिपूनें या वेळीं केलेल्या अनेक अनन्वित प्रकारांचें सविस्तर वर्णन वुइल्यम लोगनकृत ' मलबार ' (१९०६ त छापलेली आवृत्ति) या पुस्तकांत दिलेले आहे. त्यांतील कांहीं भाग संक्षेपरूपानें येथें दिला आहे. या वेळीं नायर लोकांना जे हाल सोसावे लागले त्याची; आठवण देणाऱ्या बऱ्याच अद्भुत दंतकथा आज तागायत मलबारांत प्रचलित आहेत शिवाय कित्येक म्हणी त्या वेळीं मल्याळी भाषेंत रूढ झाल्या. त्यांपैकीं एक ' पहल कटाह रावु विटाह ' म्हणजे ' दिवसा जंगल व रात्रीं घर ' अशा अर्थाची आहे; व ती तत्कालीन स्थितीची बरोबर कल्पना देते.

तद्नंतर त्यानें आपल्या मांडलिकांशीं व शेजाऱ्याशीं केलेलें वर्तन पाहिलें म्हणजे हिंदु व ख्रिश्चन लोकांविषयीं त्याचें मन पराकाष्ठेचें संशयी बनलें होतें असें म्हणावें लागतें. या संशयी स्वभावामुळें त्यानें कोर्च प्रांताची व्यवस्था स्वतःच करण्याचें ठरविलें आणि व्यवस्था करण्याच्या मिषानें त्यानें या मुलखांत जो धुमाकूळ मांडला त्यामुळें कोचीच्या राजाचें मन टिपूविषयीं विटून गेलें. तीस हजार पायदळ, पांच हजार घोडेस्वार व वीस तोफा एवढ्या सामग्रीनिशीं टिपूची स्वारी नोव्हेंबर महिन्यांत कोचीकरांच्या मुलखांत जी एकदा शिरली ती त्या मुलखाचा सत्यानाश केल्यानंतर बाहेर पडली. म्हातारेकोतारे व बायकापोरें यांनीं देशत्याग केला व तरुणांना जंगलावांचून थाऱ्यास जागा राहिली नाहीं. धनिक लोकांनीं कोचीकराच्या मुलखांतून पळ काढला व त्रावणकोरच्या राजानें बांधलेल्या तटामागें ते लपून बसले. याखेरीज जे लोक तेथेंच राहिले होते त्यांची टिपूच्या सैन्यानें कत्तल केली व त्यांची घरेंदारें जाळून टाकलीं; इतक्याही उपर जे जिवंत राहिले होते त्यांना जबरदस्तीनें मुसलमानी धर्माची दीक्षा देण्यांत आली. त्रिचूर येथील हिंदु देवाल्यांत त्याच्या सेनापतीनें ठाणें दिलें व तेथें गोवध करण्यांत आला ! सारांश; या वेळी या मुलखाची जी नासाडी झाली त्यामुळें पुढें कित्येक वर्षेंपर्यंत तेथें दुष्काळ व अनेक प्रकारच्या साथी यांचें ठाणें पडलें होतें; व पूर्वस्थिति प्राप्त होण्यास बरींच वर्षें लागलीं.

हा चीड आणणारा प्रकार पाहून कोचीकरास अतिशय संताप आला. टिपूचें सैन्य आपल्या मुलखांतून निघून जातांच टिपूशीं असलेलें मांडलिकत्वाचें नातें झुगारून देण्याचा त्यानें निश्चय केला आणि एकदम इंग्रजांच्या आश्रयास जाऊन त्यानें खंडणी भरण्याची कबुली दिली, तेव्हां ' कोचीकरानें दरसाल ७० हजार खंडणी द्यावी व इंग्रजी कंपनीनें त्याचें राज्य त्यास मिळवून द्यावें असा त्यांचा करार ठरला'.८

मलबार व कोचीप्रांतांतील बंडखोर प्रजेचें शासन करण्याचा फाजील नाद धरून टिपूनें हजारो लोकांची याप्रमाणें धुळदाण उडविली किंवा त्यांना धर्मभ्रष्ट केलें. परंतु याही अडचणींतून हजारो लोक इंग्रजी बोटीचा आश्रय करून त्रावणकोर संस्थानांत पळून गेले होते. या कामीं इंग्रजी कोठीवाल्यांनीं लाखो रुपये लांच घेऊन आपल्या

---

८ या करारांतील एक अट लक्षांत ठेवण्याजोगी आहे ती अशी कीं ' कोचीकरांचा जो मुलूख टिपूच्या ताब्यांत असेल व ज्याच्याशीं डचांचा संबंध बिलकुल नसेल तेवढ्यापुरताच हा राजा कंपनीचा मांडलिक समजावयाचा.' ही अट घालण्याचें कारण डचांशीं आपला तंटा येऊं नये अशी इंग्रजी कंपनीची इच्छा होती हें होय पण इतकी काळजी घेऊन देखील डच कंपनीचा गव्हर्नर अँगलबेक याचा रुसवा कायमच होता. इंग्रजी कंपनीनें जेव्हां ' तुमचे कोचीकराशीं काय काय करार मदार झाले आहेत ते कळवा म्हणजे

[पुढें चालू.

विरुद्धपक्षास मदत केली. व त्रावकोरच्या राजानें तर उघडपणें या लोकांना आपल्या राज्यांत ठेवून घेतलें. हें कारण पुढें करून त्यानें प्रथम त्रावणकोरच्या राजास व नंतर मद्रासच्या गव्हर्नरास पत्र पाठवून जाब विचारला. या वेळीं मद्रासेस हालंड हा गव्हर्नर असून त्याला टिपूशीं इंग्रजांचें युद्ध सुरू होणें अनिष्ट वाटत असल्यामुळें त्यानें त्रावण-कोरच्या राजास ' टिपूकडील बंडखोर लोकांस आश्रय देऊं नये ' असें कळविलें. तेव्हां रामराजास दोहींकडून अडचण वाटल्यामुळें " मी तुमच्या लोकांस आश्रय दिला नाहीं " असें टिपूकडे उत्तर पाठविलें. हें उत्तर लबाडीचें आहे अशी टिपूची खात्री असल्यामुळें त्यानें त्रावणकोरच्या कोटावर हल्ला करण्याचें ठरविलें.

कोटाच्या वेशीपासून पांचसहा मैल अंतरावर त्यानें आपल्या सैन्याचा तळ देऊन १७८९ च्या दिसेंबर २८ तारखेस रात्रीं दहा वाजतां १४ हजार पायदळास कोट घेण्याचा हुकूम दिला; आणि सूर्योदयापूर्वीं बाहेरील कोटाची एक बाजू त्याच्या सैन्यानें ताब्यांत घेतली. नंतर तेथून नऊ मैलांवर असलेल्या मुख्य वेशींतून आपलें सैन्य आंत नेण्याचा त्यानें बेत केला.याप्रमाणें दोनतीन मैल गेल्यावर शत्रूच्या सैन्याची चाहूल त्याच्या दृष्टीस पडली व मुख्य वेस संध्याकाळ होण्यापूर्वीं ताब्यांत घेणें होणार नाहीं, तेव्हां पिछाडीस असलेल्या खंदकांतून परत जाण्यासाठीं आधीं रस्ता तयार करणें आवश्यक आहे अशी टिपूची खात्री झाली. तेव्हां त्यानें बाजारबुणगे व मजूर लोकांस बाहेरील कोटाचा कांहीं भाग पाडून खंदकांत पाडावा व अशा रीतीनें रस्ता तयार झाला म्हणजे त्यावरून तोफा आणाव्या असा हुकूम दिला. या मजूर लोकांना आदले दिवशीं ८।१० कोस चालावें लागल्यामुळें ते थकून गेले होते व रस्ता तयार करण्याचें काम त्यांच्या हातून जलद झालें नाहीं. इकडे पायदळ कोटाच्या बाजूनें वेस गांठण्यासाठीं चाललें होतें, त्याची शत्रूच्या एका टोळीशीं गाठ पडली; व त्यांच्या एका गोळीनें

आम्हांस त्याच्याशीं नवे करार करतांना ठीक पडेल ' असें डच गव्हर्नरास कळविलें तेव्हां त्यानें माहिती देण्याचें तर साफ नाकारलेंच; पण या वेळीं आलेल्या नव्या गव्ह-र्नरास अँगलबेकनें असा इषारा दिला कीं " या इंग्रजांना इकडच्या प्रांतांत नुसती किरं-गळी शिरकावण्याचा अवकाश दिला कीं ते सबंध हात घुसविल्यावांचून राहणार नाहींत. " सारांश; थोड्याच महिन्यांपूर्वीं टिपूचे बेत ढासळून पाडण्यासाठीं त्रावणकोरच्या राजाशीं खलबत करणारा डच गव्हर्नर इंग्रजांचें पाऊल पुढें पडत चललेलें पाहतांच मत्सराग्नीनें जळफळत होता. परस्पराविषयीं युरोपियन कंपन्यांत दीडशें वर्षांपूर्वीं जो मत्सरभाव वसत होता त्याची हिंदुस्थानांतील अनेक राजांमधील मत्सराशीं तुलना करणें फारसें अप्रयोजकपणाचें होणार नाहीं.

टिपूच्या पायदळांतील मुख्य अधिकारी ठार झाला. त्यावरोबर त्या पायदळांतील शिपायांचा धीर खचला व आल्या वाटेनें ते पळत सुटले! हा प्रकार पाहून मागून येणाऱ्या हजारो शिपायांनीं देखील घाबरून तोंड फिरविलें. होतां होतां सर्वच पायदळ मागें धांवत सुटलें व जेथें कोट पाडून परत जाण्यासाठीं रस्ता तयार होत होता तेथें पोंचण्यासाठीं ज्याची त्याची धडपड सुरू झाली. यामुळें त्या ठिकाणीं अगदीं खेचाखेच होऊन गेली. परंतु मागें सांगितल्याप्रमाणें रस्त्याचें काम तयार झालें नव्हतें. यामुळें या पळून पुढें आलेल्या शिपायांना पलीकडे जातां येईना. पण त्यांना वाट आहे किंवा नाहीं याचा विचार करण्यास मागल्या मंडळीस फुरसत कोठें होती? त्यांनीं धक्काबुक्की करून पुढच्या लोकांना ढकललें; तेव्हां ते खंदकांत पडले व हा खंदक भरून जाईपर्यंत ही धक्काबुक्की चालली. नंतर त्या प्रेताच्या ढिगावरून बाकीचे शिपाई एकदां खंदकापलीकडे आले! स्वतः टिपूसुलतान देखील मोठ्या शिकस्तीनें या वेळीं बचावला असें म्हणतात. पण 'या हल्ल्यांत व धांदलीत आपण नव्हतों' असें टिपूनें इंग्रजाकडे पाठविलेल्या पत्रांत लिहिलें आहे.

ही सर्व धांदल एका टोळीचा अधिकारी मारला गेल्यामुळें उडाली. पण खरें पहातां शत्रुपक्षाचे फक्त वीसच शिपाई या वेळीं त्या ठिकाणीं होते. पण सेनापति मृत्युमुखीं पडतांच साऱ्या सैन्यांत गोंधळ उडून गेल्याचा देखावा आपल्या देशांत अनेक प्रसंगीं घडून आलेला आहे, तेव्हां त्याबद्दल टिपूस विशेष दोष देतां येत नाहीं. परत आपल्या तळाच्या जागीं येतांच त्यानें त्रावणकोरचा तट घेण्याची प्रतिज्ञा केली व आपलें सैन्य जमविलें. इकडे मद्रासचा गव्हर्नर व कार्नवालीस यामध्यें टिपूच्या वर्तनासंबंधीं लेखी वाटाघाट सुरू झाली; व रामराजाच्या मदतीस इंग्रजी सैन्य येण्याचें लक्षण दिसेना.

टिपूनें तयारी करून व पाऊण मैल खंदक बुजवून चांगला रस्ता तयार केला; आणि त्यावरून सैन्य व तोफा घेऊन तो चालून आला. रामराजानें देखील बरेंच सैन्य जमा केलें होतें तरी टिपूच्या कसलेल्या सैन्यापुढें त्याच्यानें टिकाव धरवेना. यामुळें टिपूचें सैन्य तट पाडून कोटाच्या आंत शिरलें.

इतक्या खटपटीनें मिळविलेल्या विजयाचें वास्तविक महत्त्व फार थोडें असून देखील तेवढ्यानें टिपू शेफारून गेला. त्यानें इंग्रजांच्या तयारीशीं तोंड देण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं आहे किंवा नाहीं हें लक्षपूर्वक पाहण्याचें सोडून तट घेतल्याबद्दल उत्सव करण्यांत दिवस घालविले. सर्व सैन्यांतील लोकांना हत्यारें खालीं ठेऊन तटाच्या जागेवरून फेरफटका करण्यास हुकूम दिला व हा सर्व प्रकार एका उंच टेकडीवर बसून तो पहात होता! नंतर त्यानें स्वतः कुदळ हातीं घेऊन पहिला घाव घातला; आणि यापुढें लष्करी व बिन लष्करी लोकांना कामास लावून सहा दिवसांत तो कोट अगदीं जमीनदोस्त केला. हा समारंभ

चालला असतांना मॅक्नामारा नांवाचा फ्रेंच अधिकारी टिपूस भेटण्यास आला होता. त्यानें टिपूचा हा प्रकार पाहून त्यास बजावून सांगितलें कीं, " त्रावणकोरच्या सैन्यावर विजय मिळविल्याबद्दल तुम्हांस आनंद वाटत असेल तर वाटो. पण इंग्रजांनीं युद्धाची जी तयारी केली आहे तिच्या मानानें तुमची कांहींच नाहीं हें ध्यानांत ठेवा. " हें बोलणें टिपूस फारसें आवडलें नाहीं, परंतु इंग्रजांनीं युद्धाची जंगी तयारी केली असल्याबद्दल मॅक्नामारानें निक्षून पुन्हा पुन्हा सांगितल्यामुळें टिपूला त्रावणकोर प्रांत सोडून लौकर आपल्या राज्यांत जाऊन युद्धाच्या तयारीस लागलें पाहिजे असें वाटूं लागलें.

सारांश, या वेळीं इंग्रजांशीं लढण्याचा प्रसंग येईल अशी टिपूची कल्पना नव्हती. १७८९ च्या डिसेंबरपर्यंत सारा त्रावणकोर प्रांत आपणास ताब्यांत घेतां येईल व या कामास इंग्रजांकडून प्रत्यक्ष अडथडा होणार नाहीं; फार तर तलचेरी येथील इंग्रजी कोठीवाल्यांनीं ज्याप्रमाणें लपून छपून शत्रूस मदत केली तशीच याही वेळीं करतील असा त्याचा अंदाज होता; पण दोनही बाबतीत त्यानें केलेले अंदाज अगदीं चुकीचे ठरले. दिसेंबरच्या एवजीं १७९० चा मे महिना आला तरीं त्याला त्रावणकोर पादाक्रांत करतां आला नाहीं; आणि इंग्रजांनीं मुकाट्यानें तमाशा पाहण्याचें ऐवजी त्रावणकोर संस्थानावर टिपूनें केलेला हल्ला म्हणजे आपणांस केलेलें युद्धाचें आव्हान आहे असें जाहीर केलें.

उलटपक्षीं कार्नवालीसनें १७८८ सालापासून टिपूशीं इंग्रजांचें युद्ध जुंपणार असें गृहीत धरून त्याच वेळीं डायरेक्टरांशीं यासंबंधीं पत्रव्यवहार केला होता. परंतु पार्लमेंटच्या एका ॲक्टाअन्वयें हिंदुस्थानांतील इतर राजांशीं इंग्रजी कंपनीनें नवीन तह करूं नये व केवळ स्वसंरक्षणाखेरीज युद्धाच्या भानगडींत पडूं नयें असा निर्बंध घातला होता. परंतु कंपनीचें हित कशांत आहे हें पार्लमेंटपेक्षां कार्नवालीसला चांगल्या प्रकारें कळत असल्यामुळे त्यानें हा निर्बंध बाजूस सारण्याचे दोन प्रकार शोधून काढले. पहिला प्रकार म्हणजे निजामाशीं कंपनीनें पूर्वी केलेल्या तहाचें स्पष्टीकरण करण्यासाठीं त्यानें लिहिलेल्या पत्रांत इंग्रजांच्या दोस्तांच्या यादींतून टिपूचें नांव वगळलें व ' त्यांचा प्रांत घेण्यास इंग्रजी पलटणीचा उपयोग करण्यास हरकत नाहीं ' असें निजामास कळविलें, आणि याशिवाय टिपूनें त्रावणकोरच्या राजाशीं केलेली खटखट म्हणजे इंग्रजाविरुद्ध त्यानें पुकारलेलें युद्धच आहे असा अर्थ केला. सारांश; मराठे व निजाम टिपूच्या विरुद्ध लढण्यास आतुर आहेत व फ्रेंच टिपूच्या मदतीस येऊं शकत नाहींत असें पाहतांच कार्नवालीसनें पार्लमेंटच्या कायद्याचा अर्थ आपल्यास अनुकूल आहे असें ठरवून युद्ध जाहीर केलें.

भाग ४ था.

पहिली सहामाही.

श्री रंगपट्टणावरील दोस्तांची स्वारी १७९० च्या जून पासून १७९२ च्या मार्चपर्यंत सरासरी एकवीस महिने चालली होती. वर्णनाऱ्या सोईसाठीं हिचे तीन विभाग किंवा तीन मोहिमा कल्पिता येतील. पहिल्या मोहिमेनें त्रावणकोरच्या राजावर टिपूनें दिलेला शह उठविण्याचें काम साधलें; व ती १७९० च्या जून महिन्यापासून दिसेंबरपर्यंत सहा महिने चालली होती. टिपूच्या राज्यांतील दक्षिणेकडील घाटाखालचा मुलूख व कर्नाटक या मोहिमेचें रणक्षेत्र असुन इंग्रजी सैन्याचें आधिपत्य मेडोजकडे होतें; त्याच वेळीं पश्चिमेकडे समुद्रकिनाऱ्याच्या बाजूस मुंबईकडील इंग्रजी सैन्य जनरल आबरक्रोंबीच्या हाताखाली ठेवण्यांत आलें होतें. या मोहिमेंत म्हणण्यासारखें यश न आल्यामुळें इंग्रजी सैन्यास त्रिचनापल्लीस व तेथून मद्रासेस परत यावें लागलें.

दुसऱ्या मोहिमेच्या वेळीं इंग्रजी सैन्य कार्नवालीसच्या आधिपत्याखाली होतें. आणि टिपूच्या राज्यांत प्रवेश करून या सैन्यानें बंगलोरचा बळकट किल्ला सर केला. पण इतर कित्येक अडचणी उद्भवल्यामुळें याही वेळीं १७९१ च्या मे महिन्यांत कार्नवालीसला ससैन्य परत फिरावें लागलें. ही मोहीम सहा महिने चालू होती.

तिसरी मोहीम १७९१ जून महिन्यांत चालू होऊन नऊ महिने तिचें काम चाललें होतें. या वेळीं मराठ्यांचें सैन्य इंग्रजांच्या मदतीस आल्यामुळें श्रीरंगपट्टणपर्यंत टिपूस रेटीत नेऊन तेथें त्यास कोंडण्याचें काम कार्नवालीसला चांगल्या प्रकारें पार पाडतां आलें. अखेरीस टिपूनें अनन्यगतिक होऊन अर्धें राज्य देऊन तह केला. तेव्हां या स्वारीचा शेवट झाला.

या तीन मोहिमांपैकीं पहिल्या मोहिमेचें वर्णन आम्हांस येथें द्यावयाचें आहे. त्यांत देखील टिपूच्या धारवाडप्रांताकडील भागांत मराठ्यांनीं केलेल्या युद्धाचें वर्णन येथें न देतां फक्त इंग्रजी सैन्यानें जे डावपेच केले त्याचीच माहिती या भागांत देणार आहों. या मोहिमेसाठीं आपणच कलकत्त्याहून मद्रासेस जावें असें प्रथम कार्नवालीसनें ठरविलें होतें. परंतु मेडोजची नेमणूक मद्रास प्रांतावर होऊन त्यानें एकदम टिपूशीं युद्ध जाहीर केल्यामुळें कार्न-

वालीसनें आपला बेत रहित केला. टिपूशीं तडजोडीचें बोलणें करणेंच न्यायाचें आहे. वगैरे उपदेश मद्रासचा गव्हर्नर हालंड आपणास करतो म्हणून कार्नवालीस संतापला होता. पण तो संताप मेडोजच्या नेमणुकीनें नाहींसा झाला. त्यानें कलकत्त्यासच राहून मेडोजच्या मदतीस युद्धसामुग्री व मनुष्यबळ पाठविण्याचें ठरविलें.

या वेळीं मेडोजच्या हाताखालीं पंध्रा हजार सैन्य जमलें होतें. बरीच वाटाघाट झाल्यानंतर युद्धाचें धोरण निश्चित करण्यांत आलें तें असें. इंग्रजी सैन्यानें टिपूच्या राज्यावर तीन बाजूंनीं हल्ला चढवावा. दक्षिणेकडे पायाघाट काबीज करून गजरहट्टीच्या घाटीनें टिपूच्या राज्यांत वरघाटी शिरून धुमाकूळ माजविण्याचें व त्याच्या राजधानीवर चालून जाण्याचेंकाम स्वतः मेडोजनें पत्करलें. पश्चिम किनाऱ्यालगत मल्याळांत मुंबईकडील सैन्य उतरवून तांबरचरीच्या घाटानें वर चढण्याचें किंवा प्रसंग पडल्यास मेडोजच्या सैन्यास येऊन मिळण्याचें काम जनरल आबरक्रोंबी यांजकडे सोपविण्यांत आलें. आणि पूर्वेकडील तापूरच्या किंवा चंगमच्या घाटीनें टिपूच्या राज्यांत शिरण्यासाठीं व इंग्रजी मुलखाचें संरक्षण करण्यासाठीं बारा महाल प्रांतांत शिरण्याचें आणि बंगाल्यांतून आणखी सैन्य आलें म्हणजे चढाई करण्याचें काम कर्नल केली यांजकडे दिलें.



जनरल मेडोज.

इतकी जमवाजमव होऊन मोहिमेवर निघण्याची तयारी होत आली तरी टिपू त्रावणकोरच्या राजाशीं भांडण्यांतच गुंतून राहिला होता! इतकेंच नव्हे; तर इंग्रजाशीं लढण्यावांचून गत्यंतर नाहीं असें उघड दिसत असून देखील त्यानें एकवार अजून समेटाचा प्रयत्न करून पहाण्याचें ठरविलें. मद्रासच्या गव्हर्नरच्या जागीं आपलीं नेमणूक झाल्याचें जें सामोपचाराचें पत्र मेडोजनें टिपूकडे पाठविलें होतें त्यास उत्तर देतांना मेडो-

सर्वे प्रथम अभिनंदन करून " तुमच्या निर्मळ अंतःकरणावर माझ्याविषयीं गैरसमज उत्पन्न करणारी धूळ कोणी तरी फेकली आहे असें दिसतें. 'ती झाडून टाकून दिल-सफाई करण्यासाठीं मी माझे दोन विश्वासू अधिकारी आपणाकडे पाठविणार आहे. तर याबद्दलचा आपला अभिप्राय कळवावा " असा मजकूर शेवटीं टिपूनें लिहिला होता.

परंतु मेडोजची मनःस्थिति लक्षांत घेतली असतां त्यास ही सूचना या वेळीं पसंत पडणें शक्य नव्हतें. टिपूशी वाटाघाट करण्यांत वेळ घालविल्यामुळें हालंडवर कार्नवालीसची गैरमर्जी झाली व आपण या मार्गानें जाऊं तर आपणावर देखील तोच प्रसंग आल्यावांचून राहणार नाहीं हें मेडाजला स्पष्ट दिसत होतें; शिवाय इंग्रजी सैन्य जय्यत तयार असून टिपू गैरसावध असल्यामुळें आपण खात्रीनें त्यास चीत करूं असा त्याला भरंवसा वाटत होता. तेव्हां त्यानें टिपूच्या पत्रास सडेतोडपणाचें उत्तर पाठविलें. तें असें: " तुमचें पत्र पोचून मजकूर समजला. तुम्ही राज्यपदावर असून थोर आहां; आणि कैद्याशीं क्रूरपणानें वागण्याची खोड तुम्हांस लागली नसती तर * तुमची गणना मी सुधारलेल्या राजपुरुषांत केली असती. दुसऱ्याचा अपमान करणें इंग्रजांना जसें रुचत नाहीं तसेंच लोकांनीं केलेला आपला अपमान निमूटपणें सोसून स्वस्थ बसणें हें इंग्रजांचें ब्रीद नव्हे. यामुळें त्रावणकोरच्या राजावर तुम्ही हात टाकला त्याच वेळीं आमचें तुमचें युद्ध सुरू झालें असें आम्ही समजून चाललों आहों. ज्याचें सामर्थ्य जास्त त्यासच युद्धांत यश लाभतें किंवा चपळ मनुष्यच शर्यत जिंकतो असा कांहीं जगांत अनुभव नाहीं. मात्र ज्यानें न्यायाचा पक्ष उचलला असेल त्याला विजयश्री अखेरीस माळ घालते असा सर्वसाधारण नियम दिसतो. आणि याच नियमावर आम्ही भिस्त ठेवली आहे. "

या झणझणीत उत्तरामुळें टिपूच्या डोळ्यांत चांगलेंच अंजन पडलें, आणि आपल्यावर मात करण्यासाठीं इंग्रज आपल्या प्रयत्नाची पराकाष्ठा करणार अशी या उत्तरानें त्याच्या

---

* मेडोजनें हें वाक्य स्वानुभवावरून लिहिलें आहे. कारण गोविंदराव काळ्यानें एका पत्रांत लिहिल्याप्रमाणें (ऐति. टिपणें. भा. ३ पृ. ३) " अर्काटाकडे हैदरअल्ली इंग्रजावर गेले होते ते सालीं बेली व मंडोर धरून कैद केले.फार तसदी केली होती. मंडोर नावें तोच मेडूस. याचें मनांत कीं त्या समईचा बदला टिपूस करावा. हा मोठा आग्रह " परंतु शेवटीं सूड घेण्याची ही मेडोजची इच्छा पुरी होण्यापूर्वी कार्नवालीसनें तह केलेला पाहून मेडोजनें आत्महत्या करून घेतली ! एकंदरीत मेडोजचा स्वभाव लहरी पण दीर्घ-द्वेषी होता असें दिसतें.

मनाची खात्री झाली. तो त्रावणकोरमधून एकदम पाऊल मागें घेऊन आपल्या राज्यांत कोइमतूर प्रांतांत आला. तेथें तात्पुरती कांहीं थोडी व्यवस्था करून तो गजरहट्टीच्या घाटीचा बंदोबस्त करण्यासाठीं वरघाटीं गेला.

कल्पनेबाहेर मोठ्या संकटाशीं एकदम झगडण्याचा प्रसंग आला म्हणून टिपूनें या वेळीं धीर खचूं दिला नाहीं. दक्षिणेकडील पायाघाटाचें संरक्षण मनाजोगें होण्यासारखें नसलें तरी इतर राज्याची व्यवस्था नीटपणें लाऊन आपण तयारीनें रहावयाचें व युद्धास प्रारंभ आपण न करतां ती जबाबदारी इंग्रजांच्या शिरावर टाकून § युद्ध सुरू होतांच हरप्रयत्न करून इंग्रजी मुलखांत धामधूम करावयाची असें धोरण त्यानें ठरविलें.

अशा रीतीनें आपल्या प्रांताची नासाडी न होऊं देतां, होतां होई तोंवर शत्रूच्या मुलखाचाच सैन्याच्या पायमल्लीनें 'पाटावरवंटा' व्हावा ही इच्छा मेडोज व टिपू या दोघांचीही एकसारखीच होती. आणि त्यांचे सर्व बेत याच धोरणावर चालले होते. मात्र इंग्रजी सेनापतीस भरपूर वेळ मिळाल्यामुळें त्याची स्वसंरक्षणाची व्यवस्था होऊन तो चढाई करून जाण्यास सज्ज झाला होता. आणि टिपूस आधीं घर बचावण्याच्या कामीं कांहीं दिवस घालविणें आवश्यक होतें. या वेळीं त्यानें जी व्यवस्था केली तिचें वर्णन मराठ्यांच्या बातमीदारानें असे दिलें आहे:—

" इंग्रजी फौजेची गोळी वाजली म्हणजे करनाटकांत फौज पाठऊन मुलूख ताख्तताराज (उध्वस्त) करावा (असा टिपूचा बेत आहे). यावत् शक्ति, अर्थें, प्राणें, आपल्याच्यानें जेथवरी होईल तेथवरी भांडावे म्हणून फौजा जमा करीतच आहे. याचे मुलखास लागून घाट आहेत. त्या त्या पट्टीचे रयत वगैरे लोकांस बेंगरुळास पाठवून देऊन गांव उजाड केले. पाणी नासून टाकिलें. दाणा शिवाय भारी किल्ल्याचे ठेविला नाहीं (= बळकट किल्ल्यावर मात्र धान्यसंग्रह ठेवला आहे.) तमाम आपले जिल्ह्याचे लोकास (= राज्यांतील प्रजेस) कौल दिल्हे जे तुम्ही जिरायेत करणें नलगे. तुम्हांस वरी वगैरेचा महसूल माफ केला. तुमचे चित्तास येईल, ज्या स्थलीं प्रशस्त वाटेल, त्या मकानीं (= ठिकाणीं) राहणें, म्हणून आपले मुलकाची रयेत वगैरेस बेंगरुळांत व श्रीरंगपटणांत ठेविलें आणि चहूंकडे निगादास्त कलमज्यारी आहे (कडेकोट व्यवस्था चालली आहे.) दोन हात

---

§ 'त्रावणकोरच्या राजावर चाल करणें म्हणजे इंग्रजाशीं कुरापत काढणें नव्हें' असें टिपू समजत होता; आणि 'त्रावणकोरवर टिपू चालून गेला त्या दिवशीं त्यानें इंग्रजावर युद्ध पुकारलें असेंच आम्ही समजतों' असें इंग्रज म्हणत होते. हा भेद येथें लक्षांत ठेवला पाहिजे.


यांसी (इंग्रजासी) पाहीन म्हणुन जोम फार वागवीत आहे.* जयापजय श्रीचे स्वाधीन, परंतु धमक भारी आहे आणि पैसेदाजहि आहे. "

हाच बातमीदार इंग्रजी फौजेची माहिती देतांना म्हणतो ' या महिन्यांत (मे मध्यें) टिपूच्या मुलखांत घुसावें हे तजवीज आहे. तीन फौजा इंग्रजी जाहाल्यांत. नाजम फार त्वरेनें येतात त्यांच्या फौजा कृष्णासमीप आल्या. (गुंटुराकडील इंग्रजी फौज) तयार होऊन नाजमाचे फौजेस मिळावयासी जात आहे. बंगाल्याची फौज आणि खर्चास अद्यापी आलें नाहीं. ते फौज आली तरी परस्परें मच्छली बंदराकडे उतरोन...... कडपे वगैरे मुलूख दाबणार. याप्रमाणें त्वरा करून माल व मुलूख जो हातीं लागेल तो घेत घेत दाबीत जावा आणि जेथें माल व मुलूख हातीं लागेल त्याचे ऐवजी फौजा ठेवीत जाव्या याप्रमाणें मुकरर केलें आहे. विद्यमानीं दाहा वर्षांचीं, बारा वर्षांचीं पोरें जमा करून त्यांस कवायेत शिकवून बारवाला तयार करतात. " या शिवाय कोइमतूरच्या आसपास इंग्रजी सैन्याचा जमाव झाला होता त्यास त्रास देण्याची दुसरी एक युक्ति टिपूनें काढली. ती अशीं " कावेरी नदींत हजारो भारे शेर वगैरे ओला पाला आणून घालून पाणी नासिलें आहे. गुरें देखील पाणियास तोंड लावीत नाहींत. कावेरीचें पाणी नासिल्या ठायापासून तों त्रिचनापल्लीपावेतों पाणी खराब जाहालें आहे व आपल्या मुलखांत फिरंगी उतरल्या रोखें चार पांच गांव पावेतों मुलूक वोस करून तळीं गुंटी फोडून, आडही बुजवून वाटेंत पाणी नाहींसें केलें आहे. "

हा उपाय योजल्यामुळें इंग्रजी सैन्यास केवढी अडचण उत्पन्न झाली हें ध्यानांत येण्यास आपण प्रथम मेडोजच्या हालचाली लक्षांत घेतल्या पाहिजेत. त्रिचनापल्लीच्या आसपास इंग्रजी सैन्याची जमवाजमव होतांच तो मद्रासेहून तरकंबाडी बंदरापर्यंत बोटीनें येऊन तेथून चंदावरच्या राजाचा पाहुणचार स्वीकारून त्रिचनापल्लीस १५ जूनच्या सुमारास पोंचला. यापूर्वी इंग्रजी सैन्यानें टिपूच्या राज्यांत शिरून करूर नांवाचें सरहद्दीवरचें ठाणें

* स्वारीवर निघाला असतांना टिपूचें स्वरूप, अंगलट, व पोषाख कसा असे याचें वर्णन १७८६ च्या सुमारास एका बातमीदारानें केलें आहे तें असें: " टिपू खासा फौजेंत आहे. मी आपलें दृष्टीनें चाळीस पन्नास हाताचे तफावतीनें पाहिला. रंग गोरा मध्यम आहे. डेऱ्याहून मोर्चांत सोमवारीं आला. तेव्हां निळ्या घोड्यावर बसला होता. पागोटें चक्रीदार, छिटी बैवरी व आंगरखा पिवळा ताप्त्या व जुबा मोठ्या पटीचे मश्रूचा व पिवळी शालजोडी येणेंप्रमाणें पोषाख होता. मिशा मध्यम गालांवर, कानाल्या केसाच्या, येणेंप्रमाणें पाहिल्या. " (ऐति. टिप. भा. ३. पृ. ४८)

हस्तगत केलें होतें. तें बळकट व संग्रहाच्या दृष्टीनें सोईचें असल्यामुळें मेडोजनें तेथें तळ देण्याचें ठरविलें. आणि अठरा दिवसानंतर तेथून धारापूरचा किल्ला काबीज केला. इतक्यांत टिपू कोइमतुरास आहे अशी बातमी आल्यामुळें मेडोजनें तिकडे आपला मोर्चा वळविला. परंतु उत्तरेकडून मराठे व निजाम आपल्या राज्यावर येत असल्याची व राजधानींत कांहीं फंदफितुर झाल्याची बातमी कळल्यामुळें टिपूनें कोइमतूरच्या



टिपूच्या सैन्यांतील घोडेस्वार व तोफेचा गाडा.

बाजूचें सर्व सैन्य उठवून तो वरघाटी घाईनें निघून गेला. जातांना शहरास आग लाऊन दिली आणि तेथील लोकांस शहर सोडून जाण्यास सांगितलें. टिपू जातो असें ऐकतांच इंग्रजी सैन्य धाऊन आलें; परंतु त्यापूर्वीच तो जलदीनें भवानी नदी उतरून गजरहट्टीच्या घाटानें वर गेला होता. इंग्रजी सैन्यानें भवानी नदीपर्यंत त्याचा पाठलाग केला. परंतु नदीस पाणी फार व पलीकडे शत्रूचें सैन्य अशा परिस्थितींत नदी ओलांडून जाणें धोक्याचें आहे असें ठरवून मेडोज परत कोइमतुरास गेला; आणि तेथील आग विझवून, व लोकांना धीर देऊन सर्व स्थिरस्थावर केलें.

अशा रीतीनें करूर, धारापूर व कोइमतूर हीं तीन महत्वाचीं ठाणीं हस्तगत झाल्या-

वर वरघाटीं जाण्यापूर्वी चंदावर, त्रिचनापल्ली, करूर, एरोड आणि सत्यमंगल या नाक्यांच्या जागीं धान्यसंग्रह होऊन चांगला बंदोबस्त व्हावा म्हणजे पुढें अडचण पडणार नाहीं असा विचार करून मेडोज त्या उद्योगास लागला.

हा विचार सुचण्यास आणखी एक कारण या वेळीं उद्भवलें होतें. पावसाळ्यास सुरवात झाल्यामुळें व नद्यांचें पाणी टिपूनें बिघडून टाकल्यामुळें इंग्रजी सैन्याचे फार हाल होऊं लागले. शिवाय टिपूचे स्वार यांच्या ठाण्याच्या आसपास टपून राहत असल्यामुळें "लष्करचे बाहेर कोणी तीन चार कोस भटकत नाहींत. पाऊस फार. डोळा उघडीत नाहीं. याकरितां लोक फार मरतात. दुसरें, मीठ आणि लांकडें लष्करांत मिळत नाहींत, याकरितां लष्कर फार हैराण होत आहे" अशी परिस्थिति इंग्रजी सैन्यांत आली. यामुळें कोइमतूरच्या आसपासचा मुलूख घेतांना प्रत्यक्ष युद्धाचा प्रसंग येऊन प्राणहानी न झाली तरी इंग्रजी सैन्यांतील दीड हजार लोक रोगानें व हाल होऊन मरण पावले. तेव्हां मेडोजच्या शहाणपणाविषयीं लोक साशंक झाले. तथापि लष्करी दृष्ट्या इंग्रजांचें पाऊल पुढें पडत होतें म्हणून त्या वेळीं फारसा बोभाटा झाला नाहीं.

तंजावरापासून गजरहट्टीच्या घाटीपर्यंत युद्धसामुग्रीची ने-आण अव्याहतपणें होण्यास वर सांगितलेलीं पांच ठाणीं ताब्यांत घेतलीं म्हणजे काम भागण्यासारखें होतें. परंतु त्याशिवाय पालघाटचेरी व दिंडगल हे दोन किल्ले चांगले बळकटपैकीं होते व ते टिपूच्या ताब्यांत राहू दिल्यास आपल्या पिछाडीवर केव्हां हल्ला येईल याचा नेम नाहीं असा विचार करून मेडोजनें हेही किल्ले ताब्यांत घेण्याचें ठरविलें. कर्नल ओल्डहॅमनें प्रथम एरोड ताब्यांत घेऊन भवानी व कावेरी या नद्यांच्या संगमावर इंग्रजी निशाण रोवलें व कर्नल स्टुअर्टनें दिंडगलवर चाल केली. या किल्याची त्यानें चोंहीकडून पाहणी केली, परंतु त्याला कोठें सैन्य घुसविण्यास अवसर दिसेना. कारण किल्ला मूळचा बळकट असून त्याची अलीकडे डागडुजी काळजीपूर्वक करण्यांत आली होती. तथापि नुसत्या दबकावणीनें किल्ला हस्तगत झाल्यास पहावें असा विचार करून किल्लेदाराकडे त्यानें असा निरोप पाठविला कीं, "मुकाट्यानें किल्ला आपल्या ताब्यांत द्याल तर तुम्हांस बाहेर आपल्या जडजवाहिरासुद्धां जाऊं देऊं; आणि किल्ला लढविण्याच्या नादीं लागून प्राणहानि कराल तर सर्व लोकांची कत्तल होईल." पण किल्लेदारानें हरकाऱ्याजवळ उत्तरादाखल एवढाच मजकूर तोंडी सांगितला "तुझ्या सेनापतीस असें सांग कीं दिंडगलसारखा बळकट किल्ला न लढवितां ताब्यांत दिल्यास माझा धनी मला सूळीं काढील. तेव्हां

असला निरोप घेऊन पुनः कोणी मजकडे येईल तर त्या हरकाऱ्यास मी तोफेच्या तोंडी उडवून देईन. ''

या उत्तरानें चिडून कर्नल स्टुअर्टनें दोन दिवस किल्यावर तोफांचा एकसारखा भडिमार केला. पण किल्ला बळकट असून आंत भरपूर दारूगोळा होता तेव्हां या भडिमाराचा कांहीं उपयोग झाला नाहीं. उलट स्टुअर्टजवळचा दारूगोळा बहुतेक संपत आला. तेव्हां त्यानें हल्ला करून तें ठिकाण ताब्यांत घेण्याचा दोन वेळां प्रयत्न केला. पण तोही फसला. तेव्हां स्टुअर्ट निराश होऊन काय करावें या पंचाइतींत होता. इतक्यांत त्याच्या नशिबानें या वेळीं त्यास चांगला हात दिला. किल्लेदार चांगला हिंमतवान असून आंतील लोकांनीं आदल्या दिवशीं चांगला पराक्रम गाजविला होता; परंतु रात्रीच्या रात्रीं त्यांचें बस्तान कोठें बिघडलें असेल तें असो पहाटे पहावें तों किल्यावरील सर्व लोक निघून गेले होते ! यामुळें किल्लेदारास किल्यावर पांढरें निशाण उभें करण्यावांचून गत्यंतर राहिलें नाहीं. इंग्रजी सेनापतीस हा प्रकार पाहून मोठें आश्चर्य वाटलें आणि त्यानें किल्ला ताब्यांत घेऊन किल्लेदारास निघून जाण्याची परवानगी दिली. यानंतर स्टुअर्टनें पालघाटचेरी हस्तगत केली आणि कर्नल फ्लाइडनें सत्यमंगलचा किल्ला घेतला. अशा रीतीनें पूर्वसंकेताप्रमाणें सातही ठिकाणें ताब्यांत आलीं, आणि सत्यमंगलहून गजलगट्टीच्या खिंडीतून घाट चढण्याचेंच काम शिल्लक राहिलें.

हीं सात ठाणीं हस्तगत होईपर्यंत ब्रिटिश सैन्य तीन जागीं विभागलें गेलें होतें. एक भाग कोइमतुरास मेडोजच्या हाताखालीं, दुसरा घाटाच्या तोंडाशीं सत्यमंगल येथें फ्लाइडच्या हाताखालीं आणि तिसरा कोइमतुराच्या पश्चिमेस तीस मैलावर पालघाटचेरी येथें स्टुअर्टच्या हाताखालीं होता. यामुळें अघाडींत व पिछाडींत फक्त ९० मैलाचें अंतर असून पाठीवर शत्रूचा शह मुळींच नसल्यामुळें घाट चढून टिपूच्या राजधानीकडे जाण्यास हरकत येणार नाहीं असें मेडोजला वाटत होतें. त्यांतल्या त्यांत मराठे व निजाम यांचें सैन्य मदतीस येण्यापूर्वी आपल्याच हिमतीनें हा विजय मिळविला असें वाटून मेडोज या वेळीं शेफारून गेला पण त्यानें थोडासा विचार केला असतां तर टिपूनें युद्ध टाळल्यामुळें हीं ठाणीं हस्तगत झालीं, त्यावरून टिपू कमजोर ठरत नाहीं हें मेडोजच्या ध्यानांत आलें असतें. पण मेडोज इतक्या शांत स्वभावाचा नव्हता. ' हा सरदार एकवल्ली, बांका शिपाई, साधा आहे. त्यास राजतंत्र किंवा देशतंत्र विशेषें कळेना ' असें याचें मराठ्यांनीं केलेलें वर्णन लक्षांत ठेवण्याजोगें आहे. त्यानें चार लोकांसमक्ष

एकदा अशी प्रतिज्ञा केली कीं ' * सात दिवस लष्करांत, तमाम लष्कर वगैरे दृष्टी पाहून सातवे दिवशींच टिपूचे मुलकांत शिरतों. ' आणि या प्रतिज्ञेप्रमाणें त्यानें बरो सात दिवसांत शत्रूच्या मुलखांत प्रवेश केला; इतकेंच नव्हे तर बराच मुलूख हस्तगत केला. यामुळें त्याचें डोकें विजयानें भणाणून जाणें स्वाभाविक होतें.

इंग्रजी सैन्यानें ह्या वेळपर्यंत केलेल्या पराक्रमाचें सार मराठ्यांच्या बातमीदारानें अ दिलें आहे. " चिनापट्टणाहून इंग्रजांचे सरदार मेढूस निघाले. त्यांनी टिपूचे तालुक्य जाऊन प्रथम केरूर घेतलें. पुढें आरवाकोंची व. दिंडगल व धारापूर हीं चारी स्थ घेऊन मुलखाचा बंदोबस्त केला. टिपू कोइमतुरास आहे म्हणोन बातमी कळली त्या वरून त्या सुमारें कुच केलें. तों इंग्रज जाण्यापूर्वी टिपू कूच करून श्रीरंगपट्टणाकडे गेल कोइमतुरास आग दिली. हें वर्तमान इंग्रजांस कळतांच कोइमतुरास येऊन आग विझव ठाण्याचा बंदोबस्त केला. गल्ला वगैरे सरंजाम सापडला. घाटाखालील फार करून मुल इंग्रजांनीं घेऊन बंदोबस्त केला. टिपूचा सरंजाम मातबर असतां इतका मुलूख, ठा इंग्रजानें घेतलीं असतां झुंजावयासी उभा राहिला नाहीं याचे दोन प्रकार दिसतात. ए अडचणींतून निघोन मैदानांत यावें. पट्टणाकडे इंग्रज आलियावर लढाई एकदाच चांग करावी. दुसरा पक्ष इंग्रजांचा जोर भारी, याजकरिता समजून पट्टणाकडे आला. य बळाबळ पाहतां इंग्रजांचा जोर भारी इकडून सरकार (मराठे) व नबाबाकडील फौ कृष्णा उतरल्या, चोहोंकडून ताण, याजकरिता अडचणीचें रान सोडून पट्टणाकडे आ असें संभवतें. "

पण पुढें कोणताही प्रकार व्हावयाचा असला तरी टिपूनें ह्या वेळपर्यंत पत्करलेल पिछेहाटीमुळें इंग्रजांनीं फुशारकीच्या गोष्टी सांगण्याचें कारण नाहीं; श्रीरंगपट्टणापर्य इंग्रजी सैन्यास जाणें फार कठीण आहे, इतक्यांतच त्यांनीं ' पट्टण चीज काय आहे जातां जातां घेऊ ' असें बडबडणें योग्य नाहीं हे नाना फडणीसांनीं मात्र बरोबर ताड होतें. ते परशुरामभाऊस या वेळीं पाठविलेल्या पत्रांत लिहितातः—" इंग्रज आधी मजबूत. त्यांत टिपूचा मुलूख घेत चालिले. येणें करून इंग्रज गर्वारूढ जाहले आहेत. को असेही (त्या लोकांत) आवाज निघतात कीं, " दोनी सरकारचे (म्हणजे मराठे हैदराबादकर) फौजांचे भरंवशावर आम्ही मसलत केली नाहीं. उगच सामील असा म्हणोन शरीक केले. भर पावसाळ्यांत कोणाची वाट न पाहतां (आम्ही) टिपूच

* चिनाप—राजका. ४३.

मुलुख घेतला. टिपू लढाईस उभा न राहतां पट्टणाकडे गेला. तेव्हां कोइमतुराहून कूच करून पट्टणासच जातों. पट्टण (श्रीरंगपट्टण) चीज काय आहे ? जातां जातां घेऊं. " याप्रमाणें बोलणीं आहेत. ...... टिपू कोइमतुराहून पट्टणाकडे गेला; तेव्हां अगदीं बुडाला असें नाहीं. त्याचे जुरतीस पाऊल कमी पडले, याजमुळें इंग्रजाचे लष्करांत तर्क करतात कीं ' टिपू मेला ! जर असता तर अशी गोष्ट न होती. फौजेचे सरदार असतील त्यांचे वस्तु (हातून) दम धरवतो. कीं काय ? ' हेही तर्क आहेत. परंतु मेला असें म्हणवत नाहीं. तो मनसुब्यानें निघाला आहे. पट्टणचे मैदानांत इंग्रजांची फौज आल्यावरी निकड करील. "

इंग्रजी सेनापतीनें या वेळीं लष्कराच्या जोरावर टिपूचा पायाघाट ताब्यांत घेतला होता, तरी त्या प्रांतांत व इंग्रजी मुलखांत देखील जे भयंकर अत्याचार पुंड लोकांनीं चालविले होते ते वाचले असता मन उद्विग्न होऊन अंगावर शहारे उभे राहतात. याच सुमारास फ्रेंच राज्यक्रांतीमुळें युरोपांत जे अनन्वित प्रकार घडत होते व गुलाम कादरानें दिल्लीस जीं अमानुष व क्रूरपणाचीं कृत्यें केलीं तीं लक्षांत घेतलीं असतां इपलुएंझाच्या सार्थीप्रमाणें अत्याचार करण्याच्या वेडाची साथ देखील जगांत एकाच वेळीं येऊन जाते कीं, काय असा संशय येतो. चोहींकडे एकाच वेळीं सुटलेलें हें वारें काकतालीय न्यायानें एकरूप भासतें किंवा त्या सर्व घडामोडी एकाच प्रेरकशक्तीचीं फळें आहेत हा प्रश्न सोडविण्याचा आमचा येथें बेत नाहीं. परंतु युरोपाप्रमाणें हिंदुस्थानांत (महाराष्ट्रखेरीज) १७९० साल लोकांना अत्यंत त्रासदायक गेलें, एवढें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. मारामार, लुटालूट, दंगाधोपा याला तर सीमाच राहिली नव्हती. चिलनाईक नांवाचा पाळेगार अशा रीतीनें जाळपोळ करण्यांत मोठा वाकबगार होता. त्यास टिपूनें बोलावून आणि साहित्यसामुग्री देऊन बजाऊन सांगितलें कीं, ' या समयीं जितकी मेहनत करून दाखवाल तितके सर्फराज व्हाल (बढती मिळेल.) !' अर्थात पिशाच्याच्या हातीं कोलीत दिल्यासारखा प्रकार होऊन त्यानें लोकांना लुबाडण्याची पराकाष्ठा केली. पण ही शत्रुपक्षाच्या लोकांनीं केलेली लुटालूट एका अर्थानें तितकी मनास झोंबत नाहीं. पण ठिकठिकाणीं लोकांनीं वैयक्तिक सूड उगविण्यासाठीं एकच उसळी मारली. यामुळें या अराजकस्थितीस अत्यंत किळसवाणें स्वरूप प्राप्त झालें. उदाहरणार्थ; ' अर्काटच्या नबाबाच्या हाताखालीं जें सैन्य होतें, त्यांतील दाहाजण घरीं लग्न आहे असें सांगून लष्करचे घोडे घेऊन रजेवर गेले.त्यांनीं सरकारी चौकीवर सरकारी पास दाखवावा आणि रात्रीं खेड्यापा-

ज्यांतील घाबरलेल्या लोकांवर दरवडेखोर म्हणून खुशाल हल्ला करून लुटालूट करावी असा क्रम चालविला होता ! शेवटीं त्यांचें कृत्य उघडकीस आल्यावर कोटमास (कोर्ट-मार्शल) करविला * चिदंबर, भुवनगिरी, चेंगलपेठ वगैरे बाजूस तर अगदीं कहर झाला होता. बायकांच्या शरीराचे कांहीं भाग कापून पुरुषांच्या तोंडांत घालणें आणि पुरुषांचे बायकांच्या तोंडांत घालणें वगैरे अत्याचारांचें वर्णन वाचलें म्हणजे ते प्रकार तात्कालीन बातमीदारानें लिहिल्याप्रमाणें ' वाच्यामगोचर ' आहेत. तात्पर्य, ' चहूंकडे हाहाःकार उठून एकच गर्दी होऊन गेली. '

तथापि मोठमोठीं युद्धें होतांना लोकांचे हाल व्हावयाचेच असें समजून व या वेळची लोकस्थिति दृष्टीआड करून आपण दोनही बाजूंच्या लष्करी हालचालींकडे पुनः वळूं. मागें सांगितल्याप्रमाणें कोइमतूरच्या आसपासचा सर्व मुलूख ताब्यांत येऊन ठिकठिकाणीं दारू-गोळा व इतर धान्यांचा संग्रह केल्यामुळें गजरहट्टीच्या खिंडीनें वरघाटीं जाण्यास कांहींच हरकत नाहीं असें मेडोजनें ठरविलें. परंतु हें सर्व मनोराज्य जागच्याजागीं राहून त्याच घाटानें टिपू अचानक इंग्रजी सैन्यावर चालून आला ! आणि तोही लहान सहान टोळ्या घेऊन आला नसून निदान चाळीस हजार लढाऊ लोक, ८० हजार बाजारबुणगें व मोठा तोफखाना त्यानें बरोबर आणला होता. एवढें मोठें सैन्य अचानकपणें बिनबोभाट घाटाखालीं आणल्याबद्दल इंग्रजी इतिहासकारांनीं टिपूच्या कौशल्याची मोठी तारीफ केली आहे. या वेळीं इंग्रजी सैन्याची आघाडी फ्लूइडच्या हाताखालीं होती. त्याला एकदोन दिवस आधीं याबद्दल कांहीं गुणगुण कळून त्यानें असा प्रसंग आल्यास मागें हटून कोइमतुरास येण्याची परवानगी मेडोजकडे मागितली. परंतु मेडोज या वेळीं श्रीरंगपट्टणावर चालून जाण्याच्या बेतांत गर्क असल्यामुळें त्यानें असल्या बातम्यांवर विश्वास ठेवल्याबद्दल फ्लाइडला दोष देऊन मागें न हटण्याबद्दल निक्षून बजावलें. यानंतर टिपूचें सैन्य खरोखरीच चालून आलें तेव्हां सत्यमंगलचें ठाणें राखण्याचा त्यानें फार प्रयत्न केला. परंतु टिपूच्या प्रचंड सेनेपुढें निभाव लागण्याचें त्याला लक्षण दिसेना. संध्याकाळपर्यंत त्यानें मोठ्या कष्टानें शत्रूस तोंड दिलें आणि रात्रीं पुढें काय करावयाचें हें ठरविण्याकरितां कौन्सील भरविलें. तेथें एकमतानें कोइमतुराकडे परत जाण्याचा ठराव झाला. त्याप्रमाणें तो सर्व सैन्यासह

* कोटमासाचा अर्थ या वेळच्या पत्रांत असा दिला आहे. ' चहूंकडून चार बेताच्या छड्या घेऊन तकसीरवंताचे (अरोपीच्या) हातावर, ते बांधून, पांचपांचसे बेत मारतात. त्यांत मनुष्यांत ताब रहात नाहीं. पाठ उलून जाते. '

दुसरे दिवशीं व्यवस्थेनें मागें हटूं लागला. दहाबारा मैलपर्यंत मोकळें मैदान असल्यामुळें तेथवर ही पिछेहाट व्यवस्थितपणें झाली. पण पुढें रस्ता अरुंद, शिवाय टिपूनें लगट करून त्यांना गाठलें. यामुळें फ्राइडला मोठी पंचाईत पडली. तेव्हां सामानसुमान व तोफा वगैरेची आशा सोडून सैन्याचे लोक जिवानिशी पार नेण्याचा त्यानें प्रयत्न केला. टिपूनें ती लूट घेऊन तोफेचा मारा सुरू केला, व इंग्रजी सैन्यास भिडून युद्ध जुंपलें. दोनही पक्ष जिवावर उदार होऊन आवेशानें लढूं लागले. इतक्यांत मेडोजच्या सैन्यापैकीं कांहीं लोक आपल्या मदतीस येत आहेत असें दिसल्यामुळें फ्राइडच्या सैन्यांस स्फुरण चढलें; उलटपक्षीं मेडोजच्या ताज्या दमाच्या लोकांपुढें आपले थकलेले शिपाई फार वेळ टिकणार नाहींत असें टिपूस वाटूं लागलें. यामुळें त्यानें आपल्या सैन्यास माघारीं फिरण्याचा हुकूम दिला व फ्राइडला मागें हटतां आलें. फ्राइडच्या या पिछेहाटीबद्दल त्याची प्रशंसा करणें योग्य आहे. कारण या कामांत त्याच्या सैन्यास तीन दिवस उपाशीपोटीं राहून शिवाय शत्रूशीं लढण्याचें व मागें हटण्याचें काम चालवावें लागलें.

फ्राइडच्या सैन्यांत एकदम आवेश भरण्यास ज्या सैन्याचा देखावा कारण झाला, तें खरें पहातां मुळीं सैन्यच नसून दहावीस घोडेस्वार होते इतकेंच ! पण या स्वारांच्या दर्शनानें मेडोजचें सैन्य आल्याची जी खोटी कल्पना लढणाऱ्या लोकांच्या मनांत उद्भवली तिनें या वेळीं फ्राइडच्या सैन्याचा बचाव केला ! असो. इकडे टिपू सत्यमंगलावर चालून आल्याची बातमी मेडोजला कळतांच तो घाईघाईनें फ्राइडच्या मदतीस निघाला, आणि फ्राइड मागें हटत वेलादी येथें आला ! अशा रीतीनें एकमेकाची बातमी एकमेकास नसल्यामुळें वेलादी व दमिकोटा या भागांत हीं सैन्यें एकमेकांस भेटण्यास मागेपुढें होत होतीं. इकडे टिपूला वाटे कीं, मेडोज आपल्याच अंगावर धाऊन येत आहे. यामुळें भवानीनदीच्या तीरावर सर्व सैन्याचा तळ होता तेथें टिपू निघून गेला. आणि मेडोजलाही फ्राइडची गांठ घेतां आली.

या दोन महिन्यांत एक गोष्ट ठळकपणे दिसून आली. ती ही कीं टिपूस आपल्या हालचाली गुप्तपणें करतां येत होत्या आणि इंग्रजी सेनापतींना शत्रूची तर राहोच पण आपल्या सैन्यांतील निरनिराळ्या टोळ्यांची देखील बरोबर बातमी कळत नसे. यामुळें एव्हांपासून मेडोजनें बातमीकडे विशेष लक्ष पुरविण्याचें ठरविलें. यानंतर करूरवर छापा घालण्याचा प्रयत्न टिपूनें केला. परंतु योग्य वेळीं मदत पाठवून मेडोजनें टिपूचा बेत फसविला. इतक्यांत धारापूरवर टिपूच्या दुसऱ्या टोळीनें हल्ला करून तें ठाणें ताब्यांत देखील घेतलें, अशी बातमी आल्यामुळें मेडोजला फार वाईट वाटलें. कारण त्या ठाण्यांत बरीच धान्यसामुग्री होती ती आयतीच टिपूस मिळाली. यानंतर निदान कोइमतूर

तरी शत्रूस घेऊं द्यावयाचें नाहीं असें ठरवून त्यानें तिकडे तोंड वळविलें. परंतु मुंबईच्या सैन्यापैकीं एक भाग घेऊन कर्नल हार्टली आधींच कोइमतुरास आला होता. यामुळें टिपू कोइमतुराकडे गेला नाहीं; धारापूरची लूट घेऊन तो भवानी नदीच्या काठी पुनः आपल्या सैन्याच्या मुख्य तळावर जाऊन राहिला.

अशा रीतीनें दोनही सैन्यें आपापली जागा धरून राहिल्यामुळें कोणाचेंच पाऊल पुढें पडण्याचें लक्षण दिसेना. तेव्हां पूर्व घाटाकडे कर्नल केलीच्या हाताखालीं जें इंग्रजी सैन्य होतें त्यास आपण मिळावें असा मेडोजनें विचार केला पूर्वेकडील सैन्याकडे लक्ष देण्याचें कारण असें होतें कीं बंगाल्यांतील बरेंच लष्कर कार्नवालीसनें तेथें पाठविल्यामुळें केलीच्या हाताखालीं ९५०० सैन्य जमलें होतें, व त्यानें तापूरच्या घाटानें शत्रूच्या मुलखांत शिरण्याचा घाट घातला होता. इतक्यांत केली मरण पावला. यामुळें या सैन्याचें आधिपत्य मॅक्सवेलकडे आलें. तेव्हां दोनही सैन्यें एकत्र करून नंतर पुढील योजना करावी असें मेडोजनें ठरविलें.

परंतु हा मेडोजचा बेत कळल्यामुळें असो किंवा स्वयंस्फूर्तीनें असो, मेडोज निघण्यापूर्वी टिपूनें आपल्या बहुतेक सैन्यासुद्धा भवानीच्या तीरावरून जी भरारी मारली ती थेट मॅक्सवेलच्या सैन्यापर्यंत! या भरारीची यत्किंचित वार्ता मेडोजला नव्हती. कारण टिपूनें थोडेसें सैन्य कुमाउद्दीनच्या हाताखालीं ब्रिटिशांच्या तोंडावर ठेवलें होतें. परंतु बरेच दिवसांत मॅक्सवेलची कांहींच बातमी न कळल्यामुळें मेडोजला फार चिंता लागून राहिली व त्याच्या मदतीस होईल तितक्या लौकर पोचण्याची त्याची धडपड चालली होती. अशा स्थितींत एके दिवशीं बारामहाल प्रांताच्या सरहद्दीवरील टेकडीवर मेडोजचा मुक्काम पडला असतां त्याला पांच सहा मैलांच्या अंतरावर तंबू राहुट्या व घोडेस्वार यांचा तळ पडला आहे असें दिसलें. त्याबरोबर त्यास आनंदाचें भरतें आलें! ज्या मॅक्सवेलच्या भेटीसाठीं आपण इतके दिवस काळजी करीत होतों त्याच्याच सैन्याजवळ आपण न कळत येऊन पोचलों असें वाटून त्याच्या अंतःकरणास समाधान झालें आणि त्या समाधानाच्या भरांत त्यानें मॅक्सवेलला आपली बातमी लौकर कळावी म्हणून तीन तोफांचे बार काढण्याचा हुकूम दिला. पण काय चमत्कार असेल तो असो. बार निघाल्यापासून पांच दहा मिनिटांत ते तंबू, राहुट्या किंवा घोडेस्वार यांपैकीं कांहीं एक दिसेनासें झालें! हा काय जादूचा प्रकार आहे म्हणून शोधासाठीं माणसें पाठविल्यावर मेडोजला सर्व गोष्टींचा उलगडा झाला. ज्या सैन्याच्या दर्शनानें मेडोजला आनंदाचें भरतें आलें तें सैन्य मॅक्सवेलचें नसून टिपूचें होतें! आणि एका बाजूस मॅक्सवेल व दुसऱ्या बाजूस मेडोज यांच्या कैचींत टिपू सैन्यासुद्धा या वेळीं अनायासें सांपडला होता. परंतु मेडो-

जला बार सोडण्याची दुर्बुद्धि आठवल्यामुळें टिपू सावध झाला आणि तो शत्रूच्या कैचींतून मोठ्या शिताफीनें निसटला. असो. शेवटीं नोव्हेंबरच्या १७ तारखेस पुल्मपट्टी येथें दोनही इंग्रजी सैन्यें एकदाचीं एकमेकांस भेटलीं.

मॅक्सवेल आणि मेडोज यांच्या सैन्याची गांठ पडल्यावर टिपूनें आपलें धोरण बदललें. समोर उभें राहून युद्ध करण्याऐवजी इंग्रजी मुलखांत लूट करीत राहिल्यास इंग्रजी सैन्य इकडेच गुंतून राहील व आपल्या घाटावरील मुलखास उपद्रव पोंचणार नाहीं असा त्याचा अंदाज होता. त्यास अनुसरून त्यानें दक्षिणेकडे तोंड वळविलें. मध्यंतरीं तापूरच्या खिंडींत ब्रिटिश सैन्याच्या आघाडीनें त्यास अडविण्याचा जोराचा प्रयत्न केला. परंतु टिपूच्या घोडदळानें विलक्षण चिकाटी धरल्यामुळें तो तेथून पुढें जाऊं शकला. यानंतर टिपूच्या राजधानीकडे जाण्याची कल्पना सोडून आपल्या प्रांताचें संरक्षण करण्याच्या कामीं आपलें शक्तिसर्वस्व खर्च केलें पाहिजे ही गोष्ट मेडोजच्या ध्यानांत आली; व तो टिपूचा पाठलाग करूं लागला.


हा पाठशिवणीचा डाव सरासरी महिनाभर चालला होता. टिपूनें एखादा गांव लुटावा, किल्यास वेढा द्यावा इतक्यांत मेडोज आपल्या पाठीवर आल्याची बातमी लागतांच त्यानें पुनः झुकांडी देऊन भलतीकडे जावें. याप्रमाणें लूट मिळवीत व जाळपोळ करीत तापूरच्या घाटापासून त्रिचनापल्लीपर्यंत आणि तेथून पुनः थिआगड, त्रिनोमाली, चितपट, वंदिवश या वाटेनें फुलचेरी (पांडेचरी) शेजारीं परमकोइल खेड्यापर्यंत त्यानें भराऱ्या मारल्या.

मेडोजनें त्रिनोमालीपर्यंत त्याचा पाठलाग केला आणि अशा रीतीनें धावपळ करण्यांत तादृश फायदा नाहीं असें पाहून तो आपल्या थकल्या भागलेल्या सैन्यास विसावा देण्यासाठीं आर्णीस आला. तेथें जखमी व आजारी लोक कर्नल मसग्रेव्हच्या ताब्यांत देऊन बाकीच्या सैन्यासुद्धा मद्रासपासून अठरा मैलांवर असलेल्या वेलाउट खेड्यांत त्यानें तळ दिला.

येथवर पूर्व व दक्षिण भागांतील सैन्याची कामगिरी सांगितली. आतां पश्चिमेकडे इंग्रजी सैन्यानें मिळविलेल्या विजयाचें स्वरूप सांगून हें प्रकरण आटोपूं. जनरल आबरक्रॉबी मुंबईहून सैन्य घेऊन तलचेरीबंदरांत उतरला. त्यानें व हार्टलीनें त्रावणकोरच्या रामराजास मदत देऊन काननूर, तुरुकाबाद, बारागड, कुटापूर वगैरे किल्ले काबीज केले. यामुळें बिलियापट्टणपासून त्रावणकोरपर्यंतचा सर्व मलबार प्रांत इंग्रजी सैन्याच्या ताब्यांत आला.

मेडोज वेलाऊट येथें डिसेंबरमध्यें परत आला तेव्हांच पहिली मोहीम आटोपली. या मोहिमेंत मेडोजनें ज्या चुका केल्या त्याबद्दलचें अपयश कोणाच्या माथ्यावर माराब-

याचें, त्या चुका होणें अपरिहार्य होतें किंवा कसें आणि यापुढें टिपूस चीत करण्यास कोणते उपाय योजिले पाहिजेत याबद्दल मद्रास व कलकत्ता येथें तर जोराची चर्चा व धुसफूस सुरू झालीच; परंतु त्यापेक्षां इंग्लंडांत पार्लमेंटमध्यें या युद्धाच्या युक्तायुक्तते-



गजरहट्टीची खिंड. या खिंडीच्या उत्तरेकडील प्रांतास 'वरघाट' व खालच्या प्रांतास 'पायाघाट' अशीं नांवें आहेत.

संबंधी कडाक्याचा वादविवाद झाला. तें विवेचन देण्यास येथें अवकाश नसल्यामुळें तें पुढील प्रकरणावर ढकलणें प्राप्त आहे.

भाग ५ वा.

कंपनीचा कारभार व पार्लमेंट.

हिंदुस्थानांत ईस्ट इंडिया कंपनीचा व्यवहार इ. स. १६०० पासून १८५८ पर्यंत म्हणजे सरासरी अडीचशें वर्षें चालला होता. प्रारंभीं सुरत, मच्छलीपट्टण, हुगळी वगैरे बंदरांत वखारी घालून व्यापार वाढवितां वाढवितां इंग्रजी कंपनीनें राज्यकारभारांत हात घातला. प्रथम हा हात व्यापार संभाळण्यासाठीं होता; परंतु आस्ते आस्ते व्यापारी स्वरूप जाऊन १८३२ च्या सुमारास ती पूर्णपणें राजकीय बनली. कंपनीच्या व्यवहारांत तिला फार फायदा होऊं लागल्यामुळें इंग्लंडांतील इतर लोक (व राजा देखील) मत्सरग्रस्त होऊन कंपनीचे अधिकार अनेक प्रकारच्या सबबीवर संकुचित करून आपलें घोडें पुढें दामटूं लागले. त्याचा परिणाम असा झाला कीं १८५८ सालीं कंपनीच्या हातून हिंदुस्थानचा कारभार अजीबात काढून इंग्लंडच्या राजानें तो सर्वस्वी आपल्याकडे घेतला.

कंपनीचा अधिकार संपुष्टांत येऊन राजाची सत्ता वाढत चालली तेव्हां हिंदुस्थानचा प्रश्न ब्रिटिश पार्लमेंटपुढें वारंवार येऊं लागला. कोणतें धोरण न्यायाचें, कोणतें अन्यायाचें, किंवा इंग्रजी राष्ट्राचा फायदा कशानें होईल आणि तोटा कशानें होईल याचा निर्णय करतांना पार्लमेंटमध्यें खडाजंगीचे वाद होत असत. हिंदुस्थानविषयक पार्लमेंटमधील हे वाद वाचतांना आपण एक गोष्ट नेहमीं लक्षांत ठेवली पाहिजे ती अशी कीं, त्यावरून कोणताही सिद्धांत बांधणें बरोबर नाहीं. पार्लमेंट या नांवावरून ही संस्था एका निश्चित धोरणानें वागणारी असावी असा सकृद्दर्शनी भास होतो. परंतु हा भास भ्रममूलक आहे. शास्त्रीय संशोधनासाठीं स्थापलेल्या संस्थांच्या चर्चेत बरेंच स्थैर्य असतें; पूर्वीच्या संशोधकानें जे शोध लावले असतील ते बहुतेक मान्य करून नवा संशोधक पुढें पाऊल टाकतो. परंतु पार्लमेंटची स्थिति तशी नाहीं. ती अतिशय चंचल स्वरूपाची आहे. तिच्यांतील व्यक्ति पांच सात वर्षांत बदलून नव्या येतात. यामुळें एका वेळीं हिंदुस्थानच्या परिस्थितीची माहिती असणारे पांच चार सभासद पार्लमेंटमध्यें असल्यामुळें लोकांच्या कानांवर आमच्या देशाचें नांव वारंवार पडत असे तर पुढच्याच वर्षी नवी

पार्लमेंट होऊन कंपनीतर्फे बोलणाऱ्या सभासदाखेरीज तेथें कोणीच माहितगार सभासद नाहीं अशी स्थिति हिंदुस्थानच्या वांट्यास येई. यास आळा घालण्याचा. प्रयत्न खुद्द इंग्लंडचा राजा कधीं कधीं करीत असे. कारण इंग्लंडांतील व्यवहारांत पार्लमेंटच्या मताचें प्राबल्य मान्य झालें असलें तरी अठराव्या शतकांत इंग्रजी राजांना साम्राज्यविषयक व्यवहारांत ढवळाढवळ करण्यास बराच वाव मिळत असे. सारांश कंपनीचे नोकर, पार्लमेंटमधील सभासद, इंग्रजी राजा व हिंदुस्थानांतील परिस्थिति हीं सर्वच त्या वेळीं अत्यंत चंचल स्वरूपाचीं असल्यामुळें कंपनीचा व्यवहार व पार्लमेंटमधील याविषयींचा वाद प्रत्येक खेपेस निराळ्या स्वरूपाचा होई.

येथें आम्हीं अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांतील हिंदुस्थानांतील परिस्थिति विचाराकरितां घेऊं. औरंगजेबाच्या कारकीर्दींत कंपनीनें मोठ्या मिनतवारीनें व्यापाराची परवानगी मिळविली होती; आणि त्या परवानगीचा फायदा घेऊन ठिकठिकाणीं कंपनीनें व्यापाराचा जम बसविण्यास सुरुवात केली. हा जम उत्तम प्रकारें बसवून आपला जास्तीत जास्त नफा करून घेण्याचा तिचा निश्चय झाला होता. या कामीं फ्रेंच लोकांशीं स्पर्धा करावी लागत असल्यामुळें व इंग्रजी राज्यकर्त्यांचें फ्रेंचांचा पाडाव करण्याविषयीं परंपरागत धोरण असल्यामुळें कंपनी व इंग्रजी प्रधानमंडळ यांचें सूत जमत असे. कारण कंपनीस एवढ्यापुरती राजकारणांत ढवळाढवळ करण्याची अवश्यकता भासे. युरोपमध्यें इंग्लंड व फ्रान्स यांत बेबनाव आला कीं हिंदुस्थानांत या राष्ट्रांच्या व्यापारी कंपन्या एकमेकांवर तुटून पडत; आणि एकमेकांचा पाडाव करण्यासाठीं हिंदुस्थानांतील देशी राजेरजवाड्यांचे दरबारीं आपलें बस्तान बसविण्यास पहात. या वेळीं हिंदुस्थानांतील राजे यादवी युद्धांत गर्क असल्यामुळें त्यांना युरोपियन यादवीशीं संगनमत करणें फायद्याचें वाटलें व अशा रीतीनें युरोपियन कंपन्या देशी राजकारणांत पडूं लागल्या.

परंतु पुष्कळ दिवसपर्यंत कंपनीच्या चालकांनीं केवळ व्यापारावर दृष्टि ठेऊन देशी-राजांच्या भानगडींत पडावयाचें नाहीं असा प्रामाणिकपणें प्रयत्न चालविला होता. याचें कारण कंपनीचे चालक शास्त्रज्ञ नव्हते हें होय. त्यांना वाटे कीं आपला व्यवहार राजकारणाच्या मदतीवांचून सुरळीत चालेल व राजकारण व व्यापार हे एकमेकांपासून अगदीं अलग ठेवणें शक्य आहे. पण त्यांची ही समजूत अगदीं चुकीची होती. व्यापारवर्धन असो, धर्मप्रसार असो, शास्त्रसंशोधन असो, किंवा देशोन्नति असो; कोणताही सामाजिक व्यवहार उत्तम रीतीनें पार पडावयाचा म्हटला कीं त्याला राज्ययंत्र आधीं या महत्वाकांक्षी व्यक्तींच्या किंवा व्यक्तिसमूहाच्या हातीं असावें लागतें. गुरु नानक,

महंमद, ख्रिस्त वगैरे धर्मसंस्थापकांचा हेतु प्रथम शुद्ध धार्मिक स्वरूपाचा होता. पण त्यांच्या शिकवणीचें पर्यवसान राजकारणांत झालें हा जगाचा अनुभव आहे. पारलौकिक हेतूनें वावरणाऱ्या संस्थांची जर ही स्थिति तर ऐहिक व्यवहार करूं इच्छिणाऱ्या कंपनीची गोष्ट कशी असेल याची कल्पना कोणासही निराळी सांगावयास नको. आकाशांतून पाणी पडलें कीं ज्याप्रमाणें तें समुद्रासच मिळावयाचें त्याप्रमाणें माणसाच्या डोक्यांत एखादी चांगली, मोठी, व्यावहारिक गोष्ट करावयाची बुद्धि उत्पन्न झाली कीं तिला कमीजास्त कालानें राज्ययंत्र स्वाधीन करून घेण्यावांचून गत्यंतर राहात नाहीं.



अर्काटचा नबाब महमद अली.

या न्यायास अनुसरून कंपनी देखिल न कळत राजकारणाच्या समुद्राकडे वाहूं लागली. तेव्हां कंपनीच्या चालकांना 'अरे आपण भलत्या दिशेनें चाललों' अशी ओरड करावीशी वारंवार हुकी येई. तथापि शेवटीं राजकारणांत पडल्यावांचून आपला जम बसणार नाहीं अशी त्यांची खात्री झाली. तरी हें पडणें देखील बेतावें, कामापुरतें, असावें व किनारा सोडून या राजकारणाच्या समुद्रांत आपण बेफाम पोहण्याची इच्छा धरूं नये अशी यानंतर त्यांची हाकाटी चालू झाली. याचाच अर्थ केवळ स्वसंरक्षणासाठीं कंपनीनें युद्धांत पडावें, या पलीकडे कोणाशीं कायमचा दोस्तीचा तह करूं नये असा होता. पण सृष्टिनियमाविरुद्ध कंपनी तरी कशी आणि किती दिवस वागणार? रोजच्या रोज पुढें पाऊल टाकलें पाहिजे असें म्हणणाऱ्या कर्णधाराच्या स्वाधीन तिनें न कळत आपली नौका केली आणि शेवटीं भर समुद्रांत आपला प्रवेश करून घेतला.

उदाहरणार्थ अर्काटचा नबाब महमदअली याच्याशीं कंपनीनें केलेला व्यवहार पाहूं. या नबाबाच्या दोस्तीखातर कंपनीनें हिंदुस्थानांत फ्रेंचांशीं युद्ध केलें व त्यास सिंहासनारूढ

करण्यासाठीं बराच पैसा व मनुष्यबळ खर्ची घातलें. आणि तें साधल्यावर कर्जाच्या वसूलासाठीं त्याच्या कारभारावर देखरेख ठेवण्याची व त्याच्या वसूलाच्या बाबी आपणाकडे लावून घेण्याची त्यांना खबरदारी घ्यावी लागली. ही व्यवस्था होत आहे तोंच युरोपांत फ्रेंच व इंग्रज यांचें युद्ध आटोपून तह झाला. या (१७६३ च्या फेब्रुवारी १० तारखेस) पारिस येथें झालेल्या तहांतील अकराव्या कलमांत हिंदुस्थानासंबंधीं मजकूर आहे. त्यांत युद्ध चालू असतां एकमेकांनीं घेतलेला मुलूख ज्याचा त्यास परत मिळावा असें ठरून ' महमदअली हा कर्नाटकचा नवाब व सलाबतजंग हा दक्षिणेचा सुभेदार आहे ' ही गोष्ट इंग्रजी व फ्रेंच राष्ट्रांनीं सही शिक्यानिशीं नमूद करून ठेवली. या कबूलींत बऱ्याच हास्यास्पद गोष्टी गर्भित आहेत. दक्षिणेचा सुभेदार व त्याच्याही हाताखालचा अर्काटचा नबाब कोण असावा हें ठरविण्याचा कायदेशीर अधिकार दिल्लीपतीचा होता. तेव्हां त्याबद्दल मत देण्याचें कारण इंग्लंड किंवा फ्रान्स यांस खरें पहातां कांहींच नव्हतें. तथापि नबाब किंवा सुभेदार याचा अर्थ माहित नसल्यामुळें मुत्सद्यांनीं हे शब्द वापरले असतील असें आपण गृहीत धरूं. पण निदान ज्या व्यक्तींचा हुद्दा आपण मान्य करतों त्या जिवंत आहेत किंवा नाहींत व असल्या तर अधिकारारूढ आहेत किंवा नाहींत हें तरी या लोकांनीं पहावयाचें होतें ! ज्या सलाबतजंगास या दोन राष्ट्रांनीं दक्षिणेचा सुभेदार म्हणून मान्य केलें होतें त्या सलाबतजंगास हा तह होण्यापूर्वींच निजाम अलीनें कैदेंत टाकलें होतें आणि लौकरच त्यास परलोकची वाट धरण्यास लावली ! पण नावांत काय आहे ? सलाबतजंगाच्या ऐवजीं त्यास मारून सुभेदार ही पदवी प्राप्त करून घेणारा इसम ' निजामअली ' समजावयाचा असा बचावाचा मुद्दा तहाचीं कलमें लिहिणाऱ्या मुत्सद्यांनीं कदाचित पुढें आणलीं असतीं ! तात्पर्य तत्कालीन युरोपियन मुत्सद्यांना हिंदुस्थानची माहिती अगदींच तुटपुंजी असे.

पारिसच्या तहांतील महमदअलीच्या संबंधाचें कलम देखील असेंच लटपटीत होतें. महमदअलीचा बहुतेक व्यवहार कंपनीच्या हातीं आला व त्याला साध्या गोष्टी करण्यास देखील स्वातंत्र्य राहिलें नव्हतें. अशा स्थितीत त्याला ' स्वतंत्र राजाप्रमाणें ' आपल्या बरोबरीचा मान देण्याची भाषा इंग्लंड व फ्रान्सच्या राजानीं वापरणें म्हणजे कांहीं तरी असंबद्ध बोलण्यासारखें होतें. पण या असंबद्ध भाषेपासून महंमदअलीच्या महत्त्वाकांक्षेस इतका ऊत आला कीं त्या भरांत कंपनीच्या मद्रासेकडील व्यवहारास अगदीं निराळी दिशा लागली. इतकेंच नव्हे; तर त्यामुळें कंपनीच्या जीवितावरच घाला पाडतो कीं काय अशी एक वेळ परिस्थिति उत्पन्न झाली होती. पण अखेरीस बेडकीनें जसें आपलें

अंग फुगवून नाश करून घेतला तोच प्रकार महमदअलीचा झाला. नव्या तहानें आपण इंग्लंडच्या राजाच्या बरोबरीचे बनलों असें कळतांच महमदअलीनें कंपनीच्या नोकरांचाच सूड घेण्याचा निश्चय केला ! कंपनीनें आपणास राज्यावर बसविलें तरी आपणास मुळींच स्वातंत्र्य नाहीं, आपण त्यांच्या हातांतील केवळ बाहुलें बनलों आहों ही गोष्ट त्याच्या मनांस वारंवार झोंबे. परंतु बिचारा करतो काय ? सर्वच नाड्या कंपनीनें दाबल्यामुळें राग यावा आणि तो मनांतल्या मनांत जिरावा असा प्रकार चालला होता. पण त्याच्या मनांत अद्याप थोडी महत्त्वाकांक्षेची ठिणगी राहिली होती. तिला पारिसच्या तहांतील कलमानें उज्वल रूप प्राप्त झालें आणि कंपनीच्या नोकरांतीलच कांहीं स्वार्थसाधू लोकांनीं तिच्यावर फुंकर घालण्याचें काम केलें. याच वेळीं कंपनीस मिळणाऱ्या फायद्याविषयीं इंग्लंडांतील बऱ्याच लोकांना व खुद्द राजाला देखील मत्सर वाटत असल्यामुळें महंमदअलीच्या प्रयत्नास बराच रंग चढत चालला. तो प्रकार असा. मॅकफरसन नांवाचा एक कंपनीचा कारकून हिंदुस्थानांत १७६७ मध्यें आला होता. हा गोड बोल्या व उलाढाली स्वभावाचा असल्यामुळें त्यानें नबाबसाहेबांची मर्जी संपादन केली. त्यानें रोजची बैठक देखील तिकडेच ठेवली आणि अखेरीस मॅकफरसन म्हणजे नबाबांच्या गळ्यांतील ताईत बनला. आपली गमावलेली सत्ता परत प्राप्त करून देण्यासाठीं व कंपनीच्या जाचांतून मुक्त करण्यासाठीं परमेश्वरानें या कर्त्या पुरुषाची आपणास जोड मिळवून दिली अशी त्याच्या मनाची खात्री होऊन त्यानें आपल्यातर्फे इंग्लंडच्या राजाकडे जाऊन सर्व परिस्थिति समजाऊन द्यावी अशी नबाबानें इच्छा प्रदर्शित केली; व तिला अनुसरून हा मॅकफर्सन पैशानें खिसा भरून घेऊन इंग्लंडांत गेला. तेथें अनेक लटपटी करून त्यानें इंग्लंडच्या प्रधानाची गांठ घेतली. कंपनीच्या नोकरांनीं नबाबास कसें शून्यवत बनविलें आहे, त्याच्यावर ते कसा जुलूम करतात आणि पॅरिसच्या तहाप्रमाणें त्यास स्वतंत्र राजाचा मान खरोखरच दिल्यास इंग्रजी राष्ट्राचा कसा फायदा होणार आहे वगैरे मुद्यांचें विवेचन मोठ्या रसभरित भाषेंत त्यानें मुख्य प्रधान—ड्यूक ऑफ ग्राफ्टन—याजवळ केलें. नबाब मोठा सच्चा माणूस आहे, सभ्य आहे, हिंदुस्थानांत इंग्रजांची घडी बसण्यास महंमदअलीच कारणीभूत आहे अशी प्रधानाची खात्री होत चालली असें दिसलें. इतक्यांत मॅकफरसननें आपल्या पिशवीचें तोंड खुलें करून थोडीशी नजर देऊं केली. ती नजर मुख्य प्रधानांनीं किंवा त्यांच्या चिटणीसांनीं घेतली नाहीं, पण ती देऊं केल्याबद्दल ते मॅकफरसनवर रागावलेहि नाहींत ! उलट ‘ आपल्याच राज्यांतील व्यापाऱ्यांनीं सर्व सत्ता बळकावल्यामुळें हिंदुस्थानांतील राजांना जुलूम सहन करावा लागतो ’ याबद्दल प्रधानसाहेबांनीं गहि-

वरून खेद प्रदर्शित केला आणि महंमदअलीच्या वतीनें प्रधान या नात्यानें मला जितकें वजन खर्च करतां येईल तितकें करीन असें त्यांनीं अभिवचन दिलें. आणि मॅकफरसनच्या या कामगिरीबद्दल बक्षीस म्हणून त्याची नेमणूक कंपनींत करवून त्यास हिंदुस्थानांत रवाना केलें. अर्थात महंमदअलीच्या दरबारीं इंग्लंडच्या राजाचा वकील रवाना करण्याचें याच वेळीं गुप्तपणें ठरल्यामुळें मॅकफरसन यशस्वी होऊन परत हिंदुस्थानांत गेला असें समजण्यास हरकत नव्हती. मात्र या सर्व कारभाराची ओळख कंपनीस मुळींच नसून तो अगदीं गुपचुप अंधारांत चालला होता.

कंपनी व इंग्लंडांतील मुत्सद्दी यांचें आपसांत वैमनस्य या थरावर जाण्याचें कारण या वेळीं कंपनीस मिळणाऱ्या ' लठ्ठ ' नफ्याकडे सर्वांची मत्सरपूर्ण दृष्टि लागली होती हें होय. बंगालची ' दिवाणी ' कंपनीस मिळाल्यामुळें दरसाल एक कोटी रुपयांचें उत्पन्न होईल व त्या मानानें कंपनीच्या शेअरवर बेसुमार व्याज मिळूं लागेल अशा कल्पनेवर शेअरचा भाव फारच वाढला होता. खुद्द क्लाइव्हनें आपल्या पराक्रमाचें वर्णन करतांना या नफ्याचें सुंदर चित्र रेखाटून भलत्या महत्वाकांक्षा उत्पन्न केल्या. यामुळें युद्धाच्या खर्चानें बेजार झालेल्या इंग्लंडांतील लोकांच्या डोक्यावरचें ओझें कमी करण्यास या पैशाचा उपयोग कां होऊं नये असा प्रश्न तेथील मुत्सद्दी करूं लागले होते. व्यापार करण्यास कंपनीस आम्ही सनद दिली पण कंपनीनें नवीन धोरण स्वीकारून पैसा मिळविला आहे तर त्या पैशाचा वांटा मागण्याचा हक्क राजास पोंचतो असें मुत्सद्दी म्हणूं लागले. अर्थात हा तर्कवाद कंपनीस मान्य नव्हता. तिच्या पक्षपात्यांनीं पार्लमेंटमध्यें हा वाद निघाला तेव्हां कसून विरोध केला. परंतु प्रधानमंडळानें बहुमताच्या जोरावर ठराव पास करून घेतला.

इतक्या थरावर गोष्टी आल्या तेव्हां कंपनीचे डोळे उघडले. तिनें तडजोड करण्यास संमति दिली. दरसाल कंपनीनें साठ लाख रुपये सरकारी खजिन्यांत भरावे आणि १२ टक्यांवर नफा घेऊं नये वगैरे अर्थाचा ठराव पार्लमेंटमध्यें पास होऊं दिला; आणि हिंदुस्थानांतील परिस्थितीचें सूक्ष्म परीक्षण करण्यासाठीं सुपरवाइझर पाठविण्याचें ठरविलें.

पण इतक्या सवलती मिळाल्या तरी मुत्सद्यांचें समाधान होण्याऐवजीं त्यांच्या लोभाच्या ज्वाळा भडकण्यास मात्र ही तडजोड कारण झाली. उघडपणें इतकें बोट शिरल्यावर कंपनीच्या कारभारांत सबंध हात घालण्याचा त्यांनीं निश्चय केला. कंपनीनें कांहीं जहाजें सरकारकडे मागितलीं होतीं. तीं पाठवितांना त्यांवरील अधिकाऱ्यास

इंग्लंडच्या राजाचा वकील म्हणून हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांबरोबर वागण्याचा अधिकार देण्यांत येणार आहे असें प्रधानमंडळानें ठरविलें. कंपनीनें याबद्दल फार गिल्ला केला. तेव्हां प्रधानानें माघार घेतल्यासारखें दाखविलें, पण हा हस्तिदंती प्रकार होता; कारण त्यानें त्याच्या खिशांत मुकाट्यानें वकिलातीचें अधिकारपत्र देऊन ठेवण्यास कमी केलें नाहीं.

कंपनीचे अधिकार संपुष्टांत आणून त्यांजवर इंग्लंडच्या राजाचें म्हणजे पर्यायानें प्रधानमंडळाचें वर्चस्व स्थापित करण्यासाठीं मुख्य प्रधान वर सांगितल्याप्रमाणें शुद्ध लबाडी व फसवेगिरी यांचा आश्रय करीत होता. तथापि त्याला बहुमताचा पाठिंबा असल्यामुळें अखेरीस त्याचाच जय झाला व कंपनीस हार खावी लागली. सर जान लिंडसे कंपनीच्या मदतीसाठीं निघाला पण मद्रासेस पोंचतांच त्यानें आपलें खरें स्वरूप प्रगट केलें. ' जार्ज राजांनीं मला अर्काटच्या नबाबसाहेबांच्या दरबारीं स्वतंत्रपणें वकील म्हणून राहण्यासाठीं अधिकारपत्र देऊन रवाना केलें आहे. याशिवाय देशी राजांशीं तहरह करण्याचें व कंपनीनें नुकतींच जीं युद्धें केलीं तीं न्यायाचीं होतीं किंवा नाहीं हें ठरविण्याचेंहि काम मजकडे राजेसाहेबांनीं सोंपविलें आहे. तेव्हां कंपनीच्या दप्तरीं जे राजकारणाचे कागदपत्र असतील ते मला पाहण्यास मिळाले पाहिजेत ' असें म्हणून लिंडसे आपला अधिकार गाजविण्याचा प्रयत्न करूं लागला. पण ' ज्या गांवच्या बोरी त्याच गांवच्या बाभळी ' या न्यायानें कंपनीचे लोक लिंडसेच्याच देशांतून आलेले. ते कसचे त्याला दाद देतात ? त्यांनीं त्याला साफ सांगितलें कीं तुम्ही सांगतां अशा प्रकारें वागून तुमचें सासूबाईपण मान्य करण्यास व स्वतःची मानहानी करून घेण्यास आम्हीं मुळींच तयार नाहीं.

लिंडसेच्या तोंडावर असा रोखठोक जबाब देऊन कंपनीच्या लोकांनीं सर्व हकीकतीचें पत्र इंग्लंडांतील डायरेक्टरांकडे धाडलें. हें पत्र १७७१ च्या मार्च २२ तारखेस डायरेक्टरांना मिळालें तेव्हां त्यांच्या डोक्यांत चक्क प्रकाश पडला. लिंडसे यास वकिलातीचे अधिकार द्यावयाचे नाहींत असें अभिवचन देऊन त्याच दिवशीं मुख्य प्रधानानें बरोबर त्याच्या उलट वर्तन करावें ही अजब गोष्ट आहे अशी डायरेक्टरांनीं राजाच्या चिटणिसांकडे तक्रार केली; आणि अशा भानगडी सुरू होतील तर कंपनीचें बस्तान बिनसून जाईल असेंही कळविलें. तेव्हां चिटणीससाहेबांनीं (लॉर्ड रॉचफोर्ड) बुरखा बाजूस सारून कंपनीस कळविलें कीं " हिंदुस्थानांत तुम्ही पाठविलेल्या नोकरांनीं वारंवार अव्यवस्था माजवून सोडल्यामुळें त्यांच्या बंदोबस्तासाठीं पार्लमेंटला नवे नवे दडपशाहीचे

कायदे करावे लागले. यामुळें हिंदुस्थानांत आपल्या विश्वासांतला मनुष्य पाठवून खाती-लायक माहिती मिळविण्याची अवश्यकता राजेसाहेबांना भासली. त्यांतल्या त्यांत पॅरिसच्या तहांतील कलमामध्यें हिंदुस्थानविषयक मजकूर आल्यामुळें आपल्या नांवानें व्यवहार करणाऱ्या कंपनीची व्यवस्था कशी चालली आहे हें समजून घेणें इंग्लंडच्या इभ्रतीच्या दृष्टीनेंही महत्वाचें आहे असें राजेसाहेबांस वाटत आहे. या प्रकर्णीं कंपनीचें अनहित घडून यावें अशी आमची इच्छा नाहीं. लिंडसे यांना सध्यां वकिलातीच्या कामावरून दूर करून सर रॉबर्ट हार्लंड याची आम्हीं नेमणूक करतों. आणि कंपनीच्या नोकरांचा व नबाबांचा एकोपा राखण्यासाठीं नेहमीं झटा अशी वकिलास आम्हीं सक्त ताकीद देतों. " कंपनीच्या कारभारांत अशा रीतीनें शुद्ध फसवेगिरीच्या जोरावर हात शिरकाऊन इंग्लंडच्या प्रधानमंडळानें अधिकाधिक सत्ता मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला. हा प्रयत्न करीत असतां त्यांनीं आपण हें सर्व न्यायासाठीं व राष्ट्राच्या इभ्रतीसाठीं करीत आहों अशा अर्थाची भाषा वापरली; पण त्याचा मूळ हेतु लोभमूलक व स्वार्थसाधूपणाचा होता हें कंपनीस कळत होतें. पण आपले लोक अप्रामाणिकपणाचें वर्तन करतात असें त्यांनीं अनेक वेळां पार्लमेंटमध्यें आपणहून कबूल केलेलें; तेव्हां आतां राजानें चौकशी करूं नये असें कंपनीनें तरी कोणत्या तोंडानें बोलावें ? अर्थात त्यांना पड घेऊन प्रधान-मंडळास आपल्या नफ्याचे भागीदार होण्यास हरकत नाहीं अशी कबूली द्यावी लागली.

पण त्यांनीं कबूली दिली तरी हिंदुस्थानांतील कंपनीच्या नोकरांनीं ती कशी पाळावी हा एक बिकट प्रश्न होता. कंपनीनें आपल्या व्यापाराच्या सोईकडे लक्ष देऊन कांहीं एक धोरण ठरविलें होतें. त्या धोरणाशीं विसंगत असा इंग्लंडच्या राजेसाहेबांच्या वकिलांनीं हुकूम दिला तर तो पाळावयाचा किंवा नाहीं असा गूढ प्रश्न त्यांच्यापुढें वरचेवर येऊं लागला. मालकाची आज्ञा श्रेष्ठ कीं राजाची श्रेष्ठ असा नीतिविषयक प्रश्न सोडवितांना त्यांची मति कुंठित झाली, व त्याबरोबर त्यांचे हात लुले पडून कांहीं दिवस त्यांच्या व्यवहारांत सांवळागोंधळ माजून राहिला.

या गोंधळाचें स्वरूप समजण्यासाठीं आपण हिंदुस्थानांतील परिस्थितीकडे पाहूं. पानिपत येथें मराठ्यांचा पराभव झाला तरी थोरल्या माधवरावांच्या कर्तबगारीमुळें मराठ्यांचा दरारा सर्वत्र प्रस्थापित होऊन श्रीरंगपट्टणापासून दिल्लीपर्यंत मराठ्यांची सत्ता परत प्रस्थापित होणार असा रंग दिसूं लागला होता. हा लोंढा आपल्या अंगावर आद-ळेल तर त्यास अडविण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं नसल्यामुळें कंपनीच्या व्यवहारास

जबर धक्का पोंचेल असें समजून कंपनीनें एक धोरण निश्चित केलें होतें. तें असें कीं, बंगाल व मद्रासकडील कंपनीच्या ताब्यांतील मुलखावर साक्षात मराठ्यांची धडकी न पोंचावी म्हणून ठिकठिकाणीं धक्केखाऊ संस्थानें उत्पन्न करावयाचीं म्हणजे बंगालचा सुभेदार, रोहिले, निजाम, हैदर वगैरे लोकांनीं मराठ्यांचा आघात सहन करावा आणि अप्रत्यक्षपणें कां होईना पण यांना सहाय पोंचविण्यास कंपनीनें तयार असावें. या बाबतींत कंपनीनें आपलें धोरण हिंदुस्थानांतील नोकरांना कळविण्यासाठीं १७६९ च्या जून ३० तारखेस जो महत्वाचा खलिता रवाना केला त्याच्या तिसऱ्या व चौथ्या प्याऱ्यांत याबद्दल स्पष्ट उल्लेख आहे. पुढें बरींच वर्षेंपर्यंत कंपनीच्या व्यवहाराची योग्यायोग्यता ठरवितांना या प्यारिग्राफांतील मजकुराची कसोटी लावण्यांत येत असे. यामुळें ते दोनही आम्ही येथें देतों.

प्यारा नंबर तीन—हिंदुस्थानच्या राजकारणांत आम्हांस स्वतंत्रपणें भाग घ्यावा लागल्यापासून आणि विशेषतः गेल्या दोन तीन वर्षांत आम्हीं वारंवार अनेक पत्रांतून आमचें मत कळविलेंच आहे. तें असें कीं, हिंदुस्थानांतील जे राजेरजवाडे अद्याप मराठ्यांच्या ताब्यांत गेले नसतील आणि त्यांच्याशीं झगडण्याचें सामर्थ्य ज्या राजांच्या अंगीं असेल त्या राजांकडे आमचा कल ठेवणें हें कंपनीच्याच हिताचें व एकंदरींत शहाणपणाचें धोरण आहे; कारण ते मराठ्यांशीं झगडत राहतील तोंवर कंपनीच्या राज्यास अपाय होण्याची भीति नाहीं,

प्यारा नंबर चार—रोहिले, जाट, दक्षिणेचा नबाब, म्हैसूरचा राजा, औंधचा नबाब यानीं आळीपाळीनें मराठ्यांशीं झगडण्याचें काम चालू ठेवलें आहे; आणि त्यानीं तसेंच तें यापुढें चालवावें अशी आमची इच्छा आहे. या कारणामुळें **हैदराशीं कंपनीचें युद्ध चालू राहिलेलें पाहून** आणि सुजाउद्दवला व निजामअली यांच्याशीं खटका उडण्याचा संभव दिसत असल्यामुळें **आम्हांस** (कंपनीच्या डायरेक्टरास) **मोठी काळजी लागून राहिली आहे.** या युद्धापासून आमचा फायदा कोणताच न होतां तोटा मात्र बेसुमार आहे. कारण आमच्या सेनापतीनीं शत्रूंचा पुरापुरा पराभव केला आणि ते दातीं तृण धरून शरण आले अशी कल्पना केली तरी **युद्धापूर्वीं ते ज्या स्थितींत होते त्याच स्थितींत (म्हणजे मराठ्यांशीं व आपापसांत युद्धें करण्यास समर्थ होतील अशा सुस्थितींत) त्यांना परत प्रस्थापित करणें आम्हांस भाग पडेल.**

याचा तात्पर्यार्थ असा कीं, कंपनीचा खरा शत्रु हैदर नव्हे, निजाम नव्हे किंवा दुसरा कोणी नव्हे तर तो पेशवा आहे अशी खूणगांठ कंपनीच्या चालकांनीं बांधून ठेवली होती. हैदरास देखील ही गोष्ट मान्य होती. इंग्रज व हैदर यांनीं आपसांत युद्ध केल्यास त्याचा फायदा घेऊन मराठे दोघांचेंही उच्चाटण करतील हें जाणून हैदरानें १७६९ मध्यें कंपनीशीं दोस्तीचा तह केला होता. या तहाच्या जोरावर (मराठ्यांची स्वारी त्याच्या राज्यावर होई तेव्हां) हैदर इंग्रजाकडे मदत मागत असे. ही मदत देणें कंपनीच्या डायरेक्टरांना (वर सांगितल्याप्रमाणें) व हिंदुस्थानांतील त्यांच्या नोकरशाहीला पूर्णपणें संमत होतें. पण अर्काटचा नबाब महंमदअल्ली यास ही गोष्ट पसंत नव्हती. तो हैदराचा कट्टा शत्रु होता; हरप्रयत्न करून कंपनीची मदत हैदरास पोंचूं देणार नाहीं असा त्यानें निश्चय केला. आणि या निश्चयास त्याच्या दरबारीं असलेल्या इंग्रजी राजाच्या वकीलानें (सर रावर्ट हालँडनें) दुजोरा दिला. कंपनीचे चालक महंमदअल्लीचे कारभारी या नात्यानें वागत व आजपर्यंत नांव नबाबाचें लिहून आपणास योग्य दिसेल तसें वागण्याची संवय कंपनीस लागली होती. पण आतां नबाबसाहेब स्वतंत्र बनले होते, त्यांना हैदराशीं संगनमत करून मराठ्यांचें वैर संपादन करणें पसंत पडेना ! हें नबाबी धोरण कंपनीस कळवितांना हालँड लिहितो " कंपनीनें मुकाट्यानें नबाबांच्या धोरणास संमती दाखवून मराठ्यांचा स्नेह संपादन करावा. नाहीं तर ते कर्नाटक प्रांतांत जाळपोळ व लुटालूट करून तो उध्वस्त करून टाकतील; कारण त्यांनीं मोठें सैन्य कर्नाटकाच्या हद्दीवर जय्यत टेवलें आहे. सारांश आपल्या राज्याच्या संरक्षणार्थ नबाबसाहेबांना जी गोष्ट करणें अवश्यक दिसत आहे आणि जी कंपनीच्याही हिताची आहे ती तुम्ही कां करीत नाहीं याचीं कारणें मजकडे लेखी पाठवून द्यावीं. "

कंपनीच्या कौन्सिलानें या वकीलास चांगलें झणझणीत उत्तर पाठविलें. आम्हांस जाब विचारण्याचा अधिकार फक्त पार्लमेंटलाच आहे, तुम्हास राजाकडून सनद मिळाली आहे तशी कंपनीस देखील मिळाली आहे; मराठे कर्नाटक उध्वस्त करण्याची दहशत घालीत आहेत अशा वेळीं आपण पड घेतल्यास कंपनीची अब्रू राहणार नाहीं, ठोशास ठोसाच मारला पाहिजे; मराठे आमचे स्नेही बनण्यास तयार नाहींत तर ते आम्हांस गुलामाप्रमाणें वागवूं पहात आहेत; हैदराशीं आमचा दोस्तीचा तह झाला असून त्यानें आम्हास आपल्या राज्यांत व्यापारास परवानगी दिली आहे वगैरे मुद्दे या पत्रांत होते.

पण हट्टास पेटलेल्या हालँडचें समाधान अशा कोट्यांनीं कसें होणार ? त्यानें उलट

कंपनीच्या लोकांवर इंग्लंडच्या राजाच्या अधिकाराची बेअदबी केल्याचा आरोप ठेवला व प्रजेचे हक्क आहेत तसे राजाचेही इंग्लंडांत हक्क आहेत अशी आठवण दिली.

या बाचाबाचीचा परिणाम असा झाला कीं, हैदरास कंपनीच्या हातून मदत पोंचली नाहीं. इतकेंच नव्हे तर हार्लंडनें मराठ्यांशीं स्वतंत्र रीतीनें बोलणें सुरू करून युद्ध तहकुबी मागितली; आणि 'मराठे, इंग्लंडचे राजेसाहेब व अर्काटचे नबाबसाहेब यांच्या दोस्तीचा तह करण्यासाठी ही तहकुबी आपण इंग्लंडच्या राजाचे वकील या नात्यानें आपण मागत आहों' असेंही त्यानें कळविलें. तेव्हां मराठ्यांनीं आपलें सैन्य तात्पुरतें माघारीं नेलें.

ही दांडगाई पाहून कंपनीची नोकरशाही संतापून गेली. यापुढें भीड धरली असतां आपल्या सत्तेस धोका येईल असें तिला दिसलें. वाटेल तें करून हार्लंडची उचलबांगडी करण्याचा तिनें निश्चय केला. तेव्हां यापुढें आपला टिकाव लागणार नाहीं असें समजून हार्लंडनें एक दिवस जहाजांत बसून कोणास न कळवितां हिंदुस्थानांतून पाय काढला. अर्थात महंमदअल्ली ज्याच्या जोरावर उड्या मारीतहोता तो आधार तुटल्यामुळें तो तोंडघशीं पडला व त्याला पुनः कंपनीच्या ओंजळीनें पाणी पिण्यावांचून गत्यंतर राहिलें नाहीं.

मराठ्यांच्या विरुद्ध हैदरास मदत करतां न आली तरी कंपनी लहानसहान शिकार साधण्याच्या कामीं महंमदअल्लीस मदत करण्यास नेहमीं तयार असे. उदाहरणार्थ तंजावरच्या राजावर महंमदअल्लीचा राग होता. पण तो कंपनीच्या तंत्रानें वागत असे तोंवर त्याच्यावर महंमदअल्लीस हात टाकतां आला नाहीं. पण कंपनीचें व तंजावरच्या राजाचें कांहीं कारणानें वितुष्ट आल्यावेळीं महंमदअल्लीची कड घेऊन कंपनीनें आपलें सैन्य एकदम जनरल स्मिथच्या हाताखालीं देऊन तंजावरच्या राज्यांत रवाना केलें. या सैन्यानें खुद्द तंजावरपासून सात आठ मैलांवर असलेल्या वेलमच्या किल्यास वेढा दिला; व तो सहज ताब्यांत आला असता. इतक्यांत महंमदअल्लीनें कंपनीस न विचारतां परस्पर तंजावरच्या राजाशीं तह ठरविला आणि कंपनीस युद्ध बंद ठेवण्याचा हुकूम सोडला. तथापि या तहांतील अटीप्रमाणें महंमदअल्ली वागेल अशा बद्दलची जबाबदारी कंपनीनें आपल्या अंगावर घेतली यामुळें तंजावरच्या राजास कांहींसें समाधान वाटलें. यानंतर वर्ष दोन वर्षे गेलीं नाहींत तोंच महंमदअल्लीनें तंजावरचें राज्य खालसा करण्याचा घाट घातला. तेव्हां तंजावरच्या राजानें कंपनीकडे धांव घेतली व 'गेल्या तहांतील अटीप्रमाणें माझें संरक्षण करण्याची जबाबदारी कंपनीवर आहे; मी करारांतील

एकहि कलम मोडलें नाहीं ' अशी त्यानें आठवण दिली. कंपनीचें कौन्सिल भरलें तेव्हां देखील त्यांनीं तंजावरच्या तुळजाजीचा पक्ष न्यायाचा आहे असेंच ठरविलें. पण नबाबानें या स्वारीसाठीं लागेल तो खर्च देऊन वर ३५ लाख रुपये कंपनीस देऊं केले होते. तेव्हां त्याकडे दृष्टि देऊन कंपनीनें दाहा हजार फौजेनिशीं तंजावरास जाऊन तुळजाजीस पदच्युत केलें. आणि ' तुळजाजी कोणत्याही भानगडी करीत नसला तरी त्याचा ओढा मराठ्यांकडे आहे व पुढेंमागें युद्ध उपस्थित झाल्यास तो कंपनीविरुद्ध उठाव करील असा संभव दिसतो. याकरितां सध्यां फुरसत आहे तोंवर हें काम उरकून घेणें योग्य आहे ' असें आपल्या कृत्याचें समर्थन डायरेक्टरांकडे धाडलें. डायरेक्टरानीं या प्रकरणाचा ताबडतोब निकाल द्यावयास पाहिजे होता. पण काय कारण असेल तें असो त्यानीं वर्ष दीड वर्ष तिकडे लक्ष दिलें नाहीं.

पण इंग्रजी मुत्सद्दी कंपनीच्या कारभारांत ढवळाढवळ करण्याची संधीच पाहात होते. त्यांनीं १७७३ मध्यें नवीन एक ' कायदा ' करून ' रेग्युलेटिंग ॲक्ट ' असें त्यास नांव दिलें; व कंपनीकडे अनेक राजकारणी कागदपत्राची ते मागणी करूं लागले. तेव्हां हें प्रकरण चव्हाट्यावर आलें तर आपली फजीती होईल ही गोष्ट डायरेक्टरांच्या ध्यानांत आली. व त्यानीं एकदम मद्रास कौन्सिलचा निकाल बदलून राजास गादीवर बसविण्याचा पुनः हुकूम दिला.

अशा रीतीनें कंपनीच्या कारभारांत पूर्वी जिकडून लाग साधेल तिकडून साधावयाचें असें जें साधें धोरण होतें त्यास रेग्युलेटिंग ॲक्टानें काहीं निर्बंध उत्पन्न झाले. या निर्बंधांचा मूळ हेतु एवढाच होता कीं, कंपनीच्या जबर फायद्याचा काहीं वांटा इंग्लंडांतील सामान्य लोकांस मिळावा. तेव्हां या दृष्टीनें कंपनीचा व्यवहार बरोबर चालला आहे किंवा नाहीं याची तपासणी करण्यासाठीं जे ठोकळ आडाखे बसविण्यांत आले त्यालाच कंपनीचें धोरण म्हणतां येईल. या धोरणाची चर्चा पार्लमेंटमध्यें कधीं कधीं निघत असे; व त्या वेळीं कित्येक वक्ते स्वभावानुसार नीति, परोपकार, स्वातंत्र्यबुद्धि वगैरे जाडे शब्द योजून स्वपक्ष समर्थनाचा प्रयत्न करीत. पण इंग्लंडांतील प्रधानमंडळ व कंपनीचे डायरेक्टर अशा वक्त्यांच्या शब्दांकडे फारसें लक्ष न देतां ' तत्वमसि ' कशानें साधेल एवढेंच पहात असत.

उदाहरणार्थ कंपनीनें टिपूविरुद्ध जी मोहीम चालू केली होती तिजसंबंधानें पार्लमेंटमध्यें जो वाद झाला त्याचें स्वरूप पाहूं. या मोहिमेस १७९० जूनमध्यें प्रारंभ झाला;

आणि पार्लमेंटमधील वाद यानंतर सहा महिन्यांनीं निघाला. यामुळें आतां युद्धकरणें न्यायाचें आहे किंवा नाहीं याचा निर्णय करणें म्हणजे केवळ शब्दच्छल करण्यासारखें होतें. यामुळें वादांत लक्ष घालण्यांस सभासद फारसे तयार नव्हते. पण कित्येक सभासदांना वाक्पाडित्य करण्याचा व आपण नीतीचे चहाते आहों, असें जगास दाखविण्याची हौस असते. त्यांना आपण करतों यापासून फलनिष्पति होणार किंवा नाहीं याची फिकीरच वाटत नाहीं. उशीरानें कां होईना पण आम्हीं अन्यायाचा निषेध केला ना? मग आमचें कर्तव्य आम्ही केलें. त्याचा उपयोग न झाला तर आम्हीं त्यास काय करावें? असें त्यांचें म्हणणें असे. हें वेदान्ती उत्तर त्यांच्या दृष्टीनें ठीक असे पण व्यावहारिक दृष्ट्या अशा गृहस्थांच्या वक्तृत्वाचा परिणाम पार्लमेंटमध्यें मुळींच होत नसे हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे.

अशा एका वेदान्ती गृहस्थानें १७९० साली दिसेंबरच्या २२ तारखेस टिपूविरुद्ध इंग्रजांनीं हिंदुस्थानांत जें युद्ध सुरू केलें होतें त्याची योग्यायोग्यता ठरविण्यासांठीं एतद्विषयक पत्रव्यवहार पार्लमेंटपुढें सादर करण्यांत यावा अशी मागणी केली. "त्रावणकोरच्या राजानें जे किल्ले डचांपासून विकत घेतलें ते टिपूच्या मांडलिकाच्या राज्यांतले असल्यामुळें टिपूच्या संमतीवांचून हें विक्रीपत्र कायदेशीर होत नाहीं. अर्थात त्रावणकोरचा पक्ष उचलून इंग्रजांनीं युद्धांत पडणें न्यायाचें होणार नाहीं असा हिपर्सलीच्या बोलण्याचा मुख्य मुद्दा होता. यानंतर त्यानें या प्रकरणाची सर्व हकीकत सांगून न्यायाचा प्रश्न क्षणभर बाजूस ठेवला तरी शहाणपणाच्या व धोरणाच्या दृष्टीनें यावेळचें कंपनीचें धोरण कसें चुकत आहे हें दाखविण्याकरितां तो म्हणाला, " या युद्धांत मराठे व निजाम आमचे दोस्त म्हणून सहाय्यास यावयाचे आहेत. माझ्यामतें यांच्यावर विश्वास ठेवणें मुळींच योग्य नाहीं. मराठ्यांची लबाडी सर्वांना माहीतच आहे; आणि १७८० सालीं हिंदुस्थानांतून ब्रिटिशांची सत्ता अजीबात उखडून टाकण्यासाठीं जो हिंदी राजवाड्यांचा संघ तयार झाला होता त्याचें धुरीणत्व निजामाकडे होतें हें आपणांस कसें विसरतां येईल? सामर्थ्याच्या दृष्टीनें देखील टिपूशीं युद्ध करण्यापूर्वीं चांगला विचार केला पाहिजे. त्याच्याजवळ दीड लाख देशीं सैन्य व यूरोपियनांनीं तयार केलेली तुकडी व मोठा तोफखाना असून ५ कोटींचें उत्पन्न व ८।९ कोटींची शिल्लक त्याच्या हातांत आहे. उलट आमचा खजीना रिता असून आमची पतहि उडाली आहे " या सूचनेस दुजोरा देतांना **फ्रान्सिस** म्हणाला—हिंदुस्थानांत आमचें राज्य वाढविणें आणि देशी संस्थानिकांशीं

दोस्तीचे तह करणें मूर्खपणाचें आहे. टिपू व निजाम यांत असलेला मत्सरभाव आम्हीं वाढवावा ही गोष्ट खरी पण मराठ्यांची सत्ता वाढल्यास आपलें फार नुकसान होणार आहे. याकरितां टिपूची सत्ता उलथून टाकणें आमच्या हातांत असले, तरी आम्हीं तसें करणें शहाणपणाचें नव्हें. कारण त्या योगानें मराठ्यांची सत्ता अधिक होऊन ती आमच्या हितास विघातक होईल.

यास उत्तर देतांना कंपनीचा चालक डंडास म्हणाला—टिपू मोठा उपद्व्यापी आहे. इंग्रजाकडे तो नेहमी मत्सरपूर्ण दृष्टीनें पाहतो. त्रावणकोरच्या राजाचें विक्रीपत्र हा दिखाऊ सबब असून त्याच्या सैन्यानें यापूर्वी अनेक वेळां त्रावणकोरच्या सरहद्दीवर हल्ला करण्याची तयारी केली होती. शेजाऱ्यांचीं राज्यें काबीज करण्यासाठीं त्याची एकसारखी धडपड चाललेली असते. तथापि त्याच्या जवळचें सैन्य कितीही मोठें असलें व त्याची संपत्ति कितीही अपरंपार असली तरी आम्हीं त्याबद्दल भिण्याचें कारण नाहीं. कारण यावेळीं कंपनीजवळ जें सैन्य आहे त्या तोडीचें सैन्य हिंदुस्थानांत कधींच रणांगणांत आलें नसेल. आणि ही वेळ अशी आहे कीं सध्यां फ्रेंच, डच वगैरे यूरोपीयन राष्ट्राशीं किंवा मराठे, निजाम वगैरे हिंदी राष्ट्रांशीं आम्हांस झगडण्याचें कारण नसून फक्त एकाच शत्रूबरोबर युद्ध करावयाचें आहे.

फॉक्सनें यानंतर हिपर्सलीच्या सूचनेस दुजोरा देतांना सांगितलें कीं ' हिंदुस्थानांत असो किंवा यूरोपांत असो दुसऱ्यास जिंकून त्याचें राज्य घेण्याचें धोरण इंग्लंडनें केव्हांही स्वीकारूं नये असें मला वाटतें.

यानंतर या प्रकरणाचे कागद पार्लमेंटला सादर करण्यांत यावे ही सूचना पास होऊन कागद वाचण्यास मिळाले. नंतर फेब्रुवारीच्या २८ तारखेस पुनः हिपर्सलीनें अनेक आधार देऊन ' मराठ्यांवर विश्वास ठेऊं नये. कारण ते भयंकर लोक आहेत. तेव्हां हें लक्षांत ठेऊन म्हैसूरच्या सुलतानाचा स्नेह संपादन करणें हेंच धोरण आपणांस हितावह होईल ' असा ठराव पार्लमेंटपुढें आणला. तेव्हां पुनः पूर्वीच्याच मुद्यावर वाद माजून तेच ते आक्षेप पुढें आले. ' मंगळूरच्या तहाच्या वेळीं त्रावणकोरच्या राजाच्या ताब्यांत जो मुलूख होता त्यांत टिपूनें हात घातला असता तर त्याच्या मदतीस कंपनीनें जाणें अवश्यक होतें; परंतु मागाहून टिपू नको म्हणत असतां नवे किल्ले ताब्यांत घेऊन त्याची ब्याद ओढून घेणाऱ्याच्या सहायास जाणें हें कंपनीचें कर्तव्य नव्हे ' या विरुद्धपक्षाच्या

मुद्यास समर्पक उत्तर डंडासला देतां आलें नाहीं. पण इंग्रजांचा हिंदुस्थानांतील खरा शत्रु टिपू नसून मराठे आहेत हें तत्त्व मात्र त्यानें साफ नाकारलें. उलट ' मराठ्यांशीं दोस्ती करण्यास कोणतीच हरकत नाहीं; टिपू मात्र आमच्यावर केव्हां गदा आणील याचा नेम नसल्यामुळें, त्याच्याविषयीं आपण नेहमीं साशंक असलें पाहिजे. ' असें डंडासनें सांगितलें.

फॉक्सनें नेहमीप्रमाणें जोरदार भाषण केलें. तो म्हणाला " मराठे व निजाम यांच्याशीं कंपनीनें केलेला तह टिपूचें राज्य लुटून घेण्यासाठीं व टिपूचा विध्वंस करण्यासाठीं झालेला आहे. दुसऱ्याचा मुलूख हिराऊन घेण्यासाठीं चढावाचें धोरण स्वीकारावयाचें नाहीं असा यूरोपांतील सुधारलेले मुत्सद्दी ठराव करीत आहेत अशा वेळीं आपण हिंदुस्थानांत हें लज्जास्पद धोरण स्वीकारावें ही मोठी चमत्कारिक गोष्ट आहे. ' याचें उत्तर देतांना ' हे तह टिपूचा उच्छेद करण्यासाठीं केलेले नाहींत ' असें पिट्टनें सांगितलें. वादविवाद झाल्यानंतर मतें घेण्यांत आलीं तेव्हां कंपनीस अनुकूल असाच ठराव पास झाला.

सारांश हिंदुस्थानांतील व्यवहारापासून होणारा फायदा कंपनीच्याच लोकांस मिळावा असा आग्रह कंपनी प्रथम धरीत असे; यामुळें इंग्रजी मुत्सद्यांना बरेवाईट उपाय योजून प्रथम हिंदुस्थानच्या व्यवहारांत आपलें बोट शिरवावें लागलें. पण तें कसेंहि असलें तरी सत्तावन्न सालापर्यंत कंपनीच्या कारभारावर पार्लमेंटची देखरेख असे व कांहीं प्रसंगीं ही देखरेख बरीच कडकपणाची होई. त्यानंतर कंपनीच्या सत्तेचा लय झाल्यामुळें हिंदुस्थानच्या कारभारावर पार्लमेंटची बारीक दृष्टि राहण्याचें कारण नाहींसें झालें. यामुळें एका दृष्टीनें हिंदी जनतेचें मोठें नुकसान झालें.

भाग ६ वा.

कार्नवालीसचें धाडस व रुद्दीचा जोर.

युद्धांत शक्ती, युक्ती, व धाडस यांप्रमाणेंच नशीबाचीही परीक्षा होत असते. पैकी शक्ति म्हणजे सैन्य, दारूगोळा वगैरे कोणत्या पक्षाकडे जास्त आहे, आणि कोणत्याकडे कमी आहे, याचा अंदाज स्थूलमानानें तरी होण्याजोगा असतो. पण युक्तीचें तसें गणीत करता येत नाहीं. ती अदृश्य स्वरूपानें सेनापतीच्या डोक्यांत राहते; आणि ती श्रेष्ठ दर्जाची आहे किंवा कमी दर्जाची आहे, हें परिणामावरून ठरवावयाचें असतें. युद्धाच्या प्रारंभीं दोन्ही सेनापती आपापल्या बुद्धिबलानुसार युक्तीची म्हणजे डावपेंचाची योजना करतात, पण एकाची साधते व दुसऱ्याची फसते. आणि मग लोक ज्याचा डावपेंच फसला त्याची बुद्धि कमी दर्जाची होती असा अभिप्राय देतात, व त्याला खालीं ओढतात. अशाच रीतीनें धाडसाची वाहवा होणें किंवा न होणें हें देखील अखेरी साधण्याव अवलंबून असतें. पण नशीबाचा फेरा फार विलक्षण आहे. तो केव्हां, कोणास, कश रीतीनें हात देईल आणि कोणास खाली पाडील याचा मुळींच नेम नसतो. उदाहरणार्थ श्रीरंगपट्टणाच्या स्वारींत पहिल्या सहामाहींत इंग्रजी सेनेचें आधिपत्य मेडोजकडे होतें हें आधिपत्य त्यांजकडे देतांना त्याचा ज्यानें त्यानें गौरव केला. आणि मेडोजलाही मना पासून असें वाटले होतें कीं, मी टिपूला हां हां म्हणतां चीत करीन. या आत्म विश्वासावर त्यानें आपल्या सर्व कल्पनांची उभारणी केली आणि त्याच्या कल्पनें अशक्य असा कोणताच भाग नव्हता. पण टिपूच्या वरिष्ठ डावपेंचामुळें हा कल्पनेच मनोरा एकदम ढांसळून मेडोजला सहामाहीअखेर परत मद्रासेस येणें भाग पडले अर्थात तो युक्तीच्या बाबतींत जगाच्या दृष्टीनें कमी दर्जाचा ठरला. 'मी टिपूवर अद्या मात करून दाखवीन' असें मेडोजचें अजून म्हणणें होतें. पण पडलेल्या गड्याच्य बोलण्याकडे कोण लक्ष देणार? खुद्द त्याच्या हाताखालचे अधिकारी व साधे शिपाई देखी त्याच्या शहाणपणाबद्दल साशंक झाले; व 'याच्या अडाणीपणामुळें आमचे उगाच हा झाले आणि शिवाय अपयश पदरीं आलें' असे उद्गार ठिकठिकाणीं निघूं लागले.

हे अभिप्राय बंगाल्यांत कार्नवालीसपर्यंत पोंचून त्यांचा त्याच्या मना वाजवीपेक्षां जास्त परिणाम झाला. त्यानें व कँबेलनें मिळून इंग्रजी सैन्याची व रण

मुग्रीची तीन चार वर्षांपासून अशी चोख तरतूद केली होती कीं, त्याच्या जोरावर टिपूस सहज चीत करतां येईल अशी त्याला खात्री वाटे. पण प्रत्यक्ष अनुभव अगदी उलट आला. तेव्हां त्यानें या सर्व दोषाची जबाबदारी मेडोजच्या माथीं मारली; व यापुढें स्वतः मद्रासेस जाऊन सैन्याचें धुरीणत्व पत्करण्याचा त्यानें निश्चय केला. हा निश्चय डायरेक्टरांकडे इंग्लंडांत कळवितांना जरी त्यानें मेडोजला फारसा दोष न देतां 'मी वरिष्ठ अधिकारी असल्यामुळें सैन्यांत दाखल झालों म्हणजे साहजिक शिपायांना अधिक उत्साह वाटेल' असे शिष्टाचाराचे शब्द योजले आहेत, तरी आपल्या भावास याच वेळीं लिहिलेल्या पत्रांत त्यानें आपलें हृद्गत मोकळेपणीं लिहिलें आहे. त्यांत त्यानें स्पष्टपणें मेडोजची नालायकी नमूद करून 'या युद्धांत माझा नफा तर म्हणण्याजोगा कांहींच होणार नाहीं; पण झाला तर तोटा मात्र अतिशय होणार आहे. कारण मी टिपूस जिंकलें तर इंग्लंडांतील लोकांना माझें फारसें महत्त्व वाटणार नाहीं; पण जर कां टिपूनें माझा पराभव केला तर मात्र माझ्या फजीतीस पारावार नाहीं!' असे उद्गार काढले आहेत. यावरून मनुष्यस्वभावांतली एक महत्त्वाची गोष्ट कार्नवालीसनें ओळखली होती ती ही कीं यशाचे वाटेकरी होण्यास सर्वजण तयार असतात पण अपयशाचा वांटा मात्र एकट्या पुढाऱ्याच्याच शिरावर येतो.

याशिवाय अमेरिकन युद्धांत शत्रूस शरण जावें लागल्यामुळें, आधींच आपलें नांव कानफाट्या पडलें आहे, तेव्हां तो काळिमा धुऊन जाण्यास आपण कांहीं पराक्रम करून दाखविणें अवश्य आहे, असाही विचार त्याच्या मनांत असावा असें वाटतें. यामुळें त्यानें संधी येतांच सेनापतिपद आपणांकडे घेतलें; इतकेंच नव्हें तर लष्करी हालचाली इतक्या धडाडीनें केल्या कीं, त्यामुळें टिपू तर आश्चर्यचकित झालाच; पण इंग्रजी सैन्यांतील अधिकाऱ्यांना देखील कार्नवालीस हा अद्भुत पुरुष आहे असें वाटूं लागलें व त्यांना आवेश चढून ते अहमहमिकेनें पुढें होऊन शौर्याचीं कामें करू लागले.

अशा रीतीनें स्वसैन्याचा उत्साह तर कार्नवालीसनें एकदम वाढविलाच. पण या शिवाय त्याला आणखी एक कार्य साधावयाचें होतें. मराठे व निजाम यांनीं यापूर्वी इंग्रजांशीं दोस्तीचा तह करण्यासाठीं बोलणीं लावलीं होतीं; पण असे तह करण्याचें धोरण विलायतसरकारच्या हुकमाविरुद्ध आहे, असें सांगून कार्नवालीसनें तह नाकारला होता. पण या युद्धाच्या वेळीं इंग्रजांच्याच आग्रहावरून निजाम व मराठे सामील झाले होते. अर्थात ही दोस्ती कायम स्वरूपाची नसून फक्त या प्रसंगापुरतीच होती. यामुळें

या स्वारींत फायदा होण्याचा संभव दिसला तरच मराठे व निजाम आपल्या बाजू राहतील, नाहींतर उदासीन राहतील किंबहुना साधल्यास कांहीं सबब काढून टिपूस सामी होऊन इंग्रजावर उलटतील देखील अशी कार्नवालीसला नेहमीं भीति वाटत असे. याम मेडोजच्या पराभवाचें व टिपूच्या विजयाचें वर्तमान दोस्तांना कळतें न कळतें तोंच, आप टिपूच्या राज्यांत शिरून धुमाकूळ माजविल्याची बातमीहि त्यांना पोंचवावी अश त्याची उत्कट इच्छा होती.

आतां कार्नवालीसच्या मनांत हे विचारतरंग चालले असतांना मेडोज काय करी होता तें पाहूं. कार्नवालीसप्रमाणें मेडोजला कल्पनेनें राज्य करण्याची संवय नव्हती तो साधा शिपाईगडी होता. डावपेंचावर त्याची विशेष भिस्त नसे; किंवा आपल पराभव झाला व आपल्यावरील लोकांचा विश्वास उडाला याही गोष्टी त्याला खर बाटत नव्हत्या. तो अद्याप टिपूच्या राजधानीवर चालून जाण्याच्याच कल्पना बोल असे. दोस्तांच्या, टिपूच्या, अगर कार्नवालिसच्या मनांत काय विचार घोळत असती याची कल्पना त्याला येणें शक्य नव्हते. दृष्टिआड असलेली सृष्टी मनापुढें आणण्या सामर्थ्य कार्नवालिसच्या अंगांत फारच उत्तम प्रकारचें होतें; पण समोरच्या देखाव्य पलीकडे मेडोजला आपल्या विचाराचा पल्ला पोंचवितां येत नव्हता.

या त्याच्या साधेपणाचा फायदा आतापर्यंत टिपूनें घेतला व यापुढें आणखी थो घेण्याचा त्याचा विचार होता. त्यानें पांडेचरी येथील फ्रेंच गव्हर्नरामार्फत फ्रान्सक सहा हजार सैन्याची मागणी केली असून ' त्याच्या आधारावर हिंदुस्थानांतून इंग्रज उच्चाटण करून त्यांचें राज्य फ्रान्सला मिळवून देतों ' असा निरोप पाठविला होता. निरोपाचें उत्तर येईपर्यंत त्याला कसे तरी दिवस घालवावयाचे होते. शिवाय फ्रान्सकड मदत येईलच अशी त्याला खात्री नव्हती. तेव्हां त्यानें मेडोजकडे तहाची वाटाघ सुरू केली. आणि ही वाटाघाट मनापासून चालली आहे असें पटवून देण्याकरितां त्य जाळपोळ व लूट बंद करून लोकांना अभय दिलें. याशिवाय सामान्य लोकांचें अंतःक वश करून घेण्याकरतांही त्यानें अनेक उपाय योजले. विशेषतः धार्मिक बाबतींत मुसलमानेतर लोकांवर जुलूम करतो, असा जो समज चोंहीकडे पसरला होता तो घा विण्याकरता त्यानें हिंदूंच्या देवस्थानांना देणग्या देण्याचें व त्यांच्याशीं गोडीगुलाब बागण्याचें धोरण ठेवलें. यावेळीं त्याचा मुक्काम इंग्रजी सैन्याच्या मुक्कामापासून सो कोसांवर कंची. नांवाच्या क्षेत्राजळ होता. या क्षेत्रांतील देवालयाचा प्राकार दुरुस्त क

ण्याचें काम हैदरच्या कारकीर्दींत अर्धवट झालें होतें. तें पाहून टिपूनें यावेळीं एकदम दहा हजार होनांची मंजूरी देऊन, प्राकाराच्या दुरुस्तीस जोरानें प्रारंभ केला; आणि स्वतः रोज तिसऱ्या प्रहरीं पुष्करणी तीर्थावर जाऊन काम कोठवर झालें याची चौकशी करूं लागला. याशिवाय या देवाचा रथोत्सव याच सुमारास व्हावयाचा होता. तेव्हां 'लोकांनीं खुशाल उत्सवास यावें, त्यांना त्रास होणार नाहीं' असें जाहीर करून उत्सवाचें काम चांगल्याप्रकारें पार पाडण्यासाठीं मेहनत केली; व रथापुढें स्वतः उभे राहून खूप दारूकाम (आतष बाजी) सोडून लोकांची करमणूक केली. सारांश सामान्य लोकांचीं मनें आपणांकडे ओढून घेण्यासाठीं जे जे उपाय त्यास यावेळीं सुचले ते ते त्यानें मोठ्या शहाणपणानें योजले.

मेडोजशीं देखील त्याची वागणूक सभ्यपणाची होती. पराभूत झालेल्या सेनापतीशीं सलोखा घडवून आणावयाचा तर आपण त्याचा अपमान करणें बरोबर नाहीं, थोडी पड घ्यावी लागली तरी हरकत नाहीं पण समेट घडवून आणावा अशी टिपूची इच्छा असावी असें वाटतें. आणि ही वेळ तहास अनुकूलही होती. कारण या वेळीं इंग्रजी सैन्य अगदीं थकून भागून गेलें होतें. या वेळच्या इंग्रजी सैन्याच्या एकंदर स्थितीसंबंधीं एक बातमीदार लिहितो " इंग्रजी फौज हैराण होऊन आली. कितेक जखमी, कितेक दुखणेकरी. सर्वांस वाटलें कीं मोहीम करून घरास आलों. आतां अशांत इंग्रजांनीं हंगाम केल्यास (युद्ध सुरू केल्यास) त्यांचे लोक तन देणार नाहींत. उष्णकाळ तेव्हां इंग्रज निघणार नाहींत हे बोलवा आहे. " टिपूच्या या वेळच्या परिस्थितीसंबंधीं हा बातमीदार लिहितो ' मेडाजच्या हाताखालचे शे दोनशे उमदे गोरे सरदार टिपूनें धरले आहेत. त्यांनीं सलूख करून देतों असें टिपूशीं बोलणें लावलें आहे. ' हें सलूखाचें बोलणें करण्यासाठीं टिपूकडून पुरणिया, गुलाबखान, व वेणीपंत देव असे तिघे मुखत्यार गेले होते.' इंग्रजातर्फे महमदअल्लीखान बोलत होता.

टिपूचें म्हणणें असें होतें कीं " ज्यांत चारीं दौलतींचीं घरें रहातील ऐसें करा., इंग्रजांनीं कोणाची दौलत घेतली, त्यास बेदखल केले हा बट्टा बदमामलींचा (तुम्हास आजपर्यंत लागला) नाहीं तो लाऊन घेऊं नका. इतक्यावर आग्रहच असल्यास मी तर सिद्धच आहे. दौलत माझे बापानें व मी मेळविली. पुस्तैनची (परंपरागत) नाहीं. नशीबीं असल्यास करीतच आहे. नाहींतर हीच खतम (अखेर). तरवारेनें मेळविली आणि तरवारेनेंच हरवीन. " यास इंग्रजातर्फेचें बोलणें असें पडलें कीं बारा आणे मुलूख


तुम्ही ठेवावा आणि चार आणे आम्हांस द्यावा. हें म्हणणें टिपूनें मान्य केलें. पण त्यावर एवढीच अट ठेवली कीं ' प्रसंग पडेल तेव्हां अमूक फौजेची कुमक होईल असा क़रारनामा विलायतेहून होऊन आला पाहिजे.' ही अट दिसण्यांत सरळ होती पण विलायतेहून उत्तर येण्यास कांहीं महिने लागणार हें उघड होतें. तेव्हा टिपूनें शेवटीं कळविलें कीं 'लढाई तर आहेच. परंतु फाल्गुन शुद्ध अष्टमीपर्यंत दोघांनीं स्वस्थ बसावें. अष्टमीस सलूखाचें काय तें सांगावें ?'

टिपूनें इंग्रजी सेनापतीस आणखी एक पायबंद उत्पन्न केला होता तो असा. या युद्धांत कर्नाटकांतील बरेच पाळेगार इंग्रजांच्या बाजूस मिळाले होते. त्यांचा जमाव पाच सहा हजार लोकांचा असून किरकोळ कामें करण्यास त्यांचा चांगला उपयोग होई. या पाळेगारांना फोडण्यासाठीं टिपूचे प्रयत्न सुरू झाले. " मराठे व निजाम यांच्याशीं माझा तह झाला; आतां एकटे इंग्रज राहिले; तेव्हां त्यांचा पक्ष धरून तुम्ही आपलें व्यर्थ कां नुकसान करून घेतां ? माझ्याकडे याल तर मी तुम्हांस दाहा लक्ष रुपये खर्चास देईन " अशा अर्थाचा निरोप टिपूनें त्या पाळेगारांकडे पाठविला. त्यांना ही गोष्ट खरी वाटून इंग्रजी सैन्यांतून निसटण्यासाठी ते संधी पाहूं लागले. " पेशव्यांच्या व मोगलांच्या फौजा अद्याप इकडे आल्या नाहींत. त्या प्रांतींच आहेत. आम्ही कोठपर्यंत तुम्हां समागमें खर्चाचे पेचांत राहावें ? आम्हांस निरोप दिल्यास जिकडे सोय होईल तिकडे जाऊं " असें ते पाळेगार इंग्रजी सेनापतीजवळ म्हणू लागले. यामुळें त्यांच्या हेतूविषयीं संशय आला व बारकाईची चौकशी सुरू झाली. तेव्हां फितूराचा प्रयत्न चालू आहे ही गोष्ट अधिकाऱ्यांच्या निदर्शनास येऊन व पाळेगारांना दरमाहा सहा लक्ष रुपये देण्याचा करार करून त्यांची समजूत पाडली.

याचवेळीं मराठ्यांशीं तह करण्याचा देखील जोराचा प्रयत्न टिपूनें करून पाहिला. बदरजिमानखानानें रास्त्यांच्या पदरीं असलेल्या एका गृहस्थाजवळ यासंबंधीं बोलणें लावलें होतें. तो गृहस्थ लिहितो ' आता श्रीमंत राजश्री नाना (फडणीस) याणीं तहसंबंधी बोलणें ऐकोन घेऊन तहावरी गोष्ट पाडीत असल्यास मीच पुणियासी येतों. यासंबंधें आम्हीं टिपूस लेहून पाठवून लाख दोन लाख रुपयांचे जवाहीर नजर करावयासी घेऊन येतों. जेणेंकरून टिपूची दौलत राही अशी एखादी तोड काढून समेटांत आणावें असें बहुत तपसिलें विनंति करावयासी सांगितली. आणि आपल्यास येणेविशीं श्रीमंतांनीं आज्ञा केल्यास टिपूकडून जवाहीर नजरेचे आणावयाचे, त्यास वाटेनें सांडणीस्वार

निभावले पाहिजेत. त्याविसीं श्रीमंतांचीं पत्रें राजश्री तात्या (हरीपंत) यांसीं व राजश्री भाऊ (परशुरामभाऊ) यांसी असावे. नाहीं तरी मध्यें लुटले जातील असें सांगितलें. बदरीजमानखान बहुत बोलणीं बोलला आहे.सेवेसीं आल्यावरी समक्ष विनंती करीन.... बदरीजमानखान याच बोलण्याचा भाव आतुरपणा बहुत दिसतो. कसेंहि करावें आणि तह होय अशी गोष्ट व्हावी असें बोलणें आहे, " *

यावरून मराठ्यांशीं तहाचें बोलणें करण्याचा प्रयत्न टिपूनें वेळोवेळीं केला याबद्दल



टिपूच्या राज्यांत पूर्वेकडून शिरण्याचे तीन घाट.

संशयास जागा राहात नाहीं. पण हीं बोलणीं करून व त्याबद्दलचीं वर्तमानें चोहीकडे पसरून दोस्तांचीं मनें एकमेकाबद्दल साशंक करावीं एवढाच टिपूचा हेतु असावा असें तत्कालीन मुत्सद्यांस वाटल्यामुळें त्यानीं या बोलण्यांत उघडपणें फारसें लक्ष घातलें नसावें. टिपूचें आजपर्यंतचें बेपर्वाईचें वर्तन व उलाढाली स्वभाव अनेक प्रसंगीं प्रत्ययास आला असल्यामुळें त्याच्या या वेळच्या प्रयत्नास यश आलें नाहीं.. कारण ' अंतरंगचा भाव इंग्रजांशीं स्नेह करून घेऊन उपरांतिक इकडील (म्हणजे मराठ्यांचा) समाचार घ्यावा या विवंचनेत (टिपू) आहे ' अशीहि मराठ्यांकडे बातमी येत होती.

हा तहाचा प्रयत्न मनापासून चालला होता किंवा दिवस घालविण्याकरितां कांहीं तरी सबब म्हणून पुढें केला होता याचा निर्णय होण्यास टिपूच्या दरबारांतील कागदपत्र

* मराठ्यांच्या इ० चीं साधनें खंड १० पत्रांक ३५८.

उपलब्ध झाले पाहिजेत. ते मिळाले नाहींत तोंपर्यंत अंदाजावर लिहिणें भाग आहे. इंग्रजी इतिहासकारांनीं ही तहाची हकीकत अगदीं त्रोटक दिली आहे. टिपूकडून बोलणें करण्यासाठी लोक आले होते पण त्यांच्या जवळ वकीलीबद्दल अधिकारपत्र नव्हतें व "इंग्रजी कैदी सर्व सोडून, महत्त्वाचें एखादें ठिकाण आमच्या ताब्यांत देण्यांत येईल तर आम्हीं पुढें बोलूं" अशी अट घातल्यामुळें पुढें बोलणें बंद पडलें अशा अर्थाचा उल्लेख इतिहासकारांनीं केलेला आहे. आणि सरकारी रीतीनें प्रत्यक्ष एवढाच प्रयत्न झाला असेल हेंही खरें. पण पुष्कळ तहाची वाटाघाट समक्ष न चालता मध्यस्तामार्फत चालते. आणि यावेळीं महंमदअल्लीच्या मार्फत अशी वाटाघाट चालली होती असें ऐतिहासिक लेख संग्रहांतील कित्येक पत्रांवरून (नं. ३२८६ व ३२६७ पहा) स्पष्टपणें दिसतें. व त्याच आधारावर वर दिलेली हकीकत लिहिली आहे.

ही तहाची वाटाघाट व दिरंगाई कार्नवालीसला बिलकुल मान्य नव्हती. त्यानें एकदम शत्रूच्या मुलखांत चालून जाण्याचा निश्चय केला. दक्षिणेकडून गजरहट्टीच्या घाटानें जाणें धोक्याचें आहे, असें मागल्या साहामाहींतील अनुभवावरून ठरलें होतें; तेव्हां तो मार्ग सोडून पूर्व बाजूनें चढून जाणें कार्नवालीसला भाग होतें. या बाजूनें देखील दोन घाट होते. एक अंबूरचा घाट व दुसरा मोगली घाट. पैकीं मोगली घाटानें जाण्यास थोडा वळसा पडत असून वाट डोंगराळ व नापीक प्रदेशांतून असल्यामुळें तेथून सैन्य नेतांना भरपूर दाणावैरण मिळण्याची सोय नव्हती. आणि अंबूरच्या घाटांतून वाटजवळची असून प्रदेश सुपीक होता. अर्थात अंबूरच्या घाटांतूनच सैन्य जाईल असा सर्वांचा समज होता; आणि तोच दृढ करण्याकरितां कार्नवालीसनें थोडें सैन्य त्या घांटाच्या तोंडावर पाठविलें. या घाटांवर टिपूचा बंदोबस्त चांगला असल्यामुळें, त्यानें फारशी हालचाल केली नाहीं. कार्नवालीसनें अर्काटच्या पुढें सैन्य गेल्यावर एकदम उत्तरेकडे तोंड वळविलें, व पन्नास साठ मैलांचा फेरा घेऊन त्यानें मोगली घाट गांठला. एकीकडे हुलकावणी दाखवून एकदम दुसरें ठिकाणीं जाण्याची ही युक्ति फारच उत्तमप्रकारें साधली; कारण ती सिद्धीस जाण्यास जी तडफ लागते, ती कार्नवालीसच्या अंगीं जन्मसिद्धच होती. त्याच्या चरित्रांतील अनेक बऱ्यावाईट प्रसंगांची उपपत्ति त्याच्या या तडफेनेंच लागते. ही तडफ त्याला यावेळीं फायदेशीर ठरली; पण हिचाच अतिरेक होऊन पुढें तिला फाजील घाईचें स्वरूप आलें तेव्हां कार्नवालीसच्या सैन्यास श्रीरंगपट्टणापुढें उभे राहून उपाशीं मरण्याचा प्रसंग थोड्याच महिन्यानंतर येणार होता. तथापि १७९१ च्या जानेवारी

व फेब्रुवारी महिन्यांत त्याची तडफ इंग्रजी सैन्याची सरशी होण्यास व टिपूचा गोंधळ उडविण्यास चांगली उपयोगी पडली.

ग्यावेळीं कार्नवालीसच्या सैन्यांत पेशव्यांच्या तर्फे बच्याजी रघुनाथ मेहेंदळे नांवाचा बातमीदार होता. त्यानें इंग्रजी सैन्याच्या हालचालीचें वर्णन थोडक्यांत एका पत्रांत चांगलें केलें आहे. करितां मुसलमानी तारखांच्या जागीं इंग्रजी तारखा घालून त्या पत्रांतील अवतरण येथें देतों, ' लाट कार्नवालीस बंगालेहून पट्टणास (मद्रासेस) आले होते. ते २८ जानेवारी रोजीं लष्करांत दाखल झाले. आठ दिवस राहून ५ फेब्रुवारीस कूच करोन १९ फेब्रुवारीस मोंगली घाट चढोन वर आलें. चार रोज घाटावर मुक्काम करोन दरोबस्त संरंजाम भारी तोफखाना घांटावर आलेयावर निघाले. ते दुडबागल, कोल्हार, हुसकोटा या मार्गें बेंगरुळास ५ मार्चास दाखल जाले. मार्गांत एक वेळ टिपूकडील स्वारांचा मुकाबला जाला. परंतु लाटसाहेब बहुत मजबुतीनें सांभाळोन फौज सुद्धा बेंगरुळासी लागले. '

अर्काटहून सैन्याचें तोंड फिरवून मोंगली घाटानें बेंगरुळापर्यंत जाऊन कार्नवालीसनें तो धुमाकूळ घालीपर्यंत टिपू काय करीत होता हें आतां सांगितलें पाहिजे. इंग्रजी इतिहासकारांनीं या दिरंगाईबद्दल टिपूस दोष तर दिलाच आहे; पण तो भ्याड होता, कार्नवालिसच्या हालचाली पाहून त्याची मति गुंग झाली, त्याला एका वेळीं एकच विचार डोक्यांत वागविता येत होता, मुख्य सेनापती जसा शतावधानी असावा लागतो तसा तो नव्हता, वगैरे अनेक आरोप त्याच्यावर केले आहेत. पण थोड्याशा विचाराअंती हे आरोप दुराग्रहमूलक आहेत असें सहज दाखवितां येईल. फ्रेंचांची मदत मिळविण्यासाठीं या वेळीं पांढेचरीकडे गुंतून राहिला; यामुळें, इंग्रजी सैन्यास मोकळा मार्ग सांपडला ही गोष्ट खरी आहे. पण इंग्रजी सैन्य चालून आल्यास स्वसंरक्षण कसें करावयाचें याबद्दल त्याला कधींच फिकीर वाटत नव्हती; ' तें मला केव्हांही करतां येईल ' असा त्याला आत्मविश्वास होता. त्याच्या विचाराची मजल यावेळीं स्वसंरक्षणापलीकडे गेली असून इंग्रजांचें हिंदुस्थानांतून अजीबात उच्चाटण कसें करतां येईल या कल्पना तो डोक्यांत घोळवीत होता आणि याचकरितां त्याला फ्रेंचांची मदत पाहिजे होती.*

---

* टिपूचे वकील फ्रान्सला पोचले तेव्हां त्यांच्या दुर्दैवानें फ्रेंच राज्यक्रांतीस प्रारंभ झाला होता. लोकसत्तेची कल्पना वणव्यासारखी पेटून त्यांत राजाची आहुती पडणार असें दिसूं लागलें आणि हीं क्रांतिकारक मतें फ्रान्सनें अमेरिकेच्या मदतीस सैन्य पाठ-

[पुढें चालू

'सहा हजार फ्रेंच शिपाई व कांहीं हुषार एंजिनियर माझ्या सहायास येतील तर मद्रासेकडून इंग्रजांना रेटीत कलकत्ता देखील घेऊन दाखवीन' असें तो म्हणू लागला होता. त्यांत अतिशयोक्ति व अहंभाव याचा अंश निःसंशय होता. पण तो वजा केला तरी फ्रेंचाची मदत आली असती तर इंग्रजांना फार जड गेलें असते यांत संशय नाहीं. कार्नवालिसचा या वेळचा पत्रव्यवहार वाचला व त्याची घाई पाहिली म्हणजे फ्रेंचांची मदत आल्यास आपली धडगत नाहीं, असाच कार्नवालिसाचाही भावार्थ दिसतो. सारांश घाईनें युद्ध आटोपण्यासाठीं इंग्रजांची धडपड व होईल तितकी दिरंगाई करण्यांत आपला फायदा आहे, अशी टिपूची समजुत होती. यामुळें समोर उभा राहून युद्ध जुंपावें अशी कार्नवालिसची इच्छा होती; आणि टिपूचें सर्व धोरण युद्धाचा प्रसंग टाळून इंग्रजी सैन्यास बेजार करण्याचें होतें.

शिवाय यावेळीं इंग्रजी सैन्याचा जमाव फार मोठा व तो ही कवाईत शिकलेला असून फार व्यवस्थित असा होता. अशा सैन्याशीं समोरून युद्ध चालविण्यांत टिपूचा झाला तर एकदम फायदा; नाहीं तर सपशेल अधःपतन होण्याचा संभव होता. कारण पुढारी ठार झाला कीं, देशीं सैन्यें लगेच पळत सुटत; यामुळें हा संभव ज्यांत राहणार नाहीं अशा प्रकारची युद्धपद्धति स्वीकारणें सेनापतींना भाग पडे. ही गनीमीकाव्याची लढाई चेंगटपणाची असून इंग्रजी सैन्यें या पद्धतीनें पुष्कळ ठिकाणीं जेरीस आल्याचीं उदाहरणें आहेत. सकृद्दर्शनीं जरी आपल्या पिछेहाटीमुळें शत्रूस अवसान चढलें, तरी त्याला घोळवीत दूर नेऊन त्याची उपासमार करतां येईल असा टिपूला विश्वास होता; आणि अखेरीस इंग्रजी सैन्यावर त्यानें असा प्रसंग आणलाही. पण इंग्रजांची सद्दी जोरावर असल्यामुळें कधींही जमून न येणारे असें कित्येक योगायोग यावेळीं घडून आले व कार्नवालिस बचावला ही गोष्ट निराळी. पण त्याला शेवटीं जय मिळाला म्हणून टिपू

विल्यामुळें बद्धमूल झाली अशी फ्रेंच राजाची खात्री झाली. यामुळें टिपूचा प्रश्न निघतांच तो म्हणाला " हें प्रकरण अमेरिकन युद्धासारखें दिसतें. अमेरिकन युद्ध सुरू झाले तेव्हां मी अल्लड होतो यामुळें त्या भानगडींत पडण्यास मी संमति दिली. पण आतां मी अनुभवानें शहाणा झालों आहे. मला या टिपूच्या भानगडींत साफ पडावयाचें नाहीं.' दुधानें तोंड पोळलें म्हणजे ताक देखील फुंकून पिण्याची प्रवृत्ति होते असें म्हणतात तें खरें आहे. राजाचें हें करणे फ्रेंच मुत्सद्यांना सर्वांशीं पसंत नव्हतें. पण राजानें यावेळीं फारच निश्चय दाखविल्यामुळें त्यांना यावेळीं स्वस्थ बसावें लागलें.

भिन्ना होता किंवा तो गोंधळून गेला वगैरे इतिहासांतील विधानें खरीं धरतां येत नाहींत. असो.

मागें सांगितल्याप्रमाणें कार्नवालीस बेंगरूळाजवळ पोंचल्याची बातमी येताच टिपू चंगमच्या घाटानें आपल्या राज्यांत शिरला; व प्रथम बेंगरूळास असलेला आपला कबीला श्रीरंगपट्टणास पाठवून त्यानें किल्ला लढविण्याची तयारी चालविली. किल्ल्यास दिल्ली दरवाजा व म्हैसूर दरवाजा अशा दोन वेशी असून, उत्तरेकडच्या म्हणजे दिल्ली दरवाजाकडच्या बाजूस पेठ (म्हणजे शहर) वसली होती. कार्नवालीसनें प्रथम पेठ घेण्याचें ठरविलें. पण त्या सभोंवती देखील तट होता. तेव्हां कोणत्या बाजूनें हल्ला करावा वगैरे पाहणी करण्यासाठीं त्यानें एंजिनियर व कर्नल फ्लाइड यांस पांच चारशें लोकांसुद्धां पाठविलें होतें. त्यानीं 'शत्रूशीं गांठ घालूं नये नुसती पाहणी करून यावें' असें कार्नवालीसनें त्यांस बजाविलें होतें; पण कार्नवालिस स्वतः या दोन महिन्यांत अतिशय घाईनें, धाडसानें व बेफामपणें वागत असून त्याची एकसारखी सरशी व शत्रूची पिछेहाट होत आहे असें इंग्रजी सैन्यास दिसत असल्यामुळें, धाडसाचें वारें त्यांच्याही अंतःकरणांत पूर्णपणें शिरलें होतें. शत्रू दिसला कीं, खुशाल त्याच्या अंगावर चालून जावें, असा धडाका त्यांनीं चालविला. अशा स्थितींत पाहणीच्या वेळीं फ्लाइडला टिपूचे कांहीं लोक दृष्टीस पडतांच त्यास सेनापतीच्या हुकमाचें विस्मरण पडून तो धाऊन गेला. टिपूचे लोक पळत आपल्या गोटांत गेले तेव्हां आवेशाच्या भरांत फ्लाइडनेंहि त्यांचा तेथवर पाठलाग केला. यामुळें त्यास टिपूच्या सैन्यानें गांठून चांगला मार दिला. या चकमकींत फ्लाइडला गोळी लागली व त्याचे शें दीडशें लोक ठार झाले.

यानंतर बेंगरूळ शहर घाईघाईनें ताब्यांत घेण्यांत आलें. त्या कामीं कोणत्या अडचणी आल्या याचें वर्णन करतांना नोलन लिहितो—" आणखी एक धाडसाचें काम (आणि हें काहींसें धोक्याचें ठरलें) म्हटलें म्हणजे तटबंदी असलेल्या बंगलोर शहरावर हल्ला करण्यांत आला हें होय. हें शहर विस्तृत व महत्त्वाचें होतें. त्याच्या सभोंवारचा तट साधारण होता; पण खंदक चांगला असून आंत शिरण्याच्या वाटेवर फारच दाट निवडुंगाची लागण केली होती. शिवाय या जागेची चांगली माहिती न मिळवितां हल्ला करण्यांत आला. यामुळें व बुरूजावरून जोराचा गोळीबार झाल्यामुळें, जबरदस्तीनें आंत शिरूं पाहणाऱ्या इंग्रजी सैन्यास फार कष्ट पडले. कर्नल मूर हाऊस–इंग्रजी सैन्यांतील एक नामांकित व अनुभविक शिपाई–यांस चार जखमा लागून तो ठार झाला. शेवटीं दर-

बाजाच्या अगदीं चिंधड्या झाल्यावर लेफटेनंट आयर नांवाचा एक ठेंगणा शिपाई आंत शिरला. तेव्हां मेडोजनें सैन्यास उत्तेजन देऊन शहरांत प्रवेश केला.'

यानंतर किल्ला घेण्याचा विचार ताबडतोब सुरू झाला. कारण टिपूनें आपलाच मुलख उध्वस्त करून चारा वैरण जाळून टाकण्याची पद्धत स्वीकारल्यामुळें इंग्रजी सैन्यांतील गुरांचे हाल होऊं लागले. यामुळें एकेक दिवस लोटल तो दुष्काळाची भीति एकसारखी वाढवीत होता. पण किल्ल्यावर तावतोब हल्ला करावा तर त्यांत यश येण्याचा संभव फारच कमी. इंग्रजी सैन्य थोडें यामुळें त्याला सभोवार वेढा देण्याचें सामर्थ्य नव्हतें; याशिवाय किल्ल्यांत सर्व प्रकारची सामुग्री पोंचत असून टिपूस नव्या दमाचे लोक केव्हांही आंत नेतां येत असत, आणि त्यानें बऱ्याच मोठ्या सैन्यानिशीं रात्रींच्या वेळीं अचानकपणें इंग्रजाच्या तळावर घाला घालून गुरें व इतर सामान लुटून नेण्याचा क्रम ठेवला होता; व समोरून हल्ला चढविल्यास तो दोही बाजूंनीं आपणावर मारा करील हें इंग्रजांना उघड दिसत होतें. अशा स्थितींत एका बाजूस सुरुंगाच्या सहाय्यानें धडाका उडवून किल्ल्याच्या बुरुजास २१ तारखेस एक भोसका पडला. पण तो अगदीं लहान असल्यामुळें त्याच्या विश्वासावर हल्ला चढविण्याची सोय नव्हती. इंग्रजांनीं एका बाजूस मोर्चे लाऊन तोफा मांडण्याची तयारी चालविली होती. ती पांच चार दिवसांत पुरी झाली म्हणजे बुरजास पडलेला भोसका मोठा करण्याचा त्यांचा विचार होता. इतक्यांत सकाळच्या धुक्याचा फायदा घेऊन टिपूनें तटाच्या भिंतीवर तोफा ठेवण्यास सुरवात केली. त्यांत त्याला यश आलें असते तर इंग्रजांचे मोर्चे बांधण्याचें काम चाललें होतें तें त्याला निरुपयोगी करतां आलें असतें. तेव्हां कार्नवालिसनें त्याच वेळीं घाईनें हल्ला चढविण्याची तयारी केली. ती पाहून टिपूनें वर ठेवलेल्या तोफा खाली काढल्या; यामुळें इंग्रजानींही हल्ला करण्याचा बेत तहकूब करून मोर्चांचे काम पुरें होईपर्यंत वाट पाहण्याचें ठरविलें. पण संध्याकाळीं टिपूनें पुनः तोफा तटावर आणल्या! त्या पाहून इंग्रजी सैन्य काळजींत पडलें; कारण सकाळीं त्यांचा मारा सुरू झाला कीं आपल्या मोर्चांचें व खंदकाचें काम धुळीस मिळणार. आणि मग पुनः तयारी करणें कठीण. बरें, वाट पहात राहावें तर सैन्याचें हाल चालले होते; आहे या मोर्चांच्या जोरावर चाल करावी तर त्यांचा उपयोग होणार नाहीं असा तज्ज्ञांनीं अभिप्राय दिला. पण कार्नवालिस अडचणीच्या वेळीं बेफामपणें मुसंडी मारणारा सेनापती होता. व त्याच्या नशीबानें याबेळीं अंधारांत घेतलेली उडी नेमक्या जागेवर पडली. त्यानें त्याच रात्रीं हल्ला करण्याचा निश्चय केला; पण त्याचा बोभाटा होऊं न

देतां आपला बेत त्यानें फक्त एका अधिकाऱ्यास मात्र कळविला होता. रात्रीचे दाहा वाजतांच एकाएकीं सैन्यास कूच करण्याचा हुकूम देण्यांत आला. चांदणी रात्र असल्यामुळें पुढाऱ्याच्या मागोमाग शत्रूस चाहूल लागूं न देतां इंग्रजी सैन्य चाललें व त्यानें किल्ल्याच्या तटास शिड्या तर लावल्या. कार्नवालिसनें हा बेत अतिशय गुप्त ठेवला होता, पण त्याचा सुगावा टिपूस लागला. त्यानें ताबडतोब आपल्या सैन्याच्या एका तुकडीस (इंग्रजी सैन्यावर बाजूकडून हल्ला करण्यासाठीं) रवाना केले व किल्लेदाराकडे बातमी पोंचविण्यासाठीं स्वार पाठविले. ते येतांच किल्लेदार कांहीं लोक घेऊन तटावर आला आणि पाहतों तो तटास इंग्रजांनीं शिड्या लावलेल्या! तेव्हां तो स्वतः बुरजाच्या भोसक्या जवळ उभा राहून लोकांना लौकर येण्यास सांगू लागला. हें पाहून इंग्रजी शिपायांना काय करावें हें सुचेना. कारण वर सैन्य उभे असतां आपणांस शिडीवरून चढतां येईल असें मानण्यांत अर्थ नव्हता. पण त्यांच्या सुदैवें त्यांना यावेळीं किल्ल्यावर जाण्याची एक आडवाट सांपडली. तिचा आश्रय करून कित्येक लोक वर गेलें. शिवाय किल्लेदार अकस्मात गोळी लागून पडला.* यामुळें इंग्रजी सैन्यास शिडीचाही मार्ग मोकळा झाला. कारण किल्लेदार पडतांच टिपूच्या लोकांचा धीर खचून ते मागल्या म्हणजे म्हैसूर दरवाजानें पळत सुटले. सर्वांनीं वेश गांठण्यासाठीं एकच धुमड माजविल्यामुळें तेथें अतोनात गर्दी झाली. इकडे कांहीं इंग्रजी शिपाई किल्ल्यांत शिरले होते. त्यांची संख्या थोडी असल्यामुळें त्यांना तो शत्रूचा जमाव पाहून हा आपणावर उलटला तर आपली धडगत लागणार नाहीं असा, (रात्रीचा वेळ असल्यामुळें) संशय वाटे. व 'शत्रूस दहशत वाटेल असें उपाय योजणें हाच यावेळीं आमच्या सुरक्षितपणाचा मार्ग आहे' असें त्यांच्या मनानें घेतलें; व त्यांनीं जीव घेऊन पळत सुटलेल्या टिपूच्या सैन्याची शक्य तितकी कत्तल केली. यामुळें त्या दोन तीन तासांत हजारापेक्षां अधीक लोक त्यांच्या तरवारीस बळी पडले असतील.

---

* बहादूरखानानें बंगलोरचा किल्ला फारच शौर्यानें लढविला. यामुळें त्याच्याविषयीं सर्वांना आदर वाटत होता असें दिसतें. कार्नवालीसनें देखील त्याचे प्रेत बाजूस टेऊन 'ते योग्य ठिकाणीं पुरलें जावें याकरितां तुमच्याकडे पाठविण्यास मी तयार आहे' असा टिपूकडे निरोप पाठविला. तेव्हां टिपूनें कळविलें कीं "शूर मनुष्य आपलें कर्तव्य बजावीत असतां ज्या जागीं आपला देह ठेवतो तीच जागा त्याच्या दफनास योग्य आहे!" तेव्हां कार्नवालीसनें या सूचनेस अनुसरून लष्करी थाटानें त्या प्रेताचें दफन करविलें.

इकडे बाहेरची व्यवस्था करून टिपू सैन्यासह किल्यांतील लोकांच्या मदतीसाठ धाऊन आला; आणि पाहतो तों आपलें सैन्य जीव वांचविण्यासाठीं वेशींतून पळत सुट आहे ! इतक्यांत किल्याच्या तटावरून त्याच्या अंगावर गोळीबार सुरू झाला. तेव्ह ' किल्ला शत्रूनें घेतला; आतां तिकडे जाण्याचा प्रयत्न करण्यांत अर्थ नाहीं ' असें ठरवू तो परत आपल्या तळाकडे गेला.

इंग्रज थोड्याच दिवसांत किल्यावर हल्ला करतील अशा अजमासावर त्यानें स तयारी केली होती; पण त्याच दिवशीं हल्ला झाल्यामुळें टिपूची तयारी अपुरी ठरल कार्नवालीसला देखील यश आलें याचें कारण त्याचे डावपेच नव्हेत; तर त्याचें धाड व त्यास जोड देणारें त्याचें नशीब; कारण त्याचे लोक बुरजाजवळ पोचले त्यावेळीं त्यांच सुदैवानें (किंवा फितुरी मनुष्याच्या सहायानेंही असेल) आडवाट सांपडली नसती अग किल्लेदारास अकस्मिकपणें गोळी लागली नसती तर भलताच प्रसंग इंग्रजी सैन्यावर ओ वला असता असें या युद्धांत हजर असलेल्या एका गृहस्थानें आपला अभिप्राय लिह ठेवला आहे. तथापि कार्नवालिस धाडसी होता याबद्दल संशय घेण्यास जागा नाह मात्र धाडसामुळें नेहमीच फायदा होतो असें म्हणतां येत नाहीं. एवढे खरें कीं धाडस नशीबानें हात दिला कीं जें यश प्राप्त होतें ते लोकांना आश्चर्य चकित करून टाक पण जर कां त्याची वक्रदृष्टी झाली कीं फजीतीस पारावार राहात नाहीं. यामुळें अस धाडस विचारीं माणसें सहसा करीत नाहींत.

बेंगरूळच्या या यशानें मराठे, निजाम वगैरे सर्वत्र लोक विस्मयानें स्तंभित झा जो किल्ला घेण्यास वर्ष सहा महिने तरी लागतील असा त्यांचा अंदाज होता अवघ्या सतरा दिवसांत इंग्रजांनीं टिपूच्या सैन्यासमोर चाल करून घेतला हें ऐ मराठे लोक इंग्रजांच्या शौर्याचे मोठ्या कौतुकानें वर्णन करू लागले. किल्ला घेणें म्ह केवढी कामगिरी आहे, त्याला किती खंबीर मनाची माणसें लागतात व यांचे खऱ्या शौर्याची परीक्षा कशी हाते हें त्यांना फारच उत्तम प्रकारें कळत होतें. का लहानपणापासून म्हातारे होईपर्यंत मराठ्यांना त्यावेळीं जर कोणतें शिक्षण घेण उत्तम अवसर सांपडत असेल तर ते लष्करी शिक्षण होतें. यामुळें एखादा मार्मिक रसिक गृहस्थ ज्याप्रमाणें सऱ्या सुंदर कविता वाचून आनंदानें डुलतांना आढळतो त्य माणें खरें शौर्य दिसलें कीं, त्याचें कौतुक केल्यावांचून त्यावेळच्या मराठ्यांना राह नव्हतें. त्यांतून त्यांचा स्वभाव निर्मत्सर असल्यामुळें ते ही स्तुति अगदीं खुल्या दि करीत; व खरें अंतःकरण लिहून दाखविण्याच्या या प्रयत्नांत त्यानीं जे इंग्रजावि

प्रशंसोद्गार काढले आहेत ते त्यांच्या थोर मनास शोभण्याजोगे आहेत. ते वाचीत असतांना अधुनिक वाचकांचें देखील मन क्षणभर त्या काळच्या अनेक कल्पनांशीं तद्रूप होऊन जातें व सद्यःस्थितीचा विसर पडतो. येथें त्यांतील उतारे देऊं लागल्यास फार विस्तार होईल याकरतां तसें करीत नाहीं. ज्यांना या विषयाची गोडी असेल त्यांनीं राजवाडे, खरे, पारसनीस वगैरे संशोधकांनीं प्रसिद्ध केलेलीं या प्रकरणासंबंधीचीं पत्रें पुनः एकवार वाचावीं अशी शिफारस करून पुढील हकीकतीकडे वळतों.

बेंगरूळ घेतल्यानंतर श्रीरंगपट्टणाकडे एकदम निघण्याची कार्नवालिसची इच्छा होती. परंतु गुरांना चारा मिळाल्यावांचून त्यांच्या हातून तोफा ओढण्याचें काम होणें शक्य नव्हतें; कारण बरेच बैल मृत्युमुखीं पडले व होते ते देखील निव्वळ हाडाचे सापळे बनले होते. तेव्हां त्यांना वैरण मिळण्याची सोय उत्तरेस असल्यामुळें तो तिकडे वळला. शिवाय निजामाचे सैन्यही मिळवून घ्यावयाचें होतें. तेव्हां २८ मार्च रोजीं (लाटसाहेब) 'स्वार जाले ते चिकबालापुरावरोन दासरपल्लीचे मुक्कामीं फौजसुद्धां येऊन दाखल जाले. नबाबाकडील (म्ह. निजामाकडील) फौज रायभारामल तेजवंत बहादर (१३ एप्रील रोजीं) गंजीकोटयाहून निघोन मुक्कामसजकुरीं दाखल जाले. त्याच दिवशीं लाटसाहेबांच्या व त्यांच्या भेटी जाल्या. (१४ एप्रील रोजीं) दुसरे दिवशीं कूच करोन मजल दरमजल व्यंकटगिरीस आले आहेत, उभयतांचीं लष्करें जवळच उतरतात. एक वेळ लाटसाहेब जनरल मंडोस (=मेडोज) भारामलाचे डेरेयासी गेले होते. तेहीं दोन वेळ लाटसाहेबांचे डेरेयासी आले होते. प्रथम भेटीचे दिवशीं इंग्रजांनीं आपले बारवाले, तोफखाना दरोबस्त त्यास दाखविला. नंतर त्यानींहि आपली फौज तयार करोन गोटाबाहेर माळावर उभी 'कोर' बंदीनें केली आणि लाटसाहेबास दाखविली. 'बहुत चांगले लोक आहेत' म्हणोन डेरेयासी गेले. हल्लीं घाटाखालोन कांहीं रसद आणविली ती येत आहे. आली म्हणजे कूच करोन बेंगरुळचे मार्गें श्रीरंगपट्टणास नमूद होणार.'*

निजामाच्या या सैन्याचें वर्णन देतांना विल्क्सनें फारच टवाळी केली आहे. स्वतः कार्नवालिस या सैन्याची किंमत जाणत होता व कांहीं प्रसंगीं या सैन्यानें चांगली मदतहि केली.. पण देशी सैन्यांची चेष्टा करण्यांत आनंद मानणाऱ्या विल्क्सनें पुष्कळ ठिकाणीं दंतकथा व कल्पित गोष्टी व उपहासपरवर्णनें देऊन आपला ग्रंथ चटकदार करण्याचा अश्लाघ्य प्रयत्न जागोजाग केला आहे. त्यांतून आम्ही जो भाग या प्रकरणांत

* ऐतिहासिक टिपणें भाग २ पृ. ३ पहा.

लिहिला आहे त्याची हकीकत देतांना तर टिपू, मोंगल किंवा मराठे यापैकीं कोणाची तरी निंदा केल्यावाचून त्यानें एकहि पान जाऊं दिलें नाहीं. इतर इतिहासकारांनींही विल्क्सचाच बहुतेक ठिकाणीं आधार घेतल्यामुळें त्यांनाहि असेंच करावें लागलें आहे. निजामाचें सैन्य आल्याची हकीकत देतांना विल्क्स लिहितो " या बहुरंगी गर्दींतल्या लोकांच्या हातांत जीं विचित्र हत्यारें व रणसामुग्री होती त्याचा मासला यूरोपांतील कोणत्याही राष्ट्रीय किंवा खासगी अजबखान्यांत बहुतकरून आढळणार नाहीं ! पार्थियन पद्धतीचा तीरकमठा, सिथियन लोकांसारखी गदा, प्राचीन व अर्वाचीन कालीन नानाप्रकारच्या तरवारी, लहान मोठे भाले; चमत्कारिक कुऱ्हाडी आणि शेकडों प्रकारचीं शिरस्त्राणें या सैन्यांत होतीं. व्यवस्था व आज्ञाधारकपणा यांचा त्यांत मागमूस नव्हता; आपआपल्या निशाणाभोवतीं घोळका जमलेला दिसे. प्रत्येक शिपायास मी एक स्वतंत्र योद्धा आहे आणि माझ्या एकट्याच्या तरवारबहादुरीनें आम्हांस जय मिळणार असा अभिमान वाटत असे ! " या बेशिस्त सैन्याजवळ धान्यसामुग्री अगर दाणावैरण मुळींच नव्हती. कार्नवालिसनें त्यांजकडे रखवालीचें काम नेमून दिलें; पण नेमून दिलेलें काम करण्यांत ते मन घालीत नसत. बाहेर पडले म्हणजे त्यांचे सर्व लक्ष शत्रूला कसे लुटावें हें पाहण्यांत असे; आणि तळावर आले कीं, आपल्याच दोस्तांच्या सैन्यांत ते चोरी करीत अशीही माहिती एका इतिहासकारानें दिली आहे ! असो.

मागें सांगितल्याप्रमाणें कार्नवालीस बंगलोरहून उत्तरेस बाळापुराकडे गेला. 'बाळापुरास यावयाचें कारण अर्काटचीं व बंगाली पलटणें, व मोठमोठ्या तोफा व रसद अंबूरच्या घाटाखालीं आहे ती मिळवून घ्यावी; व गंजीकोट्याकडून नबाबाची फौज येणार त्यांची गाठ पडावी. हें होतांच (श्रीरंग-) पट्टणास जाण्याचा इरादा आहे. बरसातीच्या पूर्वी हा गुंता उरकावा एतदर्थी सामानाची बेगमी होत्ये. बेंगरुळांत तोफा एकशेवीस सांपडल्या. दारूगोळा व शिसें मुबलग बेगमीचें आहे.' याप्रमाणें कार्नवालीस रसद मिळवून घेण्याकरितां अंबूरच्या घाटाकडे परत चालला असतां टिपूस वाटलें कीं आपला घाटाखालचा मुलूख काबीज करण्यासाठी इंग्रज परत चालले असतील. या शंकेमुळें इंग्रजांच्या मागोमाग टिपूही घाटाच्या तोंडापर्यंत गेला. कार्नवालीस अन्नसामग्री व तोफा वगैरे सामान ताब्यांत घेऊन पुनः श्रीरंगपट्टणाकडे फिरला. मलबारांत जनरल आबरक्रांबी घाट चढून कुर्ग प्रांतातून श्रीरंगपट्टणाकडे येऊं लागला. तेव्हां दोन्हीं मार्गांनीं इंग्रज आपल्या राजधानीवर येणार अशी टिपूची खात्री झाली. त्यानें

तत्काळ मलबारकडे कांहीं सैन्य रवाना केलें व बाकी सैन्यासह कार्नवालिसला अडविण्याचें काम टिपूनें स्वतः पत्करलें. इंग्रजांच्या मार्गापासून दाहा पंधरा कोसापर्यंतचा टापू त्यानें जाळून बेचिराख केला; आणि त्या त्या टापूंतील रयत व गुरेंढोरें दूरच्या प्रांतांत घालवून दिलीं. त्यानें धान्याचा व वैरणीचा नाश करून टाकला इतकेंच नाहीं तर वैरणीऐवजीं झाडपाल्याचा उपयोग शत्रूस होईल म्हणून झाडेंसुद्धां तोडलीं ! रात्रंदिवस त्यानें इंग्रजांच्या लष्कराभोंवतीं घिरट्या घालीत असावें, वारंवार हल्ला करण्याचा रोख दाखवावा, तोफा माराव्या; बाण सोडावे, दाणावैरण मिळविण्यासाठी एखादी टोळी बाहेर पडलीच तर तिचा फन्ना पाडावा, ही त्याची मेहनत एकसारखी चालू होती; व तिचा परिणाम इंग्रजांच्या लष्करास फारच अपायकारक झाला. तथापि इतक्याही संकटास न जुमानतां नेटानें चाल करून इंग्रज श्रीरंगपट्टणाजवळ आले, तेव्हां टिपूनें ता. १५ मे रोजीं अरिकेरा येथें त्याशीं फारच निकराची लढाई केली. त्या लढाईत त्याचा पराजय झाला. मग तो श्रीरंगपट्टणास जाऊन आपल्या राजधानीचें संरक्षण करण्याच्या उद्योगास लागला. ता. १९ मे रोजीं कार्नवालीस श्रीरंगपट्टणच्या पश्चिमेस कनियामवाडी येथें येऊन उतरला.

यापुढें श्रीरंगपट्टणास मोर्चे बसविण्याचें काम राहिलें. परंतु तें काम तडीस नेण्याचें अवसान आतां इंग्रजांत राहिलें नव्हतें ! त्यांजवळ तोफा, दारूगोळा, व सैन्य मुबलक व उत्तम प्रकारचें होतें. परंतु आपलाच मुलूख उध्वस्त करण्याची जी विलक्षण पद्धत टिपूनें स्वीकारली होती, तीमुळें इंग्रजांच्या लष्करांत धान्याचा व वैरणीचा मोठा दुष्काळ पडला. टिपूच्या पदरीं पांच हजार बेद होते ते पराकाष्ठेचे हुशार व चलाख होते. त्यांनीं इंग्रजी व मराठी लष्करास येणारे जाणारे जासूद वाटेंतच मारून टाकण्याचा क्रम एकसारखा चालविला होता त्यामुळें महिना दीड महिनापर्यंत दोन्ही लष्करांची बातमी परस्परास कांहींच कळली नाहीं ! अशा स्थितींत श्रीरंगपट्टणास वेढा घालण्याचें काम चालविणें इंग्रजांस अशक्यच होतें. युद्धकर्मास लागणारें शौर्य व कौशल्य त्याजवळ भरपूर होतें, परंतु यावेळीं पोटाच्या विपत्तीमुळें हें सर्व असून नसून सारखेंच अशी दशा झाली ! " पांच रुपयांस शेर तांदूळ व नाचण्याचें पीठ तीन रुपयांस एक शेर ! वैरण लांकूड अगदीं नाहीं. तोफखान्याचे बैल झाडून मेले. गोटाबाहेर माणूस व गुरें गेलीं असतां त्यास तोडावें, लुटावें याप्रमाणें टिपूकडील बेदांनीं केलें तेव्हां धारणीचा मजकूर लिहावयाचा काय ! " शिपाई व सोजीर यास दोन दोन दिवस

फाके पडावे तेव्हां एखादे वेळीं अन्नाचा घास दृष्टीस पडावा ! स्वारांच्या घोड्यास तृणाचें दर्शन होत नसल्यामुळें घोडदळाचें आपोआप पायदळ बनत चाललें होतें ! अशी दशा झाल्यामुळें कार्नवालिसनें परत जाण्याचा निश्चय करून तोफा फोडून टाकल्या; व दारुगोळ्याचा नाश केला. अवजड सामान होतें तें सर्व निरुपयोगी करून टाकून दिलें. आबरक्रांबी याची फौज पश्चिमेकडून येत होती तिला परत जाण्याविषयीं हुकूम केला आणि लष्करचा तळ हालऊन तारीख २६ मे रोजीं बेंगरूळकडे कूच केलें.*

अशा रीतीनें ओठाशीं आलेला घास टाकून कार्नवालीसला परत बेंगरूळास जाण्याचा प्रसंग आला. त्यावेळीं अनेक आपत्तींनीं त्याच्या सैन्यास गाठलें होतें; व बेंगरुळास पोचल्यावर तरी ही स्थिति कशी सुधारतां येईल याची त्यास जबरदस्त शंका होती. टिपूनें आपला मुलूख उध्वस्त केला व तो एकसारखा मार्गे हटत होता याबद्दल इंग्रजी अधिकारी व खुद्द कार्नवालीस त्याला आतांपर्यंत भित्रा म्हणत असत. परंतु त्याच्या युद्धपद्धतीचा खरा परिणाम यावेळीं अनुभवास आला. जी तडफ आतापर्यंत कार्नवालिसच्या पराक्रमाची कीर्ति चोहीकडे फैलावण्यास उपयोगी पडली त्याच फाजील तडफेनें त्याचें नांव कायमचें बदू होण्याचा प्रसंग आला. कारण बेंगरुळाहून निघतांनाच ' ही घाई शहाणपणाची नव्हे ' अशी इशारत त्याला मिळाली होती. परंतु लष्करी विजयाच्या भरांत त्यानें तिकडे दुर्लक्ष केलें व आपणावर हा प्रसंग ओढून घेतला.

कार्नवालिसचें सैन्य बेंगरूळच्या वाटेनें परत निघालें त्या वेळचा देखावा मोठा भयंकर होता. अनेक प्रकारचे रोग, व्याधी, थकवा व उपासमार यांनीं लोक गांजून गेल्यामुळें कित्येकांनीं वाटेंतच देह ठेवले; आणि इतर रेंगाळत कसे तरी कष्टानें चालले होते. याचें कारण बेंगरूळास पोंचेपर्यंत आपले अद्याप हाल व्हावयाचे आहेत आणि तेथें पोंचल्यावर देखील कोणता प्रसंग येईल याचा नेम नाहीं हें ते जाणून होते. पण याशिवाय सर्वांत संकट म्हटलें म्हणजे आपणावर टिपूचें सैन्य अचानक रीतीनें हल्ला करील कीं काय अशी त्यांना भीति पडली होती. अशा मनःस्थितींत तें सैन्य असतांना समोरून घोडेस्वाराची एक टोळी धांवत येतांना त्यांच्या दृष्टि पडली; आणि बारकाईनें पाहिल्यावर या घोडेस्वारामागें मोठें सैन्य येत असल्याचे निदर्शक असे धुरळ्याचे लोटच्यालोट उठतांना त्यांना दिसले ! अर्थात् त्यांच्याशीं सामना देण्याची तयारी करणें त्यांना भाग होतें. सेनापतीनें घाईघाईनें

* ऐतिहासिक लेखसंग्रह पृष्ठें ४४८१।४४८२ पहा.

व्यवस्था ठरविली. लष्करी अधिकारी आपापल्या जागीं जाऊन उभे राहू लागले. इतक्यांत एक स्वार बिलकुल न डगमगतां–नव्हे मोठ्या आनंदानें–इंग्रजी सैन्याकडे आला. जवळ येऊन पोंचला तेव्हां तो मराठा घोडेस्वार आहे अशी त्यांची खात्री झाली! आणि त्यानें 'हें समोरून येणारें सैन्य टिपूचें नव्हे; परशुरामभाऊच्या हाताखालीं मराठे लोक तुमच्या मदतीसाठीं धावून आले आहेत' असा निरोप सांगितला. तो ऐकतांच निराशा, रोग व दुष्काळ यांनीं त्रस्त झालेल्या इंग्रजी सैन्यास जो आनंद झाला त्याचें वर्णन कोठवर करावें! शत्रूवर रोखण्यासाठीं तयार केलेल्या बंदुका बाजूस ठेवून त्यांनीं मराठ्यांचें अंतःकरणपूर्वक स्वागत करण्याची तयारी केली. साहसी पण या वेळीं अत्यंत अडचणींत सांपडलेल्या कार्नवालिसच्या मनास तर जें समाधान वाटलें त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. बरोबरीच्या अधिकाऱ्यांनीं दिलेला सल्ला न जुमानता व अमेरिकन युद्धांत आपल्या कीर्तीस लागलेला कालिमा धुवून टाकण्याच्या इच्छेनें त्यानें जें धाडस केलें होतें तें अंगावर येऊन कायमचीच अपकीर्ति होण्याचा समय आला होता. पण त्याही संकटांतून डोकें शाबूत राहण्यास आतां हरकत नाहीं अशी त्याची खात्री झाली.

मराठी सैन्याच्या टोळ्या मागून टोळ्या येऊं लागल्या. त्या–मोठ्या वावटळीच्या पाठोपाठ येणाऱ्या पावसाच्या सरींप्रमाणें–इंग्रजी सैन्यास सुखप्रद झाल्या. कांटक, अनुभवी व उत्साही असे मराठे घोडेस्वार त्या ओसाड बनलेल्या माळावर ऐटींत घोडे फेकीत पुढें येऊं लागले. इंग्रजी सैन्याप्रमाणें त्यांच्या घोड्यांचीं पावलें एका रांगेंत पडत नव्हती, स्वारांचा पोषाख एकरंगी नव्हता आणि हत्यारेंहि एका साच्याचीं नव्हतीं. कोणी आपली तरवार फिरवीत, कोणी भाल्याच्या फेकी करीत, आणि कित्येक तर आपल्या घोड्यांना प्रेमानें गोंजारून शाबासकी देत होते. इंग्रजांच्या मदतीस येण्यासाठीं त्यांना फार मेहनत पडली. कारण मध्यंतरी धारवाडच्या वेढ्यामुळें त्यांना अडकून राहावें लागलें. तेव्हां 'आपण ज्यांना दोस्त म्हणविलें त्या इंग्रजांना अडचणीच्या वेळीं मदत न पोचली तर तें आपल्या लौकिकास शोभणार नाहीं' असें वाटून ते या वेळीं धावून आले. आणि निजामाप्रमाणें हात हालवीत व 'खाया काळ' होऊन ते आले नव्हते; तर इंग्रजी सैन्याची भूक उत्तम रीतीनें भागविता येईल अशी धान्यसामुग्रीही त्यांनीं बरोबर आणली होती! मोहीम कशी करावी, त्यांत अडचणी कोणत्या येतात, घाईनें शत्रूच्या राजधानीवर चालून जाण्यापेक्षां रसद येण्याचा मार्ग सुरक्षित ठेवण्यासाठीं किती काळजी घेतली पाहिजे व शत्रू गनीमीकाव्याचा आश्रय करून आपणास अडचणींत कसा पाडूं शकतो वगैरे

गोष्टींची कल्पना मराठी योध्यांना फारच उत्तम प्रकारची होती. कारण त्यांनीं अनेक लढाया मारल्या होत्या, शत्रूचे डावपेंच पाहिले होते आणि युद्धशास्त्राचे नियम ते अनुभवानेंच शिकले होते. यामुळें त्यांचें सैन्य कवाइती थाटानें ' कोरबंदीनें ' आले नाहीं तरी त्याबद्दल कार्नवालिसच्या मनांत आदरभाव उत्पन्न झाला. आतां चार सहा महिने जास्त कमी लागले तरी शत्रू चीत होणार अशी त्याच्या मनाची खात्री झाली.

मराठ्यांनीं आणलेल्या सामानांत धान्यच होतें असें नव्हे; तर ' बर्मिंगहॅम येथील चाकूपासून तो भारी किंमतीच्या हिऱ्यामाणकापर्यंत सर्व तऱ्हेचा माल ' त्यांच्या लष्करी बाजारांत मिळत होता ! आणि कार्नवालिसनेंहि एक चमत्कारिक प्रकार करून खूप पैशाचा लाग एके ठिकाणीं साधल्यामुळें त्याला मराठ्यांकडून माल विकत घेण्यास फारशी अडचण भासली नाहीं. पण तो सर्व प्रकार सांगण्यापूर्वीं मराठे व मोगल इतके दिवस कोणत्या कामांत गढले होते व त्यांना येण्यास दिरंगाई कां लागली याची माहिती देणें अवश्यक आहे आणि याकरितां पुढच्या भागांत आम्ही प्रथम ती देणार आहों.



भाग ७ वा.

धारवाडचा वेढा व कर्नल फ्रेड्रिकची प्रतिज्ञा.

टिपूवर स्वारी करण्याच्या कामीं इंग्रज, मराठे व निजाम यानीं एकमतानें झटावें असा करार झाला होता. त्याप्रमाणें इंग्रजांनीं युद्धास सुरुवात झाल्यापासून दोन मोहिमा कशा प्रकारें केल्या याची माहिती येथवर दिली. आतां मराठ्यांनीं केलेल्या कामगिरीचें वर्णन आम्ही देणार आहों.

श्रीरंगपट्टणच्या स्वारीसंबंधीं दोस्तांच्या करारनाम्यांत मुख्य तीन कलमें होतीं. तीं अशीः—

१ मराठे व मोंगल यानीं पंचवीस पंचवीस हजार फौजेनिशीं टिपूच्या उत्तर सरहद्दीवर स्वारी करून होईल तितका मुलूख काबीज करावा.

२ लॉर्ड कार्नवालीस मागतील त्या वेळीं एक महिन्याच्या मुदतींत मराठे व मोंगल यांनीं दाहा दाहा हजार स्वार इंग्रजांच्या मदतीस पाठवावे. या स्वारांचा खर्च इंग्रजांनीं द्यावा. आणि उलट मराठी व मोगली फौजांच्या मदतीस इंग्रजांनीं दोन दोन पलटणें व सहा सहा तोफा द्याव्या. त्यांचा खर्च मराठे व मोंगल यानीं चालवावा.

३ टिपूचा मुलूख काबीज होईल तो तिघांनीं सारखा वाटून घ्यावा.

या कलमांवरून तिघांनीं एक दिलानें टिपूविरुद्ध झटावें हा या तहाचा मुख्य कटाक्ष दिसतो. पण दोस्तांची ही दिलजमाई पक्की नसून तात्पुरती होती; समानशत्रुत्वामुळें हे तिघे एके ठिकाणीं जमले होते. पण एकमेकांचीं अंतःकरणें एकमेकांबद्दल साशंक होतीं, मैत्री जमण्यास जी दीर्घकालीन सहकारिता घडावी लागते ती या तिघांत नव्हती इतकेंच नव्हे, तर हे तिघे आजपर्यंत केवळ शत्रु या नात्यानेंच एकमेकांस भेटले होते. मित्रत्वाच्या नात्यानें जमण्याचा त्यांचा हा पहिलाच प्रसंग होता.

या आकस्मिक भेटीमुळें प्रथम तिघांचीही थोडीशी गडबड उडाली व सामोपचार, स्नेह, नीति वगैरे शिष्टाचार प्रदर्शक भाषेस ऊत आला. पण राजकारणांत शुद्ध भावनात्मक स्नेह अगर द्वेष टिकूं शकत नाहीं. '**स्वार्थं साधयेत्**' हें राजकारणातलें आद्य सूत्र आहे.

त्यास अनुसरून या प्रसंगीं आपलें घोडें पुढें दामटण्याचा ज्यानें त्यानें प्रयत्न सुरू केला. त्यांतल्या त्यांत निजामाची बोलाचाली व गडबड फारच दिसत होती. कारण त्यानें मराठ्यांविरुद्ध इंग्रजांनीं आपणास प्रसंगोपात मदत करावी असा अंतस्थ करार करण्याचा प्रयत्न चालविला होता. दक्षिण हिंदुस्थानांत चौथाई वसूल करण्याची सनद मराठ्यांना मिळाल्यापासून ते निजामाकडून चौथ वसूल करीत. अनेक सबबीवर याची टाळाटाळी तो करी; परंतु मराठे प्रबळ असल्यामुळें त्यास अखेरीस हार खावी लागे. पाणिपतच्या युद्धानंतर मराठ्यांच्या राज्यावर जे अनेक शत्रूंचे आघात झाले व राघोबाच्या स्वार्थसाधूपणामुळें यादवी माजली त्या गडबडींत निजामानें ही खंडणी देण्याची पद्धति बंद करण्यासाठीं जोराची खटपट केली; परंतु अखेर सर्व शत्रूंचा पराभव होऊन राघोबा मराठ्यांच्या कैदेंत सांपडल्यापासून पुनः सर्व रंग पालटला होता. त्यांतूनहि राघोबा मरण पाऊन मराठी राज्यास दोनतीन वर्षें स्वस्थतेची मिळाल्यापासून सवाई माधवरावांचें यश खग्रास ग्रहणांतून सुटलेल्या सूर्यप्रकाशाप्रमाणें लोकांच्या आदरास पात्र होऊं लागलें होतें; पण हाच प्रसंग निजामास भयावह वाटूं लागला. दोन तीन कोटी रुपयाची बाकी वसूल करण्यासाठीं मराठे तगादा करणार व तो टाळण्यासाठीं त्यांच्याशीं युद्ध करण्याचा प्रसंग आला तर इंग्रजांनीं आपल्या पक्षास सामील व्हावें अशी त्याची इच्छा होती. यामुळें टिपूवर स्वारी करण्याचें इंग्रजांनीं ठरवितांच निजाम आधीं त्यांस सामील होऊन राजकारणाचे डाव टाकूं लागला.

पण इंग्रजांना निजामाच्या स्नेहापेक्षां मराठ्यांच्या स्नेहाची किंमत अधिक वाटत होती. त्यांनीं मराठ्यांविरुद्ध निजामाशीं संगनमत करण्याचें मान्य केलें नाहीं. उलट पुणें दरबारानें टिपूविरुद्ध आपल्या मदतीस यावें असें बोलणें लावलें. तथापि निजामास देखील या मोहिमेंत सामील करून घ्यावयाचा असल्यामुळें कार्नवालिसनें स्पष्ट नकार न देतां 'मराठ्यांच्या विरुद्ध आपण या वेळीं कांहींहीं बोललों तरी देखील प्रस्तुत स्वारीस ती गोष्ट बाधक होईल' हा मुद्दा पुढें आणून वेळ मारून नेली. यामुळें निजामाचा हेतु साधला नाहीं. पण मराठ्यांपेक्षां आपण इंग्रजांच्या सहायास जाण्याविषयीं अधिक तत्पर आहों हें दाखविण्यासाठीं निजामास जितकी गडबड व बोलाचाली करणें शक्य होतें तितकी तो करीत होता. 'मेडोज दक्षिणेकडून टिपूवर चालून गेला असून, स्वतः कार्नवालीस देखील स्वारीवर निघणार. आमचा सरदार दाराजहा यानें फौजेसुद्धा कुच केलें व स्वतः आम्हीं स्वारीवर दाखल होणार. मराठी सैन्यानें लौकर या स्वारींत सामील व्हावें; आणि त्या-

बरोबर पेशवे सरकार किंवा निदान नाना फडणीस तरी निघाले पाहिजेत, तर कराराप्रमाणें टिपूच्या मुलखाची तिजाई त्यांना मिळेल, एरव्हीं मिळणार नाहीं ' असें निजामानें बोलणें लावलें होतें.

मराठे या आरडाओरडीचें इंगित जाणत होते. या शब्दजालाखालीं निजामानें जें आमिष ठेवलें होतें त्याचा लोभ इंग्रजांना वाटणार नाहीं हें मराठ्यांनीं सहज ओळखलें; पण आपल्याविरुद्ध इंग्रजांची दोस्ती संपादन करण्याची इच्छा निजामास झाली याबद्दल मात्र मराठ्यांना विषाद वाटला. अलीकडे त्यांनी निजामाची मैत्री जोडण्यासाठीं बरीच मेहनत चालविली होती. ' आपण दोघे शेजारी, व जवळ जवळ एका तोलाचे. यामुळें आमच्यांत वितुष्ट आल्यानें दोघांच्याही मुलखाची पायमल्ली होते; कोणाचाही कायमचा जय अगर पराजय होत नाहीं. त्यापेक्षां आपण स्नेही या नात्यानें वागूं तर फार फायदा होणार आहे ' हें तत्त्व निजामास समजाऊन देण्यासाठीं पुणें दरबारची मंडळी झटत होती. पण मराठ्यांना खंडणी भरून त्यांचा स्नेह जोडावा ही गोष्ट निजामास बरी वाटेना; इतकेंच नव्हे तर आपण पाश्चात्यांचा स्नेह जोडून एकवेळ तरी मराठ्यांचा रणांगणांत पराभव करावा अशी त्याची फार दिवसांची हौस होती.

इंग्रजाशीं देखील जमल्यास स्नेह जोडावा अशी पुणेकर मुत्सद्यांची इच्छा होती. राघोबा प्रकरण आटोपल्यापासून इंग्रजांनीं मराठ्यांविरुद्ध वर्तन केलें नाहीं. दिल्लीकडे मराठ्यांचें पाऊल पुढें पडत असतां इंग्रज स्वस्थ बसले व त्यांनीं प्रत्यक्ष अडथळा केला नाहीं. यामुळें इंग्रजांविषयीं नानाच्या मनांत अनुकूल ग्रह उत्पन्न होऊं लागला; तथापि कायमचा स्नेह घडून येण्याची वेळ अद्याप आली नाहीं हें त्यास माहीत होतें. मात्र मराठे व इंग्रज यांजमध्यें पूर्वीं उभा दावा होता तो न होंसा होऊन आस्ते आस्ते सहकार्य करण्याचे प्रसंग वारंवार येतील तर बरें असें नानास अलीकडे वाटूं लागलें होतें. या इच्छेच्या भरांत काशीक्षेत्रांत श्रीविश्वेश्वराच्या देवळाचा सभामंडप पाडून त्या जागीं औरंगजेबानें मशीद बांधली होती ती मोडून पुनः मंडप बांधण्यासाठीं औधच्या वजीराजवळ इंग्रजांनीं आपलें वजन खर्च करावें असें नानानें कार्नवालिसला सुचवून पाहिलें; परंतु ही गोष्ट देखील त्यानें मान्य केली नाहीं. तेव्हां टिपूविरुद्ध उपस्थित झालेल्या या मोहिमेंत इंग्रजांना मदत पाहिजे आहे, अद्याप त्यांना आपल्या मैत्रीची अवश्यकता भासत नाहीं, यामुळें ते आपल्या भिडेखातर यत्किंचित स्वार्थत्याग करण्यास तयार नाहींत अशी त्याची खात्री झाली. तथापि इंग्रज, मराठे, निजाम व टिपू यांनीं आपा-

पल्या राज्याच्या हद्दींत शांततेनें नांदावें व या शांततेचा बिघाड करणारावर इतर तीघांनीं तात्पुरतें संगनमत करून चालून जावें, म्हणजे देशांत स्थैर्य राहील असें नानाच्या राजनीतीचें सामान्य धोरण दिसतें.

श्रीरंगपट्टणच्या स्वारींत मराठ्यांचें सैन्य पाठविण्याचें ठरल्यावर त्याचें आधिपत्य कोणास द्यावें याचा विचार सुरू झाला. पेशवे किंवा नाना यांनीं निजामाच्या सूचनेप्रमाणें स्वारीवर निघण्याची अवश्यकता नव्हती; तेव्हां दक्षिणेकडील मोहिमांचा अनुभव असलेल्या योद्ध्याकडे ही कामगिरी सोपविणें जरूर होतें. या दृष्टीनें हरिपंत फडके व परशुरामभाऊ या दोघांची निवड या वेळीं करण्यांत आली. पैकीं हरिपंत पोटदुखीनें हैराण असल्यामुळें परशुरामभाऊंनीं या स्वारीवर प्रथम निघावें असा निश्चय ठरला.

या स्वारींत मराठ्यांची पंचवीस हजार फौज जावी अशी नानांची योजना होती. तिचा तपशील असा; पटवर्धनांचे सरंजामी स्वार तीन हजार, भाऊंनीं नवीन ठेवावयाचे स्वार सात हजार, रास्ते तीन हजार, प्रतिनिधी दोन हजार, गणपतराव मेहेंदळे दोन हजार व किरकोळ आठ हजार. याशिवाय सरकारांतून पांच हजार गारदी द्यावे व पांच हजार भाऊनीं नवीन ठेवावे असें ठरलें होतें.

मराठी सैन्यांत सामील होण्याकरितां इंग्रजांनीं कांहीं पायदळ व तोफा पाठविण्याचें कबूल केलें होतें. त्याप्रमाणें त्यांचें सैन्य मे महिन्यांत मुंबईहून निघालें. कॅपटन लिट्लच्या हाताखालीं आठवी पलटण व कॅपटन अलेक्झांडर मॅकडोनाल्ड याच्या हाताखालीं अकरावी पलटण मिळून आठ आठशें लोकांच्या दोन पलटणी होत्या; शिवाय एक यूरोपियनांची कंपनी, तोफखान्याच्या दोन कंपन्या आणि सहा तोफा बरोबर होत्या. मिळून सरासरी अडीच हजार माणसांचा जमाव यावेळीं मुंबईहून निघाला. तोफखान्याचें आधिपत्य कॅपटन थामसन यांजकडे होतें.

मे महिन्याच्या १५ व्या तारखेस हें सैन्य मुंबईहून निघालें तें जयगडच्या खाडींतून संगमेश्वरास आलें. तेथून अंबाघाट चढून पावसाचा मारा सोशीत हें सैन्य ७ जून रोजीं घाटमाथ्यावर आलें. नंतर २६ तारखेस हीं पलटणें अंबाघाटापासून ५० मैलांवर कुमठ्यास दाखल झालीं.

तेथें परशुरामभाऊंच्या हाताखालीं सरासरी वीस हजार घोडेस्वार व दाहा हजार पायदळ जमलें होतें. त्यांत हें इंग्रजी छोटें सैन्य सामील झालें. नंतर मालगांव, मिरज, रायबाग, गोकाक, मनोली या वाटेनें कृष्णा, घटप्रभा, व मलप्रभा या नद्या ओलांडून ६ सपटेंबर रोजीं हें सैन्य टिपूच्या राज्यांत शिरलें.

अशा रीतीनें मराठ्यांचें सैन्य धारवाडच्या किल्ल्यापासून पांच मैलांवर असलेल्या नरेंद्र गांवाजवळ येईपर्यंत त्यास टिपूच्या सैन्याकडून कांहींच उपसर्ग पोचूं शकला नाहीं. पण तेथून झटापटीस प्रारंभ झाला. रोज सकाळीं नरेंद्र गांवापासून मराठ्यांनीं कांहीं तोफा धारवाडच्या किल्याकडे न्याव्या; किल्यापासून अर्ध्या मैलावर असलेल्या एका टेकडीवरून संध्याकाळपर्यंत मारा करावा आणि संध्याकाळीं पुनः तोफा तळावर ओढून आणाव्या असा क्रम चालला होता.

पण धारवाडच्या वेढ्याचें काम खरोखर यानंतर एक महिन्यानें सुरू झालें असें म्हणतां येईल. नरेंद्राहून रोज तोफा आणून तिसरा प्रहरपावेतों शेंपन्नास गोळे मराठ्यांनीं टाकले तरी त्यांचा मारा किल्ल्यापर्यंत होत नव्हता; कारण टिपूचे लोक किल्यावरून, पेठेजवळून व बातेऱ्यावरून शेंपन्नास गोळे मराठ्यांवर फेकीत यामुळें मराठ्यांना किल्याच्याजवळ जातां येत नसे. अर्थात अशा रीतीनें रोज येरझारा करण्यानें शत्रूस तंबी पोचत नाहीं, व्यर्थ आपला दारूगोळा व घोडीं-माणसें मात्र खराब होतात असें पाहून परशुरामभाऊंनीं नरेंद्राहून कूच करून धारवाडच्या पूर्वेस एका कोसावर नवलूर म्हणून गांव आहे तेथें मुक्काम केला. आणि दुसरे दिवशीं तेथून तोफा घेऊन धारवाडच्या दक्षिणेस मैराळ टेकडीवर एक चांगलें देवालय होतें तेथें प्रातःकाळीं दोन घटका दिवसास भाऊसाहेब जाऊन बसले. या टेकडीपासून धारवाड शहर (म्हणजे पेठ) एका बाणाच्या खाचेवर आणि तेथून किल्लाही तितक्याच अंतरावर होता. भाऊसाहेबांच्या बरोबर चारपांचशे स्वार व सखोजी काटे आणि नारायणजी बाबर असे दोघे पागे होते. लौकरच इंग्रजी फौजेचे अधिपति लिटली (कॅप्टन लिट्ल), त्याच्या तोफखान्याचा सरदार टामसन आणि दुसऱ्या पलटणाचा साहेब मेघडालन (मॅकडोनाल्ड) असे तिघेजण व मराठ्यांचा तोफखाना त्या टेकडीजवळ येऊन पोचला. तेव्हां शत्रूच्या लोकांनीं मैराळ टेकडीच्या रोखानेंच सर्व मारा सुरू केला. किल्ल्यावरून व बातेऱ्यांवरून तोफांचा मारा नेहमींपेक्षां जोराचा होऊं लागला व पेठेंतून (म्हणजे शहरांतून) तीन हजार पायदळ व तीन तोफा नीट टेकडीच्या रोखानें पुढें येऊं लागल्या, या वेळीं दिवस चार पांच घटका आला असेल नसेल. मराठ्यांचीं जमवाजमव अद्याप चांगलीशी झाली नव्हती. यामुळें शत्रूची टोळी पेठेंतून निघाली ती मैराळ टेकटीपासून लहानशा जेजालेच्या अंतरानें एकतळ्या मेढ आहे तेथें येऊन तिनी तोफा टेऊन बेमुरवत मारूं लागली; व टेकडीच्या आसपास चोहींकडून गोळ्यांचा वर्षाव सुरू झाला.

पण भाऊसाहेब या वर्षावांत स्वस्थपणें उभे राहून सैन्याची हालचाल पहात होते. तेव्हां सखोजी काटे भाऊसाहेबांजवळ येऊन म्हणाला "आज त्यांचा रंग एक प्रकारचा दिसतो. जर त्यांनीं चालून घेतलें, तर या समयीं येथें जमाव बहुत थोडा आहे; दम धरवणार नाहीं. अम्हांस आज्ञा दिल्यास आम्हीं येथून उजवीकडे एका गोळीच्या माऱ्या-वर उभे राहतों. जर त्यांनीं आपल्यावर चालून घेतलें तर आम्हीं आडवीं घोडीं घालतों." तेव्हां भाऊसाहेबांनीं तसें करण्यास परवानगी दिली व सखोजी काटे व नारायणजी बाबर आपल्या पागासुद्धां धारवाडच्या नदि पूर्वेकडून चालूं लागले. नंतर कप्तान लिटली भाऊसाहेबांजवळ येऊन म्हणाला "आज किल्ल्यांतील बहुत लोक आम्हा-वर चालून आले आहेत. दोन तीन हजार माणूस आहे, तीन तोफा आहेत. त्यास त्यांनीं मागें जाईन म्हटलें तर पेठ एक गोळीच्या अंतराची जागा. यासमयीं आज्ञा केल्यास आम्हीं चालून जाऊन तोफा घेतों. तुम्ही आपले गारद्यांची कळागत लावावी म्हणजे आम्ही एके बाजूनें उठतों; नाहींतर आमच्या बरोबर गाडदी यानीं उठावें. परंतु आपल्या बरोबर गाडदी उठले तर विना अंगाशीं अंग लागल्याशिवाय वार काढूं नये." परंतु गाड्यांचे जमातदार म्हणूं लागले कीं "आम्हीं धांवत, बार काढीत जाऊं." हें लिटलीच्या मनास येईना. इतकी बोलाचाली होईतोंवर दाहा घटका दिवस आला. तेव्हां 'आज उशीर झाला, उद्यां पाहतां येईल' असें म्हणून लिटली उगाच बसला. इतक्यांत मराठ्यांच्या दोन पागा बाजूस किल्ल्याजवळ गेल्या होत्या त्यांजवर फारच जोराचा मारा झाला. त्या गडबडींत एक गोळा येऊन खुद्द नारायणजी बाबर यालाच लागला! डावे हाताच्या फऱ्याजवळ बसला तो उजवे कुशीस पार होऊन गेला! अशा रीतीनें नारायणजी ठार झाल्याचें वर्तमान येतांच भाऊसाहेबांस फार संताप आला. त्यांनीं लिटलीस सांगितलें कीं 'आम्हांपुढे तोफा आल्या आहेत त्या पाडाव झाल्याच पाहिजेत. तुम्ही करीत असल्यास बरें; नाहीं तर आम्ही गाडदी उठवितों; आणि फौजाही उठवितों.' तेव्हां लिटलीनें उत्तर केलें "ऐसी मर्जी असल्यास तोफांचा पाड काय आहे! मीच तोफा घेतों" नंतर लिटलीनें आपल्या पलटणी टेकडीच्या पाय-थ्याशीं उभ्या केल्या आणि तोफा टेकडीवर चाढविल्या. एक तोफ भाऊसाहेबांच्या उजव्या हाताकडे व दुसरी डाव्या हाताकडे ठेवली आणि तोफखान्याच्या सरदारास लिटलीनें सांगितलें कीं "आंतील लोक आले आहेत त्यांजवर चालून घेतों. तूं या या दोन्ही तोफांचा मारा त्या लोकांवर धर." नंतर तो भाऊसाहेबांपाशीं आला; आणि

म्हणाला "सरकारचे गाडदी बसले आहेत त्यांस कलागत लावणें म्हणून सांगावें. आम्ही तोफावर लेण उठवितों." तेव्हां भाऊसाहेबांनीं गाड्यांकडे सांगून पाठविलें व त्यांच्या अंगानें गोळागोळी सुरू झाली. तेव्हां लिटलीनें आपल्या पालटणींपैकीं तीनशें माणसांची एक लेण पुढें आणली. तेव्हां भाऊसाहेबांनीं लिटलीस विचारलें कीं 'साहेब! आंतील तीन हजार माणूस उभें असतां तीनशें माणूस त्यांजवर उठवितां हें काय? तेव्हां लिटलीनें सांगितलें कीं 'तीनशें लोक पुरेत! खातरजमा आपल्यास असूं द्यावी.' तुम्ही पहात राहावें. तीनशें माणसांनिशीं तिनी तोफा घेतों ही खातरजमा असूं द्यावी. इतकें म्हणून टेकडीखालीं लेण उभी होती, त्या लेणेस लिटलीनें आपली टोपी काढून दोन वेळां फिरविली. तेव्हां तीनशें माणसांची तुकडी चालूं लागली. हें पाहून खासा लिटली टेकडी खालीं जाऊन नीट त्यांच्या लोकांवर चालून गेला. एक दुर्बीण मात्र त्याच्या हातांत होती. तसेंच चालून त्यांच्या तोफांपर्यंत तीनशें माणसांनिशीं जाऊन आंतील लोक मारीत होते त्यांच्या अंगास अंग भिडल्यावर मग खासा लिटली रुमाल फिरवूं लागला. त्याबरोबर इंग्रजांच्या सलका सुटूं लागल्या. आंतील तीन हजार बार असतां तीनशें माणसांचा मार सोसवेनासा होऊन पळूं लागले! इंग्रजांचे उजवे बाजूनें मराठ्यांचे राहिले होते तेही इंग्रजाबरोबरच तोफांपाशीं गेले. इंग्रजांनीं तोफा मागें टाकून पुढें पेठेकडे चाल केली. इतक्यांत शत्रूच्या कुमकेस कांहीं लोक आले. तेव्हां मराठ्यांची फौज उठली व घोडेस्वारांनीं शत्रूच्या लोकांना पेठेच्या दरवाजापावेतों मारीत नेलें. आणि नंतर सारे लोक मागें सरून आसऱ्यास आले. तिन्ही तोफाही आणल्या. शत्रुसैन्यापैकीं या दिवशीं दीडशें पावेतों माणूस ठार व शें दोनशें जखमी झालें असेल. मराठ्यांकडील दोनशेंपर्यंत लोक ठार व जखमी झाले. त्या दिवशीं इंग्रजानें बहुत तारफेनें लढाई केली. इंग्रजाच्या फौजेचे बार दाहा आखास एक बार याप्रमाणें यावत् लिटली फिरून भाऊसाहेबांपाशीं येईतावत्पर्यंत मार सारखा धरला होता. मग बंद केला. इंग्रजांच्या करण्यास हद्द आहे! भाऊसाहेबांनीं लिटलीची तारीफ केली. जर त्या दिवशीं इंग्रज उठत नव्हता तर तोफा येत नव्हत्या. *

हातघाईचा प्रसंग आला असतां इंग्रजी कवाइतीं फौज व बंदुकांचा मारा कसा

---

* मैराळ टेकडीजवळ झालेल्या चकमकीचें हें वर्णन ऐति० लेख० नं० ३२३८ च्या पत्रावरून क्वचित फेरफार करून बहुतेक जशाचें तसें घेतलें आहे.

यशस्वी होत असे आणि त्यांच्या धाडसानें एतद्देशीय लोक कसे विस्मित होऊन जात याची कल्पना या तत्कालीन वर्णनावरून चांगली येण्याजोगी आहे.

पण ही पद्धति यशस्वी होण्यास हातघाईचा प्रसंग आला पाहिजे आणि तोही लौकर आला पाहिजे हें विसरतां कामा नये. शत्रूनें समोरून युद्ध करण्याचे प्रसंग टाळले, किंवा चेंगटपणाची झोंबाझोंबी सुरू होऊन दिवसगत होऊं लागली तर ती स्थिती कवाइती पद्धतींत वाढलेल्या लोकांना असह्य वाटे. यामुळें अशा परिस्थितींत इंग्रजी अधिकारी अधीरपणानें व अपुऱ्या तयारीनिशीं शत्रूवर चाल करीत आणि कित्येक वेळां फजीत पावत. धारवाडच्या वेढ्यांत असा एक प्रसंग इंग्रजी सैन्यावर आला, त्यांचे वर्णन आतां आम्ही करणार आहों.

मागें सांगितल्याप्रमाणें मैराळ टेकडीजवळील चकमकींत इंग्रजी सैन्यानें पराक्रम गाजविला तरी धारवाडचा किल्ला ताब्यांत येण्याचें लक्षण दिसेना. दोन तीन तोफा शत्रूच्या ताब्यांत गेल्या किंवा शेंदोनशें लोक ठार झाले म्हणून किल्ल्यांतील लोकांचा धीर खचण्याजोगा नव्हता. कारण हा वेढा पुष्कळ दिवस टिकणार असें ठरवून भरपूर धान्य-सामुग्री, दारूगोळा व मनुष्यबळ वगैरेची तरतूद बदरजिमालखानानें किल्ल्यांत पूर्वीपासून चांगल्याप्रकारें करून ठेवली होती; व किल्ला शेवटपर्यंत लढविण्याचा त्याचा निश्चय होता. अर्थात् किल्ला हस्तगत होण्यास बरेच दिवस लागतील हें परशुरामभाऊंस माहीत होतें आणि त्याच अनुरोधानें त्यांच्या सर्व हालचाली सुरू होत्या. या वेळीं घाई करण्यांत अर्थ नाहीं, धीरा धीरानें पाऊल पुढें टाकीत वेढा पक्का केला पाहिजे म्हणजे शत्रूची उपासमार सुरू होऊन तो शरण येईल अशा हिशेबावर भाऊसाहेबांनीं वेढ्याचें काम चालू ठेवलें होतें.

या धोरणास अनुसरून त्यांनीं धारवाडच्या किल्ल्यास जेथून जेथून रसद पोंचण्याचा संभव होता तीं तीं ठाणीं हस्तगत करण्याची आधीं व्यवस्था केली. हुबळी, दोदवाड, मिश्रीकोट, सावनूर, लक्ष्मेश्वर, जडे, अनवटी, सोंदे, गजेंद्रगड, हरपनहल्ली, उचंगीदुर्ग वगैरे ठिकाणीं ल्हानमोठ्या सैन्यानिशीं भाऊसाहेबांनीं सरदार पाठविले व त्यांनीं बहुतेक ठाणीं हस्तगत केल्याचीं वर्तमानें रोज येऊं लागलीं. धारवाडच्या किल्ल्यावर रोज शेंदीडशें गोळे मारीत बसल्यानें काम भागेल असें त्यांना कधींच वाटत नव्हतें. पण त्यांची दृष्टि धारवाड हस्तगत करण्यापेक्षां धारवाडचे धागे तोडण्याकडे विशेष लागली होती. आधीं दूरपर्यंत पसरलेल्या मुळ्या तोडून नंतर बुंध्यावर आघात केला तर तो वृक्ष

लौकर उमळून पडतो या व्यावहारिक अनुभवावर भिस्त ठेवून त्यांनीं टिपूच्या राज्यांत दंगल माजवून तेथून धारवाडास मदत येण्याचा मार्ग आधीं अशक्य करून ठेवला. हें सर्व जमून येईपर्यंत बदरीजमालखानास जाग्यावरून हालतां येऊं नये म्हणून धारवाडाजवळ भाऊसाहेबांनीं ही तोफांची चाळवाचाळव सुरू ठेवली होती इतकेंच; पण त्यांचें खरें लक्ष समोरच्या दखाव्यापेक्षां दूरवर पसरलेल्या मराठी सैन्याच्या बातमीकडे अधिक होतें. कारण एकंदर युद्धाच्या दृष्टीनें शत्रु जेरीस येण्यास या दुसऱ्या गोष्टीचें महत्त्व पहिल्या इतकेंच किंबहुना त्याहीपेक्षां अधिक होतें.

धारवाडास बाहेरून रसद येण्याचा संभव फारसा राहिला नाहीं व किल्ल्यापासून वीस पंचवीस मैलांपर्यंतच्या घेरांत मराठी सैन्य वावरूं लागलें अशी खात्री होतांच भाऊसाहेबांनीं ' बाहेरील लोकांनीं किल्यांत जाऊं नये व आंतील लोकांनीं किल्यांत येऊं नये ' असें जाहीर रीतीनें कळविलें व ' दस्तकाखेरीज माल येऊं देऊं नये. ज्याजवळ दस्तक नसेल तो कोणाचाही असो, लुटावा ' अशी ताकीद झाली.

पण नुस्ती ताकीद केली म्हणून कोण ऐकतो ? अनेक उपायांनीं किल्यांत धान्य पोचविण्यासाठीं बाहेरचे लोक प्रयत्न करीतच होते. तेव्हां त्यांना दहशत बसेल असा उपाय योजणें अवश्यक झालें. इतक्यांत मराठ्यांच्या बाजारांतील एक तांबोळी हुबळीस जात असतां शत्रूच्या लोकांनीं धरून त्याचें नाक कापून त्यास परत लष्करांत पाठवून दिलें. तेव्हांपासून किल्यांत सामान पोचविण्यासाठीं जाणारे शत्रूचे लोक सापडले कीं, त्यांचें नाक कापून जशास तसें या न्यायानें ' शत्रूचाच जाबता उतरावयास प्रारंभ झाला. ' शिवाय कित्येकांचे हातपाय तोडले. यानंतर गुप्त रीतीनें रसद पोंचविण्याचें काम बायका करूं लागल्या. तेव्हां मराठ्यांनीं त्यांचीं देखील नाकें कापलीं. यामुळें चोहीकडून मोठी दहशत बसली.

अशा रीतीनें बाहेरची मदत येईनाशी झाली तेव्हां आंतल्या लोकांची उपासमार सुरू झाली व रोज दाहावीस लोक कंटाळून शत्रुसैन्यांतून पळून जाऊं लागले व एकंदरींत शत्रूचा उत्साह कमी होऊं लागला. या स्थितींत तारीख तेरा डिसेंबर रोजीं भाऊसाहेबांच्या फौजेनें धारवाडच्या पेठेवर हल्ला करून ती ताब्यांत घेतली. या वेळीं शत्रूच्या फौजेनें चांगली मारामारी केली; पण मराठी घोडेस्वार, गारदी व इंग्रजी पायदळ यांनीं शत्रूस उधळून लावलें व त्याच्या तीन तोफा पाडाव आणल्या. या हल्याचे वेळीं देखील लिटलीनें ' शिपाईगिरीची कस्त ' चांगली केली.

यानंतर किल्ल्याच्या दक्षिणेस शत्रूच्या थोड्या बातेऱ्या राहिल्या होत्या. त्या ताब्यांत आल्या आणि तेव्हांपासून शत्रूचा प्रसार किल्याबाहेर मुळींच राहिला नाहीं.

अशा प्रकारें वेढ्याचें काम पद्धतशीर रीतीनें चाललें होतें; परंतु तेवढ्यानें मुंबई येथील इंग्रजी अधिकाऱ्यांचें समाधान होईना. आठ पंध्रा दिवसांत धारवाड काबीज करून मराठी सैन्यानें खुद्द टिपूच्या राज्यांत उत्तरेकडून प्रवेश करून त्यास शह दिला पाहिजे म्हणजे मेडोजचें काम हलकें होईल असें त्यास वाटत होतें. पण दोन महिने झाले तरी किल्ला ताब्यांत आला नाहीं असें पाहून मुंबईकरांनीं मराठ्यांच्या मदतीकरितां आणखी दोन तीन पलटणें रवाना केलीं. तीं धारवाडास पोचतांच सर्व इंग्रजी पलटणांचें आधिपत्य लिटलीकडून काढून कर्नल फ्रेडरिक यांजकडे देण्यांत आलें.

हा फ्रेड्रीक उद्दाम स्वभावाचा मनुष्य होता. तो ज्यास त्यास टाकून बोलत असे. धारवाडास पोचतांच त्यानें वेढ्याचे कामीं उगाच दिरंगाई केल्याबद्दल सर्वच लोकांना दोष देऊन १०।२० दिवसांत किल्ला सर केलाच पाहिजे असा आग्रह चालविला. भाऊसाहेबांच्या मतें किल्याची तटबंदी ढासळल्याखेरीज हल्ला चढविण्यापासून कांहीं फायदा होणार नाहीं असें होतें. यामुळें त्यानीं पुण्याहून आणखी तोफा व दारूगोळा आणवून मारा सुरू ठेवला. परंतु मराठ्यांचें सर्वच काम अव्यवस्थित व गबाळेपणाचें असतें असें फ्रेड्रिकचें व कित्येक इंग्रजी अधिकाऱ्यांचें म्हणणें होतें. मराठ्यांना तोफांची मारगिरी शास्त्रशुद्ध रीतीनें करतां येत नाहीं; यामुळें उगाच दिवसगत लागते असा एकंदरींत इंग्रजी अधिकाऱ्यांचा अभिप्राय होता. एडवर्ड मूर आपल्या या वेळच्या रोजनिशींत लिहितो " भाऊसाहेबांच्या तोफा किल्यावर इतके दिवस मारा करीत असून अद्याप तट ढासळण्याचें लक्षण मुळींच दिसत नाहीं. आग्नेयीकडील सर्व बाजूवर हा मारा सरसकट चालू असतो; पण त्या माऱ्याचा रोख एखाद्या विवक्षित ठिकाणावर नसतो. फत्तेबुरजावर टिपूचें निशाण फडकत आहे तें आहेच. त्याला कांहीं धक्का लागलेला दिसत नाहीं. एकवेळ हें निशाण मराठ्यांनीं पाडलें पण तें लगेच पूर्ववत उभें करण्यांत आलें आणि तेव्हांपासून तें रात्रंदिवस तेथें फडकत आहे. मराठे ज्या पद्धतीनें लढत आहेत तीच पद्धति चालू राहावयाची असेल तर त्यानीं वीस तोफांचा मारा किल्ल्यावर सुरू ठेवला तरी किल्ल्याचा कोट पाडून तो सर करण्याचें काम तडीस जाण्यास सात वर्षें तरी पुरतील किंवा नाहीं याची वानवाच आहे ! तोफेंत दारू भरून तोफखान्याचे सर्व लोक गप्पा मारीत बसतात; नंतर बत्ती दिल्यावर तास अर्धा तास चिलीम

झोकतात आणि तोफेच्या गोळ्यानें खूप धुरळा उडालेला दिसला कीं, तोफ उडविल्याचें सार्थक झालें असें ते समजतात! नंतर पुनः बार भरतात आणि गप्पा व तंबाकू ओढणें सुरू होतें! दोन प्रहरीं दोन तासपर्यंत म्हणजे एक वाजल्यापासून तीन वाजेपर्यंत दोनही पक्ष तोफांची मारगिरी बंद ठेवतात. कारण ती जेवणाची वेळ असल्यामुळें त्यावेळीं तोफांचा मारा सुरू राहूं नये ही गोष्ट दोनही पक्षास मान्य आहे!"

यानंतर तोफांची मारगिरी करण्याचें काम कर्नल फ्रेड्रिक यानें आपणाकडे घेतलें व तटबंदीवर जोराचा मारा सुरू केला. परंतु लौकरच दारूगोळा संपला, यामुळें त्याचाहि यत्न खुंटला. भाऊसाहेबांनीं पुनः कांहीं दारू आणावी; परंतु तीही संपल्यामुळें काम बंद पडावें, असा प्रकार वारंवार होऊं लागला.


टिपू सुलतान.

यामुळें व एकंदरींत फ्रेड्रिक उतावळ्या व गर्विष्ठ स्वभावाचा असल्यामुळें त्याचें बोलणें बेफामपणाचें येऊं लागलें. एके दिवशीं भाऊसाहेबांनीं त्यास मोर्चाचें सामान पुरवून 'तोफेची मारगिरी कोण्या जाग्यावरून योजिली आहे ती सांगावी' म्हणून विचारलें; परंतु फ्रेड्रिकनें उद्दामपणें उत्तर दिलें कीं, "योजिलेली जागा आमच्या तीर्थरूपांस देखील सांगावयाची नाहीं! सुरू होईल तेव्हां कळेल." तथापि हा हिंमत धरून काम करतो व ही भांडाभांडीची वेळ नव्हे हें लक्षांत आणून भाऊसाहेबांनीं या 'कठोर बोलण्या' कडे लक्ष दिलें नाहीं.

पण फ्रेड्रिक नुसतें कठोर बोलून थांबेना. त्यानें मराठी सैन्याची बेअब्रु करण्याचा

प्रसंग आणला. त्याचें वर्णन स्वतः परशुरामभाऊंनींच एका पत्रांत (ऐ. ले. नं. ३२७७) केलें आहे तें येथें देतों.

"इंग्रजाकडील पलटणवाला कर्नल फेड्रिक याचें बोलणें जे ' धारवाडचा किल्ला विसा रोजांत फत्ते करावा याप्रमाणें मुंबईहून निघतेसमयीं हुकूम आहे. येऊन सोळा सतरा दिवस जाले. याउपर मुरत लागावयाची नाहीं. यास्तव खंदक भरावयास शेराचे वगैरे भारे व शिड्या येणेप्रमाणें सरंजाम जलदीनें द्यावा; म्हणजे हल्ला करून स्थळ घेतों. हें काम आपल्या पलटणानिशींच करणार. सरकारच्या लोकांनीं (मराठ्यांनीं) येऊं नये. तमाशा पहावा. अथवा सरकारच्या लोकांनीं ही गोष्ट करावी आम्ही पाहूं. कोणी कोणाची कुमक करूं नये. आम्ही स्वतंत्र कार्य केल्यास स्थळ देऊं न देऊं हा अंदेशा येत असल्यास आणों नये. सरकाराशीं तफावत करणार नाहीं. किल्यांत नक्त ऐवज असेल तो घेऊन आमच्या शिपायास बक्षीस देऊं. वरकड जिनसीस हात लावणार नाहीं. आम्हांजवळ सामान आहे तें थोडें असें वाटत असेल त्यास याच सामानानें धारवाडासारखे दोन किल्ले विल्हेस लावूं ! इतकें सामान यासाठींच आणावयास कारण एवढेंच कीं, काम जलदीनें व्हावें, हर इलाज करून या जाग्यांतून मोकळें झालें पाहिजे. याचा इत्यर्थ काय तो सांगावा ' म्हणोन. त्याजवरून विचार पहातां ही गोष्ट बुद्धिपरती आहे ! यास काय अजमास समजला कळत नाहीं. जागा कुबळ (=बळकट). तोफेच्या मारगिरीनें किंवा अन्नपाण्याच्या विपत्तीनें जेरीस यावा तर तूर्त मारगिरी होत आहे, याचा विशेष काट जाला नाहीं; व थोडें बहुत भिंताड पडलेलें असावें तेंही नाहीं ! अन्नाची तूट किल्यांतून जो येतो तो बहुतच सांगतो. परंतु किल्यांत धान्याचा कांहीं संग्रह आहे. लोकांस मात्र हमखास देत नाहींत. युक्तीयुक्तीनें देतात. खंदक मातबर. भरावयाचा उद्योग केल्यास लौकर आटोपेलसें दिसत नाहीं. इतकें असोन याच्या बोलण्याची घमक मोठी ! **मनसब्यानें उत्तर सांगितल्यास याचें बोलणें प्रतिज्ञेचें पडतें.** परीक्षा पहावी तर दैववशात् त्याच्या वस्तू (हातून) छगो साधल्यास इंग्रज फार शेर होतील. आणि सरकारचे मनुष्य मुबलग असतां कांहीं प्रयोजन जालें नाहीं असें होईल, व लौकिकांत बहुतच कमी पडेल. हा अर्थ ध्यानीं आणोन (हल्ला करण्याचें आपणच) कबूल करावें तर आपल्या लोकांचा दम किती हें समजण्यांतच आहे. मोहरा (हल्ला) फिरल्यास हे (इंग्रज) तमाशा पहाणार. साऱ्यांनीं मिळोन उठावणी करावी म्हटल्यास त्याच्या चित्तास येत नाहीं ! ' **करणें**

…र स्वतंत्र करूं, कोणी कोणाची कुमक देखील करूं नये ' असे आवाज निघतात ! उत्तर सांगावयास सुचत नाहीं. मोठें संकट आहे. श्रीसत्तेकरून काय घडतें पहावें. सरकारची कुमक असावी असा आमचा बेत. परंतु त्याच्या म्हणण्यांत ' आम्ही (इंग्रज) माघारे फिरूं ही गोष्ट लक्षांत सुद्धां आणूं नये. कसेंही असो कुमकेचें प्रयोजन नाहीं. आमचें आम्ही पहातों ' त्याजवरून शेराचे वगैरे भारे व शिड्यांची तरतूद करविली आहे. ईश्वरईच्छेनें काय घडेल तें खरें. साधेल असें वाटत नाहीं. '

यानंतर आणखी दोन दिवसांनीं अमृतराव टकले लिहितो:—

" धारवाडच्या किल्ल्यास मोर्चे बसले आहेत. सरकारचे लोकांचे मोर्चे शुक्रवार पेठ व हावेरी पेठेच्या, बेगम पेठच्या व किल्याच्या मध्यें मोर्चेबंदी करोन मोर्चे बसले …त. इंग्रजाकडील मोर्चा किल्याच्या दक्षिण दिशेच्या पश्चिम दिशेच्यामध्यें बातेरी …ून मोर्चा बसविला आहे. तेथें सरकारच्या तीन तोफा इंग्रजाकडे दिल्या आहेत. …ा इंग्रजांनीं किल्यास तोफा लागू करून किल्याच्या तटास हजार गोळे लाविले आहेत. तट कांहीं ढासळला नाहीं. आणखी तोफा लागू आहेत. काट कसा होतो पहावा. सरकारचे मोर्चेकरून तोफा लागू करून फत्ते बुरूज कांहीं ढासळला. परंतु तो बुरूज आंतले तटास आहे. दुसरा तट बाहेरील शाबूद आहे. फत्ते बुरूजास तोफा लागू करून उपयोगी नाहीं. हें जाणून तोफा दुसरीकडे लागू केल्या आहेत. "

परंतु मागें सांगितल्याप्रमाणें फ्रेड्रिकनें प्रतिज्ञेचें बोलणें सुरू केलें होतें. भाऊसाहेबांनीं त्याची समजूत पाडण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. " आजपर्यंत हा किल्ला कोणी हल्ला करून घेतला नाहीं. माणसांची खराबी मात्र होईल " असें सांगून पाहिलें; परंतु ' याउपरी आपणास रहावयास पुरवत नाहीं ' असा रोखठोक जाबाब फ्रेड्रिकनें दिल्यामुळें पुढें बोलण्याची सोय राहिली नाहीं; व भाऊसाहेबांनीं त्यांस हल्याची परवानगी दिली.

यानंतर फ्रेड्रिकनें किल्लेदाराकडे निरोप पाठविला कीं " हल्ला करणार. कौलानें उतरत असल्यास पार करून देऊं, नाहींतर कत्तल करूं. " बदरीजमालखानानें उलट कळविलें कीं ' आज उद्या दोन दिवस मुहूर्त नाहीं. नंतर पल्टणींतील कोणी खासा यावा म्हणजे त्याशीं बोलणें तें बोलों. ' परंतु हें बोलणें फ्रेड्रिक यास मानवलें नाहीं. त्यानें हल्ल्याचाच बेत निश्चित केला; त्यासंबंधीं बोलणें करण्यासाठीं तो वारंवार भाऊसाहेबांकडे येऊं लागला. तेव्हा त्यांनीं सहज एकदां ' लिटलीस बरोबर आणीत नाहीं याचें कारण काय ' असा प्रश्न केला. तेव्हा फ्रेड्रिक म्हणाला ' लिटलीनें किल्ल्याचें काम केलें नाहीं; व त्यास ठाऊकही

नाहीं. मैदानच्या लढाईस मात्र योग्य. ही गोष्ट त्याची नव्हे. आणि त्यास विचारावयाचेंही नाहीं. हुकमाप्रमाणें वर्तेल. '

अशा रीतीनें स्वकीय व परकीय अशा सर्वच लोकांना मूर्ख ठरवून धारवाडचा किल्ला हल्ला करून घेण्याची हिंमत फ्रेडरिक कशाच्या बळावर धरीत होता तें आतां येथें सांगणें अवश्यक आहे. धारवाडचा किल्ला साधारणपणें गोलाकृति असून त्या सभोंवतीं दोन कोट व दोन खंदक होते. खंदकांची रुंदी व खोली २५।३० फूट असून कोटाच्या भिंती चांगल्या मजबूत होत्या, व ठिकठिकाणीं बुरूज बांधून आणि माऱ्याच्या जागा तयार करून त्यांवर तोफा ठेवल्या असल्यामुळें किल्ल्यांत प्रवेश करणें फार कठीण होतें. पण बाहेरच्या खंदकापासून एकदम आंतल्या खंदकांत—किंबहुना थेट किल्ल्यापर्यंत देखील—जाण्यास कोटाच्या भिंतीखालून एक भुयार होतें. आंतल्या कोटांत आग्नेय कोपऱ्यास ' फत्ते बुरूज ' असून त्यावर टिपूचें निशाण फडकत होतें. या बुरजाच्या पश्चिमेस बाहेरच्या तटास वरून आंतल्या खंदकांत उतरतां येण्याजोग्या पायऱ्या होत्या. मागें सांगितलेलें भुयार व ही पायऱ्यांची वाट जबरदस्तीनें ताब्यांत घेऊन आंतल्या कोटाची भिंत एके ठिकाणीं ठेंगणी होती तेथून किंवा आंतल्या खंदकावर एके जागीं बांध पडला होता त्यावरून आंत शिरतां येईल असा फ्रेड्रिकचा अंदाज होता. सारांश, बाहेरचा खंदक ओलांडला म्हणजे पुढें चाल करण्यास फारशी हरकत पडणार नाहीं अशी त्याची कल्पना होती. या माहितीच्या जोरावर त्याच्या सर्व उड्या व ' प्रतिज्ञा ' चालल्या होत्या. ही माहिती महत्त्वाची होती व तिच्या आधारावर त्यास यश मिळण्याचाही थोडासा संभव होता; नाहीं असें नाहीं. पण अपयश येण्याचा देखील तितकाच किंवा त्याहून अधिक संभव होता. तथापि प्रयोग करून पाहण्याजोगा होता एवढें म्हणतां येईल. आणि फ्रेड्रिकनें भाऊसाहेबांस कांहीं माहिती सांगितली असती तर त्यांनीं हा बेत सिद्धीस नेण्यास हरएक प्रकारें मदत केली असती; पण इतकी सरळपणाची वागणूक फ्रेड्रिकच्या हातून कशी घडावी ? आपणास मराठ्यांची यत्किंचित मदत न घेतां किल्ला सर करतां येईल व असें केल्यास मराठे सहजच आश्चर्यचकित होतील या विचारानें त्याचें डोकें फिरलें होतें. कोणी कांहीं सुचविण्याची किंवा वाद करण्याची सोय राहिली नव्हती. ' आमच्या वडिलास देखील माझा बेत कळणार नाहीं ' अशा अर्थाचें उत्तर त्याचें तयार होतें.

मागें सांगितल्याप्रमाणें भुयार व कोटाच्या आंतल्या बाजूच्या पायऱ्या गांठण्याचा

इरादा धरून फ्रेड्रिकनें आपलें सैन्य ६ फेब्रुवारी रोजीं सायंकाळीं आघाडीवर नेऊन ठेवलें; आणि ७ तारखेस पहाटे ४ वाजतां सांकेतीक तोफांचे तीन बार होतांच पलटणी चालूं लागल्या. आघाडीस भारेवाले, दोन्ही बगलास बारवाले आणि त्यांच्या मागे तोफा व पायदळ असा व्यूह रचला होता. किल्यावरील लोक सावधच होते. त्यांना या हालचालीचा सुगावा लागतांच त्यांनीं तोफा, बंदुका वगैरें साधनांनीं बेसुमार मारा केला. त्यास न जुमानता ह्या पलटणी बाहेरच्या खंदकापर्यंत पोचल्या; व भारेवाल्यांनीं खंदकांत भारे टाकण्याचें काम एक तासभर केलें. याच वेळीं मेघडालन (मॅकडोनाल्ड) यानें भुयाराच्या तोंडाजवळ खंदकांत बसून राहिलेल्या शत्रुपक्षाच्या शिपायास ठार केलें किंवा पळवून लावलें; आणि तो स्वतः भाऱ्यावर उडी मारून भुयारांत शिरणार होता. इतक्यांत फटफटीत उजाडले व शत्रूनें या भाऱ्यास एकदम आग लावली. ही आग कशी लागली याबद्दल मतभेद दिसतो. कित्येकांच्या मतें खंदकात बसलेल्या शत्रूच्या लोकांनीं ती लावली असावी किंवा दोन्ही पक्षांकडून सुटणाऱ्या बाणांच्या आगीनें भारे पेटले असावे. पण मराठ्यांच्या पत्रांत अशी हकीकत दिली आहे. " काल सोमवारीं प्रातःकाळीं तीन चार घटका रात्रीस इंग्रजांनीं हल्ला करावा म्हणोन इत्यर्थ करून इंग्रजांकडील लोक किल्ल्याचे खंदकापर्यंत गेले. खंदकांत उतरावयाचे पूर्वी पंधरा दिवस रानांतील झाडपाल्याचे भारे हजार बाराशें आणले होते. त्यापैकीं पांच सातशें भारे खंदकांत टाकिले. बाकी आणखी भारे टाकावे तों किल्यांतिल लोकांनीं तटावरून (भारे खंदकांत टाकले होते त्यांजवर) दारूचीं गाडगीं आग लावून टाकलीं व तेल व कडबा वरचेवर वरून टाकीत होते. तेणेंकरून भारे वाळले होते त्यांस आग लागून जाळ झाला. तेणेंकरून लोक खंदकात उतरावयाचे राहिले. "

एकंदरींत बरेच भारे खंदकांत पडूं देऊन नंतर त्यास वरून कडब्याची भर घालून आग लावण्यांत किल्ल्यांतील लोकांनीं चांगलें प्रसंगावधान दाखविलें यांत संशय नाहीं. कारण भारे पेटतांच जो आगीचा डोंब झाला त्याच्या आसपास उभें राहण्याची देखील सोय नव्हती; मग विझविण्याची गोष्ट दूरच राहिली. यामुळें खंदकांत उतरलेल्या किंवा पलीकडे गेलेल्या लोकांची आशा सोडून इंग्रजी सैन्यानें परत फिरावें असा हुकूम देण्यावांचून फेड्रिकला गत्यंतर राहिलें नाहीं. त्यानें तो हुकूम सोडला व पलटणी परत आपल्या ठाण्यावर आल्या.

युद्धांत पुष्कळ गोष्टी नशीबावर अवलंबून असतात, यामुळें सेनापतीची योजना

कधीं सफल होते तर कधीं उत्तम योजना देखील निष्फल ठरते. यामुळें जेथें उपाय हरतो तेथें माघार घ्यावी लागली म्हणून शूर पुरुषाच्या यशास कमीपणा येत नाहीं. याप्रमाणें फ्रेड्रिकच्या पिछेहाटीबद्दल देखील मराठी सैन्यांतील लोकांनीं कधीं फारसा दोष दिला नाहीं. पण फ्रेड्रिकचें आजपर्यंतचें वर्तन इतकें तोऱ्याचें, अट्टाहासाचें व उद्दामपणाचें होतें कीं, त्याला यापुढें लोकांत तोंड काढण्याची लाज वाटूं लागली. आपलेच शब्द आठवून तो झुरणीस लागला. 'इंग्रजांची मसलत कच्ची झाली' असा शेरा मराठ्यांनीं दिला व तो त्याला मान्य करावा लागला. आतां धारवाडचा किल्ला कांहीं दिवसांनीं ताब्यांत येणार; परंतु तो इंग्रजी सैन्याच्या अपूर्व धाडसामुळें नव्हे, तर मराठी सैन्याच्या पद्धतशीर धिम्मेपणानें येणार हें त्याला स्पष्टपणें दिसलें. यामुळें आपली प्रतिज्ञा खोटी ठरली म्हणून तो झुरणीस लागला; व डाक्तरांनीं अनेक उपाय केले तरी त्यास आराम न वाटून तो एका महिन्यांनीं मार्चच्या १२ तारखेस मरण पावला !*

---

* फ्रेड्रिकच्या मृत्युसंबंधीं आणखी एक चमत्कारिक गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. मुंबईहून तो धारवाडास दाखल झाला त्याच दिवशीं परशुरामभाऊंची भेट घेण्याचें त्यानें ठरविलें व आपल्या आवडत्या घोडीवर स्वार झाला. परंतु घोडीनें उपाई येऊन इतकी दंगामस्ती केली कीं, फ्रेड्रिक घोड्यावरून खालीं आला. पण पुनः तो वर बसून घोडी फिरवूं लागला; परंतु पुनः खालीं यावें लागलें. असा प्रकार तीन वेळ घडला. ती घोडी तडफ असून तिला नेहमीं साध्या लगामाची संवय होती. पण त्या दिवशीं काटेरी लगाम घातल्यामुळें तो तिला लागत होता; यामुळें घोडीची धडपड चालली होती असें स्पष्टीकरण मूरनें दिलें आहे. पण कारण कोणतेंही असलें तरी फ्रेड्रिकला हा 'प्रथमग्रासे मक्षिकापात झाला' असें मराठी लष्करांतील लोकांना वाटू लागलें; व या अपशकुनास न जुमानतां ही स्वारी पुढें निघाली आहे; पण ती निभाऊन येणें कठीण अशी त्यांनीं मनाशीं खूणगांठ बांधून ठेवली ! शेवटीं मागें सांगितल्याप्रमाणें हल्ल्यांत अपयश आल्यामुळें झुरणीस लागून फ्रेड्रिक मेला हीं बातमी ऐकूं आली तेव्हां त्यांना बिलकुल आश्चर्य वाटलें नाहीं. 'अहो, हें असें व्हावयाचेंच; आम्हांला तेव्हांच वाटलें होतें कीं, असें कांहीं तरी होईल म्हणून. पहिल्याच दिवशीं एवढा अपशकुन झाला, तेव्हां तो यश मिळवून, वांचून कसा परत येणार ?' असा प्रश्न ते एकमेकांस विचारीत होते. हें पाहून इंग्रजी शिपायांना मात्र मोठें आश्चर्य वाटलें !

या हल्ल्याचे वेळीं मराठ्यांनीं बिलकुल मदत दिली नाहीं; त्यांनीं याचवेळीं दुसरीकडे हल्ला केला असता तर शत्रूच्या तोफांचा सारा मारा इंग्रजी सैन्यावर पडला नसता वगैरे तक्रार कित्येक इंग्रजी लेखकांनीं केली आहे; परंतु ती व्यर्थ आहे. कारण मराठ्यांना यत्किंचित् सुगावा लागूं न देतां फ्रेड्रिकनें पहाटे अकस्मिकपणें हल्ल्यास सुरवात केली, यामुळें याच्या मदतीस कोठें व कशा रीतीनें जावें हें मराठ्यांना ठरविणें शक्य नव्हतें, बरें आयत्या वेळीं फ्रेड्रिकला विचारावें तर ' योजिली जागा आमच्या तीर्थरूपांस देखील सांगावयाची नाहीं ' असें उत्तर येत असे. यामुळें तोही मार्ग मोकळा नव्हता. पण या शिवाय सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी होती कीं ' जें करणें तें स्वतंत्रपणें करूं. कोणी-कोणाच्या मदतीस जाऊं नये ' वगैरे ठराव त्यानें भाऊसाहेबांशीं पूर्वींपासून केला होता. मराठ्यांच्या मदतीवांचून व त्यांना अशक्य वाटत असतां आपण अगदीं थोड्या सैन्यानिशीं समोरून हल्ला करून धारवाडचा किल्ला सर केला असें हिंदी लोकांस दाखवून देण्याची त्याला भारी इच्छा आणि ही इच्छा गुप्त नसून त्यानें आपली **प्रतिज्ञा** उघड-पणें जाहीर केलेली ! अशा स्थितींत मराठ्यांनीं त्याच्या मदतीस जाणें शक्य नव्हतें. यश अगर अपयश जें येईल त्याची जबाबदारी सर्वस्वीं फ्रेड्रिकनें आपल्याच शिरावर घेतली होती. यामुळें हल्ला परतल्याबद्दल दुसऱ्या कोणासही दोष न देतां तो फ्रेड्रिकलाच स्वीकारण्या वाचून गत्यंतर नव्हतें. आणि ही जाणीव होती म्हणुनच त्याला जीव नकोसा झाला व तो झुरणीस लागून मरण पावला.

भाग ८ वा.

धारवाडच्या वेढ्यासंबंधीं अवांतर माहिती.

व्यापारी या नात्यानें इंग्रजांची माहिती मराठ्यांना शिवाजी महाराजांच्या वेळेपासून होती. पण ते राजकारणांत पडूं इच्छीत नाहींत असा समज थोरल्या बाजीरावांच्या वेळेपर्यंत महाराष्ट्रांत असे. पाश्चात्यांपैकीं पोर्तुगीजांशीं लढण्याची व वलंदेज म्हणजे डच यांचा व्यापार हटवून इंग्रजांना व्यापारी सवलती देण्याची अवश्यकता मराठ्यांना भासली. त्यानंतर नानासाहेब व थोरले माधवराव यांच्या कारकीर्दींत इंग्रजांची बंगाल, अंतर्वेद व मद्रास येथील हालचाल मराठ्यांच्या लक्षांत आली; पण त्याचें महत्त्व त्यांना फारसें वाटलें नाहीं. यानंतर नारायणरावाचा वध होऊन राघोबाच्या फितुरीमुळें मराठ्यांचीं सैन्यें चोहींकडे वाटलीं गेल्यावेळीं इंग्रजांनीं अचानकपणें साष्टी घेतली व राघोबाचा पक्ष उचलून पुण्यावर चाल करण्याची हिंमत धरली; तेव्हांपासून इंग्रज राजकारणांत लक्ष घालतात व लढवय्ये या नात्यानें देखील त्यांची योग्यता उपेक्षणीय नाहीं असें मराठ्यांच्या निदर्शनास आलें. तथापि राघोबा प्रकरणामुळें झालेल्या झटापटींत कोणाचाच निश्चित विजय न झाल्यामुळें बराच मतभेद उत्पन्न झाला होता. इंग्रजांत मुंबईकर व कलकत्तेकर असे दोन तट उत्पन्न झाले. कलकत्तेकरांनीं सोडलेले हुकूम अमान्य करून मराठ्यांना तंबी पोंचविण्याचा प्रयत्न मुंबईकरांनीं दोन तीन वेळां केला; परंतु वडगांव, खोपोली वगैरें ठिकाणीं पराभव झाल्यामुळें अखेरीस कलकत्तेकरांच्या हुकुमास त्यांना मान वांकवावी लागली. तथापि इतक्या अट्टाहासानें पत्करलेला मार्ग सोडून राघोबास आपण बारभाईंच्या स्वाधीन केलें यामुळें इंग्रजांच्या लष्करी लौकिकास कलंक लागला व तो पुढेंमागें संधी शोधून धुऊन काढला पाहिजे; असें आग्रहानें प्रतिपादन करणारा एक महत्त्वाकांक्षी व जोरदार पक्ष मुंबईस अस्तित्वांत आला.

मराठी मुत्सद्यांत देखील जोराचा मतभेद उत्पन्न झाला. महादजी शिंद्यास हेस्टिंग्जशीं स्नेह करून दिल्लीकडे मोर्चा वळविणें इष्ट वाटलें. पण हेस्टिंग्ज जातांच कलक-

त्याच्या वातावरणांत झालेल्या स्थित्यंतराचा फायदा घेऊन नानानें पुणें दरबारांत इंग्रजांचा वकील आणून ठेवला. हा वकील पुण्यास आल्यापासून कलकत्तेकरांचा ओढा पुणें दरबाराकडे लागण्यास बरीच मदत झाली.

या वकीलाचें नांव मॅलेट असें होतें व तो गोडबोल्या असल्यामुळें, त्याचें बस्तान पुण्यास चांगलें जमलें होतें. किरकोळ बाबतींत तो मराठ्यांना माहिती पुरवून मिशनरी पद्धतीनें इंग्रजांची छाप पुणेकरांवर बसविण्याची खटपट करीत होता. साधें घड्याळ, **जबाबी** घड्याळ व **डबीचें** घड्याळ (वॉच्) मराठे लोक वापरूं लागले; डॉक्टर फिंडले याचें औषध कित्येक पुणेकरांना पसंत पडलें, स्वतः सवाईमाधवरावांना भूगोलज्ञान देण्याकरितां इंग्रजांच्या सहाय्यानें टिपणें तयार होऊं लागलीं व कर्मणुकीखातर चमत्कारिक प्राण्यांचें एक संग्रहालय पुण्यास अस्तित्वांत आलें. व्यापाऱ्यांची मजल याहीपुढें गेली होती. आरसे, काचेचे दिवे वगैरे विलायती मालाची एक स्वतंत्र पेठ पुण्यांत वसली होती.

पुणें दरबारांतील मुत्सद्यांची खटपट अर्थात् यापेक्षां महत्त्वाच्या गोष्टी संपादन करण्यासाठीं चालली होती. इंग्रजांकडून नकाशे तयार करविण्यासाठीं व या नकाशांत कोठें चूक आढळल्यास ते दुरुस्त करविण्यासाठीं नानांनीं इंग्रजांच्या सहवासांत असलेल्या आपल्या लोकांना पाठविलेलीं बरीच पत्रें आढळतात. इंग्रजी जाणणाऱ्या व्यंकटराम दिल्याची नेमणूक दरमाहा शंभर रुपयांवर करून विलायतची खात्रीलायक व अंतस्थ बातमी मिळविण्याची खटपट गोविंदराव काळ्यांनीं केली. फ्रान्समध्यें राज्यक्रांति होऊन बादशहास मारून रयतेनें आपलें राज्य केलें वगैरे बातम्या मराठी दरबारास कळूं लागल्या. पण या सर्व हैदराबाद, कलकत्ता, मुंबई व मद्रास येथें असलेल्या इंग्रज, फ्रेंच, वगैरे लोकांच्या तोंडून बाहेर पडलेल्या उद्गाराच्या किंवा पत्रव्यवहाराच्या आधारावर मिळविलेल्या होत्या. स्वतंत्रपणें यूरोपियन परिस्थिति पाहण्यासाठीं मराठ्यांनीं बातमीदार पाठविल्याचा दाखला आढळत नाहीं. तथापि यूरोपियन लष्करी लोक भाड्यानें ठेऊन पाश्चात्य युद्धपद्धतीची माहिती मिळविण्याचा मात्र कांहींसा प्रयत्न झालेला दिसतो. इव्हान्स नांवाचा इंग्रज दोन अडीचशें गोऱ्या लोकांनिशीं परशुरामभाऊच्या पदरीं होता. महादजी शिंद्यानें व होळकरानें फ्रेंच लोक ठेऊन कवाइती पलटणें तयार केल्याचें प्रसिद्धच आहे. याशिवाय **विमान तयार करणारे**, मोर्तेल (मॉर्टर), फुजील, कानू (कॅनन), बंब व तिरकटी तारांडी तयार करणारे, ' पिठाची

पाणचक्की ' व ' वाऱ्यावरची चक्की ' बनविणारे, तोफेंतून बहेर पडल्यानंतर ' दहा-जागीं टीप खाऊन अकरावे जागीं फूटणारे गोळे ' तयार करणारे, विलायती **माथमाटिक** विद्या जाणणारे, ' अंगांतील शिरा व हाडें कसकशीं व किती आहेत ' वगैरे सांगणारे टोपीवाले, मराठ्यांकडे नोकरीसाठीं येऊं लागले होते; (ऐ. स्फु. ले. भा. ३ पृ. ५९); आणि हळुहळू पाश्चात्यांचा खरा परिचय मराठ्यांना होऊं लागला.

अशा रीतीनें परिचय दृढ होत असल्यामुळें, दोघांनाही हातांत हात घालून काम करण्याची इच्छा उत्पन्न झाली. लष्करीदृष्ट्या आपण समबल आहों ही जाणीव दोन्ही पक्षास असल्यामुळें श्रीरंगपट्टणच्या स्वारींत मराठ्यांना सामील करून घेण्याची आवश्यकता कार्नवालीसला भासली. ' चालू युद्धांत पेशवे सरकारकडून ताबडतोब जोराचें सहाय मिळविण्यासाठीं मी वाटेल ती झीज सोसण्यास तयार आहें व टिपूकडून मिळणारी चौथाईची रक्कम बंद पडेल अशा संशयानें मराठे कांकू करतील तर युद्धाच्या अखेरीस आधीं १२ लाखांचा मुलूख मराठ्यांकडे लाऊन देऊन नंतर तीन वांटे करण्यास आपण तयार आहों ' असें पुणेंदरबारास कळविण्याबद्दल कार्नवालिसनें मॅलेटला लिहिलें होतें. *

पण या कराराप्रमाणें मुंबईकरांनीं कांहीं पलटणें परशुरामभाऊंच्या हाताखालीं लढण्यासाठीं पाठवावयाचीं असें ठरल्यामुळें कांहीं इंग्रजांना वैषम्य वाटलें. राघोबा प्रकरणांत घ्यावी लागलेली पड आठवून धारवाडच्या वेढ्याच्या प्रसंगानें आपली महती मराठ्यांना पटवून देण्याचा त्यांनीं निश्चय केला. आणि त्यास अनुसरून लढण्यांतच आपली तडफ त्यांनीं दाखविली असती तर तें न्यायाचें ठरलें असतें. कॅपटन लिटलचें वर्तन अशाच पद्धतीचें होतें; पण मुंबईकरांना तें शिळपटपणाचें वाटून वीस दिवसांत धारवाड घेऊन दाखविण्यासाठीं कर्नल फ्रेड्रिकची मुद्दाम रवानगी झाली. त्यानें मुंबईहून संगमेश्वरास पोंचल्यापासून आपले गुण उघळण्यास सुरुवात केली, व ' कार्तिक अमावास्येपर्यंत आम्ही संगमेश्वरास मुक्काम करणार. ' ' दोन तीन गोरे पळून गेले आहेत ते आणून देणें नाहीं तर प्रांतांत लोक घालतों ' वगैरे धमकीच्या गोष्टी मराठ्यांच्या अधिकाऱ्याजवळ तो सांगू लागला. यामुळें व ' चार पांच इंग्रज रात्रीं घोड्यावर बसून उगेच प्रांत चोहीकडे फिरून ' येऊं लागले व त्यांच्या पायीं ' वीस पंचवीस रेड्यांचा वध झाला ' म्हणून लोक संशयग्रस्त झाले.

हें सैन्य परशुरामभाऊंच्या मदतीस जावयाचें असल्यामुळें या दांडगाईकडे दुर्लक्ष करणें

---

* रॉसकृत कार्नवालिसचा पत्रव्यवहार खंड २ पृ. २४ पहा.

कोकणांतील अधिकाऱ्यांना भाग होतें. पण पुढें रत्नागिरीच्या सुभेदारापासून ' इंग्रजानें सहा हजार रुपये बळजोरीनें घेतले. याखेरीज रोज साडेतीन खंडी बारीक तांदूळ, साडेतीन चार मण डाळ, तूप चार मण, बकरी पन्नास, कोंबडी सवातीनशें, (कलाली) दारु, दीड खंडी व दाहा रेडे' घेण्यास त्यानें सुरवात केली; यामुळें 'इंग्रजांचे चित्तांत धारवाडास जावें हें कांहींच नाहीं ' असें ठरवून अंजनवेलकर व रत्नागिरीकर सुभेदारांनीं आठशे लोक जमा केलें. परंतु स्वतः परशुरामभाऊंनीं मध्यस्ती केल्यामुळें हें प्रकरण या वेळीं विकोपास गेलें नाहीं. ' रत्नागिरीकरांनीं प्यादे जथविण्याचें कारण नाहीं. (इंग्रज संगमेश्वर प्रांतीं) भयप्रदर्शेव.रून हुशारी दाखवितात. वांकड्या पावलाची गोष्ट नाहीं ' असें परशुरामभाऊंनीं कळविलें व फ्रेड्रिकही लौकरच तेथून निघून धारवाडास गेला.

ही सर्व हकीकत वास्तवीकरीत्या क्षुल्लक स्वरूपाची आहे. पण एका आनुषंगिक कारणामुळें या गोष्टी सांगणें आम्हांस भाग पडत आहे. कर्नल फ्रेड्रिक आडदांड व भांडखोर स्वभावाचा आहे ही गोष्ट त्या वेळीं बऱ्याच लोकांना माहीत होती व त्याची नेमणूक करण्यास कार्नवालीसनें संमति दिली नसती. परंतु ' फ्रेड्रिक व मराठे यांच्यांत मतभेद येईल, तर फ्रेड्रिकला ताबडतोब परत बोलावण्यांत येईल. ' असें मुंबईच्या जनरल आबरक्रोंबीनें आश्वासन दिल्यामुळें, फ्रेड्रिकची रवानगी या वेळीं झाली. (कार्नवालिसचा पत्रव्यवहार खंड २ पृ. ७५ पहा.) आणि शेवटीं त्यानें मागील भागांत सांगितल्याप्रमाणें धारवाडच्या किल्ल्यावर अवेळीं हल्ला करण्याचा प्रयत्न करून आपली फजीति करून घेतली; व नंतर तो या अपमानाच्या परिस्थितीस कंटाळून मरण पावला. पण हा सर्व अनिष्ट प्रकार मराठ्यांच्या हलगर्जीपणामुळें घडून आला असें म्हणणारे फ्रेड्रिकचे चाहाते इंग्रजी पलटणाबरोबर या वेळीं होते. त्यांपैकीं लेफ्टेनंट मूर नांवाच्या एका गृहस्थानें धारवाडच्या वेढ्याचे प्रसंगीं लिहिलेली रोजनिशी मागाहून छापण्यांत आली आहे. ती अर्थात् मराठ्यांविषयीं निंदाव्यंजक उद्गारांनीं भरलेली *

* मूरची रोजनिशी कर्नल फ्रेड्रिकाविषयी मित्रत्वाच्या उद्गारांनीं व मराठ्यांविषयीं निंदाप्रचुर विधानांनीं कशी भरली आहे हें दाखविण्यासाठी मार्च १ तारखेची त्याच्या रोजनिशीतली नोंद येथें मासल्यासाठी देतों.

" March the 1st.—Our line is more sickly than it has hitherto been; many officers are ill, and among them our Colonel; whose

[पुढें चालू.

आहे; पण तत्कालीन लेखकानें लिहिलेली माहिती म्हणून इंग्रजी इतिहासकार या रोजनिशींतील अवतरणें देऊन मराठ्यांची योग्यता कमी ठरविण्याचा प्रयत्न करीत असतात. परंतु रोजनिशींतील नोंदी फ्रेड्रिकविषयीं मित्रप्रेमानें अंध बनलेल्याः एका बगलबच्चाच्या आहेत हें लक्षांत ठेवलें असतां त्याच्या मतास किंमत देण्याचें कारण राहत नाहीं.

इंग्रजी सैन्यानें कच खाल्यानंतर 'युक्तियुक्तीनेंच' धारवाडचा किल्ला घेतला पाहिजे असें ठरून मराठे आपल्या उद्योगास लागले. फ्रेड्रिकच्या मृत्यूनंतर इंग्रजी सैन्याचें आधिपत्य 'सरताउस' (सारटोरियस) यांजकडे आलें. त्यानें थैले तयार करवून माती भरून ठेवली व भारे वगैरे साहित्य करविलें. परंतु 'प्रथमता पलटणवाल्यांचा दम होता तो आतां नाहीं' हें मराठ्यांना स्पष्टपणें दिसून आलें.

एकंदरीत धारवाडच्या वेढ्यांत घडून आलेल्या सहवासानें इंग्रज व मराठे यांचा परस्परांविषयींचा आदरभाव वाढण्याऐवजीं कमी झाल्याचें मात्र दिसून येतें. मराठ्यांचा तोफखाना वाईट, त्यांच्यांत वक्तशीरपणा नाहीं, शिस्त नाहीं, चोहीकडे गबाळेपणाचा कारभार दिसतो असें इंग्रजाच्या म्हणण्याचें तात्पर्य दिसतें; आणि इंग्रज धाडसी असले तरी त्यांची घाई फार व मसलत कच्ची असें मराठ्याचें म्हणणें होतें. इंग्रजांच्या हातून हें वेढ्याचें काम शेवटास जाणार नाहीं असा पूर्वीपासून अंदाज असल्यामुळें मराठे वेढ्याचें काम आपल्या पद्धतीनें करीत होते. अमक्या वेळीं सर्वांनीं

situation is peculiarly cruel, being the only Company's officer, commanding in the feild, set down before the fort of this importance, without a single requisite for reducing it, and subject to the delays, and irksome frivolity, *of our tardy allies.*—Too much confidence seems to have been placed in their promise of supplies; and it should be a caution, how, again, the success and credit of the British arms is suffered to depend upon the punctuality of a country power.—If any can be at all trusted, it certainly is the Mahrattas; but, even with them, it seems a matter of little moment to what extent their promises are made. And although, at the time, they may have no intention of breaking them, it is to be understood that failure is no discredit; nor must punctuality be expected any further than their own veiws are forwarded by observing it."

एकमतानें एकाच ठिकाणावर हल्ला करावयाचा हें धोरण मराठी युद्धपद्धतींत स्वीकारण्यांत येत नसे. ज्या त्या सरदारानें आपलें व शत्रूचें सामर्थ्य अजमाऊन पाहून कामाचा बोजा उचलावा; या कामीं वरिष्ठांच्या हुकमापेक्षां ज्याची त्याची हिंमत हीच अधीक महत्त्वाची समजली जात असे. यामुळें प्रत्येक सरदारावर युद्धाच्या कामीं सक्ती नव्हती. तरी माझ्या हातून इतरांपेक्षां अधीक पराक्रम झाला पाहिजे अशी स्वाभाविक ईर्षा रणांगणावर गेलेल्या लोकांना वाटत असे; व त्यांना आपापल्या बुद्धिप्रमाणें स्वतंत्रपणें कार्य करण्यास पूर्ण मुभा होती. हा प्रकार कवाइती पद्धतीच्या शिस्तींत वाढलेल्या इंग्रजी अधिकाऱ्यांना फारच चमत्कारिक भासे. यामुळें मन्याबापू मेंधळे, हरीपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन वगैरे अनेक सरदारांपैकीं मुख्य सेनापति कोण व मतभेद उपस्थित झाल्यास कोणाचें मत निर्णायक समजावयाचें हें गूढ इंग्रजी अधिकाऱ्यांना मराठी सैन्याबरोबर एक वर्ष घालवून देखील उकललें नाहीं !

पेशव्यांचें व पटवर्धनांचें सैन्य यामध्यें मर्दुमकी गाजविण्यासंबंधीं कशी चढाओढ होती हें दाखविण्यास काशी बल्लाळानें १५ जानेवारी १७९१ रोजीं पाठविलेल्या एका पत्रांतील उतारा देतों. (ऐतिहासिक टिपणें भा. ५ पृ. ३३ पहा):—

स्वामींची आज्ञा घेऊन पुण्याहून तोफांसुद्धां निघालों तो छ १८ रबिलाखरीं (ता. २५ दिसेंबर) लष्करांत राजश्री परशरामपंतभाऊ यांजवळ येऊन दाखल जालों. तोफा कारखान्यांत दाखल केल्या, त्याच दिवशीं भेटीस बलाविलें. त्यावरून जाऊन भाऊंची भेट मोर्च्यांत घेतली. त्या वेळेस सांगितलें कीं ' किल्ल्याचे पूर्वेकडे दरवाजा लगत किल्लेकरी यांनीं बातेरी बांधिली आहे, त्यावर जाऊन तो मोर्चा कायम करावा. ' ती गोष्ट मान्य करून गोटास आलों. नंतर दुसरे दिवशीं लोक तयार करून दारुगोळीची वाटणी केली, आणि श्रीमंतांचे चरण चित्तांत आणून चालिलों, तों पेठेंत गेलों. इतक्यांत किल्ल्यावरील तोफांचा मार आम्हांवर धरिला. तत्राप तसेंच पुढें चालिलों. बातेरींतील माणूस बाहेर पडिले. त्यांची आमची लढाई तीन घटका जाली. त्यांत आम्हांकडील पन्नास साठ माणूस जखमी व दहा ठार जालें. मारा मोठा जाला. तितका मार सोसून बातेरीवर कायम जालों. हा तमाशा राजेश्री भाऊंनीं श्रीखंडेराव याचें देऊळ टेंकडीवर किल्ल्याचे दक्षिणेस अर्ध कोशावर आहे तेथें उभें राहून पाहिला. मोठें जुंज होतें असें पाहून चार घटकांनीं दोनशें स्वार आमचे कुमकेस पाठविले. त्यापूर्वीच आम्हीं ती बातेरी घेतली. किल्लेकरी यांणीं त्या जाग्याकरितां तीन दिवसपर्यंत प्रयत्न तितका

केला. परंतु आम्हीं मजबुतीनेंच होतों. त्यांचा उपाय चालूं दिल्हा नाहीं. **हुजरून नवे लोक आले. यामुळें हटकून काम सांगितलें. परंतु स्वामींचे पुण्येंकरून कामकाजाविशीं भाऊंची खातरजमा जाली.** या बातेरीवर दोन चारदा लोकांनीं लगट केला; परंतु ढासण बसूं दिलें नाहीं. आतां कायम जालों, आणि मोर्चे पुढें चालविले. किल्ल्यांतील प्रकार तरी, दाणा आहे परंतु मीठ, मिर्ची वगैरें सामान नाहीं. " वगैरे. पुढें पुढें इंग्रजाप्रमाणें शत्रूच्या अंगावर धाऊन जाण्याचें अवसान देखील मराठ्यांनीं दाखविलें. मार्च ८ तारखेस किल्ल्यांतील दोन चारशें मनुष्य बाहेर पडून मराठ्यांच्या मोर्चावर चालून आलें. तेव्हां दोन घटकापर्यंत हत्यारांची लढाई करून त्यांना मराठ्यांनीं मागें हटविलें. चार सहा घटका झाल्यावर ' शत्रू येऊन आपली जागा पाहून गेला; तेव्हां आपणही त्याची पाहून यावें ' असा विचार करून पन्नास साठ आसामी ' नामी नामी ' जमादारांनीं चाल करून खंदकाच्या रेवणीस पोहोचून आंत उड्या घालोन त्यांच्या मनुष्यावर हत्यार चालविलें. गोळी वाजविली नाहीं. पांच चार जिवें मारलें. बाकी लोक रेवणीच्या पाळीवरून पळाले. कांहीं लोकांनीं खंदकांत उड्या घेतल्या. मग जमातदार माघारे आले. रेवणी व खंदक पाहून आले व फत्ते जाली. यामुळें शिड्या याव्या म्हणजे हल्ला करतों ' असें त्यांचें म्हणणें सुरू झालें.

अशा रीतीनें मराठी लष्करांत उमेद भरून तें धाडसानें लढूं लागलें तेव्हां त्याच्यापुढें बदरीजमालखानाच्या लोकांस दम धरवेना. किल्ल्यांतील लोकांची दाटी मोडण्यासाठीं बायका व इतर बिन लढाऊ लोक (यांना ' कचरा ' असें म्हणत) बाहेर घालविले. पण हा ' कचरा ' मराठ्यांनीं जबरदस्तीनें परत किल्ल्यांत घालविला. यामुळें आंतील लोकांवर उपासमारीचा प्रसंग आला. शेवटीं सात महिने किल्ला लढविल्यावर बदरीजमालखानानें निरुपायानें परशुरामभाऊकडे तहाचें बोलणें लावलें. आणि अकरा तोफा, रोकड द्रव्य, आणि तीनशें घोडीं घेऊन बद्रीखानानें बाहेर जावें असा करार झाला.*

---

* या कराराप्रमाणें बदरीजमालखान आपल्या गोटास उतरावयास जात असतां लष्करच्या लोकांनीं ' चैत्र मासाच्या गुंदस्त मासाचें ' (अर्थात शिमग्याचें) वाद्य करून पालखींत धूळ टाकली !

यानंतर ६ एप्रील रोजीं धारवाडच्या किल्ल्यावर मराठ्यांचें निशाण चढलें;† व बद्रीस सुरक्षितपणें जाऊं देण्यासाठीं परशुरामभाऊ झटत होते. बदरीजवळ बराच ऐवज असून लोक थोडे यामुळें त्यानें आपल्या डेऱ्याजवळ मुक्काम करावा असें भाऊंचें सांगणें होतें. परंतु बदरीला या सांगण्यांत भलता हेतू असेल असा संशय येऊन 'एक कोसावर राहावयास जाऊं म्हणोन' त्यानें आग्रह धरला. जनोबानें असें करण्यांत धोका आहे वगैरे समजाऊन सांगितलें. पण तो ऐकेना. शेवटीं संध्याकाळ झाली. तेव्हां त्याला वाटेल तिकडे जाण्याची परवानगी मिळाली. त्याप्रमाणें तो चालता झाला. कांहीं अंतरावर जातांच लुटारू लोकांनीं त्याच्या पिच्छावर गलबला करून दरोबस्त सरंजाम लुटला. हें पाहून खान घोड्यावर बसून पळूं लागला. त्याच्या पाठीवर लोक धावले, तेव्हां यांची त्यांची तोडातोड होऊन खानास चार जखमा झाल्या व तो घोड्यावरून खालीं आला. त्याच्या सर्व संपत्तीची लूट झाली; व त्यास उंटावर बांधून पुनः परशुरामभाऊकडे आणलें. एकंदरींत शरण आलेल्या बदरीजमालखानाची अशी विपत्ति झाली; हें मराठ्यांच्या कीर्तीस कमीपणा आणणारें आहे यांत शंका नाहीं. पण हा प्रकार बदरीनें आपणहून ओढून घेतला व तो न घडावा म्हणून मराठी सेनापति व अधिकारी झटत होते या गोष्टी निर्विवाद आहेत.

यानंतर जखमा बऱ्या होईपर्यंत बदरीजमालखानास नरगुंदच्या किल्ल्यांत ठेवण्यांत

---

† वर्षप्रतिपदेच्या दिवशीं धारवाडच्या किल्ल्यांतील सर्व कैदी सोडण्यांत यावे असें परशुभाऊंनीं बदरीजमालखानास सांगून पाठविलें होतें. परंतु तो मानी असल्यामुळें त्यानें "आपल्या वस्तु (हातून) ही गोष्ट घडावयाची नाहीं." असें स्पष्ट उत्तर केलें. नंतर दोन चार दिवसांनीं मराठ्यांची फौज किल्ल्यांत गेल्यावर तमाम बंदीवान सोडण्यांत आले. त्यांत ब्राह्मण, बायका व शूद्र यांचीच संख्या फार होती. इंग्रजी कैदी देखील धारवाडच्या किल्ल्यांत बरीच वर्षें टिपूनें ठेविले होते व त्यांना आयत्या वेळीं टिपूनें मारविलें अशी वार्ता ऐकण्यांत आल्यामुळें इंग्रजी पलटणांनीं पुष्कळ बारकाईनें किल्ल्यांत शोध केला; आणि कांहीं तत्रस्थ लोकांनीं इंग्रजी कैदी या खोलींत ठेविले होते असें म्हणून जागाही दाखविली; परंतु त्यास प्रत्यंतर पुरावा कोणताही मिळाला नाहीं. भिंतीवर अगर दरवाज्यावर या कैद्यांनीं आपलीं नांवें कोरलीं असतील या आशेनें कॅप्टन मूर वगैरे मंडळींनीं सर्व ठिकाणीं बारकाईनें पाहणी केली; परंतु त्यांची निराशा झाल्यामुळें शेवटीं त्यांनीं तो नाद सोडून दिला.

आलें. इकडे धारवाडच्या किल्ल्यांतून निघतांना खानानें लबाडी करून कराराप्रमाणें न वागतां चापाच्या बंदुका हजार दोन हजार मुद्दाम मोडून पेवांत घातल्याचें व तोफा फोडल्याचें उघडकीस आलें. या आरोपास बदरीकडून समाधानकारक उत्तर न आल्यामुळें, श्रीरंगपट्टणची मोहीम संपेपर्यंत त्यास कैदेंत रहावें लागलें.

धारवाडचा किल्ला ताब्यांत घेण्याच्या कामीं परशुरामभाऊंनीं शेवटीं बरीच घाई केली व बदरीजमालखानास पुष्कळ सवलती देऊन वेढ्याचें काम आटोपतें घेतलें. यामुळें बेंगरूळ घेतांना इंग्रजांनीं आपलें शौर्य व धाडस प्रगट करून आपल्या नांवाचा दरारा चोहोंकडे उत्पन्न केला तसा दरारा मराठ्यांच्या वागणुकीनें उत्पन्न झाला नाहीं. या गोष्टीची जाणीव परशुरामभाऊंस होती; परंतु पेशव्यांची फौज, पुढील मसलतीवर नजर देऊन लवकर टिपूच्या राज्यांत नेऊन भिडविणें अगत्याचें होतें; यामुळें धारवाडाकडील काम घाईघाईनें आटोपावें लागलें; वगैरे स्पष्टीकरण परशुरामभाऊंच्या एका पत्रांत आहे, तें असें.

" इंग्रजांनीं बेंगरुळासारखा किल्ला टिपू समीप असतां सहजांत घेतला, नबाबाची (निजामाची) फौज गंजी कोट्याकडे होती ती इंग्रजाचे कुमकेस दाखल जाली. पुढें पट्टणाकडे रोख केला अशीं वर्तमानें येतात. त्यापक्षीं सरकारच्या फौजेनें पेशकदमी न केल्यास (पुढें पाऊल न टाकल्यास) ठीक दिसत नाहीं. कसेंही करून गेलें असतां विशेष. तत्रापि मसलतीस आलें तसें केलें पाहिजे. युक्तियुक्तीनें आपण लिहिला बेत राखून सरकारचा नक्ष राहून, आपला बचाव होऊन, दुसऱ्याचा उपर न राहतां होईल ती गोष्ट करितों. धारवाडसंबंधें गोष्ट तहांत आणावयाची नव्हती, परंतु पुढील मसलतीवर नजर देऊन ठराव केला. तथापि बदरीस निरोप न देण्याविशीं योजना होती. आपोआप त्याचा जथ विसकटून तळावर मालचा माल होऊन राहत होता त्याप्रमाणें होत चाललें इतक्यांत त्यांची लुटालुट होऊन जखमा लागून खराबी जाली; ती त्याच्या दैवानेंच जाली. परंतु लौकिकांत ठीक नाहीं. सारांश युक्तियुक्तीनें पुढें जसें दिसेल तसें करूं. इंग्रजांनीं बेंगरूळ घेतलें. पुढें पट्टणास जाणार तेव्हां आम्हीं मागें राहतां नये. "

भाग ९ वा.

मराठे वीर व मराठे शाहीर.

ब्राह्मणी राज्य जोमदार, घोड्यावर स्वार, होते शिपाई ।
जबर सद्दि, कैकानिं पाहिली; शत्रु ठेवला नाहीं ॥

रामजोशी.

पाणिपतच्या युद्धानंतर मराठ्यांचें राज्य बुडविण्यासाठीं चारही बाजूंनीं शत्रूचा मारा सुरू झाल्यामुळें थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दींत मुलुखगिरी व स्वारी-शिकारी यांवांचून एकहि वर्ष सुनें गेलें नाहीं. त्यांतल्या त्यांत हैदरानें मराठ्यांवर एकामागून एक हल्ले करण्याचा क्रम ठेवल्यामुळें, त्याच्यावर पांच सहा वेळा स्वाऱ्या कराव्या लागल्या व कर्नाटकची स्वारी करावयाची म्हणजे मुक्काम कोठें करावयाचे, अडचणींचें स्वरूप काय असतें आणि शत्रू जेरीस आणण्यास काय केलें पाहिजे वगैरे गोष्टींचे आडाखे अगदीं बसून गेले. शिवाय या प्रत्येक स्वारींत विजयश्रीनें मराठ्यांनाच माळ घातली असल्यामुळें कर्नाटकच्या स्वारीवर निघण्याची महाराष्ट्रांतील लोकांना मोठी हौस वाटे. माधवरावाच्या मृत्यूनंतर राघोबाच्या गडबडींत इंग्रजाशीं युद्ध उपस्थित झाल्यामुळें, स्वराज्याच्या हद्दींतच मराठ्यांना दाहा बारा वर्षें घालवावीं लागलीं; आणि त्यानंतर बदामीची स्वारी टिपूवर झाली त्यांत म्हणण्यासारखें यश आलें नाहीं; पण त्यानंतर १७९० मध्यें इंग्रज, मराठे व निजाम यांचा तह ठरून टिपूवर स्वारीस निघण्याचें निश्चित झालें; तेव्हां पुनः लोकांना कर्नाटकच्या मुलुखगिरीची आठवण झाली व साऱ्या महाराष्ट्रभर वीरश्रीचें वारें खेळून जिकडे तिकडे स्वारीची तयारी सुरू झाली. ही तयारी १७९१ च्या प्रारंभीं पुरी होऊन, हजारों सैनिकांनीं गजबजलेल्या फौजा बाहेर पडल्या.

या सैनिकांचा उत्साह व त्यांच्या घरींदारीं उडणारी गडबड यांचें शब्दचित्र यथार्थपणें काढून ठेवण्याचें काम वस्तुतः तत्कालीन महाकवींचें होतें. त्यांच्या कविकल्पनेस पुरून उरण्याजोगे प्रसंग त्या वेळीं त्यांच्या सभोंवार घडतहि होते; पण पंतांसारख्या कविव-

यांचा ओढा तत्कालीन, ऐहिक घडामोडींचें वर्णन करण्याकडे नसून अष्टोत्तरशत रामायणें, मंत्रभागवत, व महाभारत मराठी भाषेंत आणून सोडण्याच्या परमार्थपर उद्योगांत गढलें होतें. वेदान्त व भक्ति यांत त्यांचें मनाचा लय होऊन 'दयाघना' स उद्देशून केकावली रचण्यांत ते आपल्या आयुष्याची सार्थकता मानीत होते. त्यांना या स्वाऱ्या–शिकाऱ्यांचें महत्त्व कसें वाटावें ? सारांश त्या वेळीं प्रतिष्ठित व विद्वान म्हणविणारे लेखक आपल्या लेखणीची प्रतिभा स्वराज्याचें कौतुक करण्याच्या कामीं लावण्यास तयार नव्हते; साराच बुद्धिमान वर्ग एक प्रकारच्या वैराग्यवृत्तीनें पछाडल्यासारखा झाला होता. शिवाजी महाराजांनीं व समर्थांनीं ज्या स्वराज्यस्थापनेसाठीं जिवापाड मेहनत केली, तें स्वराज्य म्हणजे केवढी पवित्र देणगी आहे व ती राखण्यासाठीं सर्वात्मना झटणें यांतच खरा परमार्थ कसा आहे, हें आपल्या प्रतिभासंपन्न वाणीनें महाराष्ट्रापुढें मांडण्याचें जर मोरोपंतांसारख्यांनीं मनावर घेतलें असतें तर कीर्तन–पुराणद्वारा लोकांत सहज जागृति राहूं शकली असती. ही जागृति, लोकांना ऐहिक इतिकर्तव्यता व ध्येय समजून देण्यासाठीं बुद्धिमान वर्गासच विशेषतः पाहिजे होती; कारण या वर्गास स्वराज्याचें महत्त्व पटलें असतें म्हणजे तें सुरक्षित ठेवण्यास कोणते उपाय योजले पाहिजेत हें त्यांनीं शोधण्यास कमी केलें नसतें.

प्रतिष्ठित वर्गांत अशा रीतीनें ऐहिक संसाराविषयीं घातुक औदासीन्य पसरलें असलें तरी, महाराष्ट्रांतील सामान्य लोक आपलें तात्कालिक कर्तव्य करण्यासाठीं आनंदानें झटण्यास तयार होते; व झटतही होते. या लोकांचें कौतुक करून त्यांना प्रोत्साहन देण्यास ' महाकवी ' तयार नसले तरी शाहीर, गोंधळी व पवाडे गाणारे देशीकवी होते व यांनीं आपलें काम त्या वेळीं बऱ्याच चांगल्या रीतीनें बजावलें. पण त्यांची गणना ' प्रतिष्ठित ' कवींत नसल्यामुळें त्यांचीं वीररसभरित काव्यें थोडा अडचणीचा प्रसंग येतांच कोपऱ्यांत पडलीं; तीं आजतागाईत तेथेंच आहेत. त्यांना उजेडांत आणण्याचे दिवस कधीं येणार असतील ते येवोत.

या शाहिरांचीं काव्यें मागें पडलीं याचें कारण, तीं टाकाऊ आहेत असें मात्र नव्हे. पण ईश्वरभक्ती ज्यांत नाहीं तें काव्य नव्हे, निदान तें म्हणण्यांत आपणास पुण्य लागत नाहीं, अशी ठाम समजूत असल्यामुळें पेशवाईंत व त्यानंतर आजतागायत वीररसपरिप्लुत व चरित्रपर महाकाव्य मराठींत निर्माण झालें नाहीं. शाहिरांनीं हें काम त्यांतल्या त्यांत बरें केलें; पण त्यांची वर्णनशैली उत्तम व आवेशयुक्त असली तरी श्रोत्यांनीं काय बोध घ्यावयाचा

हें त्यांना सांगतां येत नव्हतें किंवा जनतेची वैराग्यवृत्ति पालटून ती प्रवृत्तिपर करण्याचेंही सामर्थ्य त्यांच्यांत नव्हतें. यामुळें विजेची चमक पाहतांच क्षणभर मन जसें आश्चर्यचकित होतें, तसें हीं वर्णनपर काव्यें ऐकून लोकांचे त्या वेळेपुरते बाहु स्फुरण पावत. व ते देहभान विसरत. पण त्यांचा परिणाम कायमचा नसे. यामुळें परिस्थिती बदलतांच लावण्या देखील ' दो दिवसांची तनु हे साची ' याच विचाराची महती गाऊं लागले.

तथापि तात्कालिक कां होईना, पण या शाहीरमंडळींनीं सामान्य लोकांना वीरश्रीची गोडी लावली, ही गोष्ट आपण विसरतां कामा नये; आणि मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहितांना या शाहिरांची कामगिरी आपणास अवश्यमेव जमेंत धरली पाहिजे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ' महाराष्ट्र सारस्वता ' च्या नवीन आवृत्तींत रा. वि. ल. भावे यांनीं या विषयासंबंधीं जे विद्वत्ताप्रचुर व सहृदयपणाचे उद्गार काढले आहेत ते प्रस्तुत विषयास लागू पडण्याजोगे असल्यामुळें येथें देतों. शाहीरमंडळीविषयीं लिहितांना रा. भावे म्हणतात—

' त्यांच्या विचाराचें वळण खरें खरें असें मराठमोळ्याचें होतें; व कांहीं प्रसंग खेरीज करून बहुतेक सर्व ठिकाणीं ते लोकांच्या नित्यांतल्या शब्द वटिकाच योजीत असत. यामुळें त्यांच्या कवनांत एक तऱ्हेचें जीवन आढळते. त्यांची भाषा तरतरीत अशा जिवंतपणाची आठवण करून देते, आणि यामुळेंच त्यांचें बोलणें एकंदर लोकसमूहाला ज्यास्त पटतें....शाहिरांचीं गाणीं हीं मराठ्यांचीं खरीं गाणीं आहेत. त्यांत महाराष्ट्राच्या चालीरीति स्पष्टपणें नजरेस पडतात. त्यांत महाराष्ट्राचे विकार, त्याच्या आवडी नावडी, त्यांतील लोकांचे गुणदोष, त्यांतील जनसमूहाचा स्वभाव व त्याच्या अनेक वृत्ति स्पष्टपणें दिसतात. इतकेंच नव्हे, तर शाहिरांचे शब्द आणि मनांतले विचार शब्दानें प्रदर्शित करण्याची त्यांची ठेवण, हीहि शुद्ध मराठी वळणाची दिसते. ती इतरांना समजणारहि नाहीं; आणि कदाचित पटणारहि नाहीं.

नाजुक बांधा सडक आकृती ठेंगणी गोजरी ।
कंगणदार पगडी शिरीं ।
कांठिदार अंगरखा दुपेटा भरनाक्षिदार भरजरी ।
ललाटीं गंध केशरी ।
सुवर्णतोडे, सुवर्ण-हिऱ्याच्या मुद्या चमकती करीं ।

खूप डौल दिसे अंबरीं ॥
गळयांत कंठी, कानि चौकडा भिगबाळी गोमटी ।...*

इत्यादि वर्णन इतर कोणापेक्षांहि मराठयालाच आवडेल. कारण त्यांत त्याला त्याचीं स्वतःचीच प्रतिमा दिसेल. याप्रमाणेंच कोंवळ्या मनाची अल्लड वृत्ति, लग्न झाल्यानंतर पतीविषयीं केवळ धार्मिक आणि आनुवंशिक बुद्धीनें उद्भवणारें प्रेम, तारुण्याच्या झुळकीबरोबर पतिदर्शनाविषयींची उत्सुकता, उत्तरहिंदुस्थानांत मुलुखगिरीवर गेलेल्या स्वजनाविषयीं मनाची हुरहूर, तिकडचे जासूद येतांच होणारा आनंद, स्वारीचा मुक्काम गांवाजवळ आलेला कळल्यावर होणारी मनाची धांदल, सुमुहूर्तानें घरांत प्रवेश करणाऱ्या यजमानांना ओंवाळण्यासाठीं पंचारतीची तयारी, नवऱ्याच्या आवडीच्या पदार्थांची पाकनिष्पत्ति, नंतर राग, अनुराग इत्यादि विकार आणि रुसवे फुगवे, हीं सर्व अत्यंत मनोहर चित्रें उठावदार रंगानें रंगविलेलीं आणि मार्मिक शब्दांनीं खुलविलेलीं अशीं पहावयाचीं असतील तर तीं मराठी शाहिरांच्या कवनांत पहावीं. तीं त्यांच्या तोंडून डफ तुणतुण्यावरच गाइलेलीं ऐकावींत. महाराष्ट्राबाहेर तीं दिसावयाचीं नाहींत; आणि इतर कोठें तीं खुलावयाचींहि नाहींत. ज्या लढाईचें वर्णन पुढल्या चौकांत गोंधळी एकतारीवर गात असेल, अंगेजणीनें चढाई करून चढविलेल्या हल्ल्याचें वर्णन शाहीर आंगणांत म्हणत असेल, त्या लढाईंत माझा भाऊ होता, ही कल्पना कोणत्या बहिणीला मोहून टाकणार नाहीं ! त्या स्वारींत माझा बाप होता हा अभिमान कोणत्या मुलाला वाटणार नाहीं ! त्याच लढाईंतल्या लुटींत आणिलेल्या मोत्यांचा कंठा आज माझ्या गळयांत आहे, तेथेंच मिळविलेल्या बक्षिशांतली तरवार ही माझ्या समोर खुंटीवर ठेविलेली आहे, हें मनांत येतांच कोणती बायको द्रव्यलोभ पार विसरून जाऊन अंगावरचा शालू माडीवरून त्या शाहिराच्या अंगावर फेकणार नाहीं ! आणि हें पाहून

---

*जरद्या घोड्यावर स्वार शिपाई सरदार तो छेलछबेला ।
मस्तकीं फुलांचा तुरा, शिपाई झुरा, इष्कि रंगेला ।
पौर्णिमेस तारांगणीं जसा गगनीं चंद्र उदेला ।
हे भगवंताचे लाल, सदा खुशियाल, न्यूनता नाहीं ॥
चल पाहूं कन्हया राव राजेंद्र सवाई ।
हें सवाई माधवरावाचें वर्णन आहे.

गळ्यांतला शेरभर सोन्याचा गोफ कोणता धनी त्या शाहिराच्या गळ्यांत घालणार नाहीं! असे हे प्रसंग स्वराज्यांत वारंवार येत आणि अशा वेळीं शाहीरांच्या अंगावर बक्षिसांचा पाऊस पडे.

आणखी एका ठिकाणीं रा. भावे म्हणतात—

आठ महिने सर्व देशभर स्वाऱ्या शिकाऱ्या कराव्या, आपल्या देहाची आणि त्यांतील रक्ताची पर्वा न बाळगितां मुलुखगिरीचे कष्ट करावे, आणि चार महिने परत देशीं येऊन विश्रांति घ्यावी; व ते विश्रांतीचे दिवस सुखांत आणि नाना तऱ्हेच्या इष्कांत घालवावे, हा सर्वांचा नित्यक्रम होऊन राहिला होता. अशा वेळीं शृंगारिक कवनाची बूज केवढी राहात असेल, व ख्याली खुशालीच्या वर्णनांवर कशा उड्या पडत असतील हें सहज ताडतां येईल. अशा काळांत, आपलीं ममतेंतलीं व लोभांतलीं माणसें पुनः दसरा करून मुलुखगिरीवर जाण्याची तयारी करूं लागलीं म्हणजे, मागें रहाणारांना काय वाटत असेल, याचीं वर्णनें अनेक शाहिरांनीं गाइलीं आहेत. अशाच एका प्रसंगीं होनाजी म्हणतो—

गावा जातो प्राणविसावा, राहवा दोन गोष्टी सांगून।
पंधरा पदर मजसाठीं सख्यांनों, घ्या येवढें त्याला मागुन ॥धृ०॥
हातिच्या हत्यारा शिवायासाठीं घेतुन अकारल्या।
तंग, तोबरे, रजामे, जीन, घर, शृंगारल्या,।
जामदारखान्यांत खजिना द्रव्याच्या पेट्या भरल्या।
दोन सलीतेसहित कतरा त्या उंटाच्या तयारल्या।
घरमंडळीसहवर्तमान अवघ्या फौजा येकसरल्या।
पहिल्यानेंच कुच करून साजणी मुकामाला जाती दुरल्या ॥
... .चार दिवस ... यालागुन।
गांवा जातो प्राणविसावा, राहवा दोन गोष्टी सांगून ॥

या अशा विनवण्या कैक शिपाईगड्यांना कैक जणींनीं त्या काळीं खचित केल्या असतील. पण ते शिपाईगडी हाडाचे खरे मर्द मराठे होते. अशा बाइलबुद्धीला ते थोडीच भीक घालणार! असली बायकी भीड शिवाजीनें आपल्या प्रत्यक्ष आईची देखील मानिली नाहीं; मग त्याचेच फर्जंदजादे आणि शिलेदार आपल्या बाइलेची कितपत ऐकणार! यावर सरदारांच्या तर्फेचें उत्तर:—

आम्ही प्रलयंगता, तुम्ही ग बुध नाहीं कामाची ।
आलीं धन्याचीं पत्रें आम्हांला जलद जाण्याचीं ॥ ध्रु० ॥
या लष्करची सुखसाजणी न ये ग सांगाया ।
आहे धन्याची दया आम्हावर कृपेची छाया ।
उठुन ताजीम देती, ठाव पंगतीचा जेवाया ।
पोऱ्या खिजमतगार कोतवाल घोडा बसाया ॥
स्वारि जघुन चाले । नउशे रंगीत भाले ।
वीटे पटेवाले । हत्ती विनीवर चाले ।
नौबत कडाक्याची ।
नामजाद शिपाई पुढें जिलिब गारद्याची ॥
आम्ही प्रलयंगता० ॥
कर्नाटकच्या स्वारीस होतों श्रीमंतावरोबर ।
रणसंग्रामीं झटुनि केली तलवार ।
ढिगांतुन फटके आम्ही शिपाई रणशूर ।
झाडिमधें पिटुन घातला हैदर ॥
पाहुन मनीं चटका । म्हणति त्याला हटका ।
शिरपाव द्या, द्या जरीपटका ।
चवरी, अब्दागिरी, बक्षिस कंठी मोत्याची ।
आवंदाची बोल येक पालखिची ॥
आम्ही प्रलयंगता० ॥
पूर्वीपासून नक्षा चालत आला वडिलांचा ।
आणिबाणीच्या वेळीं विडा उचलिला पैजेचा ॥
कटुन मरावें हा असा धर्म क्षत्रीयाचा ।
कसें 'रहा' म्हणतिस घरीं डाग लागेल जन्माचा ॥ इ. इ.

अशा आवडीनें लढाईवर जाणाऱ्या शिपायांची मात ऐकून कोणाहि मराठ्याचें मन प्रसन्न होईल व हीं गाणीं ऐकून गाणाऱ्या शाहिराला कोणीहि आपल्या हातांतलें सोन्याचें कडें सहज बक्षीस देईल. (महाराष्ट्र सारस्वत पृ. ४७९।४८०)

शाहिरानीं मुलुखगिरीचा सुखसोहळाच वर्णन केला आहे असें म्हणतां येत नाहीं. लढाई म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूशीं गाठ घालण्याची तयारी पाहिजे, इतकेंच नव्हे तर, हालहाल होऊन मरणाची पाळी येण्याचाही पुष्कळ संभव असतो, हें दाखविण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. कर्नाटकच्या स्वारींत कोणत्या मुक्कामावर काय अडचणी होत्या हें दाखविण्यासाठीं एक शाहीर म्हणतो—

बुधीहाळ किल्ला बाका । डुरुन टाकी तोफांचे गोळे ।
जसा अग्नीचा दिसतो लोळ । श्रीमंताचें पुण्य प्रबळ ।
सोडी तकटीं निशाण । जाताजाता बसे वलगण ।
चिनकहाळ्ळी महाबळ्ळी जेर केली मौजेने ।
किल्ला घेतला तमाशाने ।
भोवती जेर करोनी कशी घेतली विशाल ।
अवघा प्राक्तनाचा खेळ ॥ १ ॥
तेथुन पुढ नंदिगड घेतलें बाळापुर ।
नागमंगळ जागा थोर मुळबागल ।
किल्ला बाका घटकेंत केला जेर ।
शहा दिला बेंगरुळावर ।
बहिरवदुर्ग आणि मांगडी पाहता फिरती डोळे ।
भोंवती झाडी अती प्रबळ ॥ २ ॥
देवराय दुर्गभोंवते किल्ले घेतले प्रतापान ।
पुढुनी जंगल महादारुण ।
हाला करितां बहुत पडिले लोक तमाशानें ।
खराबी फार केली किल्लयानें ।
मारुन गोळ्या झोळिस लोळ्या लाविल्या तुंबळ ।
शेवटीं जेर केले स्थळ ॥ ३ ॥
नळवाटेनें पोटें फुगतीं, प्राण उरतों डोळा ।
म्हणती कसें आलें कपाळा ? ।
हागवणेन व्याकुळ झाले × × वाहे बुळबुळा ।
भारी कर्नाटक उन्हाळा ।

जेव्हां घरची आठवण होती तेव्हां रडे मुळमुळा ।
कशी आठवती मुलेंबाळे ॥ ४ ॥
आजपासुन कर्नाटकची नको चाकरी, हरी ! ।
शेत करून राहू घरीं ।
रेती खाता पाणी लागत सुख नाहीं शरीरी ।
मोठी महागाई पडली भारी ।
बाबु सवाई रामाबाई कविमतबाला खेळ ।
जबुन हें कर्नाटकचें जळ ॥ ५ ॥

मराठ्यांना आपल्या घोड्यासंबंधीं वाटत असलेल्या विलक्षण प्रेमाबद्दल तत्कालीन इंग्रजांना आश्चर्य व कौतुक वाटे. घोडा दाहा रुपयांचा असो किंवा हजार रुपयांचा असो; त्याचे चोज व शृंगार करण्यांत मराठा स्वार गढलेला असे. अनुकूलता असेल तो घोड्याच्या गळ्यांत पुतळ्यांच्या माळा, वाळे व इतर शृंगार घाली; लगाम व अनीन, जीन, जेरबंद वगैरे थाटाचा करी; पण ज्याची ऐपत एवढी नसेल तो निदान आयाळाच्या केसांच्या वेण्या करून व कपाळावर रंगीबेरंगी बटीची गोंडवेणी लोंबत ठेऊन घोड्याची शोभा वाढविण्यास कमी करीत नसे. पण त्याच्या प्रेमाची मर्यादा या बाह्य थाटावरच संपत नसून तिचा ठाव घेण्यास आपणास या स्वाराच्या अंतःकरणांत शिरलें पाहिजे. त्याला आपला घोडा जिवापेक्षांही प्यारा वाटे. त्याची सुश्रूषा करण्यासाठीं एक स्वतंत्र पोरगा स्वारींत प्रत्येक स्वार घेत असे, तरी तो त्यांच्यावर विसंबून न राहतां त्याला चंदी, वैरण, पाणी, खरारा वेळच्या वेळीं मिळत आहे किंवा नाहीं हें पाहण्याविषयीं तो फार दक्षता ठेवी. इतकेंही असून घोड्यावरून खाली उतरतांच त्याच्या पुठ्यावर थाप मारून, त्यास गोंजारून, त्याचें सारें अंग मनगटापासून कोपरापर्यंत साऱ्या हातानें जोरजोरानें रगडल्यावांचून व त्याचे पाय मागें व पुढें ओढून सांधे मोकळे केल्यावांचून मराठी स्वारास चैनच पडत नसे. सारांश मराठ्यांचे घोडे तेजस्वी, तयार व चलाख असून धन्याच्या प्रेमळ वर्तनाचा त्यांच्यावर परिणाम झालेला दिसे. तत्कालीन एक इंग्रज गृहस्थ लिहितो ' घोडा बाळगावा मराठ्यानेंच. त्याचें तो जें कौतुक करतो, त्याचें वर्णन करतां पुरवत नाहीं; पण एवढें खरें कीं इंग्रजी सैन्यांत घोड्यास रोज चार साडेचार शेर चंदी असून त्यापेक्षां शेर दीडशेर चंदीवरच मराठ्यांचे घोडे जास्त तयार आहेत ! '

पूर्वी घोड्यांच्या मोठमोठ्या पागा जागजागीं असत; व शिवाय कुरणांत यथेच्छ चरण्यासाठीं मोकाट सोडलेलीं शिंगरें पुष्कळ असत; त्यांपैकीं नीट देखणीं शिंगरें निवडून, त्यांना 'वजवण्याचें,' 'सजविण्याचें' व चोट्या (आयाळाच्या केसांच्या वेण्या) विणून, तंग तोबऱ्याची तयारी करण्याचें कामांत बायका लक्ष घालीत असत. 'परशराम' कवीनें केलेल्या एका कवनांत एक वीरपत्नी आपल्या स्वामीची महती सांगतांना म्हणते—

मादवान सिंगरं पागा चरायास बनल्या, पत्र पाठवुन त्या स्वामिनीं शहरासि आणल्या ॥ त्यांत छाट केल्या, नीट देखण्या ज्यांना मी चुणल्या ॥ आधीं वजवुन सजाविल्या हौसेन मग चोट्या विणल्या ॥ तंग तोबरे जीन खोगरें नांवनिशी गिणल्या ॥ बारगिर पोरगे ठेवितां गोष्टी गुजगुजल्या ॥ हाती उंट पालख्या नालख्या आबराने चिनल्या ॥ शिलकिस केले तऱ्हेतऱ्हेचे वस्ता नव्या नवल्या ॥ दलबादल अलिजा डेरे । नाही फरसखाने सारे । मखमाली त्रिच्छुने न्यारे ॥ चा० ॥ सरमजाम कुलतमाम केली तयारी जायाची ॥ कोण सख्याला अर्जी वर्जी कठीण मर्जी रायाची ॥ नलगे० ॥

* पहाटे बिनीवाल्याचा नगारा कानीं पडतांच खडबडून जागीं झालेली व शत्रूच्या मुलखांतून जाणाऱ्या सैन्यांत असलेली एक वीरपत्नी आपल्या पतीस जागे करतांना म्हणते—

करून मधां जिनबंदी सरल्या पुढें स्वतांच बिनिवाले सरले । सरंजामि सरकारि एकांडे ठळक ठळक मागें उरले ॥ रंव पडली पहा उंट तट्टें किती सौदागर देशावरले । हाका आरोळ्या देति भयंकर मार्ग चुकुन डोंगरि शिरले ॥ कठिण घांट आज म्हणुन मुळीं आधिं फकीर आणिक ढाले फिरले । अजुन आपुण निद्रिस्त तशामधीं होति मुकाम फारच दुरले ॥ चा० ॥ पहाटची झोंप अति गोड केवळ शरकरा ॥ उठुं नये वाटतें खरेंच किहो प्रियकरा ॥ सुखरूप शयन मजालिस गेल्यावर करा ॥ चा० ॥ सगुण गुणगंभिरा तुला कशी दुपारचिरे सोसेल कहालीं ॥ १ ॥ बृहस्पती-शशी-दैत्यगुरु तिघे तेजहीन तेजीं बुडले । इतर तारे तर लहान केवळ मग दिसतील कोणी कडले ॥ श्रीमंत प्रभूचे रमणुकीचे ताळे बादल डेरे

पडले । नवे मंडप सजदार गज्यांवर बांव सहित सारे भिडले ॥ ठांइ ठाईं तासे तबल दुडुमदिनीं तयारिचे मफें झडले। आरब रोहिले सिंदी सोरटी कुल तमाम जन गडबले ॥ चा० ॥ आसवले व्याघ्र या वनांत वृक हिंडती ॥ दिवसास परस्पर मनिं निर्भय भांडती ॥ ज्या स्थळीं भुतें झोटिंग पिशें कांडती ॥ चा० ॥ अशा गति श्रुत असुन कसे जसे स्वस्थपणें निजलां महालीं ॥ २ ॥ चपळ पंच कल्याण निळे एक एक सुरेख घोडे दिसती। उबार दाण्यासाठिं हुजुरच्या कुमेद नर माद्या हिंसती ॥ दुध खिरी शिंगरें पिती सुरु अपेट जे जे वळु असती। चारजामे जिन ठेउन अंधारी देउन गडी बळकट कसती ॥ उमेदवारी जिवट गोहो कांहीं तयांत कुणी ब्राह्मण असती। सर्व कर्म सारून अगोधर पेव्हांपासुन रोखुन बसती ॥ चा० ॥ जाहाले रथारूढ नभांत नारायण ॥ लागलें काल कडकडीत उत्तरायण ॥ कुठवर तरी करूं आर्जवपारायण ॥ चा०॥ निबीड अरण्यामधीं आशि-कशी निचिंत पणची घडि वाहली ॥ ३ ॥

(हा उतारा प्रभाकर कवीची कविता सध्या छापण्याचें काम चालू आहे त्यांतून घेतली आहे.)

सवाशें वर्षांपूर्वींच्या मराठी लष्कराची कल्पना देतांना फल ज्योतिषांवरील त्यांच्या श्रद्धेचा उल्लेख करणें अगत्याचें आहे. ज्योतिषांच्या नादीं लागून त्यांचें भकंकर नुकसान झालें असें जरी म्हणतां येत नाहीं तरी कोणतीही महत्त्वाची कामगिरी अंगावर घेतांना मुहूर्त पाहिल्यावांचून त्यांना चैन पडत नसे. तिथि, नक्षत्र, वार यांचें अनुकूल्य, गुरुपुष्य, अमृतसिद्धी वगैरे योग, निदान शिवालिखित अगर गर्गाचार्यांचा मुहूर्त साधल्यावांचून त्यांचें पाऊल पडत नसे. हरीपंत फडके स्वारीसाठी प्रथम डेरे दाखल झाले आणि नंतर त्यांना कळलें कीं, तो मुहूर्त बरा नव्हता; तेव्हां ते पुन: पुण्यांत परत येऊन दुसरे दिवशीं सुमुहूर्तानें निघालें. धारवाडचा वेढा आटोपण्यापूर्वीं परशुरामभाऊस तळ हालवितां येणें शक्य नव्हतें पण चांगलासा योग येतांच त्या दिवशीं त्यानें प्रस्थान काढून ठेवलेंच. त्याचप्रमाणें दोन सरदारांच्या भेटी व्हावयाच्या असल्या तर ही भेट कोणत्या दिवशीं व्हावी हें ज्योतिष्यांच्या सल्लयानें ठरविण्यासाठीं महिना महिना आधीं वाटाघाट चालत असे. स्वारी शिकारींत यश आल्यावर फेडावयाचे नवस तर पुष्कळच असत. याशिवाय

पीर, फकीर, सन्याशी यांचें दर्शन व आशिर्वाद घेण्यासाठीं त्यांचें मन ओढ घेत असे. पंचाक्षऱ्यांचा धंदादेखील बराच जोरांत होता. ग्रहणासारखा योग किंवा सिंहस्थ अगर अधिक महिना आला म्हणजे तर नदीतीर गाठण्यासाठीं एकमतानें प्रयत्न सुरू होई. या धार्मिक व भाविक समजुतींचा फायदा घेण्यास मराठ्यांचे शत्रु कमी करीत नसत. एकदां निजामाशीं युद्ध सुरू असतांना रात्रीं कुकडी नदीवर नानासाहेब पेशवे स्नानास गेल्याची संधी पाहून त्यानें अकस्मात् त्यांच्यावर हल्ला केला; यामुळें त्यांचें बरेच नुकसान झालें; पण नुकसान होतें म्हणून ' नको हा धर्म आणि नको हें ज्योतिष ' असें त्यांना कधीं वाटल्याचें दिसत नाहीं.

मराठ्यांच्या या भाविकपणामुळें श्रीरंगपट्टणच्या स्वारींत कधीं कधीं इंग्रजांना बरीच गैरसोय सोसण्याचा प्रसंग येई कार्नवालिसच्या व मराठ्यांच्या सैन्याचा एकदां श्रीरंगपट्टणाजवळ तळ पडला असतांना मोठा पाऊस पडून चोहींकडे चिखल झाला. त्यांत इंग्रजांच्या तळाची जागा खोलांत असल्यामुळें तेथें बराच चिखल होऊन त्यांना फार त्रास पोचूं लागला. तेव्हां ' आज येथून तळ हालवून दोन तीन कोसावर उंचवट्याच्या जागीं जाऊं ' असा निरोप कार्नवालीसनें हरीपंताकडे पाठविला. त्यालाहि ती गोष्ट योग्य वाटली. पण इतक्यांत एकानें शंका काढली कीं ' या ठिकाणीं तळ दिला त्यास आज नववा दिवस. ' अर्थात ३।१३; ९।१२ या शास्त्राप्रमाणें त्या दिवशीं तळ हालविणें श्रेयस्कर नाहीं असा एकदम निर्णय झाला; आणि कार्नवालिसनें तो, मोठ्या कष्टानें कां होईना पण, मान्य केला ! सारांश मराठ्यांच्या लष्करी हालचालींचें शास्त्रशुद्ध अध्ययन करणारानें आधीं फलज्योतिषाची साधारण तरी माहिती मिळविली पाहिजे. ती नसेल व त्या वेळचें पंचांग आपल्या दृष्टीसमोर नसेल तर मराठ्यांच्या पुष्कळशा हालचालींचा अर्थच ध्यानांत येत नाहीं.

येथवर दिलेल्या सामान्य व त्रोटक वर्णनावरून श्रीरंगपट्टणच्या स्वारींत सामील झालेलें मराठी सैन्य इंग्रजी सैन्यापेक्षां किती निराळ्या स्वरूपाचें होतें हें लक्षांत येण्याजोगें आहे. इंग्रजी शिपाई पाई चालत असून त्याच्या हातांत बंदूक होती व मराठा गडी घोड्यावर बसलेला असून त्याच्या हातांत भाला होता एवढें सांगितल्यानें; अगर इंग्रजांच्या अंगांत एकजात एका रंगाचा पोषाख होता आणि मराठ्यांच्या अंगावर नुसत्या मुंडाशापासून तो तहत भरजरीच्या पोषाखापर्यंत सर्व प्रकार दिसले असते, असें म्हणण्यानें या दोघांतील भेदभावाची पुरेशी कल्पना येत नाहीं. ती येण्यास थोडेसें जास्त

वर्णन दिलें पाहिजे. श्रीरंगपट्टणच्या स्वारींत मराठे व इंग्रज जवळ जवळ एका पाहिरीवर असल्यामुळें एकानें दुसऱ्याविषयीं तिरस्कारबुद्धी व्यक्त करणें अगर आचारविचारांतील भिन्नतेबद्दल एकमेकांनीं एकमेकास नांवें ठेवणें शक्य नव्हतें. पण त्यांना हा भेदभाव पदोपदीं भासत होता यांत शंका नाहीं. दरबारी वागणुकीचेंच एक उदाहरण या मुद्याच्या स्पष्टीकरणार्थ देऊं. धारवाडचा वेढा चालू असतांना एकदा दरबार भरला. तेव्हां परशुरामभाऊ लोडाशीं टेकून बसले व इतर मानकरी अधिकारानुसार स्थानापन्न झाले. कर्नल-फ्रेड्रिक, कॅपटन लिट्ल वगैरे इंग्रजी अधिकारी देखील तेथें बसले होते. इतक्यांत मन्याबापूंची स्वारी तेथें आली. त्याबरोबर सर्व मंडळींनीं उठून त्यांचा गौरव केला. बापू परशुरामभाऊंच्या शेजारीं मानाच्या जागीं बसले. सर्वांचें डोळे या स्वारीकडे लागले. इंग्रजानींही बापूकडे पाहिले. पण त्यांच्या मनांत कोणकोणते विचार आले असतील परमेश्वर जाणे! कारण मन्याबापूचें शरीर जरी पिळदार व दंड भरलेले होते तरी त्यांच्या अंगावर पोषाख म्हणजे फक्त रेशमी चड्डी व डोक्यावर पागोटें! ही उघडी मूर्ति दरबारांत येऊन बसली त्या वेळीं या पोषाखाखेरीज एका हातांत तरवार व दुसऱ्यांत ढाल असे दोनच पदार्थ त्यांच्या हातांत दिसत होते. मन्याबापूंनीं अनेक युद्धांत गाजविलेल्या पराक्रमाबद्दल त्यांना हे दोन पदार्थ बक्षीस मिळाले असल्यामुळें, त्यांनीं ते मुद्दाम दरबाराच्या प्रसंगीं आणले होते. अर्थात त्यांचे दोनहि हात अडलेले. तेव्हां त्यांच्याकडे टक लावून पाहणाऱ्या कित्येक इंग्रजांच्या मनांत असें कोडें उद्भवलें कीं, ही स्वारी आतां अत्तर कसें घेणार? शेवटीं अत्तर लावणारा इसम मन्याबापूकडे आला. तेव्हां त्यानीं ढाल पुढें केली व त्या इसमानें अत्तर लावल्यावर ढालच नाकासमोर क्षणभर नेऊन परत मन्याबापूनें आपला ढालीचा हात पूर्वस्थळीं नेला! अर्थात् कोडें अशा सहज रीतीनें सुटलेलें पाहून इंग्रजांना कौतुक वाटलें.

घोड्यावर बसण्यांत एक प्रकारचा मोठेपणा व प्रतिष्ठा आहे असें मराठ्यांना वाटत असल्यामुळें इंग्रजी अंमलदार (घोडा पोऱ्याच्या हातीं देऊन) दहादहा मैल हौसेनें चालत जातांना पाहून मराठ्यांना चमत्कारिक दिसें; आणि बाहेर जाण्यास न मिळाल्यामुळें खोलींतल्या खोलींत व्यायामासाठीं येरझारा करतांना पाहून तर हे इंग्रजी शिपाई वेडसर असावे असेंही त्यांना भासे. शेवटीं एकदा एका मराठ्यानें इंग्रजी शिपायास स्पष्टच प्रश्न केला कीं 'तुमची इतर सर्व वर्तणूक शहाणपणाची दिसते पण हें काय वेड्यासारखें मागें पुढें हिंडत असतां?' तेव्हां त्या शिपायास मी व्यायाम घेतो हें कांहीं घड-

पणीं सांगतां येईना, कारण त्यावेळीं मराठींत व्यायाम हा शब्द आजच्या अर्थानें नव्हता. शेवटीं वेडेपणाचा आरोप टाळण्यासाठीं तो म्हणाला ' आम्ही हा देवाचा जप करतों. जपाच्या वेळीं असें मागें पुढें हिंडण्याची आम्हां लोकांत चाल आहे.' या उत्तरानें मराठ्यांचें समाधान झालें. कारण आपण जसे पुजेच्या वेळीं हात जोडतो, किंवा मुसल्मान गुडघे टेकतात तसे हे इंग्रज मंत्र म्हणतांना येरझारा करीत असतील असें त्यास वाटलें! या समजुतींत कांहीं चुकीचा भाग असला तरी इंग्रजी शिपायांची हीं वेडाची लहर नव्हे, हे मराठ्यांना कळलें तेव्हां उत्तराचा मुख्य हेतु साधला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

स्वराज्यांत मुलूखगिरीच्या दिवसांत काय देखावा असे याची कल्पना येथवर दिली. आतां सैन्याची जमवाजमव करणाऱ्या व जमलेलें अवाढव्य सैन्य शत्रूच्या मुलखांतून व्यवस्थितपणें नेणाऱ्या सेनाचालकांच्या लष्करांत कसा काय प्रकार चालत असे याचें वर्णन द्यावयाचें आहे. पैकीं टिपूवर सैन्य घेऊन निघणाऱ्या हरीपंत फडक्याच्या मागोमाग हिंडण्यानें आपला पहिला हेतु सिद्धीस जाईल.

हरीपंत फडके, नाना फडणिसांचा उजवा हात होता. तो शूर, चाणाक्ष व अत्यंत निःस्वार्थी असल्यामुळें महत्त्वाच्या प्रसंगीं नाना, हरीपंताचा सल्ला घेण्यास कधीं विसरत नव्हते. श्रीरंगपट्टणावर परशुरामभाऊ व हरीपंत या दोघांनींही निघावें असें ठरलें होतें तरी पोटदुखीच्या आजारानें हरीपंत आजारी असल्यामुळें परशुरामभाऊ आधीं निघाले. आणि त्यांनीं धारवाडच्या वेढ्याचें काम सात महिन्यांत पार पाडलें. इकडे कांहीं नाजूक प्रकरणें उद्भवलीं होतीं, तीं उरकण्यास अत्यंत विश्वासूक व बुद्धिवान माणसाची जरूरी होती. तीं कामें म्हणजे निजामअली व कार्नवालिस बायांच्याशीं कित्येक राजकीय प्रकारणांचें खलबत करण्याचेसंबंधींचीं होतीं. या खलबतांची जबाबदारी टाकण्यास हरीपंताशिवाय दुसरा मनुष्य नव्हता. यामुळें हरीपंततात्यानीं प्रथम निजामअलीची भेट घेऊन, नंतर इंग्रजी सैन्यास जाऊन मिळावें, असा विचार कायम झाला. त्याप्रमाणें हरीपंत जानेवारीच्या १ तारखेस पुण्याहून पंढरपूरास आले. ठिकठिकाणच्या पथक्यांना आपल्या जमावासह येऊन मिळण्याविषयीं त्यांनीं हुकूम सोडले. पंढरपुराहून काडलुर संगमापाशीं त्यांनीं कृष्णा उतरून पहिला मुक्काम केला. नंतर गदवाल प्रांतांत उंदेरी येथें स्वारी गेली. त्या ठिकाणीं पुणें दरबाराकडून निजामाकडे असणारे वकील गोविंदराव कृष्ण काळे व पिंगळे तात्यांच्या भेटीस आले. तेथें त्रिवर्गाचें खलबत होऊन फाल्गुन शुद्ध पंचमीस नबाबाची

भेट घेण्याचा निश्चय ठरला. नंतर बुणगे कृष्णातीरीं ठेऊन फक्त चार हजार सैन्य घेऊन तात्या निजामाची भेट घेण्यासाठीं पानगलास गेले. तेथें निजामाचा दिवाण मश्रुलमुल्ख तात्यांना सामोरा आला. दोघांच्या भेटी होऊन दोन घटका खलबत झालें. तात्यांनीं त्याला जरीचीं वस्त्रें, कंठी, शिरपेच व जिगा देऊन निरोप दिला. नंतर एक दिवस गेल्यानंतर बारा घटका दिवसास तात्यांची स्वारी तयार होऊन नवाबाच्या हवेलीस दाखल झाली. पुढें दोन घटका खलबत झाल्यावर नबाबांनीं तात्यास पानदान देऊन डेऱ्यास मार्गस्थ केलें. नंतर एक आठवडा तात्यांचा मुक्काम तेथें होता व तेवढ्या अवधींत नबाबाशीं त्यांच्या चार बैठकी झाल्या. या बैठकींत टिपूला नरम करावयाचा पण सप-शेल बुडवावयाचा नाहीं, हें निश्चित ठरलें. शिवाय तूर्त तात्यांनीं कुच करून गुत्तीच्या मार्गें बेंगरूळच्या रोखानें पुढें जावें; आणि नंतर १५।२० दिवसांनीं नबाबांनीं बेंगरूळास तात्यांना गांठावें असाहि निर्णय झाला. इतक्यांत इंग्रजांनीं बेंगरूळ घेतल्याची बातमी आली, ती अशी " इंग्रज बेंगरूळापासून साहा कोसांवर होते. किलेदारासी मिळोन किल्यांत फितूर केला. हें वर्तमान टिपूस पट्टणीं समजलें. तेथोन सरजामसुद्धां निघोन टिपु बेंगरूळास आला. किल्लेदारानें फितुर केला होता त्याचे पारपत्य केलें. दुसरा किल्ले-दार किल्यांत ठेऊन बंदोबस्त केला. हें वर्तमान इंग्रजास समजलें नाहीं. छ. ११ रजब रोजीं इंग्रजांनीं किल्यापासी येऊन हल्ला करोन पेठ घेतली. टिपू फौजसुद्धा तेथें होता. त्याची व इंग्रजाची लढाई झाली. पांच हजार इंग्र[illegible] ठार झाले. परंतु पेठेतील मारचा इंग्रजांनीं सोडला नाहीं. टिपू पट्टणास माघारा आला. छ. १५ रजब रोजीं इंग्रजांनीं हल्ला करोन बेंगरूळचा किल्ला घेतला. छ. २६ रजब रोजीं इंग्रजाकडील मिस्तर किनवी आहे त्याणीं नवाबास व तात्यास [हें वर्तमान] सांगितलें.'* तें ऐकून नबाबांनीं आनंदप्रदर्शक तोफा सोडण्याचा हुकूम केला. नंतर चार दिवसांनीं नबाबांचा निरोप घेऊन हरीपंत मश्रुल्मुल्कास परतभेट देण्यासाठीं आले.

---

* बेंगरूळची पेठ व किल्ला इंग्रजांनीं कसा घेतला याबद्दलची ही सारी हकीकत व हरीपंताचे मुक्काम आम्ही एका अप्रकाशित तत्कालीन अस्सल पत्राच्या आधारें दिले आहेत. इंग्रजी इतिहासांतील एतद्विषयक हकीकत विस्तृत रीतीनें मागें एका प्रकरणांत आलीच आहे. दोनही हकीकतींत कांहींसें अंतर आहे.

त्यानें त्यांवा आदरसत्कार करून वस्त्रें, शिरपेंच, जिगा, कंठी, एक हत्ती व एक घोडा याप्रमाणें नजर दिली; व इतर दरखदार, फडणीस, पोतनीस, मजमदार, चिटणीस वगैरे जी ठळक मंडळी तात्यांच्या बरोबर होती त्यांनाहि एकेक दोन दोन वस्त्रें व शिरपेच वगैरे देऊन सर्वांना निरोप दिला. नंतर तात्या तेथून निघाले ते तुंगभद्रा–दक्षिण-तीरावर आलपुर येथें आपल्या लष्करांत सामील झाले.


हरीपंत अशा रीतीनें नुसत्या बोलाचालींत दिवस घालवीत होते याचें कारण त्यांच्या जवळ अद्याप चांगलेसें सैन्य जमलें नव्हतें. यामुळें घाईनें पुढें जाण्याची त्यांची उत्कट इच्छा असून त्यांना दिवस घालवावे लागले. या वेळीं परशुरामभाऊ धारवाडच्या वेढ्यांत गुंतले होते. यामुळें त्यांना निघा म्हणण्याची सोय नव्हती. पण कुरुंदवाडकर रघुनाथराव दादांना भाऊनीं तुंगभद्रा पार होऊन टिपूच्या मुलखांत लुटालूट करण्यासाठीं पाठविलें होतें. तेव्हां त्यांनीं तरी आपल्या सैन्यांत सामील व्हावें असें सांगण्याकरितां हरीपंतांनीं रघुनाथरावास १५ मार्च १७९१ रोजीं पत्र पाठविलें होतें. त्यांत ते म्हणतात; "इकडील वर्तमान तर आम्ही दरमजल तुंगभद्रा पार व्हावें, त्यास फौज जमा व्हावयास फार दिवस लागले. अद्यापि लोक येतच आहेत. राजश्री आपा (बळवंत) मागाहून येणार त्यांस-मागमें फार करून फौज येईल. आम्ही यादगिरीजवळ आलों. दोनतीन रोजांत काडलूर संगमास कृष्णा उतरून नबावांची भेट घेऊन सल्ला मसलत ठरेल त्याप्रमाणें पुढें कर्तव्य. मुख्य फौज जमा होण्याचा विलंब आहे. इंग्रज याणी चिनापटणाहून कूच केलें. दरमजल घांट चढून बेंगरुळास येऊन मोर्चे लावणार. नबाबाची फौज पुरशी घाटास आहे, त्यांस पत्रें आलीं कीं तुम्ही लौकर येऊन मिळावें. आम्हांकडे पत्रें आलीं कीं 'तुम्ही लौकर यावें' नबाबहि निघण्याची तयारी करीत आहेत. श्रीमंताचे प्रतापेंकरून सर्व गोष्टी नीट आहेत. परंतु फौज जमा होणें व आपा येणें इतका अवकाश आहे. या दिवसांत आपला समागम असता तर फार उपयोगी पडतें. इंग्रजांचा मोठा सरंजाम, नबाबाचा मोठा सरंजाम, श्रीमंताकडील मोठा सरंजाम ते आम्ही! त्यास राजश्री (परशुराम) भाऊ आम्हीं एक होऊन फौज दिसती तर आम्हांहून मोठा कोणीच नव्हता. परंतु भाऊ धारवाडास गुंतले. आम्ही इकडे आलों. त्यास फौज जमा होण्यास दोसगत लागली; नाहींतर आहे सरंजाम इतकाच पुरे." "श्रीमंतांची फौज सरंजाम मोठा, ही गोष्ट नबाब व इंग्रज यांजपाशीं प्रसिद्ध आहे. सांप्रतकाळीं तिन्हीं दौलतींतील फौज एकत्र होणार. त्यांत आम्ही थोडके दिसलों तर लौकिकास वाईट. अनायासें

तुंगभद्रापार आपलें येणें झालें. आम्ही पार होऊन येतों. आपणास कांहीं विशेष काम तिकडे आहे असें नाहीं. इंग्रज बेंगरूळास येतात, तेव्हां हीच मसलत सर्वांनीं मिळोन करावयाची. त्यांत एक गोष्ट आमची उणी आहे. ती तुम्ही आल्यानें शोभा येऊन जाहिरण्यांत फार चांगलें दिसतें. या गोष्टीस भाऊंची परवानगी नलगे. आम्ही इकडून आलों तुम्ही पाहिलेंच आलां आहां. भेटी झाल्यानें चित्तास मोठी मजबुती होईल. मनांत आले प्रकार सारे लिहिले आहेत. यांत आपलें मन घेऊन नमुदांत येईल ती गोष्ट खरी."

हरीपंत फडक्यांचें हें पत्र सविस्तर रीतीनें आम्ही येथें दिलें आहे. त्यावरून मराठी सेनापती व हाताखालचे सरदार यांचे संबंध कशा प्रकारचा होते हें चांगल्या रीतीनें कळून येईल. शिंदे, होळकर किंवा पटवर्धन या वेळीं पेशव्यांचे नांवानें अंकित असले तरी वस्तुतः बरोबरीच्या नात्यानें वागत असत. यामुळें पुणें दरबारांतील मुत्सद्यांना यांच्या हातून काम घ्यावयाचें म्हणजे तें हुकमाच्या जोरावर घेतां येत नव्हतें; तर त्यांची समजूत पाडून, त्यानीं चुचकारून, त्यांचें मन वळवून करवून घ्यावें लागत असे. यामुळें वर दिलेल्या पत्रांत हरीपंत तात्यांनीं रघुनाथरावास सौम्य शब्दांत आपलें म्हणणें सूचनेदाखल मांडलें आहे. सारांश मराठी सैन्यासंबंधी विचार करतांना सेनापती म्हणजे एखादा नारसिंहाचा आवतार. त्याचा शब्द मोडला कीं लष्करी कायद्याप्रमाणें देहान्त शिक्षा मिळावयाची वगैरे कल्पना सोडून एका शांत, प्रेमळ, मनमिळाऊ पण हिंमतबाज पुढाऱ्याची कल्पना केली पाहिजे.

भाग १० वा.

मराठी व इंग्रजी सैन्याची मुलाखत.



मराठा घोडेस्वार.

मागील प्रकरणांत सामान्यतः महाराष्ट्रांतील लष्करी पेशा पत्करणाऱ्या लोकांच्या घरींदारीं काय परिस्थिति होती व हरीपंतासारख्या सेनापतीस सैन्याची जमवाजमव करतांना काय उपाय योजावे लागत याची माहिती सांगितली. आतां प्रत्यक्ष शत्रूशीं झगडणाऱ्या मराठी सैन्यांत काय देखावा दिसत होता हें कळण्यासाठीं परशुरामभाऊच्या सैन्याबरोबर आपणास धारवाडपासून श्रीरंगपट्टणापर्यंत गेलें पाहिजे. भाऊचें सैन्य धारवाडाहून एप्रील ६ तारखेस निघालें तें मे महिनाअखेर श्रीरंगपट्टणास पोचलें. म्हणजे दीड पावणे दोन महिन्यांत सरासरी अडिचशें मैलांचा पल्ला या सैन्यानें गांठला.

वीस हजार सैन्य बरोबर घेऊन शत्रूच्या मुलखांतून परशुरामभाऊ इतक्या झपाट्यानें प्रवास करूं शकला ही गोष्ट भाऊस भूषणावह आहे. पण पटवर्धन घराण्यांत त्या काळीं असे पुरुष निर्माण होत असत कीं, त्यांना हा प्रवास म्हणजे तळहाताचा मळ होता. हरभट हा भट होता, पण या भटाच्या पोटीं जे मुलगे व नातू मिळून सरासरी २०।२५ पुरुष जन्मास आले ते एकापेक्षां एक शूर निघाले; व निजाम, करवीरकर व म्हैसूरकर या तीघां शत्रूंशीं एकसारखा पन्नास वर्षें त्यांनीं झगडा करून आपलें स्वातंत्र्य कायम ठेवलें. हें युद्धकलेचें व मुत्सद्देगिरीचें शिक्षण त्यांना लष्करी शाळा किंवा कॉलेजें यांमधून मिळत नव्हतें. पण त्यांना परिस्थितीच अशी अनुकूल होती कीं, ते छातीचे व धोरणी पुरुष निपजावे. शाळांमधून मुलांना माराच्या धाकानें किंवा मार्कांच्या आशेनें



ता. २६ मे १७९१ रोजीं इंग्रजी सैन्याच्या मदतीसाठीं श्रीरंगपट्टणाकडे चालून जाणारे मराठे घोडेस्वार.
(तत्कालीन एका इंग्रजी चितार्‍यानें काढलेल्या चित्राच्या आधारें.)

अभ्यास करण्याची इच्छा होते, पण पटवर्धन घराण्यावर आलेले प्रसंग पुष्कळ वेळा असे होते कीं त्यांत यत्किंचित चूक झाल्यास त्यांना जहागिरीसुद्धां रसातळास जावें लागे. या घराण्यांतील पुरुष १५।१६ वर्षांचा झाला कीं, त्याला वडिलांबरोबर मोहिमेवर जावें लागे. व मुत्सद्यांच्या मुलांसही लहानपणापासून कारभारांत लक्ष घालणें भाग पडे. " त्या वेळीं पटवर्धनांचें घराणें तेजस्वी होतें. प्रत्येक स्वारींत सोळा सत्रा पुरुष घरचे असत. हे सर्वच लहान मोठ्या योग्यतेचे व इतमामाचे सरदार होते. पण कधीं कोणांत कुरकुर देखील होत नसे. मग तक्रारी, भांडणें, व फितूर यांचें नांव कशाला ! वडिलां-विषयीं मर्यादा, एकजूट आणि पुढाऱ्यांवर पूर्ण विश्वास या तीन गोष्टींचें बाळकडूच सर्वांस मिळालें होतें ! सर्वांच्या प्रीति व द्वेष, ग्रह व आग्रह, मसलतींचीं धोरणें व वागणुकीच्या तऱ्हा एकच ! अशा संघशक्तीच्या जबरदस्त जोरावर कसेंही संकट पडलें तरी ते डगमगत नसत व पाहिजे ती मसलत पार पाडण्याचें सामर्थ्य त्यांच्यामध्यें होतें यांत नवल काय ? एक मेला कीं त्याच्याच तालमींत तयार झालेला दुसरा त्याचें काम बजाविण्यास तयार असे. " (ऐ. ले. सं. पृ. ११०).

अशा रीतीनें लष्करी घराण्यांत व लष्करी वातावरणांत वाढल्यामुळें परशुरामभाऊस वीस हजार सैन्य हाताखालीं वागविणें म्हणजे मोठीशी कठीण कामगिरी आहे असें मुळींच वाटत नव्हतें. धारवाड काबीज करण्यास त्याला सात महिने लागले. याबद्दल विवेचकांनीं त्याला दोष दिला आहे. पण भाऊचें लक्ष केवळ धारवाड काबीज करण्याकडे नसून तेथून श्रीरंगपट्टणापर्यंत टिपूच्या सैन्यावर ठिकठिकाणीं छापे घालण्यांत व त्याच्या मुलखाची पाहणी करण्यांत गुंतलें होतें. यामुळें धारवाड काबीज झालें तेव्हांच श्रीरंग-पट्टणापर्यंत आपणास वेगानें जाण्यास हरकत येणार नाहीं अशी त्याची खात्री झाली होती; व त्याप्रमाणें पुढें घडूनहि आलें.

धारवाड काबीज करण्याच्या कामीं इंग्रजी पलटणांचा तादृश उपयोग झाला नाहीं हें मागें सांगितलें आहे. पण प्रारंभीं त्यांनीं हिंमत धरून काम केलें होतें व या पलटणांचा योग्य खर्च मराठ्यांनीं द्यावा असें ठरलेलें; यामुळें भाऊंनीं या पलटणीच्या अधिकाऱ्याकडे पत्र पाठवून खर्चाचा अंदाज विचारला. तेव्हां इंग्रजांनीं कमिटी भरवून ' निदान एक लाख रुपये आम्हीं बजावलेल्या कामगिरीबद्दल मिळाले पाहिजेत ' असा ठराव केला ! हा ठराव ऐकून भाऊंनीं उत्तर दिलें कीं ' एवढी रक्कम देण्यास मला सवड नाहीं. चाळीस हजारांवर भागत असेल तर पहा. ' परंतु एवढी लहान रक्कम घेण्याचें

आपल्या कामगिरीचें महत्त्व आपणच कमी केल्यासारखें होईल असें म्हणून इंग्रजांनीं ती नाकारली. यानंतर सार्टोरियसच्या हाताखालची पलटण परत मुंबईस गेली व कॅप्टन लिट्लची पलटण परशुरामभाऊच्या सैन्याबरोबर निघाली.

या मराठी सैन्याचा अवाढव्यपणा व इंग्रजी सैन्याचा सुटसुटीतपणा यांची तुलना करून कित्येक लेखकांनीं मराठ्यांच्या बेशिस्त वर्तनाबद्दल व लुटारूपणाबद्दल दोष दिला आहे. पण मराठी लष्कराबरोबर असलेले बाजार व बुणगे सैन्याचें काम निर्धास्तपणें चालण्यास चांगले उपयोगी पडत असें श्रीरंगपट्टणच्या मोहिमेंत आलेल्या अनुभवावरून तरी निःसशय ठरतें. जवळची सामुग्री किंवा शत्रूच्या मुलखांत तरवारीच्या जोरावर मिळणारी लूट आपल्या सैन्यास पुरूं शकेल या अंदाजावर धडाडीनें जाणाऱ्या कार्नवालीसवर आपल्याच तोफा फोडून, उपासमारीनें डोळ्यांत जीव आलेल्या शिपायांना वांचविण्यासाठीं परत फिरण्याचा प्रसंग आला. पण बाजारबुणगे बरोबर वागविणारा परशुरामभाऊ अडीचशें मैलांचा प्रवास करून ऐन वेळीं कार्नवालीसच्या उपाशीं सैन्यास पोटभर अन्न देऊं शकला. सारांश, बाजारबुणगे या शब्दानें जो अनिष्ट अर्थ सध्या आपल्या डोक्यांत येतो तो आपण बाजूस ठेऊन हीं दोनहीं अंगें सैन्यास अवश्यक आहेत असा अनुभव आल्यामुळें, तीं मराठ्यांच्या लष्कराबरोबर असत हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. या बुणग्यांच्या हातून प्रसंगोपात भलत्या गोष्टी घडत; पण लष्कर म्हटलें कीं तेथें असले प्रकार व दांडगाई चालावयाचीच.

या बाजारबुणग्यांची व सैन्याच्या हालचालीची कल्पना येण्यासाठीं भाऊच्या सैन्याच्या एकदोन मुक्कामांचें वर्णन देऊं. मराठी लष्कराचा तळ एका ठिकाणाहून दुसरीकडे जाण्याचें ठरलें म्हणजे ती बातमी सर्व शिपायांना कळविण्याचें काम बहुतकरून फकीर किंवा दवंडीवाले यांजकडे असे. हे लोक गरीब असून बातमी लौकर फैलावण्यासाठी आस्थेनें धडपडत. सध्या वर्तमानपत्राचा बातमीदार जसा कान टवकारून बातमी मिळविण्यासाठीं चोहींकडे लक्ष पुरवितो व ती मिळतांच आपल्या वर्तमानपत्रांत आधीं प्रसिद्ध करण्यासाठीं अटोकाट प्रयत्न करतो त्याप्रमाणें हे फकीर व दवंडीवाले पुढच्या मुक्कामाची बातमी लष्करांतील लोकांना सांगण्यासाठीं धांवत सुटत. मोठमोठ्यानें ओरडून व दवंडीमुळें लोकांचें लक्ष वेधून ते बातमीचा प्रसार फारच जलदीनें करीत; व लष्करांतील लोक बातमी पुरविल्याबद्दल या फकीरांना व दवंडीवाल्यांना आणा दोन आणे आपणहून देत. वर्तमानपत्राचा अंक विकत घेणाऱ्यानें आणा दीड आणा दिलाच

पाहिजे अशी जी आजची रीत आहे, तशी त्या वेळचीं वर्तमानें पोंचविणाऱ्या दवंडी-वाल्याची नसे. बातमी लौकर पसरविण्याचें काम होईल तितक्या जलदीनें करण्याकडे त्याचें लक्ष असे, कोणाकडे पैसे मागत राहण्यास त्याला सवड नव्हती. पण लोकांनीं देऊं केलेले पैसे मात्र घेण्यास तो थांबत असे; व पैसा देणारा मनुष्य दान किंवा धर्म करण्याच्या दृष्टीनें पैसा देई.

पण बातमी फैलावण्याचा हा खासगी प्रकार झाला. सरकारी रीतीनें बातमी जाहीर करण्यासाठीं उंटावरून किंवा हत्तीवरून पहाटेच्या वेळीं नगारा वाजवीत असत. पहाटे तीन चार वाजतां नगारा वाजला म्हणजे तळावरील सर्व लोकांना तो ऐकूं जाई व ते झोंपेतून जागे होत. तो ऐकतांच बिनीवाल्यानें सात आठ हजार घोडेस्वारा सुद्धा ताबडतोब निघालें पाहिजे अशी पद्धत होती. तो पुढच्या मुक्कामाची जागा ठरवी. शत्रूचें सांनिध्य व नदी अगर तलाव यांसारख्या विपुल पाण्याचा आसरा या दोन गोष्टी लक्षांत घेऊन तो नव्या मुक्कामाची जागा मुकर करी; व लष्करांतील सर्व लोकांना घेऊन येण्यासाठीं ताबडतोब कांहीं घोडेस्वार व सांडणीस्वार पाठवी. ते तळावर पोंचतांच ती बातमी ऐकून घेण्यासाठीं हरकारे किंवा वाटाडे टपलेले असत. प्रत्येक पथका-बरोबर असे उत्तम वाटाडे दोन चार तरी असत. ते हरकाऱ्याकडून नवीन तळाची जागा व रस्ता पांच मिनिटांत समजून घेऊन आपापल्या मालकास त्याची वर्दी देत. शत्रूच्या मुलखांतून अनेकवार जाण्यायेण्याचा प्रसंग असल्यामुळें, लष्करच्या कामास पुरेसा त्या त्या प्रांताचा भूगोल उत्तम प्रकारें माहीत असलेले लोक मराठी सैन्यांत बरेच असत. यामुळें वाटाड्याच्या हातून मुद्दाम किंवा अजाणतपणें चूक झाल्यास ती ताबड-तोब दुरुस्त होई.

सूर्योदयाच्या सुमारास दुसरा नगारा वाजे. त्या वेळीं लोक तंबू राहुट्या काढून व सामानाची बांधाबांधी करून निघण्याची तयारी करीत. यानंतर तास दोन तासांनीं तिसरा नगारा होई; पण तो ऐकण्यास तळावर फारशी मंडळी शिल्लक नसत. दुसरा नगारा ऐकल्यापासून तिसरा होण्यापूर्वी जे ते पथक आपापल्या सवडीप्रमाणें निघे. हा घोळका जात असतांना कोणचे पथक पुढें आणि कोणते मागें असावें याबद्दल कडक निर्बंध नसत; एकमेकांनीं एकमेकांच्या सोईकडे पाहून वागावें एवढा सामान्य नियम असे.

अशा रीतीनें हीं पथकें नव्या तळाकडे पोंचलीं म्हणजे कोणत्या पथकानें कोठें

रहावयाचें हें कळण्यास अडचण पडत नसे. कारण बिर्नावाला प्रत्येक पथकांतील लोकांची संख्या लक्षांत घेऊन तळाची लहान मोठी जागा आधींच ठरवून ठेवी, व प्रत्येक पथकाचें निशाण त्या त्या ठिकाणीं फडकत ठेवण्याची व्यवस्था करी. यामुळें सैन्यांतील लोकांना नव्या तळावर कोणी कोठें उतरावयाचें हें एकदम ध्यानांत येई. कोस अर्ध कोसावरून आपापलीं निशाणें ओळखून स्वार आपले घोडे योग्य दिशेनें वळवीत; आणि ते तेथें पोंचण्यापूर्वीं तंबू राहुट्या उभारलेल्या असत. परशुरामभाऊच्या सैन्याबरोबर अशाप्रकारें वीस पंचवीस पथकें होतीं.

या पथकांची भरती सैन्यांत कशी होई हें येथें सांगितलें पाहिजे. पथकांत महत्त्व काय तें घोड्यांचें. घोड्यांच्या पागा दोन प्रकारच्या असत; घरपागा व सरकारी पागा. सरकारी पागांतील घोडे सरकारी असून त्यावरच्या स्वारांना 'बारगीर' म्हणत. बारगीरास पगार दरमहा आठपासून बारापर्यंत लायकिप्रमाणें मिळे. सरकारांतून बहुतेक पागा-सरदारलोकांच्या हवालीं करण्यांत येत. मग बारगिरांस दरमहा पगार पोंचविण्याचें काम सरदाराचें. ही रक्कम त्यास साल दरसाल हिशेब होत तेव्हां सरकारांतून मिळे.

घरपागा तयार होत त्या अशा. कोणी सधन मनुष्यानें पदरचा पैसा खर्चून अथवा ज्याच्या अंगांत हिंमत व कर्तृत्व असेल, त्यानें कर्ज काढून घोडे खरेदी करावे व बारगीर नोकरीस ठेवावे. दर वर्षीस लढाया व मुलखगिऱ्या असतच. तेव्हां अशा तऱ्हेनें सजलेल्या घरपागेच्या मालकास आपली पागा घेऊन मोहिमेंत हजर होण्याविषयीं सरकारांतून बोलावणें येई. मग पागेचा मालक किंवा त्याच्या घरचे मुलगे किंवा जवळचे आप्त अथवा कोणी विश्वासु कारकून पागा घेऊन मोहिमेवर जाई. या नोकरीबद्दल मालकास सरकारांतून पागेपैकीं प्रत्येक स्वारास तीनशें रुपये या हिशेबानें पैका मिळे. लुटीवर घोड्यांचें पोट व बारगिरांचे पगार भागवावे व सरकारी तनखा अजीबात खिशांत टाकावा असा पागेच्या मालकाचा हेतु असे. यापैकीं त्यास साधेल तितकें तो साधी. असल्या पागांतून वीस पंचवीस पासुन पांच पांचशे घोडे असत. यंदा बरकत आली तर पुढील वर्षीं त्यानें आणखी घोडे खरेदी करावे असा क्रम चाले. हा एक त्या काळचा प्रतिष्ठित धंदा असून महत्त्वास चढण्याचा मार्ग होता. पांच पन्नास घोडे पागेंत जमत तों पागा सरकारांतून एखाद्या नदीच्या कांठीं कुरणें व दोन चार खेडीं बहुधा इनाम मिळवीं. मग त्यांतूनच एखादें बरेसें खेडें पाहून त्यास

तटबंदी करी. पागा मोठी होई तों सरकारास तिची जरूरी अधीकच लागे; आणि पैक्याची तर पेशवे सरकारांत नेहमीं टंचाई; यामुळें पागेच्या मालकास वेळेवर मोठमोठ्या रकमा देण्याचें सरकारास सामर्थ्य नसे. मग पागेचे मालकास पागेच्या खर्चाकरितां निराळा तालुका तोडून जहागीर देण्यांत येई. इतकें झालें म्हणजे पागेस 'पथक' ही संज्ञा आली

पुढें या पथक्यानें सरकारच्या अधिक अधिक कामगिऱ्या बजवाव्या व अधिक अधिक जहागीर संपादन करावी. याप्रमाणें होतां होतां पांच चार घोडीं प्रारंभीं बाळगणारा यःकश्चित मनुष्य आपल्या हिंमतीच्या जोरावर वाढत वाढत शेवटीं सालिना पन्नास लाख रुपये उत्पन्नाच्या जहागिरीचा मालक झाल्याचीं उदाहरणें घडून आलीं आहेत. असलीं उदाहरणें फारच क्वचित् दृष्टीस पडावयाचीं हें तर खरेंच. कारण हा जो त्या काळच्या धाडशी लोकांचा वैभवास चढण्याचा मार्ग . सांगितला, यांत धोके पदोपदीं येणारे होते. एखादी भली मोठी ठोकर लागली कीं, पागा गेली आणि सगळेंच गेलें! (ऐ. ले. सं. भाग १ पृ. १२३ टीप पहा.)

असो; मराठी सैन्याचा तळ हालतांना प्रथम बिनीवाले व पथके गेल्यानंतर शेवटीं परशुरामभाऊची स्वारी आपल्या सात आठ हजार घोडेस्वारांसुद्धां निघे. त्या वेळीं अग्रभागीं हौदे व अंबाऱ्या पाठीवर असलेले हत्ती चालत असून, खासा स्वारी पालखींत किंवा घोड्यावर असे. सभोंवतीं प्रमुख अधिकारी घोड्यांवर आरूढ झालेले असून चोपदार, व रणवाद्यें वाजविणारे लोक अगदीं शेवटीं असत.

घोडेस्वारांच्या टोळ्या नव्या तळाकडे जातांना दिसणारा देखावा फारच बहारीचा असे. ही बहार पोषाख किंवा शिस्त यामुळें आलेली नसून अंतःकरणांतील उल्हास व आनंद यामुळें आलेली होती. सैन्यास करावा लागणारा प्रवास कंटाळवाणा नसून उलट मनोरंजक वाटे. घोडा व स्वार यांचा एकजीव झालेला असल्यामुळें स्वाराचें हद्दत ओळखून घोडा योग्य वाटेनें आपणच जाई; यामुळें स्वाराचे दोनही हात बहुतेक मोकळे असत; पैकीं त्याच्या एका हातांत लांब भाला असे. या भाल्याच्या फेंकी करून दाखविण्याची हौस प्रत्येक घोडेस्वारास. नदीवर किंवा विहिरीवर पोहण्यासाठीं गेलेलीं मुलें ज्याप्रमाणें उंचावरून उडी मारून, आडवे उभे हात टाकून व नानाप्रकारें पोहून आपलें कौशल्य सभोंवतालच्या मुलांस दाखविण्यासाठीं व दुसऱ्याचें पाहण्यासाठीं उत्सुक असतात, त्याप्रमाणें अगदीं पुढच्या रांकेस असलेले घोडेस्वार

भाल्याच्या नाना प्रकारच्या फेंकी करून दाखवीत व हात दमले म्हणजे आपला घोडा मागें घेत व नव्या दमाच्या घोडेस्वारांना आपलें कौशल्य दाखविण्यास संधी मिळे. हे भाले हलके व दहापंधरा फूट लांबीचे असून त्यास मुठीजवळ रुपेरी घुंगूर बसविलेले असत; व शिवाय भाल्याचा इतर भाग देखील हैसिप्रमाणें शृंगारलेला असे; आणि तो भाला विद्युद्वेगानें स्वाराच्या डोक्याभोंवतीं फिरूं लागला म्हणजे तो देखावा पाहून व घुंगरांचा मधुर ध्वनि ऐकून सर्व घोडेस्वारांची मोठी करमणूक होई. त्यांतच एखाद्याचें विशेष कौशल्य व सफाई दिसली म्हणजे सर्वांच्या तोंडून त्याची वाहवा होई. सारांश त्या लष्करी स्वारांना मर्दानी खेळाची हौस पुरवून घेण्यास फुरसत मिळत नसल्यामुळें मोहिमेचे मुक्काम गाठतांना प्रवासालाच करमणुकीचें स्वरूप देणें त्यांना भाग पडे.

तळावर भाऊसाहेबांचा तंबू बाजाराच्या मध्यभागीं असे. हा लष्करी हालता बाजार म्हणजे मराठ्यांच्या योजकतेचें एक चिन्ह होतें. लष्करास लागणारा हरएकप्रकारचा माल पुरविण्यासाठीं सरकारी व्यवस्था साधारणच असे. पण या लष्करी बाजारांत सर्व प्रकारचा माल मिळे; व त्यांतील दुकानांची मांडणी इतक्या व्यवस्थितपणें होई कीं, कोणत्याही मुक्कामावर पाहिलें तरी त्यांतील रस्ते व दुकानांचा अनुक्रम एकसारखाच असे. कापडबाजार, भाजीबाजार, मोडकाबाजार येथपासून तो हिऱ्यामाणकाच्या बाजारापर्यंत प्रत्येक प्रकारचा स्वतंत्र बाजार निरनिराळ्या भागांत भरलेला; यामुळें कोणसही एखादा जिन्नस कोठें मिळेल हें समजण्यास मुळींच अडचण पडत नसे.

भाऊसाहेबांच्या तंबूजवळ सावकार व सराफ यांची आळी असे. त्यांत हुंड्या देण्याघेण्याचा व्यवहार चालत असून लाखो रुपयांची घडामोड रोज चाले. हिंदुस्थानच्या कोणत्याही भागांतली हुंडी मिळण्यास किंवा ती पटविण्यास तेथें अडचण नव्हती. यानंतर हिंदी व यूरोपियन उंची कापड, रेशमी माल, साटीण, किनखाब, हिरेमोतीं वगैरे मौल्यवान वस्तूपासून तों तहत चाकूकात्र्यांपर्यंत लहानसहान जिन्नस पुरविणारीं दुकानें होतीं. एकंदरींत एक यूरोपियन म्हणतो त्याप्रमाणें ' या बाजारांत मिळणाऱ्या जिनसांची कितीही लांब यादी करणें सोपें आहे. पण येथें न मिळणाऱ्या जिनसांची यादी मात्र करणें कठीण. '

यानंतर दाणेआळी असे. शिवाय सोनार, लोहार, सुतार, शिंपी, स्वयंपाकी वगैरे स्थाइक शहरांत ज्या ज्या प्रकारच्या लोकांचे धंदे चालतात, ते ते धंदे तेथें चालत; यामुळें या लष्करास शहराचीच उपमा साजत होती.

सर्व सैन्य व बाजार नव्या तळावर पोचतांच किंवा त्यापूर्वी थोडा वेळ तीन चार हजार घोडेस्वारांची टोळी आसपास फिरून शत्रूची पहाणी करण्यासाठीं व दाणावैरण मिळवून आणण्यासाठीं पाठवीत असत. या कहीं बरोबर हत्ती, घोडे, उंट, बैल, माणसें व बायका यांचा मोठा घोळका असे, हा सर्व जमाव परत येई तेव्हां धान्यसामुग्री व दाणावैरण यांच्या ओझ्यानें ओथंबलेला असे. यांच्याकडे पाहणारास मधाचें ओझें घेऊन पोळ्याकडे येणाऱ्या मधमाशांची आठवण होई.

मराठी सैन्यांत पायदळाचें महत्त्व फारसें नव्हतें. पण त्यापैकीं गार्द्यांना कांहींसा मान होता. परशुरामभाऊंच्या सैन्यांत पांच हजार गारदी होते; त्यांच्या आंगांत तांबडा कोट असून त्याची गळपट्टी निळ्या रंगाची असे. त्यांची बंदूक बहुधा इंग्रजी, पण ती मोडकीतोडकी असे; कधीं घोडा मोडलेला तर कधीं काना फुटलेला असावयाचा. आणि यूरोपियनाप्रमाणें कवाईत शिकविण्याचा प्रयत्न झाला होता, पण त्या कवाइतींत कांहीं अर्थ नव्हता. याशिवाय गार्द्यांच्या कमरेस एखादी तरवार किंवा पिस्तुल असे. या गार्द्यांकडे बहुतेक तोफांचें संरक्षण करण्याचें काम असे. शत्रूचें ठाणें ताब्यांत आलें, कीं त्याच्या संरक्षणासाठीं कांहीं गार्दी ठेवण्याचा परिपाठ होता. याशिवाय रोहिले, अरब वगैरे परकी लोक परशुरामभाऊंच्या सैन्यांत होते. त्यांच्याजवळ तोड्याच्या बंदुका, तरवारी, भाले वगैरें हत्यारें असत; आणि कित्येक तर तीरकमठे देखील घेऊन येत!

या सैन्याबरोबर लुटारू लोकांचा भरणा देखील बराच मोठा असे. शत्रूच्या मुलखांत शिरून लोकांचीं धान्याचीं पेवें व भूमिगत द्रव्य खणून काढणें व लुटालूट करणें हाच व्यवसाय करून कित्येक लोक पोट भरीत. पण यांच्या बेलगामी वर्तनामुळें मराठ्यांना कित्येक वेळां खालीं तोंड घालण्याचा प्रसंग येई. उदाहरणार्थ परशुरामभाऊ तुंगभद्रा पार होण्याचे पूर्वी कित्येक लमाण व पेंढारी शिवमोग्याकडे गेले होते; त्यांनीं शृंगेरीच्या स्वामीचा मठ दंडकमंडलुसुद्धां लुटला; बायकासुद्धां बाटविल्या, कित्येक बायकांनीं जीव दिले, स्वामीच्या मूर्ती देवलिंग आदिकरून लुटले गेले. स्वामीचे हत्ती व पागा झाडून लमाणांनीं नेली! स्वामींनीं पांच उपोषणें केलीं व ते मृत्यु पावले अशी देखील अफवा उठली होती, पण ती खोटी ठरली.

ही बातमी परशुरामभाऊंस कळतांच त्यांनीं घोडेस्वार पाठवून लमाण धरून आणले; व त्यांचा हत्ती काढून घेतला. पण त्यांजपाशीं लुटीचा माल फारसा सांपडला नाहीं. त्यांचें शासन करावें व स्वामीचा माल स्वामीस द्यावा अशा विचारांत भाऊ होते; पण हे

लुटारू मध्ये आहेत त्यांची चौकशी मी करीन असा रघुनाथराव कुरुंदवाडकरानें आग्रह धरल्यामुळें, ते लोक त्याच्या स्वाधीन करावे लागले.

आपल्या धर्मगुरूंच्या मठाची अशी अप्रतिष्ठा व्हावी हा मराठी सेनापतींचा हेतु असणें शक्य नाहीं. पण या गुरूंचें वर्तन देखील कांहींसे आक्षेपार्ह असे हें आपण विसरतां कामा नये. सेनापती ब्राह्मण आहेत तेव्हां ते आपल्या मठास हात लावणार नाहींत या विश्वासावर आसपासचे सर्व धनिक लोक आपला वित्तविषय घेऊन मठाच्या आसऱ्यास येत. यामुळें आयतें एकत्र झालेलें हें द्रव्य लुटण्याचा मोह पेंढाऱ्यांना पडणें अपरिहार्य होतें. या पेंढाऱ्यांवर मराठी सेनापतींची हुकमत फारशी चालत नसे आणि अशा घबाड लाधण्याच्या प्रसंगीं तर ते पेंढारी अगदींच बेफाम होत. यामुळें लोकांना आश्रय देण्याचें या वेळीं स्वामींनीं नाकारणें जरूर होतें. शिवाय हें स्वामी टिपूस जय-प्राप्ती व्हावी म्हणून अनुष्ठानें व व्रतें वैकल्यें करीत असत; यामुळेंही त्यांच्यावर मराठ्यांचा राग असण्याचा संभव आहे.

बिनलढाऊ लोकांचें हें लटांबर मराठी सैन्याप्रमाणें इंग्रजी लष्कराबरोबर देखील असे. लढाऊ लोकांच्या निदान चौपट तरी इतर लोक इंग्रजी लष्करांत असत. धान्य-सामुग्री, तोफा, राहुट्या व दारूगोळा यांची नेआण करण्यासाठीं निदान पांच लाख बैल व त्यांच्या अनुषंगानें निदान एक लाख लमाण दोस्तांच्या सैन्याबरोबर टिपूच्या राज्यांत शिरले होते; याशिवाय शेंकडो हत्ती व हजारो उंट होते. आणि प्रत्येक घोड्या-बरोबर स्वाराखेरीज निदान चार असामी तरी असत. आणि अजारी व जखमी माणसांना नेण्याकरितां हजारो पालख्या व डोल्या असत त्यांचे भोई होते ते निराळेंच.

हा सर्व सामान्य शिपायांचा व घोडेस्वारांचा लवाजमा झाला. पण गोऱ्या शिपायां-बरोबर पुष्कळच नोकर द्यावे लागत. कारण प्रत्येक अधिकाऱ्यांच्या तैनातीस निदान चाळीस, कप्तानाच्या वीस आणि उपकप्तानाच्या तैनातीस दहा आसामी लागत. प्रत्येक सोल्जराबरोबर निदान एक तरी पोऱ्या असे. एतद्देशीय शिपायांबरोबर कधीं कधीं बायका-मंडळीही असे.

व्यापारी लोकांची संख्या देखील लहान सहान नव्हती. याशिवाय शुद्ध लुटालूट करण्याच्या इच्छेनें सैन्याबरोबर लोक येत असत. ते शत्रूच्या गांवांतून हिंडून धान्याची पेवें शोधण्याचें व गुरें वळवून आणण्याचें काम शिताफीनें करीत. यामुळें हे लोक सैन्याबरोबर ठेवण्यांत आपलें नुकसान नाहीं असें अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आलें.

युद्धास प्रारंभ होतांच शिपायांच्या बायकापोरांमुळें सैन्याच्या हालचालीस व्यत्यय येईल या भीतीनें इंग्रजी सेनापतींनीं हीं बायकापोरें परत घरीं पाठविणें शिपायांना भाग पाडलें. पण यामुळें एकंदरींत तोटा झाला, असा तत्कालीन अधिकाऱ्यांचा अभिप्राय आहे. डिरोम म्हणतो ' बरोबर बायकामंडळी घेणें ज्यास पुरवतें, व सोईचें दिसतें तोच बायका किंवा नोकर बरोबर घेईल. शिवाय शत्रूच्या मुलखांत जो कांहीं कमाई करून आणील तोच नोकर कोणीही ठेवील. '

इंग्रजी सैन्यांतलि शिपायांचे या मोहिमेंत एकंदरींत फार हाल झाले. यास कारण इंग्रजी अधिकाऱ्यांना इकडील स्वाऱ्यांचा विशेष अनुभव नव्हता. अधिकाऱ्यांची सोय बरी होती, कारण प्रत्यकाबरोबर एक पोऱ्या असे तो घोड्याची व्यवस्था ठेवी व एक खुर्चीवाला हमाल असे तो खुर्ची, बाटली, ग्लास व पाण्याचा खुजा घेऊन नेहमीं आफीसरांच्या पाठोपाठ धावण्यास तयार असे; यामुळें त्यानें वाटेल तेव्हां घोड्यावर बसावें, वाटेल तेव्हां पायीं चालावें आणि तेंही नको असल्यावर खुर्चीवर स्वस्थ बसून आराम करावा. शिवाय ही स्वारी तळावर पोंचतांच त्याचा तंबू ठोकलेला तयार असून त्याला तेथें जेवण करून सकाळपर्यंत झोप काढण्यास कांहीं प्रत्यवाय नसे. पण शिपायांचे बरेच हाल होत असत. बंदुक, तरवार, दारुगोळा, कपडे, स्वयंपाकाचीं भांडीं वगैरे बोजा घेऊन मध्यें विसावा न घेतां त्याला सारा दिवस चालावें लागे; तहान लागल्यास गढूळ पाण्याची विहीर वाटेंत आढळेल तिच्यांत पाणी मिळालें तर त्याचें मोठें भाग्य व अशा रीतीनें थकून भागून मुक्काम गांठल्यावर उघड्यांत रात्रभर पडावें लागे; इतकेंच नव्हे, तर त्यांतल्यात्यांत वेळ काढून बाजारांतून माल खरेदी करून स्वयंपाकपाणी व धुणें करावें लागे.

बायका बरोबर नसल्यामुळें इंग्रजी सैन्यांतील देशी शिपयांचे होणारे हाल पाहून मूरनें असा अभिप्राय लिहून ठेवला आहे "शिपायांना सैन्यांत बायका आणण्याची परवानगी द्यावी असें माझें मत आहे. असें करण्यानें कांहीं फायदे आहेत तर कांहीं तोटे आहेत हें खरें. पण तोट्यापेक्षां फायदे जास्त आहेत. तोटा एवढाच कीं आपल्या पगारांतली कांहीं रक्कम त्याला बायकोच्या पोटासाठीं खर्चावी लागेल; पण बायको लष्करांत असेल तर शिपाई सैन्य सोडून पळून जाण्याची भीति रहात नाहीं. या बायकांमुळें बिनलढाऊ लोकांचा भरणा वाढतो यांत शंका नाहीं. पण यांत मोठीशी गैरसोय नाहीं. उलट फायदे मात्र पुष्कळ आहेत. शिपायांना स्वयंपाकाचा, भांडी घासण्याचा व कपडे धुण्याचा त्रास घ्यावा लागत

नाहीं. शिवाय एक तंबू व बैल मिळाला म्हणजे ही बाई दोघां तीघां शिपायांच्या स्वयं पाकास पुरणारें सामान वागवते व बैल हाकून पुढच्या मुक्कामावर नेते. आणि शिपा जखमी किंवा आजारी पडला तर या बायकोचा उपयोग किती होतो हें तर सांगावया सच नको. एकंदरींत शिपायांना बायका बरोबर घेऊं देण्यानें त्यांचें जीवित सुखमय होतें. आणि त्यांना ही सवलत न दिली तर ते वाटेंत भाड्याची बायको गांठल्याशिवाय रहात नाहींत. त्या योगानें त्याचा खर्च दुप्पट होतो, त्याला नीतिबाह्य वर्तन करावें लागतें, तो आजारी पडतो आणि निरुपयोगी होऊन बसतो !'

इंग्रजी सैन्याचे हे हाल सरसकट एकसारखे असते तर गोष्ट निराळी होती. पण मद्रास व बंगालकडच्या शिपायांची व्यवस्था बऱ्यापैकीं असून मुंबईकर शिपायांना मात्र १७९० च्या मे महिन्यापासून १७९२ च्या जूनपर्यंत बराच काळ उघड्या मैदानांत व बिनआसऱ्याच्या जागेवर घालवावा लागला ! आणि या पक्षपाताचें कारण काय तर मुंबईच्या शिपायांना तंबू राहुट्या देण्याची वहिवाट नव्हती. तेव्हां नवी वाहिवाट घाल-ण्याचें धाडस कोणी करावें ?

मागें सांगितल्याप्रमाणें परशुरामभाऊ आपल्या सैन्यासह ६ एप्रिल १७९१ रोजीं तुंगभद्रा उतरून दक्षिण तीरास आले. यापूर्वींच रघुनाथराव कुरुंवाडकरास त्यांनीं पांच हजार फौजेसह हरिहरास पाठविलें होतें. ते त्यांना बसवापट्टणच्या मुक्कामीं मिळाले. नंतर भाऊंनीं त्यांजबरोबर तोफा देऊन त्यांची आघाडीस रवानगी केली. शिवाय गणपतराव मेहेंदळे व काशीनाथपंत रानडे यांजबरोबर पांचसहा हजारांची टोळी देऊन ती बिदनूरच्या बाजूस पाठविली. तिनें शिवमोग्याचें ठाणें घेतलें. याच सुमारास विजयदुर्गाहून मराठ्यांच्या आरमारानें करवारांत जाऊन टिपूच्या ताब्यांतील प्रदेशांत बराच धुमाकूळ केला.

किरकोळ सैन्य अशा रीतीनें निरनिराळ्या दिशेस पेरून परशुरामभाऊ मधल्या वाटेनें मोठ्या सैन्यानिशीं चित्रदुर्गास गेले. या सुमारास जलदीनें पुढें श्रीरंगपट्टणाकडे जाण्याविषयीं नानांचीं परशुरामभाऊंस पत्रें आलीं होतीं. त्याप्रमाणें तें घाईनें मेल-कोट्यास आले. तेथें त्यांची व हरीपंत फडक्याच्या सैन्याची गांठ पडली. या वेळीं परशुरामभाऊजवळ वीस हजार व हरीपंताजवळ बारा हजार मिळून बत्तीस हजार मराठी फौज तेथें जमली होती. आणि विशेष गोष्ट ही कीं, त्यांच्याजवळ धान्यसामुग्री भरपूर होती.

यानंतर भाऊंनीं आपले पुत्र रामचंद्रपंत आप्पा यांजबरोबर पांच हजार फौज देऊन

त्यास श्रीरंगपट्टणच्या बाजूनें शत्रुसैन्याची पाहणी करण्यासाठीं पाठविलें होतें. त्याची भुकेनें व्याकुळ होऊन बंगलोरकडे मागें फिरणाऱ्या इंग्रजी सैन्याशीं गांठ पडली. रामचंद्रपंतांनीं स्वार व कारकून पाठवून आपण आल्याची वर्दी कळविली. पण इंग्रजांना ती खरी वाटेना. नंतर गोरे अधिकारी स्वतः येऊन पाहून गेले तेव्हां त्यांची खात्री झाली. इंग्रजी अधिकारी मोठ्या आनंदानें मराठ्यांना भेटले; व मराठ्यांनीं, आपल्या जवळचा माल इंग्रजांना पुरवितांना कोणताही भेदभाव मनांत आणला नाहीं. हा माल इंग्रजी लष्करास पुरविल्यानें सर्वांवरच उपासमारीचा प्रसंग येईल हें त्यांना दिसत असलें तरी त्यांनीं त्याकडे दुर्लक्ष केलें. इंग्रजी व मोंगली फौजेनें मराठ्यांच्या या सरळ स्वभावाचा चांगला फायदा घेतला. "इंग्रजी सैन्यानें दाणे वगैरे जो जिन्नस सांपडला तितका नेला. **पेढे, फुटाणे वगैरे खोबऱ्याची वाटी आदिकरून रुपयास दोन वाट्या घेऊन इंग्रजांनीं खादल्या! दह्याचीं मडकीं गवळ्यांपासून दोन दोन रुपये द्यावें व गाडगेंच घ्यावें असें जाहलें!*"**

पण यामुळें चारच दिवसांत मराठी लष्करांत देखील दुष्काळाची धारण झाली. रुपयास सवाशेर तांदूळ, दोन शेर नाचण्याचें पीठ, व चार रुपये शेर तूप मिळूं लागलें. तेव्हां हीं सैन्यें एकत्र राहून निभाव लागणार नाहीं असें समजून निरनिराळ्या दिशेस सैन्यें विभागून रहावें हा बेत सर्वानुमतें दोस्तांनीं ठरविला.

---

* ऐ. ले. सं. भा. ९ पहा.

भाग ११ वा

दोस्तांच्या सैन्याची तात्पुरती पिछेहाट.

इंग्रजी व मराठी सैन्याची भेट होतांच दोघांनाहि मोठा आनंद झाला; व शेवटीं आपणास जयप्राप्ती खास होणार असें त्यांना वाटूं लागलें. पण कार्नवालिसला या भेटीमुळें तात्कालिक धोरण ठरविण्याच्या दृष्टीनें थोडी पंचाईत वाटली. कार्नवालिसला मुळीं हिंदुस्थानांत येऊन काय तीं पांच वर्षें झालीं होतीं;* आणि तो सर्व काल त्याला कलकत्त्यापासून काशी पर्यंतच्या मुलखांत घालवावा लागला. यामुळें त्याला उत्तर हिंदुस्थानांतील लोकांचीच तेवढी साक्षात माहिती होती. मराठ्यांची माहिती फक्त कागदपत्रावरून व मुंबई येथील इंग्रजांमार्फत काय मिळत असेल तेवढीच त्याच्या कानावर गेलेली. यामुळें मराठे हे अत्यंत मतलबी, स्वार्थसाधू व विश्वासघातकी लोक आहेत असा त्याचा सर्व सामान्य समज झालेला होता. हा समज दूर करण्याचें काम मराठ्यांचा कलकत्त्यास वकील होता त्यानें बजवावयास पाहिजे होतें. पण हा वकील दिल्ली व हैदराबाद येथील दरबारांत वावरणाऱ्या मराठ्यांच्या वकीलासारखा मुत्सद्दी व तोलदार नव्हता. त्याला इंग्रजांकडील बातमी तर चांगलीशी कळत नव्हतीच पण मराठ्यांकडली बातमी देखील त्याच्यापेक्षां कार्नवालिसला आधीं लागे असें इतिहास-संग्रहांत छापलेल्या अनेक पत्रांवरून दिसतें. तथापि मॅलेट पुण्यास राहूं लागल्यापासून मराठ्यांची सत्ता उपेक्षणीय खास नव्हे एवढें कार्नवालिसच्या ध्यानांत आलें होतें; व यासाठीं त्यानें टिपूशीं युद्ध सुरु करण्यापूर्वी मराठ्यांशीं दोस्तीचा तह केला होता. पण तह झाला तरी ते मनापासून इंग्रजांना मदत पोचविण्यासाठीं झटणार नाहींत अशी कार्नवालिसला जबरदस्त शंका होती; आणि परशुरामभाऊ बरेच महिने धारवाडच्या वेढ्यांत गुंतला यामुळें त्याच्या या शंकेस दृढता येऊन मराठ्यांविषयींचें त्याचें प्रतिकूल मत जास्तच पक्कें झालें. अशा रीतीनें आपल्या आपयशाचें कारण मराठ्यांचा विश्वासघातकी स्वभाव अशी त्यानें मनांत खूण गांठ बांधली व तो निराशेनें बेंगरूळच्या वाटेनें परत

---

* कार्नवालीस गव्हर्नर जनरल या नात्यानें कलकत्त्यास येऊन १७८६ च्या सप-टेंबर १२ तारखेस अधिकारारूढ झाला.

निघाला. इतक्यांत तीस बत्तीस हजार मराठी सैन्य भरपूर अन्नसामुग्रीसुद्धां इंग्रजांच्या मदतीस अचानकपणें येऊन पोंचलें ! यामुळें त्याचें मन आश्चर्यचकित झालें. " मराठ्यांविषयींचा माझा अंदाज सर्वशेल चुकला, आतां तरी त्यांच्याविषयीं भलत्या कुशंका मनांत उद्भवून माझ्या हातून त्यांचें मन दुखवलें न जावो " असें म्हणून मराठ्यांशीं वागतांना आपल्या हातून त्यांच्या पुढाऱ्यांचा अपमान न घडावा म्हणून तो फार जपू लागला. यामुळें मराठी सैन्याच्या अधिपतींची सल्ला घेऊन पुढचा कार्यक्रम ठरविण्याचा त्यानें निश्चय केला. बंगलोरकडे परत जावें कीं तावडतोब पुनः श्रीरंगपट्टणाकडे वळून युद्धाचा निकाल लावावा हा तात्कालिक प्रश्न त्याला सोडविणें भाग होतें. पण मराठ्यांच्या सेनापतींचा रागरंग पाहून या प्रश्नाचा आपणास निर्णय केला पाहिजे असें त्यास दिसून आलें. यामुळें त्यांची भेट घेण्याची त्यानें तावडतोब तयारी केली.

त्यावेळीं म्हणजे १७९१ च्या मे २८ तारखेस मेलकोट्यानजीक दोन्ही सैन्यांचा तळ पडला होता. तेव्हां कार्नवालीसनें मराठ्यांच्या तळाकडे आधीं भेटीसाठीं जावें कीं, हरीपंतानें इंग्रजी तळाकडे आधीं यावें, हा वाद उपस्थित होऊन कालहरण न व्हावें म्हणून मध्येंच एके जागीं तंबू उभारून तेथें दोघांची मुलाखत व्हावी अशी सूचना कार्नवालीसनें केली व ती मराठ्यांना पसंत पडली.

दोन प्रहरीं एक वाजतां ही मुलाखत व्हावयाची असें ठरलें होतें. त्याप्रमाणें ठरल्यावेळीं कार्नवालीस, जनरल मेडोज व इंग्रजी सैन्यांतील कित्येक मोठमोठे अधिकारी तंबूंत हजर झाले. पण मराठ्यांपैकीं तेथें कोणीच आलें नव्हतें. तेव्हां कार्नवालिसनें ' आम्हीं येऊन पोंचलें तुम्हीं लौकर या ' असे एका मागून एक निरोप मराठ्यांकडे पाठविले. पण ' टाइमशीर ' वागण्याची सवय मराठ्यांना नसल्यामुळें, त्यांना मुलाखतीच्या जागेवर येऊन पोंचण्यास दोन तीन तास उशीर लागला. हा उशीर हेतुपुरस्सर केलेला नसून मराठ्यांच्या हाडींमाशीं खिळलेल्या एका दोषाचा हा परिणाम होता हें उघड आहे. पण मुलाखतीच्या जागीं जमलेल्या इंग्रजी मंडळींना मात्र या गोष्टीचा राग आला. " ठरलेल्या वेळीं येणें हें थोरवीचें लक्षण नव्हें; आपल्यासाठीं लोकांना तिष्ठत ठेवणें यांत प्रतिष्ठितपणा आहे " असें एशियाटिक लोकांना वाटत असल्यामुळें, मराठ्यांनीं भेटीस येण्यास मुद्दाम उशीर केला, वगैरे चिरडखोरपणानें लिहिलेलीं वाक्यें या मुलाखतींत हजर असलेल्या इंग्रजी लोकांच्या लेखांत आढळतात. पण हें लिहिणें अज्ञानमूलक आहे. असो. तीन वाजण्याच्या सुमारास मराठे सरदार व

सेनापती हत्तीवर बसून सावकास व दरबारी थाटानें पावलें टाकीत. चार वाजण्याच्या सुमारास तंबूजवळ आले. त्यावेळीं बरोबर पायदळ, घोडेस्वार व इतर लवाजमा त्यांनीं आणला होता. ते हत्तीवरुन उतरतांच तंबूच्या दारापर्यंत कार्नवालीसनें व मेडाजनें जाऊन त्यांचें स्वागत केलें आणि त्यांची भेट घेतली. खांद्याला खांदा लावून देशी पद्धतीनें इंग्रजी व मराठी सेनापतींची भेट व थोडेसें संभाषण होतांच दुसऱ्या तंबूंत फक्त खाशी मंडळी महत्त्वाचें खलबत करण्यासाठी गेलीं.

या खलबताच्या प्रसंगी हरीपंत फडके, परशुरामभाऊ व कांहीं निवडक सरदार मराठ्यांच्या तर्फे व कार्नवालिस मेडोज वगैरे पांचचार जण इंग्रजांच्या तर्फेचे हजर होते. पैकीं एका बाजूचा पुढाकार हरीपंताकडे व दुसऱ्या बाजूचा कार्नवालीसकडे होता. हरीपंताचें वय या वेळीं साठीच्या सुमाराचें असून त्याची गणना पोक्त मुत्सद्द्यांत होत असे त्यांतून स्वतःस अधिकार मिळवावा अशी त्यानें केव्हांही इच्छा न करतां प्रत्येक प्रसंगीं केवळ राज्यरक्षणाच्या दृष्टीनें जें जें करणें इष्ट दिसलें तेंच त्यानें केलें होतें. यामुळें. त्याच्या मतास मराठी दरबारांत चांगला मान असे. नाना फडणीस व महादजी शिंदे या दोन व्यक्ति वगळल्या असतां त्या वेळीं हरीपंताच्या बोलण्यावर आक्षेप घेण्याचें धाडस मराठ्यांच्या दरबारांत कोणीही सहसा करीत नसे. शिवाय त्याची चर्या, स्वरूप व शरीराची आकृती ही सर्व या गुणांना साजेशी गंभीर होती. तो शरीरानें स्थूलहि नव्हता किंवा किडकिडीतही नव्हता; डोळे पाणीदार असून, वर्ण गोरा, व अंगलट बांधेसूद होती व त्याच्याकडे पाहतांच हा बुद्धिमान व आदरणीय आहे असें पाहाणारास वाटत असें; यामुळें कार्नवालिसच्या मनांत हरीपंताविषयीं अनुकूल ग्रह या भेटीच्या प्रसंगीं झाला व सहवासानें ही अनुकूलता पक्की होत गेली.

हरिपंताखालोखाल मराठी सैन्यांत महत्त्वाचा पुरुष म्हणजे परशुरामभाऊ त्याचें वय या वेळीं सरासरी चाळीस वर्षांचें असावें. तो कांहींसा ठेंगणा, काळसावळ्या वर्णाचा व शरीरानें पुष्ट असा होता. शौर्याच्या दृष्टीनें त्याची मोठी ख्याती होती. त्याचे काळेभोर डोळे व उत्साहपूर्ण चेहरा पाहतांच त्याच्या शौर्य धैर्यादि, गुणांची ओळख सहज पटत असे. कारस्थानापेक्षां लढवय्या म्हणून घेण्याची त्याला अधीक हौस होती त्यांतून टिपूशीं युद्ध करण्यासाठीं तर त्याचें पाऊल नेहमींच सर्वांपेक्षा पुढें असें. यामुळें मराठ्यांच्या तर्फे प्रत्यक्ष लढण्याचें काम या वेळीं परशुरामभाऊनें करावे व कार्नवालिस अगर

टिपू यांच्याशीं बोलाचाली व करारमदार वगैरे करण्याचें मुत्सद्देगिरीचें काम हरीपंतानें संभाळावें अशी कामाची वाटणी ठरली. *

या मुलाखतीसाठीं आलेल्या इतर मराठे लोकांचें मूरनें असें वर्णन दिलें आहे. " मराठ्यांचे सरदार व इतर सर्वच लोक फार साधे, पण नीटनेटके दिसतात. त्यांची मुद्रा सौम्य, स्वभाव मायाळू आणि वागणूक सभ्यपणाची व सरळ आहे. त्यांची आपल्या देशावर व पुढाऱ्यांवर अढळ निष्ठा आहे. मोगली सैन्यांत पोषाखाचे अवडंबर माजवून व नुसता दिमाख दाखवून ऐन युद्धाच्या वेळीं शत्रूस पाठ दाखवून पळत सुटणारे लोक होते, तसे मराठ्यांच्या सैन्यांत नव्हते. १७७२ सालीं थोरल्या माधवरावांनीं ज्या ठिकाणीं हैदराचा पराभव केला त्या मेलकोटें नांवाच्या गांवाजवळच इंग्रजी व मराठीं सैन्याची मुलाखत अकस्मिकपणें झाली हा शुभ शकुन आहे असें समजून ते आनंदांत आहेत. मे च्या १५ तारखेस इंग्रजी सैन्यानें टिपूचा पराभव केला असून देखील आपल्याच तोफा फोडून परत फिरण्याचा प्रसंग इंग्रजी सैन्यावर आलेला पाहून त्यांना मनापासून वाईट वाटलें."

इंग्रजी व मराठी सेनाधिपतींचें खलबत तास दीडतास चालून सायंकाळीं साहा वाजण्याच्या सुमारास दोनही बाजूचे लोक आनंदानें तंबूबाहेर आले. या भेटींत श्रीरंगपट्टणाकडे परत मोर्चा न वळवितां बेंगळूरकडे जाऊन विसावा घेण्याचाच ठराव कायम झाला; याचें कारण असें. श्रीरंगपट्टणाला वेढा द्यावयाचा म्हणजे तोफखाना जबरदस्त पाहिजे. पण तो आपल्याच हातानें फोडलेला असून मद्रासेहून नवा तोफखाना येण्यास बराच अवकाश लागण्याचा संभव होता. शिवाय लोक उपासमारीनें व दगदगीनें फार थकले नसल्यामुळें त्यांना विसावा मिळाल्यावांचून त्यांच्या हातून पुढें काम रेटणें शक्य नव्हतें. आणि लढाऊ लोकांना अन्न व युद्धसामुग्री पुरविण्यास त्या काळीं जीं वाहतुकीचीं जनावरें

* सांवशीच्या लढाईंत कोन्हेरराव मारले गेले, पांडुरंगरावास हैदरानें कैद करून पट्टणास नेलें ते कैदेंतच मेले; पटवर्धनांचे जिव्हाळ्याचे स्नेही मुरारराव व शिवराव घोरपडे हेही शत्रूच्या कैदेंत मरण पावले; अलीकडे टिपूनें विश्वास दाखवून पटवर्धनांचे आप्त नरगुंदकर यांस कैद केलें व त्यांचें संस्थान घेतलें इत्यादि गोष्टींमुळें परशुरामभाऊ व टिपू यांमध्यें भयंकर वैर पडलें होतें. शिवाय हैदर व टिपू यांनीं आपल्या जहागिरीपैकीं एक पैसासुद्धां गेलीं सोळा सतरा वर्षें आपल्या हातीं लागू दिला नाहीं व धारवाडच्या सुभ्यांत नानाप्रकारचे जुलूम करून हाहाःकार उडवून दिला. याही गोष्टींचें उसनें परशुरामभाऊस आतां फेडावयाचें होतें. (ऐति. ले. सं. पृ. १७९२ पहा.)

लागत त्यांचा फारच तुटवडा होता. त्यांतलीं बहुतेक उपासमारीनें व रोगानें मृत्युमुखीं पडलीं होतीं व जीवंत होतीं तीं स्वतःचें शरीर वाहण्यास देखील समर्थ नव्हती; तेव्हां त्यांच्या हातून वाहतुकीचें काम होणें कसें शक्य? शिवाय मेलकोव्याचें युद्ध झाल्यापासून दहाबारा दिवस इंग्रजी सैन्याचा तळ ज्या भागांत पडला होता, तेथें चोहीकडे मेलेल्या जनावरांच्या हाडांचा व मांसाचा खच पडल्यामुळें अत्यंत दुर्गंधी सुटली होती; आणि सैन्यांतले लोक भुकेच्या यातना सहन न होऊन हें कुजकें मांस खाऊं लागले! यामुळें अनेकप्रकारच्या रोगांचा प्रसार सैन्यांत झाला. देवीच्या सांथीनें हजारों लोक खितपत पडले व पुष्कळांनीं यमसदनाची वाट धरली. सारांश, श्रीरंगपट्टणाच्या जवळून इंग्रजांना तळ हलविण्यावांचून त्या वेळीं गत्यंतरच नव्हतें.

इतक्या यातना भोगाव्या लागल्यामुळें जेरीस आलेल्या इंग्रजी सैन्यास हरएकप्रकारें मदत पोंचविण्यासाठीं मराठे तयार होते. पण त्यांच्या जवळचा तरि सांठा किती दिवस पुरणार? सर्वांनीं मिळून अन्न मिळविण्यासाठीं आधीं जोराची खटपट केली पाहिजे, हें तत्त्व हरीपंतानें कार्नवालिसकडून आधीं मान्य करून घेतलें; आणि त्याची अंमलबजावणी करण्याचे त्यानें दोन मार्ग सुचविले. शत्रूच्या मुलखांत गांवोगांव असणाऱ्या धान्य-संग्रहाचा शोध लाऊन तो हस्तगत करण्याचें काम मराठ्यांना साधण्याजोगें होतें व तें त्यांनीं आनंदानें पत्करलें. पण इंग्रजांना सध्यां लढण्याचें सामर्थ्य नसलें तरी त्याचें द्रव्य बळ मोठें; तेव्हां धान्य विकत घेण्याची सोय दिसेल तेथें इंग्रजांनीं हिंमत धरून पैशाचा पुरवठा करावा असें हरीपंताचें म्हणणें होतें व तेंही कार्नवालीसनें मान्य केलें.

गेल्या महायुद्धांत ज्याप्रमाणें तटस्थ राष्ट्रें युद्धमान राष्ट्रांस हरएक प्रकारचा माल विकत देण्यासाठीं धडपडत असत, त्याचप्रमाणें युद्धाच्या वेळीं दक्षिण हिंदुस्थानांत धान्याची नेआण करण्याचें काम लमाण लोक करीत असत. या लमाणांजवळ हजारों बैलांचे तांडे असून सामान्य चोर व दरवडेखोर यांपासुन स्वसंरक्षण करून घेण्यासाठीं लागणारी शस्त्रसामुग्रीहि त्यांच्या जवळ असे. त्यांच्या बरोबर बायका, पोरें वगैरे लोकांचा मोठा घोळका असून हा फिरता व्यापारी संघ युद्धमान राष्ट्रांना धान्य विकून आपला चरितार्थ चालवीत असे. अमूक पक्षासच धान्य पुरवावयाचें आणि अमक्यास पुरवावयाचें नाहीं असा भेदभाव ते करीत नसत. आपणापुढें धान्य खरेदी करण्यासाठीं आलेला इसम न्यायी पक्षाचा आहे किंवा अन्यायी पक्षाचा आहे, याचा विचार करण्याच्या भानगडींत न पडतां आपण ठरविलेल्या भावानें धान्य घेऊन पैसे पदरांत टाकण्यास जो

तयार असेल त्यास आम्हीं धान्य पुरवूं असे ते म्हणत. यामुळें ते वंजारी व लमाण लोक दोनही पक्षांस हवेसे वाटत. ज्याच्याजवळ द्रव्यबळ जास्त असेल त्याला या वंजाऱ्यांच्या धान्याचा अधिक फायदा मिळे. तेव्हां हरीपंताचें कार्नवालिसला असें सांगणें होतें कीं " टिपूची पत सध्यां बाजारांत अगदीं कमी झाली आहे. त्याची हुंडी चालत नाहीं; व रोकडहि त्याच्याजवळ फारशी नाहीं. तेव्हां त्याला लमाणांकडून धान्य मिळणें कठीण पडेल. तुम्हांजवळ द्रव्यसंग्रह चांगला आहे व तुमची पतहि चांगली आहे. तेव्हां पैसा खर्च कराल तर तुमची धान्याची अडचण नाहींशीं होईल. '

हा उपदेश पटल्यामुळें कार्नवालिसनें पैशाचा पुरवठा करण्यासाठीं एक धाडसाचा उपाय योजला तो असा. चीनच्या बाजूस इंग्रजी कंपनीचा बराच मोठा व्यापार चालत असे. त्यासाठीं रोकड रक्कम (चांदी सोनें) घेऊन कांहीं इंग्रजीं जहाजें चीनकडे जाण्यास निघालीं असतां कलकत्त्याच्या बंदरांत मुक्कामासाठीं राहिलीं होतीं. तेव्हां कार्नवालीसनें या जहाजांवरची सर्व रक्कम पुढें चीनकडे न पाठवितां एकदम आपल्या सैन्यासाठीं ताब्यांत घेऊन खर्च करण्याचें ठरविलें ! दुसऱ्या कोणत्याही गव्हर्नरानें असें कृत्य करण्याचें मनांत देखील आणलें नसतें. पण इंग्लंडांतील कंपनीचे सूत्रचालक व मुत्सद्दी यांचा आपणावर पूर्ण विश्वास आहे अशी खात्री असल्यामुळें, कार्नवालिसनें हे धाडस केलें व तें पचलेंहि. असो. या वेळीं पैशाच्या जोरावर धान्यसंग्रह व इतर अनुकूलता मिळविण्याची संधी कार्नवालिसला सहजगत्या प्राप्त झाली व तिचा त्यानें पूर्ण फायदा घेतला.

दोस्तांच्या सैन्यानें या वेळीं तात्पुरती पिछेहाट करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें जूनच्या ६ तारखेस मेलकोट्याहून या सैन्यांनीं प्रथम उत्तरेकडे नागमंगळाकडे कूच केलें. कारण परशुरामभाऊंनीं त्या ठिकाणीं धारवाडाहून येतांना थोडेसें सैन्य व अन्नसामुग्री ठेवली होती. ती ताब्यांत घेऊन हीं सैन्यें पूर्वेकडे वळून मद्दूर नदी ओलांडून बेंगरूळास गेलीं.

अशा रीतीनें थोडासा द्राविडी प्राणायाम करून व दिवसगत लाऊन बेंगरूळास हीं सैन्यें गेलीं. कारण उत्तरेकडून येतांना परशुरामभाऊंनीं चित्रदुर्गापासून दक्षिणेस ठिकठिकाणीं जीं ठाणीं बसविलीं होतीं त्यांच्यावर टिपूचा हल्ला होण्याचा संभव होता; तेव्हां त्यांना इषारा पाठवून बेंगरूळच्या बाजूस बोलावून घेणें जरूर होतें; शिवाय होईल तितके दिवस टिपूला किल्ल्यांतून बाहेर पडूं देऊं नये म्हणजे त्याची धान्यसामुग्री संपेल असाहि त्यांचा हेतु होता. आणि दोस्तांचीं सैन्यें मद्दूर नदीपलीकडे गेलीं म्हणजे ज्या मुलखांतून टिपूस चारा व अन्न मिळण्याचा संभव होता तो प्रदेश लुटून आपलीं सैन्यें त्या सामुग्रीनें ताजींतवानी करणें दोस्तांना इष्ट दिसलें.

बेंगरूळच्या दिशेनें ही पिछेहाट करीत असतांना इंग्रजी पलटणें पिछाडीस असून शत्रूचे घोडेस्वार समोरून येत आहेत किंवा काय, याचा तपास करण्याचें काम त्याजकडें दिलेलें होतें. यामुळें त्यांना पहाटे उठून आधीं मराठी घोडेस्वारांना जागें करावें लागे. नंतर हे घोडेस्वार व इंग्रजी सैन्यांतील बाडबिछाड निघून गेलें म्हणजे मागाहून इंग्रजी पलटणें शेवटीं निघत असत. यामुळें ही दोस्तांचीं सैन्यें चाललीं असतां एखाद्या टेंकडीवरून पाहणारास आघाडीस घोडस्वार व हत्ती, उंट आणि बैल यांचा अव्यवस्थित घोळका दिसत असून पिछाडीस तेवढें व्यवस्थेनें पावलें टाकणारें पंधरा हजार इंग्रजी पायदळ दिसलें असतें.

आघाडीस चालणाऱ्या मराठे घोडेस्वारांनीं या वेळीं महत्त्वाची कामगिरी बजावली. ते आसपास दहा पंधरा मैलपर्यंत टेहळणी करून टिपूचे कहींचे बैल व उंट लुटींत. त्याच्या लहानसहान टोळ्या सभोंवार हिंडतांना आढळल्या तर त्यांवर छापा घालीत; दोन चार घोडेस्वार मुद्दाम शत्रूच्या छावणीच्या आसपास जाऊन त्याला आपल्या अंगावर ओढून घेत व ते पाठलाग करूं लागले म्हणजे त्यांना आयते मागें राहिलेल्या मोठ्या सैन्याच्या आटोक्यांत आणून सोडीत. सारांश मराठे घोडेस्वारांना ज्याप्रकारची युद्धपद्धति अंगवळणी पडलेली होती तीच स्वीकारण्याचा या वेळीं प्रसंग आल्यामुळें त्यांच्या हातून समाधानकारक रीतीची कामगिरी झाली. ती इंग्रजी सैन्यास या वेळीं फारच पसंत पडली. याचे कारण असें कीं, मराठ्यांनीं हें काम केलें नसतें तर इंग्रजी सैन्यास टिपूच्या बेंदानीं बेजार करून टाकलें असतें. या वेळीं इंग्रजी सैन्यांतील घोडे म्हणजे हाडांचे जिवंत सापळे बनलें होतें. त्यांना जलद चालण्याचें देखील सामर्थ्य नव्हतें; तेव्हां शत्रूचा छापा आला असतां त्यांचा कितपत उपयोग झाला असतां हें दिसतच होतें. शिवाय इंग्रजी सैन्यांत या वेळीं आजारी व जखमी लोकांची संख्या फार मोठी होती. यामुळें ज्या घोड्यांच्या आंगीं थोडेंबहुत सामर्थ्य राहिलें होतें त्यांच्यावर या आजारी लोकांना बसवीत व सर्व अधिकारी व स्वार घोड्याचा लगाम धरून सावकास चालत. यामुळें मंदगतीनें पावलें टाकीत जाणाऱ्या या सैन्याचें संरक्षण करण्याची जबाबदारी या वेळीं मराठे घोडेस्वारांनीं केली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

या सैन्यांचे दोन चार कोसांवर मुक्काम होत. तेव्हां कार्नवालीस व मेडोज एक दोन दिवसाआड हरीपंत व परशुरामभाऊ यांची गांठ घेऊन अनेक प्रकरणांची चर्चा करीत. अशा दोन तीन प्रसंगांचीच माहिती उपलब्ध आहे, व ती आम्हीं योग्य ठिकाणीं

घेणार आहों. पण या एकंदर भेटीसंबंधीं इंग्रजी लेखकांची सरसकट एक मोठी तक्रार असे ती ही कीं, ठरलेल्या वेळीं हे मराठे सेनापति कधींही भेटीस तयार नसत. कांहीं ना कांहीं उशीर प्रत्येक भेटीच्या वेळीं व्हावयाचाच. यामुळें इंग्रजांना चीड येत असे. पण सर्व राग गिळून हरीपंत आले म्हणजे त्याला आपल्या मनांतला राग दिसू न देण्यासाठीं इंग्रजांना उसनें हसें आणावें लागे. तथापि कार्नवालिस चाणाक्ष मनुष्य होता. कोणत्या वेळीं आत्मसंयमनाची आवश्यकता आहे हें तो चांगलें जाणत असे. यामुळें पुढें पुढें त्यानें मराठ्यांना दोष देण्याचें मनापासून सोडून दिलें.

बेंगरूळास विसावा घेतल्यानंतर पुढें श्रीरंगपट्टणाच्या वेढ्यास पुनः निघण्याच्या वेळीं काय काय अडचणी येतील व त्या कशा दूर कराव्या याची चर्चा देखील या वेळीं हे सेनापती करीत असत. तोफा दारू वगैरें लढाऊ सामान मद्रास व कलकत्त्याहून आणतां येण्याजोगें होतें. पैशाचीहि अडचण फारशी नव्हती. पण या पैशाच्या जोरावर जमविलेली धान्यसामुग्री, दारुगोळा व तोफा वाहून नेण्यास हजारों बैलांची आवश्यकता होती, ते कसे मिळवावे हें कोडें कांहीं केल्या लौकर सुटेना. इंग्रजांच्या सैन्यांतील साठ हजार बैलांचा संहार टिपूच्या सैन्यांतील लोकांनीं गेल्या पांच सहा महिन्यांत केला होता. तेव्हां ही उणीव पैशानें भरून निघणें मुष्किलीचें होतें. याकरतां कार्नवालिसनें मद्रास व पुणें या बाजूस बैल खेरदी करण्यासाठीं बरेच एजंट तर रवाना केलेच; पण दुसरी एक चमत्कारिक तोड त्यानें काढली. ती अशी कीं मोठमोठे लष्करी अधिकारी व पलटणिवरचे कप्तान यांना त्यानें नक्त नेमणूकच करून दिली. या नेमणुकींतून या अधिकाऱ्यांनीं आपल्या हाताखालच्या शिपायांना लागणारें धान्य, तंबूचें सामान व इतर ओझें वाहून नेण्याची व्यवस्था जमेल तशी करावी. या उपायानें खर्च थोडा वाढला. पण कार्नवालिसचा खजीना या वेळीं चांगला भरलेला होता. तेव्हां या नव्या उपायामुळें खर्च झाला तरी सामानाच्या वाहतुकीची व्यवस्था करण्याची त्याच्या मागची विवंचना नाहींशी होऊन ती काळजी सर्व अधिकाऱ्यांत वाटली गेली. त्याचा परिणाम असा झाला कीं, प्रत्येक अधिकारी व सैनिक डोकें खाजवून हा प्रश्न सोडवूं लागला. यामुळें कोणी बैल खेरदी केले, कोणी उंट मिळविले तर कोणी खांद्यावरूनच सामान नेऊं लागला. ज्यास जो उपाय सुचला तो त्यानें योजून प्रसंग निभवावा; जो तोड काढील तोच कर्ता व जो 'कसें करावें' म्हणून हात जोडून बसे तो अजागळ; असें ठरण्याची वेळ दिसल्यामुळें जो तो ईर्षेनें हें काम निभवूं लागला. लष्करी बाबतींत देखील

व्यवस्थेची जबाबदारी सरकारनें आपल्या शिरावर न घेतां व्यक्तीवर सोपविणे कधीं कधीं जास्त फायदेशीर असतें व याचाच अनुभव या वेळीं कार्नवालिसला आला.

बैलांच्या खालोखाल तांदूळ, (गोऱ्या शिपायांना लागणारें) मांस, मीठ व ताडीची दारू यांचा पुरवठा भरपूर करणें महत्त्वाचें होतें. पैकीं तांदूळ सर्वच लोकांना लागत असत्यामुळें त्याची खरेदी करण्यासाठीं चोहीकडे लोक रवाना करण्यांत आले. बेंगरूळचा किल्ला ताब्यांत आला तेव्हां बराच तांदूळ तेथें इंग्रजी सैन्याच्या ताब्यांत आला होता. पण गेल्या दोन तीन महिन्यांत त्याच तांदळावर सर्व इंग्रजी सैन्याचें पोट चाललें होतें यामुळें त्यापैकीं शिलकी सांठा फारसा राहिला नाहीं. मराठ्यांनीं आणलेली अन्नसामुग्री मोठी होती. पण लाखो सैन्यानें एका जागीं तळ देऊन तिचा फन्ना उडविण्याचें का[ही] पत्करलें तर तो सांठा देखील पुरणें शक्य नव्हतें. याशिवाय मराठे घोडेस्वार टिपूच्या मुलखांतून लूट आणीत. पण त्या मुलखाची गेल्या पांच सात महिन्यांत सैन्याच्या बर्दळीनें इतकी पायमल्ली झाली होती कीं, तो अगदीं पिळून काढला तरी त्यापासून फारसा लभ्यांश मिळण्याची आशा नव्हती. फार तर या लुटीवर मराठ्यांना आपलें पोट चालावितां आलें असतें इतकेंच.

याही अडचणींतून पार पडण्याचा मार्ग कार्नवालिसनें पैशाच्या जोरावर काढला तो असा. वंजाऱ्यांचा तांडा टिपूच्या व मराठ्यांच्या सैन्यास धान्याचा पुरवठा करतो हें त्यानें ऐकलेंच होतें. तेव्हां असा एखादा मोठा तांडा गांठण्याचें काम त्यानें कॅपटन अलेक्झांडर रीड यांजकडे सोपविलें, व त्यानें तें चांगल्या रीतीनें पार पाडलें. त्यानें हजारो बैल बाळगणाऱ्या वंजाऱ्यांचे तांडे गाठून व त्यांजकडून महागाईनें धान्य विकत घेण्याचा परिपाठ ठेऊन वेंकटगिरीजवळ त्यांचा एवढा मोठा बाजार जमविला कीं, दोस्तांचीं सैन्यें बेंगरूळाशेजारीं पोचलीं तेव्हां त्यांना तो देखावा पाहूनच मोठें समाधान वाटलें. व पुढें पुढें या वंजाऱ्यांनीं इंग्रजी सैन्याची ही विवंचना अजीबात दूर केली. आणि सरकारी कामिसराइट्च्या व्यवस्थेपेक्षां ही तोड युद्धाच्या वेळीं जास्त सोइस्कर पडते असे अनुभवास आलें. *

मेलकोट्याहून दोस्तांचीं सैन्यें नागमंगळ किल्ल्याजवळ पोंहोचलीं; व तो किल्ला मदूर

*या युद्धात चार लाख वंजारी धान्याची नेआण करण्यांत गुंतल असावे असां विल्क्सचा अभिप्राय आहे.

नदीच्या पश्चिमेस असल्यामुळें, शत्रूच्या आटोक्यांत सांपडण्याची भीति होती. याकरितां तेथील मराठ्यांचें ठाणें उठवून सर्व सैन्य पूर्वेस वळलें व त्यानें मद्दूर नदी ओलांडली. मेलकोट्यापासून नागमंगळपर्यंतचा प्रदेश खडकाळ व रुक्ष होता. पण या नदीच्या दोही बाजूस अत्यंत सुपीक प्रदेश व दाट झाडी असल्यामुळें, सैन्यांतील लोकांना यानंतरचा प्रवास आनंददायक झाला. मद्दूर नदी ओलांडून तेथून सहा मैलांवर असलेल्या हुलिदुर्ग किल्ल्यावर मुक्काम करण्याचें ठरलें. तेव्हां जून १९ तारखे कर्नल रीड व कॅप्टन ओरॅम यांना हुलिदुर्ग किल्ल्याची टेहेळणी करण्यासाठीं पाठविण्यांत आलें; आणि दुसऱ्या दिवशीं आणखीं थोडें सैन्य पाठवून त्यास वेढा घालण्याची हूल उठविली. हा किल्ला उंचावर, मजबूत रीतीनें बांधलेला असून किल्लेदाराजवळ अन्नसामुग्रीहि भरपूर होती. यामुळें किल्ला लढविण्याचें त्यानें मनांत आणलें असतें तर तो सर करण्यास बराच त्रास ‍ असता. पण तो किल्लेदार दोस्तांचें अफाट सैन्य पाहून घाबरला व आपणास सुरक्षितपणें बाहेर जाऊं देण्याचें अभिवचन मिळेल तर किल्ला ताब्यांत देण्यास मी तयार आहे असा त्यानें निरोप पाठविला. याप्रमाणें किल्ला हस्तगत झाला तेव्हां इंग्रजी सैन्यास या ठिकाणीं सहा हजार जनावरें, दोन हजार मेंढ्या आणि कांहीं अन्नसामुग्री मिळाली; यामुळें हा शुभशकुन झाला असें वाटून सैन्यास हळुहळूं उमेद चढूं लागली.

हा किल्ला मराठ्यांनीं आपल्या ताब्यांत घ्यावा असें कार्नवालिसचें म्हणणें होतें. परंतु तें परशुरामभाऊस पसंत पडलें नाहीं. यामुळें शत्रूस तरी तो उपयोगी पडूं नये म्हणून त्याचा शक्य तितका विध्वंस करून हीं सैन्यें पुढें निघालीं. मद्दूर व कावेरी यांच्या डाव्या तीराकडील शिवगंगा आणि बेंगरूळपर्यंतचा टापू अतिशय दाट जंगलानें भरलेला होता. व श्रीरंगपट्टणाकडे जाणाऱ्या सैन्यास अडविण्याच्या कामीं या प्रदेशाचा चांगला उपयोग व्हावा या दृष्टीनेंच टिपूनें हें जंगल कायम ठेवलें होतें. या जंगली प्रदेशांतून जाण्यायेण्यास फक्त तीन वाटा होत्या. अगदीं दक्षिणेकडची कंकणहळीवरून, दुसरी सेनापट्टणावरून आणि तिसरी सुवर्णदुर्ग, उत्तरदुर्ग व हुलिदुर्ग या किल्ल्यावरून होती. या तीनहि रस्त्यावरील प्रत्येक टेकडीवर किल्ला बांधलेला असून तेथें लहान लहान राजे व नाईक स्वतंत्रपणें नांदत असत. पण हैदर व टिपू यांच्या कारकीर्दीत त्यांचें स्वातंत्र्य नष्ट होऊन ते त्यांचे अंकित बनले होते. या तीन रस्त्यापैकी कार्नवालिस तीन महिन्यापूर्वीं अगदीं दक्षिणेकडील वाटेनें श्रीरंगपट्टणाकडे गेला होता; पण आतां तेथून परत बेंगरूळकडे येतांना तो अगदीं उत्तरेकडच्या वाटेनें गेला. याचें कारण

दक्षिणेकडील वाटेवरचा मुलूख नुक्ताच सैन्याच्या तुडवणीमुळें बेचिराख झाला होता; व मधली वाट टिपूनें उध्वस्त केली होती. यामुळें थोडीबहुत सामुग्री मिळाली तर उत्तरेकडील वाटेवरच मिळण्याचा संभव होता. यामुळें तो रस्ता पसंत करण्यांत आला.

हुलिदुर्गाहून दोस्तांचें सैन्य २२ जून रोजीं निघालें आणि जंगली प्रदेशांतून जाणें अप्रशस्त वाटल्यामुळें, तें उत्तरेकडे वळून २५ तारखेस उत्तरदुर्गास पोंहोचलें.

इतक्यांत वेंकटगिरीच्या बाजूस कॅपटन रीडनें जे वंजाऱ्यांचे तांडे जमविले होते त्यांच्यावर टिपूच्या घोडेस्वारांनीं छापा घातल्याची बातमी आली. तेव्हां कार्नवालिसनें ब्राउनच्या हाताखालीं तीन पलटणें देऊन त्यास वेंकटागिरीकडे जाऊन वंजाऱ्यांनीं आणलेला धान्याचा साठा बेंगरूळास घेऊन येण्यासाठीं रवाना केलें.

इकडे उत्तरदुर्गच्या किल्लेदाराकडे इंग्रजी सेनापतीनें निरोप पाठविला कीं " व्यर्थ प्राणहानि करण्याची आमची इच्छा नाहीं. तुम्ही किल्ला आमच्या हवालीं कराल तुमच्या जिवास अपाय होणार नाहीं. " पण हा किल्लेदार बाणेदार पुरुष होता. त्या उलट असें उत्तर पाठविलें कीं, " मी आज वीस वर्षें टिपूचें अन्न खाल्लें आहे; व निमकहरामी करण्याची माझी इच्छा नाहीं. तुम्हांस हा किल्ला पाहिजे असेल तर आधीं श्रीरंगपट्टण हस्तगत करावें. " या उत्तरामुळें नुसत्या दबकावणीनें किल्ला हस्तगत होण्याची आशा राहिली नाहीं. म्हणून त्याची चोहोकडून टेहेळणी करण्यांत आली. तेव्हां ' डोंगराच्या माथ्यावरचा किल्ला फारच बळकट ठिकाणीं आहे. तो लढून ताब्यांत घेण्यास बरेच दिवस लागतील आणि डोंगराच्या पायथ्याजवळचा किल्ल्याचा भाग घेतां येण्याजोगा असला तरी त्यांत फारशी सामुग्री आपल्या हातीं लागणार नाहीं ' असा अंदाज दिसला. याकरतां तो उत्तरदुर्गचा किल्ला घेण्याचा विचार सोडून दोस्तांचें सैन्य पुढें निघालें.

नंतर पूर्वेकडे सावनदुर्गच्या रोखानें हें सैन्य चालूं लागलें; तेव्हां २८ तारखेस मागडी नांवाच्या शहराजवळ त्याचा तळ पडला. या गांवांत हिंदू लोकांचीं सुप्रसिद्ध देवालयें व स्वामीचा मठ होता; व नेहेमीं यात्रेकरूंची गर्दी असे. पण यावेळीं त्या गांवांतील सर्व लोक तेथून सहा मैलांवर असलेल्या सावनदुर्गच्या आश्रयास गेले होते.

मागडीहून सावनदुर्गची टेहेळणी करण्यासाठीं एंजिनियर व कांहीं पलटणें पाठविलीं. त्यांनीं चोहोकडून पाहणी केल्यावर त्यांना असें दिसून आलें कीं तो किल्ला तर मजबूत आहेच. पण सभोंवार इतकी दाट झाडी आहे कीं, आंतील लोकांची उपासमार कराव-

टिपू यांच्याशीं बोलाचाली व करारमदार वगैरे करण्याचें मुत्सद्देगिरीचें काम हरीपंतानें संभाळावें अशी कामाची वाटणी ... *

या मुलाखतीसाठीं आलेल्या इतर मराठे लाकांचें मूरनें असें वर्णन दिलें आहे. " मराठ्यांचे सरदार व इतर सर्वच लोक फार साधे, पण नीटनेटके दिसतात. त्यांची मुद्रा सौम्य, स्वभाव मायाळू आणि वागणूक सभ्यपणाची व सरळ आहे. त्यांची आपल्या देशावर व पुढाऱ्यांवर अढळ निष्ठा आहे. मोगली सैन्यांत पोषाखाचे अवडंबर माजवून व नुसता दिमाख दाखवून ऐन युद्धाच्या वेळीं शत्रूस पाठ दाखवून पळत सुटणारे लोक होते, तसे मराठ्यांच्या सैन्यांत नव्हते. १७७२ सालीं थोरल्या माधवरावांनीं ज्या ठिकाणीं हैदराचा पराभव केला त्या मेलकोटें नांवाच्या गांवाजवळच इंग्रजी व मराठी सैन्याची मुलाखत अकस्मिकपणें झाली हा शुभ शकुन आहे असें समजून ते आनंदांत आहेत. मे च्या १५ तारखेस इंग्रजी सैन्यानें टिपूचा पराभव केला असून देखील आपल्याच तोफा फोडून परत फिरण्याचा प्रसंग इंग्रजी सैन्यावर आलेला पाहून त्यांना मनापासून वाईट वाटलें."

इंग्रजी व मराठी सेनाधिपतींचें खलबत तास दीडतास चालून सायंकाळीं साहा वाजण्याच्या सुमारास दोनही बाजूचे लोक आनंदानें तंबूबाहेर आले. या भेटींत श्रीरंगपट्टणाकडे परत मोर्चा न वळवितां बेंगळूरकडे जाऊन विसावा घेण्याचाच ठराव कायम झाला; याचें कारण असें. श्रीरंगपट्टणाला वेढा द्यावयाचा म्हणजे तोफखाना जबरदस्त पाहिजे. पण तो आपल्याच हातानें फोडलेला असून मद्रासेहून नवा तोफखाना येण्यास बराच अवकाश लागण्याचा संभव होता. शिवाय लोक उपासमारीनें व दगदगीनें फार थकले नसल्यामुळें त्यांना विसावा मिळाल्यावांचून त्यांच्या हातून पुढें काम रेटणें शक्य नव्हतें. आणि लढाऊ लोकांना अन्न व युद्धसामुग्री पुरविण्यास त्या काळीं जीं वाहतुकीचीं जनावरें

* सांवशीच्या लढाईंत कोन्हेरराव मारले गेले, पांडुरंगरावास हैदरानें कैद करून पट्टणास नेलें ते कैदेंतच मेले; पटवर्धनांचे जिव्हाळ्याचे स्नेही मुरारराव व शिवराव घोरपडे हेही शत्रूच्या कैदेंत मरण पावले; अलीकडे टिपूनें विश्वास दाखवून पटवर्धनांचे आप्त नरगुंदकर यांस कैद केलें व त्यांचें संस्थान घेतलें इत्यादि गोष्टींमुळें परशुरामभाऊ व टिपू यांमध्यें भयंकर वैर पडलें होतें. शिवाय हैदर व टिपू यांनीं आपल्या जहागिरीपैकीं एक पैसासुद्धां गेलीं सोळा सतरा वर्षें आपल्या हातीं लागू दिला नाहीं व [...]रवाडच्या सुभ्यांत नानाप्रकारचे जुलूम करून हाहा:कार उडवून दिला. याही गोष्टींचें [...]नें परशुरामभाऊस आतां फेडावयाचें होतें. (ऐति. ले. सं. पृ. १७९२ पहा.)

लागत त्यांचा फारच तुटवडा होता. त्यांतलीं बहुतेक उपासमारीनें व रोगानें मृत्युमुखीं पडलीं होतीं व जीवंत होतीं तीं स्वतःचें शरीर वाहण्यास देखील समर्थ नव्हती; तेव्हां त्यांच्या हातून वाहतुकीचें काम होणें कसें शक्य? शिवाय मेलकोट्याचें युद्ध झाल्यापासून दहाबारा दिवस इंग्रजी सैन्याचा तळ ज्या भागांत पडला होता, तेथें चोहीकडे मेलेल्या जनावरांच्या हाडांचा व मांसाचा खच पडल्यामुळें अत्यंत दुर्गंधी सुटली होती; आणि सैन्यांतले लोक भुकेच्या यातना सहन न होऊन हें कुजकें मांस खाऊं लागले! यामुळें अनेकप्रकारच्या रोगांचा प्रसार सैन्यांत झाला. देवीच्या सांथीनें हजारों लोक खितपत पडले व पुष्कळांनीं यमसदनाची वाट धरली. सारांश, श्रीरंगपट्टणाच्या जवळून इंग्रजांना तळ हलविण्यावांचून त्या वेळीं गत्यंतरच नव्हतें.

इतक्या यातना भोगाव्या लागल्यामुळें जेरीस आलेल्या इंग्रजी सैन्यास हरएकप्रकारें मदत पोंचविण्यासाठीं मराठे तयार होते. पण त्यांच्या जवळचा तरि सांठा किती दिवस पुरणार? सर्वांनीं मिळून अन्न मिळविण्यासाठीं आधीं जोराची खटपट केली पाहिजे, हें तत्त्व हरीपंतानें कार्नवालिसकडून आधीं मान्य करून घेतलें; आणि त्याची अंमलबजावणी करण्याचे त्यानें दोन मार्ग सुचविले. शत्रूच्या मुलखांत गांवोगांव असणाऱ्या धान्य-संग्रहाचा शोध लाऊन तो हस्तगत करण्याचें काम मराठ्यांना साधण्याजोगें होतें व तें त्यांनीं आनंदानें पत्करलें. पण इंग्रजांना सध्यां लढण्याचें सामर्थ्य नसलें तरी त्याचें द्रव्य बळ मोठें; तेव्हां धान्य विकत घेण्याची सोय दिसेल तेथें इंग्रजांनीं हिंमत धरून पैशाचा पुरवठा करावा असें हरीपंताचें म्हणणें होतें व तेंही कार्नवालीसनें मान्य केलें.

गेल्या महायुद्धांत ज्याप्रमाणें तटस्थ राष्ट्रें युद्धमान राष्ट्रांस हरएक प्रकारचा माल विकत देण्यासाठीं धडपडत असत, त्याचप्रमाणें युद्धाच्या वेळीं दक्षिण हिंदुस्थानांत धान्याची नेआण करण्याचें काम लमाण लोक करीत असत. या लमाणांजवळ हजारों बैलांचे तांडे असून सामान्य चोर व दरवडेखोर यांपासून स्वसंरक्षण करून घेण्यासाठीं लागणारी शस्त्रसामुग्रीहि त्यांच्या जवळ असे. त्यांच्या बरोबर बायका, पोरें वगैरे लोकांचा मोठा घोळका असून हा फिरता व्यापारी संघ युद्धमान राष्ट्रांना धान्य विकून आपला चरितार्थ चालवीत असे. अमूक पक्षासच धान्य पुरवावयाचें आणि अमक्यास पुरवावयाचें नाहीं असा भेदभाव ते करीत नसत. आपणापुढें धान्य खरेदी करण्यासाठीं आलेला इसम न्यायी पक्षाचा आहे किंवा अन्यायी पक्षाचा आहे, याचा विचार करण्याच्या भानगडींत न पडतां आपण ठरविलेल्या भावानें धान्य घेऊन पैसे पदरांत टाकण्यास जो

तयार असेल त्यास आम्हीं धान्य पुरवूं असे ते म्हणत. यामुळें ते बंजारी व लमाण लोक दोनही पक्षांस हवेसे वाटत. ज्याच्याजवळ द्रव्यबळ जास्त असेल त्याला या बंजाऱ्यांच्या धान्याचा अधिक फायदा मिळे. तेव्हां हरीपंताचें कार्नवालिसला असें सांगणें होतें कीं " टिपूची पत सध्यां बाजारांत अगदीं कमी झाली आहे. त्याची हुंडी चालत नाहीं; व रोकडहि त्याच्याजवळ फारशी नाहीं. तेव्हां त्याला लमाणांकडून धान्य मिळणें कठीण पडेल. तुम्हांजवळ द्रव्यसंग्रह चांगला आहे व तुमची पतहि चांगली आहे. तेव्हां पैसा खर्च कराल तर तुमची धान्याची अडवण नाहींशीं होईल.'

हा उपदेश पटल्यामुळें कार्नवालिसनें पैशाचा पुरवठा करण्यासाठीं एक धाडसाचा उपाय योजला तो असा. चीनच्या बाजूस इंग्रजी कंपनीचा बराच मोठा व्यापार चालत असे. त्यासाठीं रोकड रक्कम (चांदी सोनें) घेऊन कांहीं इंग्रजीं जहाजें चीनकडे जाण्यास निघालीं असतां कलकत्त्याच्या बंदरांत मुक्कामासाठीं राहिलीं होतीं. तेव्हां कार्नवालीसनें या जहाजांवरची सर्व रक्कम पुढें चीनकडे न पाठवितां एकदम आपल्या सैन्यासाठीं ताब्यांत घेऊन खर्च करण्याचें ठरविलें ! दुसऱ्या कोणत्याही गव्हर्नरानें असें कृत्य करण्याचें मनांत देखील आणलें नसतें. पण इंग्लंडांतील कंपनीचे सूत्रचालक व मुत्सद्दी यांचा आपणावर पूर्ण विश्वास आहे अशी खात्री असल्यामुळें, कार्नवालिसनें हें धाडस केलें व तें पचलेंहि. असो. या वेळीं पैशाच्या जोरावर धान्यसंग्रह व इतर अनुकूलता मिळविण्याची संधी कार्नवालिसला सहजगत्या प्राप्त झाली व तिचा त्यानें पूर्ण फायदा घेतला.

दोस्तांच्या सैन्यानें या वेळीं तात्पुरती पिछेहाट करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें जूनच्या ६ तारखेस मेलकोट्याहून या सैन्यांनीं प्रथम उत्तरेकडे नागमंगळाकडे कूच केलें. कारण परशुरामभाऊंनीं त्या ठिकाणीं धारवाडाहून येतांना थोडेसें सैन्य व अन्नसामुग्री ठेवली होती. ती ताब्यांत घेऊन हीं सैन्यें पूर्वेकडे वळून मद्दूर नदी आलांडून बेंगरूळास गेलीं.

अशा रीतीनें थोडासा द्राविडी प्राणायाम करून व दिवसगत लाऊन बेंगरूळास हीं सैन्यें गेलीं. कारण उत्तरेकडून येतांना परशुरामभाऊंनीं चित्रदुर्गापासून दक्षिणेस ठिकठिकाणीं जीं ठाणीं बसविलीं होतीं त्यांच्यावर टिपूचा हल्ला होण्याचा संभव होता; तेव्हां त्यांना इशारा पाठवून बेंगरूळच्या बाजूस बोलावून घेणें जरूर होतें; शिवाय होईल तितके दिवस टिपूला किल्ल्यांतून बाहेर पडूं देऊं नये म्हणजे त्याची धान्यसामुग्री संपेल असाहि त्यांचा हेतु होता. आणि दोस्तांचीं सैन्यें मद्दूर नदीपलीकडे गेलीं म्हणजे ज्या मुलखांतून टिपूस चारा व अन्न मिळण्याचा संभव होता तो प्रदेश लुटून आपलीं सैन्यें त्या सामुग्रीनें ताजींतवानी करणें दोस्तांना इष्ट दिसलें.

बेंगरूळच्या दिशेनें ही पिछेहाट करीत असतांना इंग्रजी पलटणें पिछाडीस असून शत्रूचे घोडेस्वार समोरून येत आहेत किंवा काय, याचा तपास करण्याचें काम त्याजकडें दिलेलें होतें. यामुळें त्यांना पहाटे उठून आधीं मराठी घोडेस्वारांना जागें करावें लागे. नंतर हे घोडेस्वार व इंग्रजी सैन्यांतील बाडबिछाड निघून गेलें म्हणजे मागाहून इंग्रजी पलटणें शेवटीं निघत असत. यामुळें ही दोस्तांचीं सैन्यें चाललीं असतां एखाद्या टेंकडीवरून पाहणारास आघाडीस घोडेस्वार व हत्ती, उंट आणि बैल यांचा अव्यवस्थित घोळका दिसत असून पिछाडीस तेवढें व्यवस्थेनें पावलें टाकणारें पंधरा हजार इंग्रजी पायदळ दिसलें असतें.

आघाडीस चालणाऱ्या मराठे घोडेस्वारांनीं या वेळीं महत्त्वाची कामगिरी बजावली. ते आसपास दहा पंधरा मैलपर्यंत टेहळणी करून टिपूचे कहींचे बैल व उंट लुटींत. त्याच्या लहानसहान टोळ्या सभोंवार हिंडतांना आढळल्या तर त्यांवर छापा घालीत; दोन चार घोडेस्वार मुद्दाम शत्रूच्या छावणीच्या आसपास जाऊन त्याला आपल्या अंगावर ओढून घेत व ते पाठलाग करूं लागले म्हणजे त्यांना आयते मागें राहिलेल्या मोठ्या सैन्याच्या आटोक्यांत आणून सोडीत. सारांश मराठे घोडेस्वारांना ज्याप्रकारची युद्धपद्धति अंगवळणी पडलेली होती तीच स्वीकारण्याचा या वेळीं प्रसंग आल्यामुळें त्यांच्या हातून समाधानकारक रीतीची कामगिरी झाली. ती इंग्रजी सैन्यास या वेळीं फारच पसंत पडली: याचें कारण असें कीं, मराठ्यांनीं हें काम केलें नसतें तर इंग्रजी सैन्यास टिपूच्या बेंदानीं बेजार करून टाकलें असतें. या वेळीं इंग्रजी सैन्यांतील घोडे म्हणजे हाडांचे जिवंत सापळे बनलें होतें. त्यांना जलद चालण्याचें देखील सामर्थ्य नव्हतें; तेव्हां शत्रूचा छापा आला असतां त्यांचा कितपत उपयोग झाला असतां हें दिसतच होतें. शिवाय इंग्रजी सैन्यांत या वेळीं आजारी व जखमी लोकांची संख्या फार मोठी होती. यामुळें ज्या घोड्यांच्या आंगीं थोडेंबहुत सामर्थ्य राहिलें होतें त्यांच्यावर या आजारी लोकांना बसवीत व सर्व अधिकारी व स्वार घोड्याचा लगाम धरून सावकाश चालत. यामुळें मंदगतीनें पावलें टाकीत जाणाऱ्या या सैन्याचें संरक्षण करण्याची जबाबदारी या वेळीं मराठे घोडेस्वारांनीं केली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

या सैन्यांचे दोन चार कोसांवर मुक्काम होत. तेव्हां कार्नवालीस व मेडोज एक दोन दिवसाआड हरीपंत व परशुरामभाऊ यांची गांठ घेऊन अनेक प्रकरणांची चर्चा करीत. अशा दोन तीन प्रसंगांचीच माहिती उपलब्ध आहे, व ती आम्हीं योग्य ठिकाणीं

देणार आहों. पण या एकंदर भेटींसंबंधीं इंग्रजी लेखकांची सरसकट एक मोठी तक्रार असे ती ही कीं, ठरलेल्या वेळीं हे मराठे सेनापति कधींही भेटीस तयार नसत. कांहीं ना कांहीं उशीर प्रत्येक भेटीच्या वेळीं व्हावयाचाच. यामुळें इंग्रजांना चीड येत असे. पण सर्व राग गिळून हरीपंत आले म्हणजे त्याला आपल्या मनांतला राग दिसू न देण्यासाठीं इंग्रजांना उसनें हसें आणावें लागे. तथापि कार्नवालिस चाणाक्ष मनुष्य होता. कोणत्या वेळीं आत्मसंयमनाची आवश्यकता आहे हें तो चांगलें जाणत असे. यामुळें पुढें पुढें त्यानें मराठ्यांना दोष देण्याचें मनापासून सोडून दिलें.

बेंगरूळास विसावा घेतल्यानंतर पुढें श्रीरंगपट्टणाच्या वेढ्यास पुनः निघण्याच्या वेळीं काय काय अडचणी येतील व त्या कशा दूर कराव्या याची चर्चा देखील या वेळीं हे सेनापती करीत असत. तोफा दारू वगैरे लढाऊ सामान मद्रास व कलकत्त्याहून आणतां येण्याजोगें होतें. पैशाचीहि अडचण फारशी नव्हती. पण या पैशाच्या जोरावर जमविलेली धान्यसामुग्री, दारुगोळा व तोफा वाहून नेण्यास हजारों बैलांची आवश्यकता होती, ते कसे मिळवावे हें कोडें कांहीं केल्या लौकर सुटेना. इंग्रजांच्या सैन्यांतलि साठ हजार बैलांचा संहार टिपूच्या सैन्यांतलि लोकांनीं गेल्या पांच सहा महिन्यांत केला होता. तेव्हां ही उणीव पैशानें भरून निघणें मुष्किलीचें होतें. याकरतां कार्नवालिसनें मद्रास व पुणें या बाजूस बैल खेरदी करण्यासाठीं बरेच एजंट तर रवाना केलेच; पण दुसरी एक चमत्कारिक तोड त्यानें काढली. ती अशी कीं मोठमोठे लष्करी अधिकारी व पलटणिवरचे कप्तान यांना त्यानें नक्त नेमणूकच करून दिली. या नेमणुकींतून या अधिकाऱ्यांनीं आपल्या हाताखालच्या शिपायांना लागणारें धान्य, तंबूचें सामान व इतर ओझें वाहून नेण्याची व्यवस्था जमेल तशी करावी. या उपायानें खर्च थोडा वाढला. पण कार्नवालिसचा खजीना या वेळीं चांगला भरलेला होता. तेव्हां या नव्या उपायामुळें खर्च झाला तरी सामानाच्या वाहतुकीची व्यवस्था करण्याची त्याच्या मागची विवंचना नाहींशी होऊन ती काळजी सर्व अधिकाऱ्यांत वाटली गेली. त्याचा परिणाम असा झाला कीं, प्रत्येक अधिकारी व सैनिक डोकें खाजवून हा प्रश्न सोडवूं लागला. यामुळें कोणी बैल खेरदी केले, कोणी उंट मिळविले तर कोणी खांद्यावरूनच सामान नेऊं लागला. ज्यास जो उपाय सुचला तो त्यानें योजून प्रसंग निभवावा; जो तोड काढील तोच कर्ता व जो 'कसें करावें' म्हणून हात जोडून बसे तो अजागळ; असें ठरण्याची वेळ दिसल्यामुळें जो तो ईर्षेनें हें काम निभवूं लागला. लष्करी बाबतींत देखील

व्यवस्थेची जबाबदारी सरकारनें आपल्या शिरावर न घेतां व्यक्तीवर सोपविणें कधीं कधीं जास्त फायदेशीर असतें व याचाच अनुभव या वेळीं कार्नवालिसला आला.

बैलांच्या खालोखाल तांदूळ, (गोऱ्या शिपायांना लागणारें) मांस, मीठ व ताडीची दारू यांचा पुरवठा भरपूर करणें महत्त्वाचें होतें. पैकीं तांदूळ सर्वच लोकांना लागत असल्यामुळें त्याची खरेदी करण्यासाठीं चोहींकडे लोक रवाना करण्यांत आले. बेंगरूळचा किल्ला ताब्यांत आला तेव्हां बराच तांदूळ तेथें इंग्रजी सैन्याच्या ताब्यांत आला होता. पण गेल्या दोन तीन महिन्यांत त्याच तांदळावर सर्व इंग्रजी सैन्याचें पोट चाललें होतें यामुळें त्यापैकीं शिलकी सांठा फारसा राहिला नाहीं. मराठ्यांनीं आणलेली अन्नसामुग्री मोठी होती. पण लाखो सैन्यानें एका जागीं तळ देऊन तिचा फन्ना उडविण्याचें काम पत्करलें तर तो सांठा देखील पुरणें शक्य नव्हतें. याशिवाय मराठे घोडेस्वार टिपूच्या मुलखांतून लूट आणीत. पण त्या मुलखाची गेल्या पांच सात महिन्यांत सैन्याच्या वर्दळीनें इतकी पायमल्ली झाली होती कीं, तो अगदीं पिळून काढला तरी त्यापासून फारसा लभ्यांश मिळण्याची आशा नव्हती. फार तर या लुटीवर मराठ्यांना आपलें पोट चालावितां आलें असतें इतकेंच.

याही अडचणींतून पार पडण्याचा मार्ग कार्नवालिसनें पैशाच्या जोरावर काढला तो असा. वंजाऱ्यांचा तांडा टिपूच्या व मराठ्यांच्या सैन्यास धान्याचा पुरवठा करतो हें त्यानें ऐकलेंच होतें. तेव्हां असा एखादा मोठा तांडा गांठण्याचें काम त्यानें कॅपटन अलेक्झांडर रीड यांजकडे सोपविलें, व त्यानें तें चांगल्या रीतीनें पार पाडलें. त्यानें हजारो बैल वागविणाऱ्या वंजाऱ्यांचे तांडे गाठून व त्यांजकडून महागाईनें धान्य विकत घेण्याचा परिपाठ ठेऊन वेंकटगिरीजवळ त्यांचा एवढा मोठा बाजार जमविला कीं, दोस्तांचीं सैन्यें बेंगरूळाशेजारीं पोचलीं तेव्हां त्यांना तो देखावा पाहूनच मोठें समाधान वाटलें. व पुढें पुढें या वंजाऱ्यांनीं इंग्रजी सैन्याची ही विवंचना अजीबात दूर केली. आणि सरकारी कमिसराइट्च्या व्यवस्थेपेक्षां ही तोड युद्धाच्या वेळीं जास्त सोइस्कर पडते असें अनुभवास आलें. *

मेलकोट्याहून दोस्तांचीं सैन्यें नागमंगळ किल्ल्याजवळ पोंहोचलीं; व तो किल्ला मडूर

*या युद्धांत चार लाख वंजारी धान्याची नेआण करण्यांत गुंतल असावे असां विल्क्सचा अभिप्राय आहे.

नदीच्या पश्चिमेस असल्यामुळें, शत्रूच्या आटोक्यांत सांपडण्याची भीति होती. याकरितां तेथील मराठ्यांचें ठाणें उठवून सर्व सैन्य पूर्वेस वळलें व त्यानें मद्दूर नदी ओलांडली. मेलकोट्यापासून नागमंगळपर्यंतचा प्रदेश खडकाळ व रुक्ष होता. पण या नदीच्या दोही बाजूस अत्यंत सुपीक प्रदेश व दाट झाडी असल्यामुळें, सैन्यांतील लोकांना यानंतरचा प्रवास आनंददायक झाला. मद्दूर नदी ओलांडून तेथून सहा मैलांवर असलेल्या हुलिदुर्ग किल्ल्यावर मुक्काम करण्याचें ठरलें. तेव्हां जून १९ तारखे कर्नल रीड व कॅप्टन ओरॅम यांना हुलिदुर्ग किल्ल्याची टेहेळणी करण्यासाठीं पाठविण्यांत आलें; आणि दुसऱ्या दिवशीं आणखीं थोडें सैन्य पाठवून त्यास वेढा घालण्याची हूल उठविली. हा किल्ला ... वर, मजबूत रीतीनें बांधलेला असून किल्लेदाराजवळ अन्नसामुग्रीहि भरपूर होती. ... पुढें किल्ला लढविण्याचें त्यानें मनांत आणलें असतें तर तो सर करण्यास बराच त्रास पडला असता. पण तो किल्लेदार दोस्तांचें अफाट सैन्य पाहून घाबरला व आपणास सुरक्षितपणें बाहेर जाऊं देण्याचें अभिवचन मिळेल तर किल्ला ताब्यांत देण्यास मी तयार आहे असा त्यानें निरोप पाठविला. याप्रमाणें किल्ला हस्तगत झाला तेव्हां इंग्रजी सैन्यास या ठिकाणीं सहा हजार जनावरें, दोन हजार मेंढ्या आणि कांहीं अन्नसामुग्री मिळाली; यामुळें हा शुभशकुन झाला असें वाटून सैन्यास हलुहलू उमेद चढूं लागली.

हा किल्ला मराठ्यांनीं आपल्या ताब्यांत घ्यावा असें कार्नवालिसचें म्हणणें होतें. परंतु तें परशुरामभाऊस पसंत पडलें नाहीं. यामुळें शत्रूस तरी तो उपयोगी पडूं नये म्हणून त्याचा शक्य तितका विध्वंस करून हीं सैन्यें पुढें निघालीं. मद्दूर व कावेरी यांच्या डाव्या तीराकडील शिवगंगा आणि बेंगरूळपर्यंतचा टापू अतिशय दाट जंगलानें भरलेला होता. व श्रीरंगपट्टणाकडे जाणाऱ्या सैन्यास अडविण्याच्या कामीं या प्रदेशाचा चांगला उपयोग व्हावा या दृष्टीनेंच टिपूनें हें जंगल कायम ठेवलें होतें. या जंगली प्रदेशांतून जाण्यायेण्यास फक्त तीन वाटा होत्या. अगदीं दक्षिणेकडची कंकणल्लीवरून, दुसरी सेनापट्टणावरून आणि तिसरी सुवर्णदुर्ग, उत्तरदुर्ग व हुलिदुर्ग या किल्ल्यावरून होती. या तीनहि रस्त्यावरील प्रत्येक टेकडीवर किल्ला बांधलेला असून तेथें लहान लहान राजे व नाईक स्वतंत्रपणें नांदत असत. पण हैदर व टिपू यांच्या कारकीर्दीत त्यांचें स्वातंत्र्य नष्ट होऊन ते त्यांचे अंकित बनले होते. या तीन रस्त्यापैकीं कार्नवालिस तीन महिन्यापूर्वीं अगदीं दक्षिणेकडील वाटेनें श्रीरंगपट्टणाकडे गेला होता; पण आतां तेथून परत बेंगरूळकडे येतांना तो अगदीं उत्तरेकडच्या वाटेनें गेला. याचें कारण

दक्षिणेकडील वाटेवरचा मुलूख तुकाच सैन्याच्या तुडवणीमुळें बेचिराख झाला होता; व मधली वाट टिपूनें उध्वस्त केली होती. यामुळें थोडीबहुत सामुग्री मिळाली तर उत्तरेकडील वाटेवरच मिळण्याचा संभव होता. यामुळें तो रस्ता पसंत करण्यांत आला.

हुलिदुर्गाहून दोस्तांचें सैन्य २२ जून रोजीं निघालें आणि जंगली प्रदेशांतून जाणें अप्रशस्त वाटल्यामुळें, तें उत्तरेकडे वळून २५ तारखेस उत्तरदुर्गास पोंहोचलें.

इतक्यांत वेंकटगिरीच्या बाजूस कॅपटन रीडनें जे वंजाऱ्यांचे तांडे जमविले होते त्यांच्यावर टिपूच्या घोडेस्वारांनीं छापा घातल्याची बातमी आली. तेव्हां कार्नवालिसनें ब्राउनच्या हाताखालीं तीन पलटणें देऊन त्यास वेंकटगिरीकडे जाऊन वंजाऱ्यांनीं आणलेला धान्याचा साठा बेंगरूळास घेऊन येण्यासाठीं रवाना केलें.

इकडे उत्तरदुर्गच्या किल्लेदाराकडे इंग्रजी सेनापतींनें निरोप पाठविला कीं " व्यर्थ प्राणहानि करण्याची आमची इच्छा नाहीं. तुम्ही किल्ला आमच्या हवालीं कराल तर तुमच्या जिवास अपाय होणार नाहीं. " पण हा किल्लेदार बाणेदार पुरुष होता. त्यानें उलट असें उत्तर पाठविलें कीं, " मी आज वीस वर्षें टिपूचें अन्न खाल्लें आहे; व निमकहरामी करण्याची माझी इच्छा नाहीं. तुम्हांस हा किल्ला पाहिजे असेल तर आधीं श्रीरंगपट्टण हस्तगत करावें. " या उत्तरामुळें नुसत्या दबकावणीनें किल्ला हस्तगत होण्याची आशा राहिली नाहीं. म्हणून त्याची चोहोकडून टेहेळणी करण्यांत आली. तेव्हां ' डोंगराच्या माथ्यावरचा किल्ला फारच बळकट ठिकाणीं आहे. तो लढून ताब्यांत घेण्यास बरेच दिवस लागतील आणि डोंगराच्या पायथ्याजवळचा किल्ल्याचा भाग घेतां येण्याजोगा असला तरी त्यांत फारशी सामुग्री आपल्या हातीं लागणार नाहीं ' असा अंदाज दिसला. याकरतां तो उत्तरदुर्गचा किल्ला घेण्याचा विचार सोडून दोस्तांचें सैन्य पुढें निघालें.

नंतर पूर्वेकडे सावनदुर्गच्या रोखानें हें सैन्य चालूं लागलें; तेव्हां २८ तारखेस मागडी नांवाच्या शहराजवळ त्याचा तळ पडला. या गांवांत हिंदू लोकांचीं सुप्रसिद्ध देवालयें व स्वामीचा मठ होता; व नेहेमीं यात्रेकरूंची गर्दी असे. पण यावेळीं त्या गांवांतील सर्व लोक तेथून सहा मैलांवर असलेल्या सावनदुर्गच्या आश्रयास गेले होते.

मागडीहून सावनदुर्गची टेहेळणी करण्यासाठीं एंजिनियर व कांहीं पलटणें पाठविलीं. त्यांनीं चोहोकडून पाहणी केल्यावर त्यांना असें दिसून आलें कीं तो किल्ला तर मजबूत आहेच. पण सभोंवार इतकी दाट झाडी आहे कीं, आंतील लोकांची उपासमार करावं-

ळाची असेल तर वीस पंचवीस मैलांचा घेर धरून सैन्याचा वेढा दिला पाहिजे, आणि वेढा दिला तरी झाडीच्या गर्दीमुळें आंतल्या लोकांना बाहेरच्या प्रदेशांतून गुप्तपणें सामुग्री आणण्यास सहज सवड सांपडेल. पायथ्याचा भाग हस्तगत करतां आला असता. पण त्यास देखील बरीच दगदग पडून त्या मानानें प्राप्ती होण्याजोगी नव्हती. सारांश या किल्ल्याची त्या काळांत जी चोहीकडे ख्याति होती ती अगदीं यथार्थ असल्याचें या वेळीं इंग्रजी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आलें. तेव्हां तो किल्ला घेण्याच्या नादास न लागतां दोस्तांचें सैन्य प्रथम किंचित उत्तरेस वळून नंतर मोकळ्या रानांतून बेंगरूळच्या वाटेनें चालूं लागलें.

अशा रीतीनें शत्रूच्या मुलखाची पहाणी करीत आपल्या सैन्यास विशेष त्रास पोंचू देतां कार्नवालिस बेंगरुळास येऊन पोंचला, तेथें त्याला दोन तीन आनंदाच्या बातम्या कळल्या. "कॅपटन रीड दाहा बारा हजार बैलांचा तांडा घेऊन सुखरूपपणें धान्यासह बेंगरूळास आला निजामाच्या व मद्रासेकडील इंग्रजांच्या सैन्यानें गंजीकोट्यास वेढा दिला होता तो किल्ला ११ जुन रोजीं हस्तगत झाल्यामुळें तें सैन्य शत्रूचा बराच मुलूख ताब्यांत घेऊन गुरमकोंड्याच्या रोखानें पुढें आलें व इंग्लंडांत पार्लमेंटमध्यें निघालेल्या वादाचा निर्णय कार्नवालिसला अनुकूल झाला असून पांच लाख पौंड या युद्धाच्या खर्चासाठीं कंपनीनें मंजूर करून तोफखाना व नवें सैन्य विलायतेहून रवाना झालें" शिवाय बंगाल्यांतून शंभर हत्ती वेलोरपर्यंत पोंचले आणि कंत्राटदारांनीं कराराप्रमाणें अठ्ठावीस हजार बैल सैन्यास पुरविण्यासाठीं आणले, ही बातमी देखील याच सुमारास आली.

अशा रीतीनें इंग्रजी सैन्याच्या अडचणी दूर झाल्यामुळें तें निश्चितपणें विसावा घेण्याच्या हेतूनें बेंगरूळच्या आसपास तळ देऊन राहिलें. पण मराठ्यांजवळची अन्नसामुग्री संपुष्टांत येत चालली. तेव्हां स्वस्थ बसून त्यांचा निभाव लागणें कठिण होतें. इंग्रजाप्रमाणें मराठ्यांचा खजीना भरलेला नसल्यामुळें, त्यांना धान्य खरेदी करून निर्वाह करणेंहि शक्य नव्हतें. तेव्हां त्यांनीं दुसरीकडे पावसाळा घालविण्याचें ठरविलें.

याप्रमाणें मराठ्यांचें सैन्य निघण्याची तयारी होऊं लागली. तेव्हां इंग्रजी सैन्याची कवाईत एक वेळ हरिपंत व परशुरामभाऊ यांनीं पहावी अशी कार्नवालिसनें इच्छा प्रकट केली; आणि ७ जुलै रोजीं कवाइतीच्या तयारीनें राहण्याचा हुकूम इंग्रजी सैन्यास देण्यांत आला. पण कार्नवालिस व मेडोज यांच्याप्रमाणें मराठी सेनापतींनीं घोड्यावर

बसून कवाईत पाहण्यास आलें पाहिजे, हत्तीवरून येऊं नये, असा शास्त्रार्थ आयत्या वेळीं निघाला, यामुळें या प्रसंगाचा विरस झाला.

कार्नवालिसचें म्हणणें असें होतें कीं “ आम्हांस हत्तीवर बसण्याचा सराव नाहीं; तेव्हां घोड्यावर बसणें प्राप्त. आणि मी व निजामाचा सेनापति घोड्यावर असतां मराठे मात्र हत्तीवरून तेथें येतील तर तेंहि प्रशस्त दिसणार नाहीं. मराठी सेनापतींना आमच्या सैन्याची तयारी दाखवावी व त्यांना इंग्रजी सैन्यानें थाटाची सलामी द्यावी अशी माझी फार इच्छा आहे. तेव्हां मराठ्यांनीं क्षुल्लक सबबीवर ही संधी गमावू नये. ”

हरीपंताचें म्हणणें असें होतें कीं “ हा प्रसंग खासगी स्वरूपाचा नसून सरकारी आहे. तेव्हां अशा प्रसंगीं दरबारी पद्धत अवश्य पाळली पाहिजे. तुम्ही वाटल्यास हत्ती-वर बसा किंवा घोड्यावरून चाला. त्याबद्दल आम्ही कोणत्याही प्रकारचा आग्रह धरीत नाहीं. पण आम्ही घोड्यावरूनच आलें पाहिजे हा तुमचा आग्रह आम्ही ऐकणार नाहीं. तुमची कवाईत पाहण्याची आमची इच्छा आहे. पण दरबारी पद्धत न मोडणें हें आम्हांस यापेक्षां महत्त्वाचें वाटतें. ” असो. शेवटीं दोनही पक्ष आपला आग्रह सोडण्यास तयार नसल्यामुळें हा लष्करी समारंभ आयत्या वेळीं घडून आला नाहीं.

जुलै ८ तारखेस कार्नवालिस बेंगरूळास जाण्यासाठीं निघाला व परशुरामभाऊनें शिऱ्याचा रस्ता धरला. बेंगरूळपासून शिऱ्यापर्यंतच्या मुलखांत वस्ती बरीच दाट व टिपूचें सैन्य तेथें फारसें येऊं शकत नव्हतें. यामुळें तेथें मराठ्यांचें पोट भरणें शक्य होतें; आणि याच हेतूनें परशुरामभाऊ तिकडे वळला.

निजामाच्या सैन्याचा बराच भाग असद अलीखानाच्या हाताखालीं असून तो गंजीकोट्याकडे रवाना झाला होता; बाकीचें थोडें सैन्य होतें त्याचें आधिपत्य राजा तेजवंत बहादुर यांजकडे देण्यात आलें. पण हा तेजवंत अत्यंत नालायक व मिजास-खोर आहे इतकेंच नव्हे तर तो मुद्दाम हलगर्जीपणा करतो, अशी कार्नवालिसनें तक्रार केल्यामुळें निजामानें त्याच्या जागीं मीर अलम नांवाच्या हुशार मुत्सद्द्याची नेम-णूक केली होती. हा पूर्वीं बंगाल्यांत निजामातर्फें इंग्रजांकडे वकीली करण्यासाठीं राहिला होता, यामुळें त्याची माहिती कार्नवालिसला होती.

या सुमारास टिपूकडून तहाचें बोलणें सुरू झाल्यामुळें व या बोलण्यास तीनही दोस्तांनीं मिळून उत्तर देणें अवश्यक असल्यामुळें मराठ्यांच्या तर्फे हरीपंत या कामासाठीं बेंगरुळासच राहणें इष्ट होतें. पण एवढें सैन्य घेऊन स्वस्थ राहणें हरीपंतास कसें पुरवणार? परशुरामभाऊप्रमाणें टिपूच्या मुलखांतून खंडणी वसूल करून आपणास सैन्याचें पोट चालवितां येईल व तें तसेंच चालविलें पाहिजे असें त्यानें कार्नवालिसला सांगितलें. तेव्हां कार्नवालिसनें हरीपंतास सैन्याच्या खर्चासाठीं बारा लाख रुपये देऊं करून बेंगरुळास राहण्याचा आग्रह केला; व या आग्रहास हरीपंतानें मान दिला. या वेळीं पदरचे पैसे खर्च करून हरीपंतास ठेऊन घेण्याचें काय कारण असावें या प्रश्नाचा विचार करण्याजोगा आहे. रीसनें कार्नवालिसचा या वेळचा बराच पत्रव्यवहार प्रसिद्ध केला आहे. त्यावरून असें दिसतें कीं टिपूच्या वकीलाचीं हरीपंताशीं स्वतंत्रपणें गांठ पडूं नये ही कार्नवालिसची मनापासून इच्छा होती. कारण तसें झाल्यास मराठे व टिपू संगनमत करून आपणावर उलटतील अशी त्याला नेहेमीं शंका येई. शिवाय टिपूच्या मनांतून खरोखरच तहाचें बोलणें सुरु करण्याचें येईल तेव्हां मराठ्यांतर्फे हरीपंत, मोगलातर्फे मीरअल्लम व इंग्रजातर्फे कार्नवालिस असे तीघे एकत्र असल्यास नुसत्या बोलाचालींत वेळ घालविण्याऐवजीं दोस्तांचें उत्तर तावडतोब देतां आलें पाहिजे अशीहि त्याची इच्छा होती. या तहाच्या बोलाचालींची माहिती आम्हीं पुढच्या प्रकरणांत देणार आहों तेथें या सर्व गोष्टी स्पष्ट होतील. त्यांचा उल्लेख येथें करण्याचें कारण एवढेंच कीं, हरीपंतास या वेळीं कार्नवालिसनें आग्रह करून व त्यास खर्चास देऊन ठेऊन घेतलें याच कारण एक तर इंग्रजांना आयत्या वेळीं मराठ्यांनीं तातडीनें येऊन जी मदत पोचविली तिजबद्दल कोणत्या तरी स्वरूपानें उतराई होणें त्यांना भाग होतें; आणि पावसाळा संपेपर्यंत तहाची वाटाघाट करण्यास व बरसातीनंतर श्रीरंगपट्टणावर चाल करून जाण्यास कांहीं मुद्द्यांचा निर्णय करणें अवश्यक होतें आणि तो निर्णय हरीपंत व कार्नवालिस एकत्र राहिल्यावांचून साधण्याजोगा नव्हता. सारांश हरीपंतास केवळ सैन्याचें पोट भरण्यासाठीं या वेळीं बेंगरूळ सोडून जावें लागत होतें; आणि बेंगरुळास तो राहण्यांत दोस्तांची अधीक सोय होती व ती साधण्यास खर्च करण्याइतका इंग्रजाजवळ पैसा होता म्हणून तो त्यांनीं खर्च केला. या सरळ गोष्टी आहेत. पण मराठ्यांच्या प्रत्येक गोष्टीकडे भलत्या दृष्टीनें पाहून ती दूषणीयच ठरवावयाची व इंग्रजांच्या प्रत्येक कृतीचें समर्थन करावयाचें हा विडा इंग्रजी ग्रंथकारांनीं उचलला

असल्यामुळें या प्रकरणाची हकीकत देतांना देखील मराठ्यांच्या मागें 'लाचखाऊ' वगैरे विशेषणें देण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. आजपर्यंतच्या इंग्रजी इतिहासकारांना मराठ्यांची माहिती मिळविण्याची साधनें नव्हतीं असें म्हणतां आलें असतें. पण गेल्या वीस वर्षांत महाराष्ट्रांत प्रसिद्ध झालेल्या इतिहाससामुग्रीकडे मुद्दाम असो किंवा न कळत असो जेव्हां या ग्रंथकारांचें दुर्लक्ष झालेलें दिसतें तेव्हां हे ग्रंथकार इतिहासलेखनाच्या कामीं नालायक आहेत असें म्हणणें भाग पडतें. उदाहरणार्थ; श्रीरंगपट्टणाच्या या स्वारीची माहिती देतांना संशोधक म्हणून गाजलेल्या व्हिन्सेंट स्मिथनें नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या 'ऑक्सफर्ड हिस्टरि ऑफ इंडिया' नांवाच्या जाड्या ग्रंथांत मराठ्यांच्या संबंधीं दोनच वाक्यें घातलीं आहेत व मराठ्यांची निवळ नालस्ती होईल अशा अर्थाचे शब्द त्या दोनही वाक्यांत भरपूर योजले आहेत. 'मराठे लौकर इंग्रजांच्या मदतीस आले नाहींत; नाहीं तर त्याच वेळीं टिपूचा पराभव झाला असता' असें म्हणून एका वाक्यांत मराठ्यांच्या विषयीं व्यंग्यार्थानें निंदा सूचित केली आहे; पण ती ग्रंथकारास अपुरी वाटल्यामुळें 'कार्नवालिसनें चीनकडे जाणाऱ्या कंपनीच्या चांदीवर डल्ला मारून मिळविलेला ऐवज मराठ्यांना चारून त्यानें त्यांची मदत किंवा तटस्थपणा साधला' असें स्पष्ट विधान केलें आहे; अर्थात मराठ्यांना विश्वासघातकी व लाचखाऊ ठरविण्याची प्रवृत्ति वाचकांच्या मनांत सहजच उत्पन्न होते. पण त्याबरोबर कार्नवालिसवर थोडा शिंतोडा येतो. तो टाळण्यासाठीं 'त्या कालीं राष्ट्रीय कर्ज किंवा कागदी नाणें वापरण्याची सोय नसल्यामुळें पैशाची थैली तुडुंब भरूनच युद्ध चालविणें भाग पडत होतें,' वगैरे कार्नवालिसचे समर्थन करण्याच्या हेतूनें पांच सहा वाक्यें खर्चीं घातलीं आहेत. पण या अशा वेड्या वाकड्या शाब्दिक पेचानें दूषित होण्याइतका मराठ्यांचा इतिहास आतां लेचापेचा राहिला नसल्यामुळें अशा इतिहासकाराच्या विधानांची फारशी मातब्बरी राहिली नाहीं.*

* स्मिथच्या ग्रंथांत यासंबंधीं वाक्यें आहेत तीं अशीं—

If they (the maratha force) had come a few days earlier the war might have ended triumphantly. Lord Cornwallis bought the further *Aid or neutrality of the mercenary Marathas* with funds provided by seizing the company's silver on its way to

[पुढें चालू.

भाग १२ वा,

तहाची कोरडी बोलाचाली

लार्ड कार्नवालिसनें जनरल मेडोज यास बाजूस सारून स्वतः सैन्याचें आधिपत्य स्वीकारलें त्याच सुमारास टिपूनें तहाची वाटाघाट करून तडजोडीवर युद्धाचा शेवट लावण्यासाठीं पत्रें रवाना केलीं. तीं कार्नवालीसला मोगली घाटांत १८ फेब्रुवारी रोजीं मिळालीं. त्यांचें कार्नवालिसनें २३ तारखेस जें उत्तर पाठविलें त्यांत "मागल्या तहांतील अटी ज्या अर्थीं तुम्हीं मोडल्या त्या अर्थीं तहाची वाटाघाट सुरू करण्यापूर्वी नुकसान भरपाई करून देण्यास तुम्हीं तयार आहां किंवा नाहीं तें आधीं कळलें पाहिजे" असें म्हटलें होतें. हा आरोप निराधार असल्याबद्दल टिपूनें ताबडतोब कळविलें तें असें - "त्रावणकोरच्या राजाचें वर्तन इतक्या उद्दामपणाचें होतें कीं, त्याबद्दल त्यास शिक्षा करण्यावांचून मला गत्यंतरच नव्हतें. पण ही शिक्षा करण्यांत ब्रिटिशांचा अपमान करण्याचा माझा बिलकुल हेतु नव्हता. तेव्हां मजवर भलता आरोप न करतां तहाची वाटाघाट सुरु व्हावी अशी माझी इच्छा आहे." यावर कार्नवालीसनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. यानंतर २७ मार्च रोजीं "वाटाघाटीसाठीं वकील पाठविण्यास मी तयार आहें" असें टिपूनें पुनः एकवार कळविलें. कार्नवालीसनें या गोष्टीस मान्यता दिली नाहीं व ती न देण्याचीं कारणें लिहून कळविलीं तीं अशीं; "तहाचें बोलणें करावयाचें तर तें मी एकटा स्वतंत्रपणें करूं शकत नाहीं; त्रिवर्ग दोस्तांनीं मिळून या प्रश्नाचा विचार करावा लागेल. सध्यां निजाम व मराठे यांचे प्रतिनिधी येथें नाहींत, यामुळें तहाचें बोलणें करतां येत नाहीं. पण तुम्हीं आपलें म्हणणें वकिलामार्फत तोंडीं सांगण्या ऐवजीं

China. In those days modern financial facilities did not exist. There was no paper money, no funded debt and no machinery of extensive credit. Each campaign had to be financed by chests full of coin and the amazingly cumbrous arrangements for transport and supply were of a mediaeval character.

The Oxford History of India by V. A. Smith. (1919) P. 560.

मजकडे लेखी कळवाल तर मी तें मराठे व निजाम यांजकडे अभिप्रायार्थ पाठवीन; व त्यांजकडून उत्तर येईल तें तुम्हांकडे रवाना करीन ”

यावेळीं कार्नवालीसनें टिपूस पेचांत धरण्यासाठीं जी युक्ति योजली ती लक्षांत ठेवण्याजोगी आहे. “ उगाच प्राणहानि नको, समेट व्हावा यांत दोनही पक्षाचें हित आहे. तहाच्या अटी कोणत्या असाव्या याची वाटाघाट करण्यासाठीं आम्हीं आधीं वकील पाठविण्यास तयार आहों. याउपर लढाईचा तुम्हीं आग्रह धराल तर यापुढें जी मनुष्यहानि होईल त्याची जबाबदारी तुमच्या शिरावर आहे ” असा टिपूच्या म्हणण्याचा सारांश होता. हें बोलणें वरून मोठें साळसूदपणाचें दिसत होतें. पण या बोलण्यांत लबाडीचा भाग किती व खरोखर युद्ध संपवावें या सद्धेतूचा किती याचा निर्णय करणें कठीण होतें. तीघांचींही सैन्यें टिपूच्या राज्यांत पोचून त्यांचा रोख श्रीरंगपट्टणाकडे आहे हें उघड दिसत असल्यामुळें, टिपूनें पड घेऊन भावी अनर्थ टाळण्यासाठीं हें तहाचें बोलणें सुरू केलेलें असणें अशक्य नव्हतें. पण टिपूचा अद्याप म्हणण्यासारखा पराभव झाला नसल्यामुळें तहाच्या मिषानें वकील पाठवून दोस्तांची परिस्थिति पाहणें व प्रत्येकाशीं स्वतंत्रपणें बोलणें करून त्यांच्यांत फाटाफूट पाडणें हाही त्याचा हेतु असणें संभवनीय होतें. कार्नवालिसचा या वेळचा पत्रव्यवहार वाचला असतां दोस्तांत फाटाफूट करण्याचाच टिपूचा हेतु असावा असा कार्नवालिसचा अभिप्राय दिसतो. यामुळें टिपूच्या वकीलांना दोस्तांच्या सैन्यांत होतां होइतों वर येऊंच द्यावयाचें नाहीं व आले तरी त्यांनीं फक्त टिपूचें पत्र पोंचवावें व त्याचा जबाब घेऊन जावा असें कार्नवालीसचें म्हणणें होतें. पण अशा रीतीनें पडतें घेऊन आपल्या अटी आधींच दोस्तांच्या हातीं लेखी देऊन ठेवणें इष्ट नाहीं हें टिपू जाणत असल्यामुळें त्यानें लेखाची अट मान्य केली नाहीं.

यानंतर आरिकेऱ्याच्या लढाईत टिपूचा पराभव करून कार्नवालीसनें त्याचे कांहीं कैदी सोडून दिले. त्यांच्या सांगण्यावरून टिपूनें १७ मे रोजीं पुनः एक वेळ तहाच्या वाटाघाटींसाठीं वकील पाठवितों असा निरोप धाडला. तेव्हां कार्नवालीसनें असें कळविलें कीं, आतां आमच्या जवळपास मराठे व निजाम यांचे प्रतिनिधी येऊन पोचले आहेत; तेव्हां तुम्हीं आपल्या अटी लेखी कळवाल तर आम्हीं तिघे त्यांचा विचार करण्यासाठीं कमिशन नेमूं; आणि तुमची इच्छा असेल तर ही वाटाघाट सुरू आहे तोंवर युद्ध तात्पुरतें बंद ठेऊं. ” टिपूनें या पत्रास पाठविलेलें उत्तर २४ मे रोजीं कार्नवालिसला

मिळालें; त्या वेळीं तो कानियांबाडी येथें होता. या उत्तरांत युद्ध तहकुबीचा उल्लेख केलेला नसून आपलें म्हणणें लेखी कळविण्याऐवजीं दोनही पक्षांकडील विश्वासूक मंडळींची भेट होऊन बोलण्यास प्रारंभ व्हावा यांत सर्वांचें हित आहे असें टिपूनें सुचविलें होतें.

हें उत्तर हातीं आलें तेव्हां कार्नवालिसचें धैर्य बरेंच खचलें होतें. मागें सांगितल्याप्रमाणें या वेळीं इंग्रजी सैन्य उपासमारीनें व व्याधीनें जर्जर झालें असून तें श्रीरंगपट्टण काबीज करण्याची आशा सोडून बेंगरूळाकडे जाण्यास निघालें होतें. अशा वेळीं लेखी अटी कळविण्याचा आग्रह कार्नवालिसनें सोडला व दोस्तांच्या तर्फेचे लोक बेंगरूळास बोलणें करण्यासाठीं पाठविण्यात येतील असें त्यानें टिपूस कळविलें.

कार्नवालिसचें हें पत्र जाऊन टिपूकडून त्याचें उत्तर येण्यापूर्वीं मराठी सैन्याची व इंग्रजी सैन्याची गांठ पडल्यामुळें कार्नवालिसच्या मनांत पुनः उमेद भरली. श्रीरंगपट्टणवर चढाई करून जाण्याची त्याला आशा वाटूं लागली आणि टिपूशीं तहाची वाटाघाट करण्यास आपण कबूल नाहीं, जें करावयाचें तें तिघां दोस्तांनीं एकमेकांचा विचार घेऊन नंतरच करावें असें आग्रहपूर्वक लोकांत बोलून दाखविणें कार्नवालीसला इष्ट वाटूं लागलें. इतक्यांत टिपूकडून कांहीं लोक कार्नवालिसकडे फळांच्या टोपल्या घेऊन आले व त्यांच्याजवळ टिपूच्या खासगी कारभाऱ्यानें इंग्रजाजवळील फारशी दुभाष्याकडे पोंचविण्यासाठीं एक पत्र दिलें होतें.

पण या वेळीं कार्नवालीस जोरांत होता. त्यानें त्या फळांच्या टोपल्या व पत्र घेऊन येणारे सांडणीस्वार आपल्या तंबूंत येऊं न देतां त्यांना परत जाण्यास सांगितलें. सकाळच्या वेळीं फळफळावळींच्या टोपल्या वाहून नेणारे टिपूचे मजूर व सांडणीस्वार इंग्रजी लष्करांतून परत जातांना पाहून 'समेटाची आशा संपली व पुनः युद्ध सुरू होणार' अशी इंग्रजी सैन्याची खात्री झाली. तेव्हां खरें पाहतां या सैन्यास वाईट वाटावयास पाहिजे होतें; कारण हा फळांचा नजराणा म्हणजे दोघांत स्नेह घडवून आणण्याच्या प्रयत्नांचें व्यक्त स्वरूप होतें. व तो साधल्यास एकमेकांचा जीव घेण्याचा कंटाळवाणा प्रसंग टळला असता. अर्थात हा नजराणा परत जाणें म्हणजे पुनः युद्ध जुंपणें असाच अर्थ होता. पण याबद्दल वाईट वाटण्याऐवजीं इंग्रजी सैन्यास नजराणा परत गेलेला पाहून अत्यानंद झाला (Intense delight) असें कर्नल विल्क्स म्हणतो ! या चमत्कारीक मनोविकारांचें स्पष्टीकरण करतांना मिल म्हणतो " खरा

प्रकार असा होता कीं, त्या वेळीं टिपूविरुद्ध इंग्रजी सैनिकांच्या मनांत जो संताप व त्वेष चढला होता तो रानटी लोकांना आपल्या शत्रूविषयीं वाटणाऱ्या संतापासारखा होता; त्याचें साम्य सुधारलेल्या राष्ट्रांच्या मनांत आपल्या कट्टया शत्रूविषयीं जी द्वेष-भावना असते तिच्याशीं नसून ती टिपूच्या मनांत इंग्रजाविषयीं जी भावना वसत होती त्यासारखी होती. *" टिपू म्हणजे क्रौर्याचा, लबाडीचा व नीचपणाचा पुतळा आहे अशी भावना इंग्रजी सैनिकांची या वेळीं करून देण्यांत आली होती; यामुळें त्याच्याशीं समेट होण्याऐवजीं त्याचा नायनाट करण्यांत आपणांस पुण्य लागणार आहे असें त्या साध्या व सरळ स्वभावाच्या शिपायांना वाटणें साहजिक होतें. शिपायांच्या हातून कसून काम घेण्यास त्यांच्या मनांत शत्रूविषयीं पूर्णपणें द्वेषाची भावना मुरविणें अवश्यक आहे, असा तत्कालीन इंग्रजी सेनापतींचा अभिप्राय होता असें यावरून दिसतें.

मिल्लनें या ठिकाणीं सुधारलेल्या राष्ट्रांतील सैनिकांच्या अंतःकरणांत शत्रूविषयीं जी द्वेषभावना असते ती रानटी लोकांच्या अंतःकरणांतील द्वेष भावनेपेक्षां सौम्य व स्पृहणीय असते असें पर्यायानें गृहीत धरलें आहे; व त्याच आधारावर तत्कालीन इंग्रजी सैनिकांच्या मनोवृत्तींस नांवें ठेविलीं आहेत. पण सुधारलेल्या व गैरसुधारलेल्या लोकांच्या द्वेषबुद्धींत मिल्लनें गृहीत धरलेला हा भेदभाव अस्थानीं आहे असें आम्हांस वाटतें. 'शत्रु म्हटला कीं त्यास चीत करण्यासाठीं कोणत्याही बऱ्या वाईट उपायांची योजना करण्यांत बिलकुल पाप नाहीं,' हा सिद्धांत सुधारलेलीं व गैरसुधारलेलीं राष्ट्रें एकसारखाच उराशीं बाळगीत आलीं आहेत; यामुळें शत्रूविषयीं आपल्या शिपायांच्या मनांत जालिम तिरस्कारबुद्धि ठसविण्यासाठीं वाटेल त्या युक्त्या लढविण्याचा मोह त्यांना पडल्यास आश्चर्य नाही. या बाबतींत कार्नवालिस पुरा सुधारलेला होता; कारण शिपायांच्याच नव्हे तर आपल्या राज्यांतील सर्व लोकांच्या मनांत शत्रूविषयीं विशिष्ट भावना कायम ठेवण्यासाठीं त्यानें खबरदारी घेतली होती. व त्यानें कलकत्त्यास सेन्सारशिप ठेवली

* The fact is, that the English in India, at that time had been worked up into a mixture of fury and rage against Tippoo more resembling the passion of savages against their enemy; in fact more resembling his passion towards them than the feelings with which a civilized nation regards the worst of its foes.
Mill's History of British India Vol V. P. 278.

असून त्या पलीकडे बातमी फैलावणाऱ्यास त्यानें कडक दंड होईल असा जाहीरनामा लावला होता* !

टिपूनें पाठविलेलीं फळाचीं टोपलीं परत करतांना कार्नवालिसनें असें बोलून दाखविलें कीं, हा नजराणा स्नेह जोडण्याच्या हेतूनें पाठविण्यांत आलेला नसून दोस्तांत फूट पाडण्यासाठीं पाठविलेला असावा, म्हणून मला तो स्वीकारतां येत नाहीं. यानंतर बरेच वेळा उत्तरें प्रत्युत्तरें होऊन " लार्ड कॉर्नवालीनें माझ्या राज्यामधून निघून सरहद्दीवर सैन्यासुद्धां जावें व नंतर तहाची कलमें ठरवावीं " असें टिपूनें २९ मे रोजीं कळविलें. यामुळें हें बोलणें त्या वेळीं बंद पडलें.

मराठ्यांच्या विषयीं देखील कार्नवालिसचें मन असेंच संशयग्रस्त होतें, हें त्याचा यावेळचा पत्रव्यवहार वाचणारास सहज कळण्याजोगें आहे. पुणेंदरबारांतील वकील मॅलेट व निजामाकडील केनावे यांना त्यानें पाठविलेलीं पत्रें या बाबतींत विशेषच वाचनीय आहेत. त्यावरून मराठ्यांच्या प्रत्येक हालचालीकडे तो किती संशयपूर्ण दृष्टीनें पहात असे याची साक्ष पटते.

या मोहिमेवर हरीपंत फडके निघण्याचें ठरलें तेव्हां कार्नवालिस मॅलेटला लिहितो. (जानेवारी ३, १७९१).

" नानांची खरोखरच इच्छा असेल तर हरीपंत प्रामाणिकपणें वागेल हें मला मान्य आहे. पण रास्त्यांचा टिपूशीं स्नेह आहे ही गोष्ट हिंदुस्थानांत सर्वत्र महशूर असल्यामुळें त्यांच्या आप्तांपैकीं एखाद्याच्या हाताखालीं फौज देऊन या स्वारीवर पाठविल्यास लोकांचा निरुत्साह होणार असल्यामुळें त्यास आक्षेप घेणें मला भाग पडेल असें तुम्ही माझ्यातर्फें नानांच्याजवळ बोलून ठेवावें. ". यानंतर पंधरा दिवसांनीं केनावेस लिहिलेल्या पत्रांत कार्नवालीसनें ' मराठे व निजाम आपलीं सैन्यें टिपूविरुद्ध एकवटण्यास तयार होण्याचा मुळींच संभव नसल्यामुळें ती गोष्ट त्यांना सुचविण्यांत अर्थ नाहीं ' असें म्हटलें आहे. पण पुढें तीन महिन्यांनीं मॅलेट व कार्नवालिस यांनी कांहीं तरी

---

* बडे साहेबानें (कार्नवालीसनें) सारे शहरांत दवंडी फिरवायचे हुकूम केले ' जो कोणी चिनापट्टणची (मद्रासचीं) वार्ता बोलेल, अगर मातबर असला तर पन्नास रुपये गुन्हेगारी घेणें, नाहीं तर पंचवीस वेत मारावे. ' चिनापट्टनची पक्की खबर बडे साहेबास येती; आणीक लोकास कळत नाहीं. ' इति. सं. परराष्ट्रांच्या दरबारांतील मराठ्यांचे वकील. पृ. ४

आक्षेपार्ह उपायाचें अवलंबन केलें असावें असें दिसतें. हा उपाय कोणता याचा स्पष्ट खुलासा होण्यास आज मार्ग नाहीं; कारण त्याचा उल्लेख पत्रांतून अगदीं मोघम शब्दांनीं केलेला आहे. पण तो उपाय उजळ माथ्यानें बोलून दाखविण्याजोगा नव्हता यांत शंका नाहीं. १६ एप्रील १७९१ रोजीं मॅलेटच्या पत्रास उत्तर देतांना कार्नवालिस लिहितो ' आमच्या दोस्तांच्या हालचालींना जोराची गति देण्यासाठीं जी युक्ति तुम्हीं सुचविली ती तुमच्या व माझ्या मनास एकसारखी तिरस्करणीय वाटत असली तरी आमच्या विरुद्ध जी शक्कल लढवून लोकांनीं आपला हेतु साधला, तीच शक्कल मी लढविण्यांत अन्याय होईल असें मला तर कांहीं वाटत नाहीं. तेव्हां (दोस्तांच्या सैन्यांत) जोर भरण्याच्या हेतूनें तुम्हांस जें जें करणें इष्ट दिसेल तें तें तुम्हीं खुशाल करावें. त्यास मी दुजोरा देईन एवढें आश्वासन देऊन ठेवतों. '

यानंतर हरीपंतानें मे १४ तारखेस कार्नवालिसला पत्र पाठवून " माझा मुलगा गंजीकोट्याच्या आसपास आला आहे, तेव्हां तुमच्या सैन्याची व त्याची गांठ पडण्यासाठीं त्यानें कोणत्या वाटेनें यावें हें त्यास कळवावें. " असें लिहिलें होतें. त्यास कार्नवालिसनें सरळ उत्तर न देतां " मराठ्यांचें सैन्य आणखी थोडेंसें आमच्या जवळ आलें म्हणजे मग मी हरएक तऱ्हेची माहिती देईन " असें कळविलें.

ही हकीकत मॅलेटकडे लिहून पुढें कार्नवालिस म्हणतो " धारवाड ताब्यांत आल्यापासून परशुरामभाऊनें आपल्या हालचालींविषयीं मला कांहींच कळविलें नाहीं आणि हरीपंताच्या हालचालींत देखील बराच थंडपणा दिसतो. तेव्हां या सरदारांशीं सहकार्य करून किंवा त्यांची साक्षात मदत घेऊन या स्वारींत अमूक प्रकारें यश मिळवितां येईल वगैरे कल्पना करणें मला शहाणपणाचें दिसत नाहीं हें कबूल केलें पाहिजे. " (रॉसकृत कार्नवालिसचा पत्रव्यवहार खंड २ पृ. ९१)

हें वाक्य लिहिल्यानंतर आठ दहा दिवस लोटले नाहींत तोंच मराठी सैन्याची व इंग्रजी सैन्याची गांठ पडली; आणि मराठे सरदारांचें सहकार्य व साक्षात मदतच नव्हे तर सल्ला मसलत देखील घेणें आवश्यक आहे अशी कार्नवालिसची खात्री झाली. अशा मदतीची कल्पना करणें देखील त्याला पूर्वी मूर्खपणाचें वाटत होतें; पण तोच आतां टिपूशीं वाटाघाट करण्याच्या कामीं देखील हरीपंताच्या म्हणण्याप्रमाणें धोरण ठेवण्यास कबूल झाला.

टिपूनें आपल्या अटी लेखी आधीं दोस्तांकडे पाठविल्या पाहिजेत, त्यानें तीघांना

मिळून एकच पत्र लिहिलें पाहिजे व त्याच्या वकीलानें पत्र देण्यापलीकडे बोलाचाली करूं नये वगैरे आग्रहाचीं कलमें आतांपर्यंत कार्नवालिस घालीत होता हें मागें सांगितलेंच आहे. पण या अटी नेहमींच्या वहिवाटीस अनुसरून नाहींत असें हरीपंतानें दाखवून दिलें. "या वेळीं दोस्तांच्या पक्षाची सरशी झालेली आहे. तेव्हां तहाच्या अटी मांडण्याचा अधिकार आमचा आहे. आणि पराभूत पक्षानें तहाची इच्छा व्यक्त करावयाची व विजयी पक्षानें तहाचीं कलमें सांगावयाचीं अशी सर्वत्र पद्धत आहे, ती आपणास पत्करली पाहिजे. त्याचप्रमाणें आम्हां तीघांकडे स्वतंत्रपणें पत्रें पाठविण्याची टिपूची इच्छा असल्यास त्यास तसें करूं देण्यास हरकत नाहीं; कारण आमच्यांत जर फूट नसेल तर त्यानें स्वतंत्ररीतीनें प्रत्येकास पाठविलेल्या सर्व पत्रांचा ऊहापोह आम्हांस एकत्र बसून करण्यास कांहीं प्रत्यवाय येण्याजोगा नाहीं; तेव्हां किरकोळ मुद्यावर अडून बसण्यांत अर्थ नाहीं. वगैरे गोष्टी हरीपंतानें सांगितल्या व त्या आपणास पटल्यामुळें आपण मान्य केल्या असें कार्नवालिसनें केनावे यास जुलै १६ रोजीं पाठविलेल्या पत्रांत म्हटलें आहे. याप्रमाणें टिपूकडून आपाजीराम नांवाचा वकील आला. त्याजकडून ' तीन थैल्या कराराप्रमाणें आल्या. इंग्रजांनीं पाहिल्या. आपाजीरामास लष्करांत बोलावावें म्हणून सांगितलें. ' (ऐ. ले. सं. पृ. ४५२२)

अशा रीतीनें तहाच्या वाटाघाटीस सुरुवात होणार असें लक्षण दिसूं लागलें, पण याच वेळीं मॅलेट कडून मराठ्यांच्या दुटप्पी धोरणाबद्दल इषारा देणारें एक पत्र कार्नवालिसकडे आलें; यामुळें त्याचें संशयग्रस्त मन पुन: घोटाळलें. इतक्यांत ' आपाजीराम पूर्व परिचयाचा असल्यामुळें माझ्याशीं मोकळ्या मनानें बोलेल; तेव्हां टिपूचा खरा हेतु समजाऊन घेण्यास ही संधी बरी आहे; याकरितां मी त्याला भेटणार आहें ' असें हरीपंत कार्नवालिसजवळ बोलला. त्याबरोबर त्याचें मन पुनः फिरलें व टिपूच्या वकीलाची हरीपंताशीं गांठ पडूं द्यावयाची नाहीं असें त्यानें ठरविलें.

हा बेत सिद्धीस नेण्यासाठीं कार्नवालिसनें शक्कल काढली ती अशी. टिपूच्या तर्फे तहाची वाटाघाट करण्यासाठीं दिल दिलेलखान व आपाजीराम असे दोन इसम आले होते; "पण ते टिपूचे प्रतिनिधि नव्हेत, त्याचे हस्तक आहेत; तेव्हां अशा दुय्यम दर्जाच्या इसमाशीं मी, हरीपंत अगर मीर अलम यांसारख्या अव्वलदर्जाच्या प्रतिनिधीनीं प्रत्यक्ष बोलणें करणें दोस्तांच्या इभ्रतीस शोभणार नाहीं. याकरितां आम्हीं तीन चिटणीसांची नेमणूक करून, त्यांनीं टिपूच्या वकीलांचें म्हणणें ऐकून घ्यावें; व आम्हांस कळ-

जावें. म्हणजे त्यावरून टिपूच्या मनांत खरोखर तह करावयाचा आहे किंवा नुसते दिवस घालवावयाचे आहेत तें आम्हांस कळेल. हें होईपर्यंत टिपूच्या वकीलांनीं आम्हांकडे न येतां उसूर येथें राहावें. त्यांचें दोस्तांनीं सध्यां स्वागत करूं नये. तह होणार असें दिसल्यास त्यांना आमच्या भेटीस बोलावूं." असा कार्नवालीसनें आग्रह धरला.

ही अडवणुकीची भाषा कार्नवालिसचें मन संशयांनीं व्यापल्यामुळें सुरू झाली आहे व या वेळीं तहाविषयीं आग्रह धरण्यानें आपसांत गैरसमज उत्पन्न होण्याचा संभव आहे हें हरीपंताच्या लक्षांत आलें; व त्यानें मोठें कष्टानें टिपूच्या वकीलांना नें भेटतां दुय्यम माणसामार्फत त्यांच्याशीं बोलणें करण्याच्या कल्पनेस मान्यता दिली.

पण ही कल्पना आपाजीरामास मान्य होणें शक्य नव्हतें. 'किरकोळ लोकांजवळ आम्हीं आमच्या अटी सांगून मानहानि करून घेण्यास कबूल नाहीं; त्याकरितां टिपूनें आम्हांस पाठविलें नाहीं. कार्नवालीस व हरीपंत यांच्या जवळच काय बोलावयाचें बोलावें असा आमच्या मालकाचा हुकूम आहे' या अर्थाचें उत्तर टिपूच्या वकिलांनीं दिलें.

कार्नवालीसला कसेंही करून या वेळीं आपाजीराम व हरीपंत यांची गांठ पडूं द्यावयाची नव्हती. तेव्हां टिपूच्या वकीलांकडून आलेल्या उत्तराची सबब पुढें करून त्यानें या वकीलांनीं एकदम निघून परत आपल्या मालकाकडे जावें असा निरोप पाठविला. त्यांनीं 'आठ दिवसांत आमच्या मालकास विचारून तुमच्या हस्तकाशीं आम्हीं तहाची वाटाघाट करावी किंवा नाहीं याबद्दलचें उत्तर आणवितों' असें कळविलें. परंतु हें सर्व ढोंग असून दोस्तांच्या सैन्यांत बसून त्यांची फाटाफूट करण्याचाच या वकीलांचा हेतु असावा असें कार्नवालिसच्या मनानें घेतलें असल्यामुळें त्यानें 'सध्यां तुम्हीं आहां तेथें म्हणजे सुर्जापुरास राहूं नये, एकदम चालते व्हावें' असा सक्त हुकूम पाठविल्यामुळें त्यांना परत जाणें भाग पडलें.

इ. स. १७९१ च्या मे महिन्यापासून सप्टेंबरपर्यंत कार्नवालिसच्या मतांत जी चलबिचल व धांदल उडाली होती, ती पाहणें गमतीचें आहे. कार्नवालिस स्वभावतः धाडसी, पण संशयखोर होता. "जें करावयाचें तें केवळ स्वतःच्या हिंमतीवर करावें, दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा धरून केलेला बेत सिद्धीस जात नाहीं;" या मताचा तो पुरस्कर्ता होता. पण स्वावलंबनाला देखील कांहीं सीमा आहेच. सर्वच गोष्टी केवळ स्वतःच्या जोरावर पार पाडणें पुष्कळ वेळां अशक्य असतें. निदान सवाशें वर्षांपूर्वी

हिंदुस्थानांतील इंग्रजी सत्तेस तरी शत्रूशीं झगडतांना मराठे व निजाम यांना आपल्या बाजूस सामील करून घेण्यावांचून गत्यंतर नव्हतें. पण ही मैत्री वरपांगी असून, मराठे व निजाम यांनीं टिपूच्या पक्षास मिळूं नये एवढाच त्याचा अर्थ आहे व युद्धाची सर्व जबाबदारी अथपासून इतीपर्यंत इंग्रजानांच पार पाडावी लागेल असें कार्नवालिसला वाटत होतें. पण असें घडून येणें वस्तुगत्याच अशक्य होतें. टिपूस चीत करण्याचें श्रेय इंग्रजांनीं घ्यावें आणि प्राप्तीचा वांटा मात्र आम्हांस मिळावा असा मराठ्यांचा अगर निजामाच्या म्हणण्याचा केव्हांहि अर्थ नव्हता. प्राप्तीपेक्षां पराक्रमानें मिळविलेल्या यशाची महती अधीक आहे हें या दोघांना माहीत असल्यामुळें त्यानींहि इंग्रजाप्रमाणेंच युद्धाचें काम मनापासून चलविलें होतें. सारांश प्राप्तीचा वांटा मिळविण्यापूर्वी यशाचे वांटेकरी होण्यास जी दगदग सोसावी लागते ती सोसण्यास हे तयार होते. याकरितां कार्नवालिसनें बंगलोर घेतल्याची वार्ता येतांच परशुरामभाऊ व हरीपंत इतक्या तातडीनें निघाले. तेव्हां आपल्याच जोरावर टिपूला चीत करण्याचा कार्नवालिसचा विचार त्यांना पटणें शक्य नव्हतें.

शिवाय खुद्द कार्नवालिसला देखील 'स्वतःच्या जोरावर टिपूस जिंकणें अशक्य आहे' असें मे अखेरीस दिसून आलें. तेव्हां तो मराठ्यांचें सहाय घेण्यास व त्यांच्याशीं सहकार्य करण्यास कबूल झाला. अर्थात 'टिपूनें फोडाफोडीचा प्रयत्न केला तरी आपण एकजुटीनें वागून जास्तींत जास्त फायदा करून घेऊं' हें हरीपंताचें म्हणणें कार्नवालिसला पटलें. कारण या वेळीं मराठ्यांनीं पोंचविलेल्या मदतीचें महत्त्व एवढें मोठें होतें कीं, हरीपंताच्या पोटांत कांहीं दुष्ट हेतु असेल असें त्या वेळीं तरी कार्नवालिसला वाटणें शक्य नव्हतें. पण त्याचा स्वभाव संशयखोर असल्यामुळें हरीपंतासंबंधीचा हा अनुकूल अभिप्राय दोन महिन्यापलीकडे टिकला नाहीं. इंग्रजी सैन्यावर ओढवलेला उपासमारीचा प्रसंग टळून, भरपूर द्रव्यसामुग्री संग्रहीं पडतांच त्याला हरीपंताच्या सद्धेतूविषयीं संशय येऊं लागला. जुलै अखेरीस 'हरीपंताचें म्हणणें मला पोक्तपणाचें वाटलें' (The arguments stated by Hurrypunt had great weight) 'कोणत्याहि पक्षाच्या मनांत मत्सरबुद्धि असणें शक्य नाहीं' (There could be no room for jealousy in either of the parties) असें म्हणणारा कार्नवालिस आगष्टच्या २३ तारखेस मॅलेटला लिहितों कीं 'हरीपंतानें टिपूच्या वकीलांना आपल्या छत्राखालीं घेतलें आहे असें दिसतें. पण मी या वकी-

लांच्या बाबतींत हरीपंताचे बेत हाणून पाडले आहेत* ! '

अशा रीतीनें आपसांत वैमनस्य येण्यास कारण तरी काय घडलें याचा खुलासा कार्नवालिसनें सपटंबर ८ तारखेस गुप्त मंडळाकडे (सीक्रेट कमिटी) पाठविलेल्या— एका खलित्यांत सहज येऊन गेला आहे. त्यांत तो म्हणतो, "सर चार्लस मॅलेटच्या पत्र-व्यवहारावरून साधारणपणें हें तुमच्या ध्यानांत आलेंच असेल कीं, तहाची वाटाघाट करण्याच्या कामीं सूत्रचालकत्व आपल्या हातीं घेण्यासाठीं व मराठी सत्तेचाच जास्त फायदा करून घेण्यासाठीं पुण्याचे मुत्सद्दी वाटेल तो उपाय योजण्यास मागें पुढें पहाणार नाहींत. हरीपंत धूर्त व हुषार आहे आणि पेशव्यांनीं नुकतेच त्याला या तह-प्रकर्णी बोलणें करण्यासाठीं सर्व अधिकार दिले आहेत. त्याचेंहि धोरण पुण्यांतील मुत्सद्द्यांप्रमाणेंच आहे असें दिसतें. पण या कामांत त्यास यश येऊं न देण्याची मी खबरदारी घेईन."

यावरून टिपूचे वकील परत पाठविण्याविषयीं कार्नवालिसचा एवढा आग्रह कां चालला होता हें कळण्याजोगें आहे. टिपूकडून आलेले लोक दुय्यम दर्जाचे होते, तेव्हां त्यांच्याशीं हरीपंतासारखा बडा गृहस्थ प्रत्यक्ष बोलण्यास तयार होईल, तर त्यानें दोस्तांची मानहानि होईल वगैरे अर्थाचें जें कारण सांगण्यांत आलें तें निबळ दर्शनी व मानभावीपणाचें होतें. खरें कारण असें होतें कीं, या वकीलांची व हरीपंताची गांठ पडल्यास त्यांचें संगनमत होईल व त्यांत मराठे आपला फायदा साधून इंग्रजांना तोंडघशीं पाडतील अशी कार्नवालीसला भीति पडली होती.

मराठ्यांच्या मनांत इंग्रजाविषयीं या वेळीं शत्रुत्वाची भावना नसतांहि कार्नवालिसच्या मनांत मात्र त्यांच्याविषयीं इतकी भीति कां उत्पन्न व्हावी हा प्रश्न विचार करण्या-सारखा आहे. या वेळचा मराठ्यांचा पत्रव्यवहार बारकाईनें वाचला असतां, पुणें दरबा-रांतील मुत्सद्दी इंग्रजाविरुद्ध कारस्थान उभारण्यांत गढलेले दिसत नाहींत. उलट पक्षीं मराठे, इंग्रज, निजाम व म्हैसूरकर अशीं चार संस्थानें हिंदुस्थानांत टिकणार; तेव्हां

* In the business of the Vakeels I have hitherto defeated the designs of Hurrypunt who appeared to have taken them under his protection and by an unguarded letter, which, Appaji Ram wrote, seems to have promised to introduce them to me.
Cornwallis correspondence by Rooss Vol. II. P. 106.

एकमेकांशीं न भांडतां ते आपापल्या हद्दींत राहतील तर हिंदुस्थानांत शांतता राहूं शकेल असा मराठ्यांचा अभिप्राय दिसतो. यामुळें हीं चारहि संस्थानें समबल म्हणून राहावीं आणि यांपैकीं कोणीहि विनाकारण कुरापत काढील तर इतर तिघांनीं एकवटून त्यास वठणीवर आणावें, ही त्या वेळच्या मराठी राजकारणांतील मुख्य कल्पना दिसते. हिंदुस्थानांतून इंग्रजी सत्तेचें उच्चाटण करावें अगर टिपूस राज्यभ्रष्ट करावा असा विचार त्यांच्या मनांत या सुमारास घोळत असल्याचें चिन्ह मुळींच दिसत नाहीं. पण हें सत्तेचें समतोलन करून शांतता राखण्याचें धोरण इतरांना पसंत नव्हतें. टिपू व निजाम यांना मराठ्यांकडे चौथाई द्यावी लागत असे; यामुळें ही खंडणी भरणें म्हणजे एकेप्रकारें आपण त्यांचे मांडलीक आहों अशी कबुली देण्यासारखें आहे असें वाटून हे दोघेही मराठ्यांविरुद्ध डावपेंच लढविण्यासाठीं नेहमीं प्रयत्न करीत असत. इंग्रजांकडे देखील चौथाई मागण्याचा आपला हक्क आहे असें महादजीनें एक दोन वेळां दिल्लीदरबांतून खलीते पाठवून कलकत्त्यास कळविलें होतें. पण कार्नवालिसनें तें मान्य केलें नाहीं. तथापि पुढें मागें त्यांनीं पुनः मागणी केली तर ती कायदेशीर रीतीनें कशी बाजूस सारावी हा एक बिकट प्रश्न होता. या अडचणीपेक्षां मुख्य भानगड म्हटली म्हणजे 'कंपनी' चें लक्ष यावेळीं गुजराथ कसा घ्यावा या विषयाकडे लागलें होतें. हा प्रांत मराठ्यांच्या ताब्यांत असून तो सुपीक होता. तेव्हां तो जर आपल्या ताब्यांत येईल तर बरें होईल तेव्हां टिपूशीं चाललेल्या युद्धाच्या अखेर जी बोलणी होतील त्यांत कार्नवालिसनें मराठ्यांकडून गुजराथ मिळवावी व त्याबद्दली दक्षिणेकडील कांहीं मुलूख त्यांना द्यावा अशी कल्पना कंपनीच्या चालकांनीं कार्नवालिसला सुचविली होती. तिचें ग्राह्याग्राह्यत्व ठरवितांना कार्नवालिस सप्टेंबर ३ (१७९१) रोजीं विलायतेस लिहिलेल्या पत्रांत म्हणतो " गुजराथ प्रांताची किंमत फार मोठी आहे याबद्दल तुमच्या आमच्यांत मतभेद नाहीं. पण पेशव्यांची सत्ता एखाद्या यादवीच्या प्रसंगानें अगदीं छिन्नविछिन्न झाल्यावांचून तो प्रांत आम्हांस मिळणार नाहीं अशी माझी बालंबाल खात्री आहे. त्यापूर्वी जर तो मिळवावयाचा तर मराठ्यांशीं आम्हांस युद्धच करावें लागेल; पण मला वाटतें, या प्रांताकरितां एवढी मोठी युद्धाची आपत्ति आम्हीं आपणावर ओढवून घ्यावी असें तुम्हांस किंवा मलाहि इष्ट वाटणार नाहीं. चालू युद्धाच्या शेवटीं तहाच्या वाटाघाटींत या गोष्टीचा नुसता उल्लेख करण्यानें देखील मोठी गडबड उडून जाईल; कारण आमच्या दोस्तांच्या मनांत संशय व मत्सरभाव जागृत होण्यास फारसें कारण लागत

नाहीं. तेव्हां आम्ही राज्यविस्तार करण्याच्या विचारांत आहों आणि तो विस्तार मराठी राज्याच्या काळजाशेजारीं करण्याची आमची इच्छा आहे असें यत्किंचित् लक्षण दिसेल तर त्याचा मराठ्यांच्या मनावर अत्यंत अनिष्ट परिणाम घडल्यावांचून राहणार नाहीं. ”

या पत्रावरून कंपनीच्या चालकांचा इंग्रजी राज्य वाढविण्याबद्दल कार्नवालिसच्या मागें लकडा लागला होता व त्याला तें धोरण सध्यां अनिष्ट वाटत होतें एवढें निःसंशय आहे. पण त्याबरोबरच कंपनीप्रमाणें मराठेदेखील आपलें राज्य वाढविण्यासाठीं असेंच गुप्त कारस्थान करण्याच्या विचारांत असतील या कल्पनेनें त्याच्या मनांत मात्र गोंधळ उडून गेला होता.

कार्नवालिसच्या या मनःस्थितीमुळें येऊं पाहणारें आपसांतलें वितुष्ट टाळण्यासाठीं हरीपंतानें चार दिवस दुसरीकडे सैन्य घेऊन जाण्याचा विचार केला. यावेळीं सैन्यांत महागाई बेसुमार झाल्यामुळें पोट भरण्यासाठीं कोठें तरी शत्रूच्या मुलुखांत जाणें भागच होतें व त्यानें याविषयीं कार्नवालिसजवळ गोष्ट काढली; परंतु त्याचें म्हणणें असें पडलें कीं, मराठ्यांनीं कर्नाटक प्रांतांतून वाटेल तितकें धान्य विकत घेण्यास हरकत नाहीं आणि तशी सवड नसेल तर बारा महाल व सालेम या शत्रूच्या प्रांतांत सैन्याच्या टोळ्या पाठवून धान्यसामुग्री लुटून आणणेंही मराठ्यांना कठीण नाहीं. हरीपंतास यापैकीं पहिली सूचना मान्य करणें शक्य नव्हतें; कारण एवढ्या सैन्यास धान्य विकत घेण्याइतका पैसा त्याच्याजवळ नव्हता. दुसरी तोड त्याला मान्य होती; पण ती अमलांत आणण्यास सेनापतीनें स्वतः त्या प्रांतांत गेलें पाहिजे असा त्याचा अभिप्राय होता.

पण हरीपंत दूर जाणें कार्नवालिसला अनिष्ट वाटल्यामुळें त्यानें मागें सांगितल्याप्रमाणें हरीपंतास बारा लाख रुपये पुरवून आपणाजवळ ठेवून घेतलें. कार्नवालिसनें अशी तडजोड करण्याचें आणखी एक कारण असें होतें कीं, टिपूशीं तहाची वाटाघाट करण्याचें काम स्वतः पेशवे व नाना आपणाकडे घेणार अशी बोलवा होती. तेव्हां कार्नवालिसनें मॅलेटमार्फत पुणें दरबारास कळविलें कीं, “ पेशवे स्वतः आणखी सैन्य घेऊन माझ्याप्रमाणें रणांगणावर युद्धाचा निकाल तातडीनें लावण्यासाठीं हजर होतील तर मला फारच आनंद होईल. पण शत्रूशीं तहाची वाटाघाट करतांना पेशव्यांना मध्यस्त बनतां येणार नाहीं. पेशव्यांनीं या युद्धांत एक बाजू स्वीकारली असल्यामुळें त्यांनीं स्वतंत्रपणें टिपूशीं मध्यस्ताप्रमाणें बोलूं नये. सर्व दोस्तांनीं शत्रूशीं एकच भाषा वाप-

रली पाहिजे. युद्धाच्या सुरवातीस दोस्तांनीं ज्या करारनाम्यावर सह्या केल्या आहेत त्याअन्वयें (कांहीं प्रांत केवळ मराठ्यांना देण्याचें ठरलें आहे तो भाग सोडून बाकी) टिपूकडून मिळालेल्या मुलखाचे तीन बरोबर वांटे करून दोस्तसंघांतील प्रत्येक सत्तेनें



लॉर्ड कॉर्नवालीस.

एकेक वांटा घ्यावयाचा आहे. तेव्हां या बाबतींत टिपूशीं बोलाचाली करण्याचें कारण नाहीं. "

एकंदरींत या तहाच्या बोलाचालीमुळें विलायतेंतील कंपनीचे चालक, मराठे मुत्सद्दी, निजाम व टिपू या चार निरनिराळ्या हेतूनें वागणाऱ्या लोकांशीं एकाच वेळीं अनुसंधान राखण्याचा प्रसंग आल्यामुळें कार्नवालिस इतका त्रसून गेला कीं, ' ही लढाई संपून मी केव्हां एकदां दगदगींतून बाहेर पडतों ' असें त्यास होऊन गेलें; ' व ' माझी प्रकृति बरी आहे, पण मी अगदीं पराकाष्ठेचा वंटाळून गेलों आहें ' वगैरे वैतागाचे उद्गार त्यानें यावेळीं आपल्या सलगीच्या माणसांना लिहिलेल्या पत्रांत काढले आहेत.*

अशा रीतीनें बंगलोर येथें इंग्रजी व मराठी सैन्याचा तळ पडला असतां ' तह होणार किंवा नाहीं ' या प्रश्नाचें उत्तर खुद्द युद्धमान सेनापतींना देखील देतां येण्याजोगें नव्हतें, मग तें इतरांस कसें देतां येणार? मात्र हें उत्तर जाणण्याविषयीं सर्वत्र जबरदस्त उत्सुकता उत्पन्न झाली होती यांत शंका नाहीं. त्याचप्रमाणें ' तह होणार ' अशी एके दिवशीं बातमी फैलावली तर पुढच्या आठवड्यांत ' टिपूच्या वकीलांची गांठ देखील घेण्याचें कार्नवालिसनें नाकारलें ' अशी विश्वसनीय बातमी फुटत असे. यामुळें खरी बातमी काढणाऱ्यास मोठें बक्षीस देण्याची लालूच दाखवून दरबारी लोक अनेक लोकांची योजना करीत. सध्यां वर्तमानपत्रांच्या बातमीदारांस कांहीं ठिकाणीं तरी सवलती

---

* व्हायकाउंट ब्रोम यास कार्नवालिस सप्टेंबर ८, १७९१ रोजीं लिहितो—

I trust that my evil stars can not detain me longer than Janua[ry] 1793. I grow old and more rheumatic and have lost all spirits and shall only say when I return–a soldier worn with cares and toils of war is come to lay his wearied bones among you. Cornwallis correspondence. Vol. II. P. 118.

याच सुमारास ग्रिसडेल यास लिहिलेल्या पत्रांत कार्नवालिस म्हणतो—

God knows when our war will end. I hope and trust it will be soon or it will end me. I do not mean that I am sick. I have stood a burning sun and cold wind as well as the youngest of them but I am plagued and tormented and wearied to death.

ibid. Vol. II. P. 120.

मिळण्याचा संभव असतो. पण सवाशें वर्षांपूर्वी बातमीदाराचा मागमूस लागतांच त्याला एकदम कडक शिक्षा भोगण्याचा प्रसंग येई. पण याही अडचणीस न जुमानतां यांवेळीं युद्धक्षेत्रांतील बातमी मिळवून ती पुण्याकडे पाठविण्यासाठीं लोकांची कशी धडपड चालली होती याची हकीकत वाचली असतां यूरोपांतील आधुनिक खास बातमीदारांच्या धाडसी खटाटोपाची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं. उदाहरणार्थ १७९१ आगष्ट १५ तारखेस एक बातमीदार लिहितो † "मुख्यापर्यंत आम्हांकडूनहि तीन प्रतीचीं पत्रें व माणसें गेलीं आहेत. त्यांतून एकहि पुनरागम नाहीं. तात्यासाहेब ! पूर्वीं कोण्ही एक्या पादशाहानें कृपावंत होऊन एक्या गृहस्थास समुद्राच्या लाटा मोजून आणणें-बद्दल शेवा सांगितली म्हणे ! याच अन्वयें माझ्या उमेदीसही शेवा योजून मुख्य स्थळाहून प्राप्त जाहली. तेव्हां दैवाची परीक्षा समजावी !"

† म. इ. स. खंड १०, पृ. २८९

भाग १३ वा.

नंदीदुर्ग व बिदनूर.

पावसाळा बंगलोर येथें घालविण्याचें ठरल्यामुळें इंग्रजी सैन्य त्या शहराजवळ तळ देऊन राहिलें असें मागें सांगितलेंच आहे. सैन्य विसावा घेत होतें तोंपर्यंत कार्नवालिसनें पावसाळा संपतांच श्रीरंगपट्टणाकडे कूच करण्यास आवश्यक असणारी तयारी करून ठेवली. दोस्तांच्या सैन्यास धान्य व इतर सामुग्री उत्तरेकडून व पूर्वेकडून सुरक्षितपणें येऊन पोंचावी आणि टिपूची रसद बंद पडावी या दृष्टीनें त्याला जितका बंदोबस्त करतां आला तितका त्यानें केला. त्याचप्रमाणें कर्नल डफ याजकडे तोफखाना व त्यास लागणारी सामुग्री तयार करण्याचें काम सोंपविलें व तें त्यानें चांगल्या रीतीनें पार पाडलें. तोफा व धान्यसामुग्री कर्नाटकांतून सुरक्षितपणें येऊन पोंचण्यास पालिकोडची खिंड हस्तगत करणें जरूर होतें. पण उसुरचा किल्ला ताब्यांत घेतल्यावांचून पालिकोडवर हात टाकणें शक्य नव्हतें; यामुळें दोस्तांचीं सैन्यें १५ जुलैच्या सुमारास उसूरकडे जाण्यास निघालीं.

या भागास आतांपर्यंत युद्धाचा उपसर्ग पोंचला नव्हता; यामुळें सर्व शेतकरी लोक आपापल्या कामांत गढून गेले होते. तेथील जमीन सुपीक असून शेतकरी कष्टाळू असल्यामुळें जिकडे तिकडे हिरवेंगार दिसत होतें. स्वच्छ उन्ह पडलें असलें तरी चोहींकडे पेरा झाला असल्यामुळें हवेंत गारवा होता. यामुळें मेजर गौडी याच्या हाताखालच्या सैन्यास त्या प्रदेशांतून जातांना फार आनंद झाला. या सैन्यापुढें आपला टिकाव लागणार नाहीं असें पाहून किल्लेदारानें किल्ला उडवून देण्याचा प्रयत्न केला; परंतु तो चांगलासा सिद्धीस गेला नाहीं. कारण त्या धडाक्यानें तटास ठिकठिकाणीं भगदाडें पडलीं, पण आंतल्या धान्याच्या कोठाराचा विध्वंस झाला नाहीं. यामुळें दोस्तांचें सैन्य या भोसक्यांतून सहज आंत शिरलें व धान्याचा व दारूचा सांठा आयताच त्याच्या हातीं पडला. उसूरचा किल्ला बळकट असून तो शेवट-

पर्यंत किल्लेदारानें लढवावा असा टिपूनें हुकूम सोडला होता. तथापि तो न जुमानतां किल्ला शत्रूच्या हवालीं करण्यांत आला हें ऐकतांच त्यास फार वाईट वाटलें असें कित्येकांनीं लिहिलें आहे. पण गौडीचें सैन्य किल्ल्यांत शिरण्यापूर्वीं तेथील इंग्रजी कैद्यांना टिपूच्या हुकमानें ठार करण्यांत आलें होतें व ही गोष्ट किल्लेदारानें केवळ टिपूच्या आग्रहामुळें स्वतःच्या इच्छेविरुद्ध केली. यावरून किल्ला टिपूच्या हुकमावरून खालीं करण्यांत आला असावा असें दिसतें. असो. उसूर हस्तगत होतांच पॉलिकोड खिंडीच्या शेजारचे इतर किल्ले एकामागून एक दोस्तांच्या ताब्यांत आले व कर्नाटकांत जाण्यायेण्यास अडचण राहिली नाहीं.

यानंतर आगष्ट महिन्यांत आप्पाजीराम तहाची वाटाघाट करण्यासाठीं आला; परंतु त्यास हात हालवीत परत जावें लागलें वगैरे हकीकत मागें सांगण्यांत आलीच आहे.

सपटंबर अखेरीस कर्नाटकांत २८ हजार बैल वाहतुकीच्या कामासाठीं इंग्रजांनीं मिळविल्याची बातमी टिपूस कळली तेव्हां त्यानें तहाचें बोलणें लाविलें. पण दोस्तांचे सेनापति तहास कबूल नसल्यामुळें युद्धाची तयारी करण्यावांचून त्याला गत्यंतर नव्हतें.

यानंतर महिना दोन महिने बंगलोरच्या ईशान्येस असलेले टिपूचे किल्ले घेऊन त्याच्या रसदेचा मार्ग बंद करण्यांत गेले.

टिपूच्या राज्यांत अनेक किल्ले होते. त्याच्या राज्यांत जंगलें व टेंकड्या यांची गर्दी असल्यामुळें दुर्ग बांधण्यास फार अनुकूलता होती. व हैदर आणि टिपू यांची दृष्टि लष्करी पेशाची असल्यामुळें अशा अनुकूलतेचा त्यांनीं शक्य तितका फायदा घेतला होता. चांगलीशी टेंकडी दिसतांच त्यांनीं तट बांधून त्यास किल्ल्याचें स्वरूप दिलें होतें. यामुळें या तटबंद्यांनीं सारा प्रांत फुलून गेला होता. या किल्ल्यांत नंदिदुर्गचा नंबर बराच वर लागण्याजोगा होता. याच्या तीनही बाजूंस उंच तुटलेले सुळके असून फक्त एका बाजूस मात्र वर चढतां येण्याजोगा उतार होता; व तेथें एकामागें एक दोन जबरस्त तटांच्या भिंती बांधून आंत शिरण्याचें काम दुर्घट करून ठेवण्यांत आलें होतें. पण दोस्तांच्या सैन्यास आतां उमेद चढली असल्यामुळें मेजर गौडी व मेडोज यांनीं हा हस्तगत करण्याचा निश्चय केला. त्यांनीं प्रथम धमधमे बांधून तोफांचा मारा किल्ल्यावर पोंचेसा केला व खंदक खणून आंत लोक बसविले. बावीस दिवस तोफांचा मारा सुरू होता, तेव्हां दोन ठिकाणीं तट कोसळला. त्याबरोबर

जनरल मेडोज सैन्यासह चढणीवरून निघाला. त्या वेळीं रात्रीचें स्वच्छ चांदणें पडलें असून भिंतीचा कोसळलेला भाग चांगला दिसत होता. शिवाय मागून इंग्रजी तोफांचा भडिमार त्या भागावर चालू असल्यामुळें शत्रूस पडलेली भिंत नीट करण्यास अवसर सांपडण्याजोगा नव्हता; तेव्हां समोरून प्रतिकार करण्याचा एकच मार्ग शिल्लक राहिला होता; व त्याप्रमाणें आंतील लोक तरवार घेऊन इंग्रजी सैन्यावर चालून आले. किल्लेदार टिपूचा आप्तसंबंधी असून शूर होता. त्यानें चढणीवरून इंग्रजी सैन्य येत असतां त्यांच्यावर तोफा मारण्याचा प्रयत्न केला. पण तो चढ जवळ जवळ भिंतीसारखा असल्यामुळें वरून मारा लागू होईना. यामुळें इंग्रजी शिपाई एकसारखे वरवर येऊं लागले तेव्हां तोफा मारण्याचें सोडून किल्ल्यांतील लोकांनीं वरून मोठमोठे पाषाण खालीं ढकलून देण्यास सुरुवात केली. या उपायानें इंग्रजी सैन्याच्या गतीस कांहींसा प्रतिबंध झाला. पण मेडोज अशा प्रकारच्या अडचणींत डगमगणारा नव्हता. तो स्वतः पुढे होऊन आपल्या शिपायांना धीर देऊं लागला. अशा रीतीनें इंग्रजी सैन्य वर पोंचलें; पण वाटेंत शें दोनशें इंग्रजी सोल्जर या वेळीं दगडाच्या माऱ्यानें मरण पावले. तटास भोसका पडला होता त्या ठिकाणीं इंग्रजी सैन्य पोंचतांच तरवारीची खडाजंगी सुरू झाली. तेथें तीस चाळीस इंग्रज मृत्युमुखीं पडले; पण अखेरीस टिपूच्या सैन्यास हार खावी लागली. त्याचा धीर खचून तें मागें हटलें. त्याबरोबर जनरल मेडोज सर्वांत प्रथम तट ओलांडून आंत शिरला. या प्रसंगीं इंग्रजी शिपायांनीं चांगलें शौर्य दाखविलें.

नंदीदुर्गचा किल्ला पूर्वी मराठ्यांच्या ताब्यांत होता. तो हैदरानें काबीज केला तेव्हां त्याला तीन वर्षें वेढ्याचें काम चालवावें लागलें; पण इंग्रजांनीं टिपूपासून तो तीन आठवड्यांत घेतला असें डिरोमनें मोठ्या डौलानें म्हटलें आहे. तथापि ही तुलना योग्य आहे असें म्हणतां येत नाहीं. हैदराच्या मानानें नंदीदुर्ग लढविणारे मराठे जरी जबरदस्त होते तरी त्यानें अखेरीस किल्ला काबीज केला. आणि इंग्रज, मराठे व निजाम यांचीं सैन्यें एकवटून टिपूच्या राजधानीवर जबरदस्तीनें चालून जात असतां त्यांनीं नंदीदुर्ग काबीज केलें. या दोन प्रसंगांपैकीं दुसरा प्रसंग पहिल्यापेक्षां विशेष वाखाणण्याजोगा होता असें कोणीही म्हणणार नाहीं. किल्ला लढविणारे व तो काबीज करणारे अशा परस्पर-विरुद्ध सैन्यांतील लोकांपैकीं कोणाची तारीफ करावी याचा निर्णय करतांना किल्ला किती दिवस लढला या एकाच गोष्टीचा विचार करून भागणार नाहीं; तर त्याबरोबर

हल्ला करणाऱ्या लोकांची संख्या आंतल्या लोकांच्या मानानें केवढी होती हेंही लक्षांत घेतलें पाहिजे. सारांश, नंदीदुर्ग घेतला या गोष्टीबद्दल दोस्तांच्या सैन्यास विशेष फुशारकी वाटण्याचें किंवा टिपूच्या पक्षानें कच खाण्याचें कांहीं कारण नव्हतें. या गोष्टी त्या वेळीं अशा घडतील ही अटकळ बहुतेकांना होती.

पण आपल्या विजयाच्या प्रत्येक लहान सहान गोष्टीचें वर्णन फुगवून करण्याचें व त्या अनुषंगानें शत्रूची हिंमत खचली असें दाखविण्याचें व्यसन त्या वेळच्या इंग्रजी सेनापतींना व लष्करी अधिकाऱ्यांना लागलें होतें. यामुळें इंग्रजांनी बंगलोर घेतलें तेव्हां 'टिपू कपाळावर हात मारून मटकन खालीं बसला.' नंतर शत्रूचें सैन्य राजधानी-वर चालून येणार असें ऐकतांच तो ओक्साबोक्शी रडूं लागला. त्या प्रसंगीं त्याच्या आईनें ' असा बायकांसारखा रडतोस काय ? ' असें चिडविल्यामुळेंच तो पुनः लढ-ण्याची तयारी करूं लागला; व इंग्रज श्रीरंगपट्टणांत येऊन पोंचले तर आपला सूड घेण्यास ते कमी करणार नाहींत याचीच त्याला जास्त काळजी लागली होती; कारण इंग्रजांविषयींचा आपला द्वेष पुरवून घेण्यासाठीं टिपूनें आपल्या राजवाड्याच्या भिंतीवर इंग्रजी स्त्रीपुरुषांचीं बीभत्स चित्रें काढलीं होतीं, तीं या वेळीं त्यानें पुसावयास लावलीं व एका इंग्रजाच्या उरावर एक वाघ बसला असून तो गुरगुरलेला ऐकून खालचा मनुष्य गयावया करून केविलवाण्या शब्दानें आपणास सोडविण्याविषयीं विन-वीत आहे अशा प्रकारचें मातीचें व लांकडाचें हालतें चित्र टिपूनें करविलें होतें, तेंही या वेळीं मोडून टाकविलें' वगैरे अर्थाच्या अफवांचा सुकाळ झाला असल्यामुळें, टिपू हा इंग्रजी सैन्यांतील लोकांच्या थट्टेचा विषय होऊन बसला होता. पण टिपू या वेळीं इतका बेहिंमत झाला असेल हें संभवत नाहीं. शिवाय टिपूच्या अत्यंत परिचयांतील माणसांचा देखील अभिप्राय असाच होता. नंदीदुर्ग ताब्यांत घेतला तेव्हां तेथला किल्ले-दार इंग्रजांच्या हस्तगत झाला. तो या वेळीं वयानें ६० वर्षांचा असून त्याचीं चाळीस वर्षें टिपूच्या नोकरींत गेलीं होतीं. त्याच्यावर टिपूचा पूर्ण भरंवसा असून कांस्टंटिनोपल येथील तुर्की सुलतानाकडे टिपूनें जे वकील पाठविले होते त्यांपैकीं हा एक होता. सारांश, टिपूचा स्वभाव त्याला चांगला माहीत असला पाहिजे. नंदीदुर्ग ताब्यांत आल्या-वर कांहीं इंग्रज त्याच्याशीं बोलतां बोलतां त्याच्या पराक्रमाची स्तुति करून टिपूची फटफ-जीती होणार वगैरे गप्पा मारूं लागले. पण तें त्याला पटलें नाहीं. त्याचे व इंग्रजी

अधिकाऱ्याचें बोलणें थोड्याशा फरकानें येथें संभाषणपद्धतीनें असें लिहितां येईल. (किल्लेदारास सर्वजण ' बक्षी ' या नांवानें ओळखीत असत).

बक्षी—नंदीदुर्ग लढविण्यांत मी विशेष शौर्य दाखविलें असें मला वाटत नाहीं. पण तें कसेंही असलें तरी टिपूची स्थिति निराशाजनक आहे असें जें तुम्हांस वाटत आहे तें चुकीचें आहे हें मी तुम्हांस सांगतों.

इंग्रज—आमच्या सैन्यानें बंगलोरचा किल्ला जसा मर्दुमकीनें सहज घेतला तसाच तें आतां श्रीरंगपट्टणचा किल्ला घेतल्यावांचून राहणार नाहीं.

बक्षी--बंगलोरचा किल्ला तुमच्या हातीं आला याचें श्रेय तुमच्या मर्दुमकीपेक्षां आंतील लोकांच्या बेसावधपणासच द्यावें लागेल. तुमचा हल्ला त्या वेळीं होईल अशी कल्पना आंतल्या लोकांना असती तर किल्ला इतक्या लौकर तुमच्या हातीं आला नसता पण आतां श्रीरंगपट्टणचा किल्ला असा सहजासहजीं तुम्ही घेऊं शकाल असें म्हणता येत नाहीं. या वेळीं टिपूचें सैन्य सावध आहे.

इंग्रज--तें सावध असलें तरी आम्ही किल्ला वेढून रसद बंद करूं; म्हणजे टिपूस उपासमारीमुळें शरण येण्यावांचून गत्यंतर राहणार नाहीं.

बक्षी--पण वेढ्याच्या कामास दिवसगत होईल तर टिपूपेक्षां इंग्रजी सैन्याचेच अधिक हाल होण्याचा संभव आहे. गेल्या वर्षी आलेला अनुभव तुमच्या लक्षांत असेलच. निदान कंपनीच्या हातून एवढ्या मोठ्या सैन्यांचा खर्च चालविणें होणार नाहीं असें टिपूस वाटत असल्यामुळे तो या तुमच्या वेढ्याच्या कल्पनेनें फारसा भिऊन जाणार नाहीं एवढें खास.

इंग्रज--पण. विषाची परीक्षा पाहण्याची पाळी सुलतानानें आपणावर आणून घेऊं नये हें बरें.

बक्षी—हें म्हणणें मला देखील पसंत आहे. या वेळीं तहावर प्रकरण मिटत असेल तर त्यानें अवश्य मिटवावें.

इंग्रज--नाहीं तर सुलतानाला जिंकून त्याला आमचा मांडलीक बनविणें भाग पडेल.

बक्षी—हाच तुमचा बेत असेल तर तो केव्हांही सिद्धीस जाणार नाहीं. ज्याच्या योगानें टिपूची नाचक्की होईल किंवा त्याच्या स्वातंत्र्यास धोका येईल अगर एखाद्या

म्हातारीप्रमाणें पेनशन खाऊन जन्मभर दिवस कंठावे लागतील अशा तहावर टिपू केव्हांहि सही करणार नाहीं.

या संभाषणावरून टिपूची हिंमत खचली असल्याच्या बाजारगप्पा मुळींच विश्वसनीय नव्हत्या असें म्हणण्यास हरकत नाहीं.

नंदीदुर्गचा हल्ला चालू असतांना कर्नल स्टुअर्टच्या सैन्यानें सावनदुर्गला वेढा दिला. टिपूनें तेथें धान्य व दारू पोंचवून आपल्या मतानें चांगली तयारी केली होती. पण इंग्रजांजवळ लांब पल्ल्याच्या तोफा असल्यामुळें एकहि मनुष्य बळी न देतां त्यांनीं बारा दिवसांत तो किल्ला तोफांच्या माऱ्यानें पाडून निकामी केला. यामुळें इंग्रजी शिपायांनीं हल्ला चढविला तेव्हां आंतील लोकांना फारसा अडथळा करतां आला नाहीं. उत्तरदुर्ग देखील असाच इंग्रजांनीं सर केला. अशा रीतीनें एकामागून एक किल्ले घेण्याचा इंग्रजी सैन्यानें धडाका चालविल्यामुळें टिपूचें सैन्य बेहिंमत होऊं लागलें. तेव्हां त्यानें दोस्तांच्या ताब्यांतील प्रदेशांत अकस्मात छापा घालून तो सर करण्याचा व अशा रीतीनें आपल्या सैन्याची उमेद कायम ठेवण्याचा निश्चय केला.

दोस्तांचें सैन्य पूर्वेस गुंतलें आहे असें पाहून त्यानें दक्षिणेकडे आपला मोर्चा वळविला व कोइमतूरच्या किल्ल्यावर अशा वेगानें तो जाऊन पोंचला कीं, तेथील फौजेस त्याच्या ताब्यांत किल्ला देऊन शरण जाण्यावांचून गत्यंतर राहिलें नाहीं. आंतील लोकांना सुरक्षितपणें निघून जाण्यास परवानगी मिळेल असें अभिवचन दिल्यामुळें कोइमतूर टिपूच्या स्वाधीन झालें असें कांहीं लेखकांचें म्हणणें आहे. त्यांत सत्यांश असो किंवा नसो; त्यानें किल्ल्यांतील सर्व लोकांना कैद करून श्रीरंगपट्टणाकडे रवाना केलें. शेवटीं आपला पराभव झाला तर निदान कांहीं इंग्रजांना तरी ठार मारून आपली सूड घेण्याची इच्छा पुरवून घ्यावी या हेतूनें टिपूनें या लोकांची रवानगी श्रीरंगपट्टणाकडे केली असें एक इतिहासकार म्हणतो. पण त्यांत फारसा अर्थ दिसत नाहीं. बहुधा या किल्ल्यांतील लोकांचा पराभव झाल्यामुळें ते टिपूच्या हातांत सांपडले व नेहमींच्या पद्धतीप्रमाणें त्यानें त्यांस कैद केलें असा सरळ प्रकार घडला असावा.

कार्नवालिसच्या मदतीसाठीं विलायतेहून आलेलीं पलटणें, व तोफा मुंबईस आक्टोबरच्या सुमारास येऊन पोंचलीं. त्यांना घेऊन जनरल आबरक्रॉंबी पश्चिम किनाऱ्यानें तलचेरीस आला व मद्रास आणि बंगालकडून आलेली सामुग्री व सैन्य बंगलोरच्या बाजूनें इंग्रजी सैन्यांत सामील होण्यासाठीं येऊं लागली.

अशा रीतीनें इंग्रजी सैन्याची चोहीकडून जुळवाजुळव होऊं लागली असें पाहून टिपूनें बारामहाल प्रांतांत आपलें सैन्य पाठवून शत्रूच्या बगलेवर छापा घालण्याचें काम चालू ठेवलें. तेव्हां त्याचा बंदोबस्त करण्याचें काम कॅप्टन मॅक्सवेल व मराठ्यांच्या सैन्याची एक टोळी यांजकडे सोंपविण्यांत आलें. महिना दीड महिना टिपूच्या सैन्याशीं मराठी घोडेस्वार व इंग्रजी पायदळ यांना लढावें लागलें. त्यांत कर्नल मॅक्सवेलचा एके ठिकाणीं बराच पराभव झाला. पण अखेरीस मराठी व इंग्रजी सैन्याच्या माऱ्यापुढें टिपूच्या सैन्याचा टिकाव लागला नाहीं.

बारामहाल प्रांतांत हा प्रकार चालला असतां जनरल आबरक्रोंबी नवीन विलायती पलटणें, तोफा व इतर सामुग्री घेऊन तलचेरी बंदरांत उतरून काननूर येथें घाट चढूं [illegible] [illegible] चार महिन्यापूर्वी तो हा घाट चढून टिपूच्या राज्यांत शिरला तेव्हां त्यानें तोफा नेण्यासाठीं तात्पुरता रस्ता तयार केला होता. पण पावसाळ्यांत तो रस्ता पाण्याच्या ओघानें वाहून गेल्यामुळें पुनः सर्व तयारी प्रथमपासून करावी लागली. ५ डिसेंबर रोजीं तो पुदिचेरम् घाट चढूं लागला व इलिकोर येथें नदी ओलांडून तो जंगलांत शिरला. या जंगलांतून अनेक टेकड्या चढून व तोफा ओढून नेतांना या सैन्याचे बरेच हाल झाले. पण या वेळीं टिपूचें लक्ष इतरत्र गुतलें असल्यामुळें आबरक्रोंबीस पुदिचरम् घाट चढून व नंतर २५।३० मैल खडकाळ प्रदेशांतून जाऊन पुनः सदाशिव घाट ओलांडण्याचें काम निश्चितपणें करण्यास अवसर सांपडला. शिवाय कुर्गचा राजा टिपूच्या धर्मच्छलानें चिडून त्याचा सूड घेण्यासाठीं टपून बसला होता. त्यानें यावेळीं इंग्रजी सैन्यास मनोभावानें मदत केली. यामुळें आबरक्रोंबीचें सैन्य सुखरूपपणें टिपूच्या राज्यांत येऊन पोचलें. यावेळीं इंग्रजी व देशी मिळून नऊ हजार शिपाई व चांगला तोफखाना आबरक्रोंबीजवळ होता; व त्यास कुर्गच्या राजाची हरएक प्रकारची मदत असल्यामुळें त्याचें सैन्य टिपूच्या राजधानीवर चालून जाण्याचा हुकूम केव्हां येतो याची उत्सुकतेनें वाट पहात राहिलें होतें.

इंग्रजी सैन्याच्या हालचाली अशा रीतीनें चालल्या असतां मराठ्यांचें सैन्य काय करीत होतें तें आतां पाहूं.

परशुरामभाऊ इंग्रजांच्या सैन्यांतून निघाले ते शिऱ्याच्या बाजूस वळले व चित्रदुर्गच्या पूर्वेस त्यानें तळ दिला. त्यांचे पुत्र आपासाहेब पश्चिमेकडे राहिले. जुलैपासून सपटंबरपर्यंत पावसाळ्यांत भाऊ स्वस्थ होते व त्यानंतर दोन तीन महिने ते आजारी

होते. दसरा झाल्यावर भाऊंच्या प्रकृतीस आराम पडत चालला व त्यांनीं हालचाल करण्याचें ठरविलें; इतक्यांत लार्ड कार्नवालिस व हरिपंत यांनीं त्यांना ताबडतोब निघून येण्याविषयीं पत्रें पाठविलीं. इंग्रजांनीं मागडी किल्ला घेतला व नंदीगड, अदवानी, मदगिरी, बाळापूर हीं ठाणीं दिवाळीपर्यंत घेऊन नंतर श्रीरंगपट्टणाकडे जाण्याचा त्यांचा बेत होता. हे किल्ले ताब्यांत येण्यास बरेच दिवस लागतील असा परशुराम-भाऊंचा अंदाज असल्यामुळें बिदनूर प्रांतांत जमेल तितका मुलूख ताब्यांत घ्यावा व खुद्द बिदनूर देखील सर करावें अशी भाऊंची इच्छा होती. नाना फडणवीसांनासुद्धां ही भाऊंची योजना पसंत पडली, तेव्हां भाऊनीं चेनागिरीच्या बाजूचीं ठाणीं घेऊन शिवमोग्याकडे कुच केलें. त्या किल्याजवळ रेझाखान नांवाचा टिपूचा शूर सर-दार वीस हजार कवाइती पायदळ, दोन तीन हजार स्वार व दाहा बारा तोफा घेऊन बसला होता. तो भाऊंचें सैन्य येतांच किल्ला सोडून तुंगेच्या तीरावर एका अडच-णीच्या जंगलांत जाऊन राहिला. ही बातमी कळतांच रामचंद्रपंत आपा व रघुनाथपंत कुरुंदवाडकर यांजबरोबर दहा हजार स्वार व कॅपटन लिटलच्या हाताखालचीं इंग्रजी पलटणें देऊन भाऊनीं त्यास रेझासाहेबावर पाठविलें. " नंतर गोळागोळी तीन प्रहर पावेतों झाली. संध्याकाळीं प्रहर दिवस राहिला. इंग्रजास तो कांहीं आटपेनासा झाला. इंग्रज यांनीं श्रीमंत दादासाहेबास (रघुनाथपंतास) सांगून पाठविलें कीं, याची मसलत संध्याकाळ पावेतों गोळागोळी करून रात्रीस निघून जावें अशी दिसते. त्यास तुमचा लाग आहे. घोडे घालावे, म्हणून सांगून पाठविलेवरून आपासाहेब व बाबासाहेब (दोघेही परशुरामभाऊचे मुलगे) यांस पिछाडीस ठेऊन दादासाहेबांनीं आपले फौजे-सुद्धा घोडे घातले. त्याची मारगिरी फार केली. घोड्या कांहीं ठार झाल्या. माणूसही ठार व जखमी झालें. त्याचा (शत्रूचा) मोड झाला. शत्रूची फौज डोंगरांतून निघोन तोफा टाकून निघोन गेली. झाडी भारी म्हणोन तो गेला. लडाईचे समयीं फार उतावळे ! कितीं सांगितले तरी ऐकत नाहींत. ईश्वर तारणार ! " या लढाईत हरीपंताचा जावई गणेश गंगाधर पागे ठार झाला. पण रेझासाहेबाचा पूर्ण पराजय झाला. त्याचें सर्व लष्कर मराठ्यांनीं लुटलें. यानंतर भाऊंनीं शिवमोग्याचें ठाणें घेऊन लुटून फस्त केलें.

अशा रीतीनें बिदनूर सुभ्यांतलीं बहुतेक ठाणीं घेऊन परशुरामभाऊ खुद्द बिदनूर घेण्याच्या उद्योगास लागले. किल्लेकरी फितूर होईल असें प्रथम भाऊंना वाटलें होतें; पण त्यानें किल्ला झुंजविण्याची तयारी केलेली पाहून भाऊ त्यावर चालून जाण्याच्या

उद्योगास लागले. इकडे कार्नवालिस श्रीरंगपट्टणावर जाण्याच्या तयारींत होता. त्याला भाऊनें बिदनुराकडे अडकून राहणें बरें वाटलें नाहीं त्यानें नाना फडणीसांस पत्रावर पत्रें पाठवून परशुरामभाऊच्या वर्तनाबद्दल तक्रार केली, आणि नानांनीं देखील भाऊस श्रीरंगपट्टणाकडे जाण्याविषयीं लिहिलें. तेव्हां भाऊनीं कार्नवालिसकडे जाण्याचें ठरविलें.

जानेवारी महिन्यांत भाऊच्या सैन्याबद्दल इंग्रजांकडून जो आग्रह चालला होता त्याचें वर्णन करतांना विसाजी नारायण पुण्याहून लिहितो. "हल्लीं इंग्रजांचें बोलणें बहुत निकडीचें पडलें आहे कीं, भाऊनीं लवकर पट्टणास यावें. या उपरि पट्टणास न गेल्यामुळें श्रीमंतांचे मसलतीस धक्का हे अंदेश येतात. याकरितां जाण्याचा बेत घडावा हें चांगलें. याउपर जाणें न झाल्यास जन्मपर्यंत शब्द राहील. याचे अंदेश बहुत लांब आहेत. घरचीच मसलत असती चिंता नव्हती. इंग्रजांशीं संबंध. ते शब्दाशब्दास धरितात, एवढेंच त्यास निमित्त झालें! वरकड ते जाऊन पट्टणास मोर्चा देतात. आपण गेला नाहीं याजमुळें श्रीमंतांचे वाटणीस हिसका बसून फिराऊन गोष्टी सांगतील असें आहे." (ऐ. ले. सं. नं. ३४१०)

हरीपंत इंग्रजी फौजेबरोबर होता. त्याला देखील परशुरामभाऊ बिदनुराकडे न गुंततां येणार हें ऐकून समाधान वाटलें. तो फेब्रुवारी ११ तारखेच्या एका पत्रांत लिहितो. "संकष्ट चतुर्थीस श्रीगणपतीची प्रार्थना भाऊ येण्याविषयीं अहर्निश करितों, त्याचें सार्थक होऊन आपलें पत्र येऊन पोचलें, याचा संतोष झाला तो पत्रीं काय लिहूं! श्रीगजाननानें आपल्यास इकडे येण्याची प्रेरणा केली ही गोष्ट श्रीमंतांच्या प्रतापेंकरून झाली!"

मराठ्यांच्या सैन्यानें मांडलेल्या या धुमाकुळानें टिपूस बरीच चिंता पडली असावी असें दिसतें. कारण त्यानें कमरूदीनखान नांवाच्या सरदारास बऱ्याच मोठ्या सैन्यानिशीं बिदनूर प्रांतीं रवाना केलें. भाऊनेंही त्याच्याशीं दोन हात करण्याचें ठरविलें. पण अशानें श्रीरंगपट्टणावर दोस्तांचें सर्व सैन्य एकवटण्याचा कार्नवालिसचा बेत एकीकडे राहून भलत्याच ठिकाणीं युद्ध जुंपण्याची वेळ आली. तेव्हां कार्नवालिसनें हरीपंताकडून व नानाकडून सक्त तगाद्याचीं पत्रें पाठविलीं, यामुळें अखेरीस भाऊला बिदनूर प्रांतांतून श्रीरंगपट्टणच्या रोखानें यावें लागलें. यामुळें खानास असें वाटलें कीं, भाऊ आपल्या सैन्यास भिऊन जीव बचावण्यासाठीं दुसरीकडे निघाला असावा.' पण हा तर्क चुकीचा होता. कार्नवालिसच्या आग्रहामुळें भाऊस यावेळीं खालीं वळणें प्राप्त झालें होतें.

भाऊला आलेलें हें यश मुख्यतः लिटलच्या मदतीमुळें आलें असें नेहमीप्रमाणें इंग्रजी ग्रंथकार म्हणतात. पण तें खरें दिसत नाहीं. कारण तसें असतें तर तो लिटलच्या तंत्रानें वागण्यास तयार झाला असता; व कार्नवालिसच्या इच्छेप्रमाणें तो आबाक्रोंबीच्या सैन्यास जाऊन मिळता. या वेळां मुंबईहून आलेल्या सैन्यावर टिपूचा हल्ला होण्याची



बंगलोरपासून श्रीरंगपट्टणाकडे जाण्याचे तीन रस्ते व ओलांडावें लागणारें जंगल.

भीति असल्यामुळें त्यांना मराठी घोडस्वारांच्या संरक्षणाची आवश्यकता भासत होती. पण भाऊला शिऱ्याच्या बाजूच्या सुपीक प्रदेशांत फिरून धान्य मिळविण्यास चांगली संधी मिळाल्यामुळें त्याचें पाऊल त्या प्रांतांतून लौकर निघेना. भाऊच्या हालचालीचा

परिणाम दोस्तांच्या हालचालीस उपकारक होत नाहीं यासाठीं त्यानें आपला आग्रह सोडून आबरक्रोंबीकडे जावें असा कार्नवालिसनें आग्रह धरला. तेव्हां भाऊला अखेरीस दक्षिणेस वळावें लागलें.


तथापि भाऊच्या या हालचालीनें खानाच्या सैन्यास उमेद चढून त्यानें अनेक ठिकाणीं छापे घातले व लुटालूट केली. त्याच्या घोडेस्वारांच्या एका टोळीनें तर कर्नाटकांत शिरून मद्रासपर्यंत जाळपोळ व लुटालूट केली. या वेळीं मद्रास येथील कौन्सिलमधील लोक भयाभीत झाले व त्यांना काय करावें हें सुचेना. शेतकरी व सामान्य लोक यानीं तर पळ काढला. पण मद्रासेंतील कांहीं धीट लोकांनीं स्वयंसेवक बनण्याचा उपक्रम केल्यामुळें हा प्रसंग निभावला.

मद्रास व बिदनूर प्रांतांत हा धुमाकूळ चालला होता, त्याच सुमारास इंग्रजी आरमारानें मलबार किनाऱ्याकडे येऊन टिपूचें बरेंच नुकसान केलें. त्यानें टिपूच्या ताब्यांतलीं बंदरें घेऊन ठिकठिकाणीं सैन्य उतरविलें. तेव्हां टिपूला मदत करण्यासाठीं फ्रेंचांनीं या वेळीं दोन जहाजें पाठविलीं. तीं मलबार किनाऱ्याकडे आपला माल घेऊन येऊं लागलीं. या वेळीं फ्रान्स व इंग्लंड यांमध्यें यूरोपांत युद्ध चालू नव्हतें, यामुळें फ्रेंचाच्या जहाजांवर इंग्रजांना हात टाकतां येईना. तथापि हीं जहाजें टिपूच्या मदतीसाठीं चाललीं आहेत या सबबीवर एक जहाज इंग्रजांनीं अडविलें. त्याबरोबर त्या जहाजावरील फ्रेंच तोफांनीं अडविणाऱ्या इंग्रजी जहाजावर भडिमार केला. यामुळें युद्धास सुरवात झाली व अखेरीस फ्रेंचांना हार खावी लागली.

अशा रीतीनें चोहीकडून टिपूस पायबंद देत दोस्तांचीं सैन्यें श्रीरंगपट्टणाच्या दिशेनें चालू लागलीं. १७९२ च्या जानेवारी १४ तारखेस इंग्रजी व मराठी सैन्यें उत्तरदुर्गाजवळ एकवटून हुलिदुर्गच्या रोखानें निघालीं. २५ तारखेच्या सुमारास निजामाचें सैन्य त्यांतच सामील झालें व २७ तारखेस सर्व सैन्यें हुलिदुर्गास पोंचलीं. सहा महिन्यापूर्वीं इंग्रजी सैन्यानें हा किल्ला काबीज केला होता. पण नंतर कार्नवालिसला परत फिरावें लागलें, तेव्हां टिपूच्या सैन्यानें तो आपल्या ताब्यांत घेतला. आतां पुनः दोस्तांचें प्रचंड सैन्य त्या किल्ल्याजवळ येऊन पोंचतांच किल्लेदारानें न लढतां तो शत्रूच्या ताब्यांत दिला.

शेवटीं दोस्तांचीं सैन्यें श्रीरंगपट्टणच्या जवळ येऊन पोंचलीं; व खुद्द त्या शह-

रास वेढा देण्याचें काम आतां सुरू होणार अशी टिपूची खात्री झाली. हा प्रसंग टाळण्याकरितां त्यानें सर्व प्रकारचे उपाय योजून पाहिले. तहाचें बोलणें लावलें,



टिपूचें हस्ताक्षर

दोस्तांच्या सैन्यानें टिपूचा पराभव करून त्यांजकडून अर्धे राज्य घेतलें तेव्हां त्यानें एक टिपण स्मरणार्थ लिहिलें होतें त्यांतील एका भागाचें हें छायाचित्र येथें दिलें आहे. टिपू चांगला शिकलेला होता त्याच्या पदरीं अनेक विद्वान लोक होते इतकेंच नव्हें तर त्याचें पुस्तकसंग्रहालय नांवाजण्याजोगें असून त्यांत अनेक दुर्मिळ असे अत्यंत प्राचीन, हस्तलिखित संस्कृत ग्रंथ होते. शिवाय राज्याची व सैन्याची व्यवस्था करण्यासाठीं त्यानें जे कायदे व नियम केले त्याचें टांचण प्रथम स्वतः लिहून काढण्याची त्याची वहिवाट होती; व तो रोजनिशी लिहीत असे यामुळें त्यानें लिहिलेले बरेच कागद श्रीरंगपट्टणच्या राजवाड्यांत १७९९ मध्यें सांपडले. ते त्या वेळीं कलकत्त्याच्या संग्रहालयांत ठेवण्यांत आले असे कांहीं ठिकाणीं उल्लेख आहेत.

दोस्तांत फूट पाडण्याचा प्रयत्न केला, त्यांचीं सैन्यें एकत्र न देण्यासाठीं ठिकठिकाणीं अडविलीं, पण कशाचाच उपयोग झाला नाहीं. फ्रान्स व तुर्कस्तान यांची मदत

मिळविण्याचाही त्यानें प्रयत्न केला; पण त्यांच्यावर भिस्त ठेऊन तो दोस्तांशीं लढण्यास तयार झाला असें म्हणतां येत नाहीं. हे दोनहि देश आपणास साक्षात फारशी मदत करूं शकणार नाहींत; पण सर्व प्रकारचे उपाय करून पहावे व या दोन देशांनीं मनांत आणल्यास इंग्रजांना पायबंद पोंचेल एवढीच त्याची कल्पना असावी असें दिसतें. तथापि एवढी खटपट करून देखील चोहोंकडून त्याच्या राजधानीवर सैन्याचा वेढा पडूं लागला होता. तरी त्यानें धैर्य सोडलें नाहीं. श्रीरंगपट्टणचा किल्ला अत्यंत मजबूत होता. व सहा महिन्यापूर्वी कार्नवालिसला तेथून परतावें लागलें होतें.तेव्हां किल्ला सर करण्यास दोस्तांना पुष्कळ खटपट करावी लागेल व तेवढ्यांत आपल्या नशीबानें एखादी तोड सांपडण्याचा संभव आहे असें त्यास वाटत होतें. या वेळीं विनाकारण लढण्याचा हट्ट धरून टिपूनें आपलें नुकसान करून घेतलें असें नोलन वगैरे इतिहासकार म्हणतात. पण तें चुकीचें दिसतें. कारण तहाची वाटाघाट करण्यास पाठविलेलीं माणसें अनेक सबबींवर परत पाठविण्यांत आल्यामुळें सर्वस्वीं शरण जाऊनच युद्ध थांबविण्याचा एक मार्ग शिल्लक राहिला होता. आणि असें करण्यांत फायदा किंवा लौकिक कांहींच नव्हता. टिपूस पदच्युत करून पूर्वीच्या हिंदू राजास तक्तनशीन करण्याची सेडोजची इच्छा मात्र फलद्रूप होण्याची वेळ आली असती. त्यापेक्षां शक्य तोंवर शौर्यानें लढून व शत्रूची रग जिरवून नंतर तहास मान्यता देणें हा एकच मार्ग त्याला मोकळा राहिला होता व तो त्यानें पतकरला.तेव्हां याबद्दल त्यास दोष देणें न्याय्य होणार नाहीं.

भाग १४ वा.

टिपूच्या सरदारांच्या हालचाली.

नंदिदुर्ग सर केल्यानंतर कार्नवालिसनें एकदम श्रीरंगपट्टणची वाट धरली नाहीं. त्यानें महिना दीडमहिना बेंगळूरच्या आसपास घालविला. याचें कारण असें कीं, निजामाचें म्हणजे मोंगलांचें व मराठ्यांचें सैन्य अद्याप किरकोळ कामांतून मोकळें झालें नव्हतें. टिपूच्या राज्यांतिल उत्तरेकडील ठाणींठुणीं प्रथम हस्तगत झालीं म्हणजे श्रीरंगपट्टणच्या वेढ्याचें काम निर्वेधपणें चालवितां येईल; नाहींतर दोस्तांच्या सैन्यावर पिंछाडीकडून टिपूच्या सरदारांचा हल्ला होण्याची भीति कायम असेपर्यंत श्रीरंगपट्टणच्या वेढ्याचें काम मनाजोगें होणार नाहीं असा विचार सर्वानुमतें दोन महिन्यांपूर्वीं ठरला होता. त्यास अनुसरून मोंगल व मराठे टिपूच्या राज्यांतिल उत्तरेकडचा मुलूख ताब्यांत घेत होते. शिवाय कार्नवालिसला गेल्या मोहिमेंत जो कडू अनुभव आला होता त्यामुळें भरपूर अन्नसामुग्री बरोबर घेतल्यावांचून पट्टणच्या वेढ्यास हात घालण्यास त्याचें मन धजावेना. त्यानें मद्रासेहून धान्याच्या गोण्या व दारूगोळा मागविला. तो येऊन पोंचण्याचे दिवस जवळ आल्यामुळें कार्नवालिसचें लक्ष मुख्यत्वेंकरून ही रसद सुरक्षीतपणें आपल्या हातीं कशी येईल व टिपूच्या लोकांनीं तिच्यावर छापा घातल्यास तो मारून काढण्यासाठीं आपलें सैन्य कोणत्या प्रांतांत पेरून ठेवावें हें ठरविण्याकडे लागलें होतें.

कार्नवालिसचे हे दोनहि हेतु ओळखून टिपूनें तदनुसार डावपेचांची योजना केली होती. मराठी व मोंगली सैन्यें जे किल्ले ताब्यांत घेण्यासाठीं खटपट करीत होतीं त्या किल्ल्यांस मदत पोंचवून किल्ला लौकर शत्रूच्या हातीं पडूं नये या दृष्टीनें त्याला सरदारांची योजना ठिकठिकाणीं करतां आली तितकी त्यानें केली; आणि मद्रासेकडून येणाऱ्या इंग्रजांच्या रसदेस प्रतिबंध करण्याचा त्यानें शक्य तो प्रयत्न केला. टिपूच्या या हालचालीपैकीं मराठ्यांच्या सैन्याशीं त्याच्या सरदारांनीं केलेल्या झटापटीची

वर्णनें मागल्या एकदोन प्रकरणांत दिलीं आहेत. आतां येथें इंग्रजी व मोंगली सैन्याशीं टिपूच्या सैन्याच्या ज्या चकमकी झडल्या त्यांचें वर्णन द्यावयाचें आहे.

मोंगली सैन्यानें या युद्धांत टिपूचे प्रथम गंजीकोट व कोपळ हे दोन किल्ले सर करण्याचें काम पत्करलें होतें आणि जून १७९१ पर्यंत तें काम त्यानें पार पाडलें. त्यानंतर हें सैन्य गुरुमकुंड्याच्या वेढ्याचें काम चालविण्यांत गुंतलें होतें. नंदिदुर्ग सर झाल्यानंतर कार्नवालिसनें चार तोफा गुरुमकुंड्यास मोंगली सैन्याकडे पाठविल्या. त्यांच्या सहाय्यानें ७ नोव्हेंबर रोजीं पेठ हस्तगत झाली. यानंतर लौकरच निजामाचा दुसरा मुलगा शिकंदरजा व मशीरुलमुल्क मोठें सैन्य घेऊन हैदराबादेहून गुरुमकुंड्यास आले. या सैन्याबरोबर इंग्रजांचा रेसिडेंट सर जॉन केनावे हाही होता. या सर्वांनीं मिळून गुरुमकुंड्याच्या बालेकिल्ल्याची पाहणी केली. त्यावरून तो लौकर हस्तगत होण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां वेढा चालविण्याचें कंटाळवाणें काम हाफीजजी नांवाच्या एका सरदाराकडे सोपवून, कार्नवालिसच्या इच्छेनुसार राजपुत्र शिकंदरजा व मशीरउलमुल्क वगैरे मंडळी कर्नाटकांतून येणाऱ्या इंग्रजांच्या रसदेच्या संरक्षणार्थ कोलारच्या बाजूस आली.

इंग्रजांची ही रसद मद्रासेहून घेऊन येण्याची कामगिरी कर्नल फ्लॉइड याजकडे होती. आणि त्याला हें काम चांगल्या रीतीनें पार पाडतां यावें म्हणून हजारबाराशें घोडेस्वारांची योजना ठिकठिकाणीं कार्नवालिसनें केली होती; व शिवाय अंबूरपासून वेंकटगिरीपर्यंत कांहीं पायदळ ठेवलें होतें. थोडथोडी सामुग्री वरघाटीं पाठविण्याचें काम फ्लाइडनें चालू केलें होतें. इतक्यांत ही बातमी टिपूस समजली. तेव्हां त्यानें आपल्या मुलाच्या म्हणजे हैदरसाहेबाच्या हाताखालीं सैन्य देऊन मोंगली सैन्याचा समाचार घेण्यासाठीं रवाना केलें.

इंग्रजाच्या रसदेच्या संरक्षणार्थ मोगलांचें बहुतेक सैन्य गुरुमकुंड्याहून निघून गेलें होतें हें मागें सांगितलेंच आहे. ती बातमी ऐकून हैदरसाहेब मोठ्या वेगानें बाराहजार सैन्याच्या टोळीनिशीं गुरुमकुंड्यास अचानक जाऊन पोंचला; आणि २१ नोव्हेंबर रोजीं त्यानें मोगलांचा सेनापति हाफीज यास कैद करून पेठेंत आपला अंमल परत बसविला व मोगलाच्या सैन्यास हाकून दिलें. ही बातमी ऐकून मोगलांचें मुख्य सैन्य (इंग्रजांच्या मदतीस गेलें होतें तें) परत गुरुमकुंड्यास नेणें भाग पडलें. यामुळें वेंकटगिरीच्या बाजूची इंग्रजांची रसद उघडी पडली; व तिच्यावर

टिपूच्या सरदारांना छापा घालतां आला असता. पण हैदरसाहेबाचा मुख्य हेतु गुरुमकुंड्यांत मदत पोंचविण्याचा होता. तें काम करून तो झपाट्यानें परत फिरला. त्याच्या जवळ सैन्याचा व तोफांचा पुरवठा विशेष नसल्यामुळें तो इंग्रजांची रसद मारण्याच्या भानगडींत पडला नाहीं. शिवाय गुरुमकुंड्यांतील कित्येक बड्या लोकांचीं बायकापोरें त्याला आधीं श्रीरंगपट्टणास नेऊन पोचवावयाचीं होतीं; तो आपल्यावर इंग्रजांचा हल्ला होईल कीं काय या विवंचनेंत होता. यामुळें तो श्रीरंगपट्टणच्या वाटेनें मुकाट्यानें निघून गेला.

इकडे कर्नल फ्लाइडनें रसदेवर शत्रूचा छापा पडला तर काय करावयाचें याची व्यवस्था करून ठेवली होती. परंतु तसा कांहींच प्रकार न घडल्यामुळें तो उसकोट्याच्या वाटेनें बेंगळूरास २२ जानेवारी १७९२ रोजीं सुरक्षितपणें दाखल झाला.

गुत्तीकडे टिपूच्या सरदारांनीं हैदरसाहेबाप्रमाणेंच धाडसाचीं कामें करून दाखविलीं. या किल्ल्याजवळ हाशमतजंग, हिदादखा, रावरंभा व विसोमिया हे मोगली सरदार चार हजार फौजेनिशीं मोरचे देऊन बसले होते. त्यांपैकीं “ रावरंभा व हाशमतजंग यांजला नबाबांनीं पानगलास बोलावून घेतलें; म्हणोन उभयतां निघोन गेले. ” ही बातमी किल्लेदारानें तावडतोब टिपूकडे कळवून व या संधीचा फायदा घेणें शक्य आहे असें सुचवून किल्ल्यांतील स्थितीसंबंधानें त्यानें असें स्पष्टपणें कळविलें कीं, लोकांची शिबंदी चढली, गल्ला सरला, याकरिता रस्त आली पाहिजे. ’ त्यावर टिपूनें मीर मोहिद्दीन व गुलाबपत्रलीबक्ष यांजबरोबर पांच हजार फौज देऊन गल्ला व खजीना रवाना केला. “ त्यांनीं नवाबाकडील फौज व सरकार (=मराठ्यांचे) तर्फेनें राजश्री रामराव देसाई होते, त्यांजवर छापा घालोन नवाबाची फौज लुटली. हिदादखा ठार झाले. विसामिया पंचवीस लोकांनिशीं निघोन गेले. रामराव देसाई संभाळून अदवाणीकडे गेले. (टिपूची फौज) खजीना, गल्ला किल्ल्यांत पावता करून माघारा (श्रीरंग) पट्टनास आली. ”

मोगली सैन्यास सतावून सोडण्यासाठीं अशा प्रकारचे छापे घालण्याचें काम चालू असून इंग्रजी सैन्यास बेचैन करण्याचाहि उद्योग टिपूनें चालविला होता. मद्रासेहून येणारी रसद बेंगळुरास पोचवावयाची म्हणजे बारामहाल प्रांतांतून ती नेणें आवश्यक होतें. तेव्हां या प्रांतांत टिपूच्या घोडेस्वारांनीं धुमाकूळ मांडला. या टोळीचें आधिपत्य धारवाडचा किल्लेदार बदरीजमालखान याचा मुलगा बंकरसाहेब

याजकडे होतें. या घोडेस्वारांची संख्या फक्त दीड हजार होती. पण तिनें त्रिपतूर लुटून आसपासचा मुलूख बेचिराख केला. आणि इंग्रजांनीं गोळा केलेलीं गुरें वानियंबाडी येथील कुरणांत चरण्यासाठीं नेलीं होतीं तिकडे जाण्याचा टिपूच्या घोडेस्वारांचा रोख दिसला. यामुळें इंग्रजांचें कांहीं सैन्य त्या ठिकाणाच्या रक्षणासाठीं गेलें. तेवढ्यानेंहि काम भागेना. तेव्हां कर्नल मॅक्सवेल याच्या हाताखालीं पायदळ व तोफा देऊन २१ आक्टोबर रोजीं त्यांची रवानगी बारामहाल प्रांतांत करण्यांत आली.

टिपूचे लोक पिनागर येथील बळकट किल्ल्याच्या आश्रयानें हा सर्व खेळखंडोबा करतात असें वाटून मॅक्सवेलनें ३१ आक्टोबर रोजीं किल्ल्यास वेढा दिला. नंतर एक (सहा रत्तलचे गोळे मारणारी) तोफ चालू करण्यांत आली. पण किल्ल्याची तटबंदी मजबूत असल्यामुळें मारा लागू होईना. तेव्हां शिड्या लावून इंग्रजी शिपाई वर चढले. त्यांनीं तटावरून आंत उड्या मारून दरवाजे उघडले. नंतर अशाच रीतीनें दुसऱ्या तटाचा देखील दरवाजा उघडण्यांत आला. हा सर्व प्रकार चालला असतां शत्रूनें म्हणण्याजोगा प्रतिबंध केला नाहीं. व बालेकिल्ल्यावर इंग्रजी शिपाई चढण्याच्या सुमारास आंतल्या लोकांनीं शरण आल्याचें निदर्शक निशाण उभें केलें. अर्थात 'आपण हरलों, आतां आपणास प्राणदान देण्यांत यावें' असा हें निशाण उभारण्याचा अर्थ होता. पण इंग्रजी शिपायांनीं या विनवणीकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. त्यांनीं किल्ल्यांतील तीनशें लोकांपैकीं दीडशें लोकांची कत्तल केली व बाकीच्यांना कैदेंत टाकलें. किल्ल्यांत कांहीं घोडेस्वार होते ते मात्र शत्रू जवळ येतांच पळून गेले, यामुळें वांचले. बाकीच्या लोकांना देहान्त प्रायश्चित्त किंवा कैदेची शिक्षा भोगण्याचा प्रसंग आला. या हल्ल्यांत इंग्रजांकडील फक्त सात लोकांना थोड्याशा जखमा झाल्या; पण प्राणहानि मुळींच झाली नाहीं.

पिनागरची पेठ हस्तगत करतांना इंग्रजी शिपायांनीं शरणागतांची कत्तल करण्याचें जें अश्लाघ्य काम केलें त्याच्या दोषांतून सोडविण्यासाठीं इंग्रजी ग्रंथकारांनीं एक सबब पुढें केली आहे. किल्ल्यांतील लोकांनीं इंग्रजांच्या हरकाऱ्यांवर अनेकवार गोळ्या झाडल्या आणि तहाचें निशाण फार उशिरां उभें केलें अशीं दोन कारणें या इतिहासकारांनीं इंग्रजी सैनिकांच्या पापक्षालनार्थ पुढें केलीं आहेत; पण हीं दोनही कारणें लंगडीं आहेत. हरकाऱ्यांवर गोळ्या झाडल्या ही सबब सर्वच ठिकाणीं स्वपक्षसमर्थनार्थ पुढें करण्यांत येते व तिच्या योग्यायोग्यतेचा निर्णय

करणें फार कठीण असतें. पण एकहि शिपाई ठार न होतां इंग्रजी सैन्य शिड्यां-वरून आंत येऊन खुशाल दरवाजे उघडूं शकलें व हा प्रकार दोन वेळां झाला. यावरून आंतील लोक किल्ला लढविण्याच्या कामीं कुचराई करीत होते, हें उघड आहे. या कुचराईचें कारण नामर्दपणा हें असो किंवा फितूर हें असो, कांहींहि असलें तरी आंतील लोकांची कत्तल करण्याचें कारण नव्हतें. शरणागतांना जीवदान दिल्यानेंच इंग्रजी शिपायांचें शौर्य खुलून दिसलें असतें.

यानंतर मॅक्सवेल बारामहालच्या दक्षिणेकडील भागाचा बंदोबस्त करून कावेरीपट्टणच्या बाजूस वळला; आणि ७ नोव्हेंबर रोजीं त्यानें कृष्णगिरीस वेढा दिला. हा किल्ला बळकट असून पुष्कळ श्रीमान लोक आश्रयार्थ तेथें आले होते. इंग्रजांचें सैन्य जवळ येतांच हे लोक किल्ल्याच्या खालच्या भागांतून वरच्या भागांत सुरक्षित ठिकाणीं जाऊं लागले. हें पाहून तावडतोब हल्ला करून त्यांना ताब्यांत घेण्याचा मॅक्सवेलनें निश्चय केला. रात्रीं दाहा वाजतां त्यानें किल्ल्यावर हल्ला करण्याचा हुकूम सोडला. इंग्रजी सैन्याच्या तीन टोळ्या करून दोन टोळ्यांनीं आडवाटेनें जाऊन बाजूंनीं हल्ला करावा व एका टोळीनें समोरून तटावर चालून जावें असा मॅक्सवेलच्या व्यूहाचा इत्यर्थ होता.

उजव्या व डाव्या बाजूस पाठविलेल्या टोळ्या गुप्तपणें जाऊन पेठेंत शिरल्या व भिंती चढून त्यांनीं आंत उड्या घेतल्या व वेशीचा दरवाजा देखील त्याच वेळीं उघडण्यांत आला. अर्थात सैन्याचा आंत प्रवेश होण्यास फारसे प्रयास पडले नाहींत. दरवाजाजवळ जमलेल्या किल्ल्यांतील लोकांना जेव्हां दोन्ही बगलांकडून शत्रूचे लोक आंत येत आहेत असें दिसलें तेव्हां त्यांना वेशीजवळ झगडा करण्यांत अर्थ नाहीं असें दिसून आलें. यामुळें तो तट सोडून ते मागें फिरले. पाहिऱ्या चढून बाले किल्ल्याच्या वेशीपर्यंत ते जाऊन पोंचतात न पोंचतात तोंच इंग्रजांनीं जलदी करून तेथेंहि आंत शिरण्याचा घाट घातला. कॅप्टन वॅलेस यानें धाऊन जाऊन किल्लेकऱ्यांचें निशाण हिसकाऊन घेतलें आणि तो आंत शिरणार इतक्यांत किल्ल्याचा दरवाजा बंद झाला. इंग्रजी सैन्याच्या आघाडीचे शिपाई अगदीं शेवटच्या पाहिरीवर पोंचले होते व आपणास आंत शिरण्यास मिळणार याबद्दल त्यांना मुळींच शंका नव्हती. यामुळें त्यांनीं बरोबर शिड्या घेतल्या नव्हत्या. पण आयत्या वेळीं दरवाजा बंद होऊन वरून मोठमोठ्या दगडांचा वर्षाव होऊं लागला तेव्हां त्यांची धांदल उडाली.

त्यांनीं तितक्याहि गडबडींत शिड्या आणवून तटाच्या भिंतीस त्या लावण्याचा प्रयत्न केला. पण शिडी लावतांच वरच्या लोकांनीं भली मोठी शिळा फेंकून शिडी मोडून टाकण्याच्या कामीं फार चलाखी दाखविली. त्यांतून चांदणी रात्र असल्यामुळें वरच्या शिपायांना खालीं चाललेल्या हालचाली स्पष्टपणें दिसत व त्यांवर तोंड करण्यास त्यांना अनुकूलताही चांगली होती. अशा प्रकारें दोन तास झटापट झाल्यावर पुष्कळ अधिकारी व शिपाई दगडांच्या माऱ्यानें मृत्युमुखीं पडल्याचें पाहून मॅक्सवेलला हल्ल्याचें काम तहकूब करून शिपायांना परत फिरण्याचा हुकूम देणें भाग पडलें. त्यांची पिछेहाट होत असलेली पाहून किल्यांतील कांहीं लोकांनीं त्यांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. पण इंग्रजी शिपायांचा बंदुकीचा मारा जबर असल्यामुळें या पाठलाग करणाऱ्या टोळीच्या हातून फारसें काम झालें नाहीं. इंग्रजी सैन्य परत शहरांत पोंचतांच त्यानें तेथून पाय काढण्याचें ठरविलें. कारण उजाडतांच शत्रूनें तोफेचा मारा सुरू केल्यावर पेठेंत राहून निभाव लागण्याजोगा नव्हता. पण तेथून जाण्यापूर्वीं इंग्रजी सैन्यानें पेठेस ठिकठिकाणीं आग लावण्याचा प्रयत्न केला. पण नुकताच पाऊस झाला होता यामुळें आगीचा फैलाव झपाट्यानें होण्याचें लक्षण दिसेना. तेव्हां तोहि नाद सोडून पहांट होण्यापूर्वीं इंग्रजी सैन्य तेथून निघून गेलें.

मॅक्सवेलला (कृष्णगिरीवर केलेल्या) या हल्यांत पेठ हस्तगत होईपर्यंत चांगलें यश आलें; पण बाले किल्यांत शिरण्याचें काम ऐनवेळीं करतां आलें नाहीं ही गोष्ट नमूद करतांना इंग्रजी ग्रंथकारांनीं बरीच लटपट केली आहे. ती हास्यास्पद असून खरें कारण निराळेंच होतें असें तत्कालीन एका अस्सल मराठी अप्रकाशित पत्राच्या सहाय्यानें म्हणतां येतें.

कृष्णगिरीची पेठ हस्तगत करून तिचा नाश करावयाचा, तेथें काय लूट मिळेल ती घ्यावयाची व परत फिरावयाचें, किल्ला हस्तगत करण्याच्या भानगडींत पडावयाचें नाहीं असा मॅक्सवेलचा प्रथमपासून संकल्प होता असें इंग्रजी ग्रंथकार म्हणतात. परंतु द्राक्षें मिळालीं नाहींत म्हणजे तीं आंबट आहेत असा पुकारा करण्यांतलाच हा उघड उघड प्रकार दिसतो. किल्ला हस्तगत होण्याचा संभव नाहीं अशी जर मॅक्सवेलची पूर्वींच अटकळ होती तर त्यानें पहिला तट ओलांडण्याची खटपट तरी कां केली ? आणि बाले किल्याच्या वेशीच्या पाहिरीपर्यंत शिपायांना नेऊन त्यांना व्यर्थ मृत्युमुखीं कां पाडलें ? खरा प्रकार असा होता कीं, किल्यांतील कांहीं

लोक फितूर झाले होते. त्यांच्या सहाय्यानें किल्ला हस्तगत होईल अशी मॅक्सवेलची अटकळ होती. त्याप्रमाणें पहिला दरवाजा उघडण्यापर्यंत घडलें देखील. परंतु आयत्या वेळीं फितुराची बातमी किल्लेदारास लागल्यामुळें त्यानें तातडीनें फितुरी लोकांचा बंदोबस्त केला व बाले किल्याची वेस बंद करून तटावरून दगडांचा मारा केला. यामुळें मॅक्सवेलच्या ओठावरचा घास खाली पडला. १७९१ दिसेंबर १४ तारखेस कार्नवालिस व हरीपंत यांच्या लष्करांत राहणाऱ्या बाळाजी रघुनाथ नांवाच्या बातमीदारानें या प्रसंगाची हकीकत चार वाक्यांत यथायोग्य रीतीनें सांगितली आहे. तो म्हणतो " इंग्रजांकडील पांच पलटणें पेशजी कृष्णगिरीकडे गेलीं होतीं. त्यांनीं घाटाखालीं पिनागर पेठ मारली. कृष्णगिरींत फितूर केला. किल्लेदारास वर्तमान समजलें. फितुरी होते त्यांचें पारिपत्य केलें. हल्ला मारून कहाडला. तीनशें इंग्रज गोरे ठार झाले. तेथून निघून लष्करांत बेंगरूळचे नजीक (लष्कराचा) मुकाम होता तेथें आले. "

यावरून किल्ला हस्तगत करण्याच्या वेळीं इंग्रजी शिपाई बेधडकपणें तटावर चालून जात व त्यांच्यापैकीं फारच थोडे लोक कामास येत याचें श्रेय इंग्रजी ग्रंथकारांनीं या शिपायांच्या निधड्या छातीकडे दिलें आहे तें कांहीं प्रसंगापुरतें तरी चुकीचें असून किल्यांतील लोकांत फितूर झाले असल्यामुळें एकहि मनुष्य जखमी न होतां इंग्रजी शिपायांना तट चढून आंत उड्या टाकण्याचें श्रेय मिळत होतें असें म्हणावें लागतें. निदान तत्कालीन विश्वसनीय मराठ्यांच्या बातमीदाराचा तरी अभिप्राय अशा प्रकारचा दिसतो एवढें निर्विवाद आहे.

वर सांगितलेल्या अप्रकाशित पत्रांत या वेळच्या आणखी एक दोन मनोरंजक बातम्या दिल्या आहेत त्या अशा–(बेंगरूळ) " किल्यांतील जरबा (= तोफा) थोर आठरा वीस काहाडोन रोगण देऊन बार करोन इंग्रजांनीं पाहिल्या. समागमें घेतल्या. चेनापटणाहून (= मद्रासेहून) रस्त आली. त्याबरोबर पंचवीस तोफा थोर आहेत. दारू, गोळा, सरंजाम, धान्य वगैरे एका वरशाची बेगमी समागमें करोन घेतली आहे. त्यापैकीं शेरभर धान्य परवानगीशिवाय कोणास प्राप्त होणार नाहीं ऐसी त्यांची कैद (= शिस्त) आहे. राजश्री (हरीपंत) तात्या यांचे शरीरास दिपवाळीपासून समाधान नाहीं. पोट दुखतें. ज्वर येतो. आतां प्रकृत बरी आहे.

उभयतां इंग्रज (= कॉर्नवालीस व मेडोज) परामर्शास आले होते. त्याणीं दुरबीण येक व घड्याळ येक व दुरंगी सकलाद येणेप्रमाणें दिलीं. ”

टिपूसंबंधींची या पत्रांतील बातमी देखील मौजेची आहे. ती अशी–“ टिपू सुलतान आपल्या जमावानिशीं पट्टणापासून (दोन) कोस उत्तरेस आहे. तीनशें ब्राह्मण अनुष्ठानास घातले (आहेत.) ते नित्य श्रीरंगस्वामी व श्रीगंगाधरेश्वर व नरसींव स्वामी यांचे देवळांत अनुष्ठानास बसतात. दर असामीस दररोज दोन होन दक्षणा द्यावी येणेंप्रमाणें करार शत्रु पराजय व्हावयासीं होत आहे. ” यावरून अड-चणीच्या वेळीं तरी टिपू हिंदूंच्या देवांवर भार टाकीत होता असें दिसतें. मग हें करणें श्रद्धापूर्वक होतें किंवा आपल्या प्रजेच्या धार्मिक कल्पना न दुखविण्यासाठीं तो हें सर्व ढोंग करीत होता हें समजण्यास मार्ग नाहीं.

या ठिकाणीं दक्षिण हिंदुस्थानांतील थोडीशी भूगोलिक माहिती देणें अवश्यक आहे. कृष्णेच्या दक्षिणेस रामेश्वरापर्यंत जो त्रिकोणाकृति प्रदेश मलबार व कारो-मांडेलचा किनारा यांमध्यें सांपडला आहे त्याचें क्षेत्रफळ एक लक्ष चाळीस हजार चौरस मैल आहे. त्यापैकीं गुंतूर सरकार व कर्नाटक पाइनघाट हे इंग्रजांच्या प्रत्यक्ष ताब्यांत होते; व तंजावर, त्रिचनापल्ली, तिनवेल्ली व त्रावणकोर येथील संस्थानि-कांच्या ताब्यांतला प्रदेश इंग्रजांच्या वर्चस्वाच्या छायेखालीं आलेला होता; मिळून सरासरी पन्नास हजार चौरस मैलांवर इंग्रजांची सत्ता होती. कर्नूस, रायचूर वगैरे निजामाच्या ताब्यांतले महाल होते त्यांचें क्षेत्रफळ चार हजार चौरस मैल होतें. याशिवाय सावनूरचा नवाब, कुर्गचा राजा व मलबारकडील बाला–घाटाच्या बाजूचे किरकोळ संस्थानिक यांच्या ताब्यांतल्या प्रदेशाचें क्षेत्रफळ साहा हजार चौरस मैल भरलें असतें. मिळून टिपूच्या साक्षात अमलाखालीं असलेल्या प्रदेशाचें क्षेत्र सरासरी ८०००० ऐंशीं हजार चौरस मैल असावें. या प्रदेशाची उत्तरसीमा कृष्णानदी व दक्षिणसीमा कावेरीनदी अशा होत्या. कृष्णानदी व तुंगभद्रा यांच्या संगमाजवळ दक्षिणेकडे तोंड करून उभें राहिलें असतां परशुरामभाऊंनीं व्यापलेला प्रदेश उजव्या हातास व निजामानें जिंकलेला प्रदेश डाव्या हातास दिसला असता. याशिवाय पूर्वेस बारा महाल, पश्चिमेस समुद्रकिनारा आणि दक्षिणेस कोइमतूर वगैरे महाल इंग्रजांच्या हस्तगत झाले होते. अशा रीतीनें अर्धें अधिक राज्य शत्रूच्या ताब्यांत गेल्यामुळें टिपूच्या नाड्या आंखडत चालल्या होत्या. पण त्यानें अशाहि प्रसंगीं धीर

न सोडतां दोस्तांचीं सैन्यें एकवटण्याच्या कामीं शक्य तितकी खटपट चालविली होती. निजामाचा मुक्काम रायचुराच्या पूर्वेस पन्नास मैलांवर पानगल येथें होता. तेथून दक्षिणेस गुंती ८० मैल, व गुंतीहून गंजीकोटा ५० मैलांवर आणि गंजीकोटयाहून गुरमकोंडा ७५ मैलांवर होता. मिळून पानगलाहून सरासरी दोनशें मैलांपर्यंतचा टापू मोंगली सैन्यानें व्यापला होता. पण या प्रदेशांतील सर्वच किल्ले त्याच्या हस्तगत झाले नव्हते. टिपूच्या सरदारांनीं किल्ले लढविण्याचें काम या भागांत चिकाटीनें चालविलें; यामुळें निजामाच्या सैन्याचा पाय या प्रदेशांतून लौकर निघेना. तुंगभद्रेच्या पश्चिमेस मराठ्यांची देखील अशीच स्थिति होती; पण कार्नवालिसला श्रीरंगपट्टणला वेढा देण्याची घाई असल्यामुळें तो मोंगल व मराठे यांना दक्षिणेंत येण्याबद्दल एकसारखा तगादा करीत होता.

हा तगादा करण्याचें कारण कार्नवालिसला या वेळीं युद्ध लौकर केव्हां एकदांचें संपेल असें झालें होतें. या वेळीं त्यानें आपल्या स्नेह्याला लिहिलेल्या एका पत्रांत " हें प्रकरण इतकें लांबणार असें कळलें असतें तर मी त्रावणकोरच्या रामराजाला डचांकडून किल्ले विकत न घेण्याबद्दल सल्ला दिला असता " अशा अर्थाचा मजकूर लिहिला होता. यावरून त्याची मनःस्थिति ताडतां येते. त्याचप्रमाणें विलायतेंतून कंपनीच्या चालकांनीं पाठविलेल्या खलीत्यांत कार्नवालिसची पाठ थोपटली होती तरी प्रसंगीं तोटा सोसून देखील टिपूशीं चाललेलें युद्ध बंद करून त्याच्याशीं तह करण्याबद्दलचा इषारा देण्यांत आला होता. मराठे व निजाम यांची तर ओढगस्त बोलावयासच नको. तीं त्या वेळच्या प्रत्येक पत्रांतून चांगलीच निदर्शनास येते.

अशा रीतीनें टिपूचें व दोस्तांचीं मनें युद्ध संपविण्यासाठीं आतुर झालीं होतीं तरी कार्नवालिसजवळ या वेळीं पैशाचा भरभक्कम पुरवठा असल्यामुळें त्याला हताश होण्याचें कारण नव्हतें. एका पैशाच्या जोरावर कंटाळलेल्या माणसांत उत्साह भरण्याचें व नवीन माणसें उभीं करण्याचें काम आपणास करून दाखवितां येईल अशी त्याला विचाराअंतीं खात्री वाटत होती. आणि अमेरिकेंत वाशिंगटनला शरण जाऊन त्याच्या नांवास लागलेला काळिमा धुवून टाकण्यास व विलायतेंत उजळ माथ्यानें वावरण्यास त्याला टिपूचा पराभव करून विजयश्री मिळविल्यावांचून गत्यंतर नव्हतें. कार्नवालिस लढाईच्या दगदगीनें कंटाळला होता; पण लोकांच्या डोळ्यांत भरण्याजोगा विजय मिळाला नाहीं तर पुढचें सारें आयुष्य स्वदेशांत कोनाकोपऱ्यांत

बसून चालवावें लागेल असें त्याचें मन त्यास सांगत होतें. यामुळें त्यानें कंटाळा बाजूस सारून, निरलसपणें युद्धाची कसून तयारी केली. आणि त्या वेळीं प्रसंगच असा आला होता कीं, कंटाळा येण्याजोगी परिस्थिति असली तरी तिचा पगडा मनावर बसूं न देतां जो पक्ष चिकाटीनें युद्ध चालवील त्यास विजयश्रीनें माळ घातली असती. सारांश, पैशाचा जोर व अपयश धुवून टाकण्याची जबर महत्त्वाकांक्षा या दोन कारणांमुळें कार्नवालीसला या युद्धांत टिपूवर जय मिळवितां आला.

भाग १५ वा.

श्रीरंगपट्टणचा वेढा.

निजामाचें व इंग्रजांचें सैन्य एकत्र झाल्यानंतर दोस्तांचें सैन्य श्रीरंगपट्टणच्या शेवटच्या मोहिमेसाठीं निघण्याचें ठरलें. त्यापूर्वीं आपल्या सैन्याची कवाईत एक वेळ मराठे व निजाम यांना दाखविण्याची कॉर्नवालिसची फार इच्छा होती ती त्यानें पुरवून घेतली. चार महिन्यांपूर्वीं हा बेत आयत्या वेळीं-मराठे सरदारांनीं हत्तीवरून येतां कामा नये अशा किरकोळ मुद्यावर मतभेद उपस्थित होऊन—बिनसला होता; पण आतां मराठे व निजाम हत्तीवरून आल्यास आपली कांहीं हरकत नाहीं असें कॉर्नवालिसनें कबूल केलें असल्यामुळें इंग्रजी सैन्याची कवाईत हरीपंतानें पहाण्याचा योग जुळून आला. इंग्रजी सैन्याचे तीन विभाग करून त्यांची तीन टेकड्यांवर चतुष्कोणाकृति मांडणी करण्यांत आली होती. या सैन्यानें चार मैल लांबीचा प्रदेश व्यापला असून निजाम, हरीपंत फडके, कडापाचा नबाब वगैरे खाशी मंडळी सालंकृत हत्तीवर बसून उत्तमोत्तम घोड्यांवर आरूढ झालेल्या सरदारांसह इंग्रजी सैन्याच्या उजव्या बगलेपर्यंत येतांच २१ तोफांची सलामी देण्यांत आली व मोर्चे-

स्वारांच्या टोळीनें नागव्या तरवारींची कवाईत करून स्वागत केलें. या सैन्याकडे ही खाशी मंडळी कांहीं वेळ लक्षपूर्वक पहात उभी होती. नंतर शिपायांच्या पायदळाजवळून जलद पावलें टाकीत ही मंडळी गोऱ्या सैन्याजवळ आली. त्यांचा एकजात पोषाख व शिस्त बारकाईनें पाहिल्यानंतर संध्याकाळीं पांच वाजण्याच्या सुमारास ही मंडळी परतली. नंतर कॉर्नवालिसच्या तंबूंत जाऊन सैन्याच्या व्यवस्थितपणाची तारीफ करण्यांत आली व दुसऱ्या दिवशीं कुच करण्याची वेळ ठरवून सर्वजण परत आपापल्या तळावर गेले.

नंतर फेब्रुवारी १ तारखेस दोस्तांचीं सैन्यें हुलिदुर्गाहून श्रीरंगपट्टणच्या शेवटच्या मोहिमेसाठीं निघालीं. आघाडीस इंग्रजी सैन्य व पिछाडीस मराठ्यांचें व निजामाचें सैन्य उभें करून ही सेना चालूं लागली. इंग्रजी सैन्यानें मध्यभागीं अवजड तोफा, उजव्या बाजूस पायदळ व जेजाला आणि डाव्या बाजूस सामानसुमानाचे हत्ती, उंट, बैल व बाजारबुणगे अशी मांडणी केली होती. सैन्याच्या हालचाली करतांना कोणता भाग कोणीकडे असावा याची व्यवस्था या वेळीं जी ठरली ती पुढें बरींच वर्षेपर्यंत इंग्रजी सेनापतींना उपयोगी पडली. यापूर्वीच्या लढायांतून इंग्रजी सेनापतींची भिस्त बहुतेक पायदळावर असे. तोफांचा उपयोग केला तरी तो जितक्यास तितकाच; आणि पुढें चाल करून जातांना तोफांना अग्रस्थान देण्यांत येत नसे. पहिल्या मोहिमेच्या वेळीं इंग्रजी सैन्य एका सडकेवरून गेलें; आणि त्या वेळीं तोफा अगदीं मागल्या बाजूस चालत होत्या; पण तोफा इतक्या अवजड असत कीं, आघाडीचीं माणसें मुक्कामाच्या जागीं पोंचलीं तरी तोफा तळावर येऊन पोंचण्यास कधीं कधीं एक दोन दिवस लागत. आणि त्यानंतर पिछाडी यावयाची ! यामुळें मुक्कामाच्या जागीं परत सैन्य येईपर्यंत बरीच अव्यवस्था होई व कोण कोठें आहे याचा बरोबर पत्ता लागत नसे. शिवाय इतक्या लांबवर बारीक दोरीप्रमाणें पसरलेल्या या सैन्यावर शत्रूचा हल्ला होण्याची भीति फार असे. यामुळें दुसऱ्या मोहिमेंत तोफखाना मध्यभागीं घेऊन सैन्याची हालचाल करण्यांत आली. पण यामुळें पुढचा भाग व मागला भाग यांचा मेळ बसेना. नंतर तोफखाना सैन्याच्या आघाडीस चालविण्याची कल्पना निघाली व थोड्या अनुभवानें तिच्यांत सुधारणा होऊन तोफखान्याचा रस्ता निराळा असावा व त्याच्या दोनही बाजूंस स्वतंत्र रस्ते तयार करून सैन्याच्या हालचाली कराव्या म्हणजे सर्व काम व्यवस्थित

चालतें असें ठरलें. यापूर्वीं इंग्रजी सैन्यांत तोफा बोजड व थोड्या होत्या, यामुळें हा प्रश्न सोडविण्याची तादृश आवश्यकता भासली नव्हती; पण आतां श्रीरंगपट्टण-सारख्या जबरदस्त किल्ल्यावर मारा करण्यास जावयाचें तर तोफा पल्लेदार व विपुल असल्याशिवाय काम भागणार नाहीं असें दिसल्यामुळें व कॉर्नवालिसला सर्व गोष्टी अनुकूल असल्यामुळें या वेळीं तोफखान्याची तयारी इंग्रजांनीं चांगली केली होती.

या मोहिमेंत इंग्रजी सैन्याजवळ ८६ तोफा होत्या; पैकीं ५८ पंचरसी व २८ लोखंडी होत्या. त्याचप्रमाणें घोडेस्वार ११ शें, तोफखान्यावरचे लोक ४२ शें, पायदळ १५॥ हजार व इतर इंजिनियर व मजूर मिळून हजार बाराशें लोक होते. एकूण लढण्यासाठीं रणांगणावर निघालेल्या इंग्रजी सैनिकांची संख्या २२ हजार असून त्यांत ६ हजार गोरें व १६ हजार काळें सैन्य होतें. मराठ्यांच्या सैन्यांत घोडेस्वारांचाच मुख्यतः भरणा होता. त्यांची संख्या अजमासें १२ हजार होती. निजामाच्या सैन्यांत १८ हजार घोडेस्वार असावे असें इंग्रजी ग्रंथकार म्हणतात. एकूण दोस्तांचें या वेळचें प्रत्यक्ष लढाऊ सैन्य ५० पासून ६० हजार पर्यंत असावें. यांत संख्येच्या दृष्टीनें मराठ्यांचा नंबर शेवटचा होता. हरीपंताने यासाठीच परशुरामभाऊस लौकर येण्याविषयीं पत्रावर पत्रें लिहिलीं होतीं; पण त्यांचे सैन्य वेळेवर येऊन पोचलें नाहीं. यामुळें शेवटच्या मोहिमेंत कॉर्नवालिसला संख्या व सामुग्री या दोन्ही दृष्टीनें इंग्रजी सैन्य महत्त्वाचें आहे असें दाखवितां आलें; इतकेंच नव्हे तर पूर्वीच्या दोन मोहिमेंत मराठे व निजाम यांची मनधरणी करणारे इंग्रजी सेनापति यश घेण्याची वेळ आली तेव्हां मराठी व मोंगली सैन्याकडे महत्त्वाची कामगिरी देखील सोंपविण्यास तयार नव्हते!

हुलिदुर्गापासून दोस्तांच्या सैन्याची आघाडी सहा मैलांवर मद्दूर नदीच्या कांठीं आली तेव्हां पलीकडच्या तीरावर टिपूचे कांहीं घोडेस्वार दृष्टीस पडले. तेव्हां शत्रूनें आपल्या सैन्यास अडविण्यासाठीं येथपासून तयारी केली असावी अशा अंदाजावर इंग्रजी तोफखाना उभा करण्यांत आला; परंतु शत्रूचे हे टेहेळणीचे स्वार होते. ते फक्त बातमी काढण्यासाठीं पुढें आले असून एवढ्या मोठ्या व सर्व प्रकारच्या सामुग्रीनिशीं चालून आलेल्या दोस्तांच्या सैन्याशीं थोड्या थोडक्या घोडेस्वारांनीं तोंड देणें शक्य नव्हतें. असें करण्यापासून टिपूस कांहीं एक फायदा न होतां दोस्तांच्या सैन्यास हुरूप चढण्यास मात्र किरकोळ चकमकी कारणीभूत झाल्या

असत्या. शत्रुसैन्याकडून नदीच्या उताराजवळ कोणत्याहि प्रकारचा प्रतिबंध न झाल्यामुळें दोस्तांचीं सैन्यें नदीपार झालीं; व दुसऱ्या दिवशीं त्यांनीं करिकोड येथें तळ दिला. नंतर थोड्या तोफा तेथें ठेवून हें प्रचंड सैन्य ५ फेब्रुवारी रोजीं मेलकोट येथें दोन प्रहरीं तीन वाजण्याच्या सुमारास श्रीरंगपट्टणापासून सहा मैलांवर येऊन पोंचलें.

मागें सांगितलेले टिपूचे घोडेस्वार दोस्तांच्या सैन्याची टेहेळणी करीत मागें हटत; आणि त्यांची सूचना येतांच खेड्यापाड्यांतील सर्व लोक सामानसुमानासुद्धां राजधानीकडे आश्रयासाठीं जात. इतकेंच नव्हें, तर त्या प्रदेशांतील सर्व भाग उध्वस्त करून इतका भयाण करून टाकण्यांत आला होता कीं, प्राणी तर राहोच, पण वनस्पति देखील तेथें दिसत नव्हत्या. झाडेंच तोडलीं होतीं असें नव्हे, तर त्यांचीं पाळेंमुळें देखील खणून काढण्यांत आलीं होतीं. यामुळें दोस्तांच्या सैन्यास नदीकिनाऱ्यावर तळ देणें भाग होतें.

दुसऱ्या दिवशीं कांहीं इंजिनियर व जनरल मेडोज यांनीं दोन प्रहरच्या सुमारास दुर्बिणीच्या सहाय्यानें टिपूच्या सैन्याची पहाणी केली. तेव्हां त्यांना त्याच्या मांडणीची कांहींशी कल्पना आली ती अशी:—

श्रीरंगपट्टणचा किल्ला कावेरी नदीच्या दोन फाट्यांनीं बनलेल्या एका खडकाळ बेटावर बांधलेला होता. त्याच्या उत्तरेस टिपूच्या सैन्याचा तळ पडला असून तळाचें तोंड आग्नेयीस होतें. दोस्तांचीं सैन्यें व टिपूचें सैन्य यांमध्यें लुकणी नदी वहात होती. शिवाय एका जबरदस्त कांटेरी कुंपणाचा आश्रय आंतील सैन्यास होता. हें कुंपण बांबूचीं दाट बेटें व निवडुंगाची लागवड यामुळें चांगलेंच अभेद्य बनलें होतें. निदान साध्या घोडेस्वारांचा तरी त्यांतून शिरकाव होणें अशक्य होतें. अशा रीतीनें एका अंगानें हें कांटेरी कुंपण व दुसऱ्या अंगानें कावेरी नदी यांच्या दरम्यानच्या या पटांगणाची लांबी तीन मैल व रुंदी पाउण मैल होती. पैकीं पूर्वेकडचा प्रदेश सखल असून त्यांत आसपासचे लोक आश्रयासाठीं येऊन राहिले होते; आणि पटांगणाचा पश्चिमभाग खडकाळ व उंच असून तेथें टिपूनें सहा बुरूज बांधून तोफांची मांडणी केली होती. त्यांचा मारा दूरवर होण्याजोगा होता. या तोफांची संख्या शंभरपर्यंत असून या किल्ल्याबरील सर्व सैन्य व तोफा सय्यद हमीद व सय्यद गफूर नांवाच्या दोन विश्वासू सरदारांच्या हुकमतीखालीं देण्यांत आल्या होत्या.

शिवाय व्हिजी नांवाच्या फ्रेंच अधिकाऱ्यानें तयार केलेली गोऱ्या लोकांची तुकडी देखील याच ठिकाणीं होती. या पटांगणाच्या उजव्या म्हणजे पूर्वेकडील बाजूस देखील लुकणी नदी व एक कालवा यांचा आसरा असून त्यापलीकडे उंच टेकड्या होत्या; व त्यांवर तोफा असून शेख अनसर नांवाच्या अनुभविक योद्ध्याची तेथें नेमणूक झाली होती. स्वतः टिपूनें मध्यभागाची व्यवस्था आपणाकडे घेतली असून त्याचा तंबू सुलतानबुरुजाशेजारीं ठोकलेला होता.

श्रीरंगपट्टणच्या संरक्षणार्थ टिपूनें या वेळीं जी तोफांची व सैन्याची रचना केली होती तिचें पंचवीस वर्षांपूर्वी मराठ्यांच्या आधिपत्याखालीं याच दोस्तांनीं दिलेल्या वेढ्याच्या वेळीं हैदरानें केलेल्या व्यूहाशीं साम्य होतें; व तेव्हांप्रमाणें याही वेळीं आपणांस दोस्तांना हरवितां येईल अशी टिपूस उमेद वाटत असली पाहिजे असा डिरोमनें तर्क करून मागल्या वेढ्याचे वेळीं हैदराच्या तोफांपुढें मराठे व निजाम यांचा निभाव न लागल्यामुळें त्यांनीं इंग्रजांना आयत्या वेळीं कसें तोंडघशीं पाडलें व शेवटीं मद्रास येथें १७६९ मध्यें हैदरापुढें इंग्रजांना मानहानि पत्करून तह कसा कबूल करावा लागला याची हकीकत दिली आहे. * वास्तविक रीत्या

---

* It appears that the Confederate forces drew off after receiving the first discharge of cannon from Hyder's lines and judging it was impracticable to force a position of such strength they differed on the plan to be adopted for the further prosecution of the war. The grain brought forward by the brinjarries was soon exhausted; and in want of forage from the desolate state of the country the Mahrathas were bought off by Hyder and withdrew from the siege. The Nizam apprehensive for his safety also agreed to a separate negotiation which not only terminated their hostilities but ended in uniting their forces to exterminate the English from the Carnatic. The Nizam did not continue steady in this alliance but the consequence was a ruinous invasion of the Carnatic; and although ably opposed by General

[पुढें चालू.

दोस्तांनीं श्रीरंगपट्टणाभोंवतीं दिलेल्या या दोन वेढ्यांत साम्य फार थोडें होतें व परिस्थिति अगदीं भिन्न होती; आणि दोन्ही वेळीं मराठ्यांना यश लाधलें व इंग्रजांना मात्र पंचवीस वर्षांपूर्वी हैदरानें सांगितलेल्या अटी कबूल कराव्या लागल्या, याचें कारण त्या वेळीं मराठ्यांची सत्ता इतर सर्वांपेक्षां डोईजड होती व इंग्रज त्या वेळीं नुकतेच व्यापारी पेशा सोडून तरवार हातीं धरूं लागले होते; पण ते शब्दाचे धड नाहींत अशी इतरांची खात्री असल्यामुळें कोणीही त्यांच्या मदतीस धांवून गेलें नाहीं. अर्थात इंग्रजांचा कमकुवतपणा व हेस्टिंग्जच्या वेळीं इंग्रजी अधिकाऱ्यांत असलेला आपसांतला बेबनांव हैदराच्या पथ्यावर पडला; आणि मराठे जबरदस्त असल्यामुळें त्यांना चौथाई देण्याचें हैदरास कबूल करावें लागलें असा वास्तविक प्रकार आहे. पण तो दृष्टिआड करून मूरनें या वेळच्या इंग्रजांच्या अपयशाचें खापर मराठ्यांच्या द्रव्यलोभावर व निजामाच्या भित्रेपणावर फोडलें आहे; पण तें सर्वस्वीं निराधार आहे. खरें पाहतां या वेळची हकीकत देतांना मध्येंच हें प्रकरण घुसडण्याची जरूर नव्हती; पण डिरोमनें मराठ्यांना दोष देण्यासाठीं काल्पनिक हकीकत देऊन हा आगंतुक भाग आपल्या ग्रंथांत आणला आहे; व श्रीरंगपट्टणच्या स्वारीची हकीकत देतांना डिरोमचा ग्रंथ नंतरच्या ग्रंथकारांनीं आधारभूत मानल्यामुळें त्यांनाही मराठ्यांविषयीं निंदाप्रचुर वाक्यें नमूद करणें ओघानेंच प्राप्त झालें आहे. यास्तव त्यासंबंधीं थोडीशी हकीकत येथें देणें आवश्यक आहे.

नानासाहेबांच्या कारकीर्दींत व माधवरावांच्या वेळीं देखील दक्षिण हिंदुस्थानांत मराठ्यांची सत्ता सर्वश्रेष्ठ मानण्यांत येत होती. त्याला विरोध करण्याचें सामर्थ्य निजाम व हैदर यांच्या अंगीं कांहींसें होतें. विशेषतः फ्रेंचांच्या मदतीनें निजामाच्या दरबारीं लष्करी तयारी होऊं लागली होती. पण नानासाहेबांनीं अनेक युद्धांत निजामाचा पराभव करून त्याचा जोम नाहींसा केला व फ्रेंचांचें वर्चस्व देखील कमी केलें. पण निजामाला स्वसामर्थ्यानें जगतां न आलें तरी कोणातरी परक्यांच्या सहाय्यानें मराठ्यांचा सूड घेण्याची अनावर इच्छा होती. यामुळें फ्रेंच गेले तेव्हां त्यानें इंग्रजांना जवळ केलें. अशा रीतीनें इंग्रजांचा दक्षिण हिंदुस्थानच्या राजकार-

Joseph Smith concluded in a disgraceful peace which Hyder in 1769 dictated to the British Govt. at the gate of Madras.
Dirom's Narrative p. 133.

णांत प्रवेश झाला. हैदर देखील असाच आपल्या हिमतीवर वेळ पडेल तसें वागून पाऊल पुढें टाकीत होता. तो मराठे, निजाम व इंग्रज या तीघांशींहि झुंजून आपली सत्ता कायम करण्याच्या खटपटींत होता. त्यानें फ्रेंचांना जवळ केलें, पण निजाम जसा फ्रेंचांच्या आधीन झाला होता तसा हैदर नव्हता. त्यानें फ्रेंचांची कवाईत चालू केली तरी फ्रेंच अधिकाऱ्यांना त्यानें डोईजड होऊं दिलें नाहीं; तथापि फ्रेंच व इंग्रज यांच्या मनांतील युरोपांतील परस्परांविषयींचा द्वेषभाव येथें देखील हैदर व इंग्रज यांमध्यें कायमचें वितुष्ट आणण्यास कारण झाला. इंग्रज व हैदर यांची केव्हांही दोस्ती जमूं शकली नाहीं, याचें कारण अर्काटच्या नवाबानें केलेलें कारस्थान असें कित्येक ग्रंथकारांनीं म्हटलें आहे; पण तें चुकीचें असून फ्रेंच व इंग्रज या राष्ट्रांतील शेंकडों वर्षांपासून चालत आलेलें वैमनस्य व स्पर्धा हींच हैदर व इंग्रज यांमध्यें द्वेषभाव वाढण्याचीं मुख्य कारणें होत.

मराठ्यांच्या दरबारांत मात्र इंग्रज किंवा फ्रेंच यांचें वजन माधवरावांच्या कारकीर्दीअखेर फारसें वाढलें नव्हतें. यामुळें ते या दोघांपैकीं कोणाच्याही पक्षास मिळण्यास मोकळे होते. शिवाय त्यांची सत्ता त्या वेळीं इतकी जबरदस्त होती कीं, तिला युरोपियन कवाइतीच्या खुराकावर पोसण्याची आवश्यकता अद्याप भासू लागली नव्हती. माधवरावांनीं हैदर व निजाम यांजबरोबर झुंजून अनेक वेळां जय मिळविला; पण तो पलटणें किंवा तोफखाना यांच्या जोरावर नसून निवळ मराठ्यांच्या अंगवळणीं पडलेल्या देशी युद्धपद्धतीच्या आधारावर मिळविलेला होता.

यामुळें मराठे, हैदर, इंग्रज व निजाम अशी नंबरवारी दक्षिण हिंदुस्थानांतील सत्ताधाऱ्यांची त्या वेळीं लागली असती. तथापि निजामाचा स्वभाव उपद्व्यापी असल्यामुळें तो नेहेमीं दक्षिण हिंदुस्थानांत कलागती लावून आपला फायदा झाल्यास पहावा या खटपटींत असे. हें धोरण त्यानें सोडून द्यावें या हेतूनें माधवरावांनीं निजामाचा दिवाण रुकनुद्दौला याची भेट घेऊन मोंगल व मराठे यांनीं कर्नाटकांतील सर्व राजकारणांची दिशा मुक्रर करीत जावी असें ठरवून घेतलें. या सुमारास इंग्रजांनीं निजामाचा कांहीं मुलूख जबरदस्तीनें ताब्यांत घेतला; तेव्हां त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं निजामानें मराठ्यांशीं कायमच्या दोस्तीचा तह केला. ही बातमी ऐकून इंग्रज घाबरले व त्यांनीं हैदराकडे दोस्ती जमविण्यासाठीं संधान लावलें. पण हैदराच्या मनांत आंग्लद्वेष पक्केपणीं भिनला असल्यामुळें त्यानें हें तहाचें बोलणें मान्य केलें नाहीं.

तेव्हां इंग्रज पुनः निजामाकडे आले. त्याच्याही मनांत मराठे व हैदर यांच्याशीं दोन हात करण्याची हुक्की वारंवार अनावर होत असल्यामुळें त्यानें इंग्रजांशीं तह केला. राजमहेंद्री परगणा इंग्रजांकडेच रहावा व त्याबद्दल इंग्रजांनीं दोन पलटणें व सहा तोफानिशीं निजामअल्ली सांगेल ती चाकरी केली पाहिजे व पावसाळा संपतांच दोघांनीं मिळून हैदरावर स्वारी करून त्याचें राज्य वांटून घ्यावें असें ठरलें. अर्थात हैदराचें पारिपत्य करण्यासाठीं आतां निजामास मराठ्यांच्या मदतीची तादृश आवश्यकता दिसेना; पण हैदराचा बंदोबस्त होईपर्यंत मराठ्यांशीं गोडीगुलाबी दाखवावी आणि नंतर मराठ्यांसही बुडवावें असा निजाम व इंग्रज यांनीं गुप्त बेत केला होता. वरकरणी मात्र निजामानें मराठ्यांस असा निरोप पाठविला कीं, तुम्ही, आम्ही व इंग्रज मिळून हैदराचें पारिपत्य करूं. पण माधवराव अशा भुलथापांनीं फसणारे पुरुष नव्हते. निजामाचा दुटप्पीपणा त्यांच्या सहज ध्यानांत आला व त्यांनीं आपल्याच बळावर हैदरास जेरीस आणण्याचें ठरविलें. मोठें सैन्य जमवून त्यांनीं हैदराचा मुलूख जिंकण्यास सुरवात केली. हैदर श्रीरंगपट्टणांत जाऊन बसला व "मराठ्यांच्या लष्कराची गति खुंटून त्यानें अन्नपाण्यावांचून तडफडून मरावें व त्यास परत जाणें भाग पडावें या उद्देशानें त्यानें तळीं फोडून रिकामीं केलीं व विहिरींतून, ओढ्यांतून निवडुंग टाकून पाणी नासून टाकिलें, वैरणकाडी जाळून टाकली, धान्याचा नाश केला व कांहीं जमीनींत पुरून टाकिलें. वाटेवरचीं गांवें व शहरें उठवून वस्ती व गुरेंढोरें दुसऱ्या प्रांतांत हाकून लावून मुलूख अगदीं ओसाड करून टाकिला." *

पण मराठ्यांनीं या अडचणीस न जुमानतां पंचवीस तीस लाख रुपये उत्पन्नाचा मुलूख दोन तीन महिन्यांत हैदराकडून घेतला; व ते आणखी अधिक मुलूख घेणार असें लक्षण दिसूं लागलें, तेव्हां हैदर तहाचें बोलणें करण्यास तयार झाला. या वेळीं निजामअल्ली रायचुरावरून बल्लारीपर्यंत आला होता व इंग्रज तर अद्याप मद्रासेंतून बाहेरच पडावयाचे होते. पण माधवरावांशीं तह करण्यास हैदर तयार झाला असें दिसूं लागतांच निजाम व इंग्रज हैदराविरुद्ध युद्ध पुकारून यशाचे वांटेकरी होऊं पहात होते; पण माधवरावांना या अशा दोस्तांची वाट पहात बसण्यास फुरसत नव्हती. हैदर खंडणीची रक्कम देईल तर आपण ही मोहीम संपवावी आणि निजाम, हैदर व इंग्रज यांनीं आपसांतले तंटे खुशाल भांडत रहावें असा माधव-

---

* ऐ. ले. सं. पृ० १०५५.

रावांच्या बोलण्याचा रोख दिसला. तो ओळखून हैदर २८ लक्ष रुपये खंडणी देण्यास तयार झाला. पण त्यानें एक अट घातली ती ही कीं, ' महंमदअल्ली व इंग्रज यांज-वर स्वारी करण्याच्या कामीं मराठ्यांनीं आपणास मदत करावी. ' पण या बोलण्यां-तला हैदराचा खरा हेतु एवढाच होता कीं, इंग्रज व मराठे यांचें युद्ध लागलें म्हणजे आपला मुलूख परत घेण्यास आयतीच संधि मिळेल; पण माधवरावांनीं हें बोलणें मान्य न करतां हैदरावरची मोहीम पुढें चालू ठेवली. तेव्हां त्याचा निरुपाय होऊन त्यानें माधवरावांनीं सांगितलेल्या अटी मान्य करून तह केला. तथापि मोंगलास दुखवूं नये या हेतूनें 'त्याची जी खंडणी हैदरानें देणें असेल ती देऊन टाकावी ' असें एक कलम माधवरावांनीं या तहांत घातलें होतें. पण तेवढ्यानें मोंगलाचें समा-धान झालें नाहीं. तो इंग्रजी सैन्याच्या जोरावर हैदराशीं स्वतंत्रपणें लढण्याच्या गोष्टी बोलूं लागला. इंग्रजांच्या जोरावर मराठे व हैदर या दोघांचाही पराभव करावा अशी मोंगलाची इच्छा होती; पण इंग्रज स्वतःची शक्ति ओळखून काम करीत होते. त्यांनीं निजामअल्लीच्या सांगण्याप्रमाणें दोघांनाही दुखविण्याचें नाकारलें. पण " तिघांनीं मिळून हैदरावर मोहीम करण्याचें प्रारंभीं ठरलें होतें. तेव्हां या स्वारींत जो मुलूख व खंडणी मिळाली असेल ती मराठे, निजाम व इंग्रज यांनीं सारखी वांटून घ्यावी " अशी वाटाघाट करण्यासाठीं एक मोंगल सरदार व एक इंग्रजी अंमलदार मराठ्यांकडे आले होते. तेव्हां मराठ्यांच्या दरबारांत त्यांच्या बोलण्याचें वजन मुळींच पडलें नाहीं; इतकेंच नव्हे तर उलट हंसें मात्र झालें ! तात्पर्य, या स्वारींत ज्या तिघांनीं हैदराविरुद्ध सामील होण्याचें कबूल केलें होतें त्यांपैकीं मोंगल व इंग्रज शेवटपर्यंत सामील झाले नाहींत; उलट मराठ्यांनाच बुडविण्याचा त्यांचा बेत होता. यामुळें माधवरावांची या वेळची वागणूक राजनीतीच्याच नव्हे, तर सामान्य नीतीच्या दृष्टीनें देखील अगदीं योग्य होती असें* स्पष्टपणें दिसतें.

---

*या बाबतींत ग्रांडफचा देखील असाच अभिप्राय आहे. This proceeding, therefore, on the part of Mahdoo Rao which has been alluded to as ordinary Mahratta artifice to anticipate this plunder, was a measure perfectly justifiable for the purpose of effecting an important political object and disconcerting the plans of his enemies.

History of the Mahrattas, Vol. II p. 195.

भाग १६ वा.

युद्धाची समाप्ति.

टिपूकडून एकसारख्या चालू असलेल्या तडजोडीच्या बोलण्याकडे लक्ष न देतां कार्नवालिसनें श्रीरंगपट्टणच्या वेढ्याची तयारी चालविली व दोस्तांचीं सर्व सैन्यें ५ फेब्रुवारी १७९२ रोजीं वेढ्याचें काम करण्यासाठीं किल्याजवळ येऊन ठेपलीं. त्याच दिवशीं रात्रीं टिपूचे पहारेकरी व दोस्तांची आघाडी यांमध्यें चकमक झाली; पण त्यापासून कांहींच निष्पन्न झालें नाहीं.

या वेळीं इंग्रजी व मराठी लष्करांत दीड शेराची धारण होती. कार्नवालिसजवळ पैशाचा जोर चांगला, पण सभोंवतालचा मुलूख बेचिराख झालेला व टिपूनें किल्ल्यांत दारूगोळा आणि धान्यसामुग्री चांगल्या रीतीनें सांठवून ठेवलेली; तेव्हां वेढ्याचें काम होईल तितकें लौकर उरकणें कार्नवालिसला आवश्यक होतें. दिवसगत झाल्यास मागल्या वर्षाप्रमाणें सैन्यावर उपासमारीचा प्रसंग येण्याचा संभव होता. शिवाय मराठी व मोंगली सैन्याच्या मदतीवांचून आपणास टिपूशीं लढतां आलें हें दाखवून देण्याची त्याला विशेष उत्सुकता होती.

वस्तुतः असें होणें मराठ्यांच्या व मोंगलांच्या इभ्रतीस कमीपणा आणण्याजोगें होतें. तिघांचीं सैन्यें बरोबरीच्या व स्नेहाच्या नात्यानें श्रीरंगपट्टणास गेलेलीं; तेव्हां ऐन प्रसंगीं म्हणजे शत्रूवर चाल करण्याच्या वेळीं तिघांनाही यशाचे वांटेकरी होण्याचा मान एकसारखा मिळणें न्यायतः प्राप्त होतें. या वेळीं टिपू इतका कचाट्यांत सांपडला होता कीं, त्याला अखेर हार खावी लागणार याबद्दल शंका राहिली नव्हती; तेव्हां शत्रूचा पराभव करून हें यश घेण्यासाठीं तिघांनाही एकसारखीच उत्सुकता लागली असली पाहिजे. पण मराठे व निजाम यांची चौथाईच्या बाबतींत

अंतस्थ कुरबुर सुरू होती व हिची तजवीज करण्यास इंग्रजांची मध्यस्थी उपयोगी पडणार आहे हें दोघांनाही माहीत असल्यामुळें कार्नवालिसचें मन न दुखविण्यासाठीं दोघेही जपत होते. टिपूचें युद्ध संपतांच निजामाशीं मराठ्यांचें युद्ध जुंपलें तर इंग्रजांनीं निदान मराठ्यांच्या विरुद्ध शत्रु या नात्यानें तरी उभें राहूं नये अशी हरीपंताची इच्छा आहे हें कार्नवालिस जाणत होता. त्याचप्रमाणें निजामाच्या दरबारांतील बित्तंबातमी त्याला असल्यामुळें मराठ्यांच्या विरुद्ध लढण्याची हिंमत निजामानें धरली आहे ती इंग्रजी पलटणीच्या जोरावरच आहे हेंही त्यास माहीत होतें. सारांश, आपली मनधरणी करण्यासाठीं हरीपंत व मोंगल टपून राहिले आहेत हें कार्नवालिसनें ओळखलें असल्यामुळें त्याला दोघांनाही न जुमानतां आपलें घोडें पुढें दामटतां आलें. आणि चमत्कार हा कीं, कार्नवालिसनें पदोपदीं दोघांचा अपमान करून आपला हट्ट पुरवून घेतला; तरी दोघेहि राणाचा एक शब्द न काढतां त्याची एकसारखी वाहवा करीत होते! सारांश, इंग्रजांची आपणास पुढें मदत होईल हा भ्रम मराठे व निजाम या दोघांसही होता; आणि कार्नवालिसनें त्यांचा हा भ्रम कायम ठेवल्यामुळें दोघेही कार्नवालिसच्या शब्दास मान तुकवीत होते.

तारीख ६ फेब्रुवारी रोजीं कार्नवालिसनें हरीपंतास अशा अर्थाचा निरोप पाठविला कीं, " सध्यां येथें पायदळाच्या जोरावरच मुख्यतः काम करतां येण्याजोगें आहे व तें आम्ही करतों. तुम्हीं आपल्या घोडेस्वारांच्या सहाय्यानें तिन्ही लष्करांची रखवाली करावी. " हा निरोप उघड उघड अपमानास्पद होता. हरीपंतानें तत्काल उत्तर पाठविलें कीं, " मोर्चे आम्हांसही लावितां येतात. " पण कार्नवालिसनें हरीपंताची नाडी तपासून ठेवली होती; तो आपली मनधरणी करण्याची इच्छा करतो हें त्यास माहीत होतें; त्याच्या जोरावर त्यानें हरीपंतास पुनः निरोप धाडला कीं, " एकेक काम आटपावें, आम्हीं पायदळ घेऊन जाणार. " या उत्तरावर नाहीं होय म्हणणें म्हणजे आपसांत लाथाळी सुरू करण्यासारखें होतें. शिवाय या वेळीं हरीपंताजवळ इंग्रजांच्या मानानें सैन्य कमी व परशुरामभाऊ केव्हां येऊन मिळणार हेंही निश्चितपणें सांगतां येत नव्हतें; यामुळें हरीपंत विचारांत पडला.

इतक्यांत दीडप्रहर रात्रीच्या सुमारास इंग्रजांची हरीपंताकडे चिठ्ठी आली कीं, " श्रीरंगपट्टणावर आजच हल्ला करण्याचा आमचा बेत निश्चित झाला असल्या-

मुळें आम्हीं जातों. मोठ्या अवजड तोफा व इतर सामान आहे त्याचें संरक्षण तुम्ही करावें. "

याप्रमाणें मराठे व निजाम मागें राहून इंग्रजी सैन्य शत्रूवर चाल करून गेलें. इंग्रजांच्या या सैन्यानें केलेल्या पराक्रमाचें वर्णन हरीपंतानें असें केलें आहे:--

मध्यरात्रीं इंग्रजांचीं पंधरा पलटणें श्रीरंगपट्टणच्या उत्तरेस टिपूचा गोट होता त्याजवर चालून गेलीं. ' गोटावर एक सिलग केली तेव्हा तेही सावध झाले. टिपूची गाडद भारी; तोफा, बाण वगैरे सरंजाम पुष्कळ. त्याचा मारा चालला. इंग्रजानीं तोफा आपल्याबरोबर नेल्या नव्हत्या. बंदुकाच्या जोरावर आवशीचे चौदा घटकेस रात्रीं लढाई सुरू झाली ती सारी रात्रभर चालली; इतकेंच नव्हें तर दुसरे दिवशीं प्रहर दिवस उगवला तरी तिचा शेवट लागला नव्हता. टिपूचा सरंजाम भारी. याप्रमाणे लढाई कधीं पाहिली नाहीं. इंग्रज बंदुकांच्या सिलका मारीत करीघट्याचे टेकडीपर्यंत गेले. टेकली घेतली. तेथून पुढें शहर गंजम लालबाग कावेरीच्या चिमट्यांत आहे ती जागा कायम केली. टिपूची लढाई तेथें भारी झाली. एक दोन वेळ इंग्रज मागें सरले. यानीं निकड करून जागा कायम केली. माणूस परस्परें फार जाया झालें. इंग्रजाकडील पांच सातशें गोरा व हजारपर्यंत दुसरें पलटणांतील माणूस जाया झालें. या लढाईंत गोळी, तोफा, बाण यांची टिपूनें शर्थ केली. इंग्रजाकडे फक्त गोळीचा मात्र जोर. युद्ध मोठें झालें. " रात्रभर हें युद्ध चालू असून प्रातःकाळीं देखील इंग्रजी सेनापति मदतीस सैन्य पाठविण्याबद्दल निरोप धाडींत नाहीं, यामुळें हरीपंत विचारांत पडला. कार्नवालिसनें मदत न मागितली तरी कदाचित टिपूनें त्याचा पराभव केल्यास हरीपंतावर मोठा ठपका येण्याचा संभव होता. या वेळीं हरीपंताचा तळ इंग्रजी सैन्यापासून फक्त तीन कोसावर पडलेला. तेव्हा एवढ्या खडाजंगीच्या वेळीं आपण केवळ तमाशा पहात राहणें अन्यायाचें ठरेल असें समजून कार्नवालिसचा निरोप आला नव्हता तरी हरीपंतानें पांच हजार फौज इंग्रजांकडे पाठविली. हरीपंताच्या अंदाजाप्रमाणें टिपूच्या सैन्याशीं लढतां लढतां इंग्रजी सैन्य दोनप्रहरीं अगदीं थकून गेलें होतें. करीघट्याजवळ मुक्काम करण्याची त्याची इच्छा असून टिपूचे बेदडे त्यांना एकसारखे त्रास देत होते; यामुळें त्यांना विसावा घेतां येईना. इतक्यांत हरीपंतानें पाठविलेलें मराठ्यांचें सैन्य तेथें येऊन पोंचलें. त्यामुळें इंग्रजी सैन्यास फार संतोष वाटला व टिपूचे राऊत निघून गेले.

हरीपंतानें केलेल्या मदतीचा उपयोग फार चांगला झाला. इंग्रजी सैन्यास त्या वेळीं विश्रांतीची जरूर होती. ती हरीपंतानें आपण होऊन ओळखली व त्याची तरतूद केली. या ठिकाणीं कार्नवालीस व हरीपंत यांच्या स्वभावांतील भेद स्पष्टपणें दिसून येण्याजोगा आहे. इंग्रज व मराठे यांत दोस्तीचा तह झाला असून मराठ्यांची मदत होतां होईतोंवर घेऊं नये; इतकेंच नव्हे तर पुढें मागें आपलें मराठ्यांशीं वांकडें येण्याचा संभव आहे हें सदैव लक्षांत ठेऊन वागलें पाहिजे असें कार्नवालिसला वाटत होतें. पण हरीपंताची दृष्टि दोस्तीवर असून तो मनोभावानें इंग्रजांशीं सहकार्य करण्यास तयार होता; इतकेंच नव्हे तर त्यांच्या वजनानें मराठे व निजाम यांमधील तंटा देखील टाळतां येईल असा त्याचा समज होता. इंग्रजी राज्याचा विस्तार होण्यास मराठे हेच खरे शत्रु आहेत हें कार्नवालिस पक्केपणीं जाणून होता; पण हरीपंत मात्र निजाम, मराठे, इंग्रज व टिपू अशीं चार संस्थानें एकजुटीनें वागून हिंदुस्थानांत शांतता राखूं शकतील या मताचा होता. सारा हिंदुस्थान पुढें मागें इंग्रजी अमलाखालीं आणतां येईल अशी आशा कार्नवालिसला वाटत असल्यामुळें पुढील पंचवीस तीस वर्षें इंग्रजांना हिंदुस्थानांत लढत राहणें भाग आहे अशी कार्नवालिसची खात्री झाली. पण हरीपंतास भविष्यकाळ युद्धाच्या खडाजंगीनें भरलेला दिसत नव्हता, तर प्रबल राष्ट्रांच्या समतोलनानें शांततापूर्ण होणारसा भासत होता.

तथापि रणांगणावर भर युद्धाच्या प्रसंगीं आपण हजर असून हात जोडून स्वस्थ बसण्याचा प्रसंग आलेला पाहून त्यास पराकाष्ठेचा विषाद वाटला. हा प्रसंग ओढवण्याचीं दोन कारणें: एक तर या वेळीं इंग्रजी सैन्यानेंच पुढाकार घेतला पाहिजे असा कार्नवालिसचा आग्रह; आणि दुसरें कारण मराठ्यांच्या लष्कराची दैना. पैकं कार्नवालिसला चिट्ठं न देतां योग्य प्रसंग पाहून आपलें सैन्य थोडथोडें पुढें ढकल ण्याचा त्याचा प्रयत्न कसा सुरू होता हें नुकतें सांगण्यांत आलेंच आहे. मराठ्यां सैन्य रणांगणावर येऊन पोंहचतांच कार्नवालिसनें त्याचे 'मनःपूर्वक आभार मानले; आणि आपलें अर्धें सैन्य या ताज्या मराठी सैन्याच्या संरक्षणाखालीं त्या जागीं ठेऊन बाकीच्या सैन्यास मागें हरीपंताचा व मोंगलांचा तळ होता तेथें पर जाण्याचा हुकूम दिला. त्याप्रमाणें तें सैन्य मागल्या तळावर येतांच हरीपंतास आन

वाटला व रात्रभर या सैन्यास विसावा मिळाल्यानंतर सर्वच सैन्य आघाडीजवळ करीघव्यास नेण्याचा विचार हरीपंतानें केला.

हरीपंत अशा रीतीनें खुद्द खडाजंगींत सामील होण्यासाठीं धडपड करीत होता; पण त्याला स्वतःच्या दारिद्र्याकडे पाहून पराकष्ठेचें वाईट वाटे. त्यानें पुण्यास पाठविलेल्या एका पत्रांत असे उद्गार काढले आहेत--" (मराठ्यांच्या) सैन्यांत तरैण नाहीं! दाणा महाग! आम्हांजवळ पैका नाहीं! तथापि सर्व गोष्टी श्रीमंतांच्या प्रतापेंकरून पार पडतील. राजश्री भाऊ (परशुरामभाऊ पटवर्धन) बिदनुराकडे गेले. इकडे येते तर फौजेचें काम याहून चांगलें दिसलें असतें; परंतु येणें न झालें. आम्ही लिहिण्यास कसर केली नाहीं; परंतु मर्जी! इलाज नाहीं! अद्यापि आमचीं पत्रें जातच आहेत. "

यावरून आपणाजळ युद्धसामुग्री चांगलीशी नाहीं व कार्नवालिसच्या चमत्कारिक धोरणामुळें आपणांस पराक्रम दाखविण्यास योग्य संधि मिळत नाहीं या गोष्टीबद्दल हरीपंताच्या अंतःकरणास राहून राहून उद्वेग वाटत होता हें स्पष्ट दिसतें; पण त्यांतल्या त्यांत वेळ पाहून मराठी सैन्याची कामगिरी दाखवून द्यावी अशी हिंमत धरून तो काम करीत होता. शिवाय आघाडीपर्यंत मराठ्यांचें सैन्य पोंचल्यामुळें त्यास अशी आशा करण्यास जागा झाली होती. पण टिपूचा पाडाव करण्याचें श्रेय मराठ्यांना मिळूं द्यावयाचें नाहीं हा कार्नवालिसचा कृतनिश्चय झालेला. त्यानें हरीपंतास न कळूं देतां टिपूशीं तहाचें बोलणें सुरू केलें. ' प्रायशा सलूख घडेलसें दिसत नाहीं ' असें हरीपंत पुण्यास कळवीत होता त्याच वेळीं कार्नवालिसनें तह घडवून आणण्याचा निश्चय केला! यामुळें टिपूशीं दोन हात करण्याची संधि या वेळीं मराठे व मोंगल यांना मिळाली नाहीं. बरें ती येईपर्यंत तह लांबणीवर टाकावा तर आपला लढाईचा सरंजाम अपुरा; इंग्रजांनीं तर तहाची घाई चालविली. टिपूकडून मिळणाऱ्या प्रांताच्या बरोबर तीन वाटण्या करून प्रत्येकानें एकेक वांटा उचलावा अशी कार्नवालिसनेंच तयारी दाखविली; यामुळें मराठ्यांना व मोंगलांना तह करण्यावाचून गत्यंतरच राहिलें नाहीं. २३ फेब्रुवारीच्या पत्रांत हरीपंतानें तहाची बातमी लिहिली ती अशी—" टिपूनें सलूखाचा पैगाम केला. वकील पाठविले. त्यासीं बोलणें भवति न भवति फार झाली. शेवटीं गोष्ट ठरली

कीं, तीन सरकार मिळोन ही मसलत केली आहे. त्यास सलूख करितां त्या पक्षीं आम्ही सांगतों तें ऐका. निम्मे मुलूख व तीन करोड रुपये द्यावे. हा फैसला होय तर दोघे पुत्र ओलीस ठेवावे. याप्रमाणें बोलणें झालें. वकीलांनीं टिपूकडे जाऊन याद दाखविली. त्याणी कबूल केली. त्याप्रमाणें 'मान्य' म्हणोन याद करून मोहर करून पाठविली. दोघे पुत्र इंग्रजांचे गोटाजवळ येऊन उतरले. दोन चारशें माणूस समागमें आहे."

इतक्या घाईनें टिपूनें तह कबूल केला याचें कारण " टिपूस समजलें कीं तिन्ही सरकार एक. त्या पक्षीं परिणाम नाहीं, असें समजोन सलूखाची गोष्ट ठरली" असें हरीपंतानें म्हटलें आहे.

भाग १७ वा.

मेडोजचा आत्महत्येचा प्रयत्न व तहाची घाई.

तहाचीं कच्चीं कलमें ठरून युद्ध लौकरच संपणार असें जाहीर झालें तेव्हां तीं मी कोणासच खरी वाटेना. इतरांची गोष्ट तर राहो; पण खुद्द इंग्रजी सैन्यांतील कार्यांना व शिपायांना देखील हें कोडें उकलेना. तथापि टिपूचे मुलगे ओलीस न कार्नवालिसच्या भेटीस येण्याचा दिवस जेव्हां उजाडला तेव्हां आपण पहात तो स्वप्नसृष्टींतला चमत्कार नसून खरोखरीच लढाईची दंगल आटोपली अशी ची खात्री झाली.

परंतु हा तहाचा देखावा जितका आश्चर्यकारक होता तितकाच तो कित्ये- ा दुःखप्रद वाटला. विशेषेंकरून इंग्रजी सैन्याची फार निराशा झाली. टिपूचा दोन लढायांत पराभव झाला असला तरी तो अद्याप कायमचा ठेचला गेला ीं; तेव्हां टिपूची नांगी न तोडता तह करण्यांत येतो हें बरें नव्हें असेंच पुष्क- ा वाटलें. मेडोजनें तर या तहाची भाषा सुरू झाल्यापासून आपली नापसंती उघड- व्यक्त केली. पण बिचाऱ्याच्या नापसंतीस विचारतो कोण? सर्व अधिकार कार्न- लिसच्या हातांत. तो ठरवील तें व्हावयाचें. मेडोजच्या नापसंतीकडे कोणी ढुंकूनही हीना. त्यानें तहाच्या समारंभांत हजर राहण्याचें नाकारलें. तो आपल्या तंबूतच न राहिला. पण त्याला कसें चैन पडावें? ज्या टिपूनें आपणास एके वेळीं कैदेंत ठेवलें ीं; ज्याचा पुरेपूर सूड उगविण्याची आपण युद्धारंभीं प्रतिज्ञा केली होती त्या टिपूला ाजोगा नरम न करतां त्याच्याशीं सल्ला झालेला पाहण्यापेक्षां मेलेलें काय वाईट? उदासपणाचे विचार त्याच्या अंतःकरणांत घोळू लागले. दोन तीन दिवसापांसून चें औदासीन्य पाहून कित्येकांना वाईट वाटलें. त्यांनीं त्याची समजूत पाडण्यासाठीं क वार प्रयत्न केले. स्वतः कार्नवालिसनें देखील त्याचें सांत्वन करून हेलें. पण अशानें त्याचें समाधान होण्याजोगें नव्हतें. मेडूस हा कांहीं पोरवयाचा इता. त्याचें वय या वेळीं ६५ वर्षांचें असून मुंबई व मद्रास येथील गव्हर्नर या नें त्यानें मोठ्या अधिकाराचीं कामें केलीं होतीं. समरांगणावर देखील धूमश्च

कीच्या जागीं जाऊन पुढाकार घेण्यांत त्याला आनंद वाटे; व निकराच्या हल्याच्यां वेळीं तर तो हटकून आघाडींत हजर राही.

या मोहिमेची कल्पना निघाल्याबरोबर त्यानें मोठ्या उत्सुकतेनें टिपूच्या मुलखावर चाल केली. परंतु टिपूनें त्यास दाद दिली नाहीं.आणि कार्नवालिसला मेडोजच्या हातून हें काम रेटणार नाहीं असें वाटून स्वतःच त्यानें सेनाधिपत्य पत्करलें. यामुळें मेडोजचा पर्यायानें अपमान झाला. पण टिपूचा सूड घेण्याची इच्छा त्याच्या अंतःर्णात अत्यंत प्रबळ असल्यामुळें त्यानें या युद्धांत दुय्यम सेनापती या नात्यानें काम करण्याचें कबूल करून अनेक झटापटींत चांगलें शौर्य प्रकट केलें होतें. श्रीरंगपट्टणास वेढा पडून कोटावर चालून जाण्याचा बेत ठरला तेव्हां तर त्यानें अंधेऱ्या रात्रीं सैन्याची टोळी एका नाजूक ठिकाणीं नेमकी नेऊन पोचविण्याची जबाबदारी मुद्दाम उचलली. पण या ठिकाणीं रात्रीच्या अंधेरांत त्याची दिशाभूल होऊन तो भलतीकडे गेला; यामुळें कांहींसा घोटाळाही उडाला. पण कार्नवालिसनें ऐन वेळीं सर्व संभाळून घेतलें व प्रसंग निभावला. तरीहि ही गोष्ट मेडोजच्या मनाला फार लागली. तेव्हां त्यानें त्याचा वचपा काढण्यासाठीं "टिपूवर पुनः निकराचा हल्ला करून यश मिळवीन किंवा या प्रयत्नांत धारातीर्थीं देह तरी ठेवीन" अशी घोर प्रतिज्ञा केली होती. आणि ही प्रतिज्ञा पुरी करण्यासाठीं तो प्रसंगाची आतुरतेनें वाट पहात होता.

पण या प्रसंगाऐवजीं तहाची वाटाघाट सुरू झालेली पाहून त्याचं डोकें भणाणून गेलें. यापुढें जगण्यांत अर्थ नाहीं असें त्याच्या मनानें पक्केपणीं घेतलें व त्या निराशेच्या भरांत त्यानें पिस्तूल उचललें. टिपूचे मुलगे तहांचा खलीता घेऊन इंग्रजी सैन्यांत दाखल होणार हें ऐकून सर्व शिपाई व अधिकारी हा समारंभ पाहण्यासाठीं घाईघाईनें जात होते. पण याच वेळीं मेडोजनें दोन गोळ्या 'भरून पिस्तूल पोटांत मारून घेतलें!' त्या आवाजासरशीं लोक धाऊन आले. आणि पहातात तों दोन्ही गोळ्या मेडोजच्या पोटांत शिरलेल्या! डाक्तरांनीं लगेच गोळ्या काढल्या. जखमाहि बऱ्या झाल्या. तो वाचला. पण त्याला कार्नवालीसचें करणें बिलकुल आवडलें नाहीं. त्यानें गव्हर्नरीच्या जागेचा राजीनामा दिला.

पण कार्नवालिसचा स्वभाव अगदीं निराळा होता. अमेरिकेंत त्याला शत्रूस शरण जावें लागलें तरी त्यानें जीव देण्याचा प्रयत्न केव्हांहि केला नाहीं. आपली

एखादी प्रतिज्ञा खोटी ठरली म्हणून आत्महत्या करून घेणें जरूर आहे हा मेडोजचा न्याय त्याला पटण्याजोगा नव्हता. व्यक्तिविषयक मानापमानापेक्षां राष्ट्राचा नफातोटा साधणें हें महत्वाचें काम आहे असें त्याला वाटत असल्यामुळें त्यानें मेडोजचा राजीनामा एकदम मान्य करून त्याला विलायतेस निघून जाण्याची परवानगी दिली. तहनामें देण्याघेण्याचा समारंभ होईपर्यंत मेडोज मोठ्या कष्टानें लष्करांत राहिला. पण तें काम संपतांच दुसरे दिवशीं तो कूच करून मद्रासेस गेला. आणि तेथें पंध्रा दिवस राहून पहिल्या बोटीनें विलायतेस निघून जाण्याचें त्यानें ठरविलें. *

तात्पर्य, श्रीरंगपट्टणची स्वारी ऐन रंगांत आल्या वेळीं कार्नवालिसनें हें युद्ध एकदम आटोपलें. तहाचें बोलणें सुरू झाल्यापासून तीन आठवड्यांत पक्या तहावर सर्वांच्या सह्या होऊन दोस्तांचीं सैन्यें परत निघालीं देखील! एवढ्या मोठ्या युद्धाचा शेवट लावतांना तहाचीं कलमें ठरविण्यास, शत्रूकडून घेतलेल्या मुलखाची वाटणी करण्यास व खर्चाचें प्रमाण ठरविण्यास कित्येक महिने लागतील असें सर्वांना वाटत होतें. तो सर्वांचा अंदाज चुकीचा ठरून तह फारच झटपटीनें उरकण्यांत आला. याचें कारण काय असावें? या गूढ प्रश्नाचा उलगडा करण्यासाठीं अनेक लेखकांनीं अनेक प्रकारचे तर्कवितर्क लढविले आहेत. कोणी म्हणतो टिपू या वेळीं दोस्तांच्या कचाट्यांत पूर्णपणें सापडला होता; त्याला सर्वस्वीं बुडवून त्याचें राज्य खालसा करण्याचें सामर्थ्य दोस्तांच्या सैन्यांत होतें; हें काम कार्नवालिसला खात्रीनें करतां आलें असतें; पण कार्नवालिस अंतःकरणाचा उदार असल्यामुळें त्यानें या प्रसंगीं अर्धें राज्य घेऊन टिपूस जीवदान दिलें. असें प्रतिपादन करून या लेखकांनीं कार्नवालिसच्या शांत स्वभावाची व नेमस्त धोरणाची तारीफ केली आहे. अशा प्रकारें ऐन रंगाच्या वेळीं देखील विजयमदानें फुगून न जातां शत्रूशीं न्यायानें वागण्याचा निश्चय कायम ठेवल्याबद्दल मूरनें कार्नवालिसच्या थंड स्वभावाचे व आत्मसंयमनाचे गोडवे गाइले आहेत.

दुसऱ्या एका ग्रंथकारास हें समर्थन न पटल्यामुळें व राजकारणांत नेमस्तपणा स्वीकारणें हा शहाणपणा आहे असें त्यास वाटत नसल्यामुळें त्यानें कार्नवालिसच्या या वागणुकीचें कोडें राजकीय धोरणाच्या व हिशेबी तत्वाच्या आधारांवर सोडविले

* ऐतिहासिक टिपणें भाग. ३ पृ. ३० गोविंदराव काळ्याचें पत्र.

आहे. त्याच्या मतें टिपूचें सर्वच राज्य या वेळीं खालसा केलें असतें तर मराठे व निजाम यांना या सर्व राज्याची तिजाई द्यावी लागली असती; आणि ते डोईजड झाले असतें; त्यापेक्षां सध्या निम्या राज्यातलीच तिजाई आपल्या दोस्तांना देऊन बाकीचा टिपू शिल्लक ठेवणेंच कार्नवालिसला शहाणपणाचें वाटलें असावें. हिंदी राजे रजवाडे परस्परांशीं मत्सरभावानें वागत. तेव्हां त्यापैकीं कोणासही सपशेल न बुडविता सर्वांची सत्ता आहे तेवढीच कायम ठेऊन परस्परांचा धाक परस्परास घालून कोंबडी झुंजविणें व त्या अवधींत कंपनीचें बस्तान बसाविण्यास वेळ मिळविणें हेंच कंपनीच्या हिताचें आहे असें ठरवून कार्नवालिसनें या वेळीं हात आटोपता घेतला असावा असा या ग्रंथकाराचा तर्क आहे.

पण तत्कालीन परिस्थिती व पत्रव्यवहार यांचा बारकाईनें विचार केला असता वर सांगितलेले तर्क बहुतांशीं निराधार आहेत असें म्हणावें लागतें. राजकारणांत दया, औदार्य अगर नेमस्तपणा यांना वाव असतो असें निदान कार्नवालिसच्या उद्गारावरून तरी केव्हांही म्हणता यावयाचें नाहीं. कंपनीचा फायदा व त्याबरोबर इंग्रजी राष्ट्राची इभ्रत, दरारा आणि संपत्ति वाढविण्याची जी जी संधि सापडेल तिचा जास्तीत जास्त फायदा घेण्याचा कार्नवालिसचा हेतु होता. या दृष्टीनें टिपूस कायमचा गारद करणें हेंच फायद्याचें आहे असें त्यास प्रारंभीं वाटत होतें. मेडोजनें टिपूस राज्यभ्रष्ट केलें पाहिजे असें युद्धाच्या प्रारंभींच म्हटलें होतें. आणि इंग्रजी सैन्यांतील लहानमोठे अधिकारी व शिपाई देखील टिपू म्हणजे अन्यायाचा व क्रूरपणाचा मूर्तिमंत पुतळा आहे असें मनोभावानें समजून त्याला जमीनदोस्त करण्यास उत्सुक झाले होते. कार्नवालिस देखील प्रारंभीं या सर्वसामान्य भावनेनेंच प्रेरित झाला होता. कदाचित नेमस्तपणाची कल्पना त्याच्या अंतःकरणांत उद्भवत होती असें गृहीत धरलें तरी टिपूस पराभूत करून जिवंत सोडणें म्हणजे दुखविलेल्या सापाच्या विळाशेजारीं घर करून राहण्यासारखें धोक्याचें व अदूरदृष्टीचें आहे हें कार्नवानिसला कळत असलें पाहिजे. डायरेक्टरांकडे या तहाची माहिती देतांना टिपूचा उल्लेख त्यानें a faithless and violent character upon whom no dependence could be placed या शब्दांत. केला आहे.—यावरून देखील टिपूशी केलेल्या शाब्दिक तहानें शांतता प्रस्थापित होईल अगर तो पराभव कबूल करून स्वस्थचित्तानें राहील असा कार्नवा-

लिसचा अभिप्राय नव्हता हें स्पष्ट आहे. टिपूचा स्वभाव मूळचाच मानी व गर्विष्ठ. त्यांतून त्यानें निजाम, इंग्रज व मराठे यांच्याशीं स्वतंत्रपणें झुंजून आपल्या तरवारीचें तेज अनेक वेळा प्रकट केलेलें. यामुळें आपल्या सामर्थ्याबद्दल त्याला फाजील कल्पना असणें स्वाभाविक होतें. आपल्या तिघांही शत्रूंची एकजूट होऊं दिली हीच कायती आपली चूक. त्यांची जूट मोडून त्यांचें सैन्य आपल्या मुलुखांतून परत गेलें म्हणजे आपणास पुनः आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्यास हरकत पडणार नाहीं असा त्याचा अंदाज होता. आज पड घ्यावयाची पण ती पुढें पुनः मोठी उडी मारण्याच्या हेतूनें घ्यावयाची असें टिपूस वाटत असल्यास नवल नाहीं. सारांश आपण टिपूशीं जो तह करीत आहो तो टिकाऊ नसून ही वाळूवरची इमारत केव्हां ढासळून पडेल याचा नेम नाहीं हें कार्नवालिस जाणून होता.

त्याचप्रमाणें निजाम व मराठे यांना टिपूच्या सर्व राज्याची तिजाई मिळून त्यांचें पारडें वाजवीपेक्षां फाजील जड होईल अशी शंका येऊन कार्नवालिसनें आपला हात आखडला हें म्हणणें देखील असेंच चुकीचें ठरतें. निजाम व मराठे यांना मोठा वाटा मिळाला असता हें जितकें खरें आहे तितकेंच इंग्रजांना देखील त्याच प्रमाणांत मोठा वाटा मिळाला असता हें देखील खरें आहे. इतर सर्व शत्रूंपेक्षां टिपू हा इंग्रजांशीं कसून वैर करणारा होता. तेव्हां त्याला जमीनदोस्त करून त्याचें राज्य तीघांत वाटले गेलें असतें तर त्यांत कंपनीचा नफाच झाला असता. यावरून कोणत्याहि दृष्टीनें विचार केला तरी टिपूचा काटा अजीबाद उपटून टाकणेंच श्रेयस्कर आहे; नाहीं तर टिपूशीं युद्ध करण्याचा प्रसंग व अवश्यकता लौकरच उत्पन्न होऊन कंपनीस पुनः नव्या युद्धाचा खर्च पत्करणें भाग पडेल हें कार्नवालिसला सहज दिसण्याजोगें होतें.

तर मग कार्नवालिसनें हें प्रकरण तहावर कां आटोपलें याचें उत्तर काय असा प्रश्न पुढें येतो. याचा समाधानकारक रीतीनें उलगडा होण्यास युरोपांतील परिस्थितीकडे लक्ष पुरविणें अवश्यक आहे. फ्रेंच लोक इंग्रजी राज्याचे खरे शत्रू आहेत व ते आणि टिपू यांचें सामर्थ्य एकवटल्यास इंग्रजावर कठीण प्रसंग ओढवेल; हें जाणून फ्रान्समधील राज्यक्रांतीची गडबड आणि इंग्लंड व फ्रान्स यामध्यें झालेला तात्पुरता तह वगैरेसंबंधीं बातमी येतांच कार्नवालिसनें टिपूशीं कुरापत काढून युद्धास मूळ प्रारंभ केला. हें करणें डायरेक्टरांच्या हुकमाविरुद्ध आहे व ते यास आक्षेप घेतील अशी

त्याला शंका आली. पण हिंदुस्थानांत आल्यापासून तीनचार वर्षें तटस्थवृत्तीचें धोरण पत्करलें; पण या वेळीं निरुपाय झाल्यामुळें आपण या युद्धाच्या भानगडींत पडत आहों असा खुलासा केला व टिपूचें युद्ध आपण तडकाफडकीनें आटपून कंपनीचा फायदा करून दाखविला म्हणजे आपलें करणें सहज पचेल; पण फ्रान्समधील गडबडीचा फायदा आपण घेतल्यावांचून मात्र राहता कामा नये असें कार्नवालिसच्या मनानें पक्केपणीं घेतलें होतें. पहिल्या मोहिमेंत मेडोजच्या हातून टिपूचा पराभव होऊं शकला नाहीं. यामुळें कार्नवालिसचा बेत कांहींसा फिसकटला. तरीहि त्यानें धीर न सोडता स्वतः सैन्याचें आधिपत्य स्वीकारून युद्धाचा शेवट लावण्याचा निर्वाणीचा उपाय योजून पाहण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें दुसऱ्या मोहिमेच्या प्रसंगीं बेंगळूर काबीज करण्यापासून तो श्रीरंगपट्टणच्या वेशीजवळ जाऊन पोहचेपर्यंत त्यानें पराकाष्ठेची घाईही करून पाहिली. या घाईमुळें आपल्या सैन्याचे किती हाल होत आहेत व टिपूनें किल्ल्यांत राहून किल्ला लढविण्याचें धोरण स्वीकारल्यास फक्त इंग्रजी सैन्याच्या हातून किल्ला हस्तगत करण्याचें काम रेटेल किंवा नाहीं याचा विचार करण्याचें त्याला बिलकुल सुचलें नाहीं. आपण हातीं घेतलेली लढाई तांबडतोब आटोपतो व कंपनीचा भरपूर नफा करून दाखवितों असें आपण अनेक वेळा डायरेक्टरांकडे लिहिलें आहे; तेव्हां या कामीं दिवसगत करण्याची सोय नाहीं; तसें झाल्यास आपल्या धोरणासंबंधीं टीका करणाऱ्या पार्लमेंटमधील सभासदांना जोर येईल व डायरेक्टरांनीं ठरवून दिलेलें तटस्थपणाचें धोरण मोडल्याबद्दल आपणास ते दोष देऊं लागतील हें जाणून कार्नवालिसनें श्रीरंगपट्टण गांठून युद्धाचा शेवट लावण्याची अटोकाट घाई केली. पण याही वेळीं डाव त्याच्या अंगावरच उलटला. या वेळीं इंग्रजी सैन्याची इतकी खराबी झाली व त्यावर असा दुर्धर प्रसंग ओढवला कीं श्रीरंगपट्टणचा वेढा उठवून बेंगरुळास कांहीं दिवस विसाव्यासाठीं परत जाण्यावांचून गत्यंतरच राहिलें नाहीं. या सुमारास कार्नवालिसच्या मनांत अत्यंत औदासीन्याचे विचार येऊं लागले. पण याच वेळीं मराठ्यांचें सैन्य त्याच्या सुदैवानें येऊन मिळाल्यामुळें त्याच्या अंतःकरणांत पुनः जय मिळविण्याची आशा उत्पन्न झाली. तथापि मराठ्यांच्या सैन्याची मदत घेऊन सुद्धां श्रीरंगपट्टणच्या वेढ्याचें काम यावेळीं रेटण्याजोगें नव्हतें. यामुळें तो बेंगरुळापर्यंत मार्गें हटला.

कार्नवालिसच्या या उत्साहभंगाचा प्रतिध्वनी इंग्लडांत फार जोराचा उमटला.

'हें युद्ध उपस्थित करण्यांत कार्नवालिसची चूक झाली, आणि मराठ्यांच्या मदतीनें या युद्धांत जय मिळविण्यापेक्षां तें कसेंहि आटपून टाकलेलें पुरवेल' अशी पार्लमेंट-मध्यें चर्चा सुरू झाली. डायरेक्टर मंडळीनें आपलें वजन खर्चून या आक्षेपकांच्या बाजूस बहुमत होऊं दिलें नाहीं. पण त्यांच्या देखील वजनास सीमा होतीच. हें युद्ध लौकर संपेल तर बरें असें त्यांनीं कार्नवालिसच्या पत्रांत सुचविण्यास सुरुवात केली. इकडे कार्नवालिस इरेस पडल्यामुळें निर्वाणीचे उपाय योजूं लागला. 'दाम करी काम' हें तत्व लक्षांत ठेऊन त्यानें पैशाच्या जोरावर चार महिन्यांत युद्धाची जंगी तयारी करण्याचें ठरविलें. हरीपंतास पैसे पुरवून मराठ्यांचें सैन्य श्रीरंगपट्टणवर हल्ला करण्यासाठीं तयार करविलें. मद्रासेकडून भरपूर अन्नसामुग्री व दारुगोळा आणविला. अशा रीतीनें पाण्यासारखा पैसा खर्च केल्यामुळें कंपनीची शिल्लक संपली. चीनकडे कंपनीनें पाठविलेली रोकड रक्कम घेऊन जाणारें जहाज त्यानें कलकत्त्यास थांबवून त्यांतील नगद व सोनें युद्धाप्रीत्यर्थ खर्च करण्यासाठीं घेतलें. या सर्व बातम्या विलायतेस गेल्या तेव्हां 'युद्ध तावडतोब आटोपतों' हें कार्नवालिसचें आश्वासन खरें नव्हे हें डायरेक्टरांना कळलें. त्यांतून कंपनीला धोरणापेक्षा पैशाची खातर अधीक वाटे. आपण आखून दिलेलें धोरण कार्नवालिसनें मोडलें यापेक्षां त्यानें युद्धाच्या नादीं लागून पैशाचा फन्ना उडविला या गोष्टीनें डायरेक्टर अधीक चिडीस आले. त्यांचा यापुढें धीर निघेना. कार्नवालीसवर त्यांचा मोठा भरंवसा होता खरा. परंतु आतां त्यांनीं त्याला सडेतोडपणाचें उत्तर देण्याचें ठरविलें. 'हें युद्ध आतां यापुढें न लांबवितां संपवून टाका. असें करण्यांत (हें युद्ध आणखी कांहीं दिवस चालविण्यापासून कंपनीचा जो फायदा होण्याचा संभव आहे त्यापेक्षां) कमी फायदा झाला तरीहि पुरवेल" अशा अर्थाचें स्पष्टपणाचें पत्र डायरेक्टरांनीं लिहिलें. आणि हा रंग पाहतांच कार्नवालिसनें टिपूशीं तह केला.

डायरेक्टरांच्या पत्रास इतका मान कार्नवालिसनें कां दिला याचें कारण समजणें फारसें कठीण नाहीं. इंग्लंडांतील लोकमत खवळलें म्हणजे तें हिंदुस्थानांतील गव्हर्नरादि बड्या अधिकाऱ्यांचा कसा पिच्छा पुरवित असें याचीं उदाहरणें कार्नवालिसच्या डोळ्या पुढें होतीच. क्लाइव्हवर टीकाकारांनीं गहजब केला तेव्हां त्याला ती गोष्ट इतकी असह्य वाटली कीं, १७७४ साली त्याला आत्महत्या करून या त्रासांतून मोकळें व्हावें लागलें. आणि हेस्टिंग्जची देखील १७८८ सालापासून चौकशी सुरू

झाली होती; आणि त्याचे धिंडवडे कसे निघत आहेत याच्या बातम्या, हकीकती कार्नवालिसला कळत होत्या. कंपनीच्या श्रीमंतीचा मत्सर करणारा बराच मोठा समाज यावेळीं इंग्लंडांत अस्तित्वांत आलेला होता. त्याचें डायरेक्टरांपुढे प्रत्यक्ष पार्लमेंटमध्यें वजन पडत नसलें तरी त्यामुळें या बड्या मंडळींना लोकांत सुखासमाधानानें व शिष्टपणानें वावरता येत नव्हतें. क्लाइव्ह व हेस्टिंग्ज यांना पैशाचें महत्व प्रतिष्ठितपणापेक्षां अधिक वाटत असल्यामुळें त्यांनीं तो कमावतांना इतर गोष्टीची फिकीर केली नाहीं. पण कार्नवालिस पैसेखाऊ नव्हता; त्याला लोकांत अब्रूनें वावरता यावें ही गोष्ट महत्वाची वाटे. यामुळें इंग्लंडांतील लोकमतास भिऊन डायरेक्टरांच्या पत्रास त्यानें मान देण्याचें ठरविलें व श्रीरंगपट्टणची स्वारी संपविली.

मराठ्यांनीं देखील हें युद्ध बाह्य परिस्थितीमुळेंच आटपलें. वास्तवीकपणें इंग्रजांनीं उपस्थित केलेल्या या युद्धांत सामील होण्याचें मराठ्यांना साक्षात कारण कोणतेंच उद्भवलें नव्हतें. बदामीची स्वारी सुरू करतांना व त्यापूर्वी देखील टिपू-विरुद्ध इंग्रजांना सामील करून घेण्याचा व त्यांच्याशीं दोस्तीचा तह करण्याचा मराठी मुत्सद्यांनीं प्रयत्न केला होता. पण 'देशी राजेरजवाड्यांच्या भांडणांत न पडण्याबद्दल अगर कोणाशींहि दुसऱ्याविरुद्ध दोस्तीचा तह न करण्याबद्दल' आम्हांस कंपनीच्या डायरेक्टरांचा सक्त हुकूम आहे असें मॅकफर्सन व कार्नवालिस यांनीं उत्तर दिलें होतें. तेव्हां मराठ्यांनीं देखील इंग्रजांना याच प्रकारचें उत्तर देणें न्यायाचें झालें असतें. लौकिकाच्या दृष्टीनें देखील 'टिपूची रग जिरविण्याचें काम मराठ्यांच्या हातून नीटसें झालें नाहीं म्हणून तें इंग्रजांच्या सहाय्यानें पुरें करण्यांत आलें' असें दिसण्यांत मराठ्यांचें महत्व कमी होण्याचाच संभव होता.* त्यापेक्षां प्रथम तटस्थपणा स्वीकारून

* या स्वारींत दोस्तांना जय मिळण्यास मराठ्यांच्या मर्दुमकीचा चांगला उपयोग झाला ही गोष्ट फ्रेंच इतिहासकारांनीं गौरवपूर्वक नमूद केली आहे. उदाहरणार्थ यासंबंधी लांगले म्हणतो:—

Les troupes du peichouâ contribuerent beaucoup aux succes que lord Cornwallis remporta sur Typou en 1792.

Monuments De l' Hindostan par L. Langles.

व टिपू व इंग्रज यांना लढूं देऊन नंतर तडजोड करण्याचा मान मराठ्यांना घेता आला असता तर तो श्रेयस्कर होता. पहिल्या दोन मोहिमा इंग्रजांनीं आपल्याच बळावर पार पाडण्याचा प्रयत्न केला; तेव्हां त्यांना अपयश आलें व मराठ्यांची मदत पोंचली तेव्हांच इंग्रजांची सरशी झाली हें लक्षांत घेतलें असतां इंग्रज व टिपू यांचें युद्ध बरोबरीनेंच संपलें असतें असें निश्चितपणें म्हणतां येतें.

या गोष्टी इतक्या स्पष्ट होत्या कीं मराठ्यांनीं या युद्धांत दोस्त या नात्यानें सामील होण्याचे करारमदार केल्यावर देखील ते त्याप्रमाणें मदतीस धाऊन येतील असा कार्नवालिसला बिलकुल भरंवसा वाटत नव्हता; इतकेंच नव्हे तर मराठ्यांनीं असें केल्यास त्याबद्दल आपणास त्यांना जाब विचारतां येणार नाहीं अशी कबूली त्यानें मॅलेटला लिहिलेल्या पत्रांत देऊन ठेवली आहे.† तेव्हां या युद्धांत सामील होणें इष्ट नाहीं हें मराठ्यांना कळलें असलें पाहिजे. पण इंग्रजांना दुखविल्यास ते निजामास सामील होतील अशी भीति मराठ्यांना वाटे. व ती यथार्थ होती. मराठे व निजाम यांच्यामध्यें खटका उडण्याचीं लक्षणें वारंवार दिसत. तेव्हां अशा प्रसंगीं इंग्रजांनीं आपला पक्ष न उचलला तरी निदान निजामास मदत तरी करूं नये ही मराठ्यांची इच्छा. या इच्छेनुसार आपण तटस्थपणाचें धोरण स्वीकारणार असें अभिवचन इंग्रजांनीं दिलें आणि खर्ड्यांच्या लढाईत तटस्थपणा स्वीकारून तें त्यांनीं पुरेंहि केलें. पण या तटस्थपणाप्रीत्यर्थ टिपूला बुडवून इंग्रजांचा लौकिक वाढण्याला मराठ्यांनीं मदत करणें इष्ट आहे किंवा नाहीं हा प्रश्न त्या वेळीं सोडवावयाचा होता. याचें उत्तर पुणेकर मुत्सद्यांनीं अनुकूल दिलें. तथापि ही चूक आहे असें महादजीस वाटत असल्यामुळें मध्यस्ती करून हें युद्ध थांबविण्यासाठीं दिल्लीकडून तो एकदम दक्षिणेंत आला. या वेळीं नानांचें धोरण

† As we have been almost daily obliged, for several years past to declare to the Mahrathas and to the Nizam, that we were precluded from contracting any new engagements with them for affording them aid against the injustice and ambition of Tippoo, I must acknowledge, that we can not claim, as a right, the performance of those promises which the Mahrattas have repeatedly made, to co-operate with us whenever we should be forced into a war with that prince.

मराठ्यांच्या हितास विघातक आहे असें वाटत असल्यामुळें महादजी नानावर अत्यंत संतापला होता. ' उत्तरहिंदुस्थानांत दिल्लीकडे मराठ्यांचा अंमल प्रस्थापित करतांना इंग्रजांनीं आणीबाणीच्या वेळीं देखील आपणास मदत देण्याचें नाकारलें. इतकेंच नव्हें तर त्यांनीं कांहीं संस्थानिकांना आंतून फूस दिली असावी. व आपला पाडाव करण्यासाठीं ते वाट पहात आहेत ' असा संशय महादजीस आला होता. यामुळें टिपूविरुद्ध इंग्रजांना मराठ्यांनीं मदत करणें त्याला बिलकुल संमत नव्हतें.

नाना देखील महादजीचा स्वभाव पूर्णपणें जाणत होता. एखादी गोष्ट करण्याचें ठरल्यावर महादजी ती पार पाडण्यासाठीं वाटेल ते उपाय योजण्यास कचरत नसे. तेव्हां या सुमारास हरीपंतानें व पटवर्धनानें पुण्यास सैन्यासह दाखल व्हावें अशी नानांची इच्छा होती. यामुळें टिपूशीं तहाची वाटाघाट सुरू झाल्यावर मराठ्यांनीं तो होईल तितक्यां जलदीनें पार पडावा अशी कार्नवालिसप्रमाणें मराठ्यांनाही उत्सुकता लागली होती.

निजाम व टिपू यांच्याकडून तर दिरंगाई होण्याचा संभवच नव्हता. इंग्रजांच्या मताप्रमाणें वागून त्यांचा स्नेह जोडावा एवढीच निजामाची कल्पना. यामुळें कार्नवालिसच्या म्हणण्यास होस हो देण्यापलीकडे तो कांहींच करीत नव्हता. आणि टिपूला तर या त्रिकूटाचें सैन्य कसेंहि करून आपल्या हद्दी बाहेर घालवावयाचें होतें. यामुळें त्याला तह गडबडीनें आटपून टाकणेंच इष्ट होतें.

या युद्धाचा शेवट विलक्षण लगबगीनें कां झाला याची मीमांसा ही अशी आहे. फ्रेंच राज्यक्रांतीच्या गडबडीनें हें युद्ध सुरू केलें आणि डायरेक्टरांचें पत्र व महादजींचें दक्षिणेंत आगमन या दोन कारणानीं तें मुख्यत्वेंकरून अकस्मिकरीतीनें संपविलें; यावरून या युद्धाच्या आद्यंताचा धागा बाह्यपरिस्थितींत सापडण्याजोगा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

भाग १८ वा.

मेजवान्या, गुप्त खलबतें व अखेरची परिस्थिति.

श्रीरंगपट्टणची स्वारी आटोपून सर्व सैन्यें परत चालली तेव्हां तत्कालीन मुत्सद्दी, सेनापती व सैनिक यांच्या मनांत काय विचार घोळत असतील? तहानें प्रस्थापित झालेली शांतता कायम राहील असें त्यांना वाटत असेल किंवा दोस्तांची आपसांत लाथाळी सुरू होईल असा त्यांचा अंदाज होता? सारांश या युद्धानंतर दक्षिण महाराष्ट्रांत जी राज्यक्रांती झाली व भयंकर उलथापालथ घडून आली तिची पूर्वकल्पना तत्कालीन लोकांपैकीं कोणास तरी आली असेल काय? या स्वारीनंतर दोन तीन वर्षांत खर्डे मुक्कामीं मराठे व निजाम यांच्यांत खडांजंगीचें युद्ध झालें, नंतर चार वर्षांनीं इंग्रजांनीं टिपूवर पुनः स्वारी केली आणि पुढें एक दोन वर्षांनीं नाना फडणीसांच्या मृत्युनंतर इंग्रजांना सर्व हिंदुस्थान देश पादाक्रांत करणें शक्य आहे असें दिसून आलें वगैरे गोष्टी इतिहासामधून आपण वाचतों; पण हें भविष्य या स्वारीच्या अखेरीस कोणी वर्तविलें होतें किंवा नाहीं या प्रश्नाचा विचार करणें बोधप्रद आहे.

भविष्य वर्तविण्याच्या बाबतींत इतिहासाचें स्वरूप कांहीं अंशी फलज्योतिषा-सारखें आहे. गोष्ट घडल्यानंतर इतिहासकार व फलज्योतिषी त्या योगायोगाचें गणित बरोबर बसवून देतात. आणि गणीताची किंवा अनुमानाची ही पद्धति मागा-हून वाचणारास सोपपत्तिक व शास्त्रशुद्ध दिसतें. व हें भविष्य आधीं देखील सहज वर्तविता आलें असतें असेंहि वाटूं लागतें. पण भविष्य वर्तविण्याचा प्रयत्न ज्योतिषी किंवा इतिहासकार करतात तेव्हां मात्र तें बहुधा बिनचूक ठरत नाहीं. ग्रहांची काय किंवा जगांतील घडामोडींची काय दोहोंचीहि गति इतकी गुंतागुंतीची व सूक्ष्म स्वरूपाची असते कीं ठाम उत्तर देणें जवळ जवळ अशक्यकच असतें. या करितां पुढें काय घडेल याची चिंता करण्यापेक्षां आज आपणास काय केलें पाहिजे याचाच विचार करणें अधीक शहाणपणाचे मानलें जातें. भविष्यकाळाच्या पोटांत काय आहे हें एका परमेश्वराखेरीज इतरांना कळणें दुष्कर असल्यामुळें दूरच्या भविष्य काळाची फिकीर व्यवहारज्ञ माणसें करात नाहींत.

तथापि इतिहासकार मात्र कित्येक वेळा ऐतिहासिक व्यक्तींवर दूरदर्शीपणाचा

आरोप बळेंच करतात. उदाहरणार्थ; श्रीरंगपट्टणच्या स्वारीनंतर पंचवीस वर्षांनीं सर्व दक्षिण हिंदुस्थान इंग्रजांच्या ताब्यांत आला हें ऐतिहासिक सत्य डोळयांपुढें ठेऊन व त्याची कल्पना कार्नवालिसला होती असें गृहीत धरून कार्नवालिसला नसतें श्रेय देतात व मराठ्यांना अवास्तव दोष देतात. पुढें घडलेल्या गोष्टीवरून मागल्या मुत्सद्यांची लायकी किंवा नालायकी ठरविणें सोपें दिसतें; पण तें तसें नसतें. तत्कालीन परिस्थितीशीं कसें तोंड द्यावयाचें याचाच विचार मुत्सद्यांना करावयाचा असतो व पुढचा प्रसंग निभाऊन नेण्याची जबाबदारी मुख्यत्वेंकरून पुढच्या मुत्सद्यावर असते. ती त्यांनीं ओळखली नाहीं तर त्याचें अपयश किंवा दैववशात विलक्षण योगायोग जुळून येऊन पुढच्या मुत्सद्यांनीं कल्पनातीत प्रगति केली तरी त्याचें यश मागल्या पिढींतील मुत्सद्यांस देणें न्यायाचें होणार नाहीं. मुलाच्या बऱ्यावाईट कर्तृत्वाचें यशापयश कांहीं सीमेपलीकडे जसें आईबापांकडे येऊं शकत नाहीं तोच न्याय मागल्या व पुढल्या पिढींतील मुत्सद्यांच्या बाबतींत लागू पडतो. नाहीं तर संभाजीचें अपयश शिवाजी महाराजांच्या माथीं मारावें लागेल आणि वेलिंगटनच्या पराक्रमाचें श्रेय मद्रास बंदरांत प्रथम व्यापार करण्यांत जन्म घालविणाऱ्या इंग्रजी दुकानदारांना द्यावें लागेल. असा दूरान्वय करून ऐतिहासिक व्यक्तींची योग्यता ठरविणें रास्त नव्हे. ही योग्यायोग्यता मुख्यतः तत्कालीन परिस्थितीवरून व उद्गारावरून ठरविली पाहिजे.

या दृष्टीनें श्रीरंगपट्टणच्या मोहिमेअखेर निरनिराळे मुत्सदी व इतिहासकार यांनीं या स्वारीबद्दल काय अभिप्राय दिला आहे हें पहाणें महत्वाचें आहे.

इ. स. १९७२ सालच्या ॲन्युअल रजिस्टरमध्यें (म्हणजे वार्षिक वृत्तांतांत) इंग्रजी इतिहासकारानें पुढें दिलेला अभिप्राय लिहून ठेवला आहे. त्या वेळीं दरसाल प्रसिद्ध होणारें हें रजिस्टर एडमंड बर्क लिहीत असें म्हणतात. यामुळें हा अभिप्राय त्याचाच असण्याचा संभव आहे. रजिस्टरकारानें दहाव्या भागांत टिपूच्या युद्धासंबंधानें बराच मजकूर लिहिला आहे त्याचा सारांश असा.

" या युद्धाप्रीत्यर्थ पुष्कळ खर्च झाला खरा. पण त्याचीं भरपाई होण्याजोगा फायदाहि झाला आहे. कर्नाटकांतील अवघड घाट हस्तगत झाले, बराच मोठ्या उत्पन्नाचा मुलूख मिळाला, शत्रूची भीति कमी झाली, मलबार किनाऱ्यावर पूर्वी एखादें दुसरें बंदर इंग्रजांच्या ताब्यांत होतें त्या ऐवजीं भरभक्कम मुलूख ताब्यांत आला आणि मुंबई इलाख्याचा विस्तार वाढला. टिपूकडून अर्धेंच राज्य काढून घेऊन

ाकीचें अर्धे त्याचें त्यांजकडे ठेवण्यांत जी नेमस्तपणाची मुत्सद्दीगिरी दाखविण्यांत ाली आहे तिची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. पुरेसा मुलूख टिपूच्या ताब्यांत ऊन त्याला शेजाऱ्यांच्या तोलाचा बनण्यास वाव राहू दिला नसता तर हिंदुस्था- ंतील निरनिराळ्या रजवाड्यांच्या सत्तेची समता एकदम बिघडून अनेक नवीन द्धें उपस्थित झालीं असतीं. टिपूशीं झालेल्या तहानें आमचे जुनें व अनुभवानें खरें रलेलें (balance of Power) चें धोरण पुनः स्वीकारण्यांत आलें आहे."

यावरून टिपूशीं घडून आलेल्या तहानें प्रस्थापित झालेली हिंदुस्थानांतील ांतता बरीच वर्षें टिकेल असा तत्कालीन इंग्रजी इतिहासकाराचा अभिप्राय दिसतो. ढें अनेक अकल्पित घडामोडी झाल्यामुळें हा अभिप्राय खोटा ठरला हा भाग निराळा. ण दक्षिण हिंदुस्थानांत त्या वेळीं नांदणारीं चार सत्ताधारी राष्ट्रें बरोबरीच्या नात्यानें र्षें जगणार असा अंदाज हिंदी मुत्सद्याप्रमाणें इंग्रजी मुत्सद्यांचा देखील ोता ही बाब महत्वाची ठरते.

मराठ्यांचा हाच अभिप्राय होता असें म्हणण्यास चांगला आधार आहे. आपसां- ले तंटे सलोख्यानें मिटवून टाकतां येतील व त्या कामीं इंग्रजांनीं मनापासून मदत न ली तरी निदान ते आपणहून युद्धांची आग पेटविणार नाहींत असा त्यांचा अंदाज ोता. याच कल्पनेनें कार्नवालिसची एकांतीं गाठ घेऊन त्याचा अभिप्राय समजाऊन ्याचा हरीपंतानें प्रयत्न केला. पुण्यांतील मुत्सद्यापुढें त्या वेळीं दोन महत्वाचें प्रश्न ते. एक महादजी शिंद्यासंबंधानें व दुसरा निजामसंबंधानें. या दोनही प्रश्नासंबंधानें ा देण्यापलीकडे व तडजोडीसाठीं खटपट करण्यापलीकडे आपण कांहीं एक कर- र ना असें कार्नवालिसनें निक्षून सांगितल्यामुळें मराठ्यांचें समाधान झालें. राघो- चा पक्ष घेऊन ज्याप्रमाणें पूर्वीं इंग्रजांनीं ढवळाढवळ केली होती तशी पुनः यावेळीं रण्याची त्यांची सध्या तरी इच्छा दिसत नाहीं असा तात्पर्यार्थ हरीपंतानें काढला व त्या वेळेपुरता खरा होता. मराठ्यांना इंग्रजांची प्रत्यक्ष मदत नको होती; पण ांचें शत्रुत्वही त्यांना त्या वेळीं नको होतें. यामुळें मराठे व इंग्रज यांचें एवढ्या- रतें एकमत होतें. याचा परिणाम असा झाला कीं हरीपंत व कार्नवालीस यांचा ांगला सलोखा होऊन बऱ्याच मोकळेपणानें अनेक प्रश्नांचें बोलणें चालणें होऊं ागलें. या वेळीं कार्नवालीसविषयीं मराठ्यांचा किती चांगला अभिप्राय होता हें ोंदराव काळ्याच्या पत्रावरून दिसून येतें. तो म्हणतो " लाडसाहेब बहुत दुरंदेश

प्रामाणिक, बोलण्याची कायमी, संकोच, सहनशील, सर्व गोष्टी संपन्न. **असा इंग्र-जांत थोडा.** संबंध अशाशींच असावा. परंतु बंगाल्यांत चौ महिन्यांत जाऊन, तेथें चार महिने राहून, सर्व कामाचा बंदोबस्त करून आपण विलायतेस जाणार. पुन येणें समजतच आहे. (=येण्याचा संभव नाहीं.) वय साठ पासष्ट वर्षांचें. संपूर्ण केस पांढरे. **पुनरपि भेटीची आशा नाहीं.** "

यावरून कर्नवालीसची योग्यता मराठ्यांनीं चांगली ओळखली होती हें उघड आहे. क्लाइव्हपासून तों मॅकफर्सनपर्यंत जे इंग्रज कंपनीच्या कारभारासाठीं व नोकरीसाठीं हिंदुस्थानांत आले ते द्रव्यलोभी असून वचनाचे धड नाहींत, असा अनुभव आल्यामुळें मराठ्यांच्या मनांत त्यांच्याविषयीं फारसा चांगला अभिप्राय नव्हता; पण कार्नवालिस हा तोलून शब्द वापरणारा व शब्दाची किंमत जाणणारा आहे तेव्हा त्यानें केलेल्या कारारनाम्यावर व अभिवचनावर कांहींसा विश्वास ठेवण्यास हरकत नाहीं अशा अर्थानें कार्नवालिससारखा मनुष्य ' इंग्रजांत थोडा ' असें गोविंदराव काळ्यानें आपलें मत दिलें आहे.

उलटपक्षीं मराठ्यांबद्दल देखील कार्नवालीसच्या मनांत आदरभाव उत्पन्न झाला होता. त्यांच्याशीं कोणत्याही कारणानें तंटा उपस्थित करणें श्रेयस्कार नाहीं व निजामापेक्षां मराठ्यांचें बळ फारच अधिक आहे हें त्याला या स्वारींतील युद्धविषयक अनुभवानें कळून आलें होतें. यामुळें मराठ्यांचें मन दुखवेल असा शब्द न उच्चारण्याची त्यानें खबरदारी घेतलेली दिसते. मराठे व निजाम यांच्यामध्यें तंटा उपस्थित झाल्या वेळीं इंग्रजांनीं आपल्या बाजूनें लढण्यास तयार व्हावें असें बोलणें निजामानें अनेक वेळा काढलें होतें. त्याला मात्र निश्चित उत्तर कार्नवालिसच्या हातून देणें झालें नाहीं. मराठे व निजाम या दोघांनाही श्रीरंगपट्टणच्या स्वारींत सामील करून घ्यावयाचें असल्यामुळें त्याला हा विषय होता होईतोंवर टाळावयाचा होता. कारण मदत देऊं असें सांगावें तर मराठे तत्काळ बिथरतील; आणि देणार नाहीं असें स्पष्ट म्हणावें तर निजामाची निराशा होऊन तो गडबड करूं लागणार. याकरितां " ही स्वारी संपेपर्यंत हा विषय बोलणें बरें नव्हे; पण टिपूची भानगड संपली म्हणजे तुमच्या प्रश्नाचा चांगला विचार केल्यावाचून आम्ही राहणार नाहीं; " असें मोघम बोलणें कार्नवालिसच्या सांगण्याबरहुकूम हैद्राबादचा रेसिडेंट केनावे हा करीत असे. केनावेच्या या वेळच्या बोलण्यामुळें ' इंग्रज आज असा करार करण्यास तयार नसले त

प्रसंग उद्भवला म्हणजे आपला पक्ष उचलल्यावांचून राहणार नाहींत' अशी खात्री निजामास वाटू लागली होती. यामुळें त्यानें इंग्रजांचीं पलटणें आपल्या पदरीं ठेवण्याची, इंग्रजांना मदत करण्याची व त्यांच्या म्हणण्यास हरएक प्रसंगीं पाठिंबा देण्याची पद्धति ठेवली होती. तथापि निजामाची ही खात्री अस्थानीं होती. कारण 'आम्ही खात्रीनें मदतीस येऊं' असा स्पष्ट उच्चार केव्हांहि न करण्याबद्दल कार्नवालीस केनावेस वारंवार लिहीत असे. मात्र गुळमुळीत बोलणें बोलून, व व्यर्थी शब्द वापरून निजामाला मधाचें बोट लाऊन ठेवावें असा मात्र कार्नवालिसचा अभिप्राय होता.

अशा रीतीनें शब्दांत न सापडता आपला कार्यभाग उरकून घेण्याचें जें बुद्धिकौशल्य कार्नवालिसनें दाखविलें तेंच नवीन इंग्रजी मुत्सद्देगिरीचें चिन्ह होतें. आजपर्यंतची इंग्रजी मुत्सद्देगिरी गांवढळ स्वरूपाची होती. 'तांबड्या शाईचें लिहिणें आम्हांस बंधनकारक होत नसतें' हा क्लाइव्हचा युक्तिवाद; किंवा 'मुंबईकर इंग्रजांनीं केलेला करारनामा कलकत्तेकरांच्या हुकमावाचून झालेला असल्यामुळें त्या अटी कलकत्तेकर मानणार नाहींत' ही हेस्टिंग्जची सबब हिंदुस्थानांतल्या त्या वेळच्या लोकांना देखील चांगलीशीं पटली नाहीं. परंतु कार्नवालीसचें करणें मात्र वरच्या दर्जाचें आहे असें मराठ्यांना वाटलें. आपलें नुकसान न होऊं देण्यासाठीं व आपलें क्रियास्वातंत्र्य होईल तितकें कायम ठेवण्यासाठीं वाटेल तितकें जपून शब्द वापरण्याची प्रत्येक मुत्सद्यास मोकळीक असते; आणि याकरितां मुळींच करार करीत नाहीं असें म्हणण्यास देखील हरकत नसते. पण एकवेळ करार केल्यानंतर त्यांतील शब्दानें आपण बांधले गेलों हें ज्यास कबूल असेल त्याच्याशींच व्यवहार करणें शक्य आहे. अशा या व्यवहारांत निजाम फसला आणि तो असा फसावा या हेतूनें कार्नवालीस मोजके शब्द वापरीत होता. तरीहि त्याचा दोष कार्नवालीसकडे येऊं शकला नाहीं.

हा वाद या ठिकाणीं उपस्थित होण्याचें कारण असें कीं ही मोहीम संपल्यापासून (१७९२ च्या मार्चपासून) कार्नवालीस हिंदुस्थानांतून निघून जाईपर्यंतच १७९३ आगष्टपर्यंत) दीड वर्षांत दक्षिण हिंदुस्थानांत तहासंबंधीं एकसारखी चर्चा चालू होती. या वाटाघाटींपासून अखेर निश्चित असें कांहींच कलम ठरलें नाहीं. तथापि कार्नवालिस व महाराष्ट्रांतील मुत्सद्दी यांचें वाग्युद्ध चालु होतें एवढें मात्र स्पष्टपणें दिसतें. एकमेकास शब्दाच्या कैचींत पकडून ठेवण्यासाठीं दोघांचाहि प्रयत्न सुरू होता. परंतु दोघेहि मतलबास जागणारे व समबल असल्यामुळें हा लेखी तह

घडून आला नाहीं. दोन्ही पक्षाकडून शब्दाचा कीस पाडण्याच्या कामीं किती बारकाईची मेहेनत चालली होती यासंबंधींचा अस्सल पत्रव्यवहार रॉसनें प्रसिद्ध केलेल्या कार्नवालीसच्या पत्रव्यवहारांत व मराठ्यांच्या इतिहासाची साधनें खंड ७ मध्यें सविस्तरपणें आलेली आहे. पुढें दिलेलीं मराठीं अवतरणें ७ व्या खंडांतलीच आहेत.

या वाटाघाटीस प्रारंभ श्रीरंगपट्टणापासूनच झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. फाल्गुन व. १२ स टिपूच्या तहनाम्यावर सह्या झाल्या. तेव्हांपासून चैत्र वद्य ४ र्थी पर्यंत सरासरी तीन आठवडे कार्नवालीस, हरीपंत व मशीरुलमुल्क यांच्या अनेकवार भेटी झाल्या. या भेटी व प्रतिभेटी एकमेकांस मेजवान्यांचें निमंत्रण देण्यासाठीं व सामोपचाराचें बोलणें करण्यासाठीं चालू आहेत असा बाहेरून थाट असे. परंतु या बाह्य समारंभाच्या गडबडींत दोनचार घटका खासगी बैठकी होऊन महत्वाच्या राजकारणी प्रश्नांची चर्चा होत असे.

या वेळच्या तीन आठवड्यांची हकीकत भारत इ. सं. मंडळाच्या दप्तरीं असलेल्या एका अप्रकाशित पत्रांत दिलेली आहे; व ती तत्कालीन परिस्थितीची निदर्शक असल्यामुळें सारांशरूपानें येथें प्रथम देतों.

टिपूच्या दोन मुलांना बरोबर घेऊन त्रिवर्गांचीं सैन्यें श्रीरंगपट्टणाहून निघालीं तीं हुलिदुर्ग किल्यास आली. पण या मुकामास पोचण्यापूर्वी टिपूचा वकील गुलामअली यानें सांडणीस्वारामार्फत हरीपंताकडे चिठी पाठवून असें कळविलें कीं " कांहीं बोलावयाचें आहे. तें बोललें पाहिजे. डेऱ्यास येऊन बोलावें तर दुसऱ्यास संशय पडतो त्याकरिता मार्गांत घडलें पाहिजे. " त्यावरून 'बितिगिरा' नांवाच्या खेड्याजवळ गांठ घेण्याचें हरीपंतानें ठरविलें. त्याप्रमाणें गांठ पडून चार घटका उभयतांचें खलबत झालें. नंतर गुलामअली परस्पर निघून गेला, व हरीपंत लष्करांत दाखल झाला. नंतर नवली मुक्कामीं कार्नवालीस हरीपंताच्या भेटीस आला. चार घटका खलबत झालें. या खलबतांत " आम्हांस आतां निरोप देऊन मार्गस्त करावें. वैशाखमासापासून गलबतें वाऱ्याकरता चालणार नाहींत. आम्हांस कलकत्त्यास गेलें पाहिजे. बेंगरूळचें ठाणें खालीं करावयाचें; तेथें आठ दिवस लागतील; याकरता आमची रवानगी करावी " हें कार्नवालीस हरीपंताजवळ बोलला असा या पत्रांत बातमीदारानें खुलासा केला आहे.

हरीपंतानें निजामाच्या दरबारीं बरेच दिवस वागलेल्या गोविंदराव काळ्यास



महादजी शिंदे ऊर्फ पाटिलबावा

बोलावून आणून त्याचा सल्ला घेतला. कांहीं वेळ वाटाघाट झाल्यानंतर काळ्यानें मशीरुलमुलकाकडे जाऊन त्यांचें मत घेतलें. आणि सर्वांच्या मतें इंग्रजांना मेजवानी करून नंतर निरोप देण्याचें ठरलें. परंतु नवलीच्या तलावास पाणी थोडें; वैरण नाहीं व धान्यही महाग. याकरितां उत्तरदुर्गाजवळ कुणुरकुपकोटे येथें मेजवानी देण्याचा बेत कायम झाला.

अर्काटचा नबाब महमद अल्ली याजकडे जनार्दन शिवराम नांवाचा मराठ्यांचा वकील राहात असे. त्याला कांहीं उंची कापड खरेदी करून आपल्या भेटीस येण्याबद्दल हरीपंतांनीं आठ पंध्रा दिवसापूर्वी कळविलें होतें. त्याप्रमाणें मद्रास व चंदीचदावर येथें मिळणारें कापड घेऊन तो कुणुरकोपट्यास या वेळीं हजर झाला. या वकीलाबरोबर महमदअल्लीनें हरीपंतास व पांडुरंग बाबूराव बारामतीकर यांस पोषाख व दोन हत्ती भेटी दाखल पाठविले होते. ते दाखल करून घेऊन हरीपंत तात्यांची स्वारी निजामाकडील सरदार रावरंभा निंबाळकर यांचें येथें गेली. त्यांनीं तात्यास पोषाख, सिरपेच, जिगा व घोडा ही भेटीदाखल अर्पण करून विडे दिले. नंतर चैत्र शु. १३ रोजीं मराठ्यांच्या तर्फे इंग्रजास मेजवानी झाली. कार्नवालीस देखील वसि आसामी इंग्रज भोजनास आले होते. त्यांना वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे देऊन वाटेस लावले. नंतर दुसरे दिवशीं कार्नवालीस नवाबाच्या लष्करांत गेला होता. दोन घटका खलबत झालें. पुढें वद्य प्रतिपदेस निजामाचा सरदार पोलादजंग याला इंग्रजांनीं मेजवानीस बोलावलें. त्या वेळीं त्यांनीं वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे, दुरबीण, घड्याळ वगैरे जिन्नस देऊन निरोप दिला. संध्याकाळीं पोलादजंग टिपूच्या मुलाकडे मेजवानीस गेला.

नंतर दुसरे दिवशीं हरीपंत परत भेटीसाठीं इंग्रजी लष्करांत गेले होते. बरोबर कृष्णराव बळवंत, गोविंदराव कृष्ण काळे व बचाजीपंत मेंघळे होते. कार्नवालीस व हरीपंत यांचें दोन घटका खलबत झालें. नंतर त्यांणीं तात्यास पोषाख, जवाहीर, घोडा, हत्ती व बरोबरीच्या मंडळीसही योग्यतेनुसार पोषाख व अत्तरगुलाब देऊन मार्गस्थ केलें. तेथून टिपूच्या मुलांची भेट व त्यांचें आतिथ्य घेऊन हरीपंताची स्वारी परत डेऱ्यास आली. दुसरे दिवशीं चैत्र वद्य चतुर्थीस इंग्रज बेंगरूळच्या वाटेनें बहिरव दुर्गच्या मुकामास व हरीपंत शिवगंगेच्या मुकामास आले.

इंग्रजी सैन्य निघून गेल्यानंतर वाटेंत तीर्थस्नान करीत व सत्पुरुषांचे दर्शन

घेत हरीपंत बाळापूरमुक्कामीं लष्करांत दाखल झाले. पुढें मोंगली सरदाराच्या व मराठ्यांच्या भेटी परत भेटी व मेजवान्या झाल्या व ज्येष्ठ अवलीस मराठ्यांचें सैन्य पुण्यास पोचलें. *

या बाह्य समारंभाच्या वेळीं दोन चार घटका ज्या खासगी बैठकी होत त्यांत महत्वाच्या बाबींची चर्चा चालत असली पाहिजे. पण या खलबताची मराठ्यांनीं लिहिलेली हकीकत अद्याप उपलब्ध झाली नाहीं. तथापि कार्नवालिसनें हरीपंत व मोंगल यांच्या भेटीची हकीकत सीक्रेट कमिटीकडे मेच्या दोन तारखेस लिहून कळविली; व ती रॉसच्या ग्रंथांत दुसऱ्या खंडांत पृ. ५३८ वर दिली आहे. हें पत्र महत्वाचें असल्यामुळें त्याचा सारांश येथें देतो. कार्नवालीस म्हणतोः—

" गेल्या सात आठ महिन्यापासून आम्ही इकडे लढाईंत गुंतलों आहों या गोष्टींचा फायदा घेण्याच्या विचारांत महादजी शिंदे असावा आणि पेशवा व कंपनी या दोघांच्याही विरुद्ध कारस्थान उभारून आपली महत्वाकांक्षा पूर्ण करून घ्यावी

---

* या पत्रांत मराठे सरदार व निजामाचे सरदार यांमधील भेटींची व खलबताची बरीच हकीकत दिली आहे. परंतु विस्तारभयास्तव ती येथें दिली नाहीं. एका मुक्कामावर अकस्मात पावसानें गाठल्यामुळें लष्कराची जी धांदल उडाली तिचें वर्णन या पत्रांत आहे. तें गमतीचें असल्यामुळें येथें देतों. " (मेजवानीचा प्रसंग झाल्यानंतर) साहा घटका दिवस राहता स्वारी निवोन डेऱ्यास गेली. सरंजाम आणविला होता तो जिकडील तिकडे पावता करायास आज्ञा झाली. कांहीं सरंजाम रवाना केला. कांहीं पावता करावयाचा राहिला. तों वारा पर्जन्य आला. लष्कर बेसावध होतें, तेणेंकरून डेरे, राहुट्या, चांदण्यां, पालें पडलीं. सरकारचे कारखाने, जामदारखाना, दप्तरें, कोठी, खासे डेरे, वगैरे दरोबस्त पडले. जामदारखान्यांतील कापड व कागदपत्र दरोबस्त भिजले. दप्तराच्या कारकुनांनीं बुरणुस, मेणकापडे घालून रुमाल जगविले. बारा घटका रात्रपर्यंत राजश्री तात्या (= हरीपंत फडके) सखलादीची टोपी पांघरून उभे होते. वारा राहिला. मग राहुटी उभी करवून राहिले. " इतक्या आस्थेनें मराठ्यांनीं ' जगविलेले ' दप्तराचे रुमाल सध्या जिवंत आहेत किंवा मेले हें समजण्यास मार्ग नाहीं. परंतु सवाशें वर्षांपूर्वीं हरीपंतासारखा सेनापती स्वतः पावसाचा मारा सोसून कागदपत्रांची जोपासना करीत होता. पण तेच कागद गेल्या पन्नास वर्षांत वाण्याच्या दुकानीं पुड्या बांधण्याच्या कामीं खर्ची पडले किंवा वाळवीनें खाल्ले ! तथापि अजून देखील बरेच कागद ' जिवंत ' आहेत त्यांना अमर करण्याची कामगिरी चालू पिढीनें ओळखली पाहिजे.

अशी त्याची कांहीं खटपट चालू असावी असा अनेक कारणावरून मला संशय आलाच होता. पण शिंद्यास किंवा इतर मराठे सरदारास हा माझा संशय बोलून दाखविणें मला शहाणपणाचें वाटलें नाहीं. टिपूचा तह झाल्यानंतर लौकरच हरीपंतानें ' खासगी रीतीनें एकांतांत भेट घ्यावयाची आहे ' असें कळविलें. या भेटींत नमस्कार चमत्कार झाल्यानंतर त्यानें स्पष्टपणें असें सांगितलें कीं " शिंद्यानें निजाम, रघोजी भोसले व इतर कांहीं सरदार यांचें कूट जमवून दोस्तांनीं टिपूशीं चालविलेलें युद्ध जबरदस्तीनें थांबवावें अशी सूचना केली होती; याखेरीज पेशव्यांशीं शिंद्याचें वर्तन जसें असावें तसें नाहीं. तेव्हां महादजीनें जर कदाचित पेशव्याशीं बेफामपणाचें वर्तन करण्याचें मनांत आणलें तर इंग्रजांचें धोरण काय राहील; शिंदे व इंग्रज यांच्यामध्यें तह झालेले आहेत; तेव्हां त्या तहनाम्यांत शिंद्यास अशा प्रसंगीं मदत देण्याचें कलम इंग्रजांनीं मान्य केलेलें आहे किंवा काय; नसल्यास अशी मदत देण्याची आज इंग्रजांना इच्छा आहे किंवा नाहीं असा प्रश्न विचारून स्पष्टपणें उत्तर घेण्याबद्दल नाना फडणीस यांनीं मला सांगितलें आहे. " हरीपंतानें उल्लेखलेलें कलम आमच्या व शिंद्याच्यामध्यें झालेल्या तहनाम्यांत नाहीं, आणि शिंद्यानें अलीकडे काशी प्रांतांत दांडगाईचें वर्तन करून ज्या भानगडी उपस्थित केल्या आहेत त्यामुळें शिंद्यासंबंधीं माझ्या मनांत प्रतिकूल ग्रह झालेला आहे. यामुळें पेशवे व शिंदे यांच्या तंट्यांत शिंद्याची बाजू आम्ही मुळींच उचलणार नाहीं असें सांगून मोकळें होण्याची माझी इच्छा होती. पण शिंदे चुरडला जाण्यांत आमचें हित साधत नाहीं आणि ज्या शिंद्यामार्फत एके वेळीं मराठ्यांचा तह घडून आला त्या शिंद्याविषयीं अगदींच उदासीनपणा दाखविणें बरें दिसणार नाहीं असें समजून " तुम्ही म्हणता असें वर्तन शिंद्याकडून घडेल हेंच मला खरें वाटत नाहीं. आणि असें झालेंच तर दोघांत तडजोड घडवून आणण्याची मी मनापासून खटपट करीन. पण पुणें दरबार व इंग्रज यांच्या मधील चालू स्नेहसंबंध कायम असेंपर्यंत कांहींही झालें तरी तुमच्या घरगुती भांडणांत स्नेही या नात्यानें मध्यस्ती करण्यापलीकडे आम्ही अधिक हात घालणार नाहीं एवढें मात्र तुम्ही नाना फडणीसांना खात्रीलायक कळवून ठेवा " असें उत्तर दिलें. या उत्तरानें आपलें समाधान झालें व ही गोष्ट गुप्त असल्यामुळें तिची वाच्यता मॅलेटकडून होऊं नये एवढें सांगून हरीपंत निघून गेला. "

या पत्रावरून नाना व महादजी यांनीं आपसांतल्या भांडणाच्या भरीं पडून स्वतंत्रपणें इंग्रजांची मदत मागितली व तिच्या आधारावर ते एकमेकांचा पाडाव करूं पहात होते असे अनेक तर्क काढण्यांत आले आहेत. पण ते चुकीचे आहेत. टिपूच्या युद्धांत मराठ्यांनीं इंग्रजास सहाय केलें ही नानांची चूक आहे असें वाटत असल्यामुळें महादजी दक्षिणेंत येत आहे, ही गोष्ट त्या वेळीं सर्वश्रुत होती. तेव्हां ती कार्नवालीसजवळ बोलण्यांत हरीपंतानें एखादी गुप्त गोष्ट सांगितली असें होत नाहीं. फक्त नाना व महादजी यांच्या मतभेदाचा फायदा घेण्यासाठीं इंग्रज टपलेले आहेत किंवा काय याचा अंदाज पाहण्यासाठीं हरीपंतानें हा विषय काढला होता. या संभाषणास हरीपंत अगर नाना फडणीस यांनीं फाजील महत्व दिलें असेल असें दिसत नाहीं. निदान महादजींचा पाडाव करण्यासाठी इंग्रजांनीं आम्हांस पलटणें पुरवावीं असा तरी हरीपंताच्या बोलण्यांतून ध्वनि निघत नाहीं हें निःसंशय आहे.

महादजी शिंद्यानें देखील उत्तरेकडून निघतांना इंग्रजाकडे पलटणाची मागणी केली होती. परंतु आपण दक्षिणेकडे गेल्या वेळीं इंग्रजांचा व आपला स्नेह आहे असें दाखविता आल्यास रजपूत राजे बंडेबखेडे करणार नाहींत अशा अंदाजानें शिंद्यानें हीं पलटणें मागितली होतीं. नाना विरुद्ध ती वापरण्याचा त्याचा हेतु होता असें मानण्यास मुळींच आधार नाहीं. सारांश नाना व महादजी यांच्या मधील मतभेद कितीही विकोपास गेला तरी त्याचा फायदा इंग्रजांना मिळणें शक्य नव्हतें.*

तथापि इंग्रजाशी कोणत्या धोरणानें वागावें याबद्दल नाना व महादजी यांच्या मतांत कांहींसा भेद होता. इंग्रज, निजाम व टिपू हे तिघेहि आपल्या बरोबरीचे संस्थानिक असल्यामुळें तीघांशींही तहनामे करून आपसांतले तंटे होता होईतोंवर सलोख्यानें मिटविण्याचा प्रयत्न करावा; व मराठ्यांच्या विरुद्ध आपण कोणास मदत करणार नाहीं अशी कबूली इंग्रजाकडून घेऊन ठेवावी हा नानांचा अभिप्राय. पण शिंद्यांचें मत निराळें होतें. मराठमंडळांतील सर्व सरदारांचें एकमत करून व प्रसंगोपात टिपूशीं तह करून देखील इंग्रजांना शह देण्याचा जोराचा

* स्वतः कार्नवालीसनें देखील विलायतेस जाण्यापूर्वीं १७९३ च्या मे १८ तारखेस या भांडणासंबंधीं 'It will not come to extremity' असें मत दिलें आहे.

प्रयत्न केला पाहिजे असें शिंद्यानीं निश्चितपणें ठरविलें होतें. त्यानीं निजामाच्या वकीलाजवळ हें उघडपणें बोलूनही दाखविलें. एवढेंच नव्हें तर निजामानें देखील इंग्रजाशीं दोस्तीचा तह करूं नये असा सल्ला दिला.*

सर्व मराठमंडळाचें ऐक्य घडवून आणून आणि निजाम व टिपू यांच्याशी दोस्ती करून इंग्रजांस जोराचा शह द्यावा ही शिंद्यांची कल्पना नानांना देखील सर्वतोपरी मान्य होती. पण ती घडवून आणण्यास शिंद्यांची जाहीर भाषणाची पद्धत उपयोगी पडेल असें त्यांना वाटत नव्हतें. निजामाच्या मनाचा ओढा इंग्रजाकडे आहे व तो ऐन वेळीं मराठ्यांच्या विरुद्ध उभा राहील असा त्यांचा अंदाज असल्यामुळें शिंद्यांनीं इंग्रजाविषयीं विरुद्ध उद्गार काढणें गैर फायद्याचे आहेत; एवढेंच नव्हे तर असें करण्यानें इंग्रज निजामाशी दोस्तीचा तह करतील आणि सर्व कारस्थान भलत्या थरास जाईल असें त्यांना वाटत असावें. या वेळीं निजामास इंग्रजाकडून आपणाकडे कसा ओढावयाचा हा काय तो मराठी मुत्सद्यापुढें प्रश्न होता. नाना व महादजी यांच्यांत जो मतभेद होता व ज्याप्रीत्यर्थ खडाजंगीचा वाद होऊन या दोन मुत्सद्यांच्या हेतुसंबंधी भलत्या बातम्या पसरल्या त्याच्यामुळाशीं हें निजाम-प्रकर्ण होतें. हा मुद्दा निजामाजवळ बोलून दाखवावा किंवा नाहीं या नाजूक प्रश्नाचा निर्णय होईना. शेवटीं ही गोष्ट लेखी न देतां गोविंदराव काळ्यानें बोलून पहावी असें ठरलें. पण या बोलण्याची जबाबदारी आपल्या शिरावर नाहीं; यापुढें सर्व पत्रव्यवहार स्वतः सवाई माधवराव यांच्याशीच व्हावा,

† The councils of the Peishwah were at this period much swayed by Madhajee Scindia who was known to cherish views hostile to the general peace of India over which it was his avowed ambition to reastablish the Maratha authority. In a conference, which that chief had with the agent of the Nizam at Poona, he did not hesitate to state, in the most public manner, his dislike to the guarantee treaty; and to advise the Nizam not to enter into any such engagements with the British Government, of whose intentions, he said, he entertained the greatest suspicions.

(Malcom's History of India, p. 145.)

राजकारणाची पत्रें आपल्या (नानांच्या) नांवें येऊं नयेत असें नानांनीं गोविंदरावास स्वच्छ लिहिलें होतें. अर्थात शिंद्यांचें मत म्हणून ही गोष्ट निजामाकडे काढण्याचें ठरलें. "पाटीलबावांचें म्हणणें दौलतीचें दार्ढ्याचें. परंतु सर्वांची एकवाक्यता होऊन घडणें कठीण! याजकरिता नाना म्हणतात हेंच खरें. परंतु त्यांतहि एखादी दरज राखून जाल्यास चांगलें. संकट आहे. केवळ हात बांधून देणें हेंहि चांगलें नाहीं" अशा विचारानें तो कांहींसा घोटाळला. परंतु त्यानें निजामास निरोप पोंचविला. तो ऐकून घेऊन निजामानें वकीलामार्फत शिंद्यांच्या म्हणण्यास गुळमुळीत उत्तर दिलें. तो म्हणाला "टिपू खुष्कींतील सरदार. यास टाकून इंग्रज टोपीवाले यांसी दोस्ती व येगानगत ठेवावी याची कांहीं हाऊस नाहीं. परंतु टिपू कोणेवेळेस काय करील याचा भरंवसाच येईना. याजकरिता इंग्रजासी इतकी बळकटी करणें प्राप्त. टिपूचाहि भरंवसा नाहीं आणि इंग्रजास दुखवावें हें तुमचे व आमचे दोन्ही दौलतीस सलाह नाहीं." [म. इ. सा. खंड ७ पृष्ठ ११ पहा]

यावरून शिंद्यांचा हेतु आपणास मान्य आहे; परंतु टिपूच्या विश्वासावर कोणतीहि मसलत उभारणें धोक्याचें असल्यामुळें इंग्रजांना दुखविण्याचा विचार आपणास मान्य नाहीं असें निजामाच्या म्हणण्याचें तात्पर्य दिसलें. तेव्हां शिंद्यांचा अंदाज चुकीचा ठरला. तथापि हें सर्वच राजकारण दुरोखी असल्यामुळें हें उत्तर आलें तर काय करावयाचें याचीहि योजना आधीं झालेली होती. कारण 'सरकारांत राजश्री पाटीलबावासहित विचार झाला. या प्रमाणेंच नबाबांनीं मान्य करावें' असें सांगून नानांना ही मसलत संमत आहे किंवा नाहीं हें संदिग्ध ठेवण्यांत आलें होतें. तो संदिग्धपणा मध्यस्तामार्फत दूर करण्यांत आला, आणि "नबाबसाहेब फर्मावितात त्याचप्रमाणें नानांच्या मनांत. सात कलमें इंग्रजांकडील न ठरवितां मुख्य एकच कलमाचा करार करावा ऐसा आग्रह नानांचा नाहीं. परंतु महादजीराव शिंदे व हरीपंडितजी यांनीं हे शकल काहाडून समजाविलें असेल" असें सांगण्यांत आलें. नाना व शिंदे यांच्यामधील मतभेदाचा बोभाटा केवळ लौकिकी असो किंवा त्यांत कांहीं सत्यांश असो. पण इंग्रजाविरुद्ध कारस्थान उभारल्यास त्यांत निजाम सामील होईल किंवा नाहीं हें अजमाऊन पाहण्यास हा बोभाटा चांगला उपयोगी पडला. कारण निजामाची इच्छा कळून येतांच नाना व शिंदे यांचा तंटा संपून पुनः नानांच्या मतानुसार शिंदे वागण्यास तयार झाल्याचें जाहीर झालें.

यावेळीं इंग्रजांनीं आपलें धोरण तटस्थपणा (Neutrality, Non-intervention) किंवा सावधानता या शब्दांत जाहीर केलें. पण मराठ्यांचें या वेळचें धोरण यापेक्षा कांहिसें धडाडीचें होतें. गेल्या दोन वर्षांत दक्षिण हिंदुस्थानांत जें स्थित्यंतर घडून आलें त्यामुळें दोघांच्या वजनांत पुष्कळ फरक पडला होता. श्रीरंगपट्टणच्या स्वारीस सुरुवात झाली तेव्हां मराठे, इंग्रज, टिपू व निजाम यांचें बलाबलं ठरविण्याचा प्रयत्न कोणी केला असता तर निजामाचा चौथा नंबर सहज ठरला असता. बाकीचे तिघे मात्र इतके सारख्या वजनाचे दिसत होते कीं त्यांत उजवा डावा ठरविणें कठीण पडलें असतें. परंतु युद्ध जुंपल्यानंतर टिपू व इंग्रज यांची झोंबी प्रथम बरेच दिवस लागली आणि दोघांचेहि अतोनात नुकसान झालें. यानंतर मराठे मदतीस आले आणि दोस्तांचा जय होऊन टिपूचा पूर्ण पराभव झाला. इतकेंच नव्हे तर त्याला अर्धें राज्य व जबर खंडणी देऊन तह करणें भाग पडलें. यामुळें युद्धांत अखेर टिपूचें पारडें तर हलकें झालेंच. पण थकलेल्या इंग्रजापेक्षा मराठ्यांचें सामर्थ्य अधीक असावें असा संशय सर्वांना येऊं लागला. मराठ्यांच्या या वाढत्या वजनाचें निजामास फार भय वाटत असे. तेव्हां इंग्रज व मराठे यांची झोंबी लाऊन आणि आपणहि त्यांत इंग्रजांच्या वतीनें सामील होऊन मराठ्यांना हलके करावें हा निजामाच्या कारस्थानाचा रोख होता.. परंतु निजामाप्रीत्यर्थ मराठ्यांचें वितुष्ट पत्करण्याची इंग्रजांची तयारी नव्हती. यामुळें निजामास आपला ठाव लागूं न देतां दुटप्पी अर्थाचीं उत्तरें देणें कार्नवालीसला भाग पडलें. या उत्तरानें निजामाचा भलता समज झाला तरीहि पत्करेल पण आपण मराठ्याविरुद्ध साक्षात किंवा पर्यायानें कांहीं एक बोलावयाचें नाहीं हा कार्नवालीसचा कृतनिश्चय झालेला दिसतो. यामुळें तह ठरून सैन्यें परत फिरलीं व आठ पंध्रा दिवस समक्ष वाटाघाट झाली, तेव्हां मराठे व इंग्रज यांचे संबंध फार सलोख्याचे होते.

यानंतर दोन चार महिन्यांत महादजी शिंदे पुण्यास येऊन पोचले. व 'इंग्रजांना सध्या सवड न देतां मराठमंडळाचें सामर्थ्य एकवटून आणि निजाम व टिपू यांना सामील करून घेऊन याच वेळीं इंग्रजांना शह द्यावा' असा त्यांचा आग्रह पडला. याप्रमाणें इंग्रजाविरुद्ध उभारल्या जाणाऱ्या कारस्थानांत सामील होण्यास टिपू एका पायावर तयार होता. गेल्या स्वारींत टिपूशीं तह घडवून आणण्याचा प्रयत्न मराठ्यांनीं अनेक वेळा केलेला असल्यामुळें तो आपणास मदत

पोंचविल याबद्दल मराठ्यांना संशय नव्हता. परंतु निजाम या कारस्थानांत सामील होईल किंवा नाहीं याची शंका होती. ' त्याच्याशीं हें बोलणें करणें देखील धोक्याचें आहे व तो इंग्रजांना हें कळविल्यावांचून राहणार नाहीं ' असा नानांचा अंजाद. पण शिंद्यांनीं निजामाचें या बाबतींत मत काय आहे हें समक्ष विचारण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली; आणि हें जोखमीचें कारस्थान करून पहावें असें सवाई माधवराव व हरीपंत यांनाहि वाटलें. आणि शेवटीं हाच बेत कायम झाला. पण नानांचेंच अनुमान शेवटीं खरें ठरलें. एवढेंच नव्हें, तर चौथाई प्रकरणाचा तंटा विकोपास नेण्याचा त्याचा विचार दिसला. तेव्हां मराठमंडळाचें ऐक्य करून निजामास प्रथम वठणीवर आणण्याचें धोरण ठरवावें लागलें.

या धोरणाचा रोख दुहेरी होता. निजामावर स्वारी करण्यासाठीं इतकी तयारी करावयाची; कीं तिच्या जोरावर इंग्रज व निजाम या दोघांशींही सामना देण्यास हरकत पडूं नये; पण कदाचित इंग्रजांनीं तटस्थपणा पत्करण्याचा निश्चय कायम ठेवला तरीहि निजाम बुडाल्यामुळें ते कांहींसे लुले पडावे ! सारांश इंग्रज व मराठे यांच्या भावी युद्धांत इंग्रजांच्या वतीनें निजामानें पडूं नये व टिपू आणि मराठे यांनीं शिरजोर होऊं पाहणाऱ्या इंग्रजांना कमजोर करावें अशा स्वरुपाचें धोरण यावेळीं मराठ्यांच्या अंतःकरणांत घोळत होतें. यालाच **दुरोखी** धोरण अशी संज्ञा देता येते. इंग्रज आपणाविरुद्ध सामन्यास उभे राहोत किंवा न राहोत; त्यांनीं कोणताहि पक्ष पत्करला तरीहि अखेरीस मराठ्यांचेंच वजन व सामर्थ्य वाढलें पाहिजे असा या दुरकी किंवा दुरोखी शद्बाचा अर्थ होता. इंग्रजांच्या दुटप्पी धोरणास किंवा सावधानतेस हें दुरोखी धोरणाचें उत्तर अत्यंत समर्पक होतें. ही स्वारी चालू झाल्यापासून या धोरणाची कल्पना मराठ्यांना सुचली; आणि तिचा पूर्ण विचार होऊन (स्वारी संपली तेव्हां) हें धोरण परिपक्वतेस आलें. इंग्रजांच्या तोडीस तोड करण्याचें सामर्थ्य या धोरणांत होतें.

श्रीरंगपट्टणच्या' स्वारीचें वर्णन व विवेचन या ठिकाणीं संपलें. तेव्हां या पुढील प्रसंग येथें देण्याचें कारण नाहीं.

समाप्त.